प. पू. सदगुरु सांब दिक्षित लिखित

# ।। चिदंबर महागुरुचरित्र ।।



मङ्गलाचरणम्



त्याचपरी आतां चिदम्बर । मूळनामें धरोनि अवतार ।
अगाध महिमा दाविला महीवर । सद्‌गुरूपरात्पर सर्वांसि जो ।।

चिदम्बरचरित्र अध्याय पहिला

आकाशचिदम्बरमहिमवर्णनम्



तव आठवलें शंकरवचन । राजा जाहला सावधान ।
मुखपसरोनि जो उभा ब्राह्मण । धीरे रस ओती त्याचे मुखीं ।।

चिदम्बरचरित्र अध्याय दुसरा

चिदम्बरावतारवर्णनम्



तेज फाकत सूर्यापरी । सर्वालंकार ल्याइले सर्वगात्रीं ।
तैसेची शोभति दक्षिणश्रोत्री । बिल्वमंजरी शुभ्राक्षता ।।

चिदम्बरचरित्र अध्याय तिसरा

बाललीलावर्णनम्



मातींत जे होते दगडगुंडे । ते जाहले मवाळ पेढे ।
जे जे होते लहान खडे । जे जाहले खडीसाखर ।।

चिदम्बरचरित्र अध्याय चवथा

गजगौरीकथानिरूपणम्



हाती अक्षता घेवोनि ब्रह्मचारी । प्राणप्रतिष्ठा आरम्भित :
जवळ आला गज म्हणोनि । स्त्रीजन धावति भिवोनि ।।

चिदम्बरचरित्र अध्याय पांचवा

मृतवृषभसज्जीवनम्



हातिचा पुढें करोनि झारी । श्रृंगादि पुच्छापर्यंत वृषावरी ।
वरदहस्तें प्रोक्षोनि वारी । थापटी पृष्ठावरी तीन वेळ ।।

चिदम्बरचरित्र अध्याय सहावा

## चिदम्बरविवाहमहोत्सववर्णनम्



ज्यापरी असे कैलासी । त्याचपरी भूलोकीं परियेसी ।
घेऊनिया दोघी स्त्रियांसी । शोभतसे चिदम्बर ।।

चिदम्बरचरित्र (याभूळगांव येथील मूर्ती) अध्याय सातवा

## टिपूमदभङ्गः



हत्ती घोडे पायदळ । गेले यमलोका सकळ ।
टिपूचे दोन्ही बुबुळ । अवचित पडले मेदिनीवरी ।।

चिदम्बरचरित्र अध्याय आठवा

## तैलिकाख्यानम्



तेथें उखळ काढोनि घट घेई । आधीं नासाभरण तूं लेई ।
मग द्रव्य सर्वही । पुत्रासि देई विभागोनि ।।

चिदम्बरचरित्र अध्याय नववा

## शुष्कवाप्यां निर्झरोत्पत्तिः



हात जोडोनि चिदम्बर । गंगा स्तविता झाला चमत्कार ।
तेथें निघत एक निर्झर । जानुमात्र जल आले ।।

चिदम्बरचरित्र अध्याय दहावा

## मृतकन्यासज्जीवनम्



देवालयीं प्रकट होवोनि । भस्म घालोनि कन्यावदनीं ।
कमंडलूंतील उदक सिंपोनि । कन्येसि तत्क्षणीं उठविली ।।

चिदम्बरचरित्र अध्याय अकरावा

## खलनिग्रहपूर्वकसदनुग्रहः



हतशेष रत्नाकरदळभार । दशदिशा सत्वर पळाला ।
धोंडोपंते भाला घेवोनि त्वरित । वेगे शत्रुहृदयीं मारिला ।।

चिदम्बरचरित्र अध्याय बारावा

व्यङ्कटेशकामपूरणम्



मग आणोनि पांचवर । देवापुढें ठेवोनि चिदम्बर ।
सांगे बाबासि निर्धार । गिरीवरचि हे पहा ।।

चिदम्बरचरित्र अध्याय तेरावा

पठाणरूपेण व्यङ्कटेशसमागमः



आकर्णनेत्र सुहास्यवदन । स्वामीसी देखतां दुरून ।
झडकरी येतसे धावोन । देती आलिंगन स्वामी त्यासी ।।

चिदम्बरचरित्र अध्याय पंधरावा

व्याघ्ररूपेण चोरमारणम्



ऐसी विप्र करिता प्रार्थना । कृपाळू आला दीक्षितराणा ।
व्याघ्ररूपें दुष्टसंहरणा । करितसे गर्जना भैरनादें ।।

चिदम्बरचरित्र अध्याय सतरावा

विप्रदुर्मतिहरणम्



तंव जाहला चमत्कार । कलशांतुनी पडले प्रखर ।
दीर्घ पुच्छ वृश्चिक अपार । सहस्त्रावधी परियेसा ।।

चिदम्बरचरित्र अध्याय चौदावा

शिवशास्त्रिणे शिवरूपप्रदर्शनम्



जरी असे हा सदाशिव । म्यां केला असेल शिवस्तव ।
कर्पूरांगि शीतलत्व । येवोनिया राहो ।।

चिदम्बरचरित्र अध्याय सोळावा

बालमुखेन पण्डितगर्वहरणम्



काशीक्षेत्रीचे थोर ब्राह्मण । परिक्षा घ्यावयासि आले जाण ।
त्यासी परिक्षा ध्यावी आपण । वेद म्हणोन दाविजे ।।

चिदम्बरचरित्र अध्याय अठरावा

गयावलाय सहस्त्ररूप्यकप्रदानम्



गयावळ पत्र काढोनि सुरस । ठेवी सभाजनां पुढें ।। ऐसे म्हणता चिदम्बर ।
ब्राह्मणासि रुपये सहस्त्र । देवोनि गयेसि पाठविला ।।

चिदम्बरचरित्र अध्याय एकोणिसावा

जलाज्यकरणम्



ऐकूनि स्वामीची भारती । शतघट घेवोनि स्कंधावरती ।
घटखाली ठेवोनि जंव पाहती । दिसती सर्वही घृतभरित ।।

चिदम्बरचरित्र अध्याय विसावा

राजारामाय अरण्येमार्गदर्शनम्



तंववाळ बोले सुमंद हसित । वन असे भयानक अद्भुत ।
येथें दिशा चुकोनि घाबरति पांथ । मार्गदर्शक मी त्यांसी ।।

चिदम्बरचरित्र अध्याय एकविसावा

राजारामाय उपदेशः



ऐकोनि म्हणे भक्तराज । एकांती सांगेन निजगुजः
एकांतीं बैसोनि द्विजराज । मस्तकी हस्त ठेविती ।।

चिदम्बरचरित्र अध्याय बाविसावा

नाशिकक्षेत्रे चिदम्बरलीलाप्रकटनम्



गुरूपादुका पुजोनि विध्युक्त । बैसला पादुकी तुळसी वाहत ।:
विप्र खवळोनि बहुवसी । मारावया येतां भक्तासि ।।

चिदम्बरचरित्र अध्याय तेविसावा

मान्त्रिकगर्वहरणम्



हतगर्व होवोनि चिदम्बराला । शरण रिघाला पश्चात्तापे :
हात टेकूनि शिष्यस्कंधी । आला गुरूचे अंगणी ।।

चिदम्बरचरित्र अध्याय चोविसावा

वैष्णवानां विष्णुरूपदर्शनम्



मग सूदे चिदम्बरापुढें । शालिग्राम ओतिले रोकडे : शालिग्राम ओळखोनि घ्यावे ।
घेऊनि स्वस्थळा सुखे जावे : त्यांची भक्ती पाहूनि विशदू । रूप अगादू दाविता झाला ।।

चिदम्बरचरित्र अध्याय पंचविसावा

व्याघ्राच्छिशुसंरक्षणम्



माते मजवरी विश्वास ठेवोन । जावोनि बाळक माग व्याघ्रास ।
व्याघ्रापुढें हस्त पसरोनि । निर्भय मनीं मागे ती ।।

चिदम्बरचरित्र अध्याय सत्ताविसावा

शिवेन चिदम्बरनाममहात्म्यकथनम्



हरी करित पूजा गोमटी । मध्यें शोभे देव शंभू । या वीस नामांत ।
मोक्षदायक शक्ती अदभुत । चिदम्बरनाम श्रेष्ठ यांत । उपजे प्रणव जेथूनि ।

चिदम्बरचरित्र अध्याय एकोणतिसावा

पाण्डुरङ्गेण स्वभक्ताय स्वप्ने कथनम्



दयाळू पंढरीनाथ । येऊनि सांगे द्विजा स्वप्नांत : मुरगोडी श्रीचिदम्बर ।
त्याचे दर्शनमात्रें निर्धार । दैन्यसंहार होय तुझा ।।

चिदम्बरचरित्र अध्याय सव्विसावा

हरिदासमदभञ्जनम्



तिम्मप्पा श्रीगुरूनाम गर्जोनि । कीर्तन आरंभितसे तत्क्षणीं ।
तटस्थ जाहले सर्व मनी । बैसले फिरोनि सभाजन ।।

चिदम्बरचरित्र अध्याय अठ्ठाविसावा

रिक्तभूखातपूरणं दुर्भिक्षनिवारणं च



सर्व पेंव उकरोनि पाही । धान्यराशी केली एक्य ठायी: भक्तवचन परिसतां जन ।
एकापुढे एक सरे जाण । धाविन्नले चहू कडोन । धान्य लुटति यथेच्छ।।

चिदम्बरचरित्र अध्याय तिसावा

अन्नपूर्णाप्रकटनम्



मग माकणीवरी घट ठेविती । सवेचि जळपूर्ण घट दिसती ।
खाली उतरवोनि जलसमर्पिती । चारसहस्त्र जनां तेंव्हा

चिदम्बरचरित्र अध्याय एकतिसावा

द्विजव्रणनिवारणम्



तया पुसे श्रीगुरू । व्रण दावी सावरू : द्विज ऐकोनि स्वामीवचनातें ।
बंधन उकलोनि व्रणातें । पाहता व्रणचिन्हही तेथें । न दिसता विस्मय पावला ।।

चिदम्बरचरित्र अध्याय बत्तिसावा

घण्टारवगर्वखण्डणम्



इकडे पांच वर्षाचा मुका । स्वामीपुढें उभा होता देखा ।
त्यासी बोलावोनि सावित्रीसखा । मुखीं विभूती घालित ।।

चिदम्बरचरित्र अध्याय तेहतिसावा

यज्ञोपोद्धातवर्णनम्



राजसूयसमक्रतू । आपण कराल निश्चतू मलापहातटी गोण्णागर:
असे आम्रवनही विस्तीर्ण: सर्वजनासि छाया जळ: आणि वासार्थ विशालस्थळ:

चिदम्बरचरित्र अध्याय चवतिसावा

यज्ञपूर्वाङ्गकथनम्



शके सत्राशे एकोणतीसि । प्रभव संवत्सरी चैत्रमासी ।
शुक्लप्रतिपदा सोमदिवशी । आरंभी यज्ञासि दीक्षितेंद्र ।।

चिदम्बरचरित्र अध्याय पसतिसावा

यज्ञवर्णनम्



पंचकुंड सुशोभित । अहंपशूचा करोनि घात ।
कर्मयज्ञ लौकिकार्थ । करोनिया दाविला ।।

चिदम्बरचरित्र अध्याय छत्तिसावा

यज्ञावभृथवर्णनम्



स्वामी करिता गंगास्तुती । प्रकटली गंगेची चित्रकृती : पूर्वी होते जानूमात्र जळ ।
ते नाभिमात्र वाढले तत्काळ । आबालवृद्धासी सकळ । न्यूनाधिक न दिसे ।।

चिदम्बरचरित्र    अध्याय सदतिसावा

कायिकयज्ञवर्णनम्



प्रातःकाळी स्नान । वेदपाठ नित्यकर्मानुष्ठान । भक्तीनें करी अन्नदान ।
शिवाराधना तीर्थयात्रा : एवमादि सत्कर्मासि । कर्मयज्ञनामे परियेसी :

चिदम्बरचरित्र    अध्याय अडतिसावा

रूद्राक्षमहिन्मा गर्दभस्यशिवलोकप्राप्तिः



गर्दभ जाहला दुर्बळ । भार न साहता केवळ । मुहूर्तमात्र तडफडत ।
खर तेधवां प्राण सोडत । तव येवोनि माझे दूत । विमानी त्यासि बैसविती

चिदम्बरचरित्र    अध्याय एकोणचाळिसावा

भस्ममहिन्मा पतितस्यकैलासगमनम्



गांवाबाहेर टाकिलें प्रेत । कोणी संस्कार न करित : प्रेतांगी शिवद्वारीचे भस्म ।
श्वानयोगें लागता पापस्तोम । जळोनि होत पुण्यात्म । तेणे शिवदूती विमानीं वाहिले ।।

चिदम्बरचरित्र    अध्याय चाळिसावा

नृपेभ्यो ब्रह्मोपदेशः



भूपालहो तुम्हासी । संक्षेपें सांगीतले यज्ञत्रयासी : श्रीगुरूबोध रसाळ ।
ऐकतां सर्वही भूमिपाळ । आनंदसागरी बुडोनि केवळ । बैसले ते शांतचित्ते ।।

चिदम्बरचरित्र    अध्याय एकेचाळिसावा

बाजीरावेण सद्गुरूप्रसादत्याग :



बहुतांचे अन्न तुझे पदरीं । प्रसाद बांधोनि वस्त्री । निजमंदिरापर्यंत नेई:
स्वामीवचन ऐकतांही भूनाथ । फलमंत्राक्षता घालितां पदरांत । प्रसाद टाकित दासपदरी ।।

चिदम्बरचरित्र    अध्याय बेचाळिसावा

चतुर्भुजाख्यानम्



पाक केला क्षण न लागतां । द्विजेंद्राने त्या स्थळीं : तुझा संकल्प सिद्ध झाला ।
ऊठ सत्वर भोजनाला । म्हणोनि राव भोजनार्थ बैसला । साशंक चित्त जेवताही

चिदम्बरचरित्र अध्याय त्रेचाळिसावा

सन्यासिने रामेश्वरस्वरूपप्रकटनम्



संपता एकेक आवर्तन । हस्तें करी स्पर्शन । तव दीक्षित न दिसतां जाण ।
लागत हातासि दिव्यलिंग ।। आहे कैसे रामलिंग । डोळे भरून पाहूं म्हणे ।

चिदम्बरचरित्र अध्याय चव्वेचाळिसावा

संसारचन्दरोगनिवारणम्



चिदम्बरा ऐसे म्हणोनि । उडी टाकी दुर्गावरूनि । तव प्रकटला दयाखाणी ।
राजरक्षणीं चिदम्बर ।। खाली मंचक असे विशाल । गादी अंथरलीसे मृदुलः

चिदम्बरचरित्र अध्याय पंचेचाळिसावा

विधवासौभाग्यप्रदानम्



तीसि पाहतां दीक्षितमौळी । आशीर्वाद बोलत ते वेळी ।
अष्टपुत्रवती हो बाळी । सौभाग्यवती ऊठ म्हणे ।

चिदम्बरचरित्र अध्याय सेहेचाळिसावा

मृतब्राह्मणसज्जीवनम्



शिलाघातें तो ब्राह्मण । ढेकणापरी झाला चूर्ण : शिथिलांगाचे करोनि संधान ।
मृत्यंजय मंत्र जपाने : त्यासी धरोनि श्रीदीक्षित । बाहेर येत हात धरोनि ।।

चिदम्बरचरित्र अध्याय सत्तेचाळिसावा

वृक्षमूले व्यङ्कटेशमूर्तिदर्शनम्



सर्वासि संबोखोनि विश्वंभरू । व्यंकटेशमूर्ती काढोनि बाहेरू ।
अर्चा करोनि प्रीतिपुरःसरु । चिदम्बरी विश्वासू ठेवित

चिदम्बरचरित्र अध्याय अठ्ठेचाळिसावा

बन्धितपतिव्रतायै चिदम्बरदर्शनम्



पातिव्रत्यपुण्य मजजवळीं । कांही असेल गुरूमाउली । मज भेट देई येवेळी :
इत्यादी स्मरत असता अंतरी । श्रीगुरु प्रकटला माझघरी । अवचित दृष्टीपुढे

चिदम्बरचरित्र अध्याय एकोणपन्नासावा

चिदम्बरलिङ्गावतारवर्णनम्



सुब्रह्मण्यक्षेत्री वसतो सांप्रत । अश्वत्थतळी लिंगरूपें :
कैंगेरीक्षेत्रीं लिंगस्थापन करी । भक्तकाम पुरविण्या । प्रत्यक्ष जागतो लिंगस्थानी ।

चिदम्बरचरित्र अध्याय पन्नासावा





# ॥ चिदम्बर महागुरु चरित्र॥

श्री. चिदम्बर महागुरुचरित्र
*
प्रकाशक
अर्चित प्रकाशन
'समाधान' विसावा चौक,
गावभाग, सांगली- ४१६४१६
मो. न. ९८६०२८६०४२
*
© सुहास विनायक पोतनीस
*
प्रकाशन : गुढीपाडवा २०१३
*
अक्षर जुळणी :
श्री साई समर्थ ग्राफिक्स
१९८७, सी वॉर्ड, सोमवार पेठ,
कोल्हापूर.
मो. - ९८९०६४४७४८
*
मुद्रण :
ज्योर्तिलींग ऑफसेट, कोल्हापूर.
*
किंमत : २२५/-

|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री महासरस्वत्यै नम: ||
|| श्री चिदंबरेश्वराय नम: ||
|| श्री शिव चिदम्बराय नम: ||

# सप्ताह वाचन

दिवस १ ला - ९ अध्यायापर्यंत
दिवस २ रा - १६ अध्यायापर्यंत
दिवस ३ रा - २४ अध्यायापर्यंत
दिवस ४ था - ३२ अध्यायापर्यंत
दिवस ५ वा - ३८ अध्यायापर्यंत
दिवस ६ वा - ४६ अध्यायापर्यंत
दिवस ७ वा - ५० अध्यायापर्यंत
७ वे दिवशी किंवा ८ वे दिवशी अवतरणिका


शिव चिदम्बर

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

॥ श्री शिवचिदंबर कृपा ॥



कै. ति. निळकंठ द. केळकर
मराठी अनुवादक......

श्री शिवचिदंबर महास्वामींच्या वंशातील श्री. आण्णासाहेब दीक्षित हे सन् १९७१ रोजी माझे सासरे कै. ति. निळकंठ दत्तात्रय केळकर, यांचे सोलापूर येथील रहाते घरी आले होते. त्यावेळी श्री. आण्णासाहेबांनी श्री. चिदंबर महास्वामींचे माहात्म्य सांगितले व श्री. महास्वामींची पोथी दिली. या पोथीचे पारायण केले असता श्री. केळकर दादाना लक्षात आले की श्री. चिदंबर महास्वामींची लीला अपार असून सध्याच्या कलियुगात स्वामींची आराधना करणे गरजेचे आहे. परंतु मूळ पोथी सर्व सामान्यांना समजणे सोपे नाही. हा विचार करुन त्या पोथीचा कै. ति. निळकंठ केळकर यानी साध्या सोप्या मराठी भाषेत अनुवाद करावयाचे ठरविले. मूळातच संस्कृतचे ज्ञान असल्याने त्यांनी आपली रेल्वे खात्यातील आपला पदभार सांभाळून सन् १९७१/७२ साली मराठी अनुवाद करुन, आपल्या मुलांकडून चि. चंद्रशेखर, चि. सुहास व कन्या चि. सुनिता यांचेकडून लिहून घेतला.

सदर अनुवाद मी परत त्या माझ्या हस्ताक्षरात दि. २६।८।१९९७ (गणेश चतुर्थी) ते दि. १३।५।१९९९ (गुरुपुष्यामृत) या कालावधीत लिहून काढला व हा हस्तलिखीत अनुवाद मुरगोड (कर्नाटक) येथील श्री. चिदंबर महास्वामी यांच्या स्थानी अर्पण केला. हे हस्तलिखीत श्री. मनोहरपंत कुलकर्णी, अनंतपूर यांच्या वाचनात आले. सहाजिकच श्री. मनोहरपंत श्री. चिदंबर महास्वामीचे परमभक्त आहेत. त्यांनी श्री. महास्वामींचे माहात्म्य व प्रसार करावयाचे खडतर व्रत घेतले असल्याने स्वतः माझ्या घरी (सांगली) येऊन सांगितले की या मराठी अनुवादाच्या पोथीचे प्रिंटींग करुन श्री. महास्वामींच्या महात्म्याचे प्रसारण करा. कारण श्री. महास्वामीचे संस्कृत / कानडी ग्रंथ आहेत, पण मराठीत अनुवाद असलेली ही पहिलीच पोथी आहे. म्हणून मी निवृत्त झाल्यावर श्री. महास्वामींच्या आशिर्वादाने छपाई काम पूर्ण केले. या सेवाभावी कामासाठी सौ. संपदा वैभव जोशी, सांगली यांनी अक्षरजुळणी केली. तसेच श्री. मनोहरपंत कुलकर्णी, अनंतपूर व श्री. हेमंत सावंत, सांगली यांचे बहुमोल सहकार्य लाभले. वरील सर्वांचे, तसेच ग्रंथाच्या छपाईसाठी ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तिनी सहकार्य केले, त्या सर्वांचा मी शतशः आभारी आहे.

या ग्रंथाखेरीज मी सेवा समजुन अनेक ग्रंथाचे या स्वहस्ताक्षरात म्हणजे दासबोध, ज्ञानेश्वरी, गजानन महाराज चरित्र, स्वामी समर्थ, साईबाबा पोथी, गोंदवलेकर महाराज पोथी, इ. अनेक पोथ्या म्हणजे ६००० पाने लिहून काढल्या....

सुहास पोतनीस,
गावभाग, सांगली.
(महाराष्ट्र- ४१६४१६)

# अध्याय पहिला

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम:।। त्या प्रभूचे प्रेरणेनेच हे कार्य करण्यास मी प्रवृत्त झालो. तेव्हा त्या जगन्नियंत्यास त्रिवार वंदन करून प्रार्थना करतो की, हे कार्य त्यानेच सिद्धीस न्यावे, एवढे म्हणून आता श्री चिदंबर महास्वामींचे संक्षिप्त लीला चरित्र सांगण्याचा प्रयत्न करतो.

कर्नाटकात श्री चिदंबर क्षेत्र आहे. त्या ठिकाणी प्रतिवर्षी मोठी यात्रा भरते. तेथे ठिकठिकाणचे ब्राह्मण लोक येऊन महोत्सव करतात. तो महोत्सव पाहून चिदंबरांचे ठिकाणी प्रेमभाव ठेवून भव-रोग-औषध-चरित्र ऐकण्याकरिता उत्सुक झाले होते. एकाग्र चित्ताने प्रात:स्नान करून, हृदयी चिदंबराचे पूजन करून, भक्तीने सर्व लोक ध्यान करीत, सात दिवस नाम-जप करीत बसले. ह्या ब्राह्मणांची ही भक्ती ओळखून वृद्ध ब्राह्मणाचा वेष धारण करून स्वत: श्री सद्गुरू चिदंबरेश्वर त्यांच्याजवळ आले, त्यांचे तेज व अभ्युत्थान पाहून त्यांना नमस्कार करून सर्व लोक प्रार्थना करू लागले की, "स्वामी आपण कोण? कारण आपल्याला पाहताक्षणीच आमचे मन आनंदसागरात बुडाले आहे. आपण याज्ञवल्क्य, शुक्र, दत्तात्रेय, योगीश किंवा दयाळू वामदेव यापैकी आपण कोण आहात ते सत्य सांगावे." तेव्हा स्वामींनी उत्तर दिले की, "मी तर ब्राह्मण, चिदंबरोत्सव पाहण्याकरिता येथे आलो आहे." मग सर्व जण स्वामींना म्हणाले की, "चिदंबर गुरुचरित्रामृताचे प्राशन करण्याकरिता आम्ही तहानलेले आहोत. तरी आपण ते आम्हांस प्राशन करवावे. जर कृपा करून आपण हे कराल तर आम्ही सर्व कृतकृत्य होऊ" हे ऐकून स्वामी म्हणाले की, "ब्राह्मणहो! तुम्ही फारच भाग्यवंत आहात, कारण ही इच्छा आतापर्यंत मला या भूमंडळात कोणीच प्रदर्शित केली नाही. हे चिदंबर आख्यान मी बरेच पाहिले व ऐकले आहे, तरी ते यथामती तुम्हाला सांगतो. तरी ते तुम्ही क:लिभय प्रपंच तळमळ, कपट सोडून निर्भय चित्ताने व एकाग्रतेने श्रवण करा. जेव्हा या कलियुगात वारंवार धर्महानी होते त्या वेळी सर्वेश या जगीं अवतार घेऊन धर्मरक्षण करतो, असे पूर्वी व्यासांनी आपल्या शिष्यांना सांगितले होते, म्हणूनच महेशास वारंवार अवतार घ्यावा लागतो. जेव्हा जैनमताचा पगडा पृथ्वीवर बसला व वेदात धर्म-कर्म

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

लोपले तेव्हा शैवभट्टाचा अवतार होऊन पुन्हा वेदमताची स्थापन झाली. तसेच अद्वैत मार्गाच्या उद्धाराकरिता शंकराचार्यांचा अवतार होऊन द्वैतांधकाराचा नाश केला. तसेच शिवाचे विद्यारण्य म्हणून अवतार धारण करून चतुर्वेद भाष्य रचून वेदमार्ग स्थापिला. तद्वतच प्रभाकर दीक्षित, अप्पय्या दीक्षित व श्रीपाद श्रीवल्लभ असे अवतार घेऊन त्या वेळी धर्म संस्थापना केली. श्री नृसिंहसरस्वतींचा अवतार तर सर्वश्रुत आहेच, तसेच पंपाक्षेत्री विष्ट नावाने अवतार होऊन धर्मस्थापना करून तुंगातेरी गुप्त जाहले. त्याप्रमाणेच आता चिदंबर या मूळ नावाने अवतार घेऊन जो परात्पर सद्गुरू असून त्याने अगाध महिमा या भूलोकावर दाखविला. त्याचे चरित्र ऐकून भवव्यथेचा नाश होऊन इह व परलोकी सुखाची प्राप्ती होते. ज्याचा चिदंबरावर विश्वास आहे त्याच्या सर्व मनःकामना पूर्ण होतात, तसेच मोक्षाचीही प्राप्ती होते.''

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥



शिव चिदम्बर

शि व चि द म्ब र

# अध्याय दुसरा

आकाश चिदंबर माहात्म्य

।। श्री शिव चिदंबराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। इतर ब्राह्मणांनी स्वामींना असा प्रश्न केला की, ''श्री. चिदंबर अवतार कोणत्या देवाचा व कोणत्या वंशी झाला ते सांगावे.'' तेव्हा स्वामी सांगतात की, ''पृथ्वीला पापाचा भार अति झाला, म्हणून तिने कैलासी जाऊन शंकराला निवेदन केले की पापाचा भार होऊन धर्माचा नाश होत आहे. हे ऐकून श्री चंद्रशेखर म्हणाले, ''हे पृथ्वी माते, मार्तंड दीक्षित नावाचा एक तपस्वी स्वधर्माचरणरत असून त्याचा पुत्र होऊन मी वेद धर्माची स्थापना करीन त्याप्रमाणे दीक्षितांचे घरी सर्वेशाने अवतार घेतला. सद्धर्माने भक्तांचे रक्षण, नित्य श्रौतकर्म, अनादी वेदांचे मार्ग रक्षण हेच चिदंबरांचे आचरण होते. त्यांना कोणी शिवावतार म्हणतात, कोणी हृषीकेशी म्हणतात. असा तो पूर्णब्रह्म सर्व देवांना आहे, असे व्यास वचन आहे. वासुदेव व देवकी एकांती कृष्णाला बोलते झाले की, आम्ही काट्यावर उभे राहून उग्र तप केले की जेणेकरून आम्हाला सप्तजन्य पुत्र व्हावा. त्यामुळे कृपा उपजून तू आमचा पुत्र झालास परंतु तुझ्या बाललीला, तारुण्यलीला आम्हास मुळीच पाहवयास मिळाल्या नाहीत. त्यामुळे आम्ही अगदी हतभागी आहोत, कारण तुझे बालपण नंदाचे घरी व तारुण्य पांडवांकडेच गेले. तुजसारखा आमचा पुत्र असून आम्हाला पुत्रसुख काहीच लाभले नाही. जेणे करून आमचा जन्म व्यर्थच गेला. हे ऐकून कृष्णाने सांगितले की, तुम्ही याची खंत आता मुळीच बाळगू नका, आनंदात रहा. कलियुगात आकाश चिदंबर क्षेत्रात तुम्ही घोर तप कराल, तेव्हा तुमच्या पोटी मी अवतार घेऊन तुमची कामना पुरवीन. हे वचन सत्य करण्याकरिता श्री चिदंबर दीक्षित तनय म्हणून अवतरला. विजापूर प्रांती गोठे ग्रामात श्री. मार्तंड दीक्षितांचे पूर्वज ज्योतिष वृत्तीने राहात असत. नागेश नावाचा एक होरा शास्त्रज्ञ त्याचा मूळ होता, त्याचा पुत्र शंकर, त्याचा पुत्र त्र्यंबक, त्याचा धाकटा पुत्र तोच मार्तंड दीक्षित, शिवभक्त असून अतिशय विरक्त, जितेंद्रिय असून पित्याचे शुश्रुषणीरत असा संसारी वर्तत असे. परंतु त्यांना ज्योतीवृत्तीचा कंटाळा आला व पाप संग्रह फार होत चालला म्हणून ते घराबाहेर पडून

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

काशीस जाते झाले. तेथे स्वयंप्रकाश नावाचा एक ब्रह्मनिष्ठ संन्यासी होता, त्याचे शिष्यत्व पत्करून मार्तंड दीक्षित त्याचे जवळच राहिले व त्यांची सेवा करू लागले. तसेच गुरुकडून शतपथ ब्राह्मण याचा अभ्यास करून त्यांचे कृपेने श्रुतिशास्त्रात निपुण झाले. नंतर गुरुची आज्ञा घेऊन मार्तंड दीक्षित मुरगोडला येऊन वेदोक्त धर्म आचारण्याकरिता गृहस्थाश्रमाची सुरुवात केली. त्या वेळी त्यांनी तप व अग्निहोत्र स्वीकारून सोमयाग केला. त्यायोगे त्यांना बरेच शिष्य मिळाले. त्या शिष्यांनी गुरुकडून सर्व शास्त्रार्थ व सूत्रभाष्याप्रमाणे षोडश प्रयोग इत्यादींची प्राप्ती करून घेतली. तसेच गुरुकृपेने श्रौतप्रयोग व परोपकार बुद्धीने लोकहितार्थ बऱ्याच सिद्धी प्राप्त करून घेतल्या. इतके होत असता पोटी अपत्य नसल्याने मार्तंड दीक्षित तप करण्याकरिता निघाले. मुरगोड जवळच असलेल्या सोगल क्षेत्रास जाऊन सोमेश्वरची पूजा-प्रार्थना करून तेथे तीन गायत्री पुरश्चरणे केली व नंतर सुब्रह्मण्यम क्षेत्री जाऊन स्वप्रकाशेश्वर लिंगाची स्थापना विधीपूर्वक केली. अश्वत्थ व आंब्याची झाडे तसेच तलावाची योजना करून त्या ठिकाणी एक वर्ष अनुष्ठान केले व नंतर मार्तंड क्षेत्र जे हिप्परगी गाव त्या ठिकाणी पुन्हा गायत्रीचे पुरश्चरण केले. तेथे ६ महिने अनुष्ठान होता मार्तंडेश्वराने स्वप्नात येऊन सांगितले की तुझे तप सिद्ध झाले आहे व मी तुझे अभीष्ट जाणतो. तू संततीकरिता आता चिंता करू नको. दक्षिणेकडे एक मोठे चिदंबर क्षेत्र आहे, तेथे आकाशलिंग पंचसभा असून गायत्री नावाचे गाव आहे. त्याठिकाणी उपमन्यू व कण्व आदिऋषिंना वर लाभले आहेत त्या ठिकाणी क्षीराब्धि, कावेरी, शिवगंगा वगैरे तीर्थे असून ब्रह्मा-विष्णू हे देव वर लाभले आहेत. त्या ठिकाणी साक्षात चिदंबराचे वास्तव्य असून सर्व भक्तांच्या कामना तो पुरवतो. चिदंबर भक्तवत्सल असलेमुळे सेवकांना अढळ पद देतो. त्या क्षेत्राचा महिमा अवर्णनीय आहे. ते एक महासिद्ध स्थान असून भक्तास कामधेनूप्रमाणे आहे. अशी तपोभूमी जगात दुसरीकडे कोठेही नाही, असा या क्षेत्राचा महिमा व्यासमुनींनी स्कंद पुराणात सांगितला आहे. मार्तंडेश्वराने मार्तंड दीक्षितांना अशी आज्ञा केली होती की, तुम्ही चिदंबर क्षेत्री जावे, तेथे तुम्हाला चिदंबर प्रसन्न होऊन तुमचे पोटी अवतार घेईल. एवढे सांगून मार्तंडेश्वर अंतर्धान पावले व दीक्षित जागृत होऊन आपले सर्व प्रातर्विधी व नित्य क्रिया आटोपून आपल्या भार्येसह चिदंबर क्षेत्री निघाले. कारण ग्रंथात क्षेत्र महिमा पाहून त्या शिवक्षेत्रास जाण्याचा दीक्षितांना फार आनंद झाला.

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

एक राजा रोगाने अतिशय पीडीत होता. तो सर्व तीर्थे करीत हिंडला. त्या राजाला महारोग, कुष्ठरोग असल्याने त्याच्या अंगाची दुर्गंधी येत असे व त्याचे प्राणही व्याकूळ होत असत. सर्व तीर्थे करून दमल्यावर युगयुगांतरी आकाशलिंग गुप्त किंवा प्रगट सृष्टीवर दिसत असे तेथूनच सर्व ईश्वर अवतार होतात. सेतुबंध रामेश्वर त्यापैकी आहे म्हणून तेथे जाऊन प्राणत्याग करावा, असा विचार करून राजा रामेश्वरी जाण्यास सैन्यासह निघाला. चित्ती उद्विग्न होऊन अतिशय चिंतेने व्याकूळ होऊन ईश्वराने माझी उपेक्षा का करावी असे त्याला वाटले. जाता जाता एका वनात सैन्यासह त्याने मुक्काम केला. मनात उदास होऊन दुपारी एकांतात औदुंबराच्या छायेत राजा बसला. समोर पाणी व चिखल त्याला दिसत होता. त्या रानातील डुक्कर त्या चिखलात लोळत असता ते डुक्कर सोन्यासारखे दिसू लागले. राजाला हे पाहून फार आश्चर्य वाटले व तोही त्या चिखलात लोळला, तेव्हा त्याचेही सर्व रोग जाऊन त्याचे सर्व शरीर सोन्याप्रमाणे सुंदर झाले. हे पाहून राजाला अत्यानंद झाला की, भगवंताची आपणावर कृपा झाली तेव्हापासून त्याचे नाव सुवर्ण चक्रवर्ती असे झाले. राजाला वाटले की हा काय चमत्कार आहे. हा चिखल अमृतमिश्रीत आहे किंवा काय? माझे किती पुण्य थोर की मला ईश्वर प्रसन्न झाला, असे स्तवन करुन त्या ठिकाणी अपार पुण्य करून त्या ठिकाणी त्याने खणून पाहिले तेव्हा तेथे त्याला गुप्त देवालय दिसले. त्याचे नाव 'पाताळगंगा' असे पडले. देवालयात चिदंबर क्षेत्र असे नाव लिहिले होते, त्या देवालयात मूर्ती नसून त्याचे नाव आकाशलिंग असे होते. तेथे अनुक्रमे इंद्र, ब्रह्मा, विष्णू, शिवपार्वतीची सभा व तांडव नृत्य सभा अशा ५ सभा होत्या. मोठमोठ्या देवांचे विश्रांती स्थान असे हे चिदंबर क्षेत्र पाहून राजाने असा विचार केला की, आपली भक्ती वाढविण्याकरिता येथे मूर्तीची स्थापना करावी. तेव्हा राजास असे स्वप्न पडले की, तेथे सोन्याच्या मूर्तीची स्थापना करावी. जेणेकरून केवळ दर्शनाने लोकांचा उद्धार होईल. असे स्वप्न पाहता राजा स्वप्नातून जागा होऊन सोन्याचा रस कढवून मुशीत ओतला तोच ती मूस फुटली. असे १०० वेळा झाले, हे पाहून राजा कंटाळला व त्याला वाईट वाटले. त्याने मनात विचार केला की, ही माझी सेवा ईश्वराने स्वीकारली नाही तर मी प्राण देईन. नंतर पुन्हा सोन्याचा रस कढवून तो गाढ झोपी गेला, तोच स्वप्नात प्रत्यक्ष सदाशिव प्रकट होऊन राजास विचारता झाला की, "तू हे काय करितो आहेस?" हे पाहून राजा खडबडून जागा झाला व सगळीकडे तेज फाकलेले पाहून प्रेमानंदाने पायावर लोळण घेतली व

शि व चि द म्ब र

दोन्ही हात जोडून प्रार्थिता झाला की, हे चंद्रपौळी तुझी सुंदर भोगमूर्ती करून पूजेकरिता या स्थळी स्थापन करण्याचा मी सारखा प्रयत्न करीत आहे परंतु काहीच साधत नाही. तरी आता मी प्राणत्याग करतो, तेव्हा सदाशिवाने सांगितले की असा धीर सोडू नकोस. मी तुला उपाय सांगतो. जेणेकरून तुझे कार्य सिद्ध होईल. आज मध्यरात्री तुझ्याकडे एक ब्राह्मणकुमार येईल तो जे सांगेल ते कर. म्हणजे तुला मूर्ती साधेल असे सांगून निळकंठ गुप्त झाले. तो राजा सावध होऊन ह्या ब्राह्मणकुमाराची वाट पाहू लागला. मध्यरात्री सूर्यासारखा तेजस्वी एक ब्रह्मचारी येऊन म्हणाला, ''राजा मला भिक्षा घाल. मला फार भूक लागली आहे व आताच्या आता मला भिक्षा घाल. मला माघारी पाठवू नकोस, तुझे हातात जे असेल तेच दे.'' राजाने त्यास वंदन करून सांगितले की, ''माझ्या हातात हा कढवलेला रस आहे, तू आत ये. मी तुला उत्तम अन्न देतो व तू तृप्त हो.'' तेव्हा ब्रह्मचारी म्हणाला की, ''राजा मोहाने तू मला माघारी पाठवीत आहेस. ताबडतोब तो सुवर्णरस माझ्या तोंडात ओत.'' तेव्हा राजाला श्री शंकराने सांगितलेले आठवले व सावध होऊन त्याने तो सुवर्णरस ब्रह्मचाऱ्याचे तोंडात ओतला, त्याचक्षणी तो ब्राह्मण मनोहर मूर्ती होऊन तेज:पुंज असा राजापुढे बसला. म्हणजेच राजाला कोटीचंद्र सूर्यचंद्र प्रभापूर्ण अशी मूर्ती त्या क्षणी साधली किंवा ब्रह्मानंद रस मुरोन ती दिव्य मूर्ती ओतळ्यासारखी वाटली. केवळ ईच्छामात्र करून ज्याने अनंत विचित्र ब्रह्मांडे निर्माण केली. ज्याकरिता वेदशास्त्रे भांडतात तो ईश्वर सगुणमूर्ती झाला. त्याचे सौंदर्य वर्णावयास ब्रह्मदिकही शिणले, अशी मूर्ती पाहून राजा देहभान विसरला. शिवानंदी निमग्न होऊन सद्भावाने मूर्तीस वंदन करून मूर्तीचे विधीयुक्त पूजन केले व शिवाची स्थापना केली. नंतर राजाने गोपुरे बांधून सभापती असे मूर्तीस नाव ठेवले. मूर्तीपुढे नित्य आनंदोत्सव करीत त्या ठिकाणी भक्तांना श्री चिदंबर अनेक साक्षात्कार व दृष्टांत दाखवित असे. जशी भक्ती तशी प्रचिती लोकांना होत असे. अशा ह्या प्रसिद्ध क्षेत्री तापसी श्री. मार्तंड दीक्षित तप करण्यास श्री. मार्तंडश्वराचे आज्ञेने जाते झाले.

।। श्री चिदम्बर गुरुवेनम: ।।

# अध्याय तिसरा

|| श्री शिव चिदम्बराय नमः ||

|| श्री गणेशाय नमः || त्या महापुण्य व रमणीय चिदंबर क्षेत्री मार्तंड दीक्षितांनी आपल्या भार्येसह येऊन सर्व तीर्थविधी करून दुर्धर तपास आरंभ केला. ब्राह्ममुहूर्ती उठून सूर्योदयापूर्वी स्नान करून संध्या वंदनानंतर मनोभावे शिवपूजा केल्यानंतर दर्भाजीन व कांबळ्याचे आसन घालून पुरश्चरणास आरंभ करीत असत. जप मध्यान्हापर्यंत चालत असे. त्यानंतर पुन्हा स्नान करून मनोभावे शिवाची पूजा करून तेथेच ध्यानस्थ बसत. प्रदोष समयी शिवतीर्थात स्नान करून भक्तिभावाने प्रदोष पूजा केल्यानंतर यथासांग गायत्री मंत्र जप करताना शिवाचे ध्यान करीत असत. नंतर अर्धा शेर दुर्वांचा रस काढून शंकराला नैवेद्य दाखवून आपण स्वतः ग्रहण करीत असत. प्रेमाने शिवाची गर्जना करीत त्या स्थळीच कृष्णाजीन घालून थोडी विश्रांती घेत असत. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची चिंता न करिता शिवचरणीच सारखे लक्ष ठेवीत असत. याप्रमाणे सहा महिने झाल्यानंतर रोज दीक्षितांचे तपास चंद्राप्रमाणे तेज चढू लागले. एके दिवशी मोठ्या आनंदाने शिवाचे ध्यान करीत असता संध्याकाळी मार्तंड दीक्षित देहभान विसरले, कारण त्यांचे पुरश्चरण संपून भाग्योदयाची वेळ जवळ आली होती. त्या वेळी दीक्षितांचे सुदैव काय वर्णन करावे की, साक्षात महादेव आपल्या पूर्ण वैभवासकट तेथे प्रकट होऊन म्हणाले की, हे निष्पाप भक्ता उठ, तुझे तप सिद्ध झाले आहे. याप्रमाणे शिव बोलत असता, प्रत्यक्ष शिव आले हे न कळता दीक्षित ध्यानस्थच होते. तेव्हा कृपावंत असा तो शिव दीक्षितांचे डोक्यावर वरदहस्त ठेवून त्यांना जोराने हलवून सारखा उठ उठ म्हणत राहिला. नंतर दीक्षित भानावर येऊन जेव्हा डोळे उघडून पाहू लागले तेव्हा चहूकडे थंडगार असे दिव्य तेज पसरलेले पाहून पुन्हा डोळे झाकले व विस्मित होऊन पुन्हा स्तब्ध बसले. काही वेळानंतर डोळे उघडताच समोर साक्षात कैलासनाथ झळकत होते. शुभ्र जटा, पंचमुखी, शुभ्र स्फटिकमाला तसेच शुभ्र भस्माने सर्वांग वेष्टित असा शंकर समोर उभा होता. भयहारक, भवानीपती, भक्तवत्सल अशी ती भव्य मूर्ती ज्याचे कंठी रुद्राक्ष व रुद्रमाला शोभताहेत, तो गजानन जनक, गंगाधर, गजचर्म प्रावरण गौरीहर ज्याचे नावाचा सर्व देव गजर करीत आहेत, ज्याचे

वामांकी महासती पार्वती जिचे गळ्यात सोन्या-मोत्यांचे हार व दोन्ही हातात वज्रचुडे आहेत अशी बसली आहे. अशी ही त्रिभुवन सुंदर शिवमूर्ती पाहून दीक्षितांना अत्यंत आनंद झाला. सद्भावनेने शंकराच्या पायावर लोटांगण घातले. तेव्हा चंद्रमौळीने त्यांना उठविले व आलिंगन दिले आणि वर मागण्यास सांगितले. कारण दीक्षितांचे तपाने शंकर तुष्ट झाला होता. तेव्हा दीक्षित म्हणाले की, ''हे चंद्रमौळी मी काय वर मागू? तुझे पदकमळी दृढ भक्ती असू दे.'' हे ऐकून चिदंबर म्हणाले की, ''दीक्षितेंद्रा, ज्यासाठी घोर तप केलेस तेच तू विसरलास काय?'' मग स्वत:ची कामना आठवून दीक्षितेंद्राने शंकरास वर मागितला की तुझ्यासारखा पुत्र मला दे. त्यावर उमारमण बोलते झाले की, मला या भूतलावर धर्मस्थापनेचे कार्य करावयाचे आहे आणि तुलाही पुत्राची इच्छा आहे. तरी तू आता अनुष्ठान पूर्ण कर आणि मी तुझा पुत्र होऊन अवतार घेतो. त्यावर दीक्षितेंद्र बोलते झाले की तू मनुष्य जन्म घेणार त्या वेळी तुझे स्मरण होण्याकरिता काही तरी प्रत्यय खूण सांगावी. त्यावर चिदंबर बोलत झाले की, मी जन्मताच माझे उजवे कानी बिल्वपत्र व अक्षता पहाव्यात. इतके बोलून चिदंबरेश्वर गुप्त झाले. हा चमत्कार पाहूत दीक्षितेंद्राने त्या ठिकाणी नमस्कार केला, अनुग्रह झालेला आपल्या पत्नीस सांगितला व अनुष्ठानाची समाप्ती करून अत्यंत आनंदाने आपल्या भार्येसह आपल्या गावी परत आला. घरी आल्यावर शिव आराधना करीत आनंदाने काळ कंठीत असता, शिवानुग्रहाची वेळ जवळ आली व शंकराने पतिव्रतेच्या उदरी प्रवेश करून लक्ष्मीमाता गरोदर राहिली. हे पाहून दीक्षितेंद्रास अत्यंत आनंद झाला व माझे भाग्य थोर आहे असे त्यास वाटले. यज्ञ, दान अथवा तपानेही जो शंकर भेटत नाही तो चिदंबर माझ्याशी रोज खेळेल, ज्या योगे मी अगदी कृतकृत्य झालो आहे. चंद्रकलेप्रमाणे रोज गर्भ वाढत चालला, लक्ष्मी सुंदर दिसू लागली, अंग पुष्ट होऊ लागले. ब्रह्मतेजाने तोंड टवटवीत व चंद्रासारखे आल्हाददायक दिसू लागले. त्या पतिव्रतेच्या मनात सारखा आनंद भरून राहिला होता. व डोळे मिटून ध्यान करीत असता अंगावर रोमांच उठू लागले, चिदंबराने अंतरी प्रवेश केल्याने मी-तू पण सर्व नाहीसे झाले व चिदंबर चराचरी भरून राहिलेला लक्ष्मीमाता पाहू लागली आणि चिदंबरी चराचरी एकरूप झाली. हे पाहून दीक्षितेंद्रास विस्मय वाटला व लक्ष्मी मातेस विचारले की असे दीर्घ ध्यान तू काय करीत आहेस. तुझ्या मनात काय इच्छा आहे, ती मी पुरवीन. परंतु ती पतिव्रता चिदंबरानंदी एकरूप होऊन निर्विकार रूप झाली होती म्हणून तिने काहीच

उत्तर दिले नाही. तेव्हा दीक्षितेंद्रास वाटले की हिला काय झाले आहे म्हणून ही मौन व्रत धरून बसली आहे. पुन्हा तिला हाक मारून तिची इच्छा विचारते झाले. तेव्हा पतिव्रतेने डोळे उघडून विचारले की, माझी इच्छा काय विचारता? निरिच्छाला काय इच्छा असणार? सर्व ठिकाणी मीच एक पूर्ण आहे. सर्वांना मीच मूळ कारण असून भक्तांना निजस्थान देईन व धर्मसंस्थापना करीन. कलीला बांधून ब्रह्मकर्म वाढवून कलीधर्माचा लोप करीन. याप्रमाणे दीक्षितेंद्राने धर्मज्ञान युक्त सतीचे वचन ऐकून आणखीन भगवद्‌वचन ऐकण्याकरिता पुन:पुन: प्रश्न करू लागले. परंतु ती जन्ममाता नेहमी धर्मवचन बोलीत असे व मला दुसरी कसलीही इच्छा नाही परंतु धर्मपालन, भक्तरक्षण व जगदुद्धारण हीच माझी इच्छा आहे. ही गर्भस्थ शिवाची वाणी ऐकून दीक्षितेंद्रास अत्यंत आनंद झाला व विधियुक्त सर्व गर्भ संस्कार करिता झाला. लक्ष्मीमातेस नऊ मास पूर्ण होऊन दहावा महिना लागला. सोमवारी कार्तिक कृष्ण षष्ठी, पंचशुभग्रह स्वक्षेत्री अशा योगावर मकर लग्नी, द्वितीय प्रहरी, भक्त कैवारी चिदंबर अवतरला. तोच आल्हाददायक असा वारा सुटला व पाणी साधूचित्त उजळले. देव दुंदुभि वाजवू लागले आणि आकाशातून पुष्प वर्षाव करू लागले. त्या वेळी त्या दांपतीपुढे रम्य मूर्ती एकाएकी प्रकट झाली. त्याचे तेज सूर्याप्रमाणे फाकत होते, सर्व अंगावर अलंकार होते. कपाळावर भस्माचा सुरेख त्रिपुर रेखला होता. रुद्राक्ष व नागमुंड गळ्यात होते. अशा तेजस्वी बाळास पाहून दीक्षितेंद्रास आनंद झाला व दोन्ही कर जोडून स्तोत्र करू लागले. वचन दिलेप्रमाणे उमापती तू सत्य केले आहेस. मी तुला ओळखले आहे की, तूच कैलासपती आहेस. हे सांबा, मृत्युंजया, गिरीजारमणा ज्ञानपूर्णा, तू आपले वचन सत्य करण्याकरिता मनुष्यरूपे अवतरला आहेस. तू अजन्मा असून आपल्या वचनाकरीता जन्म घेतला आहेस. जन्मादि षड्भावरहित असून भक्तरक्षणाच्या हेतूने तू अवतरला आहेस. ज्याचे आज्ञेने ब्रह्मा, विष्णू आदि सुगरण स्वस्थानी भिऊन पळतात त्या तुला नमन असो.

ज्याचे नाव घेताच अनंत जन्मीची पापे जळून जातात असा तू माझा पुत्र होऊन आलास हे केवढे माझे भाग्य. मी अगदी धन्य व कृतकृत्य झालो. माझे कूळ उद्धारिले आहे, परंतु हे अलौकिक रूप लोकात प्रकट दाखवू नकोस. या रूपाचा आता उपसंहार करून सुंदर बालरूप दाखवून माझे अंत:करण शांत कर, असे भक्तिभावाने स्तोत्र करून चरणावर मस्तक ठेवून ते दिव्य रूप वारंवार पाहून हृदयी कोरुन घेतले, दीक्षितेंद्राने


शिव चिदम्बर

अशी प्रार्थना करून पायावर साष्टांग नमस्कार घातला व लक्ष्मीमातेनेही तेच केले. त्यांचे मनात आनंद सिंधू उफाळला आणि सर्व अंगाला हर्षांकुर फुटले. कंठ सद्‌गतीत झाला व डोळ्यांवाटे आनंदाश्रू वाहू लागले. हे शंकर माउली, तू माझे डोहाळे पुरविलेस व हे पुत्रराया! तुझ्यामुळे बेचाळीस कुळे उद्धारली. महाराज हे अलौकिक रूप योगी लोक नेहमी ढुंडतात, हे सुरेख असे भवरोग रसायन आहे. ते माझे हृदयी सर्वकाळ वसो. हे दयाधना, तू निर्गुण आहेस. परंतु भक्तांची कामना पुरविण्याकरिता अनेक सगुण अवतार धारण करतोस. हे करूणाकरा, त्याची प्रचिती आली. तू अभयदान दिले होतेस. हे ज्ञानराशी, तू ते सत्य केलेस. आता अलौकिक बाललीला दाखवून आम्हाला संतुष्ट कर. हे दयाळा, कोटी जन्म पुण्य करूनही तुझे लालन पालन ही गोष्ट दुर्लभ आहे. तरी ती सेवा मजकडून घ्यावी एवढी माझी इच्छा पूर्ण कर. तू प्रत्यक्ष भेटला असता मोक्षाची मला चिंता नाही. परंतु तुझी दृढ भक्ती देऊन माया दूर कर. तुझ्या चरणी मी वंदन करतो व माझे मागणे मला द्यावे, असे म्हणून लक्ष्मी मातेने साष्टांग नमस्कार केला. चिदंबराने आपल्या मातेस उठवून सांगितले. आई, तू जे जे मागतेस ते निश्चित होईल. याचा मनात मुळीच संशय धरू नकोस. मी सर्वकारण असा जगदीश तुमचा पुत्र अवतरून आपण माझे जे स्तवन केले, त्याने मी प्रसन्न झालो आहे. मी कृष्णावतारी जे सांगितले होते ते सत्य करण्याकरिता हे स्वरूप तुम्हाला दाखविले आहे. जे कृष्णपेक्षा भिन्न असे हरात्मक आहे. तुमची स्तोत्रे जे ऐकतील किंवा वाचतील त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील, तसेच त्यांना धनधान्य, पुत्रसंतती इ. लाभतील. एवढे बोलून चिदंबर तत्काळ सुकुमार असा बाळ झाला.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय चौथा

महास्वामींची बाललीला

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। लक्ष्मी आईने त्या सुंदर बाळाचे रूप सूर्यासारखे पाहिले, त्यांचे तेज सर्व खोलीत भरून आणि ते बालक अयोनिसंभव असूनही सुरेख रडू लागले. असा बालभाव मातेस दाखविल्यानंतर त्या वेदनारहित माउलीने त्याला हाती घेतले. चिदंबराचा जन्म झालेला पाहून सुवासिनींचा समुदाय तेथे जमला आणि दीक्षितेंद्राने ब्राह्मणांना बोलावून बाळाचे जात कर्म केले. गाय, वस्त्र, तीळ व सुवर्ण असे अपार दान देऊन ब्राह्मणांना संतुष्ट केले. इतक्यात उत्तम तऱ्हेचे असे ज्योतिषी हा जन्म वृत्तांत ऐकून त्या ठिकाणी आले. त्यांनी तत्काळ बाळाची लग्न शुद्धी पाहून त्याचे जन्म फळ सांगते झाले. त्यांनी सांगितले की, हे दीक्षितेंद्रा आमच्या बुद्धीप्रमाणे याचे जातक सांगतो. या लग्नी जे बाळ जन्म घेईल ते अत्यंत लोकोद्धारक व शापनुग्रह समर्थ असा अवतारी पुरुष होईल. जोपर्यंत चंद्र-सूर्य तारे आहेत, तोपर्यंत याची कीर्ती या जगात स्थिर राहील. लग्नबळ पाहता असे वाटते की, हा साक्षात शंकरच अवतरला आहे. सामुद्रिक लोक अंगचिन्ह पाहून म्हणाले की हा जगद्पालक असा प्रसिद्ध जगद्गुरू होईल व त्यास देवादिकही वंदन करतील. अशा तऱ्हेने आशीर्वाद देऊन ज्योतिषी व सामुद्रिक जाते झाले. नंतर शुभमुहूर्त पाहून दीक्षितेंद्राने बाळाचे मोक्ष देणारे असे चतुर्अक्षरी नाव ठेवले. चिदंबर नावाचे चतुर्अक्षर अत्यंत सुरेख असून चतुर्विधी पुरुषार्थसाधक व चतुर्विध मुक्ती देणारे असे आहे. ज्या ठिकाणी चारी मुक्तीचे वास्तव्य असून ज्याचे वर्णन चारी वेद करतात आणि ज्याच्या केवळ स्मरणाने चारी वर्णाचे लोक उद्धरतात, चारी वेद व सहा शास्त्रे ज्याचे नेहमी वर्णन करतात, ज्यापासून चारी वर्ण उगम पावतात त्याच्याही पलीकडचा असा हा चिदंबर आहे. पुढे शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे दीक्षितांचे घरी बाळ वाढू लागले व क्षणोक्षणी लीला दाखवीत माता पितरांना तुष्टविले. हे बाळ अतिचपळ असून नाना तऱ्हेचे खेळ दाखवित असे. शस्त्र-दीप-विळा वगैरे वेळोवेळी धरण्यास धावू लागले. ते हातून सोडविताच, देव्हाऱ्यातील

देव खाली पाडून तुप, दुध, लोणी, दही यांची मडकी फोडीत असे. तसेच धान्य व पीठ एकात मिसळून पुढे धावत असे. तसेच तांबे व घागरी लवंडीत असे. चिदंबराचे अशा चपळतेने लक्ष्मीमातेने घरकाम सोडले व एक क्षण व्यग्रपणे बसले असताना चिदंबर बाळ अतोनात खोड्या करीत असे. आपण स्वत: परिपूर्ण असून लौकिकाकरिता मातेचे स्तनपान करीत असे. माता काही कामाकरिता जात असताना आपणसुद्धा तिच्या मागे रडत, रांगत जात असे. कामात असलेल्या आईने त्याला जर घेतले नाही तर आपण स्वत: दारापुढे लोळत असे. अशा तऱ्हेने भक्तांकरीता अघटित लीला दाखवीत असे. आईने बोलावून त्याला पित्याच्या हाती सोपवले तेव्हा त्या बाळाचे बोबडे बोल ऐकताना पित्याच्या मनाला अतिशय आंनद होत असे. बाबा, मला अत्यंत भूक लागली आहे तरी मला दूध पाजा, असे म्हणत दोन्ही हाताने पितृस्तन धरुन दूध पिऊ इच्छित असे. जेव्हा माता मोठे ताट घेऊन षड्रसाने वाढून जेवणाकरिता माजघरात नेऊन बाळाचे तोंडात घास घालीत असे. एक दोन घास खाऊन बाळ पळू लागे, त्यावर माता त्याला पुन्हा आणून आग्रहाने घास घालीत असे. पुन्हा बाळ पळू लागताच व मला खेळायला वेळ नाही. तू आता ताबडतोब नीट जेव असे म्हणू लागे. बाळ तोंड बंद करुन बसत असे, तेव्हा माता त्याचे तोंड जबरदस्तीने उघडत असे. त्यावर ते बाळ मोठा आ पसरे. त्यात मातेला अद्‌भुत गोष्टी दिसत असत.

सप्त स्वर्ग, सप्त पाताळ, सप्त समुद्र, ग्रहमंडळ वगैरे बाळाच्या तोंडात माता पाहत असे. भूमंडळातील भरतखंड, त्यात मुरगोड आपल्या बाळाच्या तोंडात त्याची आई पाहत असे. तसेच आपल्या गावात आपले घर घरात आपण बसलेली असून आपल्या मांडीवर बाळ आहे, हे ती जननी आपल्या बाळाच्या तोंडात पाहत असे. बाळाने मुख पसरले असता, त्या मुखात याच प्रकारचे सर्व लोक पाहून त्या जननीस भय व कौतुक वाटून आपले डोळे झाकून घेत असे. असे बाळाच्या तोंडात विश्वरूप पाहता त्या जननीस आश्चर्य वाटले व तिने हे सर्व वृत्त व पुत्राची सर्व करणी पतीस निवेदन केली. दीक्षितेंद्राला हे ऐकताच अतिशय आनंद झाला व म्हणाला की, ''हा तुझा बाळ माणूस नसून साक्षात कैलासनाथ अवतरला आहे.'' व हात जोडून बाळाची प्रार्थना केली की या बालवयात तुम्ही प्रकट होऊ नये तरी जगन्नाथा सध्या गुप्त राहावे. पित्याचे हे वचन ऐकून बाळ हसू लागला व आईला म्हणाला की मला आता लवकर जेवायला दे. अशा तऱ्हेच्या अनेक गुप्त लीला दाखवून त्या बाळाने आपल्या जनक जननीला संतुष्ट केले व जे ब्रह्मादिकास सुद्धा दिसण्यात अशक्य त्यास

दीक्षित दंपती सहज पाहू शकत असत. केव्हा तो खेळत असे, चालत असे, कधी बसत असे, कधी धावत असे, कधी गात असे, कधी नाचत असे, अशा तऱ्हेने तो भक्तवत्सल खेळत असे. ज्याचे स्वरूप न दिसणारे आहे, असे श्रुती म्हणतात. ते सामान्य माणसांना बालवेषाने अंगणी खेळताना सहज दिसत असे. ज्याच्या सत्तेने इंद्रादी देव वर्तन करतात, ज्याचे अंगापासून गंगा जन्म पावली त्याला त्याची माता मांडीवर घेऊन न्हाऊ घालीत असे. ज्याच्या आधाराने मेरूपर्वत स्थिर राहतो तो स्वत: भिंतीचा आधार घेऊन चालत असे. असा तो माया लाघवी चिदंबरभक्त परवश झाला. जो प्रत्येक प्राणीमात्रास अन्न पुरवतो तो आपल्या आईला दूध-भात मागतो, भक्तांच्या कामना पुरवण्याकरिता आपल्या अशा बाललीला दाखवत असे. दीक्षितांचे घरात शेषावतार असा दुसरा पुत्र जन्मला त्याचे नाव 'प्रभाकर' होय. पुढे त्यांना शेषा नावाची एक कन्या झाली. तिघांना खेळवित असता दंपतीस अतिशय आनंद होत असे. चिदंबर व प्रभाकर रामकृष्णाप्रमाणे आपल्या पित्याच्या घरी वाढत होते. पूर्वी जशा यशोदेला आपल्या बाललीला दाखवल्या त्याप्रमाणेच आपल्या जनक-जननीला अपूर्व लीला दाखवीत असत. आपल्या सत्तेने माया पदर टाकून जनक-जननीला हर्षगौरी बसवून चिदंबर खेळत असे. रोज श्री चिदंबर आपल्या समवयस्क मित्रांबरोबर लौकिक क्रीडा करीत अंगणात खेळत असे. धन्य दीक्षितेंद्राचे तप की त्याने श्री चिदंबराला वाढवले, जो योगिंद्र मानस विहार असून त्याचे वर्णन करता येत नाही. जो माया लाघवी अति पुरूष होता तो आपल्या मित्रांना नाना तऱ्हेचे खेळ दाखवीत असे. आपण स्वत: मध्ये उभे राहून टाळ वाजवीत असे व इतर मुलांकडून नृत्य करवीत असे. एकदा विटीदांडू, एकदा चक्र, एकदा हुतूतू, हमरी तैसेच हमामा घालीत असे. असे खेळ सर्व मुले स्वामीसह खेळत असत. एकदा फळ गोळीवर उडवून, एकदा चेंडू फळी खेळत असत. एखादे वेळी डोळे झाकून लपंडाव खेळत असत. एखादे वेळी झोंबाझोंबी करून एकमेकास खाली पाडत असत व खाली पडताना हर्षाने टाळ्या वाजवीत असत. एकाने सुरुवात करून सर्वांना शोधून काढा म्हणत असत व जो शोधत असे त्याला आपण शिवू म्हणून धावत असत. विटी-दांडू, चेंडूचा खेळ, आंधळी कोशिंबीर याप्रमाणे खेळ खेळत असत. एके दिवशी श्री चिदंबराने आपल्या वयाची मुले आपल्या बरोबर घेऊन दगडाने एक शिवमंदिर बांधून आपल्या अंगणात शिवाची पूजा सुरू केली. एका दगडास उमावर श्री शंकर असे कल्पून पाणी, पाने, फुले, फळे, त्यांना वाहून

शिवचिदम्बर

शिवचिदम्बर

पूजा करीत मानसोपचारे श्री शिवाला नाना वस्तू चिदंबराने अर्पण केल्या. ज्या काल्पनिक वस्तू चिदंबराने श्री शंकराला अर्पण केल्या, त्या इतर मुलांनी प्रत्यक्ष पाहिल्या व त्यांना आश्चर्य वाटले व ते म्हणाले की, चिदंबर नर नसून प्रत्यक्ष श्री शंकरच आहे आणि तो कल्पित वस्तू प्रकट करत आहे, असे भोवताली इतर मुले कौतुकाने पाहत असताना नैवेद्या करिता मातीचे ढीग मांडले. प्रदक्षिणा, नमस्कार स्तुती करुन नाना तऱ्हेने आरती केली. त्या मुलांना प्रसाद म्हणून चिदंबर माती वाटू लागला. मुलांनी तो प्रसाद हाती घेताच चिदंबराचा अगाध बाळ महिमा प्रकट झाला, त्या मातीची शुद्ध साखर झाली, त्या मातीत जे दगड धोंडे होते ते पेढे झाले, जे लहान खडे होते त्याची खडीसाखर झाली. त्या मुलांनी तो प्रसाद मोठ्या आवडीने खाल्ला व तोंडाला तो प्रसाद अतिशय गोड लागला. त्यामुळे मुले पुन्हा हात पुढे करून प्रसाद मागू लागली. प्रसाद खाल्ल्यानंतर ती मुले अति आनंदित होत आपापल्या घरी गेली व आपल्या घरातील माणसांना हे कौतुक सांगू लागली. मातीची साखर करून प्रसाद वाटला. ही चिदंबर करणी लोकांनी ऐकून पूजा स्थानी ते धावत गेले. चिदंबर आपल्या सवंगड्यांसह खेळत असता लोक तेथे येऊन त्यांनी चिदंबरास नमस्कार करून त्याचा जयजयकार केला. चिदंबराची लीला पाहून लोक आश्चर्यचकित झाले व त्यांना नमस्कार करून त्यांचा हात धरून त्यांच्या घरी नेले व त्याची ही लीला त्याच्या माता-पित्यास सांगितली. हे ऐकताच मार्तंड दीक्षितांनी विनयाने सर्व लोकांना घरी पाठवून आपल्या मुलास एकांती नेले व प्रार्थना केली, ''आताच तू प्रकट होऊ नकोस. कारण असे झाले तर येथेच यात्रा सुरू होईल व तुझे दर्शन आम्हाला होणार नाही.'' हे पितृवचन ऐकताच तो लीला नाटकी ''तथास्तु'' म्हणून आपल्या वडिलांना वंदन करून पुन्हा मुलांबरोबर खेळावयास गेला.

ज्याचे दर्शनाकरिता घोर तप करूनही त्याचे दर्शन होत नाही अशा त्या शंकराला त्याची जनक-जननी हात धरून ओढून आणत असत. यज्ञाच्या वेळीही जो अवदान घेत नाही, तो आपल्या आईला म्हणत असे ''भूक लागली.'' ज्याची आज्ञा महाकाळ शिरी धारण करून वेळ काढतो असा तो शंकर आपल्या आईला म्हणतो की, ''माझ्याजवळ ये मला भीती वाटते.'' जो अखिल ब्रह्मांडास आवरण घालणारा आहे, तो आईला म्हणतो की, ''मला पांघरूण दे, मला थंडी वाजत आहे.'' ज्याच्या पोटात अनंत ब्रह्मांडे आहेत असा तो ब्रह्मांडनायक आपल्या जनक-जननीचे मांडीवर झोपतो, तिन्ही अवस्थेत तो जागरूक असतो, तो आईला

म्हणतो की, ''मला फार झोप आली आहे, मला अंथरुण घाल.'' ज्याचे तेजाने चंद्र-सूर्य प्रकाशतात तो आईस म्हणतो, ''मला लवकर दिवा आणून दे, अंधारात काही दिसत नाही.'' ज्याने क्षीरसिंधू निर्माण केला तो गाईचे दूध पिण्याची इच्छा करतो, अशा नाना तऱ्हेच्या लीला चिदंबर दाखवीत असे. दीक्षित चिदंबरास म्हणाले की, ''फार खेळू नये. विद्याभ्यासात लक्ष घाल ज्या योगे जगात पूज्य होतो.'' तेव्हा धीटपणे बाळ बोलला की, ''मी विद्याभ्यास करणार नाही, तरीही चौदाही विद्या मी तोंडपाठ म्हणून दाखवीन.'' हे भाषण ऐकून दीक्षितास आनंद झाला व ते म्हणाले की, हे अवतारी मूल आहे व आपली निजसत्ता बोलून दाखवितो. जरी चिदंबर बाळ पाचच वर्षांचा झाला होता तरी त्याची कीर्ती भूलोकावर पसरली.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि
व
चि
द
म्ब
र

शि
व
चि
द
म्ब
र

# अध्याय पाचवा

गजगौरी व्रत

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। या प्रमाणे चिदंबर बाळ वाढत असता उत्तरायणी दीक्षितेंद्राने चिदंबराचा अक्षरारंभ केला. गणेश, विष्णू व सरस्वतीची पूजा करून कुलदेवता लक्ष्मीचे पूजन केले. नंतर पित्याने चिदंबराच्या लेखनास ॐकारादी करून आरंभ केला. बावन्न अक्षरे व बाराखड्या त्याच दिवशी शिकून पुढे काय म्हणून चिदंबराने पित्यास विचारले. चिदंबराची अभ्यासांकडे तन्मयता पाहून त्यास फार आनंद झाला व नंतर चिदंबरास शिक्षा आदी करून वेदान्त सांगितला. एक महिन्यातच सर्व षडंग बाळवेशी सदाशिवाने पाठ करून आपल्या पित्यास फार आनंद दिला. त्याची लोकोत्तर बुद्धी पाहून पित्यास फार आनंद झाला व पाचवे वर्षी मोठ्या उत्सवाने चिदंबराची मुंज करता झाला. आधीच चिदंबर बाळ सुंदर त्यावर मुंजीची शोभा येताच त्याच्या मुखावर लोकोत्तर कांती दिसू लागली. आधीच सोने सुंदर असते तेथेच सुगंध प्रकटला असता जी शोभा दिसेल ती चिदंबरास प्राप्त झाली. मेखला, अजिन, दंडकमंडलू, कौपिन आणि सुंदर यज्ञोपवीत या योगे तो बटू मूर्तिमंत, दयाळू असा वेदपुरुष वाटला. स्नान-संध्या व अग्निकार्य करून नेहमी गुरूच्या सेवेला सादर असे. सर्व बालिशपणा सोडून चिदंबर वेदाभ्यासास आरंभ करिता झाला. या प्रमाणेच प्रभाकराची मुंज करून जगद्रक्षक असे हे दोन्ही ब्रह्मचारी वेदाभ्यास करिते झाले. श्रेष्ठ नित्यानुष्ठान रोज करून ते वेदपाठ करीत असत. ॐकाराधि स्पष्ट म्हणून ते शांतीपाठ म्हणत असत. मग पिता वेदमंत्र सांगत असे आणि ते दोघेही कुमार पाठ करीत असत. एकदाच सांगून चिदंबर ते अस्खलित पाठ म्हणत असे. चतुर्वेद मंत्र, ब्राह्मण पद्क्रम, जटाधन सहा शास्त्रे व अठरा पुराणे पित्याने चिदंबरास सांगितली. सूत्रभाष्य व याज्ञिक पद्धती बीजन्यास मंत्र पित्याने सांगताच ते दोघेही कुमार पाठ करीत असत. त्याचे अभ्यासधारणा, कौशल्य पाहून सर्व पंडित समुदाय म्हणत असे की काय हे आश्चर्य! हे सर्व लोकोत्तर दिसत आहे, हे दोघे ब्रह्मचारी चौदा विद्या एका वर्षातच कसे शिकले, म्हणजेच हे निश्चितच नरापासून नर नारायण होतील. जसे पूर्वी सांदीपानी आश्रमात रामकृष्ण अध्ययन करीत असत तेच उपमान येथेही शोभते. चिदंबराची पाठशक्ती पाहून सर्व पंडित माना डोलवीत व त्यांना आश्चर्य वाटून म्हणत असत की कलानिधीश आहे.

शि व चि द म्ब र

हे सर्व पाहून त्याच्या माता-पित्यास अतिशय आनंद होत असे. चिदंबराची सहाध्यायी सर्व मुले, सर्व शास्त्रांत विशारद झाली. ते सर्वजण चिदंबराच्या कृपेने शांत दांत ब्रह्मनिष्ठ निजसुख पावते झाले. दीक्षितेंद्राने दृष्टीस आरंभ करिता चिदंबराने सुगम घाटी करून पंडितास दाखविली. त्यामुळे सर्व पंडित लोक मौनावले. त्याचे स्वरवर्ण, हस्तलाघव पाहता सर्व जण स्वस्थ बसले. कोणीही व्याधिग्रस्त मूल, नारी किंवा नर चिदंबरास शरण येताच ताबडतोब आरोग्य पावत असत. चिदंबराचे वचन वज्रलेपाप्रमाणे सुदृढ होते की, जे मुखातून निघताच त्याचप्रमाणे त्याचे फळ निघत असे. ज्याला चिदंबराचा उत्तम अनुग्रह मिळत असे तो इंद्राप्रमाणे होत असे. निग्रहमात्रे एखाद्याचे त्याला इंद्राने जरी पाठी घातले तरी त्याचे भस्म होत असे. लोक म्हणू लागले की, हा बाल वयात इतके प्रताप दाखवीत आहे, तर पुढे मोठा झाल्यावर काय करील? देवा आम्हास चिरायुषी होऊन चिदंबराचे सर्व चरित्र डोळ्याने पाहू दे आणि चिदंबराची सेवा करून कैलासपदीचे ही सुख आम्हाला पाहू दे. दीक्षितेंद्राचा एक शिष्य मार्तंड नावाचा होसूर या गावी होता त्याने येऊन दीक्षितेंद्रास विनंती केली की, आज आमच्या घरी येऊन गजगौरी व्रत सांगावे. यावर दीक्षितेंद्राने त्यास सांगितले की, आज मला सवड नाही, चिदंबरास घेऊन जावे. तेव्हा तो बरे आहे असे म्हणून दीक्षितेंद्रास वंदन करून चिदंबरासह निघाला व त्याला आपल्या घरी नेऊन उत्तमासनी बसवून भक्तिभावाने अर्घपाद्य दिले. नंतर आपल्या भार्येस बाहेर बोलावून म्हणाला, तुझे दैवयोग उत्तम आहे म्हणून गजगौरी व्रताकरिता गुरुपुत्र चिदंबर आले आहेत, तेव्हा आता लवकर पूजा कर. हे पतीवचन ऐकून ती पतीव्रता इतर सुवासिनीभोवती घेऊन आसनावर बसली. शामसुंदर परमचपल अशी चिदंबराची पाच-सहा वर्षांची वामनमूर्ती तेथे येऊन बसली. स्त्रिया स्वभावाने चंचल असतात. हे दिव्य मनमोहन बाळरूप पाहून त्या भुलून गेल्या व त्यास बाळ म्हणू लागल्या व एकमेकांशी हसत म्हणू लागल्या की, ही वामनमूर्ती पहा. याला विचारा की तू काय शिकला आहे आणि चिदंबराकडे पाहून हसू लागल्या. त्या स्त्रियांचे असे उपहासात्मक बोलणे ऐकून दुसऱ्याचे गर्वहरण करणारा असा तो शंकर म्हणाला की, मी काहीच शिकलो नाही. परंतु पित्याचे आज्ञेप्रमाणे येथे सहज आलो आहे. जशी मला जमेल तशी पूजा सांगून यथेच्छ मिष्टान्न भोजन करीन. हे ऐकून ती पतिव्रता बाहेर जाऊन आपल्या पतीस विचारती झाली की, हा व्रत पूजनाकरिता लहान मुलगा आलेला आहे, तेव्हा आता कसे काय होईल? तेव्हा तिचे पतिने असे सांगितले की, तू मुळीच चिंता करू नकोस. हा गुरुचाच मुलगा आहे व

शि व चि द म्ब र

त्याच्या सांगण्याप्रमाणे स्वस्थपणे पूजा कर. त्यावर ती पतिव्रता शांत चित्ताने आसनावर येऊन बसली. त्यावर चिदंबराने संकल्प करवून आधी श्री गणेशाची पूजा केली व आपल्या हाताने गजगौरी पिठावर आणून बसवली. आपल्या हाती अक्षता घेऊन प्राणप्रतिष्ठेला सुरुवात केली.

बीजन्यास याचा उच्चार करून त्याने जीवकला योजिल्या, तोच त्या गजगौरी जवळील हत्ती सचेतन झाला. मग चिदंबराने आपल्या हाताने खूण करून त्या हत्तीस स्वस्थ बसवले व विधीयुक्त त्या स्त्रियांकडून पूजा करवली. पूजा संपल्यानंतर चिदंबर कथा सांगता झाला व त्याचे मुखाने अर्थ ऐकताच त्या स्त्रियांना आश्चर्य वाटले व माना डोलवू लागल्या. कथा संपल्यावर तांबूल, दक्षिणा घेऊन चिदंबर घोड्यावर बसला व आपल्या घरी आला. पित्याला वंदन करून सांगितले की, आपल्या आज्ञेप्रमाणे गजगौरी व्रताचे पूजन करवून येथे यज्ञाच्या प्रसादाकरिता आलो आहे एवढे बोलून तो स्वस्थ बसला. इकडे मार्तंड शिष्याचे घरी तो मातीचा हत्ती सजीव होऊन आपल्या पाठीवर गौरीस बसवून मंदगतीने पुढे पाऊल टाकू लागला व हळूच पिठाखाली उतरून माजघरात संचार करू लागला. तोच ती सती घरातून बाहेर आली व जिवंत हत्तीस तिने पाहिले व इतक्यातच त्या हत्तीने पूजेची उपकरणे खाली पाडली व आपली सोंड उंच करून मोठ्यांदा किंकाटला. मातीचा हत्ती चालतो हे ऐकून इतर स्त्रियांना आश्चर्य वाटले व आपण पाहू म्हणून चोहीकडून धावू लागल्या, तोच त्या हत्तीस माज येऊन मोठ्यांदा गर्जत पावले टाकू लागला. तेव्हा सर्व स्त्रिया बाजूला होऊन हत्तीच्या लीला पाहू लागल्या. ज्या ठिकाणी स्त्रिया होत्या तिकडेच तो हत्ती आपल्या पाठीवर गौरीला घेऊन येऊन सोंड हलवू लागला. हत्ती आला म्हणून स्त्रिया भिऊन धावू लागल्या, याप्रमाणे त्या हत्तीची लीला आपल्या घरात पाहून मार्तंड शिष्य मनात विचार करू लागला की, या स्त्रियांनी चिदंबराचा उपहास केला म्हणून ही चिदंबराची चमत्कृती आहे, ज्या योगे हा मातीचा हत्ती चालतो असे मनात म्हणून तो धावतच मुरगोडला गेला व ही चिदंबरकरणी दीक्षितेंद्राला सांगितली व म्हणाला की, आम्ही आता काय करावे? आमचे तेव्हाच समाधान होईल, जेव्हा आपण चिदंबरास सांगून हत्तीस पूर्वस्थितीत आणाल. त्यावर दीक्षितेंद्राने चिदंबरास बोलावून विचारले की तेथे तू काय करून आलास व मातीचा हत्ती सजीव कसा झाला, ते तू मला सांग. त्यावर चिदंबर भीतभीत म्हणाले मी तेथे काहीच केले नाही. आपल्या आज्ञेप्रमाणे पूजा करवून मी येथे आलो. आपण सांगितल्याप्रमाणे प्राणप्रतिष्ठा विधान केले. त्या मंत्राच्या बळाने हत्ती सजीव

झाला असावा. त्यावर दीक्षितेंद्र हसून बोलले की मी तुझे मनोगत जाणतो. पुन्हा तेथे जाऊन उत्तर पूजा करावी, हे पित्याचे वचन ऐकताच चिदंबर बरे आहे असे म्हणाला व परत तेथे जाऊन उत्तर पूजा मंत्र म्हणून अक्षता टाकल्या. चिदंबराच्या हाताने अक्षता पडताच तो हत्ती पूर्वस्थिती पावून आपल्या जागेवर शांत चित्ताने बाहुलीसारखा बसला. त्या गावातील लोक अशी लोकोत्तर चिदंबर सत्ता पाहून त्यांचे मनात आनंद मावेना व चिदंबरांचा मोठ्याने जयजयकार करू लागले. कित्येक चिदंबराच्या पुढे आडवे पडले. कित्येक नाना तऱ्हेची स्तोत्रे करून म्हणाले की तू बालवेषात असून तू प्रत्यक्ष सांब मूर्ती आहेस. अज्ञ लोकांना तू लहान मूल दिसतोस, परंतु तूच सृष्टी स्थिती व लय करतोस अशी तुझी सत्ता आहे, असे आम्हास वाटते. हे लीलाधारी बाळा, आमचे तुझ्या चरणी वंदन असो, तरी तू आम्हाला तार. याप्रमाणे सर्व लोक स्तोत्रपठण व नमन करीत असता चिदंबराने त्यांच्याकडे कृपादृष्टीने पाहून त्यांचे मनोरथ पूर्ण केले. नंतर यजमानासह मोठ्या आनंदाने जेवण केले व आपल्या घरी येऊन पित्यास वंदन केले तेव्हा दीक्षितेंद्राने तू आताच प्रकट होऊ नको असे कितीदा सांगूनही तू बाळभावाने नाना प्रकारचे खेळ खेळतो व साक्षात शंकर आहेस, हे मी निश्चितच जाणतो. तुझी कीर्ती जोपर्यंत चंद्र, सूर्य आहेत तोपर्यंत स्थिर राहील. तरी मी जे सांगतो, त्याप्रमाणे ऐकून आचरण कर. ज्यायोगे तुझे त्रिभुवनात यश निश्चितच वाढेल, आताच तू जर अशा लीला प्रकट करू लागलास तर येथे यात्रा जमेल तेव्हा तुझे दर्शन हे पुत्रराया मला होणार नाही. तुझा जन्म अवतार धर्मरक्षणाकरिता आहे, त्यासाठी तुला मी तुझ्या हिताची गोष्ट सांगतो की, लोकोपचाराकरिता अगोदर शास्त्रोक्त पितृसेवा व मातृसेवा करावी. मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत तू गुप्त राहवे व नंतर यथेच्छ लीला करून अवतार कृत्य विस्तारावे. राखेने झाकलेल्या विस्तवाप्रमाणे आपल्या घरी गुप्त राहवे असे पितृवचन ऐकून चिदंबर बरे आहे असे म्हणाला. नंतर लोकोपचारार्थ मातृपितृ सेवा करीत, तो जगज्जीवन गुप्त असतानाही समयानुसार सारे सहज लीला दाखवीत असे. कस्तूरी झाकून ठेवली असता त्याचा वास बाहेर दरवळल्याशिवाय कसा राहिल व सूर्यास ढगाने व्यापले असता प्रकाश कसा लोपेल, शास्त्रज्ञानी, लोकांनी संस्कृत शब्द बोलणार नाही, अशी प्रतिज्ञा केली तरी त्यांचे मुखातून सहज व नकळत संस्कृत भाषा बाहेर पडते. प्रापंचिकमध्ये अवतार क्रिया कदापि गुप्त राहू शकत नाही. जसे कापसाच्या राशीत अग्नीला लपायला जागा मिळत नाही. म्हणून प्रापंचिकाची तळमळ बघून दयाळूंचे कोमल हृदय तत्काळ द्रवते. त्याकरिता चिदंबर काही खेळ खेळून दाखवीत



शिवचिदम्बर

असे. एके दिवशी पित्यासहीत चिदंबरेश्वर हळ्ळीहाळ या गावी गेले होते. तेथे एक रामचंद्र नावाचा दीक्षितेंद्राचा भक्त होता, त्यांना पाहताच त्यास अत्यानंद झाला व त्यांचे आतिथ्य करून नियमित संभावना दिली. मग मार्तंड दीक्षिताने आपले सर्व अनुष्ठान संपवून रात्री तेथेच मुक्काम केला व सुखाने तेथेच झोपले. चिदंबर आपल्या पित्याची सेवा करत तेथेच जागत बसला होता. तेव्हा आतील घरात तेथील सती आपल्या पतीला म्हणाली की, "तुम्ही कष्टाने मिळवलेले धन चोर घेऊन गेले. आता पुढे कसे होईल ते मला सांगा. काल रात्री चोरी झाली व आज आपल्या घरी सत्पुरुष आले आहेत. तरी त्यांचे कृपेने आपले चोरीस गेलेले धन मिळावे ही गोष्ट त्यांचेपाशी काढा." सतीचे वचन ऐकून रामचंद्र हसून बोलला की, "कल्पवृक्षाखाली बसून तू आंबील मागू इच्छितेस, सज्जनांच्या कृपेने असाध्य गोष्टही लाभते, तेव्हा सज्जनांना अशा किरकोळ गोष्टी मागू नये, उकिरड्यात रत्न टाकू नये, नदीत अमृत ओतू नये. त्याप्रमाणे सज्जनापाशी विषय लाभ मागू नये, वेदांची विक्री करू नये, गाढवाला तूप पाजू नये, त्याचप्रमाणे विषय प्राप्तीसाठी सज्जनाला विनवू नये. सत्पुरुषाची कृपा मोठी असते, त्यामुळे अलभ्य लाभ घडतात, म्हणून द्रव्य चिंता सोडून तू मनात धीर धर. जो परवश असता तो विश्वंभर त्यास सांभाळतो. असा तो शंकर असता तू का तळमळतेस? लाभालाभ हे दैवाधीन आहे आणि कर्म हे भोग परतंत्र आहे. त्यामुळे भोगल्यावाचून कर्माचा क्षय होत नाही. तुझ्यावर शिवाचा अनुग्रह होण्याची वेळ आली आहे. ही गोष्ट निश्चितच आहे. या अर्थाचे एक भगवत वाक्य तुला सांगतो, "यस्यानुग्रह मिच्छामि, तस्य वित्तं हराम्यहम्" म्हणून तू आता स्वस्थ रहा." असे पतीचे बोलणे ऐकताच निरुपायाने ती सती स्वस्थ बसली. हे दंपतीवचन चिदंबराने ऐकले व रामचंद्रास बाहेर बोलावून सांगितले की, मला बहिर्दिशेस जावयाचे आहे तरी घरात जाऊन दिवा घेऊन यावा. गावामध्ये सुज्ञानी मल विसर्जन करू नये म्हणून गावा बाहेर जाऊन रामचंद्र म्हणाला, "या ठिकाणी बसा." तेव्हा चिदंबर म्हणाले की, "गावाजवळ घाण फार आहे, तरी आपण दूर जाऊ." त्याप्रमाणे थोडे दूर जाताच रामचंद्र म्हणाला, आता येथेच बसावे. कारण आता मध्यरात्रीची वेळ व पुढे अत्यंत अघोर अरण्य आहे, तेथे भयानक वाघसुद्धा आहे, असे भीतीचे बोलणे ऐकून चिदंबर स्वामी हसून म्हणाले, मी तुझ्याजवळ असता यमाची सुद्धा भीती तू धरू नकोस. आणखी थोडे पुढे जाऊन एका झाडाखाली बसून स्वामींनी रामचंद्रास सांगितले की, जवळ ये. तेव्हा रामचंद्र रागाने व किंचित निष्ठुरतेने म्हणाला की, "तू मला मध्यरात्री कोसभर लांब आणले आहेस त्याचे

शि व चि द म्ब र

कारण काय? मला फार झोप आली आहे व काय काम आहे ते लवकर सांग. तेव्हा श्री चिदंबर म्हणाले की, तू इथंपर्यंत ये व येथील जमीन खण. त्यात तुझे कल्याण आहे. तेव्हा रामचंद्राने दिवा खाली ठेवून हाताने माती काढू लागला. वीतभर माती काढताच खाली एक पेटी त्याच्या हाती लागली. ती पेटी वर काढून पाहताच ओळखली की ती त्याचीच पेटी होती की जी चोराने नेलेली होती. अत्यानंदाने तो देहभान विसरून मौन्य धरून स्वस्थ बसला. थोड्या वेळाने शुद्धीवर येताच आनंदाने त्याने स्वामी पदास वंदन केले. वारंवार स्फुंदून प्रेमाश्रू वाहू लागले आणि म्हणाला की ब्रह्मा, विष्णू, महेश तूच आहेस, असे म्हणत वारंवार दंडवत घालीत अनेक प्रकारे स्तवन करता झाला. तेव्हा स्वामी म्हणाले, ''आता तू पेटी घेऊन लवकर उठ व आता आपण लवकर घरी जाऊ, परंतु ही हकिकत माझ्या पित्यास कळवू नकोस.'' मग ती पेटी व दिवा घेऊन ते दोघे घरी आले. चिदंबर अंथरुणावर पडताच रामचंद्र आतील घरात जाऊन आपल्या पत्नीला ही हकिकत सांगता झाला आणि दोघांना अतिशय आनंद झाला. मार्तंड दीक्षित सकाळी आपले गावी जाणेस निघाले असता रामचंद्राने मोठ्या विनयाने प्रार्थना केली की, आपण भोजनाकरिता थांबावे. दीक्षित भोजनाकरिता थांबताच रामचंद्राने मोठ्या संतोषाने समाराधना केली. पक्वान्ने व दक्षिणा देऊन ब्राह्मणांना आनंदित केले. भोजनानंतर दीक्षितेंद्राने रामचंद्रास विचारले की तू इतका आनंदी का दिसतोस व त्या आनंदाचे कारण काय? हे दीक्षितेंद्राचे बोलणे ऐकताच रामचंद्राने स्वामींच्या तोंडाकडे पाहिले आणि तो स्वस्थ बसला. तेव्हा स्वामी रामचंद्रास म्हणाले की, ''मी जे काही विचारले तेव्हा तू मौन का झालास? तुझ्या मनात काय आहे आणि तुझ्या आनंदाचा हेतू निर्भयतेने सांग. त्यावर रामचंद्राने रात्रीचा वृत्तांत कथन केला व ते ऐकून सर्व नारी-नर आनंदाने महास्वामींचा जयजयकार करू लागले. त्यावर दीक्षितेंद्राने सर्वांचे समाधान केले व चिदंबरास घेऊन आपल्या गावी परत आले.

शि व चि द म्ब र

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

# अध्याय सहावा

मृत बैलाचे संजीवन

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम:।। बेडसूर या गावी मल्ल या नावाचा एक दीक्षित शिष्य होता. त्याने एक शिवालय बांधून त्यात शिवप्रतिष्ठान करण्याची त्याची इच्छा होती. एक दिवस मुरगोडास येऊन त्याने आपल्या गुरूला मुहूर्त विचारला. त्यावर दीक्षितेंद्राने चैत्र शुक्ल पंचमी हा स्थापना मुहूर्त काढून दिला व गुरूचे आज्ञेने चिदंबरास घेऊन मल्ल आपल्या गावी आला. प्रात:काली स्नान करून पंचमीचे दिवशी स्थापन विधीस आरंभ केला. तेव्हा बरेचसे ब्राह्मण येऊन ते मल्लास सांगते झाले, तरी तू प्रतिष्ठापना करू नकोस. तुला आम्ही दुसरा मुहूर्त काढून देऊ, त्या दिवशी प्रतिष्ठापना कर. असे ज्योतिषांचे वचन ऐकून मल्ल मनात विचार करू लागला की, गुरुवरील विश्वास सर्वांना तारक असतो. हा गुरुने दिलेला मुहूर्त आहे त्याचे उल्लंघनाकरिता आपणाला सुख होणार नाही म्हणून कर्मास आरंभ करता झाला. आपल्या वचनावर विश्वास नाही असे बघून ते ज्योतिषी तेथेच मौन धरून बसले. मल्लाने पुण्याहवाचन उरकून तो देव मंदिराकडे निघाला. मंगल वाद्ये वाजू लागली, ब्राह्मण वेदमंत्र म्हणून लागले व पूर्ण कुंभ घेऊन सुवासिनी गण पुढे येऊ लागल्या. याप्रमाणे प्रतिष्ठापना करून तो मल्ल आपल्या दाराबाहेर आला तेव्हा त्याला एक विघ्न ओढवलेले दिसले. एक मौल्यवान बैल होता, तो एकाएकी कारण नसताना खाली तडफडत पडला व त्याने प्राण सोडला. मल्लाच्या नोकरांनी ही हकिकत सांगता मल्ल भ्रांत चित्त झाला व मनात म्हणाला की, ''गुरुनी मुहूर्त शोधून दिला असता हा दुर्योग येथे कसा काय घडला.'' ज्योतिषी म्हणू लागले की, ''आम्ही तुला दुसरा चांगला मुहूर्त काढून देत असता तू गुरूचे वचन मान्य करून आमची उपेक्षा केलीस व आम्हाला सामान्य मानलेस. दुर्योगाचे फळ तुला मिळाले आहे आता तरी हे कर्म पुन्हा करू नकोस. परवा उत्तम मुहूर्त आहे त्या दिवशी तू स्थापना कर.'' इतक्यात तो शामसुंदर चिदंबर ब्रह्मचारी बाहेर आला. जो सूर्याप्रमाणे तळपत होता. ही मूर्ती भक्तांनी पाहताच त्यांना असे वाटले की हा बलीदर्प हरता वामन अथवा भक्तवत्सल उमा-रमणच येथे बटूवेषाने आला आहे. ज्याप्रमाणे राजहंसास पाहून कावळे, वाघास पाहून कोल्हा अथवा तेजोमय अशा सूर्यास पाहून दिवाभीत दचकतात, त्याप्रमाणे


शि व चि द म्ब र

ज्योतिषी लोक चिदंबरास दचकले. पण नंतर त्याचा उपहास करून हसून बोलू लागले की, तुमचा पिता स्थापना मुहूर्त उत्तम शोधून काढतो. हा मल्ल त्याचा शिष्य आपल्या गुरुचे वचन मान्य करून व आमचे वचन सामान्य मानून प्रतिष्ठा कर्म आरंभिता झाला. आज मृत्युयोग आहे असे सांगताही आमचा धिक्कार करून कर्म पुढे चालविता क्षणी त्यास योग फळाने गाठले. याप्रमाणे ज्योतिष्यांचे कठोर भाषण ऐकून त्यांना काहीच उत्तर न देता श्री चिदंबर मल्लाला म्हणाला, ''तू असा स्वस्थ का झालास व तुझे तोंडावर म्लान चर्या का दिसत आहे? तुझ्यावर काय संकट आले आहे की तू एकदम स्वस्थ झालास. आळसाने शुभसमय टळेल, त्याला तू हळहळ का करतोस. देवालयाकडे तत्काळ चल.'' असे श्रींचे वचन ऐकताच मल्ल चिदंबरास खिन्न वदन करून म्हणाला की, प्रतिष्ठान आज राहू दे. बाळा ते आपण अन्य मुहूर्ती करू. कारण आज मृत्युयोग आहे, त्यायोगे विघ्न संभवते त्यासाठी हा कर्मभाग पुढे करू. तेव्हा मंद हसत श्री चिदंबरेश्वर मल्लास म्हणू लागले की, ''तू भ्रमित का झाला आहेस की ज्यामुळे गुरुने दिलेला मुहूर्त उल्लंघू इच्छितोस. माझ्या पित्याने हा मुहूर्त शोधला आहे, त्याला मृत्युयोग कसा असेल. निष्कारण दुर्जनांचे वचन ऐकून मनात शंका घेऊ नकोस. ताबडतोब देवालयाकडे चल आणि शंकराची प्रतिष्ठापना कर.'' असे चिदंबराचे बोलणे ऐकून मल्ल खिन्न मनाने बोलता झाला की, जेवताना पहिल्याच घासात मक्षिकापात व्हावा त्याप्रमाणे प्रथमच विघ्न पाहून पुढील कर्मे चिदंबरा स्थगित ठेवली आहेत. तेव्हा श्री चिदंबराने विचारले की, ''असे काय विघ्न आहे की ज्याचा प्रतिकार करता येणार नाही. तू उगीच चिंतातुर का होतोस?'' तेव्हा मल्ल चिदंबरास म्हणाला की, देवाच्या करणीला काहीच प्रतिकार करता येत नाही. माझे ऐक, मौल्यवान बैल काही कारण नसता मरण पावला, हे त्या मृत्युयोगाचे लक्षण आहे. तेव्हा श्री चिदंबर हसून म्हणाले की, ''हा तुझा विचार अगदी अयोग्य आहे, हे असे काय मोठे विघ्न आहे म्हणून तू चिंतातुर दिसतोस? हे मल्ला हे अज्ञानपण सोड. तुझे शिरी गुरुकृपा नाचत असता हे विघ्न तुला काय करील? तरी तू आता ताबडतोब शिवालयाकडे चल. शिवस्थापना समय हा कल्याणप्रत आहे. तो मुहूर्त तुझ्या गुरुने शोधून काढला आहे, त्यात तू गुरुभक्त असा यजमान आहेस तेव्हा येथे विघ्न कोठून आले, हे गुरुभक्ता आता सर्व संशय सोड. माझ्या पित्याने मुहूर्त शोधला असता मृत्युयोग कसा आला? हे मला योगशक्तिने पाहू दे. नाहीतरी येथे मंगल कर्म चालू असता यमधर्माने बैल कसा नेला, त्याचे बल मला पाहू दे.''

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

मेलेला बैल पडला होता तेथे आवेशाने येऊन त्याकडे अमृत दृष्टीने पाहून श्री चिदंबरेश्वर म्हणाले, ''हाच तो विघ्नकारक बैल आहे ना!'' व नंतर हातातील झारीचे पाणी शिंगापासून शेपटीपर्यंत त्या बैलावर आपल्या वरद हस्ते शिंपडले व त्याचे पाठीवर तीन थापट्या मारल्या व म्हणाले, ''हे वत्सा, लवकर उठ. तुझ्यामुळे एक सत्कर्म अडले आहे. तरी तू ताबडतोब जागा हो.'' असे म्हणून चिदंबराने त्या बैलाच्या अंगावर हात फिरवला तोच तो बैल अंग मुरडीत ताबडतोब उठून उभा राहिला. मेलेला बैल जिवंत झालेला पाहून तो यजमान मल्ल अतिशय आनंदित होऊन चिदंबर चरणावर त्याने उडी घेतली. त्यास साष्टांग नमस्कार करून प्रेमाश्रूंनी पाद प्रक्षालन केले व दोन्ही हात जोडून प्रेमाने स्तोत्र करता झाला. ''हे कालकाला कर्पूर-धवला, मी तुला ओळखले आहे, तू बाल वेषाने अवतार घेतला आहेस. हे ब्रह्मचारी चिदंबरा भक्तांचे संकट हरण करणारा तू, तुझा जयजयकार असो. तू दिनांचा कैवारी आहेस, तरी तू मला तार. हे चिदंबरा, तूच नारायण असून सृष्टी स्थिती व संहार करू शकतोस, म्हणूनच मेलेला बैल जिवंत केलास. हे बाळा, तूच गजवदन आहेस म्हणून माझे संकट निवारण केलेस. मी तुला अनन्यभावे शरण आलो असून तुझे चरणी आलो आहे.'' असे नाना तऱ्हेचे स्तोत्र करून वारंवार वंदन करीत होता. तेव्हा त्यास उठवून चिदंबर म्हणाले की, ''तू निःसंशय गुरूभक्त आहेस, आता सर्व भय सोड. भक्तप्रिय सद्‌गुरुनाथ तुझे मनोदय पुरवील. गुरुभक्तांमध्ये तूच वरिष्ठ आहेस. तुला केव्हाही कष्ट होणार नाहीत. भक्तवत्सल असा शंकर तुझा निश्चित सांभाळ करील. आता ताबडतोब शिवप्रतिष्ठान कर.'' असे म्हणून अनुष्ठान विधी करविला. विधियुक्त शिवप्रतिष्ठा केली आणि ब्राह्मणांना संतोषविले. चिदंबराचा मोठा प्रताप बघून सर्वांनी त्याचा जयजयकार केला. कित्येक स्तवन करू लागले, कित्येक नमन करू लागले, कित्येक येऊन विचारू लागले की, ''चिदंबरा तुझे किती महत्त्व आहे व मेलेला बैल तू कसा जिवंत केलास.'' ज्योतिषी लोक भिऊन चिदंबरास शरण आले ते पाहून श्री चिदंबर म्हणाले की, ''तुम्ही मला का शरण येता? माझेजवळ अशी काय शक्ती आहे व माझी प्रार्थना तुम्ही का करता? माझ्या पित्याने दिलेल्या मुहूर्ताची शक्ती अशी आहे की तो मेलेला बैल जिवंत झाला. मी एक बालब्रह्मचारी आहे, आपण सर्वजण शास्त्रज्ञ आहात. तेव्हा माझ्या डोक्यावर आपला अभय हस्त ठेवून माझ्यावर पूर्णानुग्रह करावा. आजचा दिवस खरोखरच धन्य आहे की, ज्या योगे आपले अलभ्य दर्शन मला झाले. तरी आता माझेवर पूर्ण

कृपा करून मला निरोप द्यावा.'' असे सर्व ब्राह्मणास बोलून मग मल्लापाशी येऊन घरी जाण्याकरिता त्यांचा निरोप घेतला. याप्रमाणे तो माया, नाटकी येथे अगाध कौतुक दाखवून पितृदर्शनाकरिता आपल्या घरी आला व पित्याला सर्व वृत्तांत सविस्तर सांगून नेहमीप्रमाणे पित्याची सेवा करीत राहिला.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय सातवा

चिदंबर विवाह महोत्सव

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। दीक्षितेंद्राने चिदंबरास असे सांगितले की, तू बारा वर्षे ब्रह्मचारी राहून तपश्चर्या केलीस. आता गृहस्थाश्रम स्वीकारावा, इतक्यात माढळ्ळी या उप नावाचा लिंगोपत नामे वर संशोधनाकरिता येऊन दीक्षितेंद्रास विचारता झाला की, ''माझी कन्या चिदंबरास द्यावी अशी इच्छा करून तुमच्याकडे आलो आहे. ती इच्छा पूर्ण करण्यास आपण समर्थ आहात.'' दीक्षितेंद्राने ही गोष्ट मानताच लिंगोपंताने लग्न निश्चित केले व सुमुहूर्त पाहून आपले कुटुंब, इतर नातेवाईक सर्व संपत्ती घेऊन लग्नाकरिता तेथे आले आणि मोठ्या समारंभाने श्री चिदंबराचे लग्न झाले. या महोत्सवाकरिता जे ब्राह्मण व विद्वान लोक आले होते त्यांनी मंगल सुरात मंगलाष्टकास सुरुवात केली.

ज्याने प्रेमपूर्वक गिरिजेचा हात धरला. तो भवानी प्राणनायक वधुवरांचे रक्षण करू दे. जो भक्तांच्या विघ्नांचे हरण करतो, जो ऋद्धीबुद्धीचा सहकारी आहे, असा तो विघ्नहरी गणनायक वधुवरांचे रक्षण करो. ब्रह्मादि देव ज्याचे आपल्या मनात अखंड ध्यान करतात तो भक्तवत्सल हृषीकेश वधुवरांचे रक्षण करो. ज्याचे प्रकाशाने सर्व लोक स्वकर्माचरण करतात तो हा सूर्यनारायण वधूवरांचे रक्षण करो. जिचे पूजन करताच सर्व संकटे पळून जातात ती मणिद्विपवासिनी जगन्माता यांचे रक्षण करू दे. अशी मंगलाष्टके म्हणून ब्राह्मणांनी अक्षता टाकल्या, नंतर लिंगोपंताने विधियुक्त कन्यादान सुरू केले, त्या कन्येचे नाव सरस्वती असे होते. ती प्रीतीपूर्वक चिदंबरास अर्पण करताच त्या वेळी असे कौतुक दिसले की, उमा महेश्वर पूजेच्या वेळी तो पंचवदन रुंडमाळी आनंदभरीत असा त्या कन्येजवळ साक्षात शिव बसला आहे, हे पाहून लिंगोपंताने आपले सर्वस्व चिदंबरास आंदण म्हणून समर्पण केले. हा महोत्सव चार दिवस चालू राहून अपार ब्राह्मण दक्षिणादान देऊन लिंगोपंताने तुष्टविले व तो महोत्सवाने वऱ्हाडाची बोळवण करून आपल्या घरी मोठ्या आनंदाने गेला. चिदंबराने याप्रमाणे गृहस्थाश्रम स्वीकारुन नित्यनेमाने मोठ्या भक्तिभावाने पितृसेवा करीत राहिला. यानंतर


शिव चिदम्बर

शि व चि द म्ब र

दीक्षितेंद्राने मोठ्या प्रीतिने एक कुलीन कन्या पाहून प्रभाकराचेही लग्न केले. ज्या वेळी हा कैलासनाथ या जगात अवतरला तेव्हा त्याचे सर्व गणही त्याची सेवा करण्याकरिता अवतरले. कोणी त्याचे भक्त झाले, कोणी त्याची सेवा करू लागले. कोणी पुत्र, विद्यार्थी व आप्त झाले, त्यात पार्वती व भागिरथी यांनीही या जगात सरस्वती व सावित्री या नावे अवतार घेतला. चिदंबर मनात म्हणू लागला की, ''फक्त एकीचाच मी अंगीकार केला आहे व दुसरी अजून वाट पाहते आहे. तरी आता गंगेचा स्वीकार केला पाहिजे व त्याकरिता पित्याची आज्ञा लवकर घेतली पाहिजे. तेव्हा चिदंबर म्हणाले, ''हे गुरुजी, मला आता नवीनच कसे एकाकी वाटत आहे. आज एक ज्योतिषी माझा हात पाहून म्हणाला की, ''तुला द्विभार्या योग आहे, तेव्हा त्याचा अर्थच मला कळेना.'' मुलाने असे विचारताच दीक्षितेंद्र हसून म्हणाले, ''तू कोण आहेस हे मला पूर्णपणे माहीत आहे. तेव्हा तुझे इच्छेप्रमाणे सर्व काही होऊ दे.'' असे पित्याने म्हणताच एक विचित्र गोष्ट झाली. तेथे एक ब्राह्मण आला. तेव्हा चिदंबरास फार आनंद होऊन मोठ्या भक्तीने त्या ब्राह्मण श्रेष्ठास त्याने वंदन केले. मग त्याला विचारले की आपण येथे कशासाठी आलात? आपण कोण व कोठे असता हे मला सांगावे. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला की, ''आपण सर्वज्ञ आहात तेव्हा अज्ञानासारखे प्रश्न का विचारता? तरीही लोकरीतीस अनुसरून मी सांगतो ते ऐकावे. माझे मनात काय आहे हे तू जाणतोस. तरीही माझे मुखातून वदवतोस. येथून पूर्व दिशेला शेल्लीकेरी या नावाचे एक गाव आहे. तेथे अत्यंत धार्मिक व सदाचारी असा मणिगिरी नावाचा ब्राह्मण आहे ज्याची कृष्णा नावाची जाया आहे. ती मोठी साध्वी व महासती आहे. तिला एक मुलगा झाला. तो मोठा शिवपूजक असून त्याची भार्या तुंगा नावाची पतिव्रता तिच्या पोटी बिष्ट नावाचा एक मुलगा आहे. त्याचा महिमा तुम्हाला कदाचित माहीत असेल. त्याचे अमानुष असे चरित्र आपण सर्वज्ञ असल्यामुळे जाणता. मी पामर त्याचे काय वर्णन करू? त्याची सरवरा नावाची सहचारिणी असून तिचे पोटी एक कन्या जन्मली जिचे सौंदर्य पाहून तिच्या प्राप्तीसाठी देवही उपाय करू लागले की, ही आम्हाला कशी साध्य होईल. एके दिवशी दंपती मनात विचार करु लागले की आपल्या कन्येस अनुरूप असा पती या जगात कोण आहे. असा विचार करीत असता अवचित तेथे एक ब्राह्मण आला व तो तुमचे साद्यंत चरित्र सांगता झाला. तुमची किर्ती ऐकून मनात संतुष्ट होऊन दंपती म्हणाले की, ''तो सर्वेश आपल्या मुलीचा कसा अंगीकार करील. रात्रंदिवस ती कन्या सावित्री

शि व चि द म्ब र

एक मनाने तुझे चिंतन करता अगदी कृश झाली आहे, तेव्हा तो विष्टेश चिंतातुर होऊन मला त्याने ताबडतोब पाठविले. तरी आपला काय विचार आहे तो सांगावे.'' याप्रमाणे ब्राह्मणाचे बोलणे ऐकून चिदंबरेश्वर आपल्या पित्याचे जवळ जाऊन त्या ब्राह्मणाचे वचन सांगता झाला व सर्व निवेदन केले. पित्यालाही आनंद होऊन त्याने होकार दिला व चिदंबरही लग्नाकरीता जाण्यास सिद्ध झाला. आपले सर्व आप्त सोयरे व सेवक गण असा सर्व परिवार घेऊन शेल्लीकेरीस येऊन गावाजवळ राहिला. बिष्टेशाने आपल्या घरी चिदंबरेश्वरास नेऊन विधियुक्त कन्यादान केले. गीतवादन व मोठ्या वैभवाने लग्न करून चार दिवस द्विज संतर्पण केले. सर्व लहानथोर व नारी वर्ग असा विवाह उत्सव पाहून या लग्नाचे आनंदाने स्वकर्माचा त्याग करता झाला. याप्रमाणे चिदंबर सावित्रीरुपी गंगेचा करग्रहण करून फार आनंद पावला व जेणेकरून ब्राह्मण संतुष्ट होतील अशा तऱ्हेने अनेक प्रकारचे अन्नदान व दक्षिणा देऊन त्यांना तोषविले व परत जाण्यास सिद्ध झाला. श्वशुराची आज्ञा घेऊन अमौलिक अशा आंदणभाराने व मंगल वाद्यात चिदंबर निघता झाला, आपला सर्व परिवार व नव्या नवरीस घेऊन मार्गक्रमण करीत मोठ्या आनंदाने मूरगोडास आला. चिदंबर सावित्री दंपतीने मार्तंड दीक्षितांचे चरण धरून सद्भावाने वंदन केले व त्यांची सेवा करीत राहिले. कैलासाप्रमाणेच या भूलोकी दोन्ही स्त्रियांना घेऊन चिदंबर शोभू लागला. या जगात आपल्या वडिलांची सेवा आपली सर्व कामना पुरविते हे इतर लोकांना कळण्याकरिता आपण पितृसेवा करीत असे. उत्पत्ती स्थिती व लय ज्याचे आधीन आहेत, ज्याचे आज्ञेवाचून एक पानही हलत नाही, असा तो सर्वेश्वर पुत्राप्रमाणे त्याचे घरी वर्तत होता. अहो जगदीशाचे चरित्र वर्णन करण्याकरिता वेदही कुंठीत होतात तेव्हा आणखी कोण समर्थ होऊ शकेल? या जगात लोकोपचाराकरिता चिदंबरेश्वर नाना कर्मे आचरित असे. श्रुती-स्मृती ज्याचे स्तवन करीतात, तोच सर्वेश्वर वेदाध्यायन करीत असे. ज्याच्या घरी अष्टसिद्धी सेवा करतात, तो आपल्या पित्याची सेवा करीत असे. ब्रह्मा, विष्णू, महेश ज्याचे पूजेला तत्पर तयार असतात, तो चिदंबर पूजा साहित्य आणून देत असे. जो जीवनाचेही जीवन आहे, तो आपल्या खांद्यावर पाण्याने भरलेला घट आणत असे. आपल्या पित्याचे घरी कुठल्याही तऱ्हेचा मानापमान आपल्या मनात आणत नसे. हात जोडून आपली काय आज्ञा आहे असे पित्यास विचारत असे. जेव्हा पिता बोलावील तेव्हा धावत येऊन त्याचे पुढे उभा राहत असे व पित्याचे आज्ञेचे पालन करीत असे. पित्याने आज्ञा देताच कुठलाही विचार न करता ताबडतोब

सांगितलेले कार्य करून पित्यासमोर उभा राहत असे. ब्राह्ममुहूर्ती पित्याचे अगोदर आपण उठून नेहमी सगळी सेवा करून पित्याला उठवित असे. रात्री पिता झोपल्यानंतर मगच आपण झोपत असे. या प्रकारे गुरुसेवा करणाऱ्याचे कोण वर्णन करू शकेल? गुरुसेवा ही केवळ मृत आहे, गुरुसेवेने विद्येचा लाभ होतो, गुरु सेवकाला लोकात मान असतो व त्यास अष्ठसिद्धी वश होतात. गुरुसेवा ही जणू कामधेनू आहे. ज्यायोगे मनातील इच्छा पूर्ण होतात आणि गुरुसेवा ही अज्ञानरुपी काळोख दूर करणारा असा दुसरा सूर्यच आहे. गुरुसेवेने आयुष्य वाढते. तिन्ही लोकांत कीर्ती वाढते. मोक्षाची प्राप्ती होते. गुरु ही दोन अक्षरे संसारातील सर्व चिंता व ताप त्याचे हरण करतात आणि गुरुच्या नावाचा नुसता उच्चार करताच अपार सुखाचा लाभ होतो, याप्रमाणे सद्गुरू चिदंबरेश्वर मुरगोडी राहून लोकोद्धारक असे अपार चरित्र दाखवीत असे. जो अनाथांचा नाथ असा चिदंबर, त्याचे चरित्र अपार आहे आणि ते सर्व चरित्र वर्णन करण्याकरिता कोण समर्थ आहे?

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय आठवा

टिपू मद्भङ्गः

।। श्री शिव चिदंबराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। सरस्वती मातेचे पोटी दोन गोमटी अशी मुले झाली. त्यांचे नाव दिवाकर व शंकर. त्या वेळी चिदंबराला फार आनंद झाला. एके दिवशी दीक्षितेंद्राने चिदंबरास सांगितले की, आज मला लवकर इष्टी कर्माला लोणी हवे आहे, तरी गावी लवकर जाऊन लोणी घेऊन ये. मी ब्राह्मणांना घेऊन इष्टी साधनास आरंभ करतो, तेव्हा चिदंबराने पित्यास वंदन करून असे सांगितले की, ''आज मला कोठे जाऊ नये असे वाटते, परंतु आपली आज्ञा असल्यामुळे मी थोडे लोणी घेऊन लवकर येतो.'' मग पित्याला वंदून आपल्या आईजवळ येवून नमस्कार केला व विनंती केली की आज कोणीही तुझ्याकडे येऊन तुला काही वस्तु आणून दिल्यास त्याला स्पर्श करू नको व त्या वस्तूचा अंगीकार करू नको. असे मातेस सांगून आपण गावी गेला, तोच एक शेजारीण बाई दुष्ट वासना धरून तेथे आली व मोठ्या मधुर वचनाने बोलती झाली. कारण पुढे तिला नरकी जायचे होते. म्हणून तिला तशी बुद्धी झाली होती. एक पडवळ हातात धरून ती लक्ष्मीमातेस म्हणाली की, ''हे फळ अति उत्तम आहे, तरी आज त्याची तू सुंदर भाजी कर.'' असे म्हणून लक्ष्मीमातेच्या हातात दिले. कालाची आज्ञा असल्यामुळे आपल्या मुलाने सांगितलेल्याचा तिला विसर पडला व ते फळ उत्तम होते म्हणून तिने ते हाती घेतले. त्या फळाला स्पर्श होताच लक्ष्मीमाता अति विव्हळ होऊन खाली पडली आणि एकच क्षण धडपडून ती प्राण सोडून निःश्चेष्टित होऊन जमिनीवर पडली. इतक्यात चिदंबर धावत तिथे आला, आपल्या आईची अवस्था पाहून त्याला दुःख झाले व तो आपल्या पित्याचे जवळ आला व आपल्या मातेची सर्व अवस्था सांगता झाला व म्हणाला की, ''जर आपली आज्ञा असेल तर मी मातेस जिवंत करीन.'' चिदंबराचे हे बोलणे ऐकून दीक्षितेंद्र आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''मी तुझी करणी जाणतो मी काय सांगतो ते तू ऐक. तू आज हिचा जीव वाचवशील परंतु पुढे सर्व लोक तुझे दाराशी प्रेतांचे ढीग आणून लावतील, तेव्हा फार विचित्र परिस्थिती उत्पन्न होईल, त्या सर्वांचे संजीवन करण्यास तू असमर्थ आहेस असे माझे म्हणणे नाही, परंतु

लोकात तू आत्ताच प्रकट होऊ नकोस, असे मला वाटते. कालौघाप्रमाणे जे होणार ते या म्हाताऱ्यासमोर झाले आहे, तरी शास्त्रानुसाराने पुढील कार्य आहे ते निश्चिंतपणे कर.'' पित्याचे हे वचन ऐकून 'तथास्तु' असे म्हणून चिदंबराने और्ध्वदेहिक विधी अनुसरून मातृ कर्म केले. अनंत दाने करून व ब्राह्मण भोजन करून चौदा दिवस चिदंबराने आराधन केले, मग नंतर पितृसेवा करीत चिदंबर स्वस्थ चित्त राहिला. मार्तंड दीक्षित मनात असा विचार करू लागले की, मी जन्मापासून आतापर्यंत अपार सुख भोगले आहे आणि माझे भाग्यही थोर आहे, जेणेकरून मी दोन नातवंडे पाहिली आहेत. आपली अवतार क्रिया झाकून प्रत्यक्ष शंकर माझी आज्ञा पालन करतो. चिदंबर प्रत्यक्ष शंकर असून जगात एक मानव भाव दर्शवतो आणि मोठ्या भक्तिभावाने नित्य सेवा करतो. माझे आयुष्य आता नव्वद वर्षांचे झाले आहे. डोळे आणि कान आता अगदी मंद रितीने काम करतात. तरी आजपासून चिदंबराने आपला महिमा प्रकट करावा असा एकंदर आढावा घेऊन चिदंबरास बोलवून दीक्षितेंद्राने स्पष्टपणे चिदंबरास सांगितले की, ''तू आजपासून आपले अवतार चरित्र व्यक्त कर. मी तुझे पदी आता प्रवेश करतो.'' असे चिदंबरास सांगून आपले नित्यानुष्ठान करून वज्रासन घालून प्राणायाम आरंभिला. आपला श्वास ब्रह्मांडी कोंडून व योगबळाने ब्रह्मरंध्र फोडून त्यामार्गे ब्रह्म जोडी पावला. शके १७१० ज्येष्ठ शुद्ध नवमीस प्रात:काली हा योगीराज दीक्षितेंद्र निजानंदी बसला. पुत्रधर्माप्रमाणे चिदंबराने पित्याचे संस्कार केले. तेव्हा तिसऱ्या दिवशी केंगेरी या ठिकाणी चमत्कार दिसला. चिताभस्म दूर करताच तेथे सहा टवटवीत असे औदुंबरांकूर दिसले. ते पाहून चिदंबरास आनंद वाटला. त्या दिवसापासून औदुंबर पूजनाकरिता मोठ्या प्रेमाने ब्राह्मणास नेमले. अजूनही ते औदुंबर त्या ठिकाणी आहेत व त्यांची सेवा करता भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. शास्त्राप्रमाणे सर्व पितृकर्म आटोपून चौदाव्या दिवशी चिदंबराने असे चरित्र दाखविले की, ज्याचे नुसते स्मरण करताच त्रितापांचे दमन होते. त्या दिवशी ४०० ब्राह्मण आमंत्रित केले होते. ते सर्व ब्राह्मण मध्यान्ह समयी तेथे आले. काशिराज नावाचा मार्तंड दीक्षितांचा शिष्य होता. तो चिदंबराजवळ येऊन विचारता झाला की स्वयंपाक सर्व तयार आहे व ब्राह्मणही अतिशय भुकेले आहेत, तरी पाने मांडण्यास आज्ञा द्यावी. तेव्हा चिदंबर म्हणाले की, ''आज काही गडबड करू नकोस. थोडासा विलंबच करावा आणि मी जोपर्यंत पाने मांडा म्हणून सांगत नाही, तोपर्यंत गप्प रहा.'' आणखी एका मुहूर्तानंतर त्याने पुन्हा येऊन

चिदंबरास तेच विचारले व चिदंबराने तेच उत्तर दिले. याप्रमाणे तो सारखा येऊन तेच विचारू लागला. चिदंबराने तेच उत्तर दिले. तीन प्रहर दिवस आल्यानंतर चिदंबराने पाने मांडण्यास सांगितली. तेव्हा काशिराजाने ताबडतोब पत्रावळी मांडल्या व भाज्या चटण्या वाढण्यास सांगितल्या, इतक्यात पूर्वेकडून आणखी ४०० ब्राह्मण आले त्यानाही चिदंबराने आमंत्रण दिले व ते भोजनास बसले. मग काशिराजाने चिदंबरास अशी विनंती केली की बरेच ब्राह्मण आलेले आहेत, तरी आताच पाणी सोडू नये. 'आणखी थोडा वेळ थांबल्यास आणखी स्वयंपाक करवून घेतो, नाहीतर आपली अपकीर्ती होईल. चिदंबर हसून म्हणाला की, ''तू स्वयंपाकाची चिंता करू नकोस. भोजनानंतर तुला सर्व वृत्त कळेल. निष्कारण शंका घेऊ नकोस.'' काशिराजाला भय वाटले की दुप्पट ब्राह्मण आले आहेत, त्यांना पोटभर अन्न कसे मिळेल. तेव्हा चिदंबराने हसत सांगितले की माझा पिता फार कृपावंत होता. त्याने या जगातून जाताना अन्नपूर्णा माझ्या स्वाधिन केली आहे व ती आता स्वयंपाकगृहात बसलेली आहे. मी तुला लवकर दाखवितो, तू तेथे चल'' असे म्हणून चिदंबरेश्वर निघाले. तेव्हा त्या स्वयंपाक गृहात हळदीकुंकवाने सौभाग्यचर्चित अशी अन्नपूर्णा बसलेली पाहिली. काशिराजाने जेव्हा पाहिले की एक वृद्ध सुवासिनी तेथे आहे व तिला दोघांनी हात जोडून वंदन करता ती उभी राहिली. अन्नपूर्णेला पाहून काशिराजाला समाधान वाटले व त्याने त्वरित सर्व पाने मांडली. त्यादिवशी ८०० ब्राह्मण जेवले, परंतु जे पूर्वीचे तयार केलेले होते ते शिल्लक राहिले, हे पाहून सर्वांना आश्चर्य वाटले व हाच शंकर असे म्हणून चिदंबरास वंदन करते झाले. त्या दिवसापासून चिदंबराची प्रसिध्दी फार वाढू लागली व त्यामुळे यात्रा भरू लागली. सर्व लोक मानापमान दूर सारून आपले मन श्री चिदंबरापायी समर्पून त्याची सेवा करू लागले. आजूबाजूचे सर्व लोक चिदंबर चरणाचे दर्शन घेण्यास येताच त्यांचे मनोरथ पूर्ण होत असत. करुणाकर असा तो चिदंबर एके दिवशी एका क्षुद्राला पाहून म्हणाला की, ''तू माझी गोष्ट ऐक, ज्यायोगे तुझे दारिद्र्य दूर होईल. तुझ्या घरातील देवघराचे ईशान्य दिशेला खाली धन आहे. ते तुझ्या आजोबांनी ठेवले आहे, तेथे दोन हात जमिन उकरून ते द्रव्य घे.'' ऐकताच त्या क्षुद्राने ताबडतोब जमीन खणून पाहिली व लगेच येऊन चिदंबर स्वामींना सांगितले की, तेथे द्रव्य वगैरे काहीच नाही. तेव्हा पुन्हा स्वामींनी सांगितले, की एक वीतभर उत्तरेस खण तेथे तुला चिक्कार द्रव्य सापडेल. पुन्हा क्षुद्राने जाऊन तसे करताच त्याला अमाप द्रव्य सापडले व मनात

म्हणू लागला, मला शंकर पावला आहे. हर्षानंदाने ते द्रव्य घेऊन तो धावत स्वामीपुढे येऊन तो द्रव्यघट त्याचे पुढे ठेवला. तेव्हा महास्वामींनी सांगितले की, ''हे सर्व काही द्रव्य घेऊन तू घरी जा व आजपासून देव- ब्राह्मणांची सेवा चालू कर.'' असे ऐकताच त्या क्षुद्राने त्यातील अर्धे द्रव्य काढून देव-ब्राह्मणांकरिता वाटूनही टाकले व नित्यनेमाने आजन्म दानधर्म करीत राहिला. असे स्वामींचे चरित्र वाढत असता स्वामींचे श्वशुर लिंगप्पा अचानक तेथे येऊन स्वामींना विनंती करते झाले की माझे मुलीस माहेरी पाठवावे, हे ऐकून महास्वामींनी सरस्वती मातेस तिच्या पित्याचे बरोबर पाठवले व तिला घेऊन तो आपल्या घरी आला. असे आनंदाचे कित्येक दिवस लोटताच एके दिवशी नवल झाले. टिपू नावाचा दक्षिण देशाचा राजा तेथे आला. त्याचे बरोबर महाबलाढ्य असे कित्येक म्लेंच्छ सैनिक होते आणि ते फार उन्मत्त होते. कुठल्याही पापपुण्याकडे लक्ष न देता तो जिकडे जाईल तिकडे देव व ब्राह्मणांना उपद्रव देत असे. त्याने लिंगोपंताचे घरी येऊन त्याचे घरातील सर्व द्रव्य हरण केले, हे पाहून सरस्वती मातेला अन्याय सहन झाला नाही व तिने मुसळ हातात घेऊन त्याला मारावयास धावली. हे पाहून टिपूला फार संताप आला व त्या पाप्याने आपल्या सेवकाला सांगितले, ''हीला धरून आणा, आपण हिला तुरुंगात टाकू.'' पतंगाने भक्ष्य समजून अग्नीला स्पर्श करताच जसा परिणाम होतो त्याप्रमाणेच त्या सेवकांनी सरस्वती मातेस धरताच एक अपूर्व घटना घडली. काही तरी मांस गोळी भक्ष्यच आहे. असे समजून पाण्यातील मासे गिळताच व गोळ्याचा काटा टोचून त्यांना प्राण द्यावा लागतो, त्या प्रमाणेच टिपूचे सैनिक सरस्वतीमातेस स्पर्श करताच क्षणी विव्हल होऊन प्राण सोडू लागले. सेनेत हाहाकार उडाला. कारण, हत्ती, घोडे, पायदळ यमलोकी जाऊन पटापट जमिनीवर मरून पडले. टिपू मनात विचार करू लागला की कोणाचे कोपाने मला अशी दशा प्राप्त झाली आहे. कारण त्याचे स्वत:च्या डोळ्यातील बुबुळे जमिनीवर पडली होती. तो मनात विचार करू लागला की, मी कित्येक देवळे फोडली, कित्येक ब्राह्मणांना मारले आणि म्हणूनच मला अशी दशा प्राप्त झालेली दिसते आणि आता मी काय करू? माझा कोण उद्धार करील, अशी तो चिंता करू लागला. इतक्यात तेथे एक ब्राह्मण आला, जो सुहास्यवदन असा होता. त्या ब्राह्मणाला बघून टिपूने त्याला वंदन केले व विचारले की, महाराज माझी अशी दशा कोणत्या अपराधाने झाली ते मला सांगावे. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला की, ''चिदंबर महिमा फार अपार आहे. अरे यवनेशा, तू नेणतेपणे

शि व चि द म्ब र

का होईना त्याच्या कांतेवर दृष्टी ठेवलीस आणि तिला जर तू तुरुंगात घातलेस तर तुझा अपराध काय विचारतोस? तू कुटुंबासकट एका क्षणात यमपुरीला जाशील, कारण ज्याचे भयाने देवसुद्धा नित्यनेमाने येऊन चिदंबराचे चरण त्रिकाल वंदन करतात. ज्याचे भयाने वायू वाहतो, सूर्य तापतो, यथाकाली पाऊस पडतो, त्याच्या आज्ञेवाचून मृत्यू कोणत्याही जिवाला स्पर्श करीत नाही, तो हा सच्चिदानंद सर्वेश्वर ज्याचे नाव चिदंबर आहे, त्याच्या कांतेस तू नेलेस तर तुझे कल्याण कसे होईल? जर तुझे कल्याण व्हावे असे वाटत असेल तर सर्व संशय सोडून श्री चिदंबरास शरण जा व जगदंबेस समर्पण हो.'' असे ब्राह्मणाचे वचन ऐकून टिपू उद्विग्न झाला व आपल्या सेवकांचा हात धरून पायी चालत निघाला. मुरगोडास चिदंबर महास्वामींचे घर येताच मोठ्या भक्तिभावाने त्याने लोटांगण घातले व म्हणाला, ''मी अपराधी आहे, हे चिदंबरा ,मी तुला शरण आलो आहे. माझे अपराध पोटात घालून माझेवर कृपादृष्टी असू दे, तू स्वत: निष्कपटी आहेस पण मी स्वत: पापाने कष्टी झालो आहे. तेव्हा या कष्टापासून हे सर्वेश्वरा, कृपासागरा चिदंबरा या शरणागताला सोडव.'' याप्रमाणे स्तवन करून वारंवार दंडवत घालून टिपू करुणा भाकू लागला. तेव्हा श्रीगुरूच्या मनात कृपा उपजली. मग बाहेर येऊन महास्वामी टिपूस विचारू लागले. देव द्विज संहार सोडून येथे का आलास? असे गुरुवचन ऐकून टिपूने जमिनीवर लोटांगण घातले व थरथर कापू लागला व म्हणाला, ''माझ्यावर कृपा करावी.'' महास्वामींनी विचारले की, तू लवकर मला सांग, तुला काय चिंता आहे, मग हात जोडून तो आंधळा टिपू म्हणाला की मी निष्ठुर असून तुझे जायेस तुरुंगात घालीन. असे म्हणालो. माझे सेवकही अतिशय दुर्जन आहेत त्यांनी अज्ञानाने सरस्वतीस मेण्यात घातले. त्यामुळे माझे चतुरंग दल पंचत्व पाहून, मी आंधळा झालो व येथवर आलो आहे, मग सरस्वती माता आपल्या घरी गेली व माझी अवस्था अशी झाली आहे, हे ऐकून सर्व लोक तटस्थ होऊन फार बरे झाले असे म्हणाले. आपले कार्य उपायावीण झाले आहे. प्राणहारक असा दुष्ट सर्प, अग्नीत आपोआप प्रवेशताच त्यावर कोण कृपा करील असे उत्तम घडले आहे आणि म्हणू लागले हा दुष्ट मरू दे. ज्यायोगे ब्राह्मणांचे कष्ट आपोआप चुकतील. कारण टिपू स्वत: उद्धट व निष्करुण आहे. सापाला दूध पाजले तरी तो आपला घात करतोच त्याप्रमाणे या यवनाचे रक्षण केले की आपला नाश होईल असे लोक म्हणत असताच कृपानिधी असा तो चिदंबर स्वामी त्याच्या मनात कृपा उपजली. ज्याची दृष्टी सम असते तो

शि व चि द म्ब र

कदापि विषमतेस मानत नाही व विषाद न मानता दृष्टाचे कार्य उत्तम करतो. स्वरद्योत खवळले असता काय सूर्याला गिळू शकतो, तसेच कृष्णसर्प माजला तरी गरुडावर स्वारी करेल का अथवा माशी जरी उद्धट असेल तरी ती क्रोधाने समुद्रपान करेल का? त्याप्रमाणे तो जगदीश, टिपूचे किंचीतही भय न मानता त्यावर कृपा करून म्हणाला, ''तुझ्या डोळ्याला काय झाले ते दाखव.'' असे सर्वेश बोलताच तीच वाणी अमृतवाणी झाली व टिपू डोळस झाला व त्याची सेनाही जिवंत झाली. ही अद्‌भुत गोष्ट पाहून फारच आनंद झाला व नाना तऱ्हेने स्तुती करून स्वामीस विनंती केली की माझ्या मनात नेहमीच शांती असू द्यावी व यापुढे मला केव्हाही तमोगुणाची बाधा होऊ नये. यावर स्वामी त्यास म्हणाले की, ''यापुढे देव-ब्राह्मणांना कधीही स्वप्नात देखील उपद्रव देऊ नकोस. जेव्हा जेव्हा अशी इच्छा तुला होईल तेव्हा तुझ्या जीवाला हानी होईल. तरी तू आता सुस्वभावी हो'' असे सांगून त्यास परत पाठविले. तो आपली सर्व सेना घेऊन आपल्या घरी गेला.

शि व चि द म्ब र

॥ श्री चिदम्बर गुरुवेनम: ॥

# अध्याय नववा

तैलिकाख्यान

।। श्री शिव चिदंबराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे आनंदघन चिदंबरा, सर्व मानापमान सोडून जे तुझे चरण भजतात त्यांना तू मोक्ष देतोस. जमिनीत सोऽहं बीज हे सद्गुरु तू पेरले आहेस, मनातील पुष्करणीचे पाणी तुला निर्धाराने देताच व कल्पना केर काढताच त्या सोऽहंम बिजाला आनंदांकुर फुटतात आणि ते अंकुर बाहेर आल्यावर अति सोज्वळ दिसतात आणि केर काढताच ते आकाशाला व्यापून टाकतात. त्याची इतकी दाट सावली असते की, अहम् सूर्याचा प्रकाश किंचितही त्यात प्रवेश करत नाही, असा त्या वृक्षाचा महिमा अगाध आहे, त्याला सात स्कंध असून त्यातील तीन मुळाजवळ असतात व चार वर शोभतात. त्यायोगे सेवकाला अति आनंद देतात. शुभेच्छा व वैराग्याने तो वृक्ष दृढ होतो, मग वरच्या स्कंधाची निश्चित वृद्धी होते. त्या वृक्षावर एक पक्व रसाळ असे फळ आहे. त्याच्या सेवनाकरिता हंसाचा समूह आपला जीव टाकतात. ते फळ घेऊन जर त्याचे सेवन केले, तर अनायासेच साधकांचे जन्म-मरण चुकते. साधकांना कोणतेही कष्ट न देता या फळाचे सेवन करून श्रीगुरु यांना मुक्त करतात व आपल्या कृपेने निवांत बसवतात. चिदंबरेश्वरास अनन्य शरण येऊन जे आपले तन मन व धन अर्पण करतात त्यांचे जन्म व मरण चुकते जो जगन्नाथ कैलास सोडून या भूलोकावर भक्तांसमवेत भक्ती मार्ग व धर्म स्थापनार्थ आला त्या चिदंबरेश्वराचे आता आपण वर्णन करू. जो श्रौताग्नीचा अंगीकार करून आपल्या दोन्ही स्त्रियांना वागवीत होता व गृहस्थाश्रम धर्म दाखविण्यासाठी आपले नित्य कर्म आचरित असे. कण्व शाखा अनुसरून आपण स्वतः कर्मातीत असून सर्व श्रौत विधान आचरून दाखवीत असे. ब्राह्ममुहूर्ती उठून ब्रह्मचिंतन, प्रातःस्मरण करून त्यानंतर शौचविधी व स्नान करीत असे. सर्वांगी भस्म लावून त्रिपुंड्र धारण करून संध्या करुन रोज होम करीत असे. नंतर देव व ब्राह्मण व गाईचे पूजन करून शिष्यांचे अनुग्रहाकरिता पाठशाळेत जात असे. विद्यार्थ्याकडे नुसते अमृत दृष्टीने पाहून दर्शनाच्या निमित्ताने यात्रेकरू लोकास नुसते दर्शन देण्याकरिता निघत असे. चिदंबराची सभा सद्धर्म जीवन या नावाने शोभत असे. त्या ठिकाणी प्रेक्षक इतके असत की अणुमात्र जागा शिल्लक राहत नसे. मधून मधून पावले टाकीत

शि व चि द म्ब र

गुरुसभेला येत असताना पाहून लोकांना परमानंद होत असे आणि त्यांना नमस्कार करताच तो आनंदकंद त्यांचा भवबंध छेदून त्यांना उठवित असे, ज्याचे मनी जी इच्छा असेल ती केवल दर्शनाने पुरवीत असे. सर्व लोकांना चिदंबरेश्वर रोज असा बोध करीत असत की वाचेने नेहमी मंगल बोलावे, तोंडाने नेहमी शिवनाम जपावे, वेदमार्गावर विश्वास ठेवावा. सद्धर्माचे नेहमी रक्षण करावे, संसार चिंतन करू नये व नेम धरून सदा सत्य बोलावे. असा तो कृपाधन रोज सर्वांना उपदेश करीत असे. मार्तंड दीक्षितांनी गायत्रीचे पुरश्चरण केले होते. ज्या करिता त्यांच्या देहाला बरेच कष्ट झाले होते तेव्हा त्याची सांगता होण्याकरिता चिदंबरेश्वरांनी एक लक्ष ब्राह्मण समाराधना सुरू केली. नेहमी पक्वान्नाचे भोजन व तसाच आदर सन्मान श्रीमंत-गरीब न बघता सारखे मानून कोणालाही कमी अधिक करीत नसत. त्यांचे आतिथ्य बघून राजे लोकही आश्चर्यचकित झाले व हे काय आहे ते कळत नाही, असे म्हणू लागले. कारण त्या ठिकाणी सर्वच अगाध असे दिसत होते. पूर्वी जमदग्नी, वशिष्ठ यांनी कामधेनूच्या योगे एवढे आतिथ्य केले होते. तरी या श्री दीक्षितांनी त्यास मागे टाकले, असे राजे लोक बोलून सेवेकरिता तेथे राहिले. कित्येक दुर्बल लोक सहकुटुंब आपला चरितार्थ चालावा म्हणून तेथेच राहिले. चिदंबर स्वतः भिक्षुक असून अद्भुत कर्म करतो. जे जे जी इच्छा करतील ते ते त्यांना देतो. तेथे कामधेनू कल्पतरू अष्टमहासिद्धि चिदंबराचे चरण कमल सेवतात. एके दिवशी एक गरीब ब्राह्मण चिदंबराची कीर्ती ऐकून आपले दारिद्र्य नाहीसे व्हावे म्हणून गुरुचा शोध करीत आला. त्या दिवशी पर्वकाळ होता व मलापहस्नान करण्याकरिता बेंबीएवढ्या पाण्यात प्रवेश करून स्वामी उभे होते. तेव्हा तो ब्राह्मण तेथे येऊन त्याने स्वामींना वंदन केले व म्हणाला की, ''तुझी थोर कीर्ती ऐकून मी दूर देशाहून येथे आलो आहे. घरी मी तापत्रयाने गांजलो आहे पण संततीही बरीच आहे. रोज आम्हाला पोटभर अन्न मिळणेही दुर्लभ आहे. तेव्हा हे दयाळा तू जर कृपा करशील तर मुलांच्या मुंजी व लग्ने वगैरे करून आम्हाला पोटभर अन्न मिळेल.'' हे ऐकून चिदंबर स्वामी म्हणाले की, ''काय ऐकून तुम्ही येथे आला आहात? मी एक गरीब ब्राह्मण आहे आणि मी नेहमी धडपड करीत असतो. याचक मला फार आवडतो, याचकाला मी काय देऊ? त्याला नाही म्हणून माझे पुण्य नाश पावते. आपण पूज्य व सत्पात्र आणि मी असाच दरिद्री ब्राह्मण आहे. आता तुझ्या चरणांना वंदन करून तुमची प्रार्थना करतो की आपणच आम्हाला प्रतिपाळावे. पाने, फळे व पाणी जे काही मी तुम्हाला

शि व चि द म्ब र

समर्पिण त्या योगे हे द्विजेंद्रा, संतुष्ट व्हा. कोणताही दुजाभाव मनात धरू नये.'' असे गुरुवचन ऐकून त्या ब्राह्मणाने त्याला साष्टांग नमस्कार केला व म्हणाला की, ''खरोखरच आपले वचन मला कामधेनूप्रमाणे आहे.'' ब्राह्मणाचा भाव ओळखून चिदंबराचे मनात कृपा उपजली व मोठ्या प्रेमाने हाती पात्र भरून ब्राह्मणाला बोलावले. तो ब्राह्मण जवळ येताच त्याने त्या पात्रात स्पष्टपणे पाणी पाहिले. परंतु त्याचे पदरी ओतीताच अद्‌भुत गोष्ट घडून आली. पात्रातील पाणी ओतताच त्याचे पदरी ताबडतोब बावन्नकशी असे सुंदर सोने झाले. हे पाहून त्या ब्राह्मणास अतिशय आनंद झाला व तो देहभान विसरून आनंदाने नाचू लागला व ते सोने खाली ठेवून त्याने अपार स्तोत्रे केली. चिदंबर महास्वामींना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या चरणावर लोटांगण घातले. श्री स्वामी म्हणाले की, ''आता आमचे घरी यावे. ही गोष्ट मात्र कोणाला सांगू नये व अखंड वैभव भोगावे. ज्या दिवशी तू हे प्रकट करशील त्यादिवशी लक्ष्मी निश्चितच निघून जाईल.'' असे त्या ब्राह्मणाला सांगून आपला अनुग्रह आशीर्वाद दिला. त्याला त्याच्या घरी पाठविले व आपण स्वत:च्या घरी आले.

सरस्वती मातेस नंतर जुळी मुले झाली, त्यांची नावे मृत्युंजय व रुची अशी ठेवली. तसेच सावित्री मातेस दोन मुले झाली. त्यांची काशिनाथ व भास्कर अशी नावे त्यांचा पिता श्री चिदंबर महास्वामींनी ठेवली. त्यांची सारी मुले अत्यंत गुणवंत अशी होती व ते सत्कर्माचे आचरण करीत असत. ते सर्व जण विद्वान असून पित्याची आज्ञा पालन करणारे असे होते. चिदंबर महास्वामींचे जे सद्‌गुण होते त्याप्रमाणे मुलांचेही वर्तन होते. ज्याप्रमाणे बीज होते त्याप्रमाणे ही फळे होती. त्यांत सामान्य व विशेषण असे सर्व जण स्वत:च्या भागाप्रमाणे दाखवीत असत. महास्वामींची दक्षता कार्यकौशल्य व निर्भयता हे विशेष गुण दिवाकराने घेतले होते. सर्व शास्त्रांत प्रविणता व वेदशास्त्रांचे पाठ आणि प्रवचन तसेच लोकांना वश करून घेणे हे गुण शंकराने उचलले होते. तपोदक्ष व मंत्र संनिधान, व्यवहारकौशल्य आणि बीजार्थ ज्ञान तसेच अत्यंत प्रेमाने असे रोज अग्निसेवन याचा मृत्युंजयाने स्वीकार केला होता. शाप आणि अनुग्रह तसेच वाचासिद्धि देव-ब्राह्मणांची भक्ती व अन्नदान यांचा स्वीकार वररुचीने केला. सत्कर्मशीलत्व, अंतर्ज्ञान, सर्वज्ञत्व व प्रिय वचनता दुष्प्रतिग्रह निर्बंधता आणि कालज्ञता यांचा स्वीकार काशीनाथाने केला. वडील लोकांची सेवादक्षता व आपल्या नित्यानुष्ठानात दृढप्रियता व समयानुसार चमत्कार करून दाखविणे या गोष्टी भास्कराने अंगीकारल्या होत्या. याप्रमाणे

चिदंबर महास्वामींचा गृहस्थधर्म चालू असता तेथे मोठी यात्रा भरू लागली. विजयपुरीचा सदाचारी रामकृष्ण नावाचा एक ब्राह्मण होता. त्याची नारी पतिव्रता असून मोठ्या प्रेमाने आपल्या पतीची सेवा करीत असे. तो अतिशय श्रीमंत होता परंतु त्याला संतती अजिबात नव्हती, त्यामुळे पती-पत्नी नेहमी चिंतातुर असत आणि आपल्या सर्व संपत्तीस वृथा अशी मानत असत. असे कित्येक दिवस गेल्यानंतर एके दिवशी एक ब्राह्मण त्यांच्या स्वप्नांत येऊन असे बोलता झाला की, सुकृताचे फळ लोक नेहमी मागतात परंतु पुण्याचे आचरण करण्यास कंटाळतात. एका तिळाएवढे पाप फळ मागत नाहीत परंतु पापाचार करतात. संतान हे पुण्यबीज आहे आणि पुण्यावाचून ते सहजासहजी मिळत नाही. तुझे पूर्वीच्या पापामुळे तुला संतती होत नाही असे मला वाटते. जर तू पुत्राची आशा करतोस तर ताबडतोब चिदंबरास भेट. तो निश्चितच तुझी इच्छा पुरविल. असे स्वप्न बघून दोघाजणांना आश्चर्य वाटले. कारण दोघांनाही एकाच अर्थाचे स्वप्न पडले होते, म्हणून त्यांना आनंद झाला. मग प्रात:काली उठून स्नान करून मन निर्मळ केले व गुरुपद कमळी भाव धरून त्याचवेळी प्रयाण केले. काही दिवस प्रयाण केल्यानंतर ते गुरुचे गावी आले आणि गुरुचरण पाहताच प्रेमाने वंदन केले व विनंती केली की, ''पुत्राच्या आशेने आम्ही तुझे चरणापाशी शरण आलो आहे. तरी हे दयाघना, गुरुराया आमची इच्छा पूर्ण करावी.'' तो दयासागर असा चिदंबर महास्वामी त्या ब्राह्मण दंपतीस संतोष होईल असे मधुरोत्तर बोलला की, ''हे अंबे पूर्वकर्माने तुला संतती झाली नाही व तुझे पूर्वीचे पापकर्म भोगल्याशिवाय त्याचा नाश होणार नाही. तरी या पापाचा क्षय होण्याची तुझी इच्छा असेल तर मी तुला उपाय सांगतो. येथून चार कोस लांब सत्तीगेरी नावाचे गाव आहे. तेथील मारुतीच्या देवळासमोर एक घर आहे. त्या घरात पूर्वी एक तेली राहत होता. तो अत्यंत श्रीमंत होता व मोहाने तो आपले सर्व धन आपल्या गृहिणीचे हाती देत असे. तिने ते सर्व द्रव्य एका मडक्यात ठेवून त्यावर सुंदर अशी नथ ठेवली व त्या मडक्यावर पानांचे आवरण करून जमीन खणून ते त्यात ठेवले व त्यावर एक मोठे उखळ ठेवून हे सर्व एका चुलीजवळ ठेवले होते. आपल्या पतीला व पुत्रांनाही हे मुळीच सांगितले नाही. काही कालाने ती तेलीण म्हातारी होऊन मरण पावली. तिच्या पाची मुलांनी आपल्या घरातील सर्व जमीन खणून पाहिली आणि आपली वंचना केलेल्या आपल्या मातेस शाप देऊन मनात तळमळत राहिले. ह्या पुत्रांना स्वत:चे धन न मिळता त्यांना सारखे कष्ट करावे लागत असत. अशा पुत्रशापाने तुला

संतान कसे होईल. तू तो जन्म सोडून ब्राह्मणांची भार्या झालीस, तरी हे माते तुझ्या बरोबरच पुत्रशाप आहे आणि त्यामुळेच तुला संतान होत नाही. यानंतर तू सत्तीगेरीस जा व मनोभावाने मारुतीची पूजा करून आपल्या पूर्वीच्या घरी जा व तेथील चुलीजवळचे उखळ बाजूला काढून त्या मडक्यातील नथ तू नाकात घाल व बाकीचे द्रव्य तुझ्या पूर्वीच्या सर्व मुलांना वाटून दे. त्यांना आनंद होईल, तुझा प्रतिबंध दुरावेल व पुत्रानंदाची तुला प्राप्ती होईल असे हे तुझे पूर्वकर्म आहे. आपले पूर्वकर्म ऐकून महास्वामींना नमस्कार करून ते दोघे कौतुक पाहण्यासाठी निघाले, त्यांच्या बरोबर बरेच लोकसुद्धा गेले. चिदंबराने सांगितल्याप्रमाणे त्या नारीने त्या गावी जाऊन मारुतीची पूजा केली व ब्राह्मण सुवासिनीची आराधना केली. नंतर आपल्या पूर्वीच्या मुलांना पक्वान्नाचे भोजन घालून भोजनानंतर आपल्या पूर्वीच्या घरी आत प्रवेशली. त्या दिवशी ती ब्राह्मण नारी अभ्यंग स्नान करून भरजरी पितांबर नेसली होती. व सोन्यामोत्याचे दागदागिने घालून ती लक्ष्मीसारखी शोभत होती. तिचे मुख निष्कलंक असे दिसत होते व त्यावर हळदीकुंकू शोभत होते. तिला पाहून तिच्या पूर्वीच्या मुलांना फार आनंद झाला. ती स्वयंपाकगृहात गेली व आपल्या पूर्वीच्या मुलांना बोलावून त्यांचेकडून ते उखळ बाहेर काढले. त्या खाली एक मडके पाहताच सर्वांना नवल वाटले. ते मडके बाहेर काढून त्यावरची पाने दूर करताच नथीचे मोती झळकू लागले व तिने ती नथ आपल्या नाकात घातली व ते मडके खाली ओतताच त्यातून अपार द्रव्य निघाले. त्याचे बरोबर पाच भाग करून आपल्या पूर्वजन्मीच्या पाचही मुलांना ते सारखे वाटून टाकले व त्यांना सांगितले की, ''मी तुमची पूर्वजन्मीची आई आहे. तुमच्या वडिलांनी सर्व द्रव्य माझेकडे दिले होते. ते तुम्हाला ताबडतोब न देता मला मरण आले. पुत्रवंचनाचे पाप मला घडले. मग तुम्हाला दारिद्र्य आले व तुम्ही मला शाप दिला. आता मला चिदंबर पावला आहे, तुमचे द्रव्य तुम्हाला परत मिळाले आहे, तरी आता मला शापमुक्त करून आशीर्वाद द्यावा. की मी पुत्रवती होईन.'' असे बोलताना तिच्या डोळ्यातून सारखे अश्रू वाहात होते व चित्ती प्रेम दाटत होते. हे सर्व पाहून त्या पाची मुलांना अतिशय मोह दाटला. डोळ्यास पाझर फुटले व आपल्या पूर्व मातेस वंदन केले व म्हणाले की, ''तू पुत्रवती हो व जोपर्यंत सूर्य-चंद्र या जगात आहेत तोपर्यंत तुझा वंश अक्षय राहो, ज्यायोगे आमच्या दैन्याचा नाश झाला आहे.'' असे म्हणून आईच्या पाया पडले व तिने त्यांना उठवून परत जाण्याकरिता निरोप मागितला. सर्व पुत्रांना समाधान



शिव चिदम्बर

देऊन ती पूर्व माता आशीर्वाद देऊन पुन्हा चिदंबराच्या चरणाजवळ आली व त्या जगद्‌गुरुस वंदन करताच त्या कृपानिधीने नारळ तिला दिला व पुत्रवती हो, असा आशीर्वाद दिला. हे ऐकून ती नारी नानातऱ्हेने स्तोत्रे करू लागली. हे सर्वज्ञा, दयानिधी तुझ्यासारखा या जगात कोण मायबाप आहे चिदंबरा आता कृपा कर, तुझ्यासारखा दाता जो पूर्वार्जित जाणतो असा कृपावंत कोण आहे.? अनाथदिनांचा तू पिताच होतोस व नेहमी मधुर असे वचन बोलतोस. तुझ्या माया मोहाने जन्म-मरण चुकत नाही. आमचे मनच आमचे वैरी आहे आणि पुत्राची इच्छा करते हे कळून आले. जन्मोजन्मी मला कितीतरी पुत्र झाले असतील. तरी माझी इच्छा अजूनही पुरली नाही. तरी सद्‌गुरुराया, नरहरी आता इतकेच कर की विषयेच्छा एकदा पूर्ण कर. आता संसाराचा ताप हरण कर. याप्रमाणे स्तोत्र करून लक्ष महास्वामींचे चरणावर लक्ष ठेवून दोन्ही हात जोडून पुन्हा नमस्कार केला. तेव्हा चिदंबर स्वामी म्हणाले, ''तुझी इच्छा असेल तो वर माग, तो जरी दुर्लभ असेल तरी शिवापाशी मागून देतो.'' त्यावर ती पतिव्रता म्हणाली, ''जर वर देण्याची इच्छा असेल तर हे गुरुराया, तुझी चरणसेवा मला सदोदित द्यावी हेच माझे मागणे आहे. माझी असत् पुत्रवासना, हे दयाघना तू निवारण केली आहेस आणि या संसार भ्रमणात कंटाळले आहे तरी यातून माझा उद्धार करावा.'' तेव्हा महास्वामी बोलते झाले की, ''तुम्ही दोघे माझे भक्त आहात. तरी या जगातील सर्व विषयसुख भोगा आणि त्यानंतर तुम्हाला मुक्ती मिळेल.'' मग ती दंपती चिदंबर प्रसाद घेऊन अत्यानंदाने आपल्या घरी जाण्याकरिता निघाली. चिदंबराचे अनुग्रहामुळे त्यांना दोन उत्तम मुले झाली आणि त्यांना अत्यानंद झाला, ज्यांना चिदंबराचा पूर्ण अनुग्रह झाला आहे त्यांचे दैन्य निवारण होऊन ते इहलोकी सुख भोगून शेवटी कैलासी जातात, म्हणून चिदंबरावर पूर्ण विश्वास धरा. त्याचे अखंड भजन करा, ज्यायोगे तुम्हाला शाश्वत सुख लाभेल.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय दहावा

कोरड्या विहिरीत पाण्याची उत्पत्ती

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। श्रौत मार्गाचार दाखवित मुरगोड गावी चिदंबर राहत असता तेथील एक दुष्ट देसाई आपल्या कारभाऱ्याचा घात करू इच्छित होता. त्या देसायाचा कारभारी लिंगाप्पा या नावाचा होता. तो अगदी निर्भय होता. कारण चिदंबर सद्गुरूजवळ तो राहत असे. एके दिवशी राजाने लिंगोपंतास बोलावणे पाठविले. तेव्हा त्याला चिदंबर म्हणाले, ''तू आज येथेच रहा.'' तेव्हा लिंगोपंत म्हणाला की, ''मला माझ्या राजाने बोलावणे पाठविले असता मी स्वस्थ कसा बसू व राजाज्ञेचे उल्लंघन कसे करू?'' तेव्हा चिदंबर म्हणाले की, ''तो तुझा धनी असला तरी तू येथून जाऊ नये व राजाज्ञा उल्लंघनाची शंका किंचितही मनात आणू नये.'' तेव्हा लिंगोपंत म्हणाला की, ''मी आताच जाऊन परत येतो. तरी हे जगदीशा, मला निरोप द्यावा. अन्नदाता बोलावित असता कसे राहवे? तरी समर्था मला आज्ञा द्यावी. मी शीघ्र परत येतो.'' तेव्हा सद्गुरू म्हणाले की, ''मी तुझ्या हिताकरिता त्रिवार सांगतो की, आज तेथे जाऊ नकोस. येथेच सुखरूप रहा.'' कालकर्म संयोगे करून गुरुवचन न मानता लिंगोपंत उठून ताबडतोब राजदर्शनाकरिता निघाला. मग राजाला वंदन करून लिंगोपंत खाली बसला, तेव्हा राजाने आपल्या दूतांना डोळ्याने खूण केली. त्यांनी तत्काळ उठून लिंगोपंताचा घात केला. ही गोष्ट कळताच चिदंबर दीक्षित 'शिव शिव' म्हणून उठून उभे राहिले व जेथे ब्राह्मणांचा घात होतो, त्यागावी निश्चित राहू नये असे म्हणून आपल्या सर्व स्वजनांसह ते गाव १२ वर्ष सोडले. आधी देवलपूर या गावी जाऊन तेथे एक वर्ष राहिले व तेथे अपार चरित्र केले. कोकणातील दोघे ब्राह्मण बंधू भेटीसाठी आले व दुपारी जेवणाकरिता पंक्तीत बसले. पानात कण्या व भाकरी, भाजी तिखट व सांबार बघून त्यापैकी एक मनातून खूप रागावला. उठून आपल्या बंधूस म्हणाला की, ''हे कुत्र्याचे खाणे आहे, ते मनुष्यास पवित्र कसे असू शकेल. तेव्हा उत्तम अन्न तयार करून आपण जेवू.'' ब्राह्मण उठलेला पाहून चिदंबर धावून आले व त्यास समजावून सांगितले की, ''वेद सांगतात अन्न हे पूर्णब्रह्म आहे व ते कसेही असो, त्याची निंदा करू नये व त्यास वंदन करून ते स्वीकारावे व त्याचा जर त्याग

केला तर कल्याण होत नाही.'' महास्वामींनी उपदेश करूनही तो त्या अन्नाचा त्याग करून मारुतीच्या देवळात जाऊन झोपी गेला. त्या ब्राह्मणाच्या बंधूसह बाकी सर्वांनी महाप्रसाद म्हणून भोजन केले. महाप्रसादाचा त्याग केल्यामुळे तो ब्राह्मण उन्मादाने भ्रमिष्ट झाला व विपरीत असे काहीतरी बरळू लागला, माती व चिखल अंगाला लावून नाचगाणे करू लागला. जे लोक जवळ येतील त्यांना शिव्या देऊन मारू लागला. हे पाहून त्याच्या बंधूस मनात अत्यंत खेद झाला व म्हणाला, ''हे अनाथानाथा, दिनबंधू, माझ्या भावाला वेड लागले. स्वामीराया याला काही उपाय सांगा. हे भक्त सखया, तुझे पायी मी शरण आलो आहे.'' त्याची विनवणी ऐकून स्वामींचे मनांत कृपा उपजली व त्या ब्राह्मणास चिदंबराने सांगितले की हा प्रसाद जेवताच याला बरे वाटेल. असे गुरुवचन ऐकून प्रसाद आणून ताबडतोब आपल्या बंधूस जेवण घालताच त्याचे अंगी जागृतपण आले. याप्रमाणे पूर्ण काम असा तो चिदंबर महिमा करीत असता तेथे परम तपस्वी असा नारायण नावाचा यतीश्वर आला. सर्व ब्राह्मण यतीश्वरास विचारू लागले की, ''असा हा कोण थोर तपस्वी आहे, त्याचे सविस्तर पूर्वचरित्र आम्हास सांगावे.'' तेव्हा मुनिश्वर म्हणाले की, ''त्याचे पूर्वाख्यान थोर आहे. ते मी तुम्हास सांगतो ते तुम्ही आदराने ऐकावे. ते ऐकताच तुमचे सर्व पाप नाहीसे होईल. हा पूर्वी पुण्याला असता गृहस्थाश्रमी तपस्वी असा होता. हा सर्व वेदांचा अर्थ जाणत असे. काही काळानंतर तो संसाराला कंटाळला व दारिद्र्य येताक्षणी श्री दत्त क्षेत्रास जाता झाला. तेथेही त्याने पुष्कळ तप केले. श्री दत्तात्रेय संतोषून त्यास प्रसन्न झाले व वर मागण्यास सांगितले. त्यांच्या परोपकाराने कृपेने पूर्ववत सर्व सिद्धी त्यास प्राप्त झाल्या व त्यायोगे विस्मरण त्याला कधीही होत नसे. इतर सर्व लोक त्याचा अति परोपकार बघून त्याला मान देत असत. एकदा चिदंबर अमरापूर येथे गेले असता तेथे मुनीश्वर शरण येताच त्याचा अधिकार पाहून करुणाकर असा तो चिदंबर त्यास ब्रह्मोपदेश देता झाला. योगाग्नीने सुरेख असा स्वयंपाक करून त्याने चिदंबरास भोजन करविले. तो लोकांना सांगू लागला की मी चिदंबराचा शिष्य आहे व ज्याची चिदंबर नावाने वाचा पूनित झाली आहे, त्यांचा जन्म सफल होईल. चिदंबराचे सहा विख्यात असे महाभक्त होते. त्यात हा पहिला ब्रह्मनिष्ठ मुनिश्वरच होय. मग संन्यास घेऊन त्याने नृसिंह क्षेत्री वास केला व निर्विकर्म समाधीस स्वाधीन केली. ज्याचे बोधाने बरेच लोक ब्रह्मज्ञान पावून तरले व भवसिंधूतून मुक्त झाले. काशीकरामिध एक शिष्य होता, जो ज्ञाननिष्ठ होता त्याचे बरोबर यतिशाने अनेक तीर्थयात्रा केल्या. या कलियुगात ज्याच्या अनुग्रहाने

शि व चि द म्ब र

इच्छा पूर्ण झाल्या, हा दिनांचा दयाळू आहे व रोगांचा नाश करतो. एकदा निर्जन अशा अरण्यात एका देवळात गुरुशिष्यांसहीत रात्री वस्तीस असता तेथे गर्जना करीत वाघ आले. दोघे शिष्य भिऊन देवळात शिरले व दार लावून घेतले. बाहेर यतिश्वर कोणतीही भीती न बाळगता ध्यानस्थ बसले होते. भोवती वाघ नाचत होते व कर्कश नादाने गर्जना करीत होते. दाराच्या फटीतून शिष्यांनी तेव्हा पाहिले की, सद्गुरुंची समाधी मोडली नाही. त्यात एक वाघ त्याच्या पायात काटा घुसल्याने दुःखी होता. ते पाहून मुनींना मनात करुणा उपजली व त्यांनी त्या वाघाला बोलावले. वाघाला जवळ घेऊन त्याच्या पायातील काटा काढून आत औषधी रस भरला आणि वर चिंधी गुंडाळली. त्याचे पाठीवर तीन वेळा हात फिरवला. ते पाहून ते दोघे शिष्य निर्भय होऊन बाहेर आले व आपल्या गुरुला नमस्कार करून स्तोत्र करते झाले आणि म्हणाले की, ''आज आम्हाला कळून आले की तू साक्षात शंकर आहेस.'' मग स्वामी आपल्या शिष्यांस घेऊन गोष्टी बोलत असता रात्र संपून सूर्य उगवला. पुढे तो शिष्यांना घेऊन यात्रेस निघाला व रात्री दुम्बळ नावाचे ब्राह्मणाचे घरी वस्तीस राहिला. तो त्या ब्राह्मणाचे एक रोगी बालक होते. ते मध्यरात्र होताच मरण पावले. हे पाहून त्या यतीश्वराने चिदंबर या नावाचा उच्चार करून त्या बालकास भस्म लावताच ते जिवंत झाले. राजापूर कुंडात गंगा आली आहे हे ऐकून तो यती तेथे जाताच गंगा गुप्त झाली, त्या रिकाम्या कुंडावर उभे राहून चिदंबर या नावाची गर्जना करून त्या यतीने स्नान करण्याचा संकल्प केला, तोच दोन्ही कुंडातून गंगा वाहू लागली. स्नान वगैरे सर्व कृत्य करून तो मुनिवर्य पुढे निघाला व जगन्नाथालयाजवळ येऊन पोचला आणि निर्जल ठिकाणी त्याने पाणी उत्पन्न केले. नंतर श्रीगुरुचरणाचे स्मरण करून तो तपस्वी वेगाने निघाला व देवलपूर या गावाजवळ आला. इकडे चिदंबर महास्वामी सज्जनांना सांगते झाली की, ''तो यती आज येथे येतो आहे, तो श्रेष्ठ असा ब्रह्मज्ञानी आहे, तेव्हा त्याची भेट घेण्याकरिता आपण त्याला सामोरे जाऊ.'' हे ऐकून सर्व लोक चिदंबर महास्वामींबरोबर यतीश्वराचे दर्शन घेण्याकरीता निघाले. तेथून एक कोस लांब दोघांची भेट झाली व परस्परांस नमस्कार करून एकमेकांना आलिंगन दिले, दोघांनी एकमेकांचे स्तोत्र करून मग श्री चिदंबर महास्वामीने यतीरायाचा हात धरून मोठ्या सन्मानाने त्याला आपल्या घरी आणला. प्रेम व भक्तीने यतीची पूजा करून त्याने भिक्षेनिमित्त नाना पक्वान्ने करून तीन द्विजाराधना केली. तीन महिने तो यतिराज चिदंबरांसमवेत राहिला व रोज दोघांची वेदान्त चर्चा वृद्धिंगत पावली. एकाने वेदान्त निरुपण करावे व दुसऱ्याने

शि व चि द म्ब र

आनंदाने मान डोलवावी, असा आनंद होत असताना त्या निरुपणाचे काय वर्णन करावे? ज्याचे नाव प्रेमाने गाताच कामादी वैरी दूर पळतात तोच आपले स्वमाहात्म्य निरुपण करीत असे. त्या आनंद सोहाळ्याचे या भूतलावर कोण वर्णन करू शकेल? नुसत्या गंगा स्मरणाने पापाचा नाश होतो. मग ती प्रत्यक्षात मिळताच त्याचे काय वर्णन करावे? राज्यसत्ता ऐकताक्षणीच त्याचा धाक मानून लोक नम्र होतात व राजा स्वत:च आपल्या घरी आला तर त्या नम्रपणाला काय विचारावे? काशीयात्रेचा नुसता संकल्प करताच माणूस निष्पाप होतो व प्रत्यक्ष काशीवास प्रत्यक्षच घडला तर त्या पुण्याचे माप कोण करू शकेल? धन्वंतरीचे स्मरण करताच ताबडतोब रोगाचा नाश होतो व जर त्याची मैत्री आपल्याला घडली तर रोगाची चिंता कोण करील? आळशी विकल्पी व तामसी हेही ज्याचे उपदेशास ऐकताच आपल्या दुर्गुणांना तत्काळ सोडून शुद्ध सत्त्वतेस पावतात. चहाड, खादाड व गडबडे असे कित्येक वेडेवाकडे लोक ती वेदान्त चर्चा ऐकताच आपली खोड सोडून शुद्ध होत असत. वेदान्त चर्चा ऐकण्याकरिता जे सभासद हजर होते ते सर्व मी तू पण विसरून सर्वांचे ठायी चिदंबर दिसू लागे. जगाचा उद्धार करण्याकरिता गिरिजा रमणाने अवतार घेतला असा सभेतील लोकांनी त्या दिवशी निश्चित निर्धार केला. असे असता एके दिवशी आर्धोदय पर्वणी आली व नदीस्नान करावयाची इच्छा धरून चिदंबर गुरु निघाले, त्या त्यांना नारायण यती म्हणाला की, ''सर्व तीर्थे ज्याचे पाद सेवन करतात त्याला तीर्थांचे काय कारण? हा हेमंत ऋतु आहे व थंडी फार पडली आहे आणि रात्रीचे लांब जायचे आहे व लोकांस फार श्रम होतील. तेव्हा चिदंबर महास्वामी म्हणाले की, ''यतीशा, मी तुझ्या मनातील ओळखले आहे. हा कली सगळी खोटी कामे करतो. अशा वेळी आपण गुप्त असावे. यानंतर तुझी इच्छा असेल तर तुझे स्नान झाल्यानंतर मी माझ्या परिवारासह स्नान करीन.'' दयानिधी असा तो यतिराज गावाबाहेर एक कोरडी विहीर होती त्या ठिकाणी स्नान करावे म्हणून आला. त्या संन्याशाने विहिरीत प्रवेश केला आहे हे पाहून चिदंबराने गंगेचे स्तवन केले. हात जोडून चिदंबराने जेव्हा स्तवन केले तोच त्या ठिकाणी एक पाण्याचा झरा प्रकट झाला आणि एका क्षणातच तेथे गुडघाभर पाणी साठले, ते पाहून तो संन्यासी स्नान करून वर आला. वस्त्र नेसून भस्म लेपून बसला मग चिदंबराने स्वपरिवारासह स्नान केले. इतक्यात शुभ्र अशा पाण्याने ती विहीर भरली. जेव्हा सर्व लोकांनी त्या ब्रह्मनिष्ठ यतीस वंदन केले. तेव्हा त्या यतीने सांगितले की, ''ही गंगा आहे आणि येथे स्नान करताच ज्ञान प्राप्ती होते. येथे स्नान, दान व पिंडदान केले

असता अक्षय स्वर्गाची प्राप्ती होते. माझे वचन सत्य माना. हे पुण्य पितृगणास लाभते.'' असे बोलून चिदंबराजवळ आला व दोघेही आपल्या गावी सर्व परिवारासह परत आले. मग दुसऱ्या दिवशी भिक्षेनंतर तो संन्यासी श्री दत्त क्षेत्रास निघाला व चिदंबर गुरु त्याला बोळवण्याकरिता बरोबर चालू लागले. चिदंबर महास्वामींनी त्या यतीस असे सांगितले की, ''आता आपण मार्गाने जात असता सांगली गावात तुरुंगात माझा एक भक्त त्र्यंबकात्मज आहे. त्याच्याशी तुम्ही बोला. मग त्यांना नमस्कार करून त्या संन्याशास बोळवून चिदंबर आपल्या घरी येऊन अगाध करणी दाखविता झाला. तो संन्यासी सांगलीस जाऊन त्याने राज सन्मान मागे टाकून नानास बोलावले व म्हणाला की, ''तू आता भीती सोड, तू चिदंबर पदरी पडला आहेस आणि आजपासून सोळावे दिवशी या बंदीतून तुझी सुटका होईल. ज्या दिवशी तू मुक्त होशील, त्या दिवशी त्वरित चिदंबर भेटीस जा.'' आणि चिदंबराचे उत्तम चरित्र त्या संन्याशाने नानाजवळ वर्णन केले. याप्रमाणे तो संन्यासी चिदंबर ध्यान करीत नृसिंह क्षेत्रास आला. पुढे पंधराव्या दिवशी चिदंबराने सांगली राजाचे स्वप्नात येऊन सांगितले की, माझ्या भक्तास तुरुंगातून सोडावे. त्याला जन्मभर शिक्षा आहे, हे मला माहिती आहे. तरी माझी तुला अशी आज्ञा आहे की तू त्याला सोडावे. राज्यमदाने जर माझ्या वचनाचा तू अव्हेर केलास तर तुझ्या जीवास हानी आहे हे निश्चित समज.'' तेव्हा तो चिंतामणी जागा होऊन चिदंबराचे आज्ञेस त्याने वंदन केले व सकाळी नानास आणवून त्याची बेडी तोडली. प्रायश्चित्ताने शुद्ध करून आपल्या पंक्तीस त्याला भोजनास बसवून त्यास वस्त्रालंकार देऊन निरोप दिला, ''तू चिदंबर भक्त आहेस. त्यामुळेच तुझी बंदीतून मुक्ती झाली, तरी आता चिदंबराकडे जाऊन गुरु सेवा करावी.'' तेव्हा नानाने राजास प्रार्थना केली की, मला अजून चार दिवस कारागृहात असू दे व राजाचा निरोप घेऊन परत कारागृहात आला आणि त्याने आपले कार्य साधले. गाईच्या शेणाची शाई करून कारागृहाच्या भिंतीवर जागोजागी चिदंबर स्तवन लिहिले होते. त्याप्रमाणे त्याने ते लिहून घेतले. मग राजाज्ञा घेऊन चिदंबराजवळ आला व मोठ्या भक्तिभावाने चिदंबरास वंदन करून बरेच स्तवन केले. त्या दिवसापासून नानाराव चिदंबराचे दास्यत्व पत्करून गुरुचे नाना तऱ्हेचे स्तवन करू लागला. गद्य-पद्यासहित जे प्रत्यक्ष पाहिले व ऐकले होते असे स्वामींच्या चरित्रांचे त्याने वर्णन केले.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय अकरावा

शि व चि द म्ब र

मृतकन्येचे संजीवन

॥ श्री शिव चिदम्बराय नमः ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥ हे जगद्गुरु, तू आदिशक्तीचा अंगीकार करून तू परस्परच सृष्टीची उत्पत्ती, स्थिती व लय करवितोस. तुझे स्वरूप पाहताच बुद्धी व वृत्ती मौन होते. तू सर्व ठिकाणी असूनही मन बुद्धीला गोचर होत नाहीस. ज्यावर तू अनुग्रह करतोस त्याची अहंता तू आधी नष्ट करतोस व सर्व ठिकाणी तूच भरून राहतोस. तुझ्याशिवाय कोणतेही ठिकाण रिते राहत नाही. तुला जे पाहू इच्छितात त्यांनी साधू संगत धरावी. ज्यायोगे तुझी भक्ती वाढते आणि त्या भक्तीनेच ते तुजजवळ राहतात. म्हणून हे चिदंबरा, मला तू भक्ती दे. त्या करिता तुला मी वारंवार नमस्कार करतो. महामृत्यूही तुझ्या आज्ञेने चालतो व भिऊन जगात संचार करतो आणि त्याने नेलेल्या जीवालाही तू सत्वर सोडवतोस. अशा चिदंबरा तुला माझे नमन असो. चिदंबराची लीला स्मरण करताच कंठ सद्गदित होतो व हृदय भरून येते. हे भ्रांत मना तू आता विषयांकडे का वळतोस, आता तू ही चंचलता सोड, ज्या योगे तुला सुख लाभेल. किंचित समाधानी हो. तो चिदंबर सर्व सुख देणारा असा आहे. तेव्हा विषयचिंता सोडून तू आता गुरुस आळव. एक बाळकृष्ण नावाचा गोदातीरवासी ब्राह्मण कुटुंबासहित चिदंबरचरण पाहण्यास निघाला. मुरगोड पाच योजने लांब असताच संध्याकाळ झाली, तेव्हा मधेच वस्ती करून असता त्यावर एक संकट आले. त्याचे जे तान्हे बाळ होते त्याच्या अंगावर देवी उठल्याने ते बाळ तळमळू लागले. याप्रमाणे तीन दिवस झाल्यानंतर चौथे दिवशी तो मरण पावला. त्या दंपतीने बराच शोक केला व नंतर बाळास जमिनीत गाडले व तीन दिवस तेथे राहून चौथे दिवशी स्नान करून शुद्ध झाले. नंतर अतिशय कष्टी होऊन चिदंबराची भेट घेण्यास आले. त्यांना पाहून चिदंबराचे पोटी कृपा उपजली व सर्व लोकांना बाजूला सारून दंपतीचे क्षेम विचारले. तेव्हा दंपती खाली मान घालून आक्रोश करू लागली. नंतर चिदंबराने विचारले की, "तुम्ही रडता का त्याचे कारण मला सांगावे." त्यांनी गद्गद स्वरात सांगितले की, "आम्ही दुःखाने व्यापलो आहोत. कारण तुमचे भेटीस येताना रस्त्यातच आमचे बाळ मरण पावले." तेव्हा

शि व चि द म्ब र

महास्वामी म्हणाले की, ''तुम्ही माझेवर अपराध का घालता? बाळाला व्याधी येताच तुम्ही त्याला शेतात का टाकलेत?'' त्यावर बाळकृष्ण म्हणाला की, ''मृत बाळाला शेतात पुरून आम्ही तुमच्याकडे आलो हा काय आमचा अपराध आहे?'' तेव्हा चिदंबर म्हणाले की, ''बाळ मेले नसून ते जिवंत आहे, तरी सत्वर जाऊन बाळास घेऊन ये.'' गुरु मुखातून अशी अमृतवाणी निघताच त्या ब्राह्मणाला अतिशय आनंद झाला व म्हणाला की, ''हे देवा ब्रह्मादिकालाही तुझी करणी केव्हाही कळत नाही.'' नंतर चिदंबरास नमन करून बाळकृष्ण वेगाने निघाला व आश्चर्य पाहण्याकरिता इतर बरेच लोकही त्याचे बरोबर निघाले. सत्तीगेरीस येऊन तेथील सुंदर शेत पाहिले व त्यात ते बाळ रांगत व खेळत असलेले पाहिले. यामुळे सर्वांना अत्यानंद झाला. प्रेमाने स्फुंदून बाळकृष्णाने बाळास खांद्यावर घेतले व म्हणाला की, ''हे चिदंबरेश्वरा, तूच विधी हरीहर आहेस. तुझी सिद्धी कोण जाणतो असे स्तोत्र करीत चिदंबराजवळ येऊन त्याचे पायावर बाळास ठेवून स्वत: लोटांगण घातले व म्हणाला की, ''हे देवाधिदेवा, कृपानिधी मीच अपराधी आहे. तरी मला अशी बुद्धी दे की, तुझे पाय कधी सोडू नये. तू मानव वेषधारी दिसतोस परंतु तुझी कळा पाहता ब्रह्मांडही तुजसारखे नाही. हे भक्त कैवारी, तुला नमन असो. एका क्षणात तू कोटी ब्रह्मांचे निर्माण करतोस, रक्षण करतोस व नाश करतोस आणि शेवटी तू पुन्हा एकटाच राहतोस.'' असे बाळकृष्णाने स्तोत्र करताच सर्व लोकांनी आनंदाने जयजयकार केला आणि डोळ्यातून प्रेम पाझरू लागले. चमत्कार पाहून जे देवाला भजतात ते लोक किती मूर्ख आहेत, तो गिरिजापती अनंत रूपाने असता असे किती चमत्कार पहाल. आकाशातील चंद्र, सूर्य, नक्षत्रे भूगोलादि सप्त पाताळे ज्याने इच्छामात्र रचली, असा तो चिदंबर आपले चरित्र दाखवित आहे. अहो रेतबिंदू योनीत प्रवेशताच त्याला डोके, पाय आदी सर्व अवयव कोण उत्पन्न करतो व त्यास देहधारी असा उत्पन्न कोण करतो? केवढे हे आश्चर्य जे आहे ते क्षणात नाहीसे होते व जे नाही ते एकदम प्रगट होते. असा हा खेळ मायालाघवी चिदंबर खेळत असतो, तेव्हा त्याची लीला कोणास कळेल? तेव्हा चिदंबर हा तारक मंत्र समजून व मनात निश्चय करून जो त्याला भजतो तो धन्य होय. ज्याला इहपराची चाड असेल त्याने चिदंबर जोडावा. प्रांचिकांचा संग धरल्यास यमदंड चुकणार नाही. असा सर्व आनंद होत असता बाळकृष्णास वर देऊन लोकांचे भवबंध तोडण्याकरिता आनंदकंद असा तो चिदंबर चरित्र दाखवीत असे. वर मिळताच तो बाळकृष्ण चिदंबराची आज्ञा घेऊन घरी

शि व चि द म्ब र

जाता झाला व चिदंबर किर्ती प्रकट करू लागला. मग चिदंबर तेथून निघून यात्रा जनासमवेत कुंदगोळ पुरास आला. तेथे भेंडीवाड या नावाचा जाणता देसाई होता. तो चिदंबर भेटीकरिता आला व त्याचे पदी वंदून विनंती केली की, ‘‘हे चिदंबर गुरुनाथा, मला वंशवृद्धी करता हे जगन्नाथा, एक पुत्र दे. मी तुझा आज्ञांकित आहे.’’ मग श्रीनटेश हसत बोलले की, ‘‘माझ्यावर तुझा विश्वास असेल तरी तू मी सांगितल्याप्रमाणे कर, जेणेकरून तुझी वंशवृद्धी होईल.’’ त्यावर देसाईने प्रतिज्ञेने सांगितले की तुझी आज्ञा शिरसावंद्य आहे. तू सांगितल्याप्रमाणे काम मी ते करीन. मग तो सर्वज्ञ म्हणाला, आधी तुला एक मुलगी होईल व तिचे लग्न जर माझे आज्ञेप्रमाणे करून दिलेस की त्यानंतरच तुला पुत्रप्राप्ती होईल. तथास्तु म्हणून देसाई आपल्या घरी गेला व एक वर्षातच त्याला एक सुंदर अशी मुलगी झाली. इकडे चिदंबर सर्वकाळ आपल्या भक्तांची इच्छा पुरवीत असता एक राम नावाचा विप्र गुरुदर्शनाकरिता आला व त्याने चिदंबरास नमस्कार केला. त्यावर चिदंबराने विचारले की, ‘‘लग्नाच्या इच्छेने तू येथे आला आहेस का?’’ तेव्हा राम म्हणाला, ‘‘मला कोणी आप्त नाहीत. घर व धन नाही. तरी आनंदधामा, मला मुलगी कोण देईल? परंतु आपण दिनांचे रक्षण करण्यास समर्थ आहात.’’ हे ऐकून गुरु रामास म्हणाले की, ‘‘त्वरित भेंडीवाडला देसायाकडे जावे व त्यास माझे नांव सांगून त्याची कन्या मागावी.’’ तेव्हा राम गुरुचरणी विनंती करता झाला की, ‘‘तुझी आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मी आता मुलगी मागण्याकरिता भेंडिवाडला जातो. तरी हे चिदंबर गुरुराया, माझे कार्य सिद्धीस ने.’’ मग त्याने श्री गुरुस वंदन करून देसायाकडे जाऊन चिदंबराची आज्ञा सांगितली. तेव्हा देसायाला फार राग आला व रामाची निभर्त्सना करून तसेच गुरुवचन धिक्कारून त्याला घराबाहेर काढले. तेव्हा राम परतून गुरुजवळ आला व सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हा जगन्नाथ म्हणाले की, ‘‘हे रामा, तू आपल्या हिताकरिता तेथेच जाऊन वस्ती करून रहा. देसाई तुला त्याची मुलगी देईल व तुझे निश्चितच लग्न होईल, याबाबत तू शंका बाळगू नकोस.’’ गुरुवचनी विश्वास धरून तो भेंडिवाडास जाऊन राहिला व माधुकरीने पोट भरू लागला. देसायाने मनात विचार केला की, चिदंबराने माझे वैभवाकडे न बघता दरिद्री जावई कसा काय पाठवला? ज्याचा गुरुवर विश्वास नाही त्याला केव्हाही सुख लाभणार नाही. नंतर देसायाने आपल्या वैभवास शोभेल असा जावई पसंत करून लग्नास आरंभ केला. पुण्याहवाचन करून मांडव घातला, लग्नास वऱ्हाडही आले. लोकांची फार गर्दी

शि व चि द म्ब र

झाली. सीमांत पूजनाकरिता वाद्ये वाजवीत तो निघाला. सीमांत पूजन करून देसाई आपल्या घरी आला व दुसऱ्या दिवशी देवक स्थापन करताच एक नवल झाले. एकाएकी त्याच्या कन्येस अतिशय ताप आला व ती बरळू लागली, निचेष्टित झाली. देसायाने सर्व औषध मंत्रतंत्र केले. परंतु ते व्यर्थ गेले. मग ज्योतिषांना बोलावून देसायाने प्रश्न विचारला. तेव्हा त्याने सांगितले की, "या मुलीस काहीच रोग नाही, तसेच भूतबाधाही नाही. फक्त एका महापुरुषाचा क्षोभ दिसतो." हे ऐकून देसाई मनात दचकला. मग ब्राह्मणांना वंदन करून पहिल्यापासून सर्व वृत्तांत सांगितला. हे ऐकून ज्योतिषी म्हणाले की, "असे जर आहे तर तुझी गती पुढे बरी दिसत नाही. सूर्य तमोमय होईल, एका मडक्यात सर्व धरणी मावेल, अग्नीही थंड होईल, पण गुरुवाणी खोटी होणार नाही. रजोगुणी लोकांना मोक्ष लाभेल, माणसांना पंख फुटतील परंतु दीक्षितवाणी खोटी होणार नाही. आता तू इतकेच कर की मनात कोणतीही शंका न धरता गुरुची आज्ञा जशी असेल तर त्याप्रमाणे तू कर." अशी ज्योतिषवाणी ऐकून देसाई मनात भ्याला आणि मी 'रामास माझी कन्या देतो' असे म्हणून ब्राह्मणांपुढे पाणी सोडून संकल्प केला. ते ऐकून वऱ्हाडी दुर्मुखले होऊन आपल्या घरी गेले. देसायाचे संकट टळले व त्याची मुलगी सावध झाली. लग्नाला आरंभ करताच देसाई पत्नीने आपल्या मनात विचार केला की, आपली मुलगी अशक्त आहे. तरी हीचे लग्न पुढील वर्षी करू तसेच आपल्या पतीस सांगून तिने तत्काळ लग्न मोडले. पुढे काही काळानंतर ती देसाई पत्नी आपल्या पतीस सांगू लागली की, "तुम्हाला एकुलती कन्या आहे व तिला दरिद्र्याला का देता? त्यापेक्षा तिला विहिरीत लोटा ज्यायोगे मला सुख होईल." त्यावर त्या मुलीस पुन्हा ताप आला. ज्योतिषी पूर्वी जे सांगत होते तेच सांगू लागले. तेव्हा ती पत्नी म्हणाली की, "दीक्षित काय करील? आपण काय त्याचे नोकर आहोत. तरी एक श्रीमंत मुलगा पाहून लग्न ठरवावे." देसाई बहुत प्रकारे आपले स्वहित सांगता झाला. परंतु तिच्या मनास येईना की, कन्यादान रामास करावे. म्हणून देसायाने आपल्या पत्नीची भीड ठेवली, ज्यायोगे गुरुवचन त्यास गोड लागेना. त्याने तत्काळ दुसरे वऱ्हाड योजिले जे वैभवाने त्याच्या सारखे होते. स्त्रीवचन हे केव्हाही अपयश देणारे असते ज्याने यहपर चुकते. परंतु लोकांना याचे ज्ञान नाही की, गुरुवचन हे सर्व तारक आहे. गुरुवचनाने यहपर जोडले जातात. भावी अनर्थही टळतात व भक्ती-ज्ञान, वैराग्याचा लाभ होतो. गुरुवचनी सुख असते. असो, देसायाने आपल्या वैभवाने पुन्हा लग्नाची मोठ्या

समारंभाने मांडणी केली. वैभवाने वऱ्हाडही आले व मंगल वाद्ये वाजू लागली. दोन्ही पक्षांनी बरेच द्रव्य खर्च केले. देवक प्रतिष्ठा केली. ब्राह्मणांना अन्नदान व दक्षिणा देऊन संतुष्ट केले. वरास आपल्या घरी आणले व त्याच्या मुलीने गौरीहराची तयारी केली व लग्नमंडपाजवळ आली. ब्राह्मणांनी अंतरपाट धरला व मंत्राक्षता टाकू लागले. लग्नघटिका जवळ आली. सावधान हे शब्द ऐकून राम मनात दचकला. हे चिदंबरा, तुझी करणी येथे सर्वतोपरी खुंटली आहे. इतक्यात चिदंबर चमत्कार दाखवू लागला. अक्षता डोक्यावर पडताच मुलगी थरथर कापू लागली व तत्काळ जमिनीवर पडली. हातपाय झाडू लागली व निचेष्टित झाली व तिला उर्ध्व श्वास लागला. लोकांत खळबळ माजली. मुलीच्या अंगात ताप भरला व तिचे माता-पिता उपाय करू लागले. काही केल्याने ती मुलगी शुद्धीवर येईना व सर्व लोक शोक करू लागले. याप्रमाणे तीन मुहूर्त गेले. पुष्कळ उपाय केले परंतु गुरुकृपा नसता सर्व निरर्थक झाले. मग देसायाने ब्राह्मणास विचारले की, ''माझ्या मुलीला काय झाले आहे?'' तेव्हा ब्राह्मण म्हणाले की, ''अरे मुर्खा, आपले नाक कापून दुसऱ्याला अपशकून करणारा असा तू आहेस. गुरुवचनावर विश्वास ठेवून तुझे कल्याण होईल. चिदंबर महास्वामींची वाणी तू काय समजतोस? एक वेळ सूर्य थंड होईल परंतु गुरुवाणी खोटी होणार नाही.'' मग त्या देसायाने प्रतिज्ञा केली की, माझी मुलगी सावध व्हावी व सर्व देवांची शपथ घेऊन सांगतो की, तिला रामलाच देतो. याच मंडपात कन्यादान करतो. असे म्हणून चिदंबर चरण आठवू लागला. यावर तीन तास गेले, तरी मुलगी सावध होईना. तेव्हा रामास विनंती केली की, माझ्या मुलीचा स्वीकार कर, तेव्हा रामाने त्या मुलीकडे पाहिले व तिला उर्ध्व श्वास लागला होता, तिचा स्वीकार करू नये असे त्याला वाटले, तोच गुरुनाथाचे बोलणे त्याच्या कानावर आले की या मुलीचा स्वीकार कर व आपले घरी जा. हे माझे वचन तुला अमृत फळासारखे होईल, त्या वेळी चिदंबर महास्वामी कोणालाही दिसत नव्हते. फक्त रामालाच दिसत होते. हा चमत्कार पाहून त्या मुलीचा स्वीकार करून सत्वर राम मारुती मंदिराकडे निघाला. तेथे त्या मुलीस खाली निजवून आपण स्वत: चिदंबर ध्यान करीत बसला. मध्यरात्र होताच ती मुलगी मरण पावली. हे पाहून रामाने फार शोक केला, कंठ सद्गदित झाला व डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या आणि तो गुरुचा धावा करू लागला, ''हे हरा मृत्युंजया शंकरा, दयासागरा चिदंबरा, या समयी या पामराला कोणी नाही. तरी दयानिधे, तू सत्वर धाव घे. सत्यव्रता, तुझी

कीर्ती त्रिजगती भरली आहे. हे मृत्युंजया, या दिनावर तू का रुसलास? माझे कल्याणाकरिता कितीतरी विश्वास ठेवून हे सर्वेशा, मी येथे राहिलो आहे. माझ्या कोणत्या अपराधाकडे पाहून मन कठीण केलेस, जसे या मुलीचे प्राण नेलेस तसेच मलाही तुझ्या पदाजवळ ने. येथे तुझी अपकीर्ती होऊन ती ऐकावयास मला भय वाटते. दया येऊ दे आणि हे कृपानिधे तू सत्वर धाव.'' याप्रमाणे धावा करीत चिदंबर असे मोठ्याने गर्जत मोठ्याने रडत बसला, तोच तो कृपानिधी चिदंबर देवालयात प्रकट होऊन त्या मुलीचे तोंडात भस्म घालून त्याने कमंडलूतले पाणी तिच्या अंगावर शिंपडले, तोच ती मुलगी जिवंत होऊन बसली. रामाने जेव्हा डोळे उघडून पाहिले, तेव्हा चिदंबर स्वामी उभे राहिलेले दिसले व रामाने त्यांच्या चरणास वंदन केले व म्हणाला, ''हे दयाळा, या दिनाला सांभाळ.'' मग दीक्षिताने रामाचे सांत्वन केले व सांगितले, ''सकाळी उठून या मुलीस घेऊन कुंदगोळास ये. तुझे लग्न मी मोठ्या थाटाने करीन.'' असे म्हणून अंतर्धान पावले. त्याप्रमाणे राम त्या मुलीस घेऊन कुंदगोळास जाता झाला तेव्हा स्वामींनी त्यास सांगितले की, उगाच तुझे लग्न करू. मग देसायाला बोलावून मोठ्या वैभवाने लग्नास आरंभ केला व गुरुने स्वतः वर पक्ष स्वीकारला. चिदंबराचा थोर परिवार पाहून देसाई त्याचा एक दिवसही सत्कार करण्यास तो समर्थ नाही असे त्यास वाटले. तेव्हा श्री गुरु म्हणाले, ''हे देसाई, माझे भिडेमुळे तुला तुझ्या तोडीचा जावई मिळाला नाही म्हणून तू का कष्टी होतोस ते मला सांग.'' हे ऐकून देसाई लज्जित झाला व आपल्या अपराधाची क्षमा मागत त्याने दंडवत घातले. स्वामींनी देसायास अभय वचन देऊन दोन्ही पक्षाचा समारंभ आपण स्वतःच मोठ्या महोत्सवाने केला. याप्रमाणे लग्न सोहळा आटोपल्यानंतर स्वामींनी देसायाला एक नारळ व आर्शीर्वाद दिला. चिदंबराची आज्ञा घेऊन तो देसाई आपल्या परिवारासहित आपल्या घरी गेला. पुढे त्यास चिदंबराच्या कृपेने एक अत्यंत गुणवान असा मुलगा झाला.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||

# अध्याय बारावा

खलनिग्रहपूर्वक सदनु गृह
।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशायनम: ।। हे भयमोचना, करुणाघना, चिदंबरा मी भवभयाने तुला शरण आलो आहे. माझ्या कर्मामुळे मी तुला सोडले आणि प्रपंचात शिरलो. तेथे ही बायको, मुलेरूपी हे श्वापद प्राणी मला आडरानात पळवतात. मग भिऊन मी सैरावैरा पळू लागलो तोच मोहखळग्यात पडून अति वेडा होतो. हे गुरुराया, मला त्या मोहखळग्यातून ताबडतोब बाहेर काढ. त्यातून उठून हळूहळू हे दयाळा, पुढे जाताच मदरूपी हत्तीने आपल्या सोंडेने मला आवळले व गिळू लागला. त्यातून कसातरी निसटून बाहेर येताच धनरुपी पिशाचाने गाठून मला देशोदेशी भ्रमण करावयास लागले. हे कनुवाळा, त्यातून तू मला सोडव. दिवस व रात्र हे मोठे चोर आहेत कारण, ते पूर्व पुण्याचे साठे आहेत. ते धन व आयुष्य उदयास्तवाटे-नेतात तरी माझे मन विषयाला विटत नाही. कालरुपी सर्प तोंड पसरून मला गिळण्याकरिता पुढे उभा आहे व तो रोगांचे फूत्कार सोडतो. आता मला मागे-पुढे मार्ग दिसत नाही, तरी हे चिदंबरा, मला तू कडेपार कर. तुझ्यावीण मला आता गती नाही. म्हणून तुला मी प्रार्थना करतो की, माझी भय खंती आता दूर कर, एवढेच माझे मागणे आहे. कामभय हे सर्व विध्वंसक आहे, जे नुसत्या चिदंबर स्मरणाने नाहीसे होते व मनाला अत्यंत समाधान होते, जो शंकर कैलासाहून आपल्या भक्तांना घेऊन या भूलोकी अवतरून लीला दाखवतो अशा त्या चिदंबर चरणी माझे नमन असो. एकदा तिनीही मठाचे यतिश्वर देश संचार करीत असता सहपरिवार हुबळीस येऊन राहिले. तेथून बाहेर जाण्याकरिता सर्व सैन्य असतानाही त्यांच्या मनात चोराचे भय आले व ते गुरुस्मरण करीत राहिले. करवीर राजाचा रत्नाकर या नावाचा अमात्य आपल्या बरोबर सैन्य घेऊन आला होता. त्या स्वामींचे ऐश्वर्य पाहून त्यांच्या सर्वस्वाचे हरण करावे म्हणून तो उतावळा झाला. सैन्याने सबंध शहर वेढले हे पाहून त्या तिन्ही यतींना अत्यंत भीती वाटली, परंतु त्यांच्यात प्रतिकाराची शक्ती नसल्याने चिदंबर पाद स्मरण करीत बसले. भयसंहारक असा तो चिदंबर तत्काळ तेथे प्रकट झाला. त्याला पाहून ते यतीश्वर आनंदीत झाले

मग चिदंबराचा सत्कार करून आपले संकट त्यांना सांगते झाले. चिदंबराने त्यांना अभय देऊन असे सांगितले की, ''शंकर समर्थ आहे व त्याचे नुसते स्मरण केले असता भयाचा नाश होतो. तरी तुम्ही चिंता सोडावी.'' इतक्यातच रत्नाकराचे सैन्य मठात शिरले. हे पाहून चिदंबर मठात उठून त्यांचेसमोर उभा राहिला. चिदंबरास पाहून सैनिकांचे मनात भय उत्पन्न झाले व तत्काळ मागे फिरून रत्नाकराला सांगितले की, ''येथे चिदंबर आहेत व त्यांची आम्हाला भीती वाटली व आम्ही माघारी परत आलो.'' हे ऐकून रत्नाकर भिऊन हाती नजराणा घेऊन चिदंबराच्या भेटीसाठी आला. त्याला चिदंबर म्हणाले की, ''रत्नाकरा, तू यतीश्वरांना भेटून ये. त्यांचा समाचार घ्यावयाचा सोडून तू माझ्याजवळ कशासाठी आला आहेस?'' ही निंदागर्भित गुरुवाणी ऐकून रत्नाकर मनात लज्जित झाला व उभा राहून नमस्कार करून चिदंबराची क्षमा मागितली. तेव्हा तो कृपानिधी म्हणाला, ''तुला अपराधाची क्षमा हवी असेल तर त्या यतीश्वरांना जेथे जायचे असेल तेथपर्यंत निर्भयपणे बोलावून ये.'' हे गुरुवचन ऐकताच तथास्तु म्हणून तो रत्नाकर त्या यतिश्वराचे रक्षण करीत त्यांना जेथे जावयाचे होते तेथपर्यंत पोहचवून आला. मग चिदंबर महास्वामींचा निरोप घेऊन ज्या ठिकाणी गुरुचा वास सुद्धा नाही अशा देशातील लोकांचे वैभव हरण करू लागला. इकडे धोंडू गोखले या नावाचा गृहस्थ चिदंबर महास्वामींच्या दर्शनाकरिता आला. त्याला पाहून स्वामी म्हणाले की, ''तू आता बाजीरावाचे भेटीस जा. मी तुला निरोप देतो हाच महाप्रसाद'' म्हणून तो बाजीरावास भेटला. बाजीरावाने त्यास तत्काळ मोठ्या आनंदाने त्याला सेनाधिकारी केला. इकडे रत्नाकरास स्वामींनी हितोपदेश केला की, ''तू सर्व दुगुर्ण सोड, नाहीतर मरशील'' हे ऐकून उन्मत्त होऊन तो म्हणाला, ''माझ्याशी लढावयास या भूतलावर कोण समर्थ आहे? चिदंबर एक भिक्षुक आहे. तो माझा घात करण्यास समर्थ नाही.'' असे म्हणताच धोंडोपंत गोखले आपल्या बरोबर बरेचसे शूर लोक, हत्ती, घोडे व अपार पायदळ घेऊन रत्नाकरास शिक्षा करण्याकरिता कोल्हापुराजवळ आला. रत्नाकरही आपले सैन्य घेऊन गावाबाहेर आला व शत्रुसैन्य पाहून मनात संतापला व युद्धास आरंभ केला, एका क्षणातच रणांगण महाभयंकर दिसू लागले. दोन्ही बाजूचे बरेचसे सैन्य मेले. असे तुंबळ युद्ध झाले मग रत्नाकर हातात तलवार घेऊन आला व धोंडोपंताने रत्नाकरास जोराने मारले. रत्नाकराने तो घात चुकवून कौशल्याने धोंडोपंतास मारू लागला. रत्नाकराने धोंडोपंताच्या सर्व शस्त्रांचा नाश

केला व मोठ्याने गर्जना करू लागला की, धोंडू हतवीर्य झाला आहे. तोच धोंडू आपली ढाल व तलवार घेऊन आपले हस्तलाघव दाखवीत त्याने रत्नाकराचा एक हात तोडून जमिनीवर टाकला. त्याच्या हातातून रक्त वाहू लागले. परंतु त्याची उपेक्षा करून तो डाव्या हातात भाला घेऊन मदोन्मत्त हत्तीसारखा धावला. इतक्यात धोंडोपंताने आपणही भाला घेऊन चिदंबराचे स्मरण करून वेगाने शत्रुहृदयात खुपसला. तेव्हा रत्नाकराचे हृदय फुटून तो तत्काळ जमिनीवर पडला व रत्नाकराचे शिल्लक असलेले सर्व सैन्य दशदिशांना पळाले. धोंडूने त्याचे द्रव्य हरण केले व आपले सैन्यासकट स्वामींजवळ आला व गुरुचरणी वंदन करून सर्व वृत्तांत सांगितला. मग चिदंबराने त्याला सांगितले की, ''आपल्या ठिकाणी राहून धर्म व गो-विप्राचा सांभाळ कर'' असे म्हणून एक नारळ त्याच्या हाती दिला व ''हा दुर्मिळ असा प्रसाद आहे. तरी हा घेऊन तू आपल्या घरी जा.'' या प्रमाणे गुरुचे वचन ऐकताच धोंडूने विनंती केली की, ''स्वामी मी जेथे जाईन तेथे माझा विजय व्हावा तरच मी या प्रसादाचा स्वीकार करीन.'' त्यावर चिदंबर म्हणाले, ''आधी फळाचा स्वीकार कर. तुझ्यावर वैरी चालून आला तर निश्चितच तुझा विजय होईल.'' त्यावर धोंडू म्हणाला, ''स्वामी, माझी तशी इच्छा नाही, माझे मनोगत ओळखावे व अनुग्रह करावा दुसरे माझे काहीच मागणे नाही.'' अशी विनंती करून धोंडू मनात आपले विचार करीत स्वामींपुढे उभा राहिला. तेव्हा स्वामींनी धोंडूचा भाऊ गोपाळ त्यास ते प्रसाद फळ देऊ लागले. तेव्हा गोपाळ म्हणाला की, ''स्वामीराया, बंधू जवळ असता मी हे फळ घेणार नाही.'' नंतर धोंडूचा मुलगा जो बापू गोखले त्याला बोलावून सांगितले, ''हे फळ तुला देतो यांचा आनंदाने स्वीकार कर.'' हे ऐकताच बापू गोखले उठला व त्याने गुरुचा अनुग्रह स्वीकारला. बलाचा गर्व असलेले असे ते दोघे भाऊ नमस्कार करून आपल्या गावी परत गेले. महाबलाढ्य अशा त्या धोंडोपंताने अविचाराने आड मार्ग धरला. त्याने सर्व लोक त्रासले व त्यांनी येऊन सर्व दीक्षितांना कळवले. ती लोकांची दिनवाणी ऐकून तो अजानुबाहू म्हणाला की, तो भयनाशक असा शंकर तुमचे रक्षण करील. तुम्ही भिऊ नका याप्रमाणे सर्व लोकांचे समाधान करून त्यांना परत पाठविले तोच एक दक्षिण देशातील शुद्र स्वामींपाशी आला. त्याचे नाव 'धोंडी' असे होते. त्याने महाद्वारी वंदन करून एका पायावर उभा राहिला व चिदंबर नावाची गर्जना करू लागला. तीन दिवसरात्र थंडी व उष्णता सहन करून उपवास करून मोठ्या भक्तीने उभा राहिला. त्याची निष्ठा पाहून भक्त लोक



शिव चिदम्बर

गुरुला कौतुक सांगू लागले की, ''हिरण्यकशिपूसारखे शुद्राने तप सुरू केले आहे.'' तेव्हा चिदंबर म्हणाले, ''त्याची निष्ठा दुर्धर आहे. सापाला जरी दूध दिले, तरी त्याचे विषच होते. कडूलिंबाला जरी पंचामृताने वाढविले तरी त्याला गोड फळे लागणार नाहीत. त्याचप्रमाणे या शुद्राला अनुग्रह केला तर ते परपिडेला कारण होईल.'' असे म्हणून गुरु बाहेर आले व मंद स्मित करू लागले. तेव्हा धोंडीने गुरुस दंडवत घातला. त्याला उठवून जो जगाचे अंतरंग ओळखतो असा तो चिदंबर म्हणाला, ''मी तुझे अंतरंग जाणतो. अनुग्रह फळास येणार नाही, तरी सत्‌धर्माचे आचरण कर, दिनांचे रक्षण कर आणि गोब्राह्मणांचे पालन कर. जर ब्राह्मणांचा अपमान करशील तर तुझा प्राणनाश होईल.'' याप्रमाणे धोंडीस उपदेश केला व त्याला आपल्या देशास पाठविले. याप्रमाणे लोकांना सन्मार्ग दाखवीत तो सर्वेश लीला दाखवित असे. चिदंबराचे अनुग्रहाने धोंडीस टिपूचे सेनापत्य मिळाले. मग तो आपल्या पराक्रमाने फिरंगी लोकांशी युद्ध करू लागला. धोंडीचे भयाने फिरंगी लोक पळून गेले. धोंडीने त्यांचा पाठलाग करून त्यांना मारहाण चालवली. इतक्यात धोंडोपंत गोखले यांनी त्याचा मार्ग अडवून त्याच्याशी युद्ध सुरू केले. धोंडी मनात म्हणाला की, 'हा इंग्रजांच्या पक्षाचा आहे, तेव्हा याचा पराजय करावा.'' असे म्हणून त्याने निर्भयपणे व शौर्याने आपले सैन्य पाठवले. दोघांचे भयंकर युद्ध झाले. बरेच हत्ती व घोडे, पायदळ युद्धात मारले गेले व क्षणातच रक्ताची नदी वाहू लागली. कित्येक नुसतीच धडे युद्धात नाचू लागली आणि कित्येक अर्धमेले-तडफडत आक्रोश करू लागले. रक्ताची नदी धडाधड वाहू लागली. शूर मोठा पराक्रम करू लागले व पंताचे सैन्य खाली पटापट पडून जमिनीवर गडाबडा लोळू लागले. आपल्या सैन्याचा नाश झालेला पाहून धोंडोपंतास मनात फार संताप आला आणि या धोंडीस आताच मारून जमिनीवर टाकीन असे म्हणून घोड्यावर बसून मागे-पुढे न पाहता धावला व धोंडीचा घोडा मरेल असे शस्त्र हाणले तेव्हा परमशूर धोंडी घोड्यावरून खाली उडी घेऊन धोंडोपंतास जमिनीवर पाडून त्याच्या उरावर बसला. जसा वाघ हरणाला मारतो, त्याप्रमाणे दाताने त्याचा कंठ फोडून आवेशाने त्याचे रक्तपान केले व वाघ या नावास पावला. इतक्यात फिरंगी लोकांनी अपार सैन्य मिळवून पंताचा मुलगा जो बापू गोखले त्यालाही हे वर्तमान कळवून त्याला युद्धात आणले. बापूने आपल्या पित्याचा वध झालेला पाहून त्याने प्रतिज्ञा केली की, माझ्या पित्याचा ज्याने वध केला त्याचा वध करून नंतरच मी पितृक्रिया करीन. फिरंगी लोकांचे सैन्य घेऊन

तो निघाला. बापूचे सैन्य पाहून धोंडी मनात दचकला व पूर्व दिशेकडे पळू लागला. त्याचे सैन्य जिकडे तिकडे पळू लागले. रात्रंदिवस पळता पळता श्रीपर्वत वाटेत आडवा आला. पुढे वाट दिसेना. कृष्णेला महापूर आला होता व भोवती थोर पर्वत होता आणि मागून महावीर गर्जत आले. त्यामुळे धोंडी अतिशय घाबरा झाला. नंतर चिदंबराचे स्मरण करून कृष्णा प्रवाही त्याने प्रवेश केला व चिदंबर कृपेने नदीपार होऊन परतीला आला. तेथे थोड्या सैन्यासह निर्भय चित्ताने निवांतपणे जेवत बसला. इतक्यात बापू तेथे येऊन पोचला. परतीराला शत्रू पाहून कृष्णा पार करण्याकरिता तो उपाय शोधू लागला. जेव्हा त्याने आपले शत्रूच्या मुखातून चिदंबर नामोच्चार ऐकला तेव्हा बापूने त्याच उपायाने पैलतीर गाठले. बापूला एकटाच पाहून धोंडीने आपल्या सैन्यासह त्याच्यावर हल्ला केला. तरीही बापू आपल्या मनात निर्भय होता. तोंडाने गुरुनाम जपत त्याने अविश्रांत युद्ध केले व शत्रूचे सर्व सैन्य निकालात काढले आणि त्याला आपला वैरी सापडला. चिदंबराचे स्मरण करून धोंडीला जमिनीवर पाडून जनावरासारखे त्याचे शिर उडवले. तो धोंडी चिदंबर नाव उच्चारीत त्याच्या कृपेनेच कैलासास गेला व बापू गोखले आपल्या गावात परत आला. पितृक्रिया पूर्ण करून तो मंडलाधिपती होऊन आपल्या घरी सुखाने राहू लागला. रात्रन्दिवस गुरुनामस्मरण करून देवद्विजार्चन करून श्रींचे जवळ चिदंबराचे भजन करीत राहिला. असा तो भक्तरक्षक चिदंबर दुष्टांचा नाश करून भूभार कमी करीत असे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय तेरावा

व्यंकटेश कामपुराण

|| श्री शिव चिदम्बराय नम: ||

|| श्री गणेशाय नम: || हे देवाधिदेवा, चिदंबर गुरू सर्व ठिकाणी तूच भरून राहिला आहेस. तेव्हा तुझे चरणी माझा अखंड भाव राहो असे कर. त्रिभुवनात तूच एक दाता आहेस. म्हणून मी तुला मागतो की, "हे सद्गुरुनाथा, माझे मनोरथ पूर्ण कर. तूच माझा माता-पिता आहेस व तूच माझी कुलदेवता आहेस. तरी हे अनाथनाथ चिदंबरा, माझेवर तू कृपा कर. इतकेच माझे मागणे आहे. लोक अनेक देवांना भजतात व ते देव त्याचे मनोरथ पुरवतात आणि त्या देवांचे मनोरथ तू पुरवतोस, म्हणून मी तुला शरण आलो आहे." श्री गुरु कुंदगोळपुरास असताना त्यांची कीर्ती व महिमा या भूतलावर प्रकट करण्याकरिता श्री व्यंकटेश लीला करू लागला. एके दिवशी तो श्रीहरीबाबांचे स्वप्नात येऊन त्यांना त्याने एक पत्र दिले व सांगितले की, "कुबेराचे वार्षिक व्याज मला फेडावयाचे आहे तरी मला सव्वा लाख रुपये पाहिजेत. त्याकरिता तू असे कर की माझे सर्व वैभव घे व माझी उत्सवमूर्ती तू त्वरेने पालखीत घालून नृत्य गायनाच्या संगतीत रस्त्याने आनंदाने भजन करीत कुंदगोळास घेऊन ये. तेथे चिदंबर आहे त्याला जाऊन हे पत्र दे आणि तो जेवढे द्रव्य देईल तेवढे आणून ते खजिन्यात ठेव. असे सांगून व्यंकटेश अंतर्धान पावला. बाबा जागृत होताच त्याला ते पत्र प्रत्यक्ष दिसले व तत्काळ त्याने आपल्या सेवकासह प्रयाण केले व पालखीत रमानायकाला बसवून तेथून तो निघाला. टाळ, मृदंग, झांज इ. वाद्ये वाजू लागली. छत्र व चामर बसवून तेथून धरले, वेत्रधारी गाऊ लागले व वारांगना नृत्य करू लागल्या. ब्राह्मण वेदपठण करू लागले आणि भक्त गोविंद नामाची गर्जना करू लागले. अशा तऱ्हेने भक्तांसह ऐश्वर्ययुक्त तो रमाकांत प्रयाणावर प्रयाण करीत मार्गात पूजा घेत निघाला. कित्येक लोक पूजा सामग्री घेऊन हरीचे दर्शनाकरिता धावत येऊ लागले व सुवासिनी कौतुकाने आरती करू लागल्या. अशा महोत्सवाने तो श्री व्यंकटेश कुंदगोळी आला. इकडे श्री चिदंबरेश्वर येथील सर्व श्रोत्यास भविष्य सांगू लागला की, "आज येथे रमापती येत आहेत. तरी तुम्ही सर्वांनी लवकर स्नान करून यावे. आपण त्या व्यंकटेशाचे भेटीस जाऊ." असे बोलून चिदंबर महास्वामी



शिवचिदम्बर

शिवचिदम्बर

उठले व गुरुवचन ऐकून सर्व भक्तजन लवकर स्नान करून हातात फळ व पूजेचे सामान घेऊन गुरुबरोबर निघाले. चिदंबर गावाबाहेर येताच तो रमावर बऱ्याच ऐश्वर्याने व भक्त मेळाव्यासहित आला. चिदंबर पुढे सरकून त्याने श्री व्यंकटेशास पाच फळे अर्पण केली आणि साष्टांग नमस्कार घालून राजोपचाराने सर्व पूजा केली. नंतर सर्व लोकांनी भक्तीपूर्वक फळे अर्पण करून पूजा केली, यानंतर चिदंबराने त्या वैकुंठनायकास आपले घरी नेले व सर्व लोकांना फार आनंद झाला व इतर सर्व गोष्टी विसरून येथे येऊन साष्टांग नमस्कार करू लागले. ज्याप्रमाणे श्रीकृष्ण इंद्रप्रस्थास येताच पांडवांना आनंद होत असे त्याप्रमाणे सर्व लोकांस आनंद झाला. अशा महोत्सवाने चिदंबराने त्या रमावरास आपल्या घरी आणून उच्चासनावर बसवले व अपार पूजा केली. मग महास्वामी खाली बसताच बाबाने ते पत्र सर्व वृत्तांत सांगून चिदंबरापुढे ठेवले. पत्र हातात घेऊन चिदंबर स्वामी हसून बोलले की, "या पत्रात श्रीपतीने काय लिहिले आहे ते पाहून मला सांगावे." हे पाहून लोकांना आश्चर्य वाटले कारण ते पत्र कोरेच होते. लोक बोलले याचा काय अभिप्राय असावा हे आपणास माहीत असेल कारण, आपणच हरी कळा जाणते आहात. मग महास्वामीने ते पत्र घेऊन वाचताना एक कौतुक झाले. ते असे की, ते पत्र सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. श्री चिदंबर महास्वामी म्हणाले की, "श्रोतेजन, ऐका. व ते पत्र वाचू लागले. ज्याच्या पदाचे वेद वंदन करतात, जो जगद्प्रवर्तक असा सच्चिदानंद आहे, जो ब्रह्मादिकांचा उत्पत्तीकारक आहे अशा तुला नमन असो. तुझ्या चरणाचे स्मरण करीत तुझी आज्ञा मानून तुझे रूप हृदयात आठवून हे उमापती, मी येथे सुखाने आहे. जगाचा दुःख संहार निश्चित मीच करतो पण मला जर काही दुःख झाले तर ते तूच दूर करतोस. तुझ्यापासून माझा जन्म झाला आहे व तुझे ठायी मी क्रीडा करून अंती अनन्यगतीक होऊन तुझे स्वरूपी लीन होतो. तूच शीवहरी विधाता आहे व सर्वांचा अंतर्बाह्य असा आकाशाप्रमाणे व्याप्त आहेस. व सर्वांनाच तुझ्या सत्तेनेच मी या जगात पूजा घेतो म्हणून तुझ्याजवळ आलो आहे. काही कारणाकरिता कुबेराकडून मी कर्ज घेतले. त्याचे व्याज देण्याकरिता माझेजवळ द्रव्य नाही. तरी हे जगन्नायका मला सव्वा लक्ष रुपये दे. प्राणसख्या तू उदास होऊ नकोस. या वेळी तूच त्राता, माता आहेस." असे पत्र वाचून महास्वामी म्हणाले की, "लोकहो ऐका, लक्ष्मीनायक असा हा व्यंकटेश आज याचक झाला आहे. तरी या नारायणाला मी काय द्रव्य देऊ. सत्कर्म हेच माझे धन आहे, तरी ते मी याचकास कसे देऊ. चंद्राला जर उकडू लागले तर त्याला थंड वारा कोण घालील. सूर्य जर अंधारात

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

बसला तर त्याला प्रकाश कोण दाखवेल? यज्ञेश्वर जर थंडीने कापू लागला तर त्याला शेकावयाला दुसरा उपाय काय करणार? असे स्वामी म्हणताच सर्वजण स्तब्ध झाले व कोणी काहीच बोलेना. लक्ष्मीपती घरी आला म्हणून चिदंबराला आनंद झाला व त्यांनी ब्राह्मण मेळा मिळवून समाराधनेस सुरुवात केली. सर्व ब्राह्मण तृप्त झाले मग आपण स्वत: जेवले व बाबास बोलावून त्याला सांगितले, मी जे देईन त्याने तृप्त व्हावे व त्यांनी पाच धोंडे आणून देवाखाली ठेवले आणि बाबास सांगितले की, ''हे गिरीवर जाऊन मगच पहा'' असे सांगून सर्व सेवकांना वस्त्र व दक्षिणा देऊन त्यांना बोळविले. भक्तासह घरी येताच बाबा जाऊन चिदंबर वराला पाहू लागले. तेव्हा त्यांना पाच रुपये दिसले. ते काढून घेताच पुन्हा पाच रुपये दिसले. असे सव्वा लक्ष रुपये होईपर्यंत त्या पालखीतून रुपये निघाले. सव्वा लक्ष पूर्ण होताच सर्वांना अत्यंत आनंद झाला. खजिन्यात तो द्रव्य ठेवा ठेवला. त्याच वेळी दुसरा एक चमत्कार झाला. एक इंग्रज व्यापारी होता. त्याने ठिकठिकाणी जाऊन व्यापार करून बरेच द्रव्य मिळवले व इतर मालही घेऊन तो जहाजात घालून आपल्या परिवारासह बसला. ते जहाज समुद्राच्या मधोमध आले. तेव्हा अवचित तुफान वारा सुटला व जहाज बुडू लागले आणि सर्व लोक घाबरले. तेव्हा तो व्यापारीही घाबरला. त्याचा शिरस्तेदार एक ब्राह्मण होता. त्याच्यासह तो विचार करू लागला व म्हणू लागला की, तुम्ही हिंदू लोक देवांना फार भजता. त्यापैकी कोणता देव संकटातून रक्षण करणार आहे, ते मला सांग. त्यावेळी त्याने चिदंबराचा उत्तम महिमा सांगितला आणि 'चिदंबर दिनांचे विश्रामधाम आहे आणि तोच तुम्हाला यावेळी तारक आहे,' असे ऐकताच त्या क्षणीच त्या इंग्रजाने संकल्प केला, 'जर चिदंबर मला यातून पार करील तर मला झालेल्या लाभाचा चवथा हिस्सा मी त्याला अर्पण करीन. आणि 'चिदंबर' असे शब्द उच्चारीत दंडवत घातला. इतक्यात एक अद्‌भुत गोष्ट घडली, त्या समर्थ चिदंबराच्या कृपेने जहाजाची वाट सोडून अचाट वारा वाहू लागला. तोच एक बेट लागले, तेव्हा सर्वांना आनंद झाला. त्या बेटावर काही दिवस राहून पुढे आपल्या घरी जाऊन जहाजातील सर्व वस्तूंची विक्री करता त्याला लाभात पाच लक्ष रुपये मिळाले व त्यानें सव्वा लक्ष रुपये आपल्या संकल्पाप्रमाणे चिदंबरास देऊ केले. चिदंबराचे आज्ञेप्रमाणे त्या इंग्रजाने व्यंकटेशास ते धन पाठवून दिले. संकटकाळी धैर्य धरून जो त्या गुरुला आठवतो त्याचे संकट निवारण तो करतो असा हितकर्ता श्री चिदंबरासारखा त्रिभुवनात दुसरा कोणीही मिळणार नाही. तरी त्याचे पाय सोडू नये. एक वेळ आकाशातील नक्षत्रे मोजता येतील, धुलीकणसुद्धा मोजता येतील, परंतु

चिदंबराच्या महिमेचा अंत कोणाला लागणार नाही. श्री चिदंबर छब्बीपुरास गेले त्या वेळी पाण्याचा लोकांना फार त्रास होता. तेथे ठिकठिकाणी चिदंबराने पाणी उत्पन्न केले. मग तो शंकर पार्श्ववाडीस आला व तेथे त्याने नैवेद्य केला. तोच तेथे एक नारी विषयुक्त तूप घेऊन आली. ती चिदंबरास विनंती करती झाली की, ''हे तूप आपणाकरिता आणले आहे ते आपण स्वीकारावे.'' त्या सर्वज्ञाने ते तूप घेऊन एका शिष्याला पारखावयास सांगितले. तो शिष्य म्हणाला की, ''अतिशय शुद्ध तूप आहे.'' तेव्हा चिदंबर त्याला म्हणाले की, ''तू पुन्हा पाहून घे.'' तेव्हा तो शिष्य म्हणाला की, ''त्यात काहीच दोष नाही.'' तेव्हा स्वामी म्हणाले की, ''तू काही गडबड करू नकोस. स्वस्थ चित्ताने पुन्हा पहा.'' तेव्हा त्या शिष्याला राग आला व म्हणाला की, ''मी काय आंधळा आहे. माझा उपहास करू नका. आपण स्वत:च तुपाची परीक्षा करावी.'' तेव्हा नैवेद्य व वैश्वदेव करून आपण स्वत: सगळे तूप घेऊन भोजनाकरिता बसले. तेव्हा त्या नारीची सून तेथे आली व तिने स्वामींना विनवणी केली की, ''तुम्ही हे तूप घेऊ नये. हे विषयुक्त आहे.'' तेव्हा स्वामी म्हणाले की, ''हे देवाने यज्ञेश्वराने स्वीकारले आहे तेथे माणसाचा पाड काय? परंतु ते विष तिच्या मुलाला बाधले व त्याचा मरण समय जवळ आला.'' त्याच्या सतीने दीक्षिताला विनंती केली की, ''तिचा पती वाचवावा.'' तेव्हा कृपानिधीने तिच्याबद्दल कोणताही किंतु मनात न आणता भस्म देऊन तिचा पती वाचविला. नित्य अशा अद्‌भुत लीला दाखवित असता एकदा मार्गी चोर येऊन त्यांनी चिदंबरास गाठले. त्यांच्या वडिलांचे व आजोबांचे नाव सांगून चोरीच्या कर्मातून त्यांना सोडवून चिदंबराने त्यांना सन्मार्गाला लावले. असे कित्येक चोर धैर्याने स्वामींपुढे येताच त्यांना म्हणत असत की, ''जर तुम्हाला द्रव्य घ्यावयाचे असेल तर चार पावले पुढे टाका.'' पण ते चोर खुंटाप्रमाणे कुंठित होत असत. नंतर चिदंबराला विनवणी केल्यावर या चौर्य कर्मातून त्यांना सोडवून सर्वांना गमन शक्ती पुन्हा देत असत. बाजीरावाने काशीराजाचे राज्य घेतले असता तो काशीराज चिदंबराला शरण आला आणि चिदंबराचे भय मानून बाजीरावाने त्या काशीराजाचे राज्य परत दिले. कुसुगल्लपुरीस आठ ब्रह्मराक्षसांना उपदेश करून चिदंबराने त्यांना सद्‌गती दिली. पडगानूर हे एक गाव होते. तेथे एक वैष्णव सर्व लोकांना सांगू लागला की, ''हा शैव आहे. त्याचे तोंड सुद्धा पाहू नये. त्याचे भेटीकरिता कोणी जाईल त्याला मी शिक्षा करीन. त्याचे दर्शन होताच आपण सचैल स्नान करावे.'' असे दुष्टप्रवृत्तीने म्हणताच गृहदेवता रडू लागल्या व शाळीग्रामादी सर्व देव त्याचे घर सोडू लागले.

त्याच्या अंगावरील सर्व वस्त्र जळू लागले. नग्न होऊन दुसरे वस्त्र घेताच तेही जळू लागले, तेव्हा सर्व लोक त्याला सांगते झाले की, "हे दुष्टा, तू चिदंबराला निंदलेस. त्यामुळे तुझी अशी दशा झाली, ज्याला नरक गोड लागतो, तोच जगदिशाचा निंदक असतो. अरे हे मूर्खा, हे शैवाचे वैर तू सोडून दे आणि चिदंबराला तू शरण जा. तरच तुझे अंगावर वस्त्र राहिल. हरीहर एकरूप असता पाखंडी लोक त्याला निंदतात आणि हरीहर निंदकांना पुढे यम शासन करतो." हे ऐकून तो निंदक वैष्णव चिदंबरास शरण गेला. तेव्हा चिदंबराने आपल्या वस्त्राने आपले तोंड झाकले व म्हणाला की, "हे ब्राह्मणा, मी स्पष्टपणे शैव आहे. तेव्हा माझे दर्शनाने तू भ्रष्ट का होतोस व सचैल स्नानाचे कष्ट का करतोस?" हे गुरुवचन ऐकून त्या वैष्णवाने त्यांना दंडवत घातला व वंदन केले आणि मोठ्या भक्तिभावाने प्रार्थना केली की, "दीक्षितेंद्रा, मी फार पापी आहे. तेव्हा हे दयासमुद्रा, मला क्षमा कर. हे विश्वंभरा, सर्वेश्वरा, मी नेणतेपणे तुझी अपार निंदा केली." अशी अपार प्रार्थना करून वारंवार वंदन करू लागला. तेव्हा चिदंबराने आपल्या तोंडावरील वस्त्र काढून त्याला दिले. ते वस्त्र नेसून त्या अधिकारी ब्राह्मणाने परोपरीने गुरुस्तुती केली व आपला सर्व परिवार तेथे आणून मोठ्या भक्तिभावाने चिदंबराच्या पायावर घातला. त्या दिवसापासून त्याने शैवनिंदा सोडली. मग गुरुच्या पदाला वंदन करून मोठ्या आनंदाने सहपरिवार आपल्या घरी गेला. एकदा यादगिरीच्या देसायाने गुरुपायी प्रार्थना करताच त्याला दोन गोष्टी सांगून आपल्या घरी पाठविले. वीस हजार ब्राह्मण भोजन करताच त्याच्या विहिरीत पाणी आले व परस्त्री त्याग केल्यानंतर त्याला संतान झाले. पुढे गुरुवचन विसरून भोजनात पंक्तीभेद करताच विहिरीतील पाणी आटले व वारांगना संग करताच अंगावर व्रण पडले व त्यात किडे पडून फार दुःख होऊ लागले व ते भोगीत असताच दीक्षित वचनाचे स्मरण झाले व तो शिबीकेत बसून चिदंबराला शरण आला व चिदंबराला परोपरीने प्रार्थना केली व नंतर पुन्हा दोन गोष्टींचा संकल्प केला. त्या क्षणीच त्याला आरोग्य लाभले. तेव्हा तो सर्वेश्वर म्हणाला की, "पंक्तिभेदाने अपार दोष लागतात व कोटीजन्माचे पुण्य भंग पावते. त्याचप्रमाणे वारांगना संग नरकभोग देतो. तेव्हा आजपासून या दोन्ही गोष्टींचा त्याग करावा. जेव्हा दोन गोष्टी तू विसरशील त्याच दिवशी तुझ्या देहाचा नाश होईल व अतिनरक भोगशील." असे गुरुवचन ऐकून त्यास साष्टांग नमस्कार करून आपल्या घरी आला व वचन पूर्णपणे पाळले. त्यामुळे सुखात राहिला.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय चौदावा

विप्रदुर्मतीदारिद्रहरण

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। एके दिवशी महास्वामी रेणुका दर्शन घेण्याकरिता निघाले. त्यांचेबरोबर बरेचसे ब्राह्मण व सैन्यासह राजे लोकही निघाले. रेणुका क्षेत्री जाऊन यथाविधी पूजा करून ब्राह्मण भोजन करून आपल्या घरी परत निघाले. रस्त्याने येताना एक मारुतीचे देऊळ पाहून 'ही जागा फार सुंदर आहे,' असे स्वामी म्हणाले. गुरुमुखाचे हे वचन ऐकताच सर्व राजे लोकांनी मिळून स्वामींच्या पुढाकाराने तेथे गावाची रचना करण्यास सुरुवात केली. इकडे स्वामी आपले नित्य अनुष्ठान करून सहपरिवार मुरगोडास येऊन राहिले. एके दिवशी मंडलेशाने चिदंबरास विनंती केली की, 'आपले वचन म्हणजे अमृतच आहे. ते गाव पूर्णपणे तयार झाले आहे तरी आपली आज्ञा काय आहे ते सांगावे.' तेव्हा स्वामींनी विचारले की, ''त्या गावाचे नाव काय ठेवले?'' मंडेलशासकट इतर सर्वांनी त्या सर्वेश्वरास गावाचे नाव काय ठेवावे अशी विनंती केली. दीक्षित बोलले की, ''त्या गावाचे नाव शास्त्रोक्त गुरुनवपूर असे सुंदर निघते आणि सत्कर्म करता ते पवित्र आहे.'' नंतर उत्तम मुहूर्त पाहून स्वामी त्या गावात प्रवेश करते झाले आणि सबंध गाव पाहून त्यांना आनंद झाला. त्या ठिकाणी मध्ये असा मोठा देववाडा होता व पूर्व दिशेस सुंदर अशा पेठा होत्या. दक्षिणेस व पश्चिमेस ब्राह्मणांची घरे होती. उत्तरेस श्रेष्ठ असे राजगृह होते. ईशान्य दिशेस अठरा पगडी जाती निवास करून होत्या व त्याच ठिकाणी सावित्री पती असा तो चिदंबर राहून या भूलोकावर कीर्ती पसरवित होता. सदाचार व श्रौत नेमाचे आचरण तो पुरुषोत्तम लोकांना दाखवित असे. स्वत: श्रोताग्नी सेवा करीत सद्धर्म आचरून दाखवित शिष्यांकडून वेदाध्ययन करवून घेत असे. त्या जगद्गुरुचे शिष्य वेदाध्ययनात अति निपुण होते. चिदंबर आपल्या मुखाने अध्यापन करीत. कित्येकास ऋग्वेद, कित्येकास यजुर्वेद व कित्येक सप्तशतके शिकवीत असत. त्यात ५८ सामपाठी, ३०० शास्त्रपाठी होते परंतु सर्वांना सर्व विद्या सद्गुरु एकटेच शिकवीत असत. कोणी श्रौत स्मार्त पठण करीत असत. कोणी मोठ्या आनंदाने याज्ञिक पद्धती शिकत असत. कित्येक

न्याय व व्याकरणात निष्णात झाले आणि कित्येक कर्मकांडी, ज्ञानकांडी झाले. कित्येकांना ज्योतिष शास्त्रात गोडी होती. अशी परंपरा सुरू होती. कित्येक मंत्र ब्राह्मण पदक्रम कित्येक अष्ट विकृती गुरुमुखाने अभ्यासू लागले. इतक्यात शुक्ल यजुर्वेद पठकांचा सुंदर आवाज आकाशभर दुमदुमू लागला. हा वेदाध्ययन सोहळा पाहण्याकरिता इंद्रादीक देवमेळा एक चित्त करून रसाळ वेदघोष ऐकू लागले. ते सर्व देवही पाठशाळा पाहून त्यांना आश्चर्य वाटले व चिदंबर महिमा पाहून केवळ स्तब्ध राहिले. हे सर्व ऐकणारे लोक म्हणू लागले की, ''आपण सत्य लोकांत आलो आहोत काय की जेथे ऋषीगण वेदपठण करतात व ब्रह्मदेव त्यांना सांगतात की, ''मूर्तिमंत वेद समुहाने आपले रचविभाग वेगळे करून कैलासनाथाला संतुष्ट करण्याकरिता अभंगाने स्तवन करू लागले आहेत की, या कलेची दूरवृत्ती सोडवण्याकरिता स्वत: नारायणासह परिवार या भूलोकावर आले आहेत.'' याप्रमाणे चिदंबर कीर्ती त्रिलोकावर पसरली असता शृंगेरीहून सहपरिवार श्रीशंकर भारती तेथे आला. एके दिवशी प्रात:काली दंडकमंडलु काषाय शोभीत व मंदहास्य करीत केवळ मूर्तिमंत बालसूर्य पाठशाळेत आला. तो यतिसभेत येताच शिष्याने ताबडतोब उठून यतीस साष्टांग नमस्कार घातला. आजानुबाहू व सुहास्यमुख, हाती दंडकमंडलु व पायी सुवर्ण पादुका अशा त्या यतीने शिष्यांना विचारले की, ''आपला गुरु कोठे आहे? मी आलो आहे असे चिदंबराला कळवा.'' यतीराजाचे असे बोलणे ऐकून त्याला चांदीचे आसन देऊन शिष्यांनी मृदू वचनाने त्या यतीस सांगितले की, ''सद्गुरू या वेळेला होमशाळेत आहेत. आपण जरा स्वस्थ चित्ताने बसावे आम्ही सद्गुरुंना कळवितो.'' आणि बटू शिष्याने यतीशाचे आगमन चिदंबरास कळवले. हे ऐकून पूजा सोपस्कार घेऊन चिदंबर सभेत येऊन त्या यतीशाला आधी वंदन केले. नंतर त्याला पिठावर बसवून स्वत: त्याचे पाय धुवून तीर्थ आपले मस्तकावर घेऊन मोठ्या भक्तीने त्याची पूजा केली व म्हणाले की, ''जशी अभाग्यास कामधेनू त्याप्रमाणेच या दिनास आपले दर्शन झाले व मी संसारी असूनही पावन झालो आणि कृतकृत्य झालो. माझे पूर्वपुण्य फळाला आले. त्यामुळेच आपल्या पायाचे दर्शन मला झाले. तरी आता आपला निरोप काय आहे तो सांगावे.'' मग शंकर हसत बोलला. ''पाठशाळेतून जो वेदगजर होतो आहे तो पाहण्यास मी आलो. त्यामुळे मला आनंद झाला. शुक्ल यजु: याचा सुस्वर नाद आकाशाला भेदून ब्रह्मदेवाच्या स्थळापर्यंत गेला आहे. यानंतर हे सख्या अवतार क्रिया अजून पुष्कळ आहे आणि लोकोद्धार

करण्याकरिता हे दीक्षितेंद्रा मी तुला सांगण्याकरिता आलो आहे. पूर्वी अन्य मताचे खंडन करून मी अद्वैत मार्ग स्थापन केला. त्याचा लोप होऊ लागला आहे. तरी तोच मार्ग आता वाढव. कर्म उपासना, ज्ञान यांची वेदाप्रमाणे स्थापना करण्याची आठवण करण्याकरिता मी आलो आहे.'' तेव्हा चिदंबराने यतीचे पाय धरून बोलले की, ''हे जगद्‌गुरु ऐका, पूर्वी याज्ञवल्क्य ऋषींनी वाजीशाखा स्थापली. ती कलिदोषाने लीन झाली. परंतु दुर्जन लोक नवीन वेदास फार दोष देतात. त्याकरिता माझे प्रयत्न आहेत. अनिंद्य अशा वाजीशाखा स्थापनेस करून हे जगद्‌गुरू नंतर तुझे आज्ञेचे पालन करतो. हे स्वामीराया असा माझा निश्चय आहे.'' असे परस्परांचे बोलणे ऐकून जयजयकार केला व म्हणू लागले की, ''आज मोठा सुदिन आहे की ज्या योगे जगद्‌गुरुंचे दर्शन झाले. दीक्षित भिक्षा वंदन करून यतीचे निमित्ताने बरेच ब्राह्मण संतर्पण केले. मग चिदंबराची आज्ञा घेऊन शंकर मुनी अंतर्धान पावले आणि चिदंबराची कीर्ती त्रिभुवनी रोज पसरू लागली.

एक उन्मत्त असा ब्राह्मण होता, तो अत्यंत दुष्ट होता. रोज चिदंबर महिमा ऐकून रात्रंदिवस तो मनात चिंतन करीत असे की, ''चिदंबराचे कलशात खूप द्रव्य आहे ते जर मी घेतले तर निश्चितच माझे दारिद्र्य जाईल. तो कलश चोरी करणेचे उद्देशाने सेवक होऊन त्यांच्याजवळ राहिला. परंतु त्याचे चित्त सद्‌गुरु ओळखत होते. त्याची दुर्बुद्धी सोडून त्याला भक्तीने शुद्ध करण्याकरिता एके दिवशी चिदंबराने तो कलश देवालयात ठेवला. महास्वामी जेव्हा स्नानाकरिता गेले तेव्हा तो ब्राह्मण कलश चोरण्याकरिता देवालयात गेला व कलश उचलला. देवापुढे वस्त्र पसरून चहूकडे टकमक पाहू लागला आणि आपल्या वस्त्रात तो कलश उचलला व ओतला. तेव्हा एक चमत्कार झाला. त्या कलशातून लांब नांगीचे असे हजारो विंचू पडले व त्यांनी पाहता पाहता सर्व देवघर व्यापले. ते पाहून तो ब्राह्मण थरथर कापू लागला व म्हणाला, ''मला कोणीतरी सोडवा, माझे मरण जवळ आले आहे.'' अशा प्रकारे तो मोठ मोठ्याने ओरडू लागला. त्याचे किंचाळणे ऐकून स्नान सोडून सद्‌गुरु देवघराजवळ आले व पाहतात तो दार बंद आहे व पुढे म्हणाले की, ''आत कोण आहे? लवकर सांग व आक्रोश का करतोस? लवकर दार उघड.'' तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला की, ''मी अपराधी आहे. या ठिकाणी सद्‌गुरु विंचू आहेत. मी चालण्यास समर्थ नाही, तरी आपण दार उघडावे.'' मग ताबडतोब सद्‌गुरुने ते दार उघडले आणि चिदंबराने आत पाहिले. तेव्हा आतून विंचवाचे थवे बाहेर पडले. ते पाहून असे

बाटले की, जगातील सर्व विंचू येथे गोळा झाले आहेत की काय? की ही सृष्टी विंचूमय झाली आहे की, चिदंबर सत्ता प्रकट झाली आहे. शिव शिव म्हणून चिदंबराने त्या ब्राह्मणास म्हणाले की, ''हे अघोर कर्म तू का केलेस? याने तुला काय लाभले आहे हे लवकर मला सांग. मला काही मागितले असता ते काय तुला दुर्लभ होते?'' असे म्हणून दीक्षिताने स्वत: विंचवाच्या गतीचे स्तंभन केले व त्यांना पुन्हा कलशात भरले आणि त्या ब्राह्मणास विचारले, ''तुझ्या मनात काय इच्छा आहे?'' तेव्हा तो ब्राह्मण सावध होऊन व त्याने दंडवत घालून नमस्कार केला व नाना प्रकारे स्तवन केले व म्हणाला की, ''हे देवाधिदेवा, मी अपराधी आहे. माझ्या दुष्ट बुद्धीचा तू नाश केला आहेस. तरी हे जगदीशा, मला तू तार. रत्न म्हणून जर विस्तव हातात घेतला, त्याचे जे फळ आहे, तसाच मला दंड करून माझ्या दुर्वासनेचे खंडन केलेस. तरी हे सर्वेश्वरा, मला क्षमा कर. दारिद्र्य दूर होण्याकरिता हे अघोर कर्म मी केले आहे. तरी या दिनाचा उद्धार करावा.'' त्याची दैन्य वाणी ऐकून चिदंबराचे मनात कृपा उपजली. 'आजपासून दुष्कर्माचे चिंतन मनात करताच नाश पावशील,' असे सांगून आपण कलशात हात घातला. दोन मुठी त्यातून काढून त्या ब्राह्मणाचे पदरात टाकल्या व म्हणाला, ''हे ब्राह्मणा, हे इतके घेऊन आता घरी जा याच्या योगाने तुला दारिद्र्याचा वारासुद्धा लागणार नाही.'' असे त्याला सांगून त्याला घरी पाठविले व आपण स्नानास गेले. असा कृपानिधी त्रिभुवनात कोणी मिळणार नाही. ज्याला इहपर सुखाची इच्छा आहे त्याने गुरुच्या पायाचा आश्रय घ्यावा. जो भयमोचक व भक्तरक्षक असून आपल्या भक्तांना नेहमी सुख देतो व कळिकाळाचे भय त्यांना बाधत नाही. चिदंबराचे नाव ऐकून यमदूत रानोरानी पळतात व काळमृत्यूही कापतो तरी गुरुचरणी भाव ठेवा. ज्याला चिदंबराचा आश्रय मिळेल तो त्रिभुवनी पूज्य होईल. तरी चिदंबराला नेहमी भजावे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनम: ॥

# अध्याय पंधरावा

पठाण रूपाने व्यंकटेश समागम

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे आदिमूर्ती चिदंबरा, ब्रह्मस्फूर्ती,सच्चिदानंदा सदोदित माझे चित्ती हे गुरु तुझी मूर्ती राहो. हे चिदंबरा, तुझे नामी जो निष्कामी प्रीती ठेवील. त्याला हे कृपासागरा, जगत्स्वामी तू आनंदधामी ठेवतोस. कामक्रोधादी वैरी नाना तऱ्हेने गांजतात. म्हणून हे भक्तकैवारी, तुझे चरणी मी शरण आलो आहे. तुझ्या मनात या दिन दासाविषयी कृपा उपजू दे आणि माझे चित्ताला शांती लाभू दे, इतकेच तुझे चरणी माझे मागणे आहे. चित्तनिवांत राहून सतत नामस्मरण चालू दे आणि हे कृपानिधी माझे ह्रदयात तू रहा, हे इतकेच चिदंबरा मला दे. उठता, निजता, बसता, खात असताना व बोलताना तसेच अवघड समयी येता तुझे नामी मला प्रेम दे. सत्य ज्ञान व अनंत असा आकाशवत आहे आणि ज्या ठिकाणी द्वैत खोटे दिसते, त्या चिदंबराला माझे नमन असो. एके दिवशी चिदंबराने पानात राहिलेला उष्टा खजूर शिष्याजवळ ठेवून हसत मधुर भाषेत बोलते झाले की, ''हा प्रसाद दिवाकराच्या पत्नीस नेऊन दे. ज्यायोगे तिची इच्छा पूर्ण होऊन संतान होईल.'' तथास्तु म्हणून तो शिष्य मनात म्हणाला की, 'गुरुचे उच्छिष्ट अतिशय दुर्लभ आहे व ते अनायसे माझे हाती उगले आहे. रोग्याच्या हाती अमृत आले असता तो ते थोडेतरी दुसऱ्यास देईल काय किंवा लक्ष्मी जर दारिद्र्याचे घरी आली तर तो तिला सुखाने सोडील काय? वंध्येला पुत्र झाला तर ती त्याला दत्तक देईल काय? तसेच भिकाऱ्यास सिंहासन मिळाले तर तो कठीण ऐसे वैराग्य घेईल काय? कामातुराचे शय्येस जर उर्वशी मिळाली तर तो तिला परस्त्री म्हणून उदास होऊन सोडील काय?' असा मनात विचार करून त्या शिष्याने एकांती जाऊन ताबडतोब प्रसाद भक्षण केला व आनंदित होऊन गुरुजवळ उभा राहिला. चिदंबराने त्यावर त्याला विचारले की, ''प्रसाद देऊन आलास का?'' ते ऐकून तो शिष्य लज्जित झाला. नंतर तो सर्वेश्वर सर्व सभाजनांसमोर म्हणाला की, ''उच्छिष्ट भक्षणाचा अविचार करून तू पापसंग्रह का केलास? उच्छिष्ट भक्षणाने मतीनाश होतो आणि विशेष पाप लागते. तरी गुरुची आज्ञा मोडून तू उच्छिष्ट भक्षण केलेस? अरे मूर्खा, गुरुची

आज्ञा मोठी असते आणि त्याचे उल्लंघन केल्यास हजार डोळे असलेला तो इंद्रही कष्टी होतो. बळीराजाने गुरुवचन मोडताच तो राज्यभ्रष्ट होऊन एका क्षणातच पाताळी गेला. तरी तू असा अनर्थ का केलास?'' याप्रमाणे निंदा वचन ऐकून तो ब्राह्मण लज्जेने खाली मान घालून उभा राहिला व मनात विचार करू लागला की, 'अज्ञानाने का होईना, गुरुचे आज्ञेचे उल्लंघन झाले आहे, आता मी काय करू? याचे प्रायश्चित्त हेच की ज्या जिभेने खजुराच्या रुचीची इच्छा धरली की ज्यामुळे माझी लोकात छी:थू झाली अशा त्या जिभेला शिक्षा करावी.' असा निश्चय करून एकांती शस्त्राने आपली जीभ तोडून चिदंबर चरणी अर्पण केली. ही भयंकर कृती पाहून चिदंबर शिष्याला म्हणाला की, ''तू अघोर कृती का केलीस व आता तुझी पुढे गती काय?'' असे बोलून श्री सद्गुरुंनी त्याचे तोंडात भस्म घातले व डोक्यावर वरदहस्त ठेवला. तोच तो शिष्य सावध झाला व त्याला पुन्हा जीभ आली व त्यास सर्व ज्ञानाचा लाभ झाला. तो शिष्य सावध होऊन सुंदर असे स्तोत्र गाऊ लागला. जय जय त्रिलोकनाथा, शंकरा विधिद्र पूजता, निळकंठा श्रीमत् चिदंबरा सद्गुरुनाथा, मृत्युंजया मला प्रसन्न व्हावे. त्याचे स्तवन ऐकून चिदंबर प्रसन्न झाले व त्याचे इच्छेप्रमाणे त्याला वर दिला ज्यायोगे तो आनंदित झाला. चिदंबर अशी अगाध लीला नेहमी दाखवीत असे म्हणून ज्याला इहपराची चाड आहे त्याने चिदंबराचा आश्रय धरावा. एके दिवशी श्रीनिवास नावाचा एक पंडित आपल्या शिष्यासह चिदंबराची परीक्षा घेण्याकरिता आला. या चिदंबराच्या ठिकाणी देवत्व काय आहे हे मी निश्चित पाहीन असे म्हणून बरेच शिष्य समुदाय घेऊन श्री गुरुच्या सभेत आला. तो पामर परीक्षा घेण्याकरिता आला आहे हे चिदंबराला समजले. कारण तो सर्वांचे अंतर जाणतो. जेथे ब्रह्मादिकही शिणतात तरी त्याचा पार लागत नाही अशा जगन्नाथाचा तो हतभागी परीक्षा घेण्यास आला. जो आपल्या मुखाने गुरुची निंदा करतो तो यमाचा परम मित्र होय. तो पंडित येताच जगदीश्वराने त्याचे मन ओळखले. तेव्हा त्याची दुर्वासना दूर करण्यासाठी चिदंबराने असे केले. व्यावहारिक लोकांना जमविले व त्यांच्याशी व्यावहारीक गोष्टी करून प्रेम कलह सुरू केला. दोन मुहूर्त तो पंडित पाहत बसला परंतु त्याला चिदंबराचे वैभव कळले नाही. ज्याला अहंभाव आहे, त्या मूर्खाला देव कसा दिसेल, कावळा जरी पुष्ट झाला तरी त्याला आकाशाचा अंत लागणार नाही. काजवा जरी कितीही मोठा झाला तरी त्याच्यापुढे सूर्याचे अचाट तेज लोपणार नाही. माशी जरी कितीही वेगाने उडाली तरी तिला समुद्र पार करता

येईल काय? बोकड जरी कितीही वाढला तरी तो ऐरावताशी झगडू शकेल काय? कुत्रा जरी कितीही माजला तरी तो सिंहाला मारू शकेल काय? पतंग जरी कितीही खवळला तरी तो विस्तव गिळू शकेल काय? नंतर तो श्रीनिवासाचार्य आपल्या शिष्यासह बिऱ्हाडी परत गेला व मत्सराने निंदा करू लागला. गुरुनिंदकाला केव्हाही सुख होणार नाही, दुःखच होणार. महापुरुषाचा धिक्कार केला तर तो आपणासच बाधतो. दिव्याचे तेज पाहून जर पतंगाने, मत्सराने त्यावर झडप घातली तर तो स्वतःच प्राणांतिक कष्टी होतो, नागाने भरताला बळी देण्याकरिता भद्रकालीपाशी आणताच स्वतः तोच बळीरुप झाला. श्रीकृष्णाची निंदा केल्याने शिशुपाल नाश पावला, त्याप्रमाणेच त्या आचार्यास निंदेचे फळ ताबडतोब मिळाले आणि त्याची जिव्हा कुंठित झाली. त्याला थोडेही बोलता येत नसे. तसेच त्याची सर्व इंद्रिये गुरुची निंदा करताच शक्तिहीन झाली. त्याचे शिष्य गुरुची स्थिती पाहून विचार करू लागले. 'चिदंबर निंदेची प्रचिती याला आली तरी चिदंबरास शरण जावे म्हणजे आपल्या गुरुस बरे वाटेल' असा शिष्याने निश्चय करून ते आपल्या गुरुस घेऊन चिदंबराजवळ आले व नमन करून प्रार्थना केली की, "हे स्वामी, आमच्या गुरुने तुमची निंदा केली त्यामुळे त्यांची वाचा कुंठित झाली आहे. तेव्हा हे जगन्नाथा, अपराधाबद्दल त्यांना क्षमा करून त्यावर कृपा करावी. कारण तत्त्वतः तो शरण आला आहे." तेव्हा चिदंबर म्हणाले, "ज्याला स्वहिताची इच्छा आहे, त्याने कोणाची स्तुती किंवा निंदा करू नये असे भगवंत वाक्य आहे व त्याप्रमाणे वेदही सांगतात. नमन करून ब्राह्मणाचे पाय धरावे, निंदा वाक्य बोलू नये. सर्व प्राणीमात्रांचे हृदयात ईश्वराची वस्ती असते. त्यात जो कोणाची निंदा, स्तुती करील त्याला स्वतःलाच फळ भोगावे लागते. लोकांचा स्वभाव व कर्म बोलू नये हा साधूचा नियम असतो आणि तो मेघश्याम गीतेमध्ये अर्जुनाला हेच सांगतो. आपल्या जिभेने निंदक लोकांचे दोष चाटून घेतो. म्हणून ज्याला शुभ व्हावे अशी इच्छा असेल त्याने कोणाचे गुणदोष सहसा बोलू नये. आणखी एक गीतावचन असे आहे की, सर्वांभूती एकांशे करून नारायण वसतो असे कृष्ण भगवान अर्जुनाला सांगतात. असा सर्व अर्थ जो जाणतो तो कधीही कोणीची निंदा करत नाही. कारण ती निंदा भगवंतापर्यंत पोहोचते ज्यायोगे आपले स्वहिताचा नाश होतो. आपल्यावर काही संकट आले तरीही कोणाची निंदा करू नये व कोणाचे द्रव्यहरण करू नये. सर्व देहबुद्धी तत्त्वतः जड असते. तेव्हा सर्वांचा चालक एकमेव रमाकांत प्रत्येकाचे अंतर्यामी असतो तरी निंदावचने

बोलू नयेत व सर्वांभूतीतारक आहे." असे चिदंबराने सांगितले. याप्रमाणे चिदंबराचा उपदेश ऐकून तो पंडित मनात दु:खी झाला व त्याला पश्चात्ताप होऊन निंदा करणे सोडले व चिदंबराच्या पायांना वंदन केले. सारखा दंडवत घालू लागला व त्याला गहिवर दाटला व कंठ सद्‌गदित होऊन रडू लागला. त्यावर चिदंबराचे पोटी कृपा उपजून त्या आचार्याकडे अमृतदृष्टीने पाहिले, त्यावर आचार्याने स्वामींची बरीच स्तुती केली आणि म्हणाला, "मला तुझा महिमा कळत नाही. मी अज्ञ असून मूर्ख आहे. माझा अपराध फार मोठा आहे. तरी माझा अपराध पोटी घाल व मला तार. मी दुसऱ्याची निंदा केल्यामुळे माझी बुद्धी नासली आहे, तरी मला ज्ञान कसे प्राप्त होईल? हे समर्था, आपण बोध केल्याप्रमाणे आजपासून मी परनिंदा सोडली, हाच माझा संकल्प. तरी हे दयाळा, मला तार." मग तो भक्त कैवारी मायबाप आचार्यावर कृपा कर्ता झाला व त्यास बरेच वस्त्रालंकार देऊन मोठ्या प्रेमाने त्याचा सन्मान केला. नंतर चिदंबराची आज्ञा घेऊन तो आचार्य कोप सोडून आपल्या घरी गेला व सर्वांना आपले पाप सांगितले. 'चिदंबर आपला बापच आहे. त्याची निंदा करू नका.' असा चिदंबर महिमा आहे. त्याचा सर्व महिमा सांगण्यास या भूलोकावर कोणीही समर्थ नाही. ज्यावर चिदंबर कृपा होईल तोच त्याचा महिमा वर्णन करू शकेल. कोरड्या सुपारीला अंकुर फुटून त्याचा मोठा वृक्ष झाला. त्या ठिकाणी अजूनही भक्त लोक त्या वृक्षाची पूजा करतात. जे आनंदी भक्त आहेत त्यांचा चिदंबर हा प्राणसखाच होय. याकरिता नेहमी चिदंबर आठवावा. ध्यान पूजा व त्याचे स्मरण करावे, त्यायोगे या संसारातून उद्धार होईल. चिदंबर या भूलोकात असताना कलियुगाचेही काही चालेना. सर्व लोक परोपकारी झाले व नेहमी सदाचाराने वागत. ब्रह्ममुहूर्ती उठून प्रात:स्नान, ध्यान व पूजन चिदंबराचे आज्ञेने सर्व जण करीत. ब्राह्मण लोक वेदपाठ करीत असत. गुरूचे आज्ञा पालन करीत असत व सदाचरणी राहून शिवभक्ती प्रकट करीत असत. चिदंबराचे मुखातून धर्मश्रवण करीत त्याप्रमाणे ते मनात ठेवून त्याप्रमाणे आचरण करीत असत. एके दिवशी चिदंबराने प्रातर्विधी आटोपून राजे व ब्राह्मण लोकास बरोबर घेऊन सभास्थानी आला. शांतमूर्ती चिदंबर आणि स्पष्ट मधुर असे उच्चार तसेच रुद्राक्षभस्म व शुभ्र अशा वस्त्रालंकाराने त्रिभुवन सुंदर असा शोभत असे. ज्या सभेपुढे इंद्रसभाही निष्प्रभ दिसत असे आणि त्याचा गाभा पाहताच कोटीसूर्यप्रभा यावरून ओवाळून टाकावी असा होता. दीक्षितेंद्र सभेत येताच सर्व सभाजन उठून त्यांना साष्टांग नमन केले. चिदंबर कुशासनी बसताच

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

सर्व लोक आपल्या जागी बसले व चिदंबराची अमृतवाणी मोठ्या प्रेमाने ऐकू लागले. तेव्हा दीक्षित मंद हसत बोलले की, ''स्वधर्मचारासारखे पुण्य नाही. आपल्या जागी बसून स्वधर्माचे आचरण केल्यास सर्व गोष्टी सुगम होतात आणि त्यास मेघश्याम स्वतः येऊन निश्चित भेटतो. याची प्रचिती तुम्हाला निश्चितच येथल्या येथे येईल. तो व्यंकटेश सद्‌हृदय येथे येऊन अवश्य भेटेल.'' तेव्हा ब्राह्मण विचारते झाले की, ''केव्हा, कधी व कोणत्या रूपाने नारायण भेट देईल याची खूण आम्हाला सांगावी.'' तेव्हा चिदंबराने खूण सांगितली की, ''तो अनंतरूपी जगदीश पंधराव्या दिवशी तुम्हाला नक्की भेटेल.'' ही अद्‌भुत गोष्ट ऐकताच सर्व लोकांना आनंद झाला व ते दिवस मोजत राहिले व कित्येकांनी आपल्या नातलगास बोलवले. पंधरावे दिवशी प्रात:काली सर्व जण गुरुजवळ आले व प्रातर्विधी उरकून त्या भक्त मेळाव्यात दीक्षितेंद्र सभास्थानी बसले. त्या सर्वांना मनोरंजक सुंदर गोष्टी सांगत असता श्री व्यंकटेश पठाणाच्या वेशात महाद्वाराजवळ आला. सुंदर घोड्यावर स्वार होऊन हाती ढाल व तलवार घेऊन डोक्याला रुमाल बांधून. त्याचे तेज चहूकडे पसरले आणि महास्वामींना निरोप पाठवला की, 'मी भेटीला आलो आहे तरी माझ्या भेटीस यावे.' तेव्हा त्या दारीचे ब्राह्मणांनी धावत जाऊन सांगितले की, ''महाद्वारी एक पठाण आला आहे, स्वामीनी त्यास दर्शन द्यावे'' असे म्हणतो. सर्व लोकांना आश्चर्य वाटले की, 'यवनास दर्शन कसे होईल?' स्वामींनी विचारले, ''तो एकच आहे की दोन आहेत हे मला पाहून सांगावे.'' ब्राह्मण बाहेर जाऊन पाहताच तो दोघे पठाण त्यांना दिसले. त्याप्रमाणे त्यांनी स्वामींना येऊन सांगितले की, 'दोघेजण तेथे आहेत.' तेव्हा स्वामींनी त्यांना सांगितले की, ''पुन्हा पाहून यावे.'' त्यानी येऊन सांगितले की, 'एकच पठाण त्यांना दिसतो.' हे ऐकून सर्वांना हसू आले. याची खूण कोणालाही कळली नाही. स्वामी हसून ताबडतोब उठले. त्यांचेबरोबर बरीच विप्र मंडळी उठली. बाहेर जाऊ लागली. बाहेरही यात्राजनांची दाटी झाली व महाद्वारात तो पठाण उभा होता. पायात मोजे, अंगात दुशाल मंदील साजत होता. तिरकस कमान, कंठी शस्त्र असा तो दिव्यरूप पठाण शोभत होता. रत्नखजित असा शिरपेच व मोत्याचा तुरा तसेच रत्नांचा कंठा आणि हृदयावर पदक असा तो पठाण शोभत होता. आकर्ण नेत्र व सुहास्य वदन अशा त्या पठाणाने स्वामींना पाहताच ताबडतोब धावून आला व स्वामींना आलिंगन दिले. दोघेही मोठ्या आनंदाने भेटले. व्यंकटेश हात जोडून म्हणाले की, ''बऱ्याच दिवसांनी आपली भेट होत आहे.''

शि व चि द म्ब र

असे फारशी भाषेत सांगितले. ती भाषा कोणालाही कळली नाही. सर्व विप्रांना मोठे आश्चर्य वाटले व ते भ्रांतचित्त झाले की स्वामी यवनाला कसे भेटले. पठाण व स्वामी म्हणजेच व्यंकटेश व चिदंबर दोघेही मिळून घरात आले व भक्तजन मोठ्या आनंदाने पाहू लागले की, हे जणू नरनारायणच भेटले आहेत किंवा सूर्य-अग्नी हात धरून येत आहेत असे वाटते किंवा या भूलोकावर जगाचा उद्धार करण्याकरिता लक्ष्मीश व कर्पूरगौर आले आहेत असे वाटते. सर्व ब्राह्मणांना आपल्या आसनावर बसवून ते दोघे देवालयात जाऊन बोलत बसले. त्याचा वृत्तांत कोणालाही कळला नाही. ते दोघे दोन प्रहर बसले होते व नंतर व्यंकटेश गुप्त झाले व महास्वामी एकटेच बाहेर आले ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. तेव्हा त्यांनी विचारले की, ''तो यवन कोठे गेला? कारण तो दिसत नाही.'' तेव्हा स्वामी हसून म्हणाले की, ''असा भ्रम होऊ देऊ नका. तो व्यंकटेश होता. नाहीतर यवनाला मी आलिंगन कसे दिले असते? याकरिता तुम्हाला मी आधीच खूण सुचविली होती.'' तो पठाण घोड्यासकट गुप्त झाला असता सर्वांना आश्चर्य वाटले. आपण आज ईश्वरी कौतुक पाहिले व अनुभवले असे सर्वांना वाटले. असे नाना तऱ्हेचे चमत्कार सर्व जण पाहत असता देवाधिदेव चिदंबर अवतार अशा नाना लीला दाखवित असत. सर्व लोकांनी उघड पाहिले. परंतु भ्रांतीमुळे व ईश्वरी माया दुर्घट आहे म्हणून ईश्वराच्या कृपेवाचून त्याची ओळख पटणार नाही. जर तो दाखवील तरच त्याची माया माणसास कळेल अशी ईश्वराची विचित्र लीला आहे.

शि व चि द म्ब र

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

# अध्याय सोळावा

शिवशास्त्रास शिवदर्शन

।।श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। भक्तरक्षण व धर्मसंस्थापना करण्यास जो शंकर भूतलावर अवतार घेतो त्या चिदंबरास भक्तीने नमन असो. चिदंबराची लीला या भूलोकावर चालू असता त्याची कीर्ती स्वर्ग पाताळी पसरली व त्या योगे देवर्षी सिद्धनर व राजेलोक चिदंबराचे पदकमळी रमू लागले. मंद, स्तब्ध, जड-मूके, रोगी, पंगू, आळशी त्याचे दर्शनाने आनंद पावीत असत. कितीतरी सकाम व निष्काम लोक आपल्या कामाचे सिद्धीकरिता चिदंबराची भेट घेत असत. महास्वामी रोज असे चरित्र दाखवीत असत. वर्णन करावयास ब्रह्मदेव सुद्धा समर्थ नव्हता. असे असता द्रविड देशात एक महाकवी होता. त्याचे नाव शिव होते. तो सुस्वभावी असून त्रिकाळ शिवपूजा करीत असे. चिदंबराची कीर्ती ऐकून त्याने मनात विचार केला की, पापमूर्ती असा कली या भूलोकावर वावरत असताना गिरिजापती येथे कसा अवतरेल? पण स्वतःच त्याला गीतेचे वचन आठवले की, धर्मसंस्थापना करण्यास व भक्ताचा उद्धार करण्यास उमारमण येथे का अवतरणार नाही? तेव्हा असा संशय धरून हा अवतार खरा की खोटा हे पाहण्याकरिता बरेच शिष्य घेऊन स्वतः निघाला. त्याच दिवशी तो सर्वेश्वर चिदंबर शुभ्र वस्त्र, भस्म व रुद्राक्षालंकार आणि कलश धरून त्याचे स्वप्नात आला व त्याला विचारले की, 'तू कोठे निघाला आहेस हे मला सांग.' तेव्हा शास्त्री म्हणाला की, 'मी चिदंबर दर्शनाकरिता गुरुपुरीस निघालो आहे.' नंतर चिदंबर मंद हसत म्हणाले की, 'पापमूर्ती कली या जगात असताना गिरिजानाथ येथे कसा अवतरेल? तो धर्मसंस्थापना करण्यास आला आहे काय असा संशय मनात धरून त्याचे दर्शनाकरिता का निघाला आहेस? संशय आल्यास सुगती कशी प्राप्त होईल? असे ऐकून आपल्या मनातील खूण हा ब्राह्मण सांगतो त्या अर्थी हा निश्चितच उमारमण आहे. मनुष्यास हृत ज्ञान या कलियुगात कसे होईल असा विचार करून नंतर त्या शास्त्राने मनोभावाने त्याचे चरण धरून वंदन केले व आनंदाने गद्गद होऊन बरेच स्तवन केले. त्यावर मोठ्या प्रेमाने दीक्षितेंद्राने सांगितले की, मीच शंकर आहे.

या कलियुगात फार पापी झाले आहेत. त्यामुळे धर्म स्थापनेकरिता मी अवतरलो आहे. इतक्यातच तो शास्त्री स्वप्नातून जागा झाला व चिदंबरावर विश्वास ठेवून स्वप्नातील रूपाचे ध्यान करून मोठ्या प्रेमाने व आनंदाने भजन करीत देवपट्टणास आला. तेथे चिदंबराला पाहताच तीच आपली स्वप्नमूर्तीच आहे हे त्यास पटले व त्याला दुरूनच साष्टांग नमस्कार करून जवळ आला. हात जोडून सद्गुरुकडे त्याने जेव्हा पाहिले, तेव्हा तेज फाकले आहे असे त्याला दिसले व गुरूचे वामांगी गिरिजा शोभत होती. भुजंगाचे भूषण असलेला असा तो पंचवदन व्याघ्रचर्माचे परिधान केलेले व गजचर्म अंगावर पांघरलेला असा तो त्रिलोचन निळकंठ जटाधारी भस्मभूषित रुद्राक्षमाला कंठी असून नंदी वाहनावर असलेला व डोक्यातून गंगामाता वाहत असलेला असा शांत दिसत होता. हे साक्षात शिवरूप पाहून त्या शास्त्राला आनंदाने कंप सुटला व म्हणाला की, ''हे माय-बाप, मला तार.'' असे म्हणून अमाप स्तवने केली. आनंदाने वाचा गद्गद् झाली आणि अंगी रोमांच उभे राहिले व म्हणाला की, ''माझा जन्म सफल झाला आणि कोटीजन्माचे सुकृत आज फळाला आले. जो योगीयांना दुर्लभ आहे तो साक्षात स्वयंभू मला आज भेटला. मी आज धन्य झालो तरी हे सांबा, तुझे पदकमळी मी नमन करतो. हे पापहरका, दयासमुद्रा, दुस्तर भवताप संहारका, तू भक्ताला या भवातून तारतोस आणि दिनांचा प्राणसखा होतोस. लोकांच्या उद्धाराकरिता अवतार घेऊन शरणागतांचे दुःख दूर करतोस. तरी हे दयाळा, चिदंबरा, माझ्यावर प्रसन्न होऊन माझी चिंता दूर कर. हे साधुरक्षका, महात्म्या, तू आपल्या भक्तांसाठी कल्पवृक्ष आहेस. हे दयाळू चिदंबरा, तुझे नामस्मरण करणाऱ्यांचे तू पालन करतोस. हे सर्वेशा, चिदंबरा, तू माझे स्वप्नात प्रसन्न झालास आणि आत्ताच का आळसावलास? हे भक्तवत्सला, प्रसाद देवून माझी आशा ताबडतोब पूर्ण कर. मी कुटिल व अपराधी असा गर्विष्ठ पापी आहे. तरी भक्त म्हणून कृपेने माझ्याकडे पाहा. उष्णतेने जसे मेघास पिडले किंवा जहाज जसे समुद्रात बुडाले आणि आडरानी जाणारा मार्ग जसा सापडतो तसा मी अनाथ म्हणून तू मला पावलास. माझेकडे कमळासारख्या डोळ्याने पाहून माझ्याशी ज्या कारणाने आदराने बोलतोस त्याप्रमाणे हे जगद्गुरु मला अभय वचन दे. स्वप्नात येऊन ज्या संशयाचे हरण करण्याकरिता सर्वांची इच्छा पूर्ण करणारा असा सांब मीच आहे. तरी या वेळी तुझी काय इच्छा असेल तो वर माग मी तुला देतो, असे तू बोलला होतास तरी हे स्वामीराया, जशी वाणी तशीच क्रिया आता करून


शिव चिदम्बर

शि व चि द म्ब र

दाखव व माझी मोहमाया दूर कर. मी तुला शरण आलो आहे.'' अशी कवीस्तुती ऐकून महास्वामींना आनंद झाला व स्वतः मनुष्यरूप धारण करून त्या पंडितास विचारले की, ''आपले स्थान कोठे आहे व आपण येथून पुढे कोणत्या वाटेने जाणार आहात? माझे पुण्य फार मोठे होते म्हणून तुम्ही स्वतः जन्माला येऊन मला दर्शन दिले.'' हे ऐकून तो पंडित म्हणाला की, ''आपण सर्वज्ञ आहात तेव्हा माझी वंचना करून मला असे का विचारता? लोकांकरिता जर तू मला विचारत असशील तर हे विश्वेश्वरा, मी सांगतो. मी पूर्वेच्या बाजूस राहणारा असून तुझ्या चरणसेवेकरिता आलो आहे. भुकेल्यास पक्वान्न मिळताच तो अवचित सोडेल काय? तसेच मोक्षाची इच्छा असलेल्यास जर मोक्ष लाभला तर तो सोडील काय? रोगी माणसास उत्तम असा वैद्य मिळताच त्याचा अव्हेर करून तो कष्ट सोसेल काय? एखाद्या भिकाऱ्यास सिंहासनाचा लाभ झाला तर भिक्षा मागेल काय? तसेच आता मला गुरुचरण मिळाले आहेत ते सोडून हे देवा, मी आता कोठे जाऊ? तुझे चरण सोडून याउपर मी कोठेही जाणार नाही. मी भुंगा होऊन तुझ्या पदकमली येथेच राहिन. दुस्तर अशा या संसार सागरात मी मोहाने बुडालो आहे, या ठिकाणी बायको, मुले आदि आहेत आणि ते मला सारखे गांजतात. हे सद्‌गुरुनाथा, मी पतीत आहे. तेव्हा हे अनाथनाथा, माझा उद्धार कर. हे पतितपावना, कृपावंता, या दिनाची तू माताच आहे.'' त्या कवीचे असे हे प्रेमयुक्त भाषण ऐकून चिदंबराला संतोष वाटला व आपल्या अमृतवाणीने बोलता झाला की, ''ज्याप्रमाणे तू माझे स्तवन केलेस तशीच त्या महेशाची प्रार्थना कर. तो निश्चितच तुझे मनोरथ पूर्ण करील. मी पामर असा एक मानव आहे. मी तुला काय वर देऊ शकणार?'' तो सर्वेश्वर सभेमध्ये असे म्हणाला व त्या शास्त्र्यास एकांती बोलावून सांगितले की, ''नाना प्रकारे तू स्तोत्र कर. मी शंकरच आहे आणि तू माझा प्रेमळ असा भक्त आहेस.'' एवढे बोलून महास्वामी होम मंदिरात अनुष्ठानाकरिता गेले. इकडे तो शास्त्री रसभरीत अशी स्तोत्रे करू लागला. गीतवचन नाम. - सहस्त्रहृदय-भक्तानंद स्तोत्र-पंचरत्न चिदंबर पहा असे त्या पंडिताने रचले. अशी स्तोत्रे करून दुसरे दिवशी सभेत आला आणि चिदंबरास दुरून पाहताच त्याला तो सूर्यासारखा तेजस्वी दिसू लागला. सभोवती विद्वान लोक बसलेले असून ते अत्यंत शोभायमान दिसत होते आणि मध्ये सुखासन घालून चिदंबर बसले होते. नक्षत्रामध्ये जसा चंद्र, देवांमध्ये पुरुषोत्तम, सिद्धामध्ये शैवधाम तसा तो नरोत्तम दीक्षित शोभत होता. चिदंबराचे पदकमळी वंदन करून तो

शि व चि द म्ब र

मनात तो आनंदकंद आठवून तो प्रेमानंदाने भरलेला शास्त्री हात जोडून त्याने स्तोत्र सुरू केले. सभाजन ते आनंदाने ऐकत असता 'शिवाची स्तुती सोडून तू नरस्तुती केली आहेस, अशी नराची स्तुती करून तू निष्कारण कष्ट घेतलेस तरी ती कटकट आता पुरे कर.' असे चिदंबराने त्या कवीस म्हटले, नंतर तो प्रेमळ भक्त हसत म्हणाला की, ''हे गुरुमाउली मी हे रसाळ शिवस्तोत्र तुमचे पदकमल स्मरून केले आहे. त्याला नरस्तुती म्हणू नये. याविषयी हे सभासदहो, मी तुम्हाला प्रत्यय दाखवितो. ही जर शिवसांब स्तुती असेल तर तो शिव माझी प्रतिज्ञा पूर्ण करील. हे सुज्ञ लोकहो, मी आता एक प्रतिज्ञा करतो. ती तुम्ही ऐकावी. मी आता तळहातावर कापूर ठेवून आरती सुरुवात करतो. जर हा सदाशिव असेल व मी शिवस्तुतीच केली असेल तर या कापराचा अग्नी शीतल होऊ दे.'' असे म्हणून बराच कापूर हाती घेऊन पेटविला व अखंड अशा शिवस्तवनास सुरुवात केली. तोंडाने मुक्तानंद लहरी म्हणू लागला व डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले व पुन्हा हातात कापूर ठेवून करुणा भाकू लागला. असा एक मुहूर्तपर्यंत कर्पूराग्नी हातात जळत होता आणि त्याला अजिबात कोणतीही व्यथा न होता हातातील अग्नी शांत झाला. सर्व सभाजन तटस्थ होऊन त्यांचे अंगावर अद्‌भुत रोमांच उठले व हे काय आश्चर्य झाले असे म्हणत मोठ्या आदराने माना डोलावू लागले. हा चिदंबर सदाशिवच आहे व हा भक्त खरा शैव आहे व हे अभूतपूर्व चिदंबर वैभवच आज प्रकटले आहे असे म्हणून स्तवन करू लागले. कित्येक नमस्कार करू लागले, कित्येक भक्तीने स्तवन करू लागले. कित्येक जयजयकाराने गर्जना करू लागले व कित्येक आनंदाने नाचू लागले. ज्याने ते चरित्र्य प्रत्यक्ष त्या दिवशी पाहिले आणि त्या दिवशी आनंदाचा पूर किती वाहिला, त्याचे सविस्तर वर्णन कोण करू शकेल. ज्याला सदाशिव प्रसन्न झाला आहे त्याचे भाग्याचे कोण वर्णन करील? नित्य आनंदाने सेवन करावे असे हे चिदंबराच्या सेवेचे फळ आहे. मोठ्या प्रेमाने उठून त्या शास्त्र्यास आपल्या पोटी धरून त्याचे मस्तकावघ्राण करून तो जगज्जेठी आपल्या वरदहस्ताने त्याची पाठ थोपटू लागला व म्हणाला, ''हे वत्सा, हे साहस आता पुरे कर. पाहवयास अशक्य असे किती करशील. मी खरोखरीच महेश आहे.'' असे म्हणून त्याच्या हातातील कापूर शांत करून चिदंबर मधुर अशा वाणीने बोलला की, ''तुझ्या मनात असेल तो वर माग, तू शिवाचा प्रेमळ भक्त होशील. तुझ्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे तरी वर माग. तो दुर्लभ असला तरी शिवाला मागून

शि व चि द म्ब र

मी तुला देतो.'' अशी सद्गुरुवाणी ऐकून त्या शास्त्र्याने आनंदाने उठून मोठ्या प्रेमाने व भक्तीने वंदन करून प्रार्थना केली, ''हे भक्ततारका चिदंबरा, मला वैषयिक वर नको आहे. विषयाच्या संगाने एखाद्या दारुड्याप्रमाणे हे सर्वेश्वरा तुझा विसर पडतो. जर मला वर देत असलास तर हे प्रेमळा, तुझे चरणी मला भक्ती दे आणि तुझ्या भक्तीची लीला कशी आहे ती मला सांगावी. हे शंकरा, या संसारभयाचे निवारण कर आणि हे तारका भक्ती कशी असते हे मला सांगावे.'' मग चिदंबर म्हणाले की, ''मी तुला भक्तिमार्ग सांगतो. नुसत्या श्रवणाने एखादा पापीही संसार सागरातून मुक्त होतो. अगोदर वेदोक्त कर्माचरण करून मला अर्पण करावे आणि नेहमी नामसंकीर्तन करावे व प्रेमाने माझे पूजन करावे. नेहमी माझी कथा श्रवण करावीच. एकाग्र मनाने माझे ध्यान करावे आणि सर्व ठिकाणी एकच देव आहे. म्हणून सर्वांपुढे लीन असावे. भक्तीची वाढ होण्याकरिता हे शिष्यराया २४ गुण आहेत. ते या वेळी मी तुला सांगतो ते एक चित्ताने ऐक. कोणाकडूनही मानाची अपेक्षा करू नये. परंतु आपण मात्र समयानुसार दुसऱ्याचा मान-सन्मान करावा. ढोंगीपणाने कर्माचे आचरण करू नये. देवभक्ताने आपले कृतकर्म लौकिकाकरिता दुसऱ्यास सांगू नये. कोणतेही वेळी राग नसावा व सर्वांशी आर्जवाने वागावे. कर्माचे वेळी दक्ष असावे व मन निर्मळ आणि स्थिर असावे. सर्व भुतांचे ठिकाणी शिवभावना ठेवून कृपाळूता असावी. अंतर्बाह्य शुद्ध राहून सत्यव्रती असावे आणि मन हे नेहमी इंद्रीय निग्रहाकडे असावे. कोणत्याही प्राण्याचे हनन करू नये. दुसऱ्याचा अपराध सहन करावा आणि निंदकाचेही कल्याण चिंतावे. आपली शांती कधीच ढळू नये. स्त्रियांचा संग सोडून साधुसंग धरावा. नेहमी एकांती बसून माझ्या रूपाचे ध्यान करावे. दास्यभावात आपला देह समर्पावा. गुरुभक्तीस सादर असावे. आळस झाडून टाकावा व माझे सेवेकरीता इंद्रियाचे चलन असावे. याप्रमाणे हे चोवीस गुण, अहंकाराधी सोडून जो अभ्यासील त्याचे हृदयास घर करून मी राहीन. योगी लोक फार काळ शिणतात आणि नाना मार्गांनी माझा शोध करतात, परंतु मी त्यांना सापडत नाही. माझ्या प्राप्तीचा मार्ग मी तुला सांगतो. अपेक्षारहित माझ्याशिवाय सर्व विषय ज्याला ओकाप्रमाणे वाटतात त्याला माझी प्राप्ती होईल. सर्व तळमळ सोडून जो केवळ माझाच विचार करतो त्यास माझी प्राप्ती होते. कोणत्याही प्रसंगी शांती व समाधान ठेवावे. तसेच देहाचे कोणतेही दुःख केव्हाही मनात आणू नये. नेहमी सर्वांशी निर्वैर असावे व कोणाचेही गुण दोषाचा विचार मुळीच करू नये. कोणतीही भेद, बुद्धी न ठेवता

शि व चि द म्ब र

सर्व ठिकाणी ब्रह्म आहे असे समजून समत्व भाव ठेवावा. याप्रमाणे जो वागतो त्याचे आलिंगन घेण्यास मी त्याला शोधतो. मला सर्व सुलभ आहे पण वर सांगितल्याप्रमाणे पंचगुणात्मक भक्तांचा लाभ मला दुर्लभ आहे व त्याकरिता मी जन्म घेतो. प्रत्येक युगात धर्महानी होताच उच्च-निच याचा विचार न करता मी नाना अवतार घेऊन धर्मस्थापना करतो. मी आनंदरूप होऊन संतुष्ट तेजोरूप असंग व अद्वैतरूप होऊन निर्गुण सुख भोगण्याकरिता देव व भक्त होऊन असा निराळा होतो. म्हणून निष्काम भक्तीचे मला प्रेम वाटते. ब्रह्मा, विष्णू आदि देव मला इतके आवडत नाहीत जितके निष्काम भक्त आवडतात. माझे हृद्गत जाणून जे माझे भजनास तत्पर असतात, त्यांना मी दिवसा व रात्री वश होतो. मी सांगतो ते एकाग्र चित्ताने ऐक. विषयातून आपले चित्त सोडून माझे गतरूपाचे स्मरण करून अहंकार विसरून जे मला नेहमी आठवतात. ज्याप्रमाणे रानातून एकटा जात असता दुरून वाघास पाहताच भिऊन सर्व लाज सोडून मोठमोठ्याने ओरडतात. तसेच लोकलज्जा सोडून मृत्युरुपी वाघाचे भय दूर होण्याकरिता मोठ्या करुण स्वराने मला आळवतात त्यांचे नेहमी मी रक्षण करतो. त्यांची सर्व संकटे निश्चितच दूर करतो व मी उमापती त्यांचा पाठीराखा होतो. हे तुझी शपथ घेऊन सर्व सांगतो. मी सर्व भार सहन करतो व करूण स्वर ऐकताच गडबडतो आणि जेथे भक्त आहेत तेथे धावत येऊन भक्तांचे मनोरथ पुरे करतो. भक्तांचा करूण स्वर ऐकताच माझा मला विसर पडतो व माझे शिरी त्यांचा भार घेऊन प्रेमानंदाने मी नाचतो. हे कवीराया, याचा हेतू तू ऐक. ८४ लक्ष जन्मात नरजन्म दुर्लभ आहे. ज्याला निश्चितच सर्व भोग भोगावे लागतात. हेच मुख्य होय. तो दुर्लभ असा नरदेह लाभून देहास तुच्छ लेखून व सर्व मोहांचा संग सोडून मला रात्रंदिवस भजतो त्याप्रमाणेच मीही तसाच होऊन रात्रंदिवस त्याला सांभाळतो. हे मी तुला त्रिवार सत्य असे सांगतो, त्याशिवाय मी कोणत्याही सुखाकडे बघत नाही. आता जास्त बोलणे कशाला माझी हीच गुह्य गोष्ट आहे की, भक्ताशिवाय माझा वेळ जात नाही. व त्याच्यावाचून मला सर्व शून्य वाटते. मी भक्ताचे अधीन असतो व त्यांची इच्छा पूर्ण करण्याकरिता नाना अवतार घेतो व लहानपण स्वीकारतो. अर्जुनाचे घोडे मी जुंपले, द्रौपदीचे जोडे राखले, जनीसंगे दळण दळले व नामदेवाचे उष्टे खाल्ले. तसेच एकनाथाचे घरी नोकराप्रमाणे राबलो आणि इतर बऱ्याच भक्तांचे घरी नाना प्रकारचे काम केले. याकरिता माझे वचन हृदयी दृढ धरून भक्तिमार्गाचे आचरण स्वत: करून लोकांना उपदेश कर. तू

माझा वरिष्ठ असा भक्त आहेस आणि तुझे वचनी एकनिष्ठ राहिल त्याचे कष्ट मी दूर करीन. भक्तवर्या, ही गोष्ट तू सत्य जाण. तू जे माझे स्तोत्र रचले आहेस ते जे नर वाचतील, त्यांची कामना कितीही कठीण असली तरी मी पुरवीन, हाच माझा निर्धार आहे. रोज भक्तानंद लहरी पठण करणाऱ्यास मी पूर्ण अन्न देतो. कलीचे योगाने भक्ती मार्ग लीन झाले आहेत, त्या करिताच माझा अवतार आहे.'' याप्रमाणे त्या शिवशास्त्र्यास निरोप देऊन चिदंबर अनुष्ठानास गेले व तो शिवशास्त्री गुरुपदेशाने सिद्ध झाला. चिदंबर कृपा अतिशय सोपी आहे. ज्याचे नुसत्या स्मरणानेच पाप जळते. भजणाऱ्यास मार्ग सोपा असा आहे की, नेहमी चिदंबर नाम जपावे. ज्याला इहपर चाड आहे त्याने चिदंबर जोड करावी. त्यामुळे प्रपंच गोड होतो.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय सतरावा

वाघरूपाने चोराचा नाश

।।श्री शिव चिदम्बराय नमः।।

।।श्री गणेशाय नमः।। हे भक्तकैवारी चिदंबरा, तुला नमन असो. शुभ्रवस्त्रधारी बुद्धिप्रकाशा, तू अमृतकलश भरून हाती धरतोस व जगाचा उद्धार करण्याकरिता जगी-वर्ततोस. सर्वांचे अंतरी तुझा वास आहे. हे चित्प्रकाशा, तूच सर्व ठिकाणी आहेस. तरी माझे हृदयी वास करून हा ग्रंथ सुरस असा कर. मी स्वतः अत्यंत जड आहे आणि तूच जड व मूढ नाचवतोस तेव्हा ग्रंथकर्ता खरोखरी तूच आहेस. परंतु भक्तांचे लाड तू पुरवतोस. तुझे केवळ स्मरणानेच सर्व सिद्धी प्राप्त होतात व भक्तांना सद्बुद्धी देऊन तू निजपदी बसवितोस. सर्व ब्रह्मांड गोल हिंडून तू सर्वांची इच्छा पुरवितोस. तरी हे हृषिकेशी, तुला उपमा काय द्यावी. तुजसारखा कोणीच नाही. ज्ञान, औदार्य, दातृत्व, कौशल्य, धैर्यप्रिय वक्तृत्व हे पूर्णपणे तुझे ठायी आहे. तसे त्रिभुवनात कोठेही सापडणार नाही. हे पूर्णब्रह्मा, सर्वेश्वरा, चिदंबरा, तुझे वर्णन करण्यास वेदही समर्थ नाहीत. म्हणून तेही मौनावले मग मानव कसा समर्थ होऊ शकेल? परंतु भक्तिभाव धरून तुझे किंचित वर्णन केले तरीही तू संतुष्ट होतोस. जनक जरी पंडित असला तरी त्याला लहान मुलांचे अबद्ध बोबडे बोल ऐकून आनंद होतो. नाही तरी तुजसारखा गुणनिधी कोठे आणि मी मंदमूढ कोठे? समुद्रपार करण्यास जसा मासा किंवा चिलट झटतो. त्याप्रमाणे हे माझे साहस खोटे आहे. तरी हे चिदंबरा, तू माझे हे ( श्री शिव चिदंबरेश्वराय नमः) खोटे साहस पुरे कर व माझे अपराधास क्षमा कर. तू चिंतितार्थप्रद असताना मग मला भय कसले? नेहमी प्रेमळ याचक चिदंबराकडे येऊन केवळ दर्शनाने आपले मनोगत सफल होऊन आपले घरी परत जात असत. एके दिवशी एक दरिद्री असा ब्राह्मण गुरुजवळ आला. त्याला पाहून व मंद हसून त्याला चिदंबराने विचारले की, ''तू काय इच्छा धरून हे विप्रशिरोमणी येथे आला आहेस ते मला सांग.'' त्या विप्राला हे गुरुवचन ऐकून समाधान झाले व त्याने भक्तिभावाने वंदन केले आणि मोठ्या विनयाने प्रार्थना केली की, ''हे स्वामीराया, मला फार दारिद्र्य आले असून बरेच कष्ट पडतात. घरी कुटुंबही मोठे आहे, त्यांचे पोषण करण्यास मी दरिद्री

अत्यंत थकलो आहे. रोज मुलांना पोटभर अन्न मिळणेही दुर्लभ आहे, असे माझे हीन भाग्य आहे. तेव्हा मुलांची लग्ने वगैरे मी कशी करणार असा तळमळत असता हे दिनदयाघना तू निव्वळ कल्पवृक्ष आहेस असे तुझे यश का आले म्हणून मी तुझे पदकमलास शरण आलो आहे. हे सर्वज्ञा, तू सर्व जाणतोस, तरी हे कनुवाळा, तू मला तार व माझी हळहळ नाहीशी कर.'' त्या विप्राची ही दीन वाणी ऐकून तो कैलासपती तुष्ट झाला व म्हणाला, ''आजपासून तू चिंता सोड आणि आनंदाने येथे प्रसाद ग्रहण कर.'' हे ऐकून तो विप्र सर्व चिंता विसरून स्नान करून आला व पंक्तीस जेवण्यास बसला. तेथे ते प्रसादान्न तो यथेच्छ जेवला. ज्या अन्नाची रुची बघून देव सुद्धा म्हणत की, 'यापुढे अमृतसुद्धा तुच्छ आहे आणि ज्याचे सेवन केले असता मनुष्य निरिच्छ होतो.' याप्रमाणे जेवून तो विप्र चिदंबराजवळ आला. स्वामींनी त्यास जवळ बोलावून एकांत स्थानी नेले व त्याला म्हणाले की, ''हे विप्रा, मी एक गरीब ब्राह्मण आहे. तुझ्या हिताकरिता मी जे काही देईन ते त्यावर भाव ठेवून आपल्या घरी न्यावे.'' असे बोलून त्याचे पदरात मातीचा ढीग घालून घट्ट गाठ बांधली आणि त्याला सांगितले. घरी गेल्यावरच गाठ सोड. माझे वचनावर विश्वास ठेवून हे आपल्या घरी नेऊन ठेव व हे तू ऐकलेस तर तुझे कल्याण होईल, तो घरी जात असता अविश्वासाने त्याने मनात म्हणले की माझे दुर्दैव आहे, लोक म्हणतात की, दीक्षित दानशूर आहे, पण मला मातीचा मोठा खडा दिला आणि याने मला पुष्कळ संपत्ती मिळेल व माझे दारिद्र्य दूर होईल. असे कसे होईल? यामुळे मला एक मात्र फळ मिळाले, की डोक्यावर हे ओझे वाहून माझे डोके मात्र दुखेल. यापेक्षा दुसरे तिळभरसुद्धा फळ मिळेल काय? असा दुर्विचार मनात करून घरी जाण्याचे अर्धमार्गावरच त्याने गाठ सोडून पाहिली. तेव्हा त्याला गुरुची करणी प्रकट झालेली दिसली. ती अशी की, त्यात अर्धी माती होती व अर्ध्या मातीचे सोने झालेले होते. हे पाहताच तो विप्र मनात दचकला. सर्व अंगावर रोमांच उभे राहिले की स्वामींनी अनुग्रह पूर्ण केला होता पण माझे दुर्दैवाने मध्ये अडविले. माझा विश्वास बसला नाही. स्वामींनी मला विशेष सांगितले होते पण माझ्या दुर्दैवास माज असताना मला सुख कसे होईल? गुरुने माझे दारिद्र्य वन अनुग्रहाच्या शस्त्राने पूर्णपणे छेदले होते. परंतु दुर्विचार पावसाने मी मुद्दामच हे वन पुन्हा वाढविले. सर्व रोग हरण करणारी मात्रा देताच मूर्ख लोक ज्याप्रमाणे अपथ्याने मरतात, त्याप्रमाणे मला झाले आहे. कामधेनू घरी आली असता काही विचार न करता तिला लाथा मारून बाहेर हाकलले, त्याप्रमाणेच





शिव चिदम्बर

मला हे झाले आहे. कल्पवृक्षाचा अंकुर अंगणात दिसताच तो हिंगण म्हणून उपटून फेकला. तसेच चिंतामणी लाभताच काच म्हणून उकिरड्यावर फेकून दिला. हे दयासागरा, दिनानाथा, करुणासागरा, दिगंबरा, माझ्या दुष्कृतीची मला क्षमा करा. हे स्वामीराया, मी अपराधी आहे. नंतर पुन्हा गाठोडे बांधून डोक्यावर घेऊन तो धडपडीने गुरुपद पाहण्याकरीता धावत निघाला. शंकर म्हणून श्वास सोडत शिवशिव असे उच्चारीत गुरुपुरात आला. लगेच गुरुचरणी साष्टांग नमस्कार करून तो विप्र प्रार्थना करू लागला की, "हे दयाळा, मला तू तार." तेव्हा चिदंबर म्हणाले, "हे विप्रा, सर्व क्षेम आहे ना? आनंदाने येथून जाऊन ताबडतोब परत का आलास? हे मला सांग." असे गुरुवचन ऐकून त्याचे सर्व अंग रोमांचाने भरले. दोन्ही डोळे पाण्याने भरले व अर्धवट बोलू लागला, "हे सर्वज्ञा करुणाकरा, शंकरा, मी अविश्वासी व दुष्ट आहे, तरी हे सर्वेश्वरा मला तार. मी आपल्या कर्माने यमपुरी निघालो आहे. दुर्दैवाने दुष्ट कल्पना करून आपलेच नाक कापून दुसऱ्यास अपशकून करण्यास प्रवृत्त झालो. हे भक्तकैवारी, माझ्या हातानेच माझ्या पायावर दगड घालून मी दुसऱ्यावर अपराध टाकला. माझेवर अनुग्रह करून तू माझी बांधून दिलेली गाठ अर्धमार्गोतच मोहाने सोडली. तेव्हा मला अर्धी माती व अर्धे सोने दिसले. त्यामुळे मला आनंद झाला व तुझे पादुका पाहवयास आलो. तुझ्या आज्ञेचे उल्लंघन करून मीच अपराध केला आहे. तरी हे सर्वज्ञा, मला क्षमा करून हे दयासिंधू माझेवर कृपा कर." चिदंबराने त्या विप्राचे भाषण ऐकून तू मोठा भाग्यवान आहेस. तुला माती दिली असता तिचे बावन्नकशी सोने झाले. तरी याचा नीट सांभाळ कर व ही गोष्ट कोणाला कळू देऊ नकोस. हे सर्व घेऊन जा व लग्नादि कार्ये कर. निघताना तो विप्र पुन्हा म्हणाला की, "जसे हे सोने दिले आहेस, तसाच याचा मार्गात सांभाळ कर. कारण द्रव्यापाशी भय असते." तेव्हा स्वामी म्हणाले की, "हे विप्रा, शंकर हा भयनाशक आहे. तरी हे द्विजेंद्रा, निर्भय होऊन तू जा" असे म्हणून त्याला बोळावले. ब्राह्मण पुढे जाता अर्ध्या मातीचे सोने झाले आहे, अशी वार्ता चोहीकडे पसरली. हा वृत्तांत ऐकून दोन चोर चिदंबर महिमा वर्णित त्या ब्राह्मणाबरोबर चालू लागले व आपल्याला सोबत मिळाली म्हणून त्या ब्राह्मणाला आनंद झाला. मासा पकडण्याकरिता जसे बकध्यान असते आणि हरीण मारण्याकरिता शिकाऱ्याजवळ गायन असते. उंदीर धरण्यास जसे मांजर बसते, तसे त्यांची कपटाची संगत होती. या कलियुगात कपटी लोक दुसऱ्याचे वित्तहरण करण्याकरिता तोंडाने वेदान्तातील

वचन बोलतात त्याचप्रमाणे त्या द्विजालाही ही संगत होती. पुढे जाता घोर अरण्य लागले व ते चोर ब्राह्मणाचा प्राण घेण्याकरिता नग्न शस्त्र हाती घेऊन आले व ''आता तू कोठे पळून जाशील, थांब.'' असे ते त्या ब्राह्मणाला म्हणाले व त्याचे हात धरून दोघांनी ते सोन्याचे गाठोडे घेतले. मग शस्त्र उचलून वारंवार हालवू लागले, ज्यामुळे मृत्युभयाने तो ब्राह्मण कापू लागला, त्या विप्राने चोराचे पाय धरले व विनंती केली की, हे सर्व सोने घ्या मला सोडा. तेव्हा ते चोर म्हणाले की, ''तुला जर सोडले तर स्वामींना कळेल. म्हणून तुझा जीव घेतलेला बरा. स्वामींना हे वृत्त कळताच त्यांना शंकर वश असल्यामुळे आमचा घात होईल म्हणून तुझा वध केलेलाच बरा.'' हे ऐकून तो विप्र फार भ्याला व म्हणाला की, ''हे वर्तमान मी कोणालाही कळवणार नाही. तरी मला जीवदान द्यावे. तुमच्या मनात करुणा यावी.'' असे म्हणून त्या चोरांचे पाय धरले व सर्व देवांची शपथ वाहू लागला तरी त्यांना करुणा येईना व ते त्या द्विजास जीवे मारण्यास झटू लागले. एकाने त्याचे हात धरले व दुसऱ्याने शस्त्र उगारले. तो विप्र आक्रंदून म्हणाला की, मला फार तहान लागली आहे. तरी मला पाणी पाजून नंतर मारावे.'' अशी हात जोडून विनवणी केली. त्या चोरांनी विचार केला ठीक आहे. एकजण झाडावर बसला दुसऱ्याने त्याचे हात धरून त्याला दूर पाण्याजवळ नेले व म्हणाला की, ''हे विप्रा, लवकर पाणी पी.'' तो नग्न शस्त्र घेऊन तेथे उभा राहिला. तो विप्र पाणी पिताना चिदंबराचे स्मरण करू लागला, ''हे कृपासिंधू चिदंबरा, मी तुला वंदन करीत आहे. तू माझ्या दारिद्र्याचा नाश करशील म्हणून हे द्विजेंद्रा तुझ्या दर्शनाकरिता आलो तू माझे क्षेम केलेस व मी विश्रामधामास पोचलो. तुझे यश वाढू दे. तुझ्या कृपेने मी परमधामास जात आहे, माझी आपदा दूर करण्याकरिता हे स्वामीराया तू मला सुवर्णभार दिलास परंतु हे सखया शिवा तोच माझे प्राण हरण करण्यास तयार झाला. चिदंबरा, तू मातीचे सोने केलेस, मग माझे प्राण वाचविणे तुला काय कठीण आहे. पांडव लाक्षागृहात सापडताच तूच धावून त्यांना वाचवलेस मग मज अनाथांचे रक्षण करण्यास तुला का करुणा येत नाही. प्रल्हादास अग्नीत टाकताच तू धावून तो अग्नि शांत केलास. द्रौपदीने सभेत तुझे स्मरण करताच त्यावेळी तू तिचे ताबडतोब रक्षण केलेस. मगरीचे भयाने सरोवरात हत्तीने तुझे स्मरण करताच हे भक्तकैवारी, तू धावलास मग आता माझीच का उपेक्षा करतोस. तरी हे विश्वव्यापका, चिदंबरा, आनंदकंदा, करुणाकर मी आता एक शेवटचा नमस्कार करतो. माझा सांभाळ कर, तुझे पद्कमळ पाहून मी यमसदनास

निघालो आहे. दु:ख व तळमळ आता राहिली नाही.'' अशी विप्राने प्रार्थना करताच तो कृपाळू दीक्षितराणा भयंकर आवाजाने गर्जना करून त्या दुष्टांच्या नाशाकरिता वाघरूपाने आला. वाघाचा भीषण ध्वनी ऐकून ते चोर गडबडून मागे पाहू लागले. तोच वाघ आपले भीषण तोंड पसरुन त्यांचेजवळ आला होता. ताबडतोब शस्त्र घेऊन वाघ मारावयास तो चोर आला परंतु त्या वाघाने त्या चोराचा कंठ फोडला. ज्या झाडावर तो दुसरा चोर होता तेथे तो वाघ धावून गेल्यामुळे भयाने तो चोर कापू लागला व त्यालाही त्या वाघाने मारले. अशा रितीने चिदंबराने व्याघ्ररूपाने विप्रास चमत्कार दाखविला व स्वत: अंतर्धान पावले. त्याचे त्या विप्राला फार आश्चर्य वाटले. मग तो विप्र आनंदाने चिदंबर नाम:स्मरण करून पुढे निघाला व म्हणाला, ''हे ईश्वरा, तू पूर्ण अवतार आहेस. आणि या अनाथाचा तू प्राण वाचविलास.'' असा तो लीलाधारी सर्वेश्वर कलियुगात स्वामी चिदंबर म्हणून नित्यनूतन चमत्कार दाखवीत असे. ज्याला इहपर सुखाची चाड असेल, स्वर्ग व मोक्षाची इच्छा असेल त्याने चिदंबराचे पाय धरावेत.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।



शि व चि द म्ब र

# अध्याय अठरावा

बालमुखाने पंडित गर्वहरण

।।श्री शिव चिदम्बराय नम:।।

।। श्री गणेशाय नम:।। चिदंबराची कीर्ती सर्व दिशेस पसरली होती. ती ऐकून काशी क्षेत्राचे चार ब्राह्मण स्वामींकडे निघाले. मनात स्पर्धा व असूया धरून वटवट करू लागले की, कलियुगात ही सर्व लीला खोटी आहे. जसे सूर्यास बघून काजवे मनात जळतात किंवा तुळशीची पूजा केली असता जशी भांग संतापते किंवा गंगेचा खळखळाट ऐकून जसा लहानसा ओढा संतापतो अथवा कल्पवृक्षाचा प्रताप बघून शिंदीच्या झाडास कष्ट होतात, तसेच ते पुढे म्हणू लागले की पुराणात ज्ञानी लोकांनी सांगितले आहे की, काशी सर्व क्षेत्रात श्रेष्ठ आहे. तेथे प्रत्यक्ष विश्वेशांची वस्ती आहे व सर्व तीर्थांची माउली गंगा देखील आहे. या तिघांच्या दर्शनाने सर्व मुक्त होतात. असे काशी हे एवढे महाक्षेत्र असून दर्शनाकरिता तेथे यात्रिक न जाता दीक्षितांचे दर्शनाकरिता सर्व यात्रा जाते. कलीची सत्ता वाढली. असत्य हे सत्य वाटू लागले. पुण्याचे पायी वर्तन सोडून लोक पाप करू लागले. वेदांचा अनादर करून लोक कोकशास्त्र वाचू लागले. हरिहराची पूजा सोडून प्रेमाने भूत व झोटिंगाची पूजा करू लागले. गायत्री मंत्र सोडून शाबरी मंत्र जपू लागले. असे सर्व विचित्र झाले. कलियुगात लोक म्हणतात की, चिदंबराने अवतार घेतला आहे व तो नाना चमत्कार दाखवितो व तेथे बरीच यात्राही जमते. चिदंबराला बहुदा काही तरी देवता साधन झाले असता दूरदूरचे ठिकाणाहून तेथे यात्रा जमते पण जी पावन क्षेत्रे आहेत, तेथे लोक जात नाहीत. क्षेत्री देवाकरिता लोक जातात परंतु या ठिकाणी माणसाकरिता यात्रा जमते. हे किती नवल आहे असे कोठेही ऐकले नाही. ते काशी क्षेत्रातले चौघे ब्राह्मण म्हणाले, ''आपण दीक्षितांना स्वाधीन करून यात्रेकरूंसह काशीला आणू.'' ते चौघेही चौवेदी होते व अभिमानाने चिदंबर कसा आहे हे पाहण्यास निघाले. आपण चिदंबराशी वाद करू आणि त्याची परीक्षा करू, आमच्याशी वाद करण्याकरिता समर्थ असा वक्ता या जगात नाही अशी निंदा पंडित करीत असता तो गर्वहर्त्ती, उमारमण भस्मरुद्राक्ष व कलश धरून त्यांचे स्वप्नात आला व मधुर वाचेने बोलता झाला की,

शि व चि द म्ब र

''पंडितहो, माझी वार्ता ऐका. मी अनाथ असा गरीब ब्राह्मण आहे आणि गुरुपुरी राहतो. तरी मला सांभाळावे. आपण श्रम न घेता येथेच राहून या गरीब ब्राह्मणाचे हिताचे चिंतन करा. हेच तुम्हाला सांगतो.'' जागे होताच आपले स्वप्न एकमेकास सांगू लागले की अंगवस्त्र सर्वांगी भस्म व हाती कलश घेऊन ती सुमंद हास्यवदनी अशी तेजोमूर्ती पाहताच मन निवाले व म्हणाले की, ''मी गरीब ब्राह्मण असून माझे नाव चिदंबर आहे. याच जागी राहून माझे हित चिंता असे स्पष्ट म्हणाले. तरी स्वप्नाचा गूढार्थ त्या पंडितांना कळला नाही. असे स्वप्न त्या चौघांनाही नेहमी पडू लागले व त्यांना आश्चर्य वाटले व त्वरेने चिदंबराला भेटण्याकरिता मार्ग क्रमू लागले. इकडे चिदंबर लोकांना सांगू लागले की, ''काशीचे थोर पंडित माझी परीक्षा घ्यावयास येत आहेत. तरी त्यांना राहण्याकरिता योग्य असे घर बघून ठेवावे.'' ते पंडित गावाजवळ एका कोसावर आले व तेथेच एका बागेत उतरून जेवण करून संध्याकाळी चिदंबराकडे जाण्याचा त्यांनी विचार केला. स्नान व देवपूजा करून ते पंडित ध्यानस्थ बसले. तोच तेथे चिदंबर प्रकटले. परंतु त्या पंडितांनी त्यांना ओळखले नाही. सर्वांना नमस्कार करून स्वामी त्यांच्याजवळ उभे राहिले. पंडितानी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहताच त्यांचे हाती रम्य असा कलश पाहिला. दोन शुभ्र वस्त्रे व अंगी भस्म रुद्रांचे भूषण व चंद्र-सूर्याप्रमाणे नेहमी तेजस्वी प्रकाशणारा, सुमंद हसणारा असा तो शामसुंदर व त्याचे सर्व अंग अतिशय सुकुमार असे पाहून ते पंडित म्हणू लागले की, हा रमावरच येथे आला आहे काय? कामजनक की कामहर आम्हाला हा विश्वेश्वर भेटला आहे किंवा हा शिवावतार चिदंबरच आहे काय? हाच नेहमी स्वप्नात येतो व या अनाथ गरिबाला सांभाळावा म्हणतो तेव्हा याला त्याचे नाव विचारू असे म्हणून त्याला विचारले. त्यांनी सांगितले की, ''माझे नाव चिदंबर असून मी गरीब तुमचे दर्शनाकरिता आलो आहे.'' व मधुर वाणीने पुढे म्हणाले की, ''तुम्ही समर्थ असे दुरून आला आहात. मी एक गरीब ब्राह्मण तुमच्या भेटीसाठी आलो आहे.'' निदाभिमानाने तो विश्वंभर आपले नाव सांगताच ते पंडित त्वरित धावून पुढे आले व म्हणाले की, ''आपण जर चिदंबर असाल तर आमचे थोर असे मनोरथ फळाला आले.'' व प्रखर अशा संस्कृत भाषेत पूर्वपक्ष करू लागले. ही पंडितवाणी ऐकून जो सर्वांचा गर्वहरण करतो त्याने मोठ्या विनयाने सांगितले की, ''ही देवांची भाषा मला अपरिचित असून मी अज्ञानी आहे. तेव्हा पंडित म्हणाले की, ''आपली कीर्ती ऐकून आपली परीक्षा पाहण्यास आम्ही फार दुरून आलो आहोत.'' तेव्हा स्वामी म्हणाले की, ''मी एक गरीब ब्राह्मण आहे. मला काही कळत

शि व चि द म्ब र

नाही.'' तेव्हा पंडीत म्हणाले की, ''तुम्ही अवतारी आहात म्हणून तुमचे भेटीकरिता येथे दाट यात्रा भरते आणि काही कळत नाही म्हणून आपण म्हणता तरी याची प्रचिती आम्हाला डोळ्यांनी दिसू यावी.'' तेव्हा दीक्षित हसत बोलले की, ''मी काय करू? मी दरिद्री आहे. असे सांगूनही लोक माझे न ऐकता येथे येतात.'' तेव्हा पंडित म्हणाले की, ''कसेही करून आमचे बरोबर वाद करावा व त्याचकरिता आम्ही येथे आलो आहोत.'' दीक्षितांनी विनयाने त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. बहुत प्रकारे बोध केला परंतु ते गर्विष्ठ मायेने मोहित झालेले काही ऐकेनात. ते आवेशाने म्हणाले, ''एक तर आमचेशी वाद करावा किंवा सर्व यात्रेसह आमचे बरोबर श्रीक्षेत्रास यावे. विचार करून काय ते ठरवावे. आम्ही निर्भय असे वादी आहोत आणि वेदशास्त्राचे हृदय जाणतो. आमचे पराजय त्रैलोक्यात कोणी करणार नाही.'' त्या पंडीताची ही गर्विष्ठ वाणी ऐकून स्वामी म्हणाले की, ''आपले सांगणे असे निश्चित आहे ना त्याची प्रचिती पाहून बोलावी. विद्याविनयसंपन्न असा ब्राह्मण सर्व ठिकाणी पूज्य होतो व वेद अनंत असून त्याला वेदोनारायण असे म्हणतात. सर्व वेद जाणणारा सर्वज्ञ असा फक्त शंकरच आहे आपण वेद जाणणारे असे सर्वज्ञ नारायण आहात. तेव्हा सर्वज्ञांची आज्ञा जीवांचे हातून कशी उल्लंघन होईल? सर्वज्ञांचे दर्शनाने मी धन्य झालो. आपली इच्छा पूर्ण होणार हे मी त्रिवार सत्य सांगतो.'' असे म्हणून तो कृपासागर हसू लागला. तोच तेथे एक विप्रांगना कडेवर मुलाला घेऊन धावत आली व स्वामींचे पाया पडली. तिला उठवून तो कृपाधन म्हणाला, थोडा वेळ येथे बसावे व त्या बालकास पुढे बोलावून बसवले. त्यांचे हाती चार केळी होती ती बाळास प्रसाद म्हणून दिली आणि त्याने ती मोठ्या प्रेमाने खाल्ली. प्रसाद भक्षण करताच तो सर्व विद्याविशारद झाला. ज्ञानमूर्तीची सुरेख कृपा होताच काय कौतुक होणार नाही. बाळाने गुरुचे पायास वंदन केले व हात जोडून मोठ्या विनयाने संस्कृत भाषेत 'मला काय आज्ञा आहे ती सांगावी' असे म्हणाला. तो सर्वज्ञ त्या बाळास म्हणाला की, ''संस्कृत भाषा मला येत नाही जर तू माझी आज्ञा मागत असलास तर तुला माझी अशी आज्ञा आहे की काशी क्षेत्रीचे हे थोर ब्राह्मण परीक्षा घ्यावयास आले आहेत, तरी तूच परीक्षा द्यावीस आणि वेद म्हणून दाखवावे.'' तोच ते बाळ चारी वेद म्हणू लागले व पंडितांना सविस्तर असा प्रश्न केला. श्रुतीशास्त्री आपला वाद कोठे आहे तो होऊ द्या. भिऊ नका. हे बालक काय वाद करील अशी तिळभरही शंका धरू नका. असे म्हणून संस्कृत भाषेत शास्त्राचा विचार करू लागला. बाळ मुखाने शास्त्रवाद ऐकून ते पंडित सद्गत झाले व म्हणाले की, ''ईश्वरी

कळा अगाध आहे. आम्हाला मोठा अपराध घडला आहे.'' दोन्ही हात जोडून सारखे साष्टांग नमस्कार करू लागले व म्हणाले की, ''ईश्वरी अवतार प्रकट झाला आहे. आम्ही फार अन्यायी आहोत. या कलियुगात चिदंबर हा सगुण ब्रह्म आहे. ज्याच्या दर्शनाने मोक्ष सोपा आहे आणि त्याला छळण्याकरिता आम्ही आलो. हे अनुचित असे दुष्कर्म आमचेकडून घडले. हे स्वामी, सर्वोत्तमा, आमच्या हातून घोर अपराध घडला आहे. आम्हाला स्वामींचा महिमा कळला नाही तरी आमच्या अन्यायास क्षमा करा. चार वर्षांच्या बालकाकडून तुझे कृपेने चारी वेद बोलावलेस. हे करुणावंता, आमच्या अपराधाची क्षमा कर.'' तेव्हा तो दयासागर म्हणाला, तुम्ही काशी या थोर क्षेत्राचे ब्राह्मण आहात. तुमचे मुखाने नेहमी वेदोच्चार होतो. त्या योगे मला समाधान होते. कृपा करून दूर देशातून तुम्ही माझे भेटीकरिता आला आहात असे त्यांचे समाधान करून मोठ्या आनंदाने त्यांना आपले घरी आणले व मोठ्या सन्मानाने काही दिवस ठेवून घेतले. नंतर त्यांना वस्त्रे भूषणे देऊन त्यांना निरोप दिला व म्हणाले, ''आपण मला काशीला नेण्याकरिता आला होता. मी थोड्या दिवसांनीच तेथे येईन. काशीला महायात्रा असते तरी माझ्यावर दया ठेवावी.'' ते पंडित मोठ्या आनंदाने काशी क्षेत्रास परत आले व तेथे चिदंबर हा पूर्ण अवतार आहे, अशी कीर्ती वाढवू लागले व आपण सुखरूप पोहोचल्याचे पत्र स्वामींना पाठवले आणि महावस्त्र व पितांबर चिदंबराचे चरणी मोठ्या आदराने पाठविले. आपले दर्शनास पुन्हा येतो, असे पत्र त्यांनी पाठविले. ते शास्त्री पंडितांनी स्वामींना वाचून दाखविले. पत्र ऐकून स्वामींनी त्या ब्राह्मणास महावस्त्र दिले व माझा निरोप आल्यावर तुम्ही यावे असा निरोप पाठविला. असे नाना तऱ्हेचे पत्र आणणारा या सृष्टीवर चिदंबर दाखवित असे. त्याची कीर्ती कोठवर करावी? या धरणीमातेचे पत्र करून समुद्राची शाई करून कल्पतरूची लेखणी करून लिहिले तर शारदेसही ते जमणार नाही. तू बालमुखाने वेद बोलावलेस तर प्राकृत भाषेत मला बोलावण्यास काय अगाध आहे. चिदंबर लीला दिसत असते व अज्ञ लोकांना भ्रम पडत असे. भाविक नारी-नर ज्यांना अपार लीला दाखवीत असे. चिदंबरास शरण जाताच अनासायेच ब्रह्मपद मिळते. तरी लोकहो, चिदंबराचे नेहमी भजन करा.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||

# अध्याय एकोणीसावा

गयेला हजार रुपयांचे दान

|| श्री शिव चिदंबराय नमः ||

|| श्री गणेशाय नमः || हे चिदंबरा, तुला शरण येताच तू श्रम व अहंकाराचा नाश करतोस आणि निजानंदी थारा देतोस. हे दयासागरा, मी तुला शरण आलो आहे. माझे मनोरथ पूर्ण कर आणि हे समर्था, तुझे सुरस असे चरित्र वदव. ज्याचे केवळ श्रवणाने लोक पुनित व्हावे असे चिदंबराचे हे चरित्र भवरोग रसायनच आहे. मागे सांगितल्याप्रमाणे महास्वामींनी मी काशीयात्रेला येईन असे त्या पंडितांना सांगितले. तेच कथासार आता तुम्हास सांगतो. त्या सर्वेश्वराची करणी कोणासही कळत नाही. त्याचा महिमा कोण वर्णू शकेल. गुरुचे प्रकट व गुप्त कौतुक बघून असे वाटते की, या कलियुगात कृतयोगाप्रमाणेच झाले आहे. नेहमी महात्मलीला होत असे. लोकांत यश पसरू लागले व ते पाहवयास सुरवर सहपरिवार गुरुपुरास येऊ लागले. यात्रिकांचे संतोषार्थ आपुले वास्तव्य गुरुपुरातच करून श्री गुरु विचित्र व अमानवी असे चरित्र रोज दाखवित असत. श्रीराम कृष्णाचे चरित्राप्रमाणे दीक्षितही महिमा दाखवत असे. ज्याचे श्रवणाने कलिदोष नाहीसा होतो असा हा लीलाधारी चिदंबर होता. कलियुगात लोक मतिमंद झाले आणि ते कुटिल असा अनीश्वरवाद बोलू लागले की, रामकृष्ण लीला कोठे अगाध आहे? ग्रंथ व ज्ञानी लोक काहीतरी बरळतात. दुर्वृत्त लोक स्वेच्छेने अशी बडबड करीत असत. म्हणून त्यांचे विश्वासाकरिता गुरुलीला प्रकट करीत असत. भक्त चकोरांना पूर्णचंद्र असा तो लीलानाटकी चिदंबर प्रत्यक्ष गुरुपुरी दिसत असून त्याने काशीला येऊन विधियुक्त काशीयात्रा केली. अपरिमित अन्न, दक्षिणा व दान क्षेत्रस्थ ब्राह्मणांना करून गयेला मनोवेगाने आले. शास्त्रोक्त असा गयाविधी करून आपले सिद्धिने कौतुक दाखविले व ब्राह्मणाराधन सुरू केले व अपार दान व दक्षिणा दिले. अशी गयायात्रा करून सत्पात्र ब्राह्मणांना वस्त्र, पात्र देऊन नारीनर तृप्त केले. पुरोहितांना बोलावून त्यांना विचारले की, "तू बरेच द्रव्य मला दिलेस. ते किती झाले ते सांग." तेव्हा पुरोहिताने यादी आणून हिशोब केला. तो एक लक्ष रुपयाचा झाला. सद्गुरुनी हिशोब पाहून पुरोहितास कलशातून पाच मुठी रुपये दिले. ते

मोजून पाहता एक हजार कमी भरले. तेव्हा त्या पुरोहितास चिदंबराने स्वत: पत्र लिहून दिले. ते पाहून लोकांना आश्चर्य वाटले की, पाच मुठी रुपयाने एक लक्ष रुपये कसे भरले. ही धरणीमाताच रुपये देऊ लागली की चिदंबर करणी प्रकट झाली की लक्ष्मी प्रसन्न झाली म्हणून रुपये वाढले. मोजणाऱ्यांचे हात थकले आणि ठेवायास जागा राहिली नाही. इतके रुपये जिकडे तिकडे भरले. लोक म्हणू लागले की, हा नर नसून रमापतीच आहे. म्हणूनच नवविधी यास दश आहेत. माणसाला हे करणे केवळ अशक्य आहे. याचे औदार्याचे काय वर्णन करावे. याचे दातृत्व व वाङ्माधुर्य पाहता हा निश्चितच उमारमण दिसतो यात मुळी शंकाच नाही. यासारखी यात्रा मागे कोणीच केली नाही व पुढेही कोणाकडून होणार नाही. अशा तऱ्हेने लोक नाना स्तोत्रे करू लागले. नंतर चिदंबराने पुरोहिताला बोलावून सांगितले की, मी आता माझे घरी निघालो तरी आपण मजवर अनुग्रह करावा आणि माझे गावी येऊन मी तुमचे कर्ज फेडीन. त्यानंतर दोन महिन्याने तो पुरोहित गुरुपुरास येऊन स्वामीस भेटला व नमन करून बसला. तेव्हा चिदंबराने विचारले की, आपण कोण व कोणते आहात? आपले नाव काय व आपण पुढे कोठे जाणार? हे गुरुवचन ऐकून तो पुरोहित हसून म्हणाला, "आपण मला विसरला काय? मी तुमचा गयेचा पुरोहित आहे. आपणाला येथे येऊन दोन महिने झाले आणि इतक्यातच आपणाला भ्रांती पडली याचे मला आश्चर्य वाटते. आपण यात्रेकरिता एक लक्ष रुपये खर्च केले तरी हे स्वामीराया माझे हजार रुपये द्यावेत." हे ऐकून स्वामी हसून बोलले की, "सभाजनहो ऐका, हा ब्राह्मण काय म्हणतो? मी यात्रा कधी केली? या ब्राह्मणाचे धैर्य खरोखरच मोठे आहे की हा एक हजार रुपये मागत आहे." हे दीक्षित वचन ऐकून पुरोहित काही न बोलता गयेला असताना चिदंबराने दिलेले पत्र काढून सभाजनांसमोर ठेवले. स्वामींचे हस्ताक्षर पाहून लोकांना आश्चर्य वाटले व मौन धरून चमत्कार पाहू लागले. चिदंबराची कळा कोणालाही कळत नसे. ते जे अगाध लीला दाखवित खरे किंवा खोटे हे कोणालाही निश्चित कळत नसे. स्वामींनी दिवाकराला बोलावून मंद हसून त्यांना सांगितले की, "त्या गया ब्राह्मणाला ताबडतोब एक हजार रुपये दे. यात्रेला गेलो असताना त्याचे एक हजाराचे देणे राहिले आहे. माझे सहीचे तो पत्र दाखवीत आहे, तेव्हा ते दिलेच पाहिजे." त्यावर दिवाकर दिक्षित संतप्त होऊन रागाने म्हणाले की, "हा पुरोहित खोटे बोलतो आहे. आपण याच गावी असून आपणास यात्रा केव्हा घडली? हा पुरोहित खोटा आहे व त्याला शिक्षा

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

करावी.'' तेव्हा महास्वामी त्या पंडीताला म्हणाले की, ''काहीच मूळ नसता खोटे मागणे कधीच होणार नाही. तरी हे दिवाकरा, माझे सहीचे पत्र पुरोहिताने दिले आहे, त्याला मान देऊन एक हजार रुपये दे.'' तेव्हा दिवाकर म्हणाला, ''असे देत असाल तर कित्येक ब्राह्मण येथे येतील त्या सर्वांना किती रुपये द्याल?'' तेव्हा चिदंबराने दिवाकरास प्रश्न केला की, ''ब्राह्मण असे आचरण करतील काय? जीव नसताना हा देह स्वत: किंचितही नाचेल काय? बीजावीणा अंकुर, वृक्षावाचून फळे, गर्भ नसताना पुत्रजन्म याचा कोण नेम सांगेल? नवरी नसता लग्न कोणता शहाणा मांडेल? अत: असे काही कारण असल्याशिवाय हा ब्राह्मण कसे मागेल?'' असे चिदंबराने म्हणताच ब्राह्मणाला एक हजार व वस्त्रालंकार देऊन गयेस परत पाठवले. असा रोज नवीन महिमा दाखवून तो चिदंबर लोकांना सन्मार्गाला लावीत असे. ज्याचे नुसते स्मरणाने लोक भवभयातून मुक्त होत असत. अनेक जन्माचे पुण्य पदरी असल्यासच चिदंबरावर विश्वास बसत असे. नुसते चिदंबर स्मरणाने लोक ताबडतोब पुनित होत. रोज यात्राजनांची दाटी होत असे. त्याची गणना केवळ तो जगजेठी चिदंबरच जाणू शकतो. एके दिवशी एक विधवा आपले दोन मुलांसह स्वामी दर्शनाकरिता आली. स्वामींना दुरून पाहून तिने साष्टांग नमस्कार घातला. स्वामींनी तिला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद दिला. हे ऐकून सभाजन हसू लागले व म्हणाले की, ''स्वामी विधवेला पुत्र कसे होतील?'' हे ऐकून स्वामींनी सांगितले की, ''माझे तोंडून सहजच ही वाणी निघाली. तरी हे वचन सत्य करण्याकरिता उमारमण समर्थ आहेत. याविषयी कुणीच मनात शंका धरू नका'' व ब्राह्मण विधवेस कुंकू लावण्यास सांगितले. तिच्या मनातील संशय पाहून स्वामी म्हणाले की, ''तुझा भ्रतार तीर्थयात्रेस पाठविला आहे, तरी संशय सोडून तू कुंकू लाव.'' तेव्हा तिने विनवणी केली की, ''माझा भ्रतार माझे घरी खरोखरच मेला व स्वत:चे हाताने मी त्याचा अंत्यसंस्कार केला तरी मी कुंकवाचा स्वीकार कसा करू? स्वामींचे वचन पालन व धर्मसंरक्षण एकाच वेळी कसे करू?'' म्हणून तिचे मन संदिग्ध झाले. तेव्हा चिदंबर म्हणाले, ''निष्कारण शंका का घेतेस? तुझ्या घरी समंध होता. त्याचे दहन तू केलेस परंतु मी तुझा पती निश्चितच तीर्थयात्रेस पाठवला आहे. तू अर्धचंद्राप्रमाणे कुंकू लावून सुवासिनी गणात ताबडतोब बैस. शेष पृथ्वीचा भार सोडील. सूर्य थंड होईल परंतु माझे वचन केव्हाही व्यर्थ होणार नाही, तुझा भ्रतार मी तुला आणून देतो. आनंदाने कुंकू लाव.'' ती विप्रकांता अतिशय हर्षित झाली व

तिने कपाळभर कुंकू लावले नंतर त्या नारीने चिदंबरास विनंती केली की, ''स्वामी माझे पतीस माझे डोळ्यांनी केव्हा पाहता येईल.'' त्यावर चिदंबर म्हणाले की, ''तू एक वर्षभर स्वस्थ बैस. त्यानंतर तुमची भेट होईल. तू मूळीच चिंता करू नकोस.'' ती नारी स्वामीपाशीच राहिली. एक वर्ष होताच स्वामींना म्हणाली की, ''माझा पती दाखवा.'' त्या वेळी चिदंबराची कळा प्रकट झाली. सृष्टी स्थिती व लय ही लीला जो इच्छा मात्रे करतो त्या सद्गुरुला असाध्य काय? एक जटाधारी तेलंगी ब्राह्मण आपल्या खांद्यावर सुरेख अशी गंगा कावड घेऊन आला व गुरु पादुकांना वंदन केले. स्वामींनी त्या ब्राह्मणास विचारले की, ''आपले स्थान कोणत्या देशी आहे? आपल्याला बायका-पोरे आहेत का नाहीत ते मला सांगावे.'' ते स्वामी वचन ऐकून तो ब्राह्मण स्वामीस म्हणाला, ''स्वामी हे काय विचारता? हे शंकरा, माझा सर्व वृत्तांत तुम्हास ठाऊक आहे. लौकीकार्थ मी तुम्हास काय सांगू. तुझी लीला अघटित अशी आहे. एका क्षणातच तू सृष्टीची रचना करतोस, तुझ्या इच्छेने गवतही एका क्षणात मेरूसारखे होईल आणि जर तू वक्र दृष्टीने पाहिलेस तर एका क्षणात मेरूचे गवत होईल.'' तेव्हा मंद हसत तो जगन्नाथ म्हणाला की, ''ही पहा तुझी पत्नी व ही तुझी दोन मुले यांना घेऊन मोठ्या आनंदाने सुखाने प्रपंच कर. हे पतिव्रते, तू ऐक आणि आपले भ्रताराचे लक्षण पहा.'' मग तिने भ्रतारचिन्ह ओळखले व लज्जित होऊन खाली मान घातली. तेलंगी भाषेत दोघांनी स्तोत्र केले व अंगी रोमांच भरून मोठ्या आनंदाने नाचू लागले. सर्वजण जयजयकाराने गर्जना करू लागले आणि स्वामींना नमस्कार करू लागले. प्राकृत व संस्कृत भाषेत स्तवन करू लागले की, ''चिदंबर विजयी होवो, तुझा महिमा अगाध आहे. तू मेलेल्या ब्राह्मणास जिवंत केलेस, सुबुद्ध केलेस व तुझे नुसत्या श्रवणाने तू भवबंध तोडतोस. हे आनंदकंदा, तुला नमन असो. जो सर्वांचा अंतर्यामी आहे तोच तू आनंदधामी नाचतोस. ब्रह्मादिकांचा स्वामी होतोस तरी तुझे नामी आम्हास आवड दे. हे जगदाधारा, जगद्रुपा, पाण्यावरील लाटांप्रमाणे तू निराकार व निरंजन आहेस. हे सर्वव्यापका, दिगंबरा दोरी जशी सर्पासारखी वाटते आणि तो भ्रम निघून जाताच पुन्हा दोरीच दिसू लागते. तुझ्या रुपज्ञानाने जगभ्रमही शांत होतो. सर्व प्राण्यांच्या हृदयात नेहमी बोधरूप असा असतोस आणि अहंकार नासताच तू प्रत्यक्ष दिसतोस. हे सर्वसाक्षी स्वप्रकाशाकर्तुम अकर्तुम सर्वेशा, निर्लेपा, निरंजना, विश्वेशा आम्हा अनाथांना सांभाळ. तू ज्याचेवर कृपा करतोस तो तुझे सारखाच होतो. तुझेविण आमचे कष्ट निवारणारा हे नरहरी दुसरा कोण आहे?'' याप्रमाणे सर्व

लोक अपार स्तोत्र करू लागले व प्रत्यक्ष महिमा पाहून आनंदाने डोलू लागले. जो प्रत्यक्ष सद्गुरु पाय पाहतो, त्याचे भाग्य कोण वर्णन करील. ज्याप्रमाणे चित्रात सूर्य पाहिला तरी त्याचा प्रकाश लिहिता येणार नाही. याकरिता चिदंबरावर पूर्ण विश्वास ठेवून भवसागर तरून वेगाने मोक्षास जा. दिक्षित चरित्र रूपाने अमृताची पाणपोई आहे. ज्याला अमरत्व हवे असेल त्याने ते अमृत पोटभर प्यावे, चिदंबरतारक आहे व त्याला भजणाऱ्यास विशेष कष्ट न करिता ब्रह्मसुख लाभते.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय विसावा

पाण्याची उत्पत्ती

।। श्री शिव चिदंबराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। ज्याचे चरणनौकेचे आश्रयाने दुर्भाग्याचा समुद्र तरून जो परमपद पावतो त्या सद्‌गुरुंचे पाय आपल्या चित्ती धरा. एके दिवशी यात्राजनांसहित चिदंबर संगोळी गावात आले. हे ऐकून तेथील राजा दर्शनाकरिता आला. किंचित वेळ मला पहातिरी तो जगजेठी वास्तव करीत असे आणि रोज यात्राजनांची दाटी होत असे. चिदंबराच्या दर्शनाने सर्व शांत होत असत. पुढे वैशाख महिना येताच शुक्ल पंचमीस चिदंबराने त्याचे शंकर नावाच्या मुलाचे उपनयन आरंभिले. हा सोहळा चार दिवस झाला. ब्राह्मणमेळा व इतर आबालवृद्ध लोकांना श्रीप्रसाद सुलभतेने मिळाला. रोज असंख्य असे ब्राह्मण-संतर्पण होत असे. भात, सांबार, पक्वान्ने, पोळ्या, खीर, मांडे, श्रीखंड, वडे व लाडू सर्व ब्राह्मणांना यथेच्छ वाढले जात असे. असे जेवून ब्राह्मण आपापल्या घरी जात असे. याप्रमाणे समाराधना रोज वरचढ होत असे. एके दिवशी मध्यान्ही ब्राह्मण जेवावयास आले. पानात सगळे पदार्थ वाढले. तेव्हा कोठीचा अधिकारी येऊन चिदंबरास विनविता झाला की, ''सर्व पाने वाढली आहेत परंतु कोठीत तूप अजिबात नाही. तूप आणण्याकरिता बरेच सेवक गेले आहेत ते एक प्रहारानंतर येतील. स्वामी, मी आता काय करू? ब्राह्मण भुकेले बसले आहेत. पानात सर्व पदार्थ वाढले आहेत, परंतु तूप वाढण्याकरीता उशीर होत आहे. त्यामुळे ते मला शाप देतील. हे दीक्षितेंद्रा, कृपासागरा, माझ्यावर मोठे संकट आले आहे व सर्व नारी-नर मला शिव्याशाप देत आहेत. जेवणास उशीर होत आहे म्हणून माझ्या संकटाचे निवारण करावे. काहीतरी युक्ती मला सांगावी.'' त्याची करुण वाणी ऐकून स्वामी हसून म्हणाले, ''तू भिऊ नकोस. मी सांगतो तो उपाय करून पहा. येथे कोणाच्या घरी तूप आहे का पहा व आपले कार्य पूर्ण कर. आपले तूप आल्यावर त्याचे उसने फेडून टाक.'' तरी तो म्हणाला, ''हे भक्तकैवारी, एका दिवसात १०० घागरी तूप खर्च करील असा या गावात कोण समर्थ आहे? हे गाव लहान आहे व लोक गरीब आहेत. तेव्हा हे स्वामीराया शंभर घागरी उसने तूप कोण देईल?'' त्यावर दीक्षित म्हणाले

की, ''या गांवी एक नारी अशी समर्थ आहे. तिचे घरी सर्व वस्तू परिपूर्ण आहेत आणि ती याचकांचे मनोरथ पुरविते. तिचे नाव 'मलाप्रह्मा' आहे. तिचेकडे तू सत्वर जा व तिला तूप मागताच ती निश्चित देईल. बरोबर सेवक घेऊन जा.'' तेव्हा तो स्वामींना म्हणाला की, ''मला जाण्याचे धैर्य नाही. आपण स्वतः या कार्यास यावे म्हणजे कार्य सिद्धीस जाईल.'' त्याची विनवणी ऐकून बरेच शिष्य घेऊन मलाप्रह्मा दर्शनाकरिता पूजा सामुग्री घेऊन निघाले. नदी किनारी येऊन सुंदर अशी महापूजा सुरू केली व हात जोडून स्तोत्र केले की, ''हे अंबे, तुझे उदकात जो भक्तिभावाने स्नान करील तो अनंत जन्मीचा पातकी असला तरी स्नानाने पुनित होईल. तुझे दर्शनाने लोकांचे मळांचा संहार करतेस. म्हणून तुझे मलापहा असे सुंदर नाव आहे. अशा रीतीने तू लोकांचे उद्धार करतेस, सेवकांची कामना हे माते तू ताबडतोब पूर्ण करतोस म्हणून तुझे किनारी ब्राह्मणाराधना आरंभली आहे. हे अंबे, तुझ्या अनुग्रहाने सर्व सिद्धी प्राप्त होतात. मला आता तूप कमी पडले आहे, तरी ते तू मला द्यावे.'' असे स्तोत्र करून कलशपाणी चिदंबराने ब्राह्मणांना सांगितले की, ''मलापहा माता मला तूप देत आहे. तरी ताबडतोब घागरी भरून घ्याव्यात.'' ही स्वामींची वाणी ऐकून ब्राह्मणांनी घागरीत पाणी भरून घेतले व शंभर घागरी झाल्यावर खांद्यावर घेऊन भोजन शाळेत आले. त्या घागरी खाली ठेवून जेव्हा पाहिले तेव्हा त्या सर्व तुपाने भरल्या. हे अद्‌भुत कौतुक पाहून सर्व ब्राह्मण जयजयकराने गर्जना करू लागले. ''जय जय चिदंबरा, तू चंद्रशेखर आहेस आणि हे उद्धरा, आनंदसागरा दयानिधे, ह्या पाण्याचे तू तूप केले आहेस. हे महादेवा, तुला आम्ही आमच्या हिताकरिता शरण आलो आहोत. तरी आम्हाला संसार सागरातून तारून आमचे रक्षण कर. रोग्यांना अमृताची खाण सापडली व मुमुर्षूंना संजीवनी सापडली तर जसा आनंद होईल तसाच आम्हाला झाला आहे. तुझी प्रत्यक्ष करणी पाहून तूच व्यापक असा अनंत भासतोस. तरी हे जगन्नाथा आमचा विकल्प दूर कर.'' अशी नाना तऱ्हेने स्तोत्रे करून चिदंबराचे पायावर साष्टांग नमस्कार घालू लागले आणि दीक्षितेंद्राची आज्ञा घेऊन ते सर्व ब्राह्मण भोजनाकरिता गेले. सर्व ब्राह्मण स्वादिष्ट पक्वान्ने आकंठ जेवून तृप्त झाले. इतक्यात जे सेवक तूप आणण्याकरिता गेले होते ते शंभर घागरी भरून तूप घेऊन आले. तेव्हा महास्वामी म्हणाले, ''मलापहा मातेकडून आपण उसने तूप आणले आहे ते परत नेऊन द्या. स्वार्थाने येथेच ठेवू नका आणि त्या मातेच्या ऋणातून मुक्त व्हा.'' तेव्हा कोठारी म्हणाला की गंगेत पाण्याला काय तोटा आहे.

शि
व
चि
द
म्ब
र

तरी हे तूप ब्राह्मणांकरिताच पुढे उपयोगी येईल. हे तूप गंगेस समर्पण केले तर ती काय उपकार मानणार आहे? उष्णोपचार करून काय सूर्यास संतोष होईल? चंद्राला जरी शीतोपचार केले तर तो उपकार मानेल? पर्वताला जर दगड समर्पण केला तर तो काय त्याला वर देईल किंवा समुद्राला जर मीठ समर्पण केले तर त्यास उपकार वाटेल काय? त्याप्रमाणे गंगेस तूप समर्पण केले तर काय होईल? तेव्हा चिदंबर म्हणाले की, "तुझे ज्ञान बरेच दिसते. धनिकांकडून ऋण घेऊन ते परत केले नाही तर त्याचा फार मोठा दोष आहे. तो भक्तकैवारी समर्थ असा दाता आहे. तेव्हा त्यावर विश्वास ठेवून स्वार्थी न होता मनात औदार्य ठेवावे. जो उदार असतो त्याला तो जगदीश केवळ कल्पतरूच आहे. परंतु कृपणाला दोष लागतात तेव्हा या वेळी ही भलती आशा सोड." असे चिदंबराचे वाणीरुपी रसायन आत प्रवेश करताच दुराशा मळ जळून गेला त्याच्या अंगी उदारपण वाढले. नंतर तथास्तु म्हणून कोठारी ते सर्व तूप घेऊन शंभर घागरी गंगेत ओतल्या, तेव्हा ते तूप पाण्यासारखे वाहू लागले. पाण्यात पाणी घालून होताच जसे एकरूप होते त्याप्रमाणेच ते तूप गंगेच्या प्रवाहात एकरूप झाले. हा चमत्कार पाहून लोक वारंवार जयजयकार करून साष्टांग नमस्कार घालू लागले. कोणी स्तोत्र करू लागले की, "हे चिदंबरा, तुझे स्वरूप पाहून तू व्यक्त दिसतोस परंतु तूच महेश्वर आहेस. ज्यापासून विधी हरीहर व सर्व सुश्वर अवतरतात आणि चिदंबर हे तुझे मूळ रूप आहे. तू निर्गुण, शुद्ध, स्वप्रकाशी, नित्यानंद नियामक व निर्विशेष असून एका क्षणातच ब्रह्मांडाची रचना करतोस. त्रिकाली तू एकरूप आहेस. तुला मायेचा लेप मुळीच नाही, जिचे योगाने जीव पुनर्जन्म पावतात. तरी हे हृषीकेषा, आमचे इतकेच मागणे आहे की मायेचा स्पर्श आम्हाला केव्हाही होऊ नये, एवढीच कृपा असावी." असे स्तोत्र ऐकून आपला वरदहस्त पुढे करून सर्वांना वर देऊन चिदंबर आपले घरी आले. अशा तऱ्हेने रोज नवीन असे चरित्र चिदंबर दाखवीत असत, ज्याची कीर्ती तिन्ही लोकी पसरली व रोज अनेक लोक आपले कामनापूर्तीसाठी येत असत. राजे लोकांचे देखील मनोदय श्री स्वामी समर्थ पुरवीत असत परंतु एके दिवशी एक अनाथ विप्र दर्शनाकरिता आला. गुरु चरणास वंदन करून धनेच्छा मनात धरून भक्तिभावाने स्वामी पुढे हात जोडून उभा राहिला. ते जगज्जीवनाने ब्राह्मणाला पाहून त्याचे मनात काय आहे ते ओळखले तेव्हा त्याची इच्छा पूर्ण करणे गुरुला काय कठीण? परिसाचा स्पर्श लोखंडाला होताच त्याचे सोने होण्यास काय कठीण आहे? कामधेनूचे पूजन करणाऱ्यास

शि
व
चि
द
म्ब
र

काय दुर्मीळ आहे? कल्पवृक्षाखाली बसताच कोणते काम होणार नाही? लक्ष्मी घरी येताच दिनता का राहिल? जर दैवयोगाने नारायण प्रसन्न झाला तर दारुण अशा नरक दुःखाचे भय कोणाला वाटेल? दीक्षित प्रसन्न होताच ब्राह्मणाचे दुर्दैव उडून गेले व त्या वेळी एक चमत्कार झाला. तेथे एक मोठा सर्प पुढे आला तेव्हा 'या सापाला ताबडतोब उचलून घे त्यायोगे तुझ्या दैन्याचा नाश होईल.' गुरुचे वचन ऐकताच तो ब्राह्मण भयग्रस्त झाला व तेव्हा स्वामी पुन्हा म्हणाले की, ''त्या सापाला ताबडतोब धर नाही तर तो बिळात निघून जाईल.'' ब्राह्मण भिऊन 'मला धन नको' म्हणून दूर पळून जाऊ लागला. मग गुरुने त्या सापाला ब्राह्मणाजवळ आणला तेव्हा ब्राह्मणाने सापाला दुरून भीतभीत स्पर्श केला. ब्राह्मणाचा स्पर्श होताच त्या सापाचे बावन्नकशी सोने झाले. ते घेऊन तो अतिशय संतुष्ट झाला आणि त्याने सद्गुरुला नमन केले. असा अगाध महिमा पाहून त्याने नाना तऱ्हेने स्तुती केली. नंतर त्याला स्वामींनी उपदेश करून आपले घरी पाठविले. जगन्नाथाने कृपा करताच त्या ब्राह्मणाचे सर्व दैन्य नाहीसे झाले व तो श्रीमंत होऊन श्रीगुरुंना भजू लागला. गुरुचे चरित्राचे काय वर्णन करावे, जो त्याचे नाव घेईल त्याचा जन्म सार्थक होऊन तो ब्रह्मपदी नाचू लागतो. चिदंबर नामाचे नौकेत बसून मागे बरेच लोक तरून गेले तरी तेथे बसून तरा.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय एकवीसावा

राजारामास अरण्यात मार्गदर्शन

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। हे चिदंबरा, माझे आशापाश तोडून माझी वृत्ती निरपेक्ष आणि उदास कर आणि तुझे भजनी प्रीती लागावी अशी बुद्धी मला दे. षड्विकार मला नेहमी त्रास देतात जर श्री चिदंबराने कृपा केली तरच अंतर शुद्धी होईल. लौकिक, प्रतिष्ठा व मानाभिमान ही महाविघ्ने पुढे ओढवतात व त्यावर मन बसले तर तुझे चिंतन घडत नाही. असे अवगुण अंतरी साठवून लोकांकरिता मी मला तुझा म्हणवतो तरी हे भक्तकैवारी या पतीताचा उद्धार कर. हे मन अतिशय चंचल आहे. ते तुझे चरणी स्थिर व्हावे अशी मी नेहमी इच्छा करतो आणि चिदंबरा हे तू जाणतोस. हाताने तुझी सेवा घडावी किंवा संतचरणाची सेवा घडावी. पायाने तीर्थयात्रा अथवा तुझी प्रदक्षिणा घडावी नाहीतर निर्लज्ज होऊन किर्तनरंगी नाचावे ज्यायोगे पायास समाधान होईल. हे चिदंबरा, माझे इतके मनोरथ पूर्ण कर. हे सरस्वती पती सर्व चराचर भुतांचे ठिकाणी कोणताही विकल्प किंवा दोष मनात न येता समदृष्टीने तुलाच पाहवे असा मला वर दे. तुझे रसाळ चरित्र माझे मुखाने वर्णन करावे हीच दृढ इच्छा धरून हे दयाळा, तुला विनंती करतो. हा मी भलताच हट्ट धरला आहे. तरी तू रसाळ असे चरित्र वदव की, जे कानी पडताच प्रेमळ श्रोते संतोषतील. ज्यावाचून कोठेही अणुमात्र जागा रिकामी नाही. जो सर्व ठिकाणी पूर्ण आहे अशा त्या चिदंबर पायाचे स्मरण करून महासुरस अशी कथा सांगतो. एक राजाराम नावाचा भक्त होता. त्याकडून लोकोद्धारार्थाकरिता सद्गुरुनी बरेच रसाळ असे प्राकृत अभंग करवले. तो राजाराम कित्येक जन्माचा असा थोर भक्त होता व त्याचेवर पूर्ण अशी गुरुकृपा होती. मी मंदमती त्या भक्ताची कीर्ती काय वर्णन करू? कारण चिलटाकडून कैलासावर आरोहण होईल काय? दरिद्री सिंहासनावर बसेल काय? बाळ चंद्र धरून आणेल काय? आणि कामधेनूची सर इतर गायींना येईल काय? ज्याचे वर्णन प्रासादिक कवी करतात त्याचे वर्णन मी काय करू शकणार? कारण लक्ष्मीपती सारखा वैभवी माणूस होऊ शकेल काय? श्रेष्ठ पंडित लोक भाषार्थ सांगतात त्याप्रमाणे मला सांगता येईल काय? कल्पवृक्षाची करणी

बाभळीला जमेल काय? पतिव्रतेची बरोबरी करणे खटपट केली तरीही जारिणीला जमेल काय? ती जरी ८४ लक्ष योनी फिरली तरी तिला पतिव्रता होता येईल काय? पंडिताची चातुर्यकळा धनगराला जमेल काय? तसेच इंद्रपदाचा सोहळा गुराख्याला मिळेल काय? तरी पण तो कृपामूर्ती चिदंबर पूर्णत्वाने सर्वभूतांचे ठिकाणी असतो आणि त्याची करणी विचित्र आहे आणि हृदयी वास करून त्याने प्रेरणा दिली तर मग काय कठीण आहे? चिदंबराची कृपा होताच गवत मेरूप्रमाणे होते. हा जीव महेशापुढे मान डोलावतो. लहान बाळ वेद बोलतो. वंध्येला पुत्रवती असे नाव मिळते. ही चिदंबराची करणी आहे. श्री रामचंद्राच्या कृपेने दैत्याला चिरंजीव पद प्राप्त झाले. दत्ताच्या कृपेने वाळलेल्या लाकडास पाने फुटली. श्रीकृष्णाची कृपा होताच सुदाम्याचे दैन्य नाहीसे झाले आणि कुब्जेची हनुवटी धरताच ती सर्वांगाने अतिशय सुंदर झाली. त्या प्रमाणेच गुरुचे प्रेरणेने मी आता कथासार सांगतो ते ऐका. ज्याप्रमाणे लाकडाचे बाहुलीचा नाच होतो ते सर्व सूत्रधारांचे अधीन असते. पूर्वी नृसिंहावतारी या राजारामाचे नाव प्रल्हाद असे होते व रामावतारी वानर वंशात हाच अंगद होता व कृष्णाने यदुकुळी जन्म घेताच त्याने उद्धव म्हणून जन्म घेतला. पुढे तो नामदेव या नावाने शिंप्याचे कुळी अवतरला. पुढे पंढरपुरी विठ्ठल भक्त म्हणून जो तुकाराम प्रसिद्धीस आला तोच हा राजाराम होय. याचे पूर्वाख्यान कसे आहे ते 'भक्तविजय' या ग्रंथात महिपतीने वर्णन केले आहे. आता स्वत:च्या मुखानेच राजाराम अभंगात लिहीत असे की मी पूर्वी तुकाराम होतो व आता राजाराम झालो. कृष्णाने दुसरा अवतार घेतला. त्याचे नाव चिदंबर झाले. तेव्हा ताबडतोब तुकयाचा राजाराम झाला. त्याने पूर्वपरंपरेप्रमाणे अनन्य भावाने सेवा केली व चिदंबर यश चहूकडे पसरावे म्हणून भक्तिभावाने अभंग रचले. ते या ग्रंथात विस्ताराने लिहिले आहे. त्याचा अभिप्राय येथे सांगतो. गोदातटी बाबुळगाव नावाचे गाव आहे. तेथील पाटीलकी यांचे वंशी होती. ते रजपूत होते व पंचाग्नीसाधन करीत असत. त्यांचे कुळी हा महाभक्त उपजला, परंतु प्रपंची विरक्त होता. जन्मत:च तो कुमार सर्वांगाने सुकुमार होता. तो पौर्णिमेच्या शीतल चंद्राप्रमाणे दिवसेंदिवस वाढू लागला. त्याचे वयास ५ वर्षे होताच भक्ती, वैराग्य असे गुण दिसू लागले. कधी तो खेळ खेळीत नसे. अरुणोदयी स्नान करून शिवपूजा करीत असे. नंतर पुराण श्रवण करून नित्यनेमाने पित्यास वंदन करून रात्रंदिवस नामस्मरणी मग्न होत असे. काही दिवस जाता त्याने ध्रुवाचे चरित्र ऐकले आणि तेव्हा त्याला

आपला जन्म निष्फळ झाला अशी तळमळ लागली. कारण ५ वर्षांचे त्या बालकास हृषीकेश प्रसन्न झाला पण, मला तर आता ८ वर्षे पूर्ण झाली आहेत. तरी अजून देव भेटत नाही असे त्याला वाटले. त्याला नरजन्माला येऊन भगवंत साक्षात भेटला नाही त्याचा जन्म व्यर्थ गेला. त्याला जन्म-मृत्यूचा फेरा चुकणार नाही. झाड पुष्कळ उंच वाढले तरी त्याला फळाशिवाय शोभा नाही. घरात पुष्कळ संपत्ती असूनही संतानाशिवाय ती व्यर्थ होय. एखादी नारी अतिशय सुंदर असेल व तिच्या कपाळाला कुंकू नसेल तर तिचा जन्म व्यर्थ आहे. असा व्याकूळ होऊन तो रात्रंदिवस तळमळ करीत असे. एके दिवशी शिवपूजा करीत मन निश्चल करून बसला तोच तेथे एक दिगंबर मुनी आला. त्याच्या चरणी मस्तक ठेवून राजारामाने त्याची षोडशोपचार पूजा करून आपले दोन्ही हात जोडून आपले हृदयातील तळमळ त्याला सांगून प्रार्थना केली. तेव्हा तो दिगंबर मूर्ती त्याला म्हणाला की, "तुला परमेश्वर प्रसन्न होईल" आणि अंतर्धान पावला. त्या दिवसापासून राजाराम अंत:करणात जास्त झुरू लागला. ज्याप्रमाणे गाय वनात चरत असताना तिचे पाडस घरी सारखे झुरत असते. पाडस जर चुकले तर हरणी जशी त्याला वनोवनी धुंडाळते त्याप्रमाणेच राजाराम अंत:करणात त्या जगन्नियंत्याचे सगुण भेटीची वाट पाहत होता. जशी आई बाहेर कामाकरिता गेली असता बाळ अस्वस्थ होते तसेच राजाराम सगुण भेटीसाठी अटातटी करीत असे. दिनानाथाने माझी उपेक्षा केली. आयुष्याचा नाश होत आहे. सद्‌गुरुमातेने मला का अव्हेरले? हे दु:ख आता मी कोणाला सांगू? हे कृपासागरा, सद्‌गुरू, त्याने मला दूर का लोटतोस? तुझ्या वाचून मला थारा नाही. या संसारातून तू मला तार. तू जर माझी उपेक्षा केलीस तर दुसरा कोण मला तारक आहे आणि मला पदरी कोण घेईल? मग तू माझा अव्हेर का करतोस? अहोरात्र गुरुचिंतन करीत वैराग्य तीव्र झाले. तेव्हा तो गुरुबाळेश्वर तेथे प्रकट झाला. राजारामाची वृत्ती पाहून गुरुची मती कुंठित झाली आणि यास उपदेश देताच याची स्थिती पूर्ववत होईल, असा निश्चय करून तेव्हा राजारामास जवळ बोलावून गुरुमाउलीने त्यास उपदेश केला तरीही राजारामाचे समाधान झाले नाही. अनेक तऱ्हेचे संकल्प निर्माण झाले व म्हणाला की, "मला सगुण दर्शन व्हावे असे कृपादान द्यावे." हे ऐकून गुरु प्रसन्न होऊन म्हणाले की, "उमापती सगुण रूपाने तुला निश्चितच भेट देईल." असे सांगून गुरु तीर्थयात्रा करण्याकरिता गेले. इकडे भक्त विरागी होऊन सगुण मूर्तीचे मनात चिंतन करू लागला. चौथे दिवशी त्याचे स्वप्नात चिदंबर

द्विजरूपाने व हसत रसाळ वाणीने बोलले, ''आजपासून मनात शांती धर.'' एके दिवशी राजाराम हुसंगाबादास गेला. तेथील राजाने त्याला सेनाधिपत्य दिले व त्याचे पदरी पाचशे सैन्य स्वाधीन केले. तरीही राजाराम शिवनाम कधीही विसरत नसे. एकदा कृष्णभट्ट नावाचा एक द्विज त्याला अचानक भेटला. राजाराम त्या वेळी काशीयात्रेस जात होता. त्या ब्राह्मणाच्या मुखाने त्याने चिदंबर चरित्र ऐकले. ते ऐकून राजारामास अत्यंत आनंद झाला आणि मान हलवून कौतुकाने विचारले, ''मी तुला आता काय देऊ?'' त्याच दिवशी राजाराम त्या ब्राह्मणाला व त्याचा गुरुबंधू निंबाजी याला बरोबर घेऊन चिदंबर गुरुचे दर्शनाकरिता निघाला. रस्त्यात त्याला एक मोठा पर्वत लागला. तेथे भयानक अशी झाडी होती व लोकांचा वावर नव्हता व वाघ आदी श्वापदे मोठ्याने गर्जना करीत होती. कित्येक योजनांवरही गाव दिसत नव्हते. चुकून ते आडमार्गी पडले होते. तिघेही मनात भिऊन गुरुस्मरण करीत राहिले तोच तेथे बालवेशाने चिदंबर गुरु प्रकट झाले. तो आठ वर्षांचा सुकुमार बाळ प्रसन्न मुख असा शामसुंदर पुढे उभा राहिला. डोक्यावर लहान घोंगडी व हातात वेताची काठी होती. ते मनमोहक असे बालक पाहताच तिघांचे अंत:करण शांत झाले. आणि विचारले, ''तू कोण आहेस?'' तेव्हा तो बाळ म्हणाला की, ''हे अद्भुत असे वन आहे. येथे मार्गस्थ लोक दिशा चुकून धावतात, मी त्यांना मार्गदर्शन करतो. तुम्ही आडमार्ग धरला म्हणून मी धावत आलो. तरी माझे बरोबर धावत यावे. मी तुम्हाला राजमार्ग दाखवितो.'' तो बाळ वेगाने चालत होता. त्याचे मागे तिघांचे घोडे पळत होते आणि वारंवार मागे फिरून त्या तिघांकडे तो कासवाच्या नजरेने पाहत होता. थोडे पुढे जाताच मध्यान्ही सूर्य वर आला. त्या तिघांना खूप भूक लागली, तेव्हा तो बाळ एका जलाशयाजवळ बसला व म्हणाला, ''तुम्हाला भूक लागली असेल, मलाही लागली. आहे. तुम्ही येथे स्नान वगैरे आटपा. मीही जेवतो.'' तिघांनी त्याला खाण्यास देऊ केले परंतु बाळ ते घेईना आणि म्हणाले की, ''माझ्याजवळ पुष्कळ आहे.'' तिघेजण जेवले व आपल्या घोड्यावर स्वार झाले आणि तो बाळ हाताने वेताची काठी फिरवीत समोर चालू लागला. याप्रमाणे ते अरण्य पार करताच ते तिघेजण राजमार्गाला लागले आणि जवळच एक गाव दिसू लागले. त्यांना आश्चर्य वाटले व हा बाळ नसून उमापतीच आम्हाला मार्ग दाखवावयास आला होता असे त्यांना वाटले. मग ज्या ठिकाणी तो बाळ गुप्त झाला होता तेथे वंदन करून चिदंबर लीलेचे स्मरण करीत ते कुंदगोळास आले. तेथे पुष्कळ यात्री होते आणि चिदंबराचे दर्शन

सहजासहजी होत नव्हते परंतु सेवकांनी स्वामीस निरोप कळविला. इतके होण्यास तीन दिवस लागले. राजारामाचा उपवास होता व दर्शनाशिवाय अन्न घ्यावयाचे नाही असे त्याने ठरविले होते. असे चार दिवस उपास झाले आणि तो एका आसनावर निर्धार करून बसला होता. त्या दिवशी तो कृपासागर चिदंबर स्वप्नात येऊन प्रकट होऊन त्याने राजारामाला आपल्या मांडीवर बसवले व त्याला आलिंगन देऊन मधुर वाणीने सांगितले की, दुराग्रह न करिता सात्त्विक बुद्धीने देवाची आराधना करावी. असे सांगून तू साखर व खोबरे घे असे म्हणून मोठ्या प्रेमाने राजारामाच्या तोंडात घास घातला. गुरुचे हाताने प्रसाद भक्षण केला म्हणून तो तृप्त होऊन त्याचे पोट भरले. मग चिदंबराने त्यांचे उजव्या कानात मंत्र सांगितला, जो निश्चित तारक असा होता. गुरुने त्यानंतर सांगितले की, जगन्नियंता सर्वेश्वर तो मीच. माझे नाव चिदंबर आहे आणि मग त्याला स्वरूप दाखविले. ज्यात अनंत कोटी ब्रह्मांड दिसत होते. किंवा हजारो सूर्य एकवटून जसे तेजोरूप दिसेल तसे चिदंबराचे स्वरूप दिसत होते असे अद्‌भुत रूप पाहून राजारामाचे डोळे आंकुचित झाले आणि सर्वांगावर रोमांच उभे राहिले आणि अत्यंत आनंदाने दंडवत घालून त्याने नमन केले. त्यावेळी चिदंबराने आपले ते अलौकीक व अद्‌भुत रूप गुप्त करून पुन्हा विप्र रुपाने तो मायबाप राजारामाला म्हणाला, ''हे वत्सा, उद्या तू माझे भेटीस निश्चित लवकर यावे. येथे मीच उमानायक दीक्षित नावाने राहतो. संसारातून बहुतांचा उद्धार करून त्याची कीर्ती स्थिर करीन. तू सर्व कल्पना सोडून दर्शनाकरिता ये.'' इतक्यात राजाराम जागा झाला. परंतु गुरुमाउली कोठेच दिसेना. तो भक्त म्हणाला, ''हे अद्‌भुत झाले आहे. गिरिजाकांत आज मला भेटला, भोगल्याशिवायच मला तृप्ती झाली आहे. तोंडात प्रसादाचा घास आहे, मंत्राचे स्मरण आहे. आज माझी सर्व तळमळ नाहीशी झाली.'' तेव्हा तो लगेच निघाला व चिदंबराचे जवळ आला. तो भक्त दाराजवळ येताच सभाजनांना स्वामी म्हणाले की, ''आज येथे एक बुद्धिमान महात्मा येत आहे. त्याचे दर्शनाकरिता जाऊ या.'' असे म्हणून बऱ्याच लोकांना बरोबर घेऊन स्वामी दाराजवळ भक्ताचे भेटीकरिता सामोरे आले. स्वामींना दुरून पाहताच तो लोटांगण घालीत येऊ लागला. हे स्वामींना पाहून मोठ्या वेगाने त्याला आलिंगन दिले व आपले हृदयाशी धरला. त्याचे मस्तकाचे अवघ्राण करून श्री चिदंबर स्वस्थ उभा राहिला. दोन्ही डोळे पाण्याने भरले व सर्वांगावर रोमांच उभे राहिले. देव व भक्त प्रेमाने स्फुंदन करू लागले. कंठ भरून सद्‌गदित झाले

व देहभान विसरले. त्या अद्‌भुत प्रेमाचे काय वर्णन करावे? भरत श्रीरामाचे भेटीस आला असता, जसे रामाच्या पोटी प्रेम उपजले, तीच उपमा येथे सुद्धा शोभते किंवा द्वैतवनी पांडव असताना द्रौपदीचा अपूर्व धावा ऐकून कृष्ण द्रौपदीस भेटताच ज्याप्रमाणे प्रेमाचा पाझर फुटला होता. तो देवभक्तांचा आनंद पाहून सर्व लोक जयजयकार करू लागले व म्हणू लागले की, स्वामींचा महिमा अगाध आहे. हा असा कोण प्रसिद्ध पुरुष आहे? असे लोकांचे स्तवन चालू असता स्वामींनी भक्ताचा हात धरून त्याला सभेत घेऊन आले व विचारले, "तुझी इच्छा काय आहे, तो वर मागून घे. मला देणे शक्य झाले नाही तर परमेश्वरास मागून देतो." हे ऐकून तो भक्त म्हणाला की, "मी एकांती आपणास सांगीन. मग ते दोघे एकांती बसले व चिदंबराने विचारले की, "तुझ्या मनात काय मागावयाचे आहे ते सांग. ते याच क्षणी देतो." ही गुरुची वाणी ऐकून राजारामाने त्यांचे चरणावर मस्तक ठेवले व सांगितले की, "मला फक्त भक्ती दे एवढी माझी विनंती आहे." हे भक्ताचे मागणे ऐकून चिदंबर म्हणाले, "हे मी तुला पूर्वी दिले आहे. त्याची खूण तुला दाखवितो. ज्यायोगे तुझा संशय निघून जाईल." तेव्हा स्वामींनी आपले कृष्णरूप प्रकट केले ते असे चतुर्भुज होते. शंख, चक्र, गदा व पद्म व वैजयंतीयुक्त असा मेघश्याम व किरिटाचे नवरत्न धाम असा तो चिदंबर शोभू लागला. गळयात सुशोभित वनमाळा, कपाळावर मकरकुंडल हातात करदोटा आणि हृदयावर रत्नहार झळकत होते व त्यामध्ये कौस्तुभ झळकत होता. त्याभोवती नक्षत्रमाला शोभत होत्या आणि हृदयावर श्रीवत्स लांघन होते. पितांबर नेसलेला होता. सर्व लक्षणांनी युक्त असा तो पूर्ण श्रीवर होता आणि आपला वरदहस्त पुढे करून भक्ताचे समोर उभा होता. ते सुकुमार असे श्रीकृष्ण रूप पाहून भक्ताला फार आश्चर्य वाटले व हाताने नमस्कार करीत चिदंबराचे मुखकमल पाहू लागला. देहभान विसरून डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. अंगी रोमांच दाटले आणि चिदंबराचे पाय धरून वंदन केले. मग उठून पाहताच भक्ताला त्याचे फार आश्चर्य वाटले. कारण उठून पाहताच ते नाहीसे झाले व पुन्हा विप्राचे वेषाने तो भक्तासमोर उभा राहून गंभीर नादाने बोलता झाला की, "हे वत्सा, माझी वाणी ऐक. जरी तू पूर्वी ज्ञानी होतास परंतु पुन्हा देहसंबंध येताच, चित्ती प्रमाद येतात म्हणून पूर्वस्मृती होण्याकरिता हे शिष्यराया, तुला ज्ञानपद्धती थोडक्यात सांगतो त्याकडे पूर्ण लक्ष दे. चित्त शुद्धी होण्याकरिता आपला वर्णाश्रम धर्म आचारावा आणि सगुण रूपाचे ठिकाणी अत्यंत भक्ती धरावी. ब्रह्मा,

विष्णू व महेशात थोडीही भेदबुद्धी न करता शास्त्रविधीने भजन-पूजन करावे आणि सर्वांचे ठिकाणी माझीच कल्पना करावी. अनन्य भावाने व एकचित्ताने माझे गुण श्रवण करावे. याप्रमाणे भक्तिमार्गाने चालताच साधक ज्ञानाधिकारी होतो. आधी ज्ञानाचा अभ्यास करावा. ज्ञानी व्हावे. तो मार्ग सविस्तर तुला सांगतो. आधी सर्व विषय सोडावे. नंतर हळूहळू प्राण जिंकावा. नंतर सर्व इंद्रिये जिंकावीत व त्यातील द्वंद्व शांतपणे सहन करावे. गुरुवचनावर विश्वास असावा. रोज आपला अभ्यास वाढवावा व देहाचा अहंकार सोडवावा. नेहमी सत्समागम जोडावा. त्रिदेहबंध तेव्हा तुटेल, वासनेचा वीट येईल आणि विषयांबद्दल ओकारीप्रमाणे मन विटेल. असे हे शेवटचे अंग आहे. अशी ही मुख्य नऊ अंगे आधी अवश्य जाणून मग सद्गुरुचे पायाचा आश्रय एक भावाने घ्यावा. नंतर त्याला प्रेमाने वंदन करून व त्याला विनयाने प्रश्न करावा. देहधारक मी कोण आहे व जगाचे कारण काय? मग जे गुरु उत्तर देतील ते स्वस्थ चित्ताने ऐकावे. आता तुला शास्त्रोक्त असा गुरुबोध सांगतो. त्याने आपले हित होते. तूच स्वतः पूर्णब्रह्म आहेस. नेहमी तू नित्य मुक्त असा निरंजन आहेस. जसे पाण्यात बुडबुडे येतात, त्याप्रमाणे तुझ्यामध्ये जगज्जनन झाले आहे. तूच मायेचे योगाने ईश्वराचे रूप धारण करतोस. त्यामुळे तूच जगाचा कर्ता होतोस आणि चराचरात भरून राहतोस. याप्रमाणे तू पूर्णब्रह्म असून अज्ञानाने तुला देहाचा भ्रम झाला आहे आणि जीव या नावाचा प्राप्त झाला आहे. असे वेदांमध्ये सांगितले आहे. दोरीवर जसा सर्प भ्रम होतो त्याप्रमाणे मायेचे योगाने तुझेवर जगभ्रम झाला आहे. प्रकाशाच्या योगाने जसे त्या दोरीचे ज्ञान प्राप्त होते आणि सर्पाचा भ्रम नाहीसा होतो. त्याप्रमाणेच ब्रह्मज्ञानाने जगभ्रम नाहीसा होतो. सूर्य उगवताच जसे धुके नाहीसे होते तसेच ब्रह्मज्ञानाने अज्ञानाचा अंधार नाहीसा होतो. ब्रह्मी जसे अहंस्फुरण होताच ते स्फुरण ही मायेची खूण आहे कारण ब्रह्मविना माया नाही आणि माया ब्रह्म एकरूप असतात. जसे पाण्यातील तरंग वेगळे दिसतात, सूर्याचे तेज निरनिराळे दिसते तसेच माया व ब्रह्म हे वेगळे वाटतात, परंतु सुविचाराने मायेचे रूप कळते. माया म्हणजे खोटे असूनही जे खरे वाटते जसे स्वप्नात प्रत्यक्ष दिसूनही ते खोटे असते. जे अविचाराने कार्यरत दिसते परंतु पूर्ण विचाराने ते तिळमात्रही दिसत नाही त्यासच 'मिथ्या' हे नाव आहे व त्याप्रमाणे ही माया होय. खोट्या बुजगावण्याला भिऊन बाळ रात्रंदिवस तळमळ करते. त्याप्रमाणेच अज्ञानामुळे या मायेचे पीडन होते आणि ज्ञान प्राप्त होताच ते नाहीसे होते. असा जो मिथ्या

शि व चि द म्ब र

भ्रम आहे. तोच स्फुरण रुपाने ते ब्रह्म आहे. त्यापासूनच महत्तत्त्वांचा जन्म आहे आणि ते महत्तत्त्व म्हणजे अहं होय. अहंकारापासून सत्त्व, रज व तम हे निर्माण झाले व या त्रिगुणापासून पंचवीस तत्त्वे परिपूर्ण झाली. पंचभूतांचे तमोगुण, कार्य इंद्रीयांचे रजगुण व सत्त्वगुणांचे अंत:करण दैव ते कार्य अशी पंचवीस तत्त्वे आहेत. दशेंद्रिये पंचप्राण अपंचिकृत, भूते अंत:करण असे सर्व मिळून लिंगदेह निर्माण झाला. पुढे भूतपंचीकरण कारणाने स्थूलाचे निर्माण झाले आणि अभिमानाने देह व्यापला तेव्हा जीव म्हणू लागले की मी देह आहे. देहाच्या ध्यासाने सुखदु:ख निर्माण झाले आणि आपले स्वरूप विसरून तो जीव भोक्ता झाला. आणि आत्मा जीव हे नाव पावला. तरंग फेस बुडबुडे पाण्यात पुष्कळ दिसतात, तरी त्या पाण्यात काही भेद होत नाही, ते सर्व आदिअंती पाणीच असते. तसेच जग हे ब्रह्माने निर्माण केले आहे आणि ब्रह्मरूपच आहे. तरंगाधिकांचे विनाशाने जसे पाणी नाश पावत नाही. तसेच देहादी जग विनाशाने ब्रह्म नाश पावत नाही. पाण्यात तरंगादी खोटे असतात. त्याचप्रमाणे ब्रह्मी जगही खोटे असते पण ब्रह्म कालत्रयी शाश्वत आहे. याप्रमाणे देहादी जगभ्रम सोडून मोठ्या प्रेमाने व शांतीने परब्रह्माचे ध्यान करावे. ज्यायोगे मोक्ष सुलभ होतो, जे जे डोळ्याला प्रत्यक्ष दिसते ते सर्व नश्वर जाणावे व जे अदृश्य व शांत आहे, त्या ब्रह्माचे सुखाने ध्यान करावे. जे सर्वगत स्वयंप्रकाशी व शाश्वत आहे तेच निश्चित ब्रह्म होय. तरी त्याचे ध्यानाने स्वहित साधावे.'' असे चिदंबराने सांगताच भक्ताने त्याला नमस्कार केला.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय बाविसावा

राजारामास उपदेश

|| श्री शिव चिदम्बराय नम: ||

|| श्री गणेशाय नम: || जय जय चिदंबरा, भक्त चकोरा, पूर्णचंद्रा, जय जया आनंद सागरा, जय षट्कुमारा, सावित्री पती तू माझी माउली आहेस व मी तुझे तान्हे बाळ आहे. तू हाती घेऊन माझा सांभाळ कर. तू माझी हरिणी आहेस, मी तुझे पाडस आहे. माझे मन उदास झाले आहे. तरी लवकर येऊन मला भेट व मला आनंदीत कर. तू माझी गाय आहेस व मी तुझे लहान वासरू आहे. तरी तू कृपारस मला पाजून माझे प्राण वाचव. माझे एवढे मागणे पूर्ण कर. तुझे अनुग्रहाने मानव अनुतापाने विरागी होतो आणि चित्साम्राज्य वैभव भोगतो. तेव्हा तुझे चरणी माझा भाव असू दे. चिदंबराची कथा ऐकताच मनाला फार आनंद होतो. राजारामाने स्वामीस विचारले की, ''तूच ब्रह्म आहेस असे मला सांगता परंतु तुझे वचन ऐकून मनात एक संशय उभा राहतो तो असा आहे. मी जर परमान असे अद्वितीय परब्रह्म आहे, तर बायको-मुलांचा भ्रम माझे चित्तात का? हे माझे घर आहे, हा माझा मित्र आहे, हा शत्रू मला गांजतो. हे तुझे फार वाईट खेळ आहेत. मी कर्ता व दानशूर आहे. मी सुखी व दु:खी आहे आणि माझेशिवाय गवताची काडी हलत नाही. लक्ष्मी माझे घरी राबते व माझे सारखा दुसरा कोण आहे. मी फार उदार व सर्वांहून श्रेष्ठ आहे इ. कल्पना मनात जोराने का उद्‌भवता? ब्रह्मास अशी तळमळ कशी होईल ते मला सांगा. मी परमात्मा कसा व जे खोटे आहे ते दिसते कसे याचा विचार करून मला सांगा. कित्येक जन्माचे देहध्यासाने मी देहच आहे, अशी भ्रांती मनात का ठाण मांडून बसली आहे? तरी हे सर्व संशय कसे जातील असा मला बोध करा.'' तेव्हा स्वामी म्हणाले की, ''हे वत्सा, सावध होऊन ऐक. या सर्व भ्रमाचे कारण अज्ञान होय. हे मूळ कारण समज. ज्ञानाने अज्ञानाचा नाश होतो व ज्ञानाकरिता गुरुभक्ती पाहिजे आणि वैराग्याशिवाय भक्तिरस संभवत नाही. तसेच पश्चात्तापाशिवाय वैराग्य कधीच उत्पन्न होणार नाही. तेव्हा हृदय अनुतप्त होईल असे आचरण करावे. संसारात दु:खाचे दर्शन व्हावे व विषयात दोष पाहवे. जेणेकरून पश्चात्ताप उत्पन्न होतो. भ्रम नाहीसा होण्याचे हेच परंपरागत कारण आहे. तरी

संसारी दोष पाहण्याचे साधन तू साध. त्याचे योगाने अद्वैत ब्रह्म कळू लागते. संसार म्हणजे काय आहे हे आता मी तुला सांगतो. प्रत्यक्षात काहीच नसून मायेने तो दिसतो. परंतु संसारात सुख मुळीच नाही. गंधर्वनगर जसे दिसते तसाच हा संसार समज. जो मृगजळाप्रमाणे सत्य वाटतो. पुत्र, बायको, धन, संपत्ती दिसावयास रमणीय दिसतात. परंतु संसार केवळ दुःखानेच परिपूर्ण आहे हे तुला निश्चित सांगतो. ते तू ऐक. इंद्रावण हे फळ दिसावयास फार सुंदर दिसले तरी ते चाखून पाहताच त्याचा रस अत्यंत कडू असतो. दुरून पर्वत फार सुंदर दिसतो. परंतु प्रत्यक्षात तेथे मोठे मोठे दगड व काटे असतात. समुद्राचे पाणी दिसावयास फार सुंदर व गार दिसते परंतु तोंडात घालताच फार खारट लागते. असा हा संसार दिसावयास सुंदर दिसतो मात्र तो करताना अत्यंत दुःख होते. बाल्य, तरुण आदी करून चोहोकडून हा संसार दुःखमयच आहे, तसेच गर्भावस्थेत असतानाही पूर्णपणे दुःखच असते त्याचे वर्णन करणे कठीण आहे. जेव्हा शुक्रशोणित संभव होतो त्यापासून दुःखी जीव उत्पन्न होतो. त्याचे अवर्णनीय दुःख काय सांगावे? एका टीचभर जागेत जिवाला बांधून व कोंडून घ्यावे लागते. कर्मरत होण्यास तो असमर्थ असतो. मातेने खाल्लेले पदार्थ कडू, आंबट, उष्ण, थंड असे जिवाला नेहमी पिडा देतात, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. कोमल अंगास जंतू त्रास देतात. त्यामुळे जीवाला फार दुःख होते आणि जठराग्नीने किती ताप होतो की अंग शिजल्याप्रमाणे होते. मलमुत्रादि दुर्गंधीचा नेहमी त्रास होतो. त्यायोगे तो जीव सारखा कष्ट भोगतो आणि त्यामध्येच आईचा डोहाळ्याचा त्रास सुरु होतो. कोमल कंठ व कंबर आणि पाय पाठीवर त्यावर गर्भावरणाचे बंधन त्यामुळे त्या जीवास अनुताप होतो व आपले पूर्वीचे कर्म आठवून दुःखाने शंकराचे स्मरण करु लागतो. हे शिवशंभो, हरहरा मला हे गर्भातील अपार दुःख सोसवत नाही. तरी हे शंकरा, गिरिजापती, तू मला यातून सोडव. तुझा प्रताप न कळून पूर्वजन्मी महापाप केले. ते या संतापास कारण झाले. तरी हे मायबापा, यातून मला पार कर. गर्भातून मला एक वेळ सोडव. पुढे मी पाप मुळीच करणार नाही आणि मी आजन्म मरणापर्यंत तुझे पदी लीन होईन. सर्व काळ तुझे सेवेत घालवीन. हे हरेमुरारे, हृषीकेशा, मी दुसऱ्या विषयाचे चिंतन करणार नाही, तरी भवदुःखातून मला मुक्त कर. हे संसार सागर तारणाऱ्या माझे सर्व दुःखाचे निवारण कर. या गर्भातील त्रास मला आता सहन होत नाही, तरी हे रमानायका मला पार कर. असे शंकराचे स्मरण करून समाधान मानून आपले दैव आठवीत तो जीव गर्भी

काळ कंठीत असतो. नऊ महिने पूर्ण होताच प्रसववेदनांनी त्रास होऊन तंतू जसा ओढला जातो तसा तो कष्टाने योनी बाहेर येतो खाली पडताच आर्त नादाने जन्माचे दु:ख मानीत पूर्वीचे सर्व ज्ञान विसरून जन्मत: अज्ञानी होतो. जन्मदु:खाने पाच दिवस स्तनपान न करता ते बाळ अपार अशा जन्म दु:खाचे स्मरण करून रडत असते. मृत्यूच्या दु:खाहूनही जन्मदु:ख हे शंभर पट असते. संसारात काय आहे अशी गर्भव्यथा असते. आता बालपणीचे दु:ख तुला सांगतो. तेही तू एकचित्त करून ऐक. त्यामुळे संसारात काय सुख आहे काय ते तुला कळेल. बाहेरील वाऱ्याचा स्पर्श होताच पूर्वज्ञान नाहीसे होते आणि अज्ञानाने तो रडत असतो. मलमूत्रात लोळत असतो. डास, ढेकूण चावून त्याला त्रास होतो आणि आपले अंग खाजवणे सुद्धा अशक्य होते. नेहमी भूक व तहानेने व्याकूळ असतो, असे बालवयात दु:ख असते. पुढे बाळ मोठा झाल्यावर कुमार वयात जास्तच दु:ख असते. सध्या खेळण्यात तो तत्पर असतो व राग, अहंकार जोरात असतो. रात्रंदिवस खेळ खेळत असतो. सतत खाण्यास लागते आणि आपल्या हिताचा विचार मुळीच नसतो. सर्वांगाने जड व अज्ञानी असतो. त्यामुळे उपडे पडून रडत असतो व तोंड वाकडे करतो. कोठेतरी चढतो, काहीतरी मोडतो अशा गुणांनी देवाकडे त्याचे अजिबात लक्ष नसते. याप्रमाणे कुमारवयात आयुष्य व्यर्थ जाते. त्याचे आईवडील त्याला नाना तऱ्हेने व्यावहारिक बोध करतात. त्याने काही पाठ केले नाही तर त्याला धाक दाखवितात व मारतानाही नेहमी शिवीगाळसुद्धा करतात. असे काही दिवस जाताच यौवन पिशाचाची त्याला बाधा होते. त्यामुळे त्याचे मन वाकडे असे होते. त्यामुळे तो मंदबुद्धी बडबडू लागतो. दारू पिणाऱ्यासारखा उन्मत्त होऊन उगीचच अहंकाराने बडबड करतो. बायकोस कुलदैवत मानतो व देवद्विजांची निंदा करतो. विषयांचे मागे लागून आई बापांचा धिक्कार करतो. मी कर्ता असून स्वतःच पूर्ण भोक्ता आहे. माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी धनाचे संपादन करतो तेव्हा मला पाहिजे ते मी करीन असा उन्मत्त होऊन आपल्या आयुष्याचा व्यय होत आहे याची आठवण त्यास होत नाही. गेलेल्या दिवसाचा विचार न करता मी चिरंजीव आहे असा विचार प्रबळ होऊन साधूंनी केलेला बोध मनात आणत नाही. साधूंची निंदा त्यास आवडते तसेच वृद्ध लोकांची निंदा करतो आणि परस्त्री दर्शनाचा लोभ करतो. दुसऱ्याचा झालेला उत्कर्ष सहन होत नाही आणि दुसऱ्यांच्या धनावर आशा ठेवून वाट्टेल ते बोलतो. अल्प ज्ञानाने पोट फुगते आणि सर्वज्ञ लोकांचा स्पष्ट धिक्कार करतो. आपल्या

स्वतःला दुसऱ्याने मान द्यावा अशी इच्छा करून दुसऱ्याचा अपमान करतो आणि स्वतःला थोडासा जरी मान मिळाला तर त्याला स्वर्ग मिळाल्याचा आनंद होतो. धनार्जन करण्याकरिता रात्रंदिवस श्रम करतो व मोठे प्रयत्न करतो आणि एक क्षणही विश्रांती घेत नाही. पुराण आणि सत्यकथा ऐकण्यास जरी बसला तरी नाना तऱ्हेचे विकल्प मनात आणतो. त्यामुळे त्यास अर्थ समजत नाही. थोडाही धनलाभ झाला तर हर्षाने बेभान होतो आणि धननाश होताच आपला दंभ सोडून रडत बसतो. या लाकडाप्रमाणे आपल्या अंगाचे रक्षण करण्याकरीता अतिशय प्रयत्न करतो. परंतु काही केले तरी मानवाचा देह नश्वर असल्यामुळे त्याचे रक्षण करता येत नाही. गाईच्या दुधाला अव्हेरून अर्काच्या झाडाचा रस प्यावा, त्याप्रमाणे शिवचिंतन मुळीच न करता आपल्या देहाचे संरक्षण करतो. हे असे करणे म्हणजे अमृत टाकून सोमल भक्षण करणे किंवा कामधेनूस हाकलून गाढविणीचे दूध काढणे किंवा अप्सरेला लाथ मारून अस्वलाला आलिंगन देणे होय किंवा कल्पतरू तोडून टाकून शिंदीच्या झाडाला पाणी घालणे. अशा प्रकारे उन्मत्त होऊन आपण परमेश्वराचा अव्हेर करतो. आपण मनात निष्ठुर होऊन कठीण हृदयाने आपले हित व सोय सोडून आपणच आपणास अपाय करू लागतो. प्रयत्नाने जरी देहाचे रक्षण करून पाहिले तरी काळ आपले खाणे सोडील काय? त्यामुळे एक क्षणातच आपली काया काळाचा घास होईल. आपणास अज्ञानाने एवढा मोह झाला आहे की, काळ नित्य पाठलाग करतो. नेहमी कित्येक रोग आपणास झोंबतात तरी जीवाला पाप समुदाय व विषयभोग सुटत नाहीत. सापाच्या तोंडातील बेडूक, डास बघून ज्याप्रमाणे जीभ चाटतो, त्याप्रमाणेच कालग्रस्त मानव विषयसुख इच्छितात. ज्यांना आपले आपले म्हणून कुटुंबाचे ओझे आपण आपले शिरावर घेऊन येतो तेच शेवटी दूर होतात आणि ते आपणास साहाय्य करीत नाहीत. जो अंतकाळी आपणास रक्षण करणारा आहे, त्या भगवंतास अव्हेरून मोठ्या आनंदाने जीव नरकादी व्यथा आपले डोक्यावर घेतो. धर्मच अंती संरक्षण कर्ता आहे, त्यावाचून दुसरा कोणी साहाय्यकर्ता कालत्रयी नाही, असे संसारी असताना माणूस पुष्कळ उद्योग करतो आणि पाप-पुण्याचा मुळीच विचार न करता आपले मनोरथ पूर्ण करण्याकरिता धडपडतो. अंगाने सुदृढ असता आणि तारुण्यात बरीच शक्ती असताना जो मुळीच विचार करत नाही त्याचा केव्हाही उद्धार होणार नाही. तारुण्यपणी जो वैराग्य घेणार नाही त्याचा म्हातारपणी काहीच उपाय चालत नाही व सद्‌गुरू

पाद सेवन साधत नाही. उन्हाळ्यात बीज पेरले तर त्याचे फळ हातात येईल काय? तसे म्हातारपणी प्रयत्न करता वैराग्य लाभेल काय? पाणी वाहून गेल्यावर बांध घातला तर जमीन भिजेल काय? तसेच आपले यौवन निघून गेल्यावर जर लग्न केले तर संतान होईल काय? आपल्या जवळचे द्रव्य संपल्यावर दान करता येईल काय? अरुणोदयी स्त्री भोगावी काय? व म्हातारपणी योगाभ्यास करावा काय? या सर्व गोष्टीस सुज्ञ लोक मूर्खपणा म्हणतात. याकरिता नेहमी जागरूक राहून मोठ्या प्रीतीने त्या जगन्नायक सद्‌गुरूचे भजन करावे. आपला देह हा क्षणभंगुर आहे याचा मुळीच विश्वास धरू नये. मृत्यू चराचरास खातो. भविष्यात काय आहे तें कोणालाच कळत नाही. देवादिकांना जरी कल्पायुष्य आहे. तरी त्यांना मृत्यू सुटत नाही. मग अल्पायु माणसाची काय किंमत? याकरिता गुरुपदाचा आश्रय धरावा. मृत्यू हा सर्वांना अनिवार्य आहे. याकरिता बालवयापासूनच सद्‌गुरूचे भजन करावे नाहीतर यमदंडाचे मग कोण निवारण करेल? लोकसंहार कर्ता मृत्यू जरी भयानक आहे तरी गुरुभक्ताकडे पाहण्यास तो कालत्रयी समर्थ नाही. जोपर्यंत अंग सुदृढ आहे आणि आयुष्याचा व्यय झालेला नाही तेव्हा सद्‌गुरूचे भजन करून मृत्यूस दुखंड करून टाकावे. आधी संसारसुख भोगून मग वैराग्य साधन करावे असे जे अविवेकी लोक बोलतात, ते नेहमी दुःख भोगतात. मनुष्याच्या प्रत्येक क्षणी आयुष्याचा नाश होत असतो. मागे गेलेले दिवस पुन्हा येत नाहीत व मृत्यू अत्यंत जवळ येतो. याकरिता सुरस अशा कौमार्यात मृत्यूहारक जे धर्म आहेत त्याचे दिवसेंदिवस आचरण करावे. त्याने माणसाचा दुःख नाश होतो. जो बालपणी सत्कर्मे करीत नाही तो म्हातारपणाने ग्रासल्यावर काय करू शकेल? सर्व इंद्रिये विकल होतात आणि ती स्वकर्माचाराकरिता असमर्थ असतात. म्हातारपणी अशक्त होताच नेहमी रोग समूह त्यास पिडतात. त्यामुळे चिंताक्रांत होऊन त्याच्या मनास क्षणभरही शांतता मिळत नाही. पुत्र, दारा, गृह, धन याची आशा म्हातारपणी जास्त वाढते. भूक व तहान सुद्धा जास्त जाचतात आणि खाल्लेले अन्न पचत नाही. मलमूत्राची व्यथा फार होते आणि जाण्यायेण्याची शक्ती क्षीण झाल्यावर दुर्गंधी अशा शय्येवर तो लोळतो आणि नाना तऱ्हेचे दुःख भोगतो. अशा परिस्थितीत त्याचे हातून काहीच साध्य होत नाही. याकरिता भगवत धर्माचरणाचे लहानपणापासून आचरण करावे. यौवनात नाना विकल्प येतात त्यामुळे चित्त चंचल होते. म्हातारपण तर पराधीनच असते. तेव्हा साधनेस योग्य असे बालपणच आहे. जर पुत्रसंतती



शि व चि द म्ब र

असेल तर म्हातारपण येताच त्याची मलीन वृत्ती पाहून ते कंटाळून त्याचा अव्हेर करतात. तो काही बोलला तर लक्ष देऊन ऐकत नाहीत. त्यामुळे माणसास कष्ट होतात आणि म्हातारपणही सहन होत नाही. म्हातारपण येताच त्याला पाहून त्याचेच लोक म्हणतात की, ''हा पापी आहे, केव्हा मरेल ज्यायोगे आम्हा सुख होईल.'' याप्रमाणे तो नराधम म्हातारपणी नाना दु:खे अनुभवून अति कष्टाने मरण पावतो आणि स्वजनाचे रुदन ऐकत असतो. याप्रमाणे मरण आल्यानंतर भयंकर असे यमदूत त्याचे गळ्यात पाश घालतात आणि हाताने त्याला खूप मारतात. त्याला यमलोकी नेऊन यमापुढे उभे करतात. मग चित्रगुप्त त्याची पापे सांगतो आणि त्यानुसार यम त्याला शिक्षा करतो. यमदूत त्याला जी शिक्षा देतात ती मी काय सांगू? ते त्याला तापलेल्या तेलाच्या कढईत टाकतात. घोर वनात त्याला भोसकून त्याचा घात करतात. संसारी जो खोटे बोलतो त्याचे तोंड उघडून ते निर्दय यमदूत काचेचा तप्त रस घालतात. त्या यमयातना सांगणे अशक्य आहे. जो मूर्ख सर्वांना सोडून स्वत:च स्वार्थाने गोड खातो, त्याला यमसदनी कंकगृध्रादी पक्षी त्याचे पोट फाडून मांस खातात. जो दुष्ट बुद्धीने परस्त्रीला स्पर्श करतो त्याला तापलेल्या लोखंडाच्या खांबाला बांधतात. याशिवाय अट्ठावीस नरकालये विशेष अशी यमलाई असतात. संसारी प्रेम धरून जो नराधम पापाचे आचरण करतो त्या त्या पापाप्रमाणे यम त्याला त्या त्या नरकी घालतो. कुंमीपाकादि, रौरवादि, मोठे तीव्र दुर्धर नरक, ती अनुभवून तो जर यमयातनेने दु:खादूर होतो. याप्रमाणे यमालायी घोर यातना अनुभवून पामर जीव चौऱ्याऐंशी लक्ष जन्म आपल्या कर्मानुसार भोगतो. त्यानंतर त्याला मनुष्य जन्म लाभतो. त्यातही ब्राह्मण कुळात जन्म दुर्लभ आहे. असे हे मायेचे भ्रमण आहे आणि यातून केव्हाही सुटका नाही. ज्या दिवशी गर्भसंभव होतो, त्या दिवसापासून जीव दु:ख भोगतो. असा हा संसार आहे की, ज्यात तिळभर सुख नाही. याकरिता दुर्लभ असा नरदेह निश्चितच अलभ्य आहे, हे तू जाण. दोन दिवस कामस्नेह करून हे नरदेह रत्न गमवू नये. सत्कर्माने नरदेह हे स्वर्गद्वार आहे आणि भक्तीचा अंगीकार केल्यास तो गिरिजावर आपला जिवलग होतो आणि वैराग्य ज्ञानाने मोक्ष सुलभ होतो. अलभ्य लाभ आपल्या हाती असतानाही जो दुर्मतीने विचार करत नाही त्यास पुढे अधोगती प्राप्त होऊन यमयातनेने फजिती होते. जो नर भगवंत गुण न आठवता विषय चिंतनात आपला काळ व्यतीत करतो त्याचप्रमाणे देहाभिमानाने निश्चितच त्याची अशी गती होते की, जणू तो कामधेनूस बळेच हाकलून गाढवाचे

दूध काढण्यास बसतो किंवा कल्पवनाचा अव्हेर करून सुखाने अग्नीत प्रवेश करतो किंवा अप्सरेचा संग सोडून अस्वलाला आलिंगन देतो. तसेच सत्संग न केल्याने त्यास न टळणाऱ्या अशा नरकयातना भोगाव्या लागतात. याकरिता जन्म अराधीचे आलोचन रात्रंदिवस करावे ज्यायोगे पश्चात्ताप होतो व जन्ममरणाचे खंडन होते. खरा पश्चात्ताप होताच सर्व पापे जळून जातात. याप्रमाणे नेहमी विचार करून संसार आसार मानावा आणि विषयी वैराग्य धरून हे सर्व साधकाने साधावे. त्या पुरुषास विरागी म्हणावे. असे मन ओकारीचे भक्षण करण्यास विटते. तसा जो विषय भोगास विटतो त्यापाशी नेहमी ज्ञान असते. जरी पक्वान्न गोड असले तरी ते विषयुक्त आहे असे समजताच दूर सारावे त्याप्रमाणे विषयी भोगासी व्हावे. थंड म्हणून विश्रांती घ्यावयास सापाच्या फण्याच्या सावलीत कोण बसेल? त्याप्रमाणेच ज्याला विषय दिसताच तोच ज्ञानमंदिर होय आणि अशा लोकांस उपदेश दिल्यास तो निश्चितच दिवसेंदिवस वाढतो आणि जर विषयासक्त माणसांना उपदेश दिला तर तो व्यर्थ होय. यासाठी विषयाच्या ठिकाणी दोष शोधावे. हेच प्रथम साधन होय आणि यायोगे मनात वैराग्य उत्पन्न होते. हाच केवळ मोक्ष आहे, असा सिद्धांत वेदांमध्ये सांगितला आहे आणि चिदंबर दक्ष असा तारक आहे.''

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय तेवीसावा

नाशिक क्षेत्री श्री चिदंबर लीला

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।।श्री गणेशाय नमः ।। आपले भक्त मनात जी इच्छा करतात ती तत्काळ पूर्ण करण्याकरिता जो बद्ध, दक्ष आहे, त्या चिदंबर चरणी माझे नमन असो. चिदंबर राजारामाला म्हणाले की, "जन्मोजन्मी तू माझा भक्त होतोस आणि तू माझ्यासारखाच ज्ञानराशी आहेस. परंतु लोकांना दाखविण्याकरिता तुला उपदेश करतो. तूच पूर्णब्रह्म आहेस आणि स्वतःच्या सत्तेने सर्व ठिकाणे व्यापली आहेस. परंतु मायेचे उपाधीने अज्ञानाने तू स्वतःला विसरलास. पोपट स्वतः नलिका धरून आणि बद्ध आहे म्हणून चडफडतो तसेच देहोपाधीची कल्पना करून निष्कारणच तुझा जीव कर्मजाळी भ्रमण करीत आहे. जसे आकाश एकच आहे, परंतु मडक्याच्या उपाधीने ते निराळे दिसते आणि घटाचा नाश होताच महाआकाश एकच होते. तसाच आत्मा आदि आणि अंती एकच आहे. परंतु मायायोगाने तो अनेक रूप दिसतो. विचार करून ही उपाधी सोडल्यास स्वयंप्रकाशी असा एकच आत्मा दिसतो. आत्मज्ञानाची प्रचिती होण्याकरिता गुरुमुखाने अगोदर यथार्थ उपदेश घेऊन साधकाने 'तत्त्वमसि' या वेदवाक्याच्या अर्थाचा शांत चित्ताने विचार करावा. स्वप्रकाश सत्य सर्वज्ञ नित्य मुक्त साक्षी व निरंजन असा साक्षी आहे आणि सर्वांचा अंतरात्मा परिपूर्ण ईश्वर आहे त्यालाच 'तत्त्वमसि' असे म्हणतात. किंचितही अज्ञानाने देहाने दाखविला जाणारा भोग कर्तृत्वामुळे अहंकार प्राप्त होतो. जिवाची जाणती इंद्रिये तू या शब्दाने ओळखली जातात. हे शिष्यराया, जीव आणि शिव ऐक्य होण्याकरिता तुला उपाय सांगतो तो ऐक. दोन्ही शब्दांच्या उच्चाराला सोडून तुझे लक्ष चैतन्याकडे दे. त्याला तू साक्षित्वाने पहा. वाणीचे साक्षी जे शुद्ध चैतन्य आहे तेच मी म्हणून निश्चित कर. त्यालाच जीव ब्रह्मैक्य म्हणतात व कैवल्य मोक्षही त्यालाच म्हणतात. शुद्ध असे जीव व शिव ऐक्य आहे त्यालाच असीपद हे नाव आहे. लक्षणाने शोध करावा, जीवात्मैक्य बोध समजावा ती लक्षणे तीन प्रकारची आहेत. ती तुला नीट समजावीत म्हणून सविस्तर सांगतो. गंगेत घोष आहे असे म्हणावे तर त्यातून विशेष असा तीरार्थ निघतो. जहत् म्हणजे त्याग

जो गंगा पदास तीराऐसा आहे अन् त्याच्या एकात्मतेमुळे दोन्ही ठिकाणी जहल्लक्षण संभवत नाही. अजहत् याचा अर्थ अत्यांगपर असा आहे. तांबडा पळतो या वाक्यात तांबडे पद न सोडता रक्ताश्वय असा अर्थ निघतो. या अर्थाला 'अजहूत' म्हणतात. दोन्ही ठिकाणी विरोधाभास आहे. यामुळे येथे अजहूत संभवत नाही. याचे अर्थाकरिता भागलक्षण घ्यावी ती सांगतो ती ऐक. हा देवदत्त आहे या वाक्याने ऐक्यार्थ निघतो. त्यागात त्याग एकच वाक्यात आहे म्हणून त्यास 'जहद जहत्' असे नाव आहे. देवदत्ताचे स्थान मान, वयोवस्था सोडून मनुष्याचे पाहताच तेच ज्ञान होय. जिवाचा अल्प जाणतेपणा व शिवाचे सर्व जाणतेपणा हे दोन्ही सोडून नुसते चैतन्याकडे लक्ष दिल्यास भेद नाहीसा होतो. एकांती स्थिर आसन घालून गुरुसंप्रदायाप्रमाणे तत्त्व या गोष्टीचा एकाग्र मनाने विचार करावा जेणेकरून आत्मज्ञान होते. देहाभिमान जाण्याकरिता अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय या पाच कोशांचे विवरण करावे. शिरा, मांस, हाडे, आतडे व रोम आदी मिळून कातडे असा जो अन्नमय स्थूल देह पुढे दिसतो. ही आत्म्याला एक उपाधी आहे. देहाला जन्म मरण असते आणि देहात सर्व अमंगल असे पूर्ण भरलेले असते. आणि देह साक्षी व आत्मा परिपूर्ण आहे आणि हाच अन्नमय कोशाचे त्यागाचा उपाय आहे. अपंचीकृत भूते उत्पन्न होऊन दहा इंद्रिये, प्राण आणि अंत:करण हे मिळून लिंगदेह झाला. ही आत्म्याची दुसरी उपाधी होय. लिंगदेहात तीन कोश असतात. प्राण, मन आणि विज्ञान आणि यांचा साक्षी वेगळाच असतो जो चैतन्यरूपी आत्माच होय. प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे या जड देहास आत भरून हलवितात आणि प्राणमय कोश हाच होय. जीभ व ओठ न हलवता इच्छेमुळे होणारी प्रवृत्ती जी हृदयात उमटते हाच मनोमय कोश होय. आत्मा याहून वेगळाच आहे. अहंवृत्तीने कर्तृत्वादी अभिमान व बुद्धीने निश्चित ज्ञान ज्यायोगे व्यवहार पूर्ण होतो तोच विज्ञानकोश होय. तिन्ही कोश मिळून लिंगदेहास दुसरीच उपाधी आहे. जन्म व म्हातारपण हे दु:ख संतान जीव आपले डोक्यावर याचा भार पूर्णपणे वाहतो. यापासून आत्मा भिन्न आहे. जो सत्य व ज्ञानानंदाने पूर्ण आहे आणि साक्षित्वाने सत्तर गण जाणतो आणि अंतर्वृत्ती ज्ञानाने जाणतो. माझे घर म्हणताच घरधनी घराहून भिन्न असतो. तसेच माझा देह म्हणून लोक म्हणतात परंतु प्राणाहून देह भिन्न असतो. याप्रमाणे देह, प्राण, मन, बुद्धी हे देहामध्ये वेगळे जाणून मी कोण असे विचारले तर माझी परिस्थिती कळत नाही याचे कारण असे की, जिवाला मायेचे आवरण असते. यामुळे संसारभयास


शि व चि द म्ब र

पाहून जाणून सुद्धा तो नेणता होतो. मला मी ओळखत नाही आणि माझे अज्ञान जाणणारा कोण आहे. ज्याप्रमाणे वक्ता म्हणतो की मला जीभ नाही. मला मी ओळखू शकत नाही. माझे अज्ञान जाणणारा कोणी नाही. आपले अज्ञान आपणच जाणले तोच साक्षी आत्मा होय. याकरिता देहांच्या तिन्ही उपाधी सोडून आधी आत्म्याचा विचार करावा. या तिन्ही उपाध्यांहून मी भिन्न व शुद्ध आहे असे म्हटले तरीही भ्रम सुटत नाही. निश्चित ज्ञान होण्याकरिता दृढ अभ्यास पाहिजे व त्यावाचून भ्रम जाणार नाही. बऱ्याच जन्माचे देह ध्यासाने झालेला देह म्हणजेच मी होय. हा भ्रम दृढ अभ्यासाशिवाय जाणार नाही व मी ब्रह्म आहे हे समजणार नाही. भुंग्यांच्या भयाने जसे जीव-जंतू भ्रमर होतात त्याचप्रमाणे ब्रह्माच्या अभ्यासाने मनुष्य ब्रह्मपर पावतो. एकांती मऊ आसन घालून कृष्णाजी नावावर सुखासन घालून एकाग्र मन करून बसावे. नंतर मनात गुरुंचे स्मरण करून त्याची षोडशोपचाराने पूजा करावी आणि त्याचे चरणावर डोके ठेवावे. नंतर गान सरळ धरून मुळीच हालचाल न करता स्थिरासनावर बसून नासाग्री दृष्टी ठेवून इकडे तिकडे पाहू नये. तिन्ही प्राणायाम करून विषयांपासून चित्त बाजूला घेऊन निर्भय अंत:करणाने मनात विचार करावा. तिन्ही देह मला नाहीत, तेव्हा मी देही कसा असू शकेन. मी देहत्रयाचा नुसता साक्षी असून मी सर्व ठिकाणी व्यापूनही अलिप्तच आहे. मी सर्वत्र परिपूर्ण असा पूर्णब्रह्म आहे. तसेच निर्विकम निर्मोह व अदेह असून स्वप्रकाशी आहे आणि माझेमुळे सर्व प्रकाशित होतात. मीच खरा अविनाशी आत्मा आहे आणि तेजोरूपी दुसरा कोणी नाही. दुसऱ्या देहाप्रमाणे मला जन्म व म्हातारपण नाही. निर्विकार अशा मला मुळीच मळ नाही. सत्य, ज्ञानाचे आनंदात मी असतो. मला प्राण नाही, आकार नाही, मन नाही, सर्वसाक्षी असा मी नेहमी मुक्त व निर्गुण अकर्ता व असंग असा आहे. माझ्या प्रकाशाने सर्व इंद्रिये आपल्या कर्मांचे आचरण करतात. मला उपाधी नसून मी केवळ द्रष्टा आहे. तसेच जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना मीच साक्षीभूत आहे. उगाच बसले असताना अंत:करणात मी आहे म्हणून जी स्फूर्ती होते तिलाच निश्चित ब्रह्म म्हणून समजावे. यायोगे निर्विकल्प स्थिती येते. या स्थितीचे मनात जे ध्यान करताच येथूनच कल्पनाजाल निघतात. तेच निश्चित मायारूप होते. म्हणून एकाचे अनेक करून दाखवितात. नेहमी आत्मा एकच असतो, परंतु संकल्प सारखे बदलत असतात आणि प्रत्येक वेळी जी वस्तू भिन्न दिसते ती निश्चित खोटी असते. मायाही केवळ सत्य नसते. सर्व जग मायेने पूर्णपणे भरलेले

आहे आणि मायेचा नाश होताच आत्मा स्पष्ट दिसतो. म्हणून बुद्धिमान लोकांनी मायेचा नाश करण्याचा अगोदर प्रयत्न करावा आणि मायेचा नाश होताच सहजच आत्म-साक्षात्कार होतो. मायेचा नाश होण्याचा मुख्य उपाय म्हणजे संकल्पक्षय हाच होय आणि संकल्पक्षयाचा उपाय म्हणजे संकल्प साक्षीत्व होय. एक कल्पना नाश होऊन जर त्या जागी दुसरी कल्पना उत्पन्न झाली नाही तर तीच सुंदर अशी निर्विकल्प स्थिती होय. जीला अभ्यासाने वाढवावी असता तीच स्वरूपस्थिती होय. जी संकल्पाचा नाश होताच प्रकट होते व जिची वेद स्वरूप स्थिती, जीवन मुक्ती असा डांगोरा पिटतात. याप्रमाणे नेहमी आत्माविचार करून हा अज्ञानी संसार सोडावा. ज्यामुळे जीवनमुक्तिरूपी नवरी तुम्हाला माळ घालील याप्रमाणे अभ्यास करून अनुभवाने निश्चित तू संतुष्ट होशील. नित्य अभ्यास याकरिता आवश्यक आहे. तो मोठ्या आदराने करून तू मुक्त हो, असा नेहमी अभ्यास केला-तर देहभान नाहीसे होते. ब्रह्मस्फूर्ती दृढ होते आणि यायोगे जीवनमुक्ती आपल्या हाती येते. सर्वसाक्षी अशा आत्म्यास जो मनुष्य प्राणी निश्चित जाणतो त्याला ब्रह्मांडासहित त्याचा देह शून्याप्रमाणे वाटतो. त्यानंतर तो चिद्रूप, अनंत, अपार आनंदविग्रह आणि अस्तित्वाने प्रखर भासतो व तो निरुपाधिक असतो. देहातीत असून जीवनमुक्त असतो. लौकिकी नेहमी इतरांसारखाच दिसतो परंतु उठता बसता व चालताना दोष, गुणाने अलिप्त असतो. आनंदाने परिपूर्ण असतो. जीवनयुक्त असून उदासीन असतो. कोणतेही कार्यकारण त्यास शिवतसुद्धा नाही. मोक्ष-सुख साधण्याकरिता हे सख्या राजारामा, नेहमी असा अभ्यास करावा व चालताना, जेवताना व झोपताना जिवाभावाने गुरूचे चरणाचे सतत स्मरण करावे. साधकाने नेहमी विचार करावा व अहंकारास कदापिही स्पर्श न करिता जे जे चराचर दिसेल त्यातील सार तेवढे त्याने घ्यावे. नेहमी चित्त चैतन्यावर ठेवावे. खोटे असे नामरूप दूर ठेवावे. अंतरी द्वैतभाव असू नये व मन निराकारी ठेवावे. इंद्रिये कर्म करीत असता मी स्वत: निष्कर्मी असून नुसता साक्षी आहे असे समजावे. असे कर्माचे वर्म जाणून अकर्तृत्व नेहमी दृढ धरावे. मी अकर्ता असून नुसता द्रष्टा आहे. मग मी कर्मकर्ता कसा असू शकेन? तसेच कोणतेही सुखदु:ख मनात आणता नेहमी अलिप्त असावे. कोणाचाही द्वेष, निंदा न करता आपले व्यवहारात सावध असून कर्म करताना सुद्धा आत्मानुसंधान विसरू नये. केलेल्या कार्याचे फळ मिळो अथवा न मिळो दोन्हीतही समानता मानून गुरुचरणाचे नित्य चिंतन करावे. काया, वाचा, मनाने कोणाचेही



शिव चिदम्बर

शि व चि द म्ब र

अंत:करण दुखवू नये. संतोषाने नेहमी शांतता धारण करून नामस्मरणाने पापांचा समुदाय जाळावा. प्रयत्नाने दुष्टांचा संग दूर करून आदराने साधुसंग धरावा. मोह, आळस व विषयभोग सोडून मन अभ्यासात गुंतवावे. आपली मनोवृत्ती बाहेरील कोणतेही विषयावर परोपकाराशिवाय सोडू नये. नेहमी ध्यानवृत्ती राखावी जेणेकरून मोक्ष साधतो. मोह व आळसाने मनोवृत्ती जर विषयांकडे वळली तर मोठ्या प्रेमाने नामस्मरण केल्यास त्याने शांतीचा लाभ होतो. आपली वृत्ती बाहेरील विषयांपासून आवरण्याकरिता हे सख्या, दोन उपाय आहेत व ते म्हणजे प्राणायाम व नामस्मरण होय. या योगे वृत्ती शांत होते. असे हे दोन उपाय समर्थ आहेत आणि त्यामुळे मन ब्रह्मचिंतनी लागते. म्हणून सतत अभ्यास केल्याने वृत्ती जरी बाहेर गेली तरी तिला बाहेरून खेचून आणून आपले हृदयात स्थापन करावी व आत्मचिंतन साधावे. प्रतिष्ठेला तुच्छ मानून सर्वांशी नम्र वाणीने बोलावे. देह हा नीच आहे हे सत्य आहे तरी अंतरी ब्रह्मता अवश्य धरावी. मी शाश्वत असा सर्वात्मा आहे परंतु देहनाश पावणारा असून त्याचा माझा काहीच संबंध नाही असा निश्चित भाव धरावा. ब्रह्मापासून चिलटापर्यंत सर्व स्थूल सूक्ष्म जीवात भगवंत असतो. तरी काया-वाचा-मनाने कर्म करताना कोणाचा अपमान करू नये. दुर्जन लोक खुशाल दुष्टपणाने बोलू द्यात किंवा त्यांनी मारू द्यात, पण ते शांततेने सहन करून आपण स्वत: प्रेमाने मृदूवचन बोलावे. शुभाशुभाचा त्याग करुन सर्व संकल्प सोडून, लोकलज्जा सोडून नेहमी गुरु आज्ञेचे पालनास दक्ष असावे. गुरूच आद्य जाणावा. त्याचेच नेहमी चिंतन करावे. गुरु हा त्रिकाळी पूज्य असून नेहमी गुरुच वंद्य जाणावा. गुरुसारखी मोठी वस्तू ब्रह्मांडातही मिळणार नाही आणि गुरुच मातापिता स्वजन आणि आप्त हे सर्व आहेत असे निश्चित समजावे. गुरुचरणाचे ध्यान करताच सर्व कामना पूर्ण होतात. ब्रह्मा, विष्णू व महेश गुरुध्यानाने संतुष्ट होतात. संसार सागरातून तारण्यास गुरुसारखा दुसरा कोणीही देव नाही. गुरुकृपेने ब्रह्मज्ञान प्राप्त होते. गुरुला आपले सर्वस्व अर्पण करून त्याचे नेहमी चिंतन करावे. कारण गुरुशिवाय कोणी तरले आहे. ब्रह्मादिक सुद्धा गुरुपदी रमतात, असा निश्चय करून सर्वांचे ठिकाणी गुरुला पाहवे आणि त्यांची प्रेमाने मानसपूजा करावी. फोटोच्या ठिकाणी गुरुच मानावा व नेहमी षोडशोपचारी त्याची पूजा करावी. मोठे संतोषाने स्तोत्रे मंत्र व नमस्कार करावा. आपल्यास जी वस्तू प्रिय असेल ती गुरुस समार्पण करावी. गुरुचरणांचे तीर्थ घ्यावे. गुरुप्रसाद अन्नाचे नित्य सेवन करावे व गुरुनाम मुखी दृढ धरून शूचिर्भूत होऊन

शि व चि द म्ब र

गुरुजवळ असावे. गुरुचे मनात काय आहे ते जाणून त्याप्रमाणेच स्थिर चित्ताने करावे तसेच गुरुला सोडून आपले हित साधण्याचा प्रयत्न करू नये. कारण गुरुहित आहे तेच आपले हित समजावे. आपल्यात उत्पन्न झालेले त्रिताप जरी गुरुचे ध्यानात आले तरी अंत:करणात भिऊ नये कारण, गुरु रक्षण करण्यास समर्थ आहे. मनात केव्हाही राग न धरता पर्वताप्रमाणे धीर धरावा आणि जितेंद्रियत्व नेहमी राखावे कारण तो समर्थ गुरु सर्व जाणतो. याप्रमाणे गुरुभक्ती दृढ धरून सगुण असे अखंड भजन करत आत्मानुसंधानी दृढ चित्त ठेवून सुखाने सर्वत्र संचार करावा. याप्रमाणे ब्रह्माभ्यास करता दिवसेंदिवस ब्रह्मज्ञान वाढते आणि अज्ञानाचा नाश होऊन जीव स्वानंदी समरस होतो. असे झाल्याने मग तू अनुभवानेच तुष्ट होशील आणि संसार कष्ट नाश पावतील. तुझे वरील सर्व अरिष्ट टळेल म्हणून गुरुभजनी धीट हो.'' एवढे बोलून सत्गुरुनाथाने राजारामाचे डोक्यावर आपला हात ठेवला व त्याचे तोंडात भस्म ठेवले तोच त्याला सर्व ज्ञान प्राप्त झाले. त्या दिवसापासून त्या राजाराम भक्ताने चिदंबर यशाचे गुणवर्णन करण्याकरिता बरेच अभंग रचले ज्यायोगे भक्तिज्ञान पंथ प्रकट होईल. करुणाकर, ज्ञानपर, बोधपर, वैराग्यपर, कथापर व स्तुतीपर असे कित्येक अभंग तो तयार करू लागला. एकूण एक लक्ष एक्कावन्न हजार चारशे अभंग करून त्याने सद्गुरुस तोषविले. श्री. चिदंबराचे कीर्तीप्रमाणे राजारामाचे यशासही प्रकाश पडू लागला व गुरुपादुका आपल्या हृदयास बांधून त्याने भूप्रदक्षिणा केली. गुरुचे आज्ञेप्रमाणे चिदंबराची भोगमूर्ती घोड्यावर बसवून गुरुवर शिष्यांचे हातून छत्र, चामरे धरून चिदंबर कीर्ती गात असे. बरोबर शिष्यांचे समुदाय घेऊन टाळ, वीणा व मृदंग वाजवीत, प्रेमरंगाने भरलेल्या अशा भजनाने गोड अभंग गात असे. तो ज्या ठिकाणी सहज जाईल तेथे चिदंबर कीर्तीचे वर्णन करून लोकांस सांगत असे की, नेहमी चिदंबरनाम आळवावे ज्यायोगे महाभव निश्चित चुकेल. याप्रमाणे सर्वांना बोध करून कित्येकांना भक्तिमार्गास लावले आणि कित्येक क्षेत्रे फिरत प्रसिद्ध अशा नाशिक क्षेत्रात तो आला. तेथे गंगेत स्नान करून गुरु पादुकांवर तुळस वाहात बसला. तो तेथे काही ब्राह्मण लोक आले. त्यांनी जोड्यांवर तुळस वाहिलेली बघितली. तो त्यांना भयंकर संताप आला व ते राजारामास मारावयास आले तोच त्यांना वंदन करून राजाराम म्हणाला की, ''अहो दयावंत स्थिर अंत:करण करून एक क्षणभर बसावे.'' याप्रमाणे त्या ब्राह्मणांना बसवून चिदंबराचे स्मरण करू लागला व नंतर चिदंबराचे कृपेने त्यांना म्हणाला की, ''हे ब्राह्मणहो, आपल्या

घरातील देव मला दाखवा व नंतर मला शिक्षा द्या. माझे एवढे म्हणणे तुम्ही ऐकावे हीच माझी तुम्हाला विनंती आहे.'' एवढे म्हणून त्याने त्यांना साष्टांग नमस्कार घातला. नंतर ते सर्व ब्राह्मण आपल्या घरी जाऊन पाहताच देव्हाऱ्यात त्यांना जोडे दिसले. ते पाहून ते ब्राह्मण तटस्थ झाले. त्यांना मोठ्या विनयाने राजारामाने विचारले की, ''आपले घरीसुद्धा पादुकामय दैवत असता माझेवर का रागावता, तरी आता पूजा करावयाची आज्ञा द्यावी. मी माझे ठिकाणी जातो आणि माझेबद्दल तुमच्याकडे क्षमा असावी, हेच तुमचे चरणापाशी माझे मागणे आहे.'' त्या भक्ताची सविनय वाणी ऐकून त्या ब्राह्मणांनी हा भक्त शिरोमणी दिसतो व याचेशी विरोध केल्यास आपली हानी होईल असा विचार करून राजारामाची नाना प्रकारे विनवणी केली व आपले देव्हारी पूर्वीप्रमाणे देवांची स्थापना केली. सर्व लोक निंदा सोडून त्याचे वचन मान्य करू लागले. असे चरित्र दाखवित राजारामने भूप्रदक्षिणा संपविली. चिदंबराची कीर्ती सर्व दिशांना पसरवून बहुतेक लोकांना भक्ती मार्गास लावले व गुरुचरणाजवळ परत आला. गुरुदक्षिणाकरिता ब्रह्मा, विष्णू आदि सर्व देव मोठ्या दाटीने गुप्त रूपाने भेटीत असत परंतु राजाराम ते दृष्टीने पाहत असे. असा हा भक्तीचा महिमा आहे. जो निष्काम गुरुला भजेल त्याला देवदर्शन अगदी सुलभ होते तरी मोठ्या प्रेमाने गुरुस भजा. राजारामाने रचलेल्या अभंग ग्रंथावर ज्याचा विश्वास असेल त्याचेवर चिदंबरकृपा निश्चित होईल याची प्रचिती पाहवी. जे मानवाला असाध्य आहे ते चिदंबर कृपेने साध्य होते म्हणून चिदंबर चरणास सर्व काळ भजा.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय चोवीसावा

मांत्रिक गर्वहरण

|| श्री शिव चिदम्बराय नम: ||

|| श्री गणेशाय नम: || एके वेळी एक थोर शास्त्री मंत्रशास्त्र जाणणारा गर्वाने दिग्विजयार्थ निघाला. यात्रेच्या निमित्ताने त्याला जेथे जावयाचे असेल तेथील ब्राह्मणांना बोलावून वादात त्यांना जिंकून त्यांचेकडून जयपत्र घेत असे. अशी बरीच ठिकाणे हिंडून तो श्री शेषाचलास आला. तेथील व्यंकटेशाचे वैभव पाहून त्याच्या मनातील आशा वाढली व त्याने व्यंकटेशास नवस केला, ''सहा हजार रुपये मला द्यावे व मगच येथे निवास करावा नाहीतर तुझे देवत्व मी राहू देणार नाही.'' असा नवस करून तो तेथे तीन दिवस राहिला. परंतु त्याला किंचितही द्रव्य मिळाले नाही. त्यामुळे तो खूप रागावला. मग त्याने स्नान करून ताबडतोब अनुष्ठानास आरंभ केला व ज्याला कलाहरण असे नाव आहे असा मंत्र जपू लागला. पाण्याचे भांडे पुढे ठेवून मंत्रबळाने एक एक कळा काढून तो त्या भांड्यात ठेवू लागला. रोज तो आठ कळा काढीत असे. त्या दिवशी रात्री एका अधिकाराचे स्वप्नात व्यंकटेश येऊन म्हणाला, ''हा अतिशय क्रूर असा मांत्रिक आहे आणि माझे कलाहरणाची तो खटपट करीत आहे. व आज एकाच दिवसात त्याने माझ्या आठ कळा उतरवल्या. त्याला सहा हजार रुपये देऊन येथून निरोप दे नाहीतर उद्या हा माझ्या सोळा कळा उतरवील. अशा तऱ्हेने माझ्या देवत्वाचे हरण झाल्यास मला पुढे कोण विचारील. मंत्रबळाने आमचे देवत्व व सत्य गेल्यास मग आमचे महत्त्व उरणार नाही. याकरिता त्या विप्राला निरोप दे म्हणून त्याच्या जवळील मंत्रोदकाने आम्हाला अभिषेक करावा.'' असा स्वप्न दृष्टांत देऊन श्री व्यंकटेश अंतर्धान पावला. सकाळी अधिकाऱ्याने उठून त्या मांत्रिकाचे हे दु:साहस पाहून भिऊन त्याला रुपये पाठवले व त्याजवळील मंत्रोदक आणून व्यंकटेशास विधियुक्त अभिषेक करविला, हे पाहून तो ब्राह्मण मांत्रिक मंत्र गर्वाने उन्मत्त झाला. आधीच तो उन्मत्त होता, त्यात तो पूर्णपणे विद्वान होता आणि देवानेच त्याचे लाड पुरविले. त्यामुळे त्याला उन्माद चढला. आधीच वानर त्यात मद्य प्यायले आणि त्याला विंचू चावला. मग त्या वानराच्या कृतीचे कोण वर्णन करील? आधीच ब्रह्मराक्षस

असून त्यावर मंत्राने अक्षता घालताच मग त्याच्या परीपिडेला काय विचारावे आणि तो कोणासही जिवंत ठेवील. आधीच मूल नाठाळ असले आणि फाल्गुन महिना आला मग त्याचा खेळ रसाळ म्हणून पाहवा याप्रमाणे तो मांत्रिक उन्मत्त होऊन कोणास न जुमानता आपले स्वत:चेच स्तवन स्वतः करीत असे. दिग्विजयाची कामना धरून अनेक ठिकाणी हिंडून चिदंबर कीर्ती ऐकून दुष्ट बुद्धीने म्हणाला, एक दिवस मी रमानाथ मंत्रबळाने हालविला. तेव्हा दिक्षित नावाचा मानव त्याला एका क्षणातच जिंकीन अशा गर्वोक्तीने गुरुपत्तनी आला आणि त्या मांत्रिकाला पाहून लोक गडबडून गेले व बोलू लागले, गुरुजी; एक अति क्रूर मांत्रिक आला आहे. तो दुष्ट निष्ठुर असा कलाहारक असा आहे. याला भिऊन व्यंकटेशाने ताबडतोब त्याला द्रव्य दिले. काही तरी उपाय करून त्याला माघारी पाठवावे. हे दयासागरा, करुणाकरा नाही तर समय फार बिकट आहे. मांत्रिकाची किंचितही भीती मनात आणू नका. तो सर्वेश्वर समर्थ आहे. सर्व कर्ताहर्ता महेश्वर आहे आणि शरणागताचे तो नेहमी रक्षण करतो आणि नेहमी जागरूक असतो असे शिष्यांचे स्वामींनी सात्वंन केले व इतक्यातच तो मांत्रिक चिदंबराजवळ आला. त्या मांत्रिकाचे शिष्य चिदंबरापुढे निष्ठुर वचन बोलू लागले. ''आमचा गुरु त्रिलोकी विजयी आहे व त्याने मंत्राने पाशमोचन केले आहे त्याची भीती मनात न धरता तू स्वत:ला या भूलोकावर 'शिवावतार' म्हणवतोस म्हणून तुला सांगण्याकरिता आलो आहोत. जर तू खरोखर महेश्वर असशील तर पूर्वमंत्राचा शाप परिहर लवकर कर नाहीतर ताबडतोब शरण ये. आमचा गुरु फार कठीण आहे तो तुझे कलाहरण करील. क्षणातच त्याला व्यंकटेश भ्याला. त्याच्यापुढे कोणता मानव टिकू शकेल? याप्रमाणे त्या मांत्रिक शिष्यांचे निष्ठुर भाषण ऐकून तो सावित्री रमण म्हणाला की, ''सर्वेशाच्या अनंत कला आहेत. मी तर एक कलाहीन मानव आहे. माझे कलाहरण तो काय करेल? खेळ अघटित आहे नुसते तोंडाने बरळू नये. गरिबाचे घरी चोर शिरल्यास त्याला धन वगैरे काही न मिळता त्याला दु:ख होते. आकाशाची मोट बांधणे, वाऱ्याला आवळून धरणे, लोण्याला वाटून त्याला बारीक करणे, याप्रमाणेच त्या चोराला यश मिळत नाही. लोण्याकरिता पाणी घुसळणे, वाळूचे तेल काढण्याकरिता प्रयत्न करणे किंवा कमल आणण्याचा प्रयत्न करणे याप्रमाणेच त्या चोराला यश मिळणार नाही. गंधर्वनगर शृंगारणे, वांझेच्या मुलाचे लग्न मांडणे, स्वप्नातील द्रव्याने व्यापार करणे हे जसे अशक्य त्याप्रमाणे शंभूकलेचे हरण करणे अशक्य

आहे. ते मांत्रिक शिष्य स्वामींचे वचन ऐकून क्रोधाने आपले गुरुपाशी जाऊन त्याने चिदंबराशी झालेले संभाषण सविस्तर सांगितले व म्हणाले, ''आपले अनुष्ठान चालू करा म्हणजे चिदंबर आपोआप शरण येईल.'' असे शिष्यांचे बोलणे ऐकून त्या मांत्रिकाला फार राग आला आणि त्याने ताबडतोब स्नान करून कलाहरण मंत्राचे पुरश्चरण करून तीव्र अनुष्ठानास सुरुवात केली कारण तो घातकी व निर्दयी होता. मांत्रिकाची ही करणी पाहून राजे लोकांना खेद झाला. व त्यांनी स्वामींना विनंती केली की, ''मांत्रिक फार रागावला आहे व त्याने पुनश्चरण आरंभिले आहे. त्यामुळे समय पुढे कठीण दिसतो. तरी आम्हास निरोप द्यावा. आम्ही उपाय करून परत पाठवू तेव्हा तो विश्वव्यापक बोलला की, ''तुम्ही अजिबात भिऊ नका. त्याचे अनुष्ठान चालू दे व शक्ती सारखे तुम्ही साहाय्य करा.'' असे चिदंबराचे अभयवचन ऐकून सर्व लोकांना आश्चर्य वाटले. इकडे सात दिवस निराहार राहून मांत्रिकाचे अनुष्ठान चालू होते. इकडे चिदंबराची लीला रोज वाढू लागली. ते ऐकून तो मांत्रिक अतिशय खवळला व त्याने दुसऱ्या पुरश्चरणास सुरुवात केली तोच त्याला मंत्राचा विसर पडला आणि पुस्तक पाहताच आंधळा झाल्यामुळे आपले शिष्याचे खांद्यावर हात ठेवून गुरुचे अंगणात आला. त्याला पाहून चिदंबर म्हणाले, ''हे स्वामी, आपण धन्य आहात, मंत्र शापमोचन करणारे आहात आणि येथे येणे आपले काय कारणाने झाले?'' तेव्हा मांत्रिकाने त्यांना नमस्कार केला. मग त्या मांत्रिकाचे शरीरास स्पर्श करून तो करुणाकर उठ असे म्हणाला, त्याच्या विद्येचा स्वीकार केला. मांत्रिकाचे शरीरास विद्येने स्पर्श करताच चिदंबराने त्याची विद्या आकर्षून घेतली आणि अज्ञानाने तो शास्त्री गडबडून पाया पडून विनवू लागला की, ''स्वामीराया, पुढे माझी गती काय होईल, हे मला निश्चित सांगा व देव व द्विज यांचा क्षोभ मला घडला आहे. तरी हे उमापती, मी आता काय करू?'' तेव्हा स्वामी मांत्रिकाला म्हणाले, ''आता तुला काय सांगावे? जे फळ पेरलेस ते भोगावयास सिद्ध हो. जसे करावे तसे भरावे. स्वकर्माचे फळ स्वतःच घ्यावे. आता तुला काय सांगावे? आधीच आपण सावध असावे. देव, द्विजांचा क्षोभ तुला घडला आहे. त्यामुळे यमदंड निश्चित झाला आहे. तरी होणारे परिणाम आनंदाने भोगावे.'' हे गुरुवचन ऐकून तो मांत्रिक थरथर कापू लागला व चिदंबराचे पायावर पडून, ''हे गुरुराया, तू मला तार असे म्हणू लागला. हे करुणासिंधू, तू माझा सांभाळ कर. स्वतःच्या कर्माने मी नरक सागराला निघालो आहे. परंतु तुझे पदकमल नुसते पाहून पापी लोकही मोक्षाला गेले. पूर्वी तू

शि व चि द म्ब र

वैऱ्यांनाही सद्गती दिली आहेस. म्हणून तुझे पदकमलाला हे देवा, मी शरण आलो आहे. माझे अपराध पोटात घालून हे जगजेठी मला सांभाळ, माझ्यावर कृपादृष्टी ठेव.'' असे म्हणून त्याचे दोन्ही डोळे पाण्याने भरून आले. मांत्रिकाचा पश्चात्ताप पाहून चिदंबराची पोटी कृपा उपजली व त्याचे डोक्यावर हात ठेवून त्यावर अनुग्रह केला तेव्हा त्याचे मन शांत होऊन तो विधियुक्त गुरुसेवा करू लागला. त्यास भक्तांमध्ये राहण्यास महास्वामींनी आज्ञा दिली. असा गुरुचा प्रभाव आहे जो शत्रुमित्री समान असतो. कोणताही भाव धरून चित्तात गुरुचरण आठवावेत. वैरभावाने शरण, प्रेमभावाने उद्धव, अर्पण भावाने गोपीगण, मोक्षपदाला गेले. याकरिता कोणतेही भावाने सद्‌गुरु चरणी चित्त ठेवल्यास माणूस मोक्षास जातो हे त्रिवार सत्य आहे. गुरुजवळ सत्याने वागावे, गर्वरहित व आर्जवाने असावे. यायोगे जे कार्य साधते ते तुम्हाला सांगतो. ज्याचे चैतन्य बळाने देह, इंद्रिये व अंत:करण वेगळे आहे व स्वत:विषयी निरनिराळे आहे. ते जड असूनही चेतन दिसतात. मागील अवतारी सज्जनांचे पालन व दुर्वत्तनाश आणि या अवतारी ब्राह्मणत्व धरून स्वामी दुसऱ्याचे मन दुखवीत नसत. असेच एके दिवशी एक पूर्व देशस्थ ब्राह्मण जो वेद पारंगत होता तो सहकुटुंब चिदंबराचे भेटीस आला. येऊन गुरुस त्याने नमन केले. त्याला सद्‌गुरुंनी मोठ्या आदराने उठवून कुशल प्रश्न विचारून मोठ्या सन्मानाने आपले जवळ बसवले. सर्वांचे अंतरंग जाणणारा तो गुरु; त्या ब्राह्मणाचे चित्त ओळखून त्यास एकांतात बोलाविले व आदराने त्याला विचारले की, ''हे श्रोत्रिया, तू काशी यात्रेस जाऊ इच्छितोस काय ते मला सांग.'' हे स्वामींचे वचन ऐकून त्या ब्राह्मणाने दोन्ही हात जोडून करुणावचनाने विनंती केली. ''दरिद्र्याचे मनोरथ उत्पन्न होतात व लगेच लयास जातात. मी अगदी अनाथ आहे. तेव्हा मनोराज्यातच माझी यात्रा होय. दर महिन्यास कुटुंबरक्षणासाठी शंभर रुपये लागतात तेव्हा जगजेठी अशा दरिद्र्याला मोठी यात्रा करणे कसे शक्य आहे. त्याप्रमाणे ब्राह्मणाची करुण वाणी ऐकून तो कृपादानी बोलला की, ''तू सर्व चिंता सोड व यात्रेचा संकल्प करून ये. तुला यात्रेस जितके द्रव्य लागते ते मी तुला देईन. मग तू आनंदाने यात्रेला जा.'' मग तो ब्राह्मण यात्रेचा संकल्प करून ताबडतोब स्वामींजवळ आला. तेव्हा त्या विश्वपतीने त्याला दोन होन दिले. त्यानंतर तो ब्राह्मण चिदंबरावर विश्वास ठेवून क्षेत्र यात्रेकरिता निघाला. त्याने ते दोन होन खर्च करताच पुन्हा दोन होन उत्पन्न होत असे. ते दोन अक्षय होन पाहून त्याच्या मनाला फार समाधान झाले. ज्या ज्या ठिकाणी

तो यात्रेला जाई तेथे दक्षिणा, अन्न व दान पुष्कळ देऊन पुष्कळ द्रव्य खर्च करी व विप्रांना संतोषवीत असे. याप्रमाणे त्रिस्थळी यात्रा करून तो गुरुपुरास परत आला आणि आनंदाने गुरुस त्याने वंदन केले तेव्हा चिदंबराने विचारले की, ''बऱ्याच दिवसांनी भेटतो आहेस. तुझी त्रिस्थळी यात्रा यथाविधी पार पडली किंवा कसे.'' तेव्हा वंदन करून ब्राह्मण म्हणाला, ''तुमचे कृपेने यात्रा व्यवस्थित पार पडली. आपली कृपा असता भक्तास काय कमी पडेल?'' तेव्हा गुरुने हसत त्या ब्राह्मणास विचारले की, ''मी तुला दोन होन दिले होते ते आहेत का खर्च झाले?'' हे ऐकून ब्राह्मणास शंका आली की, आहेत म्हणून सांगितले तर परत करावे लागतील व त्यामुळे कुटुंब हानी होईल. परंतु सद्‌गुरुसारख्या अंतर्ज्ञानी माणसापुढे साशंकता, कपटाने, स्वार्थ साधन व खोटे बोलणे हा मूर्खपणा होय. तसेच आई-बापांची वंचना करणे व सासुरवाडीस जार कर्म करणे, राजास प्रिय असलेली वस्तू चोरणे हाही मूर्खपणाच आहे. स्वत:चेच अपराधाची भीती न बाळगता दुसऱ्यास दोष देणे, अतिथीला न देता आपणच पक्वान्न खाणे हाही मूर्खपणाच आहे. आप्तांशी देणे-घेणे, एकांती मित्रांच्या स्त्रियांशी बोलणे, केलेले पुण्य लोकांना सांगणे ही सर्व मूर्खपणाची लक्षणे आहेत. असो तरीही त्या ब्राह्मणाने सांगितले की, ''ते होन आजच संपले.'' तेव्हा गुरु 'तथास्तु' म्हणाले. तेव्हा त्या ब्राह्मणास भीती वाटली व आपले ठिकाणी जाऊन पाहता ते होन दिसले नाहीत त्यामुळे त्याला मूर्च्छा आली. नंतर शुद्धीवर आल्यावर अतिशय आतुर होऊन तो ताबडतोब गुरूजवळ आला व म्हणाला की, ''माझ्याकडून फार मोठे पाप घडले आहे. हे जन्माऊली, मी मूर्खपणाने तुमचे जवळ खोटे बोललो तरी माझेवर कृपेची सावली असावी.'' असे म्हणून जमिनीवर गडाबडा लोळू लागला. तेव्हा तो सच्चिदानंद म्हणाला की, ''तू खोटे का बोललास. सत्यासारखे शुद्ध व्रत दुसरे कोणते नाही असे वेद सांगतात. सत्य वचनाचे ठिकाणी तो आनंदधाम परब्रह्म नेहमी वसत असतो. व्रतांमध्ये उत्तम व्रत म्हणजे सत्य भाषण होय. जे मोक्ष देणारे आहे. जरी मरणकाळ जवळ आला तरी सत्याला सोडू नये. परंतु ज्यायोगे गोब्राह्मणांचे रक्षण होईल असे असत्य क्वचित बोलावे. सत्याने मोक्ष लाभ होतो. असत्याने नरक लाभ होतो व सत्य बोलणाऱ्यास आपोआपच सुख मिळते आणि असत्य बोलणारा नेहमी दु:ख भोगतो. असा वेद सिद्धांत आहे. तेव्हा मी तुला काय सांगू? आपले कर्म आपणच भोगावे. त्याला कोणताही उपाय नाही.'' हे गुरुवचन ऐकून त्या विप्रास पश्चात्ताप झाला आणि

म्हणाला की, "या पाप्याचे रक्षण करावे" व गुरुचे चरण धरले. "स्वामी, पापकर्मा असा मी पापी आहे. मी पाप उत्पन्न करणारा पापात्मा आहे आणि सद्‌गुरुची वंचना करून नरकास जात आहे, तेव्हा हे पुरुषोत्तमा, माझे रक्षण कर, हे दिनबंधू, माझा सांभाळ कर. हे करुणासिंधू, मी तुला साष्टांग नमस्कार करतो." असे म्हणून गुरुंच्या पायास वंदन करून खूप रडू लागला. तेव्हा त्या करुणानिधीने मोठ्या प्रेमाने ब्राह्मणास उठवून त्यावर कृपा केली व त्यास सन्मार्गाचा बोध केला याप्रमाणे चिदंबराची भक्ती ही निश्चितच सर्वार्थ पुरवते आणि त्या गुरुमाउलीने सर्व लोकांचा उद्धार व्हावा म्हणून या कलियुगात अवतार घेतला आहे. कलियुगात लोक मंद बुद्धीचे असतात आणि त्यांना सुख मिळावे म्हणून तो कैलासनाथ सांब प्रत्यक्ष अवतरला. अनेक ठिकाणी त्याने चरित्र दाखविले. ते नुसते ऐकून सुद्धा पापी लोक दोषांपासून मुक्त व पुनित होतात. तरी लोकहो, या चिदंबर किंकराची वाणी ऐकून निश्चित सुखाचा अनुभव घ्या, हीच सर्वांना विनंती आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

# अध्याय पंचवीसावा

वैष्णव लोकांना विष्णुरूप दर्शन

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे कैवल्यगुरु, जिवेश्वरा, हे परमगुरु, हे रामेश्वरा, चिदंबरा तुला माझे नमन असो. नाना रूपे व नाना अवतार घेऊन हे सर्वेश्वरा, तू लीला दाखवतोस. आदी कर्ता मायादेवी भ्रतार अशा सद्गुरू चिदंबरा तुला नमन असो. तुझ्या कृपादृष्टीने जीवभाव उरत नाही. मी पामर तुझा महिमा काय वर्णन करू. तुझे पायी माझे एवढेच मागणे आहे की मला वरदवाणी देऊन तुझे चरित्र मी पठण करताच सर्व संसारभवापासून माझा उद्धार व्हावा. तुझे चरित्र सर्वांनी बघून सर्वांनी सुस्वभावी होऊन संशय विरहीत सर्वांचे ठिकाणी समभाव ठेवावा. हे देवा, तू असे कर की प्रेमाने नामघोष व निर्विकल्प मनाने एकांतवास आणि त्यातच सत्सहवास घडावा याशिवाय माझे दुसरे काही मागणे नाही. हे श्रीहरी, इतके देऊन हे मुरारी मला पुनर्जन्म दे. मी संसारात येण्यास भीत नाही. का ते हे अंतर्ज्ञानी चिदंबरा, तू जाणतोसच. लौकिकाची मला मुळीच चाड नाही, पण तुझी कीर्ती उघड पसरावी हीच इच्छा आहे, हे अंतरसाक्षी, हे तू नेहमी जाणतोस. इतके माझे लाड पुरव. चिदंबरा, तू प्रेमळ अशी माउली आहेस. मी तुझे बाळ मायाजळी पडलो आहे. हे माते, मला मोकळे करून तुझे उरस्थळी खेळव. आत-बाहेर मागे-पुढे तूच जगात सर्वांकडे आहेस. जिकडे तिकडे सच्चिदानंद आहे त्या सगळीकडे बघून तुला नमन असो. हे लोकहो, स्वस्थ चित्त करून ऐका की, चिदंबरलीला अतिशय अद्भुत आहे. एके दिवशी एक तेलंगी ब्राह्मण भट्ट नारायण या नावाचा भेटीस आला व पंक्तीत जोंधळ्याच्या कण्या पाहून मला भात दे असे म्हणाला. निजपद मागताच त्या क्षणीच द्यावयास जो दीक्षाबद्ध आहे त्या चिदंबरास त्या तेलंगी ब्राह्मणाने बुद्धी नसल्यामुळे दुःखद असा जिव्हास्वाद मागितला. कल्पवृक्ष सोडून शिंदीच्या वनात, कामधेनू हाकलून गाढवीचे दूध काढण्यात किंवा अमृत सोडून मद्यपान करण्यास बसल्यास त्याचे कोणास महत्त्व वाटेल? तसेच पाचू सोडून काच घेणे, रत्न टाकून गारगोटी घेणे किंवा सिंहासन अव्हेरून उकिरड्यावर बसणे याप्रमाणे त्या ब्राह्मणाचे मागणे होते. आपले तोंड जसे असेल त्याचेच

शि
व
चि
द
म्ब
र

हुबेहूब प्रतिबिंब आरशात आपणास दिसते. मागणाऱ्याला देव देतो परंतु जे मनी वसे तसेच फळ मिळते. पंक्तिभेद करता दोघांनाही महादोष होतो असे स्वामी म्हणत. तेव्हा वेगळा स्वयंपाक करून तू तृप्ती करून घे असे म्हणून ओंजळभर तांदूळ त्या द्विजाला दिले. ते घेऊन तो ताबडतोब गेला आणि ते भांड्यात भरून ठेवले. ते तांदूळ अक्षय झाले म्हणून त्या ब्राह्मणाने नित्य समाराधना आरंभली. त्यामुळे पुष्कळ ब्राह्मण तेथे जमा होऊ लागले व दररोज ब्राह्मण संख्या वाढू लागली. स्वयंपाक पाणी करून वाढताना तो नारायण त्रासू लागला व ब्राह्मणांचा पदोपदी धिक्कार करू लागला व म्हणाला की, ''दुपारी तुम्ही जेवणास येता व आकंठ सुग्रास जेवण खाता आणि भांडी तशीच टाकून जाता परंतु मला एकट्याला हे काम आटोपत नाही. पुढे म्हणाला की, ''चिदंबराच्या ठिकाणी विशेष असे काय आहे? अक्षय पात्र माझेजवळ सुद्धा आहे. मला कशाचीच कमतरता नाही.'' सावकाराचे द्रव्य घेऊन ते फेडणे जसे अशक्य होते किंवा दिव्याने सूर्याचा उपहास करावा. तसेच समुद्राचे पाणी मडक्यात घेऊन समुद्राचा धिक्कार करावा त्याप्रमाणे हा उद्धट ब्राह्मण चिदंबरास मानेना. कोल्हा जरी वाढला तरी सिंहाची बरोबरी करेल काय? ही गोष्ट केव्हाही होणार नाही त्याप्रमाणेच हे ब्राह्मणाचे बोलणे होते. तो आणखी म्हणाला की, ''चिदंबराचे घरी नेहमी कदान्न मिळते परंतु माझे घरी उत्तम भाताचे अन्न असते. याकरिता येथे येऊन सर्व कामे करावीत व मगच भोजनास यावे.'' अशी त्याची गर्वोक्ती ऐकून सर्व ब्राह्मणांनी त्यांचा झालेला अपमान सविस्तर श्री चिदंबरास सांगितला, तेव्हा त्या कैलासरमणाने त्या ब्राह्मणांचे सांत्वन करून आपले गावी त्यांना भोजन घालून त्यांना सत्धर्म वचने सांगितली व सांगितले, ''आजपासून तेथे तुम्ही जाऊ नये. मिष्टान्नाची आशा धरू नये. कारण कदान्न व स्वादान्न हे दोन्ही समभावी आहेत कारण, ते दोन्ही मानवाची तृप्ती करतात. जिभेचे चोचले पुरण्याची आशा केल्यास अपमान व अतिदु:ख होते. परंतु मोठ्या आदराने जे आयते मिळते ते प्रेमाने जेवताच अमृत होते व अपमान होऊन जरी मिष्टान्न मिळाले तरी त्याने मुळीच सुख होत नाही. याप्रमाणे त्या सावित्री रमणाने ब्राह्मणांना बोध केला. नंतर एके दिवशी चिदंबर शुक्लवृत्ती निमित्ताने त्या तेलंगी ब्राह्मणाचे घरी आला. स्वामीने त्याचे दारात उभे राहून कौतुकाने भिक्षा म्हणताक्षणीच तो त्या विप्राने अंत:करणात फुगून तांदूळ आणून चिदंबराचे पात्रात घातले. मग श्री गुरु गुपचुप आपल्या घरी आले. तेव्हा तो विप्र रिकामे भांडे पाहून मनात शंका येऊन दचकला. मग

शि
व
चि
द
म्ब
र

त्याचे गर्वहरण होऊन तो श्री गुरुचरणी शरण आला व साष्टांग नमस्कार करून करुणावाणीने म्हणाला, ''हे करुणाकरा, मला तार कारण माझे हातून पाप घडले आहे. कारण मी ब्राह्मणांचा धिक्कार केला व गुरुंची निंदा केली आहे.'' तेव्हा गुरु हसत म्हणाले की, ''मी काय करू, तुझे कर्माचे फळ तू भोग. ब्राह्मण जरी दुर्वचन बोलला किंवा आपल्यास त्याने मारले तरी ज्याला आपल्या हिताची इच्छा आहे त्याने त्या ब्राह्मणास वंदन करावे. विप्राचा अपमान केल्यास आपले ज्ञान, वैभव असे सर्वस्व नाश पावते. याकरिता अपराधी ब्राह्मणालाही वंदन करावे. याकरिता तू त्या ब्राह्मणांचे चरणी शरण जा. त्याने तुझे हित होईल. विप्र प्रसादाने साम्राज्य सुद्धा कोणास दुर्लभ नाही.'' असे गुरुवचन ऐकून परलोक भयाने तो तेलंगी ब्राह्मण भिऊन स्वामी वचन मनात ठसवून ब्राह्मणांना हरण गेला. द्विजांचे अनुग्रहाने तो पावन होताच त्याला स्वामींनी बोलावून त्याला वरदानपूर्वक महानुग्रहाने संतोषविले. चिदंबर हा कलियुगातील कल्पतरू आहे आणि त्रिमूर्तींना तोच गुरु होय. तेव्हा त्याचे चरणास नमस्कार करताच जन्म, म्हातारपण वगैरे भार दूर होतो. ज्याला सुख हवे असेल त्याने घातकी असा देहाहंकार दूर करावा आणि या गुरुदेवास भजून मोक्ष सुखाचा लाभ घ्यावा. एक दिवस चौघे वैष्णव स्वामींचे भेटीस आले आणि आपला अभिमान प्रकट होईल अशा रितीने चिदंबराना वंदन करून ताठ उभे राहिले. त्याची एकनिष्ठ अशी विष्णुभक्ती पाहून तो सावित्रीपती आनंदाने त्या आचाऱ्यांना म्हणाला की, ''उद्या द्वादशी आहे तेव्हा पंक्तीत आपण पारणे करता की स्वत: स्वयंपाक करता हे मला निश्चित सांगावे.'' तेव्हा ते वैष्णव म्हणाले, ''आम्ही सद्वैष्णव आहोत तेव्हा महापंक्तीत भोजन करणे आम्हाला चालणार नाही.'' तेव्हा श्रीगुरुने सेवकांना सांगून त्या वैष्णवांना शिधा सामग्री दिली. त्यांनी प्रात:काली उठून देवाजवळ स्वयंपाक करून विष्णुच्या नैवेद्याकरिता त्या चौघांनी आपल्या सांबळी काढल्या. परंतु त्या पेटीत शाळीग्राम नव्हते. तेव्हा ते विचार करू लागले की, आज काय झाले? चौघांच्या सांबळी पेट्यामध्ये आज रिकाम्या कशा? हे विचारण्याकरिता ते चिदंबराकडे आले. स्वयंपाकगृहात चिदंबराला पाहून दोन्ही हात जोडून मोठ्या विनयाने साष्टांग नमस्कार केला आणि दीक्षितेंद्रास विनंती केली. आम्हाला भूक लागली आहे परंतु एक विघ्न आहे. त्याचा नाश करून आम्हाला आनंद दे व आमच्या भोजनाची व्यवस्था कर. तेव्हा श्रीगुरु म्हणाले, ''हरिभक्त असून तुमच्या भोजनाच्या आड कोण आले आहे, त्याचा आम्ही प्रतिकार करू

तुम्ही चिंता सोडावी.'' तेव्हा ते चौघे आचार्य म्हणाले, ''हे दीक्षिता श्री आम्हाला सोडून गेलेत, तर आम्हाला भोजन कसे मिळेल. जेथे देवानेच आम्हाला सोडले आहे.'' त्यावर महास्वामी म्हणाले, ''आचार्यऽहो, हे काय आश्चर्य आहे. श्रीने भक्तांना कसे सोडले. तो भक्तांना कधी सोडणार नाही, असा त्याचा निश्चय आहे कारण तो देवराय भक्तवत्सल आहे.'' तेव्हा ते म्हणाले, ''रोज त्याच्या पूजेशिवाय आम्ही अन्नाला स्पर्श करीत नाही. तरी हे देवराया, आम्हाला आता जेवण कसे मिळेल?'' तेव्हा श्रीगुरु म्हणाले की, ''चौघांचे देव एकाच वेळी कसे गेले? त्याचे कारण काय आहे ते आम्हाला सांगावे.'' तेव्हा ते म्हणाले की, ''आम्हाला कारण माहित नाही आपणच समर्थ असे ज्ञानी आहात. हे दिननाथा चिदंबरा, आमचे संकट निवारावे.'' तेव्हा चिदंबर म्हणाले, ''जरा धीर धरा, भिऊ नका. तुम्हाला दुसरे शाळीग्राम देतो. त्यांची पूजा करून भोजन करा.'' तेव्हा ते म्हणाले, ''मुंज झाल्यापासून ज्याचे आम्ही पूजन केले, ते शाळीग्राम मिळाले तरच आम्ही भोजन करू नाही तर आम्ही प्राणत्याग करू. त्यांची एकनिष्ठ भक्ती पाहून गुरुंचे चित्ती कृपा उपजली व स्वयंपाक्यास बोलावून त्याला सांबारामध्ये शोधण्यास सांगितले. स्वामी वचन ऐकून त्या स्वयंपाक्याने हाती मोठी पळी घेऊन त्या सांबारात फिरवली तो त्या पळीत शाळीग्राम निघाले. मग स्वयंपाक्याने ते शाळीग्राम चिदंबरापुढे ओतले तेव्हा श्रीगुरु आचार्यांना म्हणाले की, ''आपला शाळीग्राम ओळखून सुखाने घरी जावे आणि नैवद्य करून जेवावे व मजवर दया ठेवावी.'' हा चमत्कार पाहून ते आचार्य मनात दचकले व म्हणाले, ''आमचे करणीला आग लागो. आम्ही मायाजळी गुंतून तुला ओळखले नाही. हे अगाध लीलाधारी, चिदंबरा, सर्वेश्वरा, तुझा अपमान केला. स्वतः श्रीहरीने येऊन सुरस असे सांबार सेवन केले. मग हे मुरारी, तेथे आमचा पाड काय, तेव्हा येथे भोजन करण्यास आम्हाला काहीच दोष नाही. पुजारी देवापेक्षा पूज्य होऊन देव्हाऱ्यात बसला किंवा पतीपेक्षा जास्त अशा सुखशेजेवर त्याची बायको झोपली, गुरुपेक्षा शिष्याने जास्त ढोंग माजवून आपले गुरुस शिकवले या प्रकारेच आमची कृती झाली आहे. जसा राजा पायाने चालत असता त्याचे दूतांनी सुखासनी बसावे. त्याप्रमाणे हे जगन्नाथा, आमचा शिष्टपणा झाला. आमचे मन गर्वाने भ्रमित झाले होते, परंतु आता तुझे स्वरूप ओळखले व तुझे चरणी आमचे मन रमले. तरी हे दयाळा, आम्हाला तार. नररूपाने दिसतोस तरी तूच नारायण आहेस. तरी आम्हाला महाप्रसाद भोजन येथेच घेण्यास आज्ञा द्यावी. देवा, आम्हांवर अनुग्रह कर.



शिव चिदम्बर

तुझे पादसेवक असे आम्ही दास आहोत.'' असे म्हणून गहिवरून चिदंबराचे पायावर पडले. तेव्हा त्या दयासिंधुने त्यांना उठवून त्यांचे सांत्वन केले व त्यांना बोध केला. त्यांची अतिशय भक्ती पाहून त्यांना अगाध रूप दाखवले. नीलमेघ, घनश्याम उत्तम पितांबर नेसलेला चतुर्भुज श्रीवत्सलक्ष्मपंकजाक्ष मणी कुंडल अनर्घ्यरत्न-खचित किरीट मस्तकावर व गळ्यात वनमाला शोभत होती आणि हृदयावर कौस्तुभ शोभत होता. नवरत्न प्रभेने कुंडले कानात शोभत होती मणि मणि खचित केयूर कटक असा तो दीक्षितेंद्र शोभू लागला. कटीसूत्र मेखला शोभत होती. हातात शंख, चक्र, गदा व पद्म शोभत होते आणि गळा हाराने शोभत होता. कपाळावर कस्तुरी तिलक शोभत होता. सुरेख, सुंदर असे चारुदर्शन त्या श्रीहरीचे अंगावर शोभत होते ते आचार्य हे विष्णुरूप निष्पाप व योगीध्यान गम्य पाहून अनुतापाने गहिवरून वंदन करते झाले. सर्व अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांना अतिशय आनंद होऊन देहभान विसरले व चिदंबराचे पायावर लक्ष देऊन स्तोत्र करू लागले. हे हरे दामोदरा, करुणाकरा मार्तंड, कुलोत्पन्ना, दिनसुरद्रमा, लक्ष्मीवरा, नारायणा हे गुरु तुला आम्ही नमन करतो. दुष्टांचा नाश, भक्तांचा उद्धार व श्रौत मार्गाचे रक्षण करण्यास वैकुंठ सोडून तू या भूलोकावर आला आहेस. तुला आमचे नमन असो. हे नित्योदिता, सदया, चिदंबरा सर्वजीवपालका, तुला आमचे नमन असो. ब्रह्मा, विष्णू, महेश, गणेश्वरा, तूच नानावतार धरतोस. हे सूर्यनारायणा, हे वायुकुमारा, तू क्वचितच असा भयंकर असा नृसिंहमूर्ती होतोस. मत्स्य, कूर्मादी दशावताराने हे चिदंबरा तूच नटला आहेस. तुझे स्वरूप कळणे कठीण आहे. आम्ही पामर त्याचे वर्णन काय करू शकणार? आमचे पुण्य फार थोर होते म्हणून हे सर्वेश्वरा, तू आम्हास भेटलास. या दिनांचा उद्धार कर. हीच वारंवार तुझे चरणी आमची प्रार्थना आहे. दीक्षिताने आचार्यांचे भक्तीस बघून त्यांना उठवून आलिंगन दिले. त्यांना वर देऊन तोषविले. तसेच त्यांना मिष्टांन्नाचे भोजन घालून आनंदित मनाने त्यांना आपल्या घरी पाठविले. या कलियुगात लोकोद्धाराकरिता दीक्षितासारखा समर्थ कोण आहे? हे नटनाथाचे चरित्र त्रिलोकात पवित्र असे आहे. जो कोणी शुद्ध भावाने नेम धरून त्याचे पठण करतात त्याचा दीक्षितस्वामी सांभाळ करतात. याप्रमाणे श्रीगुरुचे हे पवित्र चरित्र ऐकून ठिकठिकाणी बरेच लोक रोज त्यांना भेटावयास येत असत. कामी निष्कामी आपले मनोरथ चिदंबराकडून मागताच पूर्णत्वास जात असत. या पुण्यराशी महापुरुषास या त्रिलोकात उपमा नाही आणि हे जाणावयास

ब्रह्मदेवही समर्थ नाही. मी बुद्धिहीन त्याचे आघात चरित्र काय जाणू शकेल? परंतु त्याचे नामाचा संबंध हाच कल्याणप्रत होय. हृदयस्थ गुरु चिदंबर जशी प्रेरणा देतो त्याप्रमाणे चरित्र सांगत आहे. ते थोडेसेच आहे, संपूर्ण सांगण्याकरिता त्रिजगात कोणालाही शक्य नाही. श्लोक किंवा अर्धश्लोक जो पाठक आहे तो पापापासून मुक्त होतो. गोदावरी तीरी राहणाऱ्या एका विप्राने जर मला एक पुत्र होईल तर तुझे दर्शनाकरिता येतो असा नवस केला. चिदंबर कृपेने त्याला पुत्र झाला त्याला तोही एकाच वर्षात. पुढे तो मोठ्या संतोषाने सहकुटुंब गुरुचे दर्शनाकरिता निघाला. येताना रस्त्यात एका शिवालयात वस्ती करून राहिला. तेव्हा त्याचे बाळास एका वाघाने धरले. तेव्हा ते दोघेजण चिदंबराची नावे गर्जू लागले. चिदंबर नावाची गर्जना ऐकून तो वाघ बाळ सोडून गेला. मग ती दंपत्ती आपले बाळास घेऊन गुरुजवळ आले. त्यांना पाहून चिदंबरास कृपा उमजली व त्यांना अपार वरदान देऊन संतोषविले. याप्रमाणे गुरुकृपा संपादन करून मोठ्या आनंदाने आपल्या मुलाला घेऊन घरी गेले. जो अनाथाला कल्पवृक्ष आहे, तो सद्गुरु आमचा कैवारी होऊन आमच्या संकटाचे कडे फोडून सर्वांचे सर्वकाळ रक्षण करू दे. चिदंबर हा कृपानिधी आहे. भावाने त्याचे पदी चित्त ठेवा, तो तुमचा पदोपदी सांभाळ करील असे हा चिदंबर किंकर सर्वांना सांगत आहे,

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय सव्विसावा

पांडुरंगाचे आपले भक्तास स्वप्नात कथन

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।।श्री गणेशाय नमः ।। हे आदिपुरुषा, विश्वंभरा, तुला नमस्कार करून प्रार्थना करतो की, तुझे सुरस असे चरित्र माझेकडून वदव जे ऐकताच श्रोते संसारी असूनही मुक्त व्हावेत. तुझी करणी अगाध अशी आहे. भक्तांना तू ब्रह्मपद देतोस, अज्ञानी लोकांना सर्वज्ञ करतोस आणि नुसते तुझे नामजपाने भवबंध तोडतोस. गर्विष्ठांचे गर्वहरण करतोस आणि भाविक लोकांना शांती देतो. तुझे साम्य कोणाला देऊ? तू नेहमी स्वप्रकाशाने सिद्ध आहेस. हे परात्परा, सर्वव्यापका, चिदंबरा, तुला नमन असो. चिदंबर कथेचे श्रवण करताच निश्चित गुरुकृपा लाभते. एके दिवशी अगडी गावाचा राजपुरोहित रामशास्त्री या नावाचा आपले कुटुंबासहीत स्वामींचे दर्शनाकरिता आला. स्वामी त्यास त्याचा सन्मान करून म्हणाले की, ''तुझे तोंडून पुराण ऐकावे अशी माझी इच्छा आहे, तरी तू ती पुरवशील काय?'' हे स्वामींचे वचन ऐकून मोठ्या भक्तिभावाने चिदंबराला वंदन करून शास्त्री पुराण सांगण्याकरिता बसला. तेव्हा फार मोठी सभा जमली होती. त्र्यंबकशास्त्रास बोलवण्याकरिता स्वामीने गोविंदाला पाठविले. तेव्हा तो पंडित गोविंदाला म्हणाला की, ''तू दीक्षित शिष्य असून माझेशी प्राकृत कसे काय बोलतोस? गुरु कसा व शिष्य कसा तू अपभ्रंश बोलतोस? तू आता जा.'' तेव्हा गोविंदाने येऊन स्वामींना सर्व सांगितले. स्वामींनी शिष्य वाक्य ऐकताच ताबडतोब त्याचे तोंडात भस्म घातले. याप्रमाणे श्रीगुरुकृपा होताच तो शिष्य सर्व शास्त्र ज्ञानी झाला आणि त्रास, क्लेष व यमक याचा उपयोग करून पंडिताला बोलाविले. हे ऐकून तो शास्त्री विस्मित झाला की, काय अद्‌भुत गोष्ट झाली की, हा मूर्ख असून शास्त्रगर्भित बोलत आहे. याचेवर फार मोठी दीक्षित कृपा दिसते. तत्काळ तो पंडित पुराण ऐकण्याकरिता सभेत आला. त्याला पाहून तो पुराणिक दचकला. त्याचे मनातील भाव ओळखून चिदंबराने त्यास सांगितले की, तुझे तोंड उघड व पुराणिकाने तोंड उघडताच स्वामींनी त्याचे तोंडात आपले हाताने भस्म घातले. तेव्हा रामशास्त्राने पुराणास सुरुवात केली. आधी मंगलाचरण केले. तेव्हा रामशास्त्र्यास सांगितले गेले की,

बाकीचे सर्व राहू दे, पुढचे पुराण सांग. मंगलाचरण संपवून पुराणिकाने स्वामींकडे पाहिले आणि तो पुराणिक सर्व शब्दार्थ सांगू लागला. व्याकरणास अनुसरून अठरा अर्थ निक्षून सांगितले आणि हे सांगताच क्षणी त्र्यंबकशास्त्र्याने उठून पुराणिकास आलिंगन दिले व म्हणाला, ''चिदंबर कला अगाध आहे. मी बुद्धिहीन हे न जाणता गर्वाने कुशब्द बोललो त्या अपराधाची क्षमा करा.'' असे म्हणून तो पंडित स्वामींचे पायावर लोळू लागला आणि आपल्या विद्येचा गर्व सोडून त्याने मोठ्या विनयाने स्वामींचे शिष्यत्व स्वीकारले. मग तो पुराणिक आपले गावी जाण्याकरिता निघाला तेव्हा तो मनात चिंताक्रांत झाला. मला श्री दीक्षित काहीतरी द्रव्य देईल ज्याने माझे दैन्य नाहीसे होईल यासाठी मी दर्शनाकरिता आलो होतो परंतु स्वामीने मला तसेच बोळावले. दैवापुढे काय उपाय चालतो, म्हणून खिन्न चित्ताने तो पुराणिक पुढे निघाला परंतु श्रीगुरुंनी त्याचे चित्त ओळखले. सर्वांना निरोप देऊन स्वामी त्या पुराणिकास बोलवण्याकरिता अर्धा कोस गेले व त्याला एकांती नेले. आपल्या अंगावरची शाल काढून त्यात एक मोठा दगड गुंडाळला आणि पुराणिकास ते घरी दैन्य राहणार नाही असे बोलून स्वत: त्याचे पदरी बांधले व त्याला त्याचे घरी पाठवले व आपण स्वत: आपले घरी आले. त्या पुराणिकाची भार्या निव्वळ कर्कशा होती व तिला धनाची आशाही फार होती. 'स्वामींनी काय दिले' म्हणून घरी येताच तिने आपले पतीस विचारले व 'ते मला दाखव' असे ती म्हणाली परंतु 'ते मी दाखवणार नाही' असे तिचा पती म्हणाला. याप्रमाणे भांडत ते दोघेही दोडवाडास आले. तेथे रामशास्त्री स्नानाकरिता जाताच तिने ती शाल उघडून पाहिले त्यात दगड पाहून तिने तो दूर फेकून दिला. तेव्हा त्या शास्त्र्याने गडबडून तो दगड आपल्या हातात घेऊन आपल्या डोक्यावर मारून घेतला तेव्हा त्याचे फार तेज चमकले. त्या दगडाचा एक भाग सोन्याचा दिसत होता व दुसरा भाग दगड दिसत होता. तेव्हा तो शास्त्री रागावून म्हणाला, ''हे अभागिनी तू काय केलेस हे? आपल्या घरापर्यंत गेले असते तर सगळेच सोने झाले असते. कसेही असो, चिदंबर महिमा अघटित आहे. त्याने माझे दुरिताचा संहार केला.'' मग ते दोघेजण आपले गावी गेले व मोठ्या आनंदाने व सुखाने चिदंबरावर प्रीती ठेवून काळ क्रमू लागले. याप्रमाणे चिदंबराचे चरित्राने भाविकास स्वहित प्राप्त होते. याकरिता पूर्ण भाव ठेवून आपले हिताकरिता स्वामींना भजा. जो अष्टमूर्ती झाला त्याला चित्तात आठवून त्याची सुंदर कथा पुढे ऐका. एक नारायण नावाचा ब्राह्मण तुंगभद्रेचे तीरावर राहत होता. तो मोठा

शि
व
चि
द
म्ब
र

शि
व
चि
द
म्ब
र

सदाचारी, वेदशास्त्र जाणणारा शिवभक्त असा होता. कुटुंबाचे पालनाकरिता नेहमी तो नाना उद्योग करीत असे. तरी त्यांचा योगक्षेम चालेना म्हणून भिक्षा मागून तो पोट भरीत असे. असे काही दिवस जाताच त्याच्या मुलामुलींची लग्ने करण्याची वेळ जवळ आली. तेव्हा तो ब्राह्मण फार तळमळू लागला की, "हे देवा, आता मी काय करू?" त्याला एक पाऊलभर सुद्धा निर्वाहाचे साधन असलेली जमीन नव्हती. त्यातच सावकार त्याला त्रास देऊ लागले. त्याला आडवून बाहेर जाऊ देत नसत. आपले देहाचे पोषण परार्धीन असून प्रपंचात नेहमी दैन्य तसेच लोकांचे बरेच कर्ज देणे आहे अशा पुरुषाला जिवंत असून मेलेले समजतात. विद्याभ्यासाशिवाय बालपण, गुरुसेवेशिवाय प्रौढपण व सदाचाराशिवाय महावय जो घालवतो तोही जीवन्मृत होय. आपले शरीर अव्यंग असतानाही जो उमारमणाची आठवण करीत नाही आणि विषय भोगाने हा नरदेह वाया घालवितो तोही जिवन्मृतच होय. असो, अशी कठीण परिस्थिती आली असता तो ब्राह्मण कंटाळला व आपल्या प्रपंचावरील लोभ सोडून पंढरीनाथाला भेटण्यासाठी आला. चंद्रभागेत स्नान करून मोठ्या भक्तिभावाने देवळात आला. कंठ सद्गदित होऊन त्याने पंढरीनाथास साष्टांग नमस्कार घातला व म्हणाला की, "माझे दैन्य पूर्णपणे जावे नाहीतर मी प्राणत्याग करीन." असा दुर्धर नवस देवापुढे करून क्षेत्रवास केला. याप्रमाणे निश्चय करून नित्यसेवा करीत राहिला आणि रोज पवित्र असे भिक्षान्न आणून जेवीत असे. याप्रमाणे एक वर्ष झाले. तेव्हा त्या दयाळू पंढरीनाथाने त्याला स्वप्नात येऊन सांगितले की, "मी तुझे हिताकरिता एक गोष्ट सांगतो ती तू ऐक. तुझे दैन्य गेले आहे असे समज. मुरगोडास चिदंबर या नावाचा दयासागर आहे. त्याचे नुसते दर्शनाने तुझे दैन्य नाहीसे होईल. कोणतीही शंका मनात न आणता उद्या तू येथून निघून जा." असे सांगून पंढरीनाथ अंतर्धान पावला. सकाळी जागा झाल्यावर माझे दुर्दैव की, तुझे हातून काहीही काम होत नाही. तरी देवा, तू श्रीपती हे तुझे नाव सोड आणि नंतर मला माणसाकडे पाठव. मी माणसाकडे जाणार नाही. तूच माझे मनोरथ पूर्ण कर नाहीतर पंढरीनाथा मी प्राणत्याग करीन. असे म्हणून उपवास करीत तेथेच वस्ती केली. याप्रमाणे तीन रात्री गेल्या व विठ्ठल पुन्हा त्याचे स्वप्नात आला व म्हणाला, "हे ब्राह्मणा, हट्ट धरू नकोस व देवाला छळू नकोस. मी सांगितल्याप्रमाणे सर्व संशय सोडून चिदंबराकडे जा." त्याप्रमाणे एका बडव्यास त्याच रात्री स्वप्न पडले व पंढरीनाथाने आदेश दिला की, "उद्या या ब्राह्मणास प्रयत्न करून चिदंबराकडे पाठवावे." तेव्हा

शि
व
चि
द
म्ब
र

त्या बडव्याने त्या ब्राह्मणास सांगितले, "जर तू भ्रमाने आग्रह धरशील तर तुला देवळात येऊ देऊ नये असा मला विठ्ठलाचा निरोप आहे. आता देवाला छळू नकोस आणि देवाचे निरोपाप्रमाणे तू ताबडतोब येथून जा. नाही तर तुझे पुण्य क्षीण होईल." विप्राने ते बडव्याचे वचन ऐकून भिऊन त्याला साष्टांग नमस्कार केला व म्हणाला, "तुमचे आज्ञेप्रमाणे मी जातो. दया असावी." नंतर त्याने अनुष्ठान पूर्ण ब्राह्मण संतर्पण केले आणि मुरगोडास निघाला. दुरून चिदंबर महास्वामीस बघून त्याने दंडवत घातला. चिदंबराने त्या ब्राह्मणास मोठ्या प्रेमाने उठविले व म्हणाले की, तू देवापाशी गेला होतास? मग मनुष्याकडे का आलास. जे करण्यास देव असमर्थ आहे ते मनुष्यास कसे साध्य होईल? स्वामींचे वचन ऐकून त्याचे मनातील संशयाची खूण पटली व त्याने साष्टांग नमस्कार पुन्हा करून लोटांगण घातले. त्याचा कंठ सद्गदित झाला. अंगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहू लागल्या व विनंती केली की, "हे चिदंबरा, तू मला तार. मी मोठा पापी व कपटी असा पापात्मा आहे. अज्ञानाने माझी ज्ञानदृष्टी झाकली आहे. तरी माझा अपराध पोटी घालून माझेकडे कृपादृष्टीने पाहवे. माया-मोहाने मला वेष्टिले आहे. देवाने सांगूनही मी ते ओळखले नाही व तुझी निंदा केली तरी देवा, तू मला तार. मी तुला शरण आलो आहे. हे देवा, तूच धर्ममूर्ती आहेस. पाप-पुण्य तुझे हाती आहे आणि तू सूत्रधार असल्यामुळे जसे नाचवशील त्याप्रमाणे जीव नाचतात. या पतिताचा उद्धार केल्यास तुझा अद्भुत महिमा वाढेल. नाहीतर तुझे ब्रीद कसे व्यक्त होईल?" ब्राह्मणाने याप्रमाणे प्रार्थना करताच स्वामींनी त्याला ताबडतोब उठवून आपले जवळ बसवले आणि त्या विप्रावर कृपालहरी प्रेरल्या. त्याचे कुशल विचारले. त्याचे तोंडून सर्व हकिकत ऐकताच त्याचे हित साधण्याकरिता मंद हसत वचन बोलते झाले, "प्रपंचात दैन्यासारखा दुसरा तापदायक अग्नी नाही. मी दीन काय करू शकतो. माझाही आता काय उपाय नाही. तुझे दारिद्र्य आता कसे नाहीसे करावे याचे माझे हृदयात चिंतन चालू आहे. परंतु हे मनोरथ पूर्ण करण्यास दारीद्र्यामुळे शक्य नाही. कारण दारिद्र्याचे मनोरथ उत्पन्न होताच लयास जातात. तुला एक उपाय सांगतो तेथे जा. ते दैन्यहारक असे स्थान आहे. आता तू लवकर स्नान करून जेवण कर आणि आज येथेच रहा. उद्या तू श्रीरंगास जा. तेथे एक दानशूर राहतो. त्याचे नाव पूर्णय्या असे असून तो तुझी विवंचना पूर्ण करील आणि तुला पाच हजार रुपये निश्चित देईल. आता यापुढे कोणतीही शंका न घेता सुखाने आज येथे रहा

शि
व
चि
द
म्ब
र

आणि उद्याचे सुमुहूर्तावर येथून गमन कर.'' चिदंबराची आज्ञा मानून तो ब्राह्मण दुसरे दिवशी निघाला तोच त्याला शुभ शकून होऊ लागले. तो रस्त्याने जात असता त्याचा एक नातलग त्याला भेटला आणि म्हणाला की, ''मी तुम्हाला शोधत हिंडतो आहे. गावाकडे ताबडतोब चला. तुम्ही पाच हजार रुपये पाठवून दिलेत. त्यामुळे सर्व कर्जाची फेड करून लग्न निश्चितच केले आहे.'' हे ऐकून त्या ब्राह्मणास फार आनंद झाला. मी कधी पाच हजार पाठविले? ही चिदंबर लीलाच दिसते की, त्याने गुप्त असा अनुग्रह केला आहे. दीक्षित करणी अगाध आहे. बोलण्यात मी गरीब व अनाथ आहे म्हणून मला तसेच बोलविले. द्रौपदीने सभेत प्रार्थना करताच जशा गुप्तपणे वस्त्रांच्या राशी पुरविल्या त्याप्रमाणे आज माझ्या बाबतीत गुरुने कृपा केली. विठ्ठलावर रागावलो, तुलाही बरेच बोललो, शंका धरून तुझे जवळ आलो, तरीही तुझे कृपेस पात्र झालो. हे अनाथनाथे, गुरुमाऊली, माझेवर तुझी कृपेची सावली असू दे आणि तुझे पदकमळी मला शुद्ध अशी भक्ती द्यावी असे म्हणून मग तो ब्राह्मण आपले नातलगास म्हणाला की, ''तुम्ही गावाकडे जावे आणि लग्नकार्यास सुरुवात करावी.'' स्वामींची आज्ञा घेऊन तो ब्राह्मण श्रीरंगास आला. तो नेहमी गुरुचरणाचे ध्यान करीत असे. इकडे चिदंबर पूर्णय्याच्या स्वप्नात येऊन म्हणाले की, ''मी काय सांगतो ते चित्त देऊन ऐक. त्यात तुझे हित आहे. तुझेवर एक संकट येणार आहे आणि ती वेळ जवळ आली आहे आणि ते संकट दूर होण्याचा एक मार्ग आहे. तो असा, तुंगभद्रा तीराचा एक ब्राह्मण ज्याचे नाव नारायण आहे तो माझे नाव सांगून तुझ्या भेटीस येत आहे. उद्या सकाळी सूर्य एका प्रहरास येताच पूर्व वेशीवर तू चालत त्यास सामोरा जा. सन्मानाने त्याला घरी नेऊन आदराने त्याची पूजा कर व त्यास पंचपक्वान्नयुक्त भोजन करवून त्याला पाच हजार रुपये देऊन द्रव्यासकट त्याचे गावापर्यंत त्याला बोळव असे केल्याने तुला संकटाचा वारासुद्धा लागणार नाही. असे जर तू केले नाहीस तर तुझे निश्चितच कल्याण होणार नाही.'' असे सांगून चिदंबर अंतर्धान पावला. एक प्रहर दिवस आल्यावर पूर्णय्या वेशीजवळ आला तेव्हा नारायणास पाहून त्याची नानाप्रकारे पूजा केली व मोठ्या आदराने त्याला घरी नेऊन पंचपक्वान्नाचे जेवण देऊन चिदंबरावरील प्रीतीने पाच हजार रुपये दक्षिणा दिली व आपले स्वार, शिपाई व उंट देऊन त्याने आनंदाने नारायणास निरोप दिला व तोही मोठ्या आनंदाने गुरुपाशी येऊन व प्रेमाने लोटांगण घातले व देहभाव विसरला व म्हणाला, ''हे देवा, तुझे स्वरूप मी ओळखले. तुझा महिमा आगाध




शिव चिदम्बर

आहे तो जाणण्यास ब्रह्मदेवही समर्थ नाही तरी हे सर्वोत्तमा, चिदंबरा, तुला मी कोणाची उपमा देऊ. सर्व देवांचाही देव तू आहेस. तूच कृपासागर आहेस. जे तुला भजतील त्यांना हे दयाघना, तू सत्वर आनंद देतोस. तुला एक मागताच तू अनंत देतोस असा तू समर्थ आहेस. इंद्र-विष्णू व शंकर तुझे पदकमळाचे सेवन करतात.'' अशा प्रकारे तो नारायण स्तोत्र करीत असता चिदंबर स्वामी त्यास उठवून नाना तऱ्हेने त्याचे सांत्वन केले. तुझे दैव थोर होते म्हणून तुला पुष्कळ द्रव्य मिळाले. तरी तू कोणास हा वृत्तांत सांगू नकोस. याप्रमाणे सांगून त्याला आपले घरी पाठवले. तोही आपले गावी जाऊन चिदंबर लीलेचा प्रसार करू लागला. चिदंबराचा अनुग्रह असा सुंदर आहे व ज्याला इहपर सौख्य पाहिजे असेल त्याने श्रीगुरुस भजावे. चिदंबरासारखा सुखदायक त्रिभुवनात शोधून सुद्धा सापडणार नाही, याकरिता भाविक जनहो, त्यांचे भजन करा.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय सत्ताविसावा

वाघाने शिशूचे रक्षण केले

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे आनंदसागरा, शुद्धबोधा, चिदंबरा माझे हृदयमंदिरात राहून तू माझे कामव्याधीचे निवारण कर. शुद्धबोध प्रकाशाने तूच साक्षित्वाने हृदयात राहतो. त्यायोगे मायेचा नाश होतो आणि जीव तुझ्याशी समरस होतो. तुझे विस्मरण होणे म्हणजेच मूळ अज्ञान होय. जे तुझे प्रतिबिंब आहे तेच जीव म्हणून नाचते. तुझे सत्तेने अज्ञान ताबडतोब नाश पावते आणि अंत:करण व सर्व इंद्रिये सचेतनाप्रमाणे खेळतात. जन्म-मरणांचे कारण म्हणजे वासना व संकल्पच होय. त्याचे निवारण करणे मला शक्य नाही. तरी हे गुरुराया, तूच त्याचे निवारण कर. निर्विकल्प स्थिती मला देऊन त्यावर तुझी सहज भक्ती दे ज्या योगे सत्संगाची मौज मिळते. हे देवराया, एवढे मला दे. जो नेहमी हृदय मंदिरात साक्षीत्व राखून इंद्रियांना विषय भोगवूनही अलिप्त असतो त्याला माझे नमन असो. हा घोर संसार तरण्याकरिता चिदंबराचे नाव हीच नौका आहे. एके वेळी शिवरात्रीचे दिवशी स्वामी सुगोल क्षेत्रास बरेच यात्रा जनांसह गेले. रुद्रासूक्ताने महाभिषेक करण्याकरिता बरेच ब्राह्मण बोलावले होते आणि रात्री स्वामी स्वत:ही जागरूक होते. कित्येकजण स्तोत्राचे पठण करीत होते. कित्येक प्रेमाने ध्यान करीत होते व कित्येक प्रेमानंदाने नाचत होते, तर कित्येक पारायण करीत होते, कित्येक नामस्मरण करीत होते तर कित्येक गात मोठ्याने नामाची गर्जना करीत होते. कित्येक प्रेमाने भजन करीत होते तर कित्येक बेल व अक्षता वाहत होते. असा शिवाचा महोत्सव पाहून जणू कैलासच भूलोकी आला आहे असे वाटत होते किंवा रमाकांतच आपले गणासह पूजेस आले आहेत असे वाटत होते. पुष्कळ लोक झाडाच्या खाली आनंदाने निद्रिस्त झाले होते. ब्राह्ममुहूर्ती सर्व जण उठून तीर्थास स्नानाकरिता निघाले. तेथे एक पतिव्रता सुवासिनी होती, तीही स्नानाकरिता आली. तोच तिचा बाळ रडू लागला. तिचा सासरा ज्या ठिकाणी झोपला होता, तेथे अंधारात वाघ बसला होता. झोपेची झापड डोळ्यावर असल्यामुळे अंधारात तिने सासऱ्यास ओळखले नाही. त्यामुळे वाघाचे हाती बाळास देऊन मी स्नान करून येईपर्यंत बाळास सांभाळावे असे सांगून निर्भय चित्ताने स्नानाकरिता गेली.

स्नान करून निर्मळ मनाने पूजा व नमस्कार करून चिदंबराजवळ त्यांचे दर्शनाकरिता आली. इतक्यात सूर्योदय झाला तो वाघ प्रेमाने त्या बाळास खेळवीत होता. हे पाहून लोकांना आश्चर्य वाटले. जिकडे तिकडे हलकल्लोळ उठला की, वाघ बाळाला खेळवित आहे. परंतु त्या पतिव्रतेस मुळीच चिंता नव्हती. आपले सर्व नेम आटोपून स्वामींना वंदन करून ती आपल्या सासऱ्याजवळ आली. पाहते तो तिचा सासरा अंथरुणावर नव्हता व तेथे भयानक असा वाघ बसलेला असून त्याचे हाती तिचे बाळ होते व त्यास तो वाघ हलवीत व चुंबीत होता. ती नारी ते दृश्य पाहून भिऊन मूर्च्छा येऊन जमिनीवर पडली व वाघाने बाळ घेतले म्हणून हृदय पिटून रडू लागली. शुद्धीवर आल्यावर ती ताबडतोब पळत चिदंबराकडे आली व त्यांना साष्टांग नमस्कार करून आक्रंदून अर्धवट बोलू लागली, ''स्वामीराया, माझे बाळ वाघाने धरले आहे. तुझे भेटीकरिता मी फार दुरून आले आहे आणि ही काय देवकरणी झाली? माझे बाळ मला सोडून गेले. आता मी घरी कशी जाऊ? हे कृपानिधी, माझे रक्षण कर आणि माझे बाळ आधी वाचव.'' अशी करुणा भाकून तिने चिदंबरांना साष्टांग नमस्कार केला. तिला पाहून तो कृपासागर म्हणाला, ''हे अंबे, लवकर उठ. सर्व शोक सोडून दे आणि मला सविस्तर वृत्तांत सांग. तुझ्या दुःखाचा आपण प्रतिकार करू. हे माते धीर धर. सर्व शोक सोडून मला काय ते सांग.'' मग धीर धरून ती नारी मधुर वचनाने बोलली, ''माझे बाळ वाघाने धरले आहे, तेव्हा ते सोडव.'' तेव्हा श्री गुरु म्हणाले, ''माते, असे अमंगळ का बोलतेस? जसे बाळ तू वाघाला दिलेस तसेच परत माग.'' ''स्वामी, बाळास मी सासऱ्याजवळ देऊन स्नानाकरिता गेले होते. त्यानंतर वाघाने बाळास धरले.'' तेव्हा चिदंबर म्हणाले की, ''माते, असे बोलू नये. येथे सोमनाथ जागरूक असता बाळाला धरण्याकरिता वाघाला शक्ती कशी येईल?'' त्यावर ती म्हणाली, ''जो माणसास खाणार आहे तो माझे बाळ कसे सोडील? तूच या वेळी संकट निवारण करणारा आहेस तरी माझे बाळास सोडव.'' तेव्हा चिदंबर म्हणाले, ''माते, माझेवर विश्वास ठेव आणि सर्व संशय सोडून शीघ्र जा व वाघास आपले बाळ मागून घे. तो निश्चित देईल. तो मनुष्यास खाणारा असला तरी त्याला सोमेशाचा धाक आहे. म्हणून तो बाळ तुझे पदरी घालेल असा निर्धार करून लवकर जा.'' मग ती नारी 'तथास्तु' म्हणून श्री गुरुंना वंदन करून गेली व तिने वाघापुढे हात पसरून निर्भय मनाने आपले बाळ मागितले व म्हणाली, ''मामंजी, पुत्रास माझेजवळ द्यावे. त्याला भूक लागली आहे व त्याला दूध द्यावयाचे आहे.'' असे तिचे बोलणे ऐकताच वाघाने बाळास तिला परत केले आणि

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

आपल्या बाळाला घेऊन ती नारी गुरूंचे दर्शनाला आली आणि सद्गुरुचे चरणास वंदन केले. आपले बाळ परत मिळाल्याने तिला आनंद झाला व ती अपार स्तोत्रे करू लागली. "जयजयाजी करूणाकर, तुझे चरित्र अगाध आहे. सद्गुरुनाथा, तुला नमन असो. तूच कैलासराणा आहेस. तूच कात्यायनीरमण आहेस. हे करुणाघना, मी तुला जाणले. तुझे दिसत असलेले चरित्राने तू देवराणा आहेस. म्हणूनच वाघ हा मनुष्य भक्षक असूनही तुझे आज्ञेचे पालन त्याने केले. याकरिता माझा उद्धार करून संसार सागरातून मला पार कर." याप्रमाणे स्तोत्र करून तिचे दोन्ही डोळे पाण्याने भरले व प्रेमभक्तीने वंदून गुरुचरणावर साष्टांग नमस्कार घातला तेव्हा त्या करुणाकराने त्या नारीस उठवून तिचे डोक्यावर अभय कर ठेवला आणि तिला वर देऊन निरोप दिला. श्रीगुरुचे अगाध चरित्र पाहून सर्व लोक हा दु:खरूप संसार सागर सोडून भजनात मग्न झाले. नंतर चिदंबराने सर्वांना पक्वान्नाचे जेवण देऊन आपले घरी जाण्यास निरोप दिला. याप्रमाणे सर्व लोक चिदंबराचे स्तवन करीत असता स्वामी सहपरिवार आपल्या घरी आले. ज्याला वंदन करून ब्रह्मा, विष्णु महेश हे सुरवर कृतकृत्य झाले त्या चिदंबराचे सुखकर असे चरित्र पुढे सांगतो. ते अगाध चरित्र स्कंदादि कवीश्वर सांगू शकत नाही. मग मी बुद्धिहीन पामर नर, त्याचे वर्णन काय करू? चिदंबर चरित्र हे गंगाजलच आहे. त्याचा थेंबही पोटात पडताच त्याच क्षणी पाप दूर होते. याकरिता अल्प बुद्धीप्रमाणे ते पवित्र गंगाजलाप्रमाणे गुरुंचे चरित्र संक्षिप्त सांगतो. ज्यायोगे दुरित नाश होईल. आकाशातील नक्षत्रे मोजणे, वाळूचे मोजमाप करणे प्रयत्नाने कधीतरी साधेल परंतु गुरुचरित्र संपूर्ण असे वर्णन करता येणे शक्य नाही. एक लाख यात्रेकरू गुरु समागमे होते. कृष्णाजवळ यादवांचे सैन्य होते. त्याप्रमाणे हे शोभत होते किंवा हरी समवेत दाशरथीमा देवास घेऊन शचीपती किंवा स्वगणासह उमापती भूलोकावर अवतरला आहे, असे वाटत होते. याप्रमाणेच तो भगवंत यात्रिकांबरोबर शोभत होता. सर्वांशी अगदी मधुर वचनाने बोलून जो त्यांचेजवळ येईल त्याला क्षेम विचारीत असत. एके दिवशी दोघे शूद्र बंधू स्वामी दर्शनाकरिता येताना, मार्गात वाघाने एकास धरले. त्याच्या भावाने ते पाहून त्याला भीती वाटली व तो वाघाला म्हणाला की, "तू जर माझ्या भावाला खाल्लेस तर तुला चिदंबराची शपथ आहे." हे ऐकून वाघाने त्या भावास सोडून दिले. तेव्हा त्याच्या भावाने त्याच्या गळ्याला फडके गुंडाळून स्वामींजवळ आणले. ते दोघे बंधू येताच यात्रेची दाटी दूर करून त्या दोघांस चिदंबराने जवळ बोलावले. "या जगात दुर्वृत्त लोक आहेत व शपथ भयाने वाघ लाकडाप्रमाणे झाला आहे. त्याचा घात झाला तर मला दोष घडेल. याकरिता

शि व चि द म्ब र

सत्वर वाघाजवळ जाऊन शपथ मोकळी कर.'' हे ऐकून तो शूद्र त्यांचे पदकमळास वंदून निघाला हे गुरुवचन ऐकून चमत्कार पाहण्याकरिता इतर सर्व लोकही जिथे वाघ होता. त्या ठिकाणी शूद्राबरोबर निघाले. दुरून पाहतात तर वाघ तोंड पसरून मागे पहात होता. परंतु तो अगदी निश्चल खुंटाप्रमाणे चिदंबराच्या भयाने उभा होता. शूद्र दूर उभे राहून म्हणाला, ''हे वाघा, ऐक. तुझेवर गुरुकृपा आहे. व तुझे भाग्य फार थोर दिसते. तरी तुला गुरुशपथेतून मोकळा केला आहे. तू आता वनात जा आणि स्वस्थ रहा.'' हे ऐकून वाघाने उडी मारली व वनात निघून गेला. यात्राजन हे आश्चर्य पाहून आनंद डोहात बुडून गेले आणि नाना प्रकारे चिदंबराचे स्तवन करू लागले. आमचे भाग्य खरोखरी थोर होते त्यामुळे आम्ही धन्य झालो आणि शिवदर्शन होऊन त्रिलोकात आम्ही मान्य होऊ असे लोक बोलत असता श्रीगुरुंनी त्या शूद्रांना जवळ बोलावून त्यांना त्याचे इच्छित असे वर दिले आणि परत पाठविले. ज्याला इहपराची चाड आहे त्याने गुरुची जोड संपादावी, म्हणजे संसार गोड होईल. अशी कीर्ती हा चिदंबर किंकर सांगत आहे.

|| श्री चिदम्बर गुरुवेनम: ||

# अध्याय अठ्ठाविसावा

हरिदासाचा गर्वपरिहार

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे सिद्धमंत्रा, तुझे स्मरणानेच तू विघ्नांचा संहार करतोस आणि अनुष्ठानाने तू ब्रह्मसाक्षात्कार दाखवितोस. हे सद्गुरू तुला नमन असो. तुझे ठायी सृष्टी दिसते. ज्याप्रमाणे पाण्यात जलचर असतात तसा तू अद्वितीय असा सृष्टीभोवती दिसतोस. गुरुमूर्ती तुला नमन असो. भाविक श्रोतेहो, तुमची भक्ती पाहून ती गुरुमाउली सुरस अशी कथा वदवील. चिदंबराचे जवळ जाऊन कोणाचे मनोरथ पूर्ण झाले नाही असे ऐकलेही नाही व पाहिलेही नाही. ज्या दैवतावर ज्याची भक्ती असेल तेच रूप धरून तो उमापती भक्तास भेट देतो. मूर्खांचा मतिभेद केला तर इहपराची हानी होते म्हणून ज्ञानी लोक त्याचे चित्त ओळखून वर्तन करतात. एके दिवशी महास्वामी यात्राजनांसमवेत मोठ्या आनंदाने व विनोदाने तडस्नूर गावी निघाले. त्या गावी सर्व लोक उतरले व माध्यान्ही तृषाकांत होऊन पाणी मिळण्याकरिता त्यांनी प्रयत्न करूनही कोठे पाणी मिळाले नाही. एक कोसापेक्षाही जास्त लांबून त्या गावाचे लोक पाणी आणत असत. यात्रिकांना एवढे कष्ट होऊ नये, म्हणून चिदंबरास कृपा उपजली व म्हणून उन्हाचे कडाक्यात ऐन माध्यान्ही गावाबाहेर निघाले व नैर्ऋत्य दिशेस एका निर्जल स्थळी झाडाखाली बसले. उंच अशी जमीन पाहून तेथे पाणी उत्पन्न करण्याकरिता सद्गुरू उद्युक्त झाले. तोच तेथे एक शूद्र आला आणि महास्वामींचा हा प्रयत्न पाहून त्याने विचारले की, ''आपण हे काय करीत आहात? आपला प्रयत्न मोठा दिसतो.'' तेव्हा महास्वामी शूद्राला म्हणाले की, ''मी तहानेने फार व्याकूळ झालो आहे. त्याकरिता येथे खड्डा खणतो आहे.'' हे ऐकून शूद्र हसू लागला व म्हणाला, ''हे ब्राह्मणा, तुला काय भ्रम झाला आहे? येथे काय पाण्याची उत्पत्ती आहे काय? तू निष्कारण श्रम का करतोस? पाण्यासाठी जमिनीची परीक्षा घ्यावी लागते. जाणत्यास विचारून हे कार्य करावे. प्रचिती घेऊन वस्तू मिळवावी तरच आपणास सुख लागेल. निर्जळ ठिकाणी पाण्याचे प्रयत्न करणे अथवा बैलाचे दोहन करणे किंवा पर्वतावर बी पेरणे हा प्रयत्न वृथा होय. मूर्खाला विद्या सांगणे, आंधळ्याला आरसा दाखवणे आणि बहिऱ्याशी एकांतात बोलणे या सर्वांस 'वृथाश्रम' म्हणतात. जमीन

शि व चि द म्ब र

धुऊन माती काढणे, अरण्यात बघून रडणे व प्रेताशी शृंगार करणेही वृथाश्रम आहे. सूर्यापुढे दिवा नेणे, दुर्दैवी मनुष्यास श्रीमंत करणे, पाणी वाहून समुद्रास अर्पण करणे याप्रमाणेच तुझा प्रयत्न दिसतो. मागाचे चित्त शुद्ध करणे व कुत्र्याचे शेपूट सरळ करण्याचा प्रयत्न करणे, त्याप्रमाणेच पाण्याकरिता येथे खड्डा करणे आहे. असे मला वाटते.'' तेव्हा महास्वामी शूद्राला म्हणाले की, ''मला फार तहान लागली आहे व तो कैलासपती समर्थ असेल तर मला येथेच पाणी मिळेल.'' इतक्यात त्या खड्ड्यातून हत्तीच्या सोंडेप्रमाणे पाण्याचा प्रवाह निघाला. हे पाहून तो शूद्र भ्याला व दंडवत घालून महास्वामींना म्हणाला, ''अशक्य ते शक्य करण्यास समर्थ असा कैलासपती तूच आहेस. मी अनाथ व मूर्ख असा मनुष्य आहे. तरी माझे बोलणे तू मनावर घेऊ नकोस. तू जर कृपा करशील तर गवताचा पर्वत बनेल व भिकारी राज्यपद पावेल, अशी तुझी अघटित करणी आहे.'' याप्रमाणे नाना प्रकारे स्तोत्र करून त्याने विनंती केली की, ''या अनाथाला तार.'' तेव्हा तो त्या करुणासागर चिदंबरांनी आपला अभय कर शूद्राला देऊन त्याचे सांत्वन करून त्याला त्याचे घरी पाठविले. पाण्याचा खळखळ असा आवाज ऐकून त्या निर्जल अरण्यात एकाएकी पाण्याचा प्रवाह कोठून आला असे यात्राजनांना वाटले. हे यांत्रिकाचे वचन ऐकून तो कृपामूर्ती हसत बोलला की, ''तुमचेवर शंकराची कृपा आहे म्हणून त्याने गंगेला येथे पाठविले. तहानेने व्याकूळ झालेल्यांची तृप्ती होण्याकरिता गंगा येथे आली आहे. या वेळी कुठलाही संशय मनी आणू नका. जरी या पाण्यात अंघोळ केली तर मन निर्मळ होईल. पापाचा नाश होईल कारण प्रयागासारखे येथे फळ मिळते.'' याप्रमाणे स्वामींचे वचन ऐकून सर्व यात्राजन मोठे भक्तीने स्नानदान करून श्रीगुरुंबरोबर आपले गावात आले. अजूनही भाविक लोक पर्वकाळी तेथे स्नान करण्यास जातात कारण, गुरुहस्ताने उत्पन्न झालेले ते तीर्थ आहे. त्याचे वर्णन करण्यास कोण समर्थ आहे? याप्रमाणे रोज श्रीगुरुचा महिमा होत असे. जो केवळ ऐकल्याने श्रीगुरुंचे कृपेने सर्वांना सुख मिळत असे.

चिदंबर चरित्र जो भक्तिभावाने पठण करतो त्याचे कोटीकुळाचा उद्धार चिदंबर कृपेने होतो. जो एका क्षणात ब्रह्मांडाची रचना करण्यास समर्थ आहे त्याचे चरित्र वर्णन करण्यास कोणास शक्य आहे. सर्व पंचमहाभूतांचा चालक जो सर्वांच्या हृदयात साक्षित्वाने राहतो तोच कर्ता, वक्ता, लेखक आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. भारतीय युद्धात जसे सर्वकाही श्रीकृष्णाने करून अर्जुनास निमित्तमात्र केले व सर्व यशाचा

शि व चि द म्ब र

वाटेकरी त्याला केले किंवा ज्याप्रमाणे उत्तर गोग्रहणी अर्जुनाने विजय संपादन केला. परंतु लोकांत मात्र उत्तराचे नाव झाले किंवा अमृतमंथनाचे वेळी सर्व भार आपण वाहून इतर देवांची कीर्ती वाढवली आणि चक्रपाणीने ते कार्य साधले त्याप्रमाणे चिदंबर महास्वामी मला निमित्त करून स्वत: आपले चरित्र वदवून पठण करणाऱ्यांना पवित्र करीत आहेत. हे स्वामी, असंख्यात आश्चर्याने भरलेल्या तुझ्या चरित्राच्या महासागरात मी पामर नकळत जाऊन पडलो आहे तरी यातून मला पार कर. तुझ्या नामस्मरणाच्या नावेत बसवून हे देवाधिदेवा, महादेवा, मला यातून पार कर आणि माझा एवढाच हेतू पुरा कर. तो भक्तकैवारी असंख्य यात्राजनांसह राहत असता तेथे अन्नपूर्णा हात जोडून दाराशी उभी राहत असे. अष्टमहासिद्धी सेवा करीत इंद्रादी देव, हरी व ब्रह्मदेव गुरुंची आज्ञा मानून त्याचे चरणी चित्त ठेवून राहिले होते. सिद्धऋषीगण, गंधर्व, नागकन्या, देव व योगीनी हे सर्व भक्तिभावाने व गुप्तरुपाने नेहमी गुरुंची सेवा करीत. चिदंबराची कृपा असलेल्या मनुष्यास पाहून त्याला देव समजून भक्त त्याकडे पाहतात, कामधेनू व कल्पवृक्ष हे चिदंबराची सेवा करीत. चिदंबर कृपा ही अद्‌भुत आहे, तरी ज्यास लाभेल तो कृतकृत्य होय. तरी आता लक्ष देऊन पुढील कथा ऐका. एके दिवशी एक गर्विष्ठ व धीट असा किर्तनकार आला. तो वाचाळ परंतु लोकांचे मनोरंजन करण्यास समर्थ होता. गुरुपुरी एक मंडलेश्वर राहत होते. ते चिदंबराचे कृपापात्र होते. त्याने ऐकले की, 'हरिदासाचे कीर्तन फार सुंदर होते.' तेव्हा त्यालाही ते ऐकण्याची तीव्र इच्छा झाली. सर्वांनी एके ठिकाणी जमून त्या हरिदासास बोलावून सांगितले की, "आधी श्रीस्वामींचे जवळ जाऊन कीर्तन करून यावे नंतर आमचे सभेच्या ठिकाणी आम्ही आपले कीर्तन करवू." हे ऐकून त्या हरिदासाने आपला नियम सांगितला की, "जो शंभर रुपये देईल त्याचे घरी एकवेळ कीर्तन करीन आणि हा चिदंबर तर अतिशय गरीब आहे. तो इतके द्रव्य मला देणार नाही. मला द्रव्याशी संबंध आहे. तरी चिदंबरास विचारून यावे. माझे निरूपण केव्हाही वाया जाणार नाही." मग स्वत: शंभर देऊन महास्वामींची विनवणी करून कित्येक लोकांनी कीर्तनास सुरुवात करवली. परंतु स्वामींनी त्या हरिदासाचा गर्व ओळखला होता व त्याच्या गर्वाचे हरण करण्याचा महास्वामींनी निश्चय केला. त्या हरिदासाचे अपूर्व कीर्तन ऐकत असता एक मंदबुद्धीचा असा 'तिम्म' नावाचा गुरुसेवक होता त्याला त्या जगन्नायकाने बोलविले. श्रीगुरुचा शब्द कानावर येताच तो तिम्म पळत जवळ आला व हात जोडून उभा राहिला. आपली आज्ञा काय आहे म्हणून विचारले. तेव्हा दीक्षितेंद्र म्हणाले की, तू

सुद्धा कीर्तन करण्यास सुरुवात कर. कारण तुझे कीर्तन ऐकण्यास मी आतुर झालो आहे. तेव्हा तो तिम्म गुरुला वंदन करून म्हणाला, "हे जगदिशा, मी मूर्ख म्हणून सर्वांना माहीत आहे आणि मला विशेष बोलावयाला येत नाही. मी कुरूप असून गालफाटा आहे. तरी हे गुरुराया, तू माझी चेष्टा का करतोस? मी वेडा व निरक्षर असून हे गुरुराया, आपला शब्द खोटा होऊ नये." त्या सेवकाचे हे वचन ऐकून स्वामींना कृपा उपजली आणि प्रेमाने त्याला जवळ बसवून त्याच्या तोंडात भस्म घातले. तत्काळ त्याला सर्व ज्ञान प्राप्त झाले. गद्य, पद्य, यमक,श्लोक व कवित्व रचू लागला. तसेच छत्तीस राग गाऊ लागला. सप्तस्वरांचा आरोह-अवरोह आणि राग रागिणी गाऊन त्याने गुरुस्तवनास सुरुवात केली आणि वाद्य व तालात त्या सभेत तो निपुण दिसू लागला. श्रीगुरुनामांची गर्जना करून त्याने कीर्तनास तत्काळ सुरुवात केली. ते पाहून सर्व लोक मनात तटस्थ झाले व सर्व लोक त्या हरिदासाकडे तोंड फिरवून याचे कीर्तन ऐकू लागले. त्या वेळी असे वाटले की, "तुंबर गात आहे किंवा नारद कीर्तन करीत आहे किंवा गंधर्व लोक मोठे आनंदाने स्वामींचे भेटीस येत आहेत किंवा अर्ध नारीनटेश्वर तांडवनृत्य करीत आहे आणि स्वत: नारायण गात आहे व सुस्वर स्वर उमटत आहेत." याप्रमाणे तिम्माने सुरस असे किर्तनास आरंभ करताच सर्वांना आश्चर्य वाटले व चित्त देऊन ऐकू लागले. श्लेष सरस आलाप बहुअर्थी शृंगारादी नवरसाने भरलेले असे अद्‌भुत कीर्तन करून त्याने गुरुनाथाला तोषविले. ज्या रंगी जो रस असेल त्याप्रमाणेच लोकांचे मन होत असते. हर्ष, आनंद व अश्रू पाहून विशेष आनंदले. सूर्य उगवताच जसा चंद्र निस्तेज होतो आणि पंडित बोलत असता वाचाळ मुका होतो किंवा सभेत उर्वशी येताच सामान्य वेश्येस कोण विचारतो? किंवा वेदान्त शास्त्र हाताशी येताच कोकशास्त्रास कोण विचारेल? किंवा पक्वान्ने समोर असताना कदान्न कोण जेवेल? किंवा चंदन मिळताच हिंगणास कोण विचारील? याप्रमाणे तिम्माचे कीर्तन ऐकून हरिदासाचे गर्वहरण झाले व त्याने गुरुस शरण येऊन आपल्या अपराधांची क्षमा मागितली. त्या दिवसापासून तिम्म हा कीर्तनकार म्हणून फार प्रसिद्ध झाला व लोक त्याचा फार आदर करू लागले याप्रमाणे चिदंबर चरित्राचे श्रवणाने कलिदोष समूळ नाहीसा होतो आणि केवळ पठणाने सुख लाभते, ही अमृताची पाणपोई मी घातली आहे. तरी सुखाची इच्छा असणाऱ्यांनी त्याचे घोट घ्यावेत अशी चिदंबर किंकराची विनंती आहे.

**|| श्री चिदम्बर गुरुवेनम: ||**

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय एकोणतिसावा

स्वत: शिवाकडून चिदंबरनाम माहात्म्य वर्णन

|| श्री शिव चिदंबराय नम: ||

||श्री गणेशाय नम: || जो निराकार असतो पण योग्यांचे हृदयात स्वप्रकाशाने भासतो, त्या चिदंबराला नमन असो. सद्‌गुरू करूणाकर व दिनानाथ असून जीव कोटीचा उद्धार करण्याकरिता स्वत: महेश्वर अवतरला आहे. युगायुगात निरपेक्ष असे धर्मरक्षण करण्याकरिता मनुष्य रूपाने या जगात अवतरून अगाध लीला दाखवित आहे. ज्याच्या साक्षात्कारासाठी योगी लोक मोठे तप व त्याग कोटीजन्म करीत असतात. तरीही त्याची भेट होणे दुर्लभ आहे. ज्याचे दर्शनाची इच्छा धरून कित्येक लंगोटी घालून कड्या-कपाऱ्यात किंवा पर्वतावर बसतात, आणखी सुद्धा अनेक खटपटी करतात तो हा पूर्णब्रह्म चिदंबर ब्राह्मणकुळात जन्म घेऊन रोज नवीन चरित्र दाखवित असे. श्रुती शास्त्रासही जे अवर्णनीय आहे अशी आत्मसत्ता तो देवराय दाखवीत असे. सर्वांचा अभिप्राय जाणून त्याप्रमाणे त्यांना बळ देत असे. ज्या योगे हे जग सचेतन दिसते, ज्याच्या सत्तेमुळे मायेचा भास होतो ते हे ब्रह्म मनुष्यरूपाने अवतरून यात्राजनांसमवेत चालत असे. कोणी एक नृसिंह भक्त छळण्याकरिता स्वामींच्या मंदिरात आला व त्याने दुरून पाहताच चिदंबराचे ऐवजी त्याने नृसिंहरूप पाहिले, त्यामुळे त्याचे गर्वहरण होऊन स्वामींना शरण आला. अशी स्वामींची अगाध करणी साद्यंत कोणी वर्णन करू शकेल. कित्येक भाविक लोकांनी गुरूंच्या पायाखालची माती घेऊन कपाळाला लावताच त्याचे सुंदर कुंकू होत असे. एके दिवशी स्वामींनी मोठ्या प्रेमाने आपल्या भक्तांना आपला वृत्तांत सांगितला. एक दिवस ब्रह्मदेवाने मला प्रार्थना केली की, ''या कलियुगात अवतार घेऊन धर्मस्थापना करावी. तरच हे जग सत्पदी राहील.'' तेव्हा मी ब्रह्मदेवाला म्हणालो, ''जर मी या भूमीवर अवतार घेतला तर मी तुझे लिपीस पुसून टाकीन. तुला मान्य असेल तर मला आता पुन्हा प्रार्थना कर.'' तेव्हा ब्रह्मदेव हसून म्हणाला, ''आपण लवकर अवतार घ्यावा व आपली सत्ता प्रकट करावी आणि सर्व लोकांना सन्मार्गावर लावावे.'' तेव्हा स्वामी ब्रह्मदेवाला म्हणाले की, ''ऐक, जगात कर्ताभोक्ता असा मी एकच आहे. तसेच दाता रक्षणकर्ता व संहारक

असा अद्वितीय मी आहे. निरपेक्ष असून तिन्ही लोकांत असून मीच सर्वसाक्षी आहे. नुसत्या बहिर्दृष्टीने लोक मला काय पाहू शकणार? सर्वांना माझा धाक आहे. माझ्या भीतीने वारा सर्व दिशांना वाहतो. तसेच धाकाने सूर्यही रोज उगवतो. माझ्या धाकाने यमसुद्धा कापतो, मला भिऊन इंद्रसुद्धा पाऊस पाडतो आणि माझा धाक मानून पंचभूते आपला आपला अधिकार पूर्ण पाळतात. वाघ, सिंह, सर्प आदी माझे धाकाने वर्तन करतात. देवनायक कल्पायुषी असूनही माझा धाक मानतो. लोकांचा केवळ नामस्मरणाने मी निश्चित उद्धार करतो. माझे अगाध चरित्र देवर्षी व ब्रह्मदेवही जाणत नाहीत. ऐका - - एक गुह्य गोष्ट मी सांगतो. जो रात्रंदिवस माझे स्मरण करतो तो निश्चित माझेप्रमाणे होतो. याकरिता नेहमी माझे स्मरण करा.'' याप्रमाणे तो दयाळू आपल्या भक्तांना निजगुज सांगत असे. कारण तो कनवाळू आहे. रसाळ अशा निजानंदाची ज्याला आवड आहे, त्याने गुरुपदास भजावे. गुरूंचे भजन जो करतो तो पूर्णब्रह्म होतो आणि त्याचा प्रपंच परमार्थ संपन्न होतो. याची एक गोष्ट मी तुम्हाला सांगतो, एके दिवशी दोघे भक्त-श्याम व सांब या नावाचे जे विरक्त होते त्यांनी एकांतात भेटून स्वामींना वंदन केले व विचारले, ''हे कृपाधना, श्री गुरुराया, हे गिरिजारमणा, ज्ञानपूर्णा, जगाचा उद्धार करण्याकरिता भूलोकी आला आहेस. तेव्हा तुझे चरणी आमचा एक प्रश्न आहे. हे स्वामीराया, तुझे भक्तास तू कोणत्या लोकी मुक्ती देशील ही गुजगोष्ट आम्हास सांगावी व आमच्या संशयाचे निराकरण करावे.'' तेव्हा त्या कृपानिधीने हसून दोघांना आपल्या आसनावर बसवून त्यांचे डोक्यावर आपला वरदहस्त ठेवला व डोके वर करून पाहण्यास सांगितले. गुरुची आज्ञा मानून ते वर पाहू लागले तर त्यांना चमत्कार दिसू लागले. ते असे की, प्रकाश चोहिकडे दाटला आहे व आदि अंतरहित शांत व अव्यक्त चिन्मात्र दिसत आहे. ज्यायोगे बुद्धी व वृत्ती स्थिर होते, ज्याला उदय किंवा अस्त नाही, जे गुणातीत आहे, जे अत्युच्च अनंत व अव्यक्त आहे असे ब्रह्म सर्व ठिकाणी दिसू लागले. जेथे राग-लोभ नसून निरविशेष अशी सत्ता आहे. ज्याला मायापाश शिवत नाहीत अशा ब्रह्मी ते स्थिर झाले. जे संसाराला न शिवता बुद्धिपारंगत झाले आहेत त्यांना ती वस्तू नेहमी स्थळ आहे. त्यांची आकाशाप्रमाणे वायुगती असते. जे उपनिषदाने प्रतिपाद्या केले आहे असे ते ब्रह्म आहे. या ठिकाणी म्हातारपण, मरण वगैरे भय नाही. तेथे भक्त समरस झाले. समुद्रात ज्याप्रमाणे मीठ मिळते, पाणी व दूध एकात असले तर वेगळे होत नाहीत, पाण्यात पाणी जसे समरस होते तसे ते दोघे ब्रह्मी

ऐक्य पावले. ज्याप्रमाणे वाती एकत्र करताच दिवा जसा एकरूप होतो किंवा ठिणगी अग्नीस मिळताच एकरूपता पावते अथवा घट फोडताच त्यातील आकाश बाह्य आकाशासी समरस होते. तसेच जीवभाव सोडून त्याच क्षणी ते ब्रह्मी एकरूप झाले. तत्काळ त्यांची निर्विकल्प समाधी लागून त्यांची बुद्धी लीन झाली. त्यांची इंद्रिये अतिंद्रिय पदी बसली. हा काय अपूर्व प्रकार आहे त्यांना कळेना. त्यांच्या सर्व गती निश्चल होऊन ते रात्रंदिवस समाधी लागून एका आसनावर सात दिवस बसले. मग त्यांची समाधी उतरली. सर्वांगावर बुद्धी पसरली आणि त्यांना पुढे प्रकाशामध्ये चित्रपर्वत दिसू लागला. तो कोटीसूर्याप्रमाणे सोज्ज्वळ होता. कोटीचंद्राप्रमाणे शीतल व निर्मळ होता. आणि नाना तऱ्हेच्या रत्नांनी इंद्रधनुष्याप्रमाणे चमकत होता किंवा आकाशी छत्र आहे व डोंगरभाग हे दंड आहेत, असे दिसत असून त्या ठिकाणी कल्पवृक्षाची वाढ होऊन आकाश आपल्या डोक्यावर घेतल्यासारखे वाटत होते. गाय, वाघ, सिंह व हत्ती जेथे निर्वैर होऊन एकत्र खेळत होते त्या कैलासाची स्थिती मी काय वर्णन करू. कानांत कोकीळ, हंस, मोर असे पक्षी सुखद कुजन करून पर्वतावर चोहीकडे खेळत होते. अत्यंत गोड अशा पाण्याने भरलेल्या अशा सुंदर तळ्यात जेथे रत्नांच्या पायऱ्या होत्या तेथे सुरवर आपले नारीसह जलविहार करत होते. अमृत पिऊन व अंतरात अत्यंत आनंदाने ते सुरवर सुवर्णकमळे वेचीत होते. कमळाच्या माळा तयार करून प्रेमाने आपल्या प्रिय सखीच्या गळ्यात घालून त्याची शृंगारकळा पुरवीत होते. दंपती एकांती बसले असता भोवताली स्फटिकांच्या भिंती असल्यामुळे त्यांचे प्रतिबिंब त्यावर पाहून चित्त दचकत होते. ठिकठिकाणी स्वकांतेस घेऊन सिद्धही सुंदर गाऊन आनंदाने क्रीडा करीत होते. कामधेनूचा समुदाय मंदार वृक्षाखाली आनंदाने रवंथ करीत बसला होता. अशा त्या कैलासाचा महिमा मी काय सांगू? काही ठिकाणी मुनी लोक चित्त एकाग्र करून व डोळे झाकून समाधिस्थ झाले असून शिवानंदाने डुलत होते. सर्व पशुपक्षी, किटके, हरणे व झाडे-झुडपे इ. शिवस्मरणाने काळ कंठित होते. जन्मोजन्मी पुण्य करून ज्यांना कैलासाचा लाभ झाला होता, ते आताही शिवानंदमय असल्यामुळे त्यांचे पुण्याचे वर्णन कोण करेल? क्षणोक्षणी शिवस्मरण करून काळकंठित श्वाससूत्री नाम ओवून ते प्राणी चिदंबराची सेवा करीत होते. याचप्रमाणे कैलास पर्वतावर नवरत्नांनी निर्माण केलेली घरे होती आणि मधोमध उन्नत शिवागारे होती. त्याचे शिरी चंद्रमंडळ शोभत होते. सात दारे, सात आवरणे व सात परीघ अमृतपूर्ण

शि
व
चि
द
म्ब
र

असून महाद्वारी सर्व देवगण हात जोडून उभे होते. अग्नियम, वरुण, निर्ऋती, वायू, इंद्र त्या शिवाचे कृपाकटाक्षाची इच्छा धरून एका दारी उभे होते. शिवाजवळ ऋषीसंघ वेदपठण करीत अंतरी नि:संग होऊन शंकराचे अभंग असे स्तवन करीत होता. कैलासावर शंकराची शोभत होती आणि चोहीकडे रत्नप्रभा फाकली होती व मध्येच आपल्या सभा परिवारासह रंभा नाचत होती. सभोवताली सर्व देवगण बसले होते. चंद्र छत्र धरून उभा होता. वायूने पंखा धरला होता व षण्मुख स्तोत्र करीत होता. सूर्यानी दिवटी धरली होती. नंदी मोठी कीर्ती वाजवत होता व हरी सुंदर पूजा करत होता व मध्ये शंभूदेव शोभत होता. सर्वांगावर सर्पलंकार लेवून कमनीय अशा रत्न सिंहासनावर शंकर विराजमान झाला होता आणि पाची मुखावर तीन डोळे शोभत होते. शुभ्र भस्माचे अंगावर उद्धूलन त्यावर त्रिपुंड्र धारण केलेला होता. व्याघ्रचर्माचे त्याने परीधान केले होते व गजचर्माचे उत्तरीय शोभत होते. त्या सद्‌हृदयाचे जटेतून झुळझुळ गंगा वाहत होती व तो अभयदानाने शरणागताचे पाठी राहून रक्षण करतो. अमूल्य असे वस्त्र नेसून तो कृपाकटाक्षाने आपले भक्तांकडे पाहतो व त्याच्या डाव्या मांडीवर चित्सौंदर्यखाणी अंबिका गिरिजामाता शोभते. कात्यायनी वदनामृत पिऊन जो सुप्रसन्न असतो अशा त्या शिवास पाहताच दोन्ही भक्तांनी वंदन केले. त्यांचे अंगावर रोमांच उभे राहिले व डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले व प्रेमाने दोघांनी शिवचरणांवर साष्टांग नमस्कार घातला. त्यांचेकडे कृपकटाक्षाने पाहून सांबाने आपल्या भक्तांना उठविले व प्रेमाने आपल्या हृदयाशी धरून त्यांचे डोक्यावर वरदहस्त ठेवला. जेव्हा त्या भक्तांनी डोळे उघडून पाहिले तेव्हा चिदंबर महास्वामी समोर दिसले. तेव्हा मनात त्यांना भ्रम निर्माण झाला व स्वामींच्या जवळ उगीच उभे राहिले. आपण कैलासावर आहोत की भूलोकावर, शिवाजवळ आहोत की गुरुजवळ, आसनावर आहोत की सभेत. आपण जागे आहोत की स्वप्नात अशी दोघांना शंका आली. त्या वेळी तो आनंदघन त्यांना विचारता झाला की, ''तुम्ही जो काही चमत्कार पाहिलात तो मला सांगा.'' मग तो भक्त सावध होऊन त्यांनी गुरुचरणी विनंती केली की, ''आम्ही जी वस्तू पाहिली ती आपण सर्वज्ञानी असल्यामुळे जाणताच. आम्ही जी वस्तू पाहिली तिचे आमचे वाणीने वर्णन करता येणार नाही. तरी आपणच कृपा करून आम्हाला सांगून आमचा संशय दूर करावा.'' तेव्हा तो कृपासागर म्हणाला की, ''तुम्ही जी वस्तू पाहिली ती निश्चितच वेद जिचे नेहमी वर्णन करतात ती परब्रह्म वस्तू होय. ज्या

शि
व
चि
द
म्ब
र

सद्‌गुरुच्या सच्छिण्य पूर्ण आहे व सर्व तऱ्हेने ज्यांनी अभिमान सोडला आहे त्यांच्याकरिता बसण्याचे ते स्थान आहे. मग जे शिवरूप पाहिले जे निष्पाप व भक्त गोचर आहे व नाना अवताराचा बाप आहे ते पश्चात्ताप पावलेले भक्त पावतात. जे सर्व बाजूनी मुक्त झालेले आहेत व जे नेहमी भजनात दंग असतात आणि ज्यांना माझे पूजनात प्रेम असते, असे भक्त शिवलोकास जातात. जेथे किंचितही शोक नाही, सांसारिक दुःख नाही असा माझा उत्तम लोक माझे भक्तांस मिळतो. याप्रमाणे श्रीगुरुची मधुर वाणी ऐकून त्या दोघांचे अंतःकरणात आनंद उचंबळून आला. व ते चिदंबर चरणी समरूप होऊन स्वतः शंकर सर्वांचे ठिकाणी एकरूप झाले. तरी भक्तिभावाने तोंडात नाम धरा. दुसरा कोणताही प्रयत्न करू नका आणि श्रीगुरुंना मनात आळवा. नामस्मरण करण्याकरिता कोठलेही कष्ट होत नाही आणि नामाने मुक्तिरूपी नवरीस वरा. असे हे थोड्याच कष्टात मोठे फळ आहे. याकरिता प्रयत्न करून हे मुमुक्षजनहो, आपले वदनी नाम धरा. ज्यायोगे मोक्ष सदनात तुम्हाला राहता येईल. तुम्हाला त्रिवार सत्य सांगतो की, 'या कलियुगात मुख्य नामच आहे. नामानेच मोक्ष सुलभ होतो. वेदसुद्धा सारखी हीच गर्जना करतात.' त्या वेळी ब्राह्मणांनी स्वामींना प्रश्न केला की, "वेदशास्त्र असे सांगतात की, ज्ञानानेच मोक्ष निश्चित लाभतो. मग नामस्मरणाने साधकास मुक्ती कशी मिळेल? नामे असंख्य आहेत पण कोणते नाम समर्थ व मोक्षदायक आहेत, तसेच नामाने ज्ञान कसे उत्पन्न होते? कारण, श्रुतीशास्त्र व पुराणात बहुधा नाममाहात्म्य वर्णिले आहे तरी नामात अशी कोणती शक्ती आहे?" मग स्वामी म्हणाले, "ज्ञानाने मोक्ष साधकास लाभतो, असे वेद बोलतात आणि ज्ञानावाचून मोक्ष हाती येत नाही असे वेद बोलतात. वैराग्याने अभ्यास केल्याशिवाय काहीही ज्ञान प्राप्त होणार नाही. दृढ भक्ती धरून असा अभ्यास रोज करताच काही काळाने ज्ञान प्राप्त होईल व त्यामुळे साधकांना मुक्ती हाती येईल. पण या कलियुगात माणसाला चित्त एकाग्र करणे कठीण आहे. त्यामुळे लोकांचा उद्धार कसा होईल असा ईश्वरास प्रश्न पडला. त्यावर एक सोपा उपाय त्याने शोधून काढला आणि तो म्हणजे नामस्मरण होय आणि विचार करून ईश्वराने नामावर स्वतःचा मोठा प्रभाव ठेवला. नामस्मरण करता करता दुष्टांचेही अंतःकरण विरून जाते. आणि मनात प्रेम उत्पन्न होते आणि नामाचे प्रेमाने चित्त शुद्ध होते. जमिनीवर एक एक थेंब पाणी पडून ते साचल्यावर जमिनीत बी पेरताच निश्चित पीक येते. दगडावर प्रहार करून सुंदर मूर्ती तयार होते. त्याप्रमाणे नामस्मरण



शिव चिदम्बर

करताच अज्ञानाचा नाश होतो. ज्ञानाचे आड पाप येते व नामस्मरणाने पापाचा नाश होतो. आणि पाप जाताच विकल्प नाहीसे होतात व ज्ञानाची उत्पत्ती होते असा स्वत: श्रीपतीने भागवतात आणि अर्जुनाला गीतेत नाममाहात्म्य व नाम भक्तीचा बोध केला आहे. प्रेमाने नाम उच्चारताच विषयी विरक्तता उत्पन्न होते व त्यातून वैराग्य उत्पन्न होऊन भक्ती लाभते आणि भक्तीने ज्ञाता आत्मरूपी होतो याकरिता सर्व अटाटी मोडून मोक्षासाठी नेहमी कंठाने नाम जपावे. त्यायोगे मुक्ती सुलभ होते. चिदंबराची अनंत नामे आहेत त्यात वीस मुख्य आहेत ती स्कंद पुराणात वर्णिलेली आहेत. चित्प्रकाश, शिव, चिदंबर, सांब, शंकर, शंभू, महेश्वर, तिल्लवनाधिश, गुरू नटेश्वर, हर, मुनींद्र, व्याघ्रपुरीश, भगवान, विभु, योगींद्र, महागुरु, चिदीश्वर, सभापती, दीक्षितेंद्र अशी वीस नामामृते आहेत. आणखी इतर पुष्कळ नावे आहेत. तरी या वीस नामात मोक्षदायक अद्‌भुत शक्ती आहे. त्यातही चिदंबर नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. या नामाचा मूळ हेतू तो निर्विकार चिदंबरच निश्चित आहे. कारण येथून ओंकाराची उत्पत्ती होते असे व्यास सांगतात. स्कंद पुराणात व्यासाने लिहिलेले चिदंबर माहात्म्य सोळा हजार आहे. याशिवाय नाम माहात्म्य वेगळे आहे. एक एक अक्षराचा महिमा चार हजार ग्रंथात व्यास महिर्षीने सांगून पुढे सांगितले की, या नामाचा अंत लागत नाही, जेथे व्यासमती कुंठित होते, तेथे मानवाची काय गत. ओंकार हा निश्चितच मूळ आकार आहे आणि त्याची स्वर व उत्पत्ती चिदंबरासाठी आहे. जे निर्विकार असून स्वप्रकाशित आहे आणि विशेष असे जे शुद्ध ब्रह्म आहे, त्यालाच चिदंबर असे नाम आहे आणि तेथेच सर्व नामांची उत्पत्ती आहे. तसेच पुढे नाना अवतार आले. चराचर जगाची उत्पत्ती झाली. तेच नेहमी स्थूल किंवा अणू नामसार होय. जो अव्यय असा जगधाम आहे. चिदंबराचे रूप सर्वत्र आहे. तेच साक्षित्वाने प्रत्येकाचे हृदयात प्रकाशते आणि त्याचे प्रतिबिंबाने अंत:करण नेहमी भरलेले असते. अंत:करणापासून संकल्पाचा जन्म होतो आणि स्थान भेदाने कल्पना परिणाम पाहून नामत्वास धरतात. चिदंबर हे नामाचे सार आहे आणि ते वृत्तीतून बाहेर येते. नाम हे ज्ञानपूर आहे. नामाचे सार हे मोक्षप्रद आहे. विहिरीचे पाणी काढताच ते काढणाऱ्याला गोड की खारट आहे ते कळते. तसेच अपार आत्मशक्ती नामाच्या योगाने मोठे कार्य करते. ब्रह्म सर्व ठिकाणी असताना हृदयात त्याची प्रत्यक्ष कल्पना करताच साक्षात्कार होऊन मोक्ष तत्काळ लाभतो. नाम हे सर्वव्यापक आहे. कारण ज्ञान असूनही भावनेशिवाय

मोक्षसुख देवादिकांना सुद्धा लाभत नाही. नामावर भक्ती ठेवून तोंडाने ते सारखे उच्चारताच अंत:करण ती भक्ती बघून मोक्ष देण्यास समर्थ होते. हाच अर्थ सूत, याज्ञवल्क्य, शुक, कपिल, दत्तात्रेय यांनी आपल्या ग्रंथात सांगितला आहे. म्हणून नाम महिमा फार मोठा आहे. उपाधि भेदाने अनंत नामे आहेत परंतु नामाने निज वस्तूची प्राप्ती होणे एकाच नामावर विश्वास ठेवून कित्येक संसारातून मुक्त झाले आहेत. उलट्या नामाने पतितही संसारात पुनित होऊन त्याने शतकोटी ग्रंथ वर्णिले. त्यामुळे त्याची गणना ऋषी लोकांत झाली. कालकूट पिताच शंकराचे सर्व अंग फार तापले. त्याकरिताच गंगा आणि चंद्र यांचे धारण केले. तरी तो शांत होईना. मग तो नेम करून सतत नामस्मरण करू लागला आणि त्या योगे शांत झाला. महापापी अशा अजामिळाने आपल्या पुत्राचे नाम उच्चारताच विष्णुदूत येऊन त्याने त्याचा सबळ असा कंठप्राश सत्वर छेदून टाकला. सर्व नामात उद्धाराची शक्ती निश्चित चिदंबराची आहे आणि कलियुगात तीच मूळमूर्ती या भूलोकावर अवतरली आहे. परात्पर असा तो पूर्णात्मा चिदंबर मूळ नाम धारण करून एक ब्राह्मण म्हणून या भूलोकावर अवतरला. मायादेवीचा पती सर्वेश्वर तो हाच होय. याकरिताच चिदंबर या नामात थोर उद्धार शक्ती आहे. लाडू, पोळ्या, श्रीखंड यांचा रस गोड लागतो. तरी साखरेसारखी त्यांची गोडी नाही. प्रदीपामधील सूर्य ज्योती, सूर्याच्या तोडीची होत नाही. जसे तळी, विहिरी खोदल्या तरी त्यातून ढगाचे पाणी मिळते आणि ते पाण्याचे कार्य चालवतात तरी त्यांना ढगाची शक्ती नसते. जरी इंद्रिये ज्ञानमय आहेत आणि व्यवहारात ज्ञान कार्ये चालवितात तरी त्यांना ब्रह्म साम्य येणार नाही. याकरिता चिदंबर नामात पापहारक अशी अद्भुत शक्ती असते. ती दुसऱ्या नामात कधीही येणार नाही. तुम्ही म्हणाला की, हे नाम तुम्हाला आवडते. म्हणून तुम्ही सांगता तरी त्याचे पुराणोक्त असे प्रमाण तुम्हाला सांगतो. जे व्यासाने स्कंद पुराणात सांगितले आहे. चिदंबरांना यत्नाम श्रेष्ठम् ही बहूमामसू! दुच्चारण मंत्रिण पुण्यराशी ही स्वयं नरदा असे हे नाम सर्व नामात उत्तम आहे. ज्याचे केवळ उच्चाराने पाप जळून भस्म होते. पंचाक्षरम, महायंत्रम, पश्चपातक, नाशनम पश्चाशत कोटी गुणीतम मुक्ती घंटा पद्ममुने पंचाक्षरी मंत्राचा जप करताच पंच महापापांचा संहार होतो आणि त्याचा पन्नास कोटी जप केला तर त्याला मुक्तीचा राजमार्ग म्हटले आहे. चिदंबरमिती ब्रुयात्सकृज्जननवर्जित: भुक्तिघण्टामणिपदो मोक्ष एवन संशय चिदंबराचे एक वेळ नाव घेताच पुनर्जन्म होत नाही. त्यालाच मुक्तिघंटा

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

मणिपद आणि मोक्षसर असे नि:संशय म्हणतात. चिदंबर माहात्म्य ऐकून वेद लज्जित होऊन म्हणाले, आमची करणी या नामापुढे थकली आहे. जीव व आत्म्याचे ऐक्याचा अनुभव घेण्यासाठी साधक आमचे पाठीशी लागतात. परंतु चिदंबर नामाचे जपाने तो सहजासहजी साधतो. तेव्हा हे असे कसे? म्हणून वेद उदासीन होऊन 'नेती नेती' म्हणून स्तब्ध झाले. पंचमांशी शिवरहस्य व्यास ऋषीने नाम महिमा वर्णन करून या शब्दाचा अर्थ सांगून प्रतिपादन केलेले आहे. व्यास म्हणतात, ''चिदंबरेती नाम सकलार्थ प्रदायकम तस्मान्मोक्षार्थिमि नित्यं सेव्यह श्रीमदचिदंबर: चिदंबरेति मंत्रोऽयं जपनिय: प्रयत्नक: चिदंबरेती मंत्रेण पूजनीय: सदाशिव: चिदंबरान महानमंत्रो नान्योऽ स्थिती धृवम् धृवम् चिदंबर ही चार अक्षरे हेच नावच मोठा महामंत्र आहे. याचा वाचेने उच्चार करताच सर्व मंत्र सिद्ध होतात. साधकाने भक्तिभावाने शंकराची पूजा चिदंबर मंत्राने केली तर त्यायोगे त्या कर्पूरगौराला अत्यंत संतोष होतो. तो कैलासनायक पार्वतीला म्हणाला की, ''चिदंबर मंत्रासारखा दुसरा महामंत्र नाही चिदंबरेति मंत्रोऽयं सतारम् मम शोभने यन् मुखे वर्तते नित्यं, सोऽहमेवनं संशय: शिव पार्वतीला म्हणाला, ''हे शोभेने हा महामंत्र प्रणवासहित चिदंबर असा आहे. ज्याचे मुखात तो असतो तोच मी सर्वोत्तमो महामंत्र शिवपूर्वाचिदंबर: मंत्रराज इति ख्यात: स्मरणात सर्व सिद्धीदा चिदंबराचे नाम माहात्म्य वर्णन करण्यास अशक्य आहे. ब्रह्मासही हजार वर्षे अभ्यासून सुद्धा जाणणे शक्य झाले नाही. प्रलयाचे वेळी महाजलात ब्रह्मदेव कमळात उपजला आणि सर्व शून्य पाहून तळमळू लागला. तेव्हा तो करुणाकर चिदंबर आकाशवाणीने ब्रह्मास म्हणाला, सतत नामजप कर ज्यायोगे सुंदर अशा ज्ञानाचा लाभ होईल. हे ऐकून ब्रह्मदेव चतुरक्षर चिदंबर प्रणवासहित ताबडतोब जपू लागला. या नामसामर्थ्याने ब्रह्मदेवाला वेदांचा लाभ झाला आणि सृष्टीरचना वैभव जाणून चरचर जीव रचू लागला. नंतर चौदा ब्रह्मांडे सृष्टी नामबळाने त्याने रचली. याकरिता नामाचे माहात्म्य फार मोठे आणि मोक्षसाधनांचा हा एक सोपा उपाय आहे. चिदंबर गुरुचे नाम हे सर्व सिद्धिदायक आहे. आता त्या नामाचा सुंदर अर्थ तुम्हाला सांगतो. तो एकचित्ताने श्रोतेजनहो, ऐका. चित्त म्हणजे शुद्ध ज्ञान आहे आणि अंबर म्हणजे आकाश म्हणजे गगनासारखे जे परिपूर्ण जे शुद्ध ज्ञान आहे तो म्हणजेच चिदंबर तो मायेचे नियंत्रण करणारा असा सर्वव्यापक आहे. वेदांमध्ये सांगितलेले आत्मसुख ज्यासाठी योगी कष्ट करतात ते पूर्णब्रह्म म्हणजेच चिदंबर होय किंवा चित्तदंभाचे बळ दहन करणारी रेफ शक्ती असा एकेक

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

अक्षराचा सोज्ज्वळ अर्थ याप्रमाणे निघतो. या मंत्राला चतुरक्षर म्हणतात आणि प्रणवासहित हा महामंत्र होतो आणि शिवपूर्वक उच्चार करताच हा थोर मंत्रराजं होतो. मंत्राचा अर्थ सांगितला. आता महामंत्राचा ऐका. आकार, उकार, मकार मिळून ओंकार झाला. भूर भूर्वादी तिन्ही लोक तीन वर्णात नेहमी असतात. तीन श्रुती आणि तीन अग्नी प्रणवाचे ठिकाणी राहिले आहेत. हा जो सर्वात्मा प्रवण आहे, ज्या शक्तीने त्याला आकार आला असा हा असंग देवदेव चिदंबर नामाने शोभतो याप्रमाणे महामंत्राचा अर्थ सांगितला. आता मंत्रराजाचा अर्थ सांगतो. जीव ब्रह्मैक्य, ज्ञान मंत्रराजातून निघते. शिव म्हणजे कल्याण, कल्याण म्हणजे आनंद चित्त म्हणजे शुद्ध ज्ञान आणि अंबर नाम सप्तदासी झाला. सच्चिदानंद ही तीन पदे अद्वितीय असे ब्रह्म दाखवितो. असे पांढरे, गोड व कोमल असे तीन गुण साखरेत असतात. तसा आनंद, चित्त, सत् ही तीन पदे पूर्णात्म बोधात असतात, हे निश्चित जाणा. याशिवाय सर्व मापक आहे. जग, जीव, शीव इ. माईक आहे आणि ते सारखे असतात परंतु मनात नसता एकही दिसत नाही. नेहमी आत्मा हा सर्वात्मक भासतो. याकरिता त्रिकाळी शिव चिदंबर नेहमी एकच भासतो, हे तत्त्वमसी याचे सार आहे. शिव चिदंबर मंत्र हा आहे. कर्मभक्ती, योगज्ञान सर्वनाम जपून साधतात. याकरिता गुरुमुखाने मंत्र घेऊन अनुष्ठान सांगतात. तोंडाने याचा उच्चार करतात अश्वमेदाधि कर्मांचे फळ मिळते. श्वासोच्छ्वासात हे नाम धरताच योगाभ्यास सोपा होतो. मन नामी विश्राम पावताच संकल्प उत्पन्न होत नाहीत. चित्ती चिदंबर मूर्ती आणून प्रेमाने नामस्मरण करताच चित्तवृत्ती चिदंबराकडे ओढ घेतात. त्यायोगे अनासायेच सद्भक्तीचा लाभ होतो. अर्थावर चित्त ठेवून नामाचा जप केल्यास मन त्याप्रमाणे होऊन आनंदात लीन होते. कलियुगात नामानुष्ठान हे उत्तम साधन आहे. ज्यायोगे साधकाला पूर्ण ज्ञान होऊन नामाप्रमाणेच त्याचा पूर्णानंद होतो. ज्याचे मुखी चिदंबर नाम आहे. त्याला त्रिलोकात उपमा नाही आणि नामाचे भीतीने यमदूतही त्यास भेटत नाही. समजून किंवा न समजून जे वाचेने हे नाम उच्चारतात त्यांची कित्येक पापे भस्म होतात. एवढे नामाचे माहात्म्य आहे. याकरिता एक कथा सांगतो. तोंडाने साखरेची गोडी सांगून जिभेची आवड पुरणार नाही. त्याप्रमाणेच तुम्हाला नामाची महती सांगतो. तरी विकल्प सोडत नाहीत. लोहचुंबकाला नाणे टोचून ते खरे की खोटे ते पाहताच त्याप्रमाणेच काही साक्ष दाखवून तुमच्या संशयाचे खंडन करीन. मोहरीला सूत गुंडाळून त्याला अग्नीत टाकून पाहतात त्याप्रमाणेच तुम्हाला नामाची प्रचिती यावेळी निश्चित दाखविन. हिरो ऐरणीवर ठेवून पारखी

शि व चि द म्ब र

जसा घण मारून पाहतो त्याप्रमाणे नाममहिमा या वेळी तुम्हाला दाखवीन. नरगुंद गावी एक धार्मिक राजा होता परंतु दुर्दैवाने त्याला ब्रह्महत्या घडली आणि तिन्ही पिठातील स्वामीनायकांना हे कळले व त्यांनी त्या राजास बहिष्कृत केले व काही करून त्याला ते पुनित करेनात. तेव्हा तो गुरुपुरात आला आणि शुद्ध व्हायची इच्छा धरून सहा महिने गावाबाहेर राहिला. रोज अंगणातील केर काढून तो गुरुगृहास प्रदक्षिणा करीत असे. एका दिवशी शिवशास्त्राने विचारले, "तू दाराजवळ का राहिला आहेस?" हे ऐकून त्या राजाने आपली सर्व हकिकत त्याला सांगितली. तेव्हा शास्त्र्याने राजास सांगितले की, "तुला एक निश्चित प्रायश्चित्त सांगतो. आता जेवण करून माझे बरोबर ताबडतोब ये." व चिदंबर या नामाचा दोन वेळ उच्च स्वराने उच्चार करून मग त्याचा हात धरून त्याला आत नेले व आपल्याजवळ बसवले हे पाहून सर्व ब्राह्मण भोजन सोडून निघाले तोच सद्गुरु तेथे आले व त्यांना सर्वांनी त्याची कहाणी सांगितली. तेव्हा सद्गुरुनी शास्त्र्यास विचारले की, "त्याला काय प्रायश्चित्त दिले ते सांग. मग स्वामीस वंदन करून शास्त्री बोलला की, "मी शास्त्रोक्त प्रायश्चित्त सांगतो. त्याचा पश्चात्ताप पाहून केवळ दोन वेळा 'चिदंबर' हे नाम त्याचे कडून वदवून मी त्याचा हात धरला. हेच मोठे प्रायश्चित्त होय." शास्त्रीचे हे वचन ऐकून महास्वामी म्हणाले की, "याचे शुद्धी करता एकदा नामोच्चार पुरे असता दोनदा कशाला नाम वदविलेस?" स्वामींनीच अंगीकार केल्यामुळे या द्विजाला पंक्तीमध्ये घेतला. असा नाममहिमा थोर आहे की, ज्याच्या केवळ स्मरणाने पापाचा नाश होतो. ब्रह्मघातक असा पतित सुद्धा नामाने पंक्ती पावन झाला हे पाहून सगळे लोक नामस्मरण करू लागले. त्यावेळी असे अद्भुत झाले की तेथे जे दोषी होते ते पुनित झाले. मुखाने नामाचा उच्चार करताच रोगी रोगमुक्त झाले. सर्व नरनारी बाळ, वृद्ध नामाचा जयजयकार करताच नामोच्चार झाल्याने त्याच्या सर्व कामना सिद्धीस पावल्या. समजून किंवा न समजून पवित्र असे नाम मुखी येताच सर्व पाप धुतले जाते जसे लाकडाची अग्नीत राख होते. जेथे नामध्वनी आहे अशा घरात कलीप्रवेश नाही. त्याला पाहून काळ सुद्धा दचकतो. आणि त्या ठिकाणी जगातील सर्व क्षेत्रे वस्ती करतात. पापाचा नाश होण्यासाठी नामामध्ये जी शक्ती आहे त्या सारखी तिन्ही लोकांत शोधूनही कदापि मिळणार नाही. एक नामाने ज्या पापाचा नाश होतो ती पापे पुन्हा करीन म्हणाले तर चौदा लोक जाळले तरी त्यासारखे होणार नाही. एक नाम, एक गुरु, एक देव व एकच पती या ठिकाणी जो मनुष्य द्वैत धरेल तो यमपुरीस जातो. श्रीकृष्णाने या प्रमाणेच नाम माहात्म्य सांगितले

आणि नामस्मरण सोडून दुसरे कोणतेही साधन नाही. नामानेच चित्ताची शुद्धी होते. नामानेच सर्वसिद्धी साधतात. नामानेच त्रिशुद्धी होऊन मुक्ती मिळते. म्हणूनच नाम हेच सर्वश्रेष्ठ आहे. ब्राह्मणाला मुख्य साधन म्हणजे वेदोक्त कर्माचरण व नेहमी गुरुनामाचे स्मरण होय. ज्याला आपले हिताची इच्छा आहे त्याने सतत नामाचा जप करावा, हेच चिदंबर किंकर तुम्हास सांगत आहे.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||



शिव चिदम्बर

# अध्याय तिसावा

भुकेलेल्यांची तृप्ती व दुर्भिक्ष निवारण

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।।श्री गणेशाय नम: ।। हे चिदंबरा, सभापती यज्ञमूर्ती तुला नमन असो. तुझे चरित्र वर्णन करण्याकरिता मला स्फूर्ती दे. एखादा मंद बुद्धीचा मनुष्य तुला नमन करताच निश्चयाने ज्ञानी होतो. असे असल्यामुळे हे सावित्रीपती, मी याचक होऊन तुझ्या पायाशी आलो आहे. माझे मनोरथ पूर्ण करून तुझे चरित्राचे श्रवणाने लोकांचा उद्धार कर. हे दानशूर भक्तकैवारी चिदंबरा, एवढेच तुझेपाशी मागणे आहे. ज्याने यज्ञ विस्तार केला व जो थोर असून त्रिलोकात प्रख्यात आहे. त्या देवाला नमस्कार करून पुढे चरित्र सांगतो ते ऐका. आता महास्वामींनी केलेल्या यज्ञाचा सविस्तर वृत्तांत तुम्हास सांगतो. श्री गुरुंचा यज्ञ अपूर्व असा यज्ञ पाहून सर्व देवांनाही भूल पडली मग तेथे माणसांचा काय टिकाव लागणार? तो यज्ञ पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले. ब्रह्म, गुरु, रवि, शेष असे सर्व देव यज्ञाचा विशेष असा महोत्सव बघून मनात लीन झाले. यज्ञमंडपाभोवती सर्व देवाच्या जणू बाहुल्याच मांडल्या आहेत याप्रमाणे भक्तजनांना त्या देव पंक्ती दिसत होत्या. त्या यज्ञोत्सवाचे वर्णन देवादिकांनाही करणे शक्य नाही आणि मी तर एक मंद बुद्धीचा मनुष्य आहे तेव्हा त्या यज्ञोत्सवाचे वर्णन कसे करू? तरी चिदंबराचे प्रेरणेने कृपेने तुम्हाला किंचित सांगतो. ते तुम्ही प्रेमाने व एकचित्ताने ऐका. सर्व त्याच्या दिग्गजांचे शिरावर शुद्ध जिजकिर्ती सुंदरी असा तो त्रिपुरारी भूलोकी लीला दाखवित होता. श्रीगुरु गुरुपुरी राहत असता चिदंबर कीर्ती चोहीकडे पसरू लागली. त्यामुळे मोठी यात्रा भरू लागली. कामी व निष्कामी लोक सेवक म्हणून तेथे जमू लागले व महास्वामी अन्नदानाने त्या सर्वांचे पोषण करीत असत. असे असता एकदा एक क्षय नावाच्या संवत्सरात फार मोठा दुष्काळ पडला. यामुळे सर्व लोक अन्नपाण्याशिवाय तडफडू लागले. अन्नार्थी लोक अनेक उद्योग करीत तरी कुटुंब पालन करणे शक्य नव्हते. तेव्हा ते म्हणू लागले की आपण प्राणत्याग करू. तेव्हा चिदंबर कीर्ती ऐकून अन्नार्थी धावत चिदंबराकडे येऊ लागले. त्यात कित्येक अस्थिपंजर होते व ते महास्वामींच्या पाया पडून आपला प्राण रक्षण करण्याकरिता घायाळ होऊन रडू लागले.

दुष्काळाने लोकांना त्रास दिलेला पाहून श्रीगुरुंचे मनात दया उपजली व आदराने त्यांनी अभय दिले. स्वामींनी भुकेने व्याकूळ झालेल्या ब्राह्मणांचा मधुर वाणीने सन्मान करून कण्या भाकरी व ताक वगैरे जेवण देऊन संतोषविले. कालांतराने दुष्काळ वाढल्याचे पाहून स्वामींच्या मनात असा विचार आला की मी जर एकदाच माझ्या सत्तेने दुष्काळ नाहीसा केला तर काळाचा मनोभंग होईल आणि माझ्या अवतारास दोष लागेल. याकरिता काळाचे काम चालू द्यावे. आपले मुक्तीने उत्तम असे अन्नोदक देऊन जे लोक काळमुखात जात आहेत, त्यांना काढून त्यांचे रक्षण करू. मग यात्राजनांना अन्नोदक देण्याकरिता दिवाकरास गुरुपुरी ठेवून बरेच यात्रिकास आपले बरोबर घेऊन स्वामी निघाले. मार्गाने जात असता सिद्ध, सूर, सनकादि बरोबर असून हरी चालतो आहे किंवा हर चालतो आहे असा तो दीक्षितेंद्र शंकर शोभत होता. आपल्या मार्गाने जात असता आपल्या मधुर वाणीने तो हृषीकेश निरनिराळ्या कथा सांगत असे. त्यामुळे सर्वांना आनंद होऊन सर्वजण मार्ग क्रमित गेले. सभोवताली पादचारी तसेच घोडदळही होते आणि त्या ठिकाणी दीक्षितेंद्र नक्षत्र समूहात चंद्राप्रमाणे शोभत होते. पांढरी शुभ्र वस्त्रे, भस्मभूषित काया आणि हातात कलश असा त्या श्री चिदंबराला पुण्यवान प्रेक्षकजन आनंदाने पाहत होते. एक क्षण जरी त्यांच्या दर्शनात विघ्न आले तर त्या ब्रह्मदेवास बोल ठेवून तू हा क्षण निर्माण का केलास आणि त्याचे फळ काय मिळेल असे म्हणत होते. याप्रमाणे श्री चिदंबरेश्वर मनुष्यासारखा वावरत होता आणि याप्रमाणे तो बेडसुरास सहपरिवार आला. त्या गावी श्री चिदंबर येताच फळ आर्दीचा नजराणा घेऊन गावातील नारीनर स्वामींचे दर्शनाकरिता धावले आणि स्वामींना पाहताच फळे वगैरे पुढे ठेऊन आनंदाने देहभान विसरून साष्टांग नमस्कार केला. स्वामींनी त्याची भक्ती पाहून आदराने त्यांना उठविले व त्यांना कुशल प्रश्न विचारून त्यांना संतोषविले. मग मल्लास बोलावून त्याला आदराने क्षेमवृत्त विचारले व 'मी तुझा धर्माषित आहे. रोज माझे स्मरण का करीत असतोस?' असे विचारले व पुढे म्हणाला, ''चंद्राचे स्मरण जसे चातक प्रेमाने करतो त्याप्रमाणे तुझे स्मरण चालू आहे आणि तुझे दर्शनाकरिता मी इथंपर्यंत आलो आहे.'' तेव्हा मल्ल स्वामींना म्हणाला, ''हे सर्वाश्रया, जगन्नाथा, तू वाणीने मला कशाकरिता मोहवितोस? मी तुझे पदकमळी शरण आलो आहे. मी तुझा दास आहे. घर तुझे आहे, तेव्हा तुझे घरात तू ताबडतोब ये.'' असे म्हणून त्याने वंदन केले. नंतर महास्वामी मंद हसत परिवारासह त्या मल्लाच्या घरी गेले

शि व चि द म्ब र

आणि त्या मल्लाने परिवारासहित स्वामींचे आतिथ्य केले. चिदंबराची पूजा करून नाना तऱ्हेची पक्वान्ने ब्राह्मणांना भोजनास देऊन दीक्षितेंद्रास त्याने तोषविले व त्यानंतर आपण स्वत: प्रसाद घेतला. जेवण आवरून मोठ्या आनंदाने तो स्वामीजवळ आला. तोच तेथे दुष्काळाने पिडलेले अन्नार्थी असे दोन ब्राह्मण आले. त्यांचे पोट पाठीला लागले होते. डोळ्यांच्या खाचा झाल्या होत्या व डोळ्यातच काय तो प्राण शिल्लक होता. बाकीचे शरीर निव्वळ हाडे व चामडे होते. अशा त्या दोघा ब्राह्मणांनी स्वामींना दुरून बघून दंडवत घालून नमस्कार केला व सद्‌गदित होऊन विनंती केली, "हे महादेवा, चिदंबरा, त्रिभुवनपालका, सर्वेश्वरा हे अवतार पुरुषा, कृपासागरा, आमच्या सुदैवाने तू भेटला आहेस. हे दयाळा, आम्ही दोघे ब्राह्मण दारिद्र्याने अगदी जर्जर झालो आहोत आणि घरी कुटुंब फार मोठे आहे. त्याचे पोषण करून देवा आता आम्ही थकलो आहोत. आधीच कुटुंबाला रोज पोटभर अन्न मिळणे कठीण होते आणि त्यात असा भयंकर दुष्काळ पडला. त्यामुळे सर्व जण अन्न अन्न म्हणून तडफडत आहेत. मरणोत्मुखाने त्यांच्या डोक्यावर कडाडून वीज पडावी तसे झाले आहे किंवा नदी वेगामुळे शिथिल झालेल्या त्या झाडावर कुऱ्हाडीचे घाव घातल्याप्रमाणे काळ आला आहे. या वेळी अन्नपाण्यावाचून आम्ही सहकुटुंब प्राण सोडावा, असा पूर्ण निश्चय केला होता. कारण दुसरा काही उपाय आम्हास सुचेना. इतक्यातच आमचे कानी तुझी कीर्ती आली. तरी तुझे चरणावर आम्ही शरण आलो आहोत. आमच्या प्राणाचे रक्षण कर. घरी कुटुंब व मुले-बाळे अन्नावाचून तडफडत आहेत. यापुढे त्यांचे पालन देवा तुझे कृपेवाचून होणार नाही. हे दिनदयाळा, सांबा, आम्हाला पोटभर अन्न देऊन या दीन कुटुंबाचे रक्षण कर." अशी त्यांनी प्रार्थना केली. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या व ते दोघे ब्राह्मण जमिनीवर लोळू लागले. त्यांना पाहून स्वामींच्या पोटात अतिशय कृपा उपजली. बाळाचे कष्ट पाहून त्याच्या मातेच्या मनात जसा कळवळा उत्पन्न होतो तशीच श्री दीक्षितांचे अंत:करणात करूणा उपजली. त्यांना उठवून आपल्या पोटाशी धरून त्यांना अभय देत स्वामी म्हणाले, "जे तुम्ही मागे कष्ट सोसलेत ते दिवस आता गेले आता धीर धरा. आधी स्वस्थपणे तुम्ही भोजन करा. तो उमारमण तुमचे निश्चित रक्षण करील. तुमचे मनोरथ निश्चीत पूर्ण होईल म्हणून मनात खंत बाळगू नका." स्वामींचे हे अभयवचन ऐकून ते दोघेही ब्राह्मण भोजनाकरता गेले. इकडे स्वामींनी मल्लास बोलावून धर्मज्ञानाचा उपदेश केला व त्याला सांगितले की, "दुष्काळात जो अन्नदाता

शिवचिदम्बर

होतो व परिस्थिती उत्तम असता जो याचकांना द्रव्य देतो व एखादयाला भीती वाटत असता त्याला जो अभय देतो असे तिघेजण शिवाला मान्य होतात. याकरता या दोन्ही ब्राह्मणांना एक वर्ष पुरेल इतके धान्य देवून शंकरास संतोष होईल असे कर. दुष्काळात थोडे जरी दिलेस तरी शंकर तुझेवर संतुष्ट होईल व तो निश्चित फळ देईल याचा तू मनात मुळीच संशय धरू नकोस.'' हे महास्वामी वचन ऐकून मल्ल त्यांचे पायाला वंदन करून म्हणाला की, ''हे स्वामी, हा दुष्काळ फार कठीण आहे आणि घरी कुटुंबही मोठे आहे आणि अतिर्थींची गर्दी रोज फार होते शिवाय रोज भिक्षुक लोक दाराशी येऊन गळा काढून रडतात. या दुष्काळातून मी कसा पार पडेन याची चिंता मी रोज करतो तर मग आपली आज्ञा मी कशी पाळू?'' मग श्री चिदंबराने त्या मल्लास सदूपदेश देऊन दानशूर असे नाव दिले आणि मग म्हणाले, ''हे मल्ला, तुझ्या संग्रहाला किती धान्य आहे ते मला सांग. म्हणजे मी तुला तुझे हित कशात आहे ते सांगतो.'' त्यावर तो मल्ल म्हणाला, ''हे गुरुराया, आमचे अंगणात या वेळी नऊ जोंधळ्यांचे पेव आहेत आणि घरी खर्चही फार आहे.'' याप्रमाणे त्या मल्लाचे सत्यवचन ऐकून स्वामी सुहास्य वदनाने म्हणाले की, ''एवढे धान्य तुझ्या घरी असता तू इतका चिक्कूपणा का करतोस? याने तू धन्य होणार आहेस काय? याचा मनात विचार कर. धनधान्य, बायको-मुले, घर व आप्त हे तुला सर्व असताना तू असा कृपण का होतोस? अशाने तुझे सर्व प्रयत्न निश्चितच व्यर्थ होतील. तू कशाची शाश्वती धरतोस? या संसारात सर्व काही मायामय आहे. येथे विजेसारखे सर्व काही क्षणिक आहे. तापलेल्या तव्यातील एका पाण्याच्या थेंबाप्रमाणे माणसाचे आयुष्य आहे. सापाच्या तोंडात सापडलेला बेडूक जसा चिलटाला गिळू इच्छितो तसे संसारी मूर्ख भोग सुखाची इच्छा करतात. सुखाकरिता जे जे करतात शेवटी त्याने अपार असे दु:खच मिळते. याप्रमाणे सुख हे संसारात स्वप्नाप्रमाणे आहे याचा तू मनात विचार करून बघ. जसे पक्षांचे थवे रात्री एका ठिकाणी बसतात आणि सकाळी वियोग होतो पावतात. त्याप्रमाणेच त्या पुत्रांचा संबंध समजावा. संपत्ती ही चंचल असते. तरंगाप्रमाणे तारुण्यही खोटे असते. देह हा केवळ रोगांचे मंदिर आहे. तेव्हा जेथे काय सुख आहे, ते मला सांग. ज्या देह सुखाकरिता मनुष्य कष्ट करून उपाय करतो तो हा जड देह पंचभूतमय आहे. परंतु त्याहून आत्मा हा वेगळाच आहे. पोट भरण्याच्या इच्छेने ज्याप्रमाणे मूर्ख लोक धान्याचे पेव भरून ठेवतात त्याप्रमाणे आत्मसुखाकरिता देह पोषण होय. आपली थंडी जाण्याकरिता

ज्याप्रमाणे गाढवाच्या अंगावर पितांबर घातला त्याचप्रमाणे स्वहिताकरिता देहरक्षण होय. देहाव्यतिरिक्त जो आत्मा त्याला न समजून मूर्ख लोक नाना संकल्प करतात. आणि त्यांना कष्टच प्राप्त होतात. विचार करून सुखाचे वर्म न जाणता सुखाकरिता नाना कर्मे करून स्वत: होऊनच मनुष्य नाना योनी भ्रम पदरी बांधतो. अचानक मृत्यू येताच सर्व सुख साधने येथेच राहतात आणि तो मायापाशास वश होऊन जन्ममरणाचा फेरा संपादितो. जो गर्भात सर्वांचे रक्षण करतो तो आता काय तसेच सोडून देणार आहे काय? रात्रंदिवस तो सभोवती जागृत आहे. तेव्हा तू स्वत: कशाचा अभिमान बाळगतोस? त्या प्रभूने जर उपेक्षा केली तर मग तुझे रक्षण कोण करील आपणच जर आपणास पाळू शकलो तर मग सुखासुखी मरण्यास कोण तयार होईल? याकरिता देहबुद्धी सोड व धर्ममतांचा स्वीकार कर. त्यामुळे तू शुद्ध होऊन सुखी होशील. कारण शेवटी धर्म हाच रक्षण करणारा आहे. आकाशात गंधर्व नगराप्रमाणे किंवा मरू स्थानातील मृगजळाप्रमाणे हे सर्व दृश्य खोटे असून नेहमी आत्माच एकमेव सत्य आहे. माझे माझे म्हणून तू ज्याचेवर प्रेम करशील तेच तुझे शेवटी वैरी होतील आणि तुला नाना रितीने दु:ख देतील. आपले स्वत:चे कर्माचे अधीन सर्व लोक असतात ते तुझे रक्षण कसे करतील? कारण ते स्वत:चे रक्षण करण्यासच असमर्थ असतात. आपले रक्षण करणारे आपणच आहोत असे श्रुतीवचन आहे. त्यावर विश्वास ठेवून संसाराची चिंता सोड. आत्मा हा चराचरी सर्वव्यापक आहे आणि त्याशिवाय इतर सर्व गोष्टी मायिक असून खोट्या आहेत, तेव्हा आत्मा संतुष्ट होईल असे कर्म कर. ब्रह्मादी सर्व जीवात आत्मा परिपूर्ण आहे आणि त्याचा अनुग्रह होण्याकरिता जीव संतर्पण कर. म्हणून या वेळी तू या दोन ब्राह्मणांना परमात्मा समजून एक वर्षापुरते धान्य दे.'' गुरुमुखाने असा बोध ऐकताच त्या मल्लास ज्ञान प्राप्त झाले आणि गुरुपदांना वंदन करून त्याने त्या दोघा ब्राह्मणांना बोलविले व सांगितले की, ''या पेवातून तुमच्या कुटुंबास एक वर्ष पुरेल एवढे जोंधळे न्यावेत.'' याप्रमाणे मल्लाची वाणी ऐकून त्या दोन्ही ब्राह्मणांनी धान्य घेतले व स्वामी चरणी वंदन करून आपले गावी निघाले. हा वृत्तांत ऐकून इतर गावातील लोक जे धान्यार्थी व दुष्काळ पीडित होते ते मल्लाकडे धावून आले. आधी श्री चिदंबराला वंदन करून म्हणाले, ''हे दानशूरा, तुझी कीर्ती ऐकून तू आमचे प्राण वाचवशील म्हणून आम्ही येथे आलो आहोत. तू धान्य देऊन दुष्काळ पीडितींचे कुटुंब रक्षण करतोस. हे तुझे यश ऐकून येथे आलो आहोत. तरी हे प्रभूराया, आमचा प्राण

शिवचिदम्बर

वाचव.'' ही लोकांची दिन वाणी ऐकून स्वामी हसून बोलले की, ''हा मल्ल दानशूराग्रणी आहे आणि तुम्ही त्याचेजवळ मागा.'' तेव्हा मल्लाने सर्व पेवे उकरून एका ठिकाणी धान्याची रास केली व स्वामी चरणी नमून तो मधुर स्वराने बोलला की, ''सर्वांचा आत्मा चिदंबर आहे व तो अनेक रूपाने याचक होऊन आला आहे. म्हणून मी हे सर्व धान्य श्रीचरणी अर्पण करीत आहे. निर्भय होऊन हे धान्य स्वीकारावे व कुटुंबाचे रक्षण करून सुखी व्हावे.'' म्हणून त्या भक्तोत्तम मल्लाने धान्यावर तुळशीपत्र ठेवले. हे भक्तवचन ऐकून लोक एकापुढे एक असे चहूकडून धावले व त्यांनी यथेच्छ धान्य लुटले. कित्येक खांद्यावर, कित्येक डोक्यावर वाहून व कित्येक बैलगाडीवर ते धान्य घेऊन आपापल्या घरी जात होते याप्रमाणे संपूर्ण तीन दिवसपर्यंत सर्व ब्राह्मणांनी धान्य नेल्यावर सद्गुरु म्हणाले की, ''मी सहज म्हणालो आणि तेच तू सत्य मानून सर्व धान्याचा व्यय केलास. आता पुढे तू आपल्या कुटुंबाचे कसे पोषण करशील?'' हे स्वामीवचन ऐकून तो भक्तराज मनाने मुळीच ढळला नाही आणि गुरुचरणी वंदन करून हास्यमुखाने बोलला की, ''सर्व जीवांचा समर्थ नियंता तो श्री विश्वंभर जगाचा अन्नदाता आहे. मग मला माझ्या कुटुंबाची काय काळजी आहे. त्यांच्या पालनाचा भार या ईश्वरावरच आहे. तुझे वचनाचे अमृतपान करून माझी सर्व चिंता नाहीशी झाली आहे. हे समर्था, माझे दृष्टीस आता समता लाभली आहे आणि जिकडे तिकडे तूच मला दिसतोस.'' भक्ताचा असा निश्चय पाहून श्रीगुरु मधुर वाणीने बोलले की, ''हे पूर्णपणे जाणून अंतःकरणात शांती राख. लौकिकार्थ बाहेरचा व्यवहार कर. त्यामुळे कार्य साधो न साधो व्यवहार हा सर्व मिथ्या आहे, हे सर्व अंतरी जाणून समत्वास ढळू देऊ नकोस. यथाविधी प्रातःस्नान करून भक्तिभावाने आधी नित्य कर्म करीत जा आणि वेदपाठाविषयी रोज आवड असू दे. आपल्या वैभवाप्रमाणे रोज शिवपूजा करीत जा व पितृतर्पण आणि वैश्वदेवही भक्तिभावाने रोज करीत जा. शंकराला नैवद्य दाखवून अतिथींना अन्न देऊन नंतर परिवारासह जेवण करून शिवस्मरणाने काळ कंठित जा. याप्रमाणे कर्माचे आचरण करीत असता आपोआपच कर्मबंध तुटतो. सहजासहजी जे करावयास पाहिजे असे कर्म केले तर कर्माचा लेप लागत नाही.'' असा मल्लास सद्बोध सांगून तो आनंदकंद उठला आणि आपल्याजवळ जोंधळे घेऊन मंद चालत पेवापाशी पोहोचला. ती सर्व पेवे रिकामी पाहून त्या देवांच्याही देवाला दया उपजली व त्याने त्या रिकाम्या पेवात एकेक मूठ घातली

मग श्रीगुरुंनी मल्लास सांगितले की, ''तिसरे दिवशी ती पेवे ताबडतोब काढून अपार धान्याचे संग्रह कर. कुणी अन्नार्थी आला तर त्याला तृप्त होईपर्यंत अन्न दे व जे याचक येतील त्यांना परिपूर्ण धान्य दे.'' याप्रमाणे जगदीशाने सांगून कर्माचार विस्तारपूर्वक करून सांगितला आणि मग स्वामी यात्रिकास घेऊन कुसुगल्लपुरास आले. इकडे स्वामी वचनाप्रमाणे तिसरे दिवशी मल्लाने सर्व पेवे काढली तेव्हा ती सर्व पेवे धान्याने भरलेली पाहून मनात तो आनंदला. हे अगाध कौतुक पाहून तो आश्चर्यचकित झाला व म्हणाला, ''हे सद्‌गुरु, चिदंबरनाथा, या मूर्खाला तुझी लीला कळत नाही.'' इतके म्हणून तो मल्ल स्वामी वचनावर आपले मनात विश्वास ठेवून ज्याप्रमाणे त्याला स्वामींनी बोध केला होता, त्याप्रमाणे वर्तणूक ठेवून अन्नदान करू लागला. या मल्लभक्ताने योगाने त्या प्रांतातील लोकांना दुष्काळाचे काहीच वाटले नाही कारण याचक जे जे मागीत ते ते त्यांना तो देत असे व श्री चिदंबर त्याला ते पुरवीत असत. याप्रमाणे भक्तराजास पुढे दाखवून सर्व लोकांची मनःकामना पूर्ण करीत परंतु, लौकिकी भक्ताचे अभिधान दाखवून स्वामींनी दुष्काळभय नाहीसे केले. याप्रमाणे श्री चिदंबरेश्वराने अपार लीला दाखवून लोकांना खूप सुख दिले. असे हा चिदंबर किंकर सांगत आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥



शि व चि द म्ब र

# अध्याय एकतिसावा

अन्नपूर्णेचे प्रगटन

।। श्री शिव चिदम्बराय नम:।।

।। श्री गणेशाय नम:।। हे सद्‌गुरूनाथा, तुला नमन असो. हे कृपावंता, मला तुझी लीला कळत नाही परंतु तुझे गुण गाण्याचा मला उल्हास वाटतो. ज्या तऱ्हेने बेडसूर गावी स्वामींनी दुष्काळाच्या भयाचा नाश केला त्याप्रमाणेच अनेक गावी लीला चरित्र दाखवले. कुसुगल्लपुरास श्रीगुरु येताच मध्यान्ही अनेक यात्रेकरू आले. परंतु तेथे अन्नपाण्याचा फार मोठा दुष्काळ होता आणि लोक एक कोस अंतराहून पाणी आणत असत. भुकेने व तहानेने पीडित लोक 'अन्न अन्न पाणी पाणी' असे म्हणत होते. त्यांचा तो ताप पाहून श्रीगुरुंनी एक ताटभर साखर आणली आणि ती त्या लोकांना वाटू लागले आणि यात्रिक खाऊ लागले. परंतु त्यामुळे त्यांची तृप्ती होईना. तेथे चार हजार यात्रिक होते आणि ताटातील साखर संपली नव्हती. इतक्यात तेथे चार मडकी पाणी भरलेली अशी माकण आली आणि तहानेने व्याकूळ झालेली मंडळी तिकडे धावली. परंतु एका क्षणातच मडकी रिकामी झाली. पुन्हा पाण्याची हाकाटी गुरुचे कानावर आली. तेव्हा ते म्हणाले, ''उगीच धडपड करू नका. पोटभर पाणी पिवून संतुष्ट व्हा'' असे म्हणून मग त्या माकणीवर घागर ठेवताच ती पाण्याने पूर्णपणे भरलेली दिसली. त्यावर ती खाली काढून रिकामी केली आणि माकणीवर ठेवली. याप्रमाणे रिकामे वर व भरलेली मडकी खाली ठेवण्याचा उद्योग चालून चार हजार लोक तृप्त झाले. इकडे चिदंबराने आठ पायली जोंधळे आणवून अर्ध्याचे पीठ व अर्धे भरडून घेतले. एक एक पिठाचे व एक कण्याचे पोते अशी दोन पोती भरून ठेवली व स्वयंपाक करविला. पीठ व कण्या कितीही घेतल्या तरी कमी पडत नव्हते. तसेच चार घागरी पाणी चार रांजणात भरून ठेवले आणि कितीही पाणी घेतले तरी कमी पडेना. पीठ कण्याचा पर्वतच लागला आहे आणि रांजणास पाझर फुटला आहे अशी स्थिती होती. दुष्काळभयाचे निवारण करण्यास श्री चिदंबराची लीलाच प्रकट झाल्याचे जाणवले. याप्रमाणे तो सर्वेश तेथे आठ दिवस राहिला. आलेल्यांना अन्न देण्याकरिता एक जणास तेथे नेमले आणि स्वामींनी त्यास सांगितले की, हा दुष्काळ संपेपर्यंत येथे राहून जे याचक येतील

त्यांना पीठ, कण्या व पाणी देत रहा.'' एका माणसाला पुरेल एवढे पीठ, कण्या, पाणी दिले तरी ते दहाजणांना पुरत होते. अशी ही गुरुंची लीला होती त्याचे कोठवर वर्णन करावे? याप्रमाणे त्या प्रांतातील दुष्काळाचे भयाचे निवारण करून तो दयानिधी सप्तरीवार शिरहट्टी या गावास आला. त्या गावातील लोक दुष्काळाने पीडित होते. त्यांचा आक्रोश ऐकून श्रीगुरुंनी विचित्र लीला दाखवली. ती तुम्हास संक्षिप्त सांगतो ती ऐकावी. कार्तिक महिन्यात प्रात:काली श्रींची स्वारी माडी चढली व चारी दिशांना नमन करून मेघांचे जाळे निर्माण केले आणि क्षणातच जोराचा पाऊस पडू लागला. जो अहोरात्र अखंड पडत होता, त्यामुळे त्या भागातील तो प्रांत अतिशय सुखावला. त्यानंतर पाऊस थांबण्याकरिता लोकांची प्रार्थना ऐकून पुन्हा श्रीगुरु माडीवर चढून प्रार्थना केली. तोच एका क्षणांत आकाश निरभ्र झाले नंतर तो गुरुराया लोकांना सांगता झाला की, ''आता सुखाने शेतात पेरणी करावी. पीक भरघोस येईल.'' हे स्वामी वचन ऐकून लोकांनी पेरणी केली आणि मोठे आश्चर्य झाले की, तेथील शेते पिकताच त्या प्रांतात दुष्काळाचे नाव सुद्धा राहिले नाही. त्यामुळे लोकांना सुख होऊन ते श्रीगुरू भजू लागले. सूर्य उगवल्यावर जसा सुंदर प्रकाश पडतो किंवा चंद्राबरोबर चांदण्यांचा निर्मळ असा प्रकाश भूतलावर प्रकाशतो त्याचप्रमाणे श्री स्वामींबरोबर असलेले यात्राजन श्री चिदंबराचे लिलेला वश होऊन नेहमी परिपूर्ण असत. त्यातच दुष्काळ पडला. मग यात्रेच्या लोटाला काय विचारावे? रोज अलोट अशी यात्रा होऊ लागली व श्री स्वामींनी लोकांचे कष्ट निवारण्याकरिता अन्नपूर्णेस प्रकट केले. त्यावेळी सद्‌गुरुनाथाने विश्वंभर नावाचा अन्वयार्थ प्रकट केला. जसजसे लोक जास्त येत, तसतसा त्या देवाला आनंद होत असे. यादवांबरोबर श्री कृष्ण किंवा आपल्या परिवारासह श्री रामचंद्र कलीमर्दन करण्यास आला आहे, असा तो दयाधन शोभत होता किंवा दुष्काळरुपी मदोन्मत्त हत्तीला भिडण्याकरिता श्री चिदंबर हरी आला आहे असे वाटत होते. त्याप्रमाणे भक्तकैवारी महाराज भक्तांचे संकट निवारीत असत. लोकांचे अन्नदानाने रक्षण करितो इतकेच नाही तर याचकांचे कितीही दुर्घट मनोरथ असले तरी ते पूर्ण करितो. एके दिवशी चार ब्राह्मण मार्गात एकमेकांशी बोलून व मनात इच्छा धरून भोजनाकरिता पंक्तीत येऊन बसले. परंतु श्री स्वामींनी त्यांची इच्छा ओळखून चौघांना घरात नेऊन आपले पंक्तीत बसवले व त्यांचे इच्छेप्रमाणे त्यांना पदार्थ वाढले. एकाला तूप-पोळी वाढविली. दुसऱ्याला मांडे साखर व निवळी, तिसऱ्याला दही पोहे तर चौथ्याला साखरभात वाढला.





शि व चि द म्ब र

त्याप्रमाणे चौघा ब्राह्मणांना त्यांच्या मनात असलेले पक्वान्न वाढले हे पाहून ते ब्राह्मण खजील झाले. श्री स्वामी त्यांना आदराने वाढीत होते व ते ब्राह्मण आपल्या अपराधाची क्षमा मागत विनवीत होते की, त्यांची इच्छा पूर्ण झाली. याप्रमाणे तो लीलाधारी या भूलोकावर नाना तऱ्हेचे खेळ दाखवित होता. भक्त, अभक्त व दुराचारी यांचाही श्रीचिदंबर कैवारी होता. त्याचे नामाचे रसायन सेवन करताच सर्व रोग जळून जातात आणि जन्म-मरणाच्या फेऱ्यातून प्राणी निश्चित पार होतो. श्री चिदंबरासारखा दयानिधी या तिन्ही लोकांत कोण मिळणार? श्री गुरुंची दयाळूता तुम्हाला सांगतो. एके दिवशी श्री चिदंबर आपले बरोबर भक्त परिवार घेऊन सहज सर्व शेते पाहत गावाबाहेर निघाले तेव्हा काही जणांनी ऐन थंडीतही बैलासह अपार कष्ट सोसून नांगर धरले आहेत असे पाहून श्री दीक्षित कृपेने द्रवून आपल्या भक्तास त्यांचे स्वहित साधण्यास सांगितले. ते ऐकून ऐकणाऱ्यास वैराग्य प्राप्त होईल. स्वामी म्हणाले, ''बालपणापासून मरणापर्यंत या संसारात लोक कष्ट करतात. परंतु चित्त शुद्धीकरिता काहीच करीत नाहीत. चित्तशुद्धीने शंकर प्रसन्न होतो. मायेला वश होऊन अज्ञानी लोक जन्म-मरण भोगतात आणि प्रलय होऊनही या मूर्ख लोकांना मुक्ती मिळत नाही. संसारातील भ्रांतीने भावी सुखावर लक्ष ठेवून, चित्त ठेवून नाना कष्ट सोसतात व अपार दुःख पावतात. दुःख समयी पुष्कळ औषधांचा उपाय करतात आणि त्यांचे यत्न संपल्यावर मग मला शरण येतात. सुदैवाने पुन्हा आरोग्य प्राप्त होताच पुन्हा प्रपंच लोलुपता स्वीकारून मला विसरतात. याप्रमाणे ही माया दुर्धर आहे व ती तरण्याचा उपाय अशक्य आहे. जे मला शरण येतात तेच मायेतून तरू शकतात.'' याप्रमाणे भक्तांबरोबर श्री स्वामी आनंदाने बोलत असता त्या भक्तांना स्वामींनी जो बोध केला तो एका शूद्राने ऐकला. तेव्हा तो शूद्र धावून आला व आडवा पडून विनवू लागला की, ''मुळातच आमची तामसयोनी आहे. आम्हाला एवढे ज्ञान कोठले जाया. पुत्रगृह व धन हेच आम्ही सत्य मानून संसारात भ्रमण करतो. तेव्हा तुझे स्मरण कसे घडेल? आमच्या सुदैवाने हे दयाळा, तू आम्हाला येथे भेटला आहेस. आता आम्ही काय केले म्हणजे तुला प्रिय होऊ हे आम्हाला सांगावे. श्वान संयोगाप्रमाणे मूर्ख लोक मनात किती तरी आपट्या खातात, तरी संसाराला काही कंटाळत नाहीत. पुन्हा तेथेच गुंततात हा कोणाचा आग्रह आहे आणि संसार मोह कसा सुटेल असा बोध करून आम्हास पावन करावे.'' याप्रमाणे शुद्राचे वचन ऐकून श्री चिदंबर म्हणाले की, ''हा शूद्र बोधास योग्य आहे. तरी हे शिवशास्त्री, तुम्ही यास

उपदेश करा.'' तेव्हा शिवशास्त्रींनी श्री गुरुची आज्ञा मानून आधी त्यांना वंदन करून त्या शूद्राचे अंतरात जसा बोध ठसेल तसा उपदेश त्याला केला. शास्त्री शूद्राला म्हणाला, ''तुजवर गुरुकृपा फार थोर आहे. याकरिता तुला एक मार्ग सांगतो तो ऐक. अरे, संसार कष्टाचे कारण मुख्य म्हणजे देहाभिमान आहे. आणि तो गेल्यावर गुरुकृपेचे सहज ज्ञान लाभते. तुला ज्ञानप्राप्तीची युक्ती सांगतो. गुरुवचनावर व शिवावर जो विश्वास तीच भक्ती. भक्तीने शंकरास भजताच निजानंदाची प्राप्ती होते. सर्व ठिकाणी शंकराची सर्व सत्ता आहे हे न जाणून तू दुःख भोगतोस. याकरिता शिवाचे ज्ञान होण्याकरिता या वेळी तुला मी एक मार्ग सांगतो तो ऐक. गुरुवचनावर विश्वास ठेवून नित्य अभ्यास करावा. कारण नित्याभ्यासावाचून भक्ती अंत:करणात ठसत नाही.'' असे शास्त्री वचन ऐकून शूद्राने त्यास वंदन करून विनवणी केली की, ''हे स्वामी, कोणत्या देवाचा आणि कोणत्या तऱ्हेचा अभ्यास करावा. जेणेकरून मनात अभ्यास ठसेल तोच मार्ग मला सांगावा.'' मग शास्त्रींनी गुरुचरणी लक्ष देऊन मधुर वाणीने सांगितले की ऐक, ब्राह्म मुहूर्ती उठून आधी गुरुचरणांचे चिंतन करावे. मग मुखाने नाम उच्चारित आपले चित्त शुद्ध करून गुरुमूर्तीचे आपादमस्तक एकमनाने ध्यान करावे. शामसुंदर कुमार किंवा वयस्कर, सुंदर अवयव, सरळ नाक, कमळासारखे डोळे अशा गुरुचे हृदयाचे ध्यान करावे. अमूल्य व रत्नखचित असा किरीट मस्तकावर लखलखीत शोभा देत आहे व रत्नांचे कुंडल कानात शोभत आहेत. आदर्श असे गंडस्थळ आणि पोळ्यासारखे सुंदर असे ओठ शोभत आहे असा चिदंबर गुरु आहे. मंद हास्य व कंदासारखे दात आणि विशाल हृदयावर रत्नजडित मोत्याचे पदक असून सूर्याप्रमाणे ते शोभत आहे. भुजंगासारखे सरळ दंड असून सर्वांगावर सुगंध चर्चिलेला आहे. उन्नत अशा आसंद्वयामध्ये रत्नभूषित केयूर शोभत आहे. तीन वलये असलेले पोट शोभत आहे. तेथेच गंभीर अशी नाभी शोभत आहे. काश्मिरी पितांबर कटीवर शोभत आहे. भव्य असे गुडगे, रम्य अशा पोटऱ्या असे सद्गुरुचे स्थान, हे शूद्रा सद्भक्तांच्या हृदयात आहे. असे गुरुरूप ध्यान कर. आपले हृदयात सोम सूर्याग्नीसारखी सुंदर गुरुमुर्ती बसली आहे असे ध्यान कर. ज्याच्या केवळ नखाचा प्रकाश इतर सर्व प्रकाशाचा लोप करतो, कमरेला करदोटा असे विशेष अलंकार ज्याला आहे, दोन्हीकडे दोन्ही सती सावित्री आणि सरस्वती आणि स्वामी मागे शोभत आहेत आणि मध्ये गुरुमूर्ती आहे, स्वस्तिकासनी बसून ती मूर्ती अमृतपूर्ण अशी शोभते आहे.





शि व चि द म्ब र

सर्वांगावर भस्म चर्चिलेले असून त्यावर त्रिपुंड्र शोभत आहे. कपाळावर केशरी गंध असून कस्तुरीचा सुंदर असा टिळा आहे. गळ्यात रुद्राक्षाचे हार शोभत आहेत आणि भक्ताकडे कृपादृष्टीने पाहत आहे, ज्याचे सौम्य दर्शन आहे, सुमंद हास्य आहे व जो लावण्यपूर्ण असा आहे, ज्याचे भाषण मधुर असून जो सर्व ठिकाणी आपले सत्येने परिपूर्ण आहे, अशा गुरुरुपाचे तू आपले चित्त निर्विकल्प करून ध्यान कर. त्यामुळे सर्व पापाचा नाश होऊन साधक पुण्यवान होतो. प्रेमाने व आर्द्र चित्ताने मनात एक मुहूर्त असे ध्यान करून मग आसन व पद्म द्यावे आणि नाना उपचाराने पूजा करावी. ज्या वस्तू तुला अपूर्व आहेत आणि दुर्मीळ म्हणून साधण्याचा तू प्रयत्न करतोस, त्या सर्व वस्तू शंकरास प्रेमभावाने अर्पण कर. शंकराला हे उपचार प्रत्यक्ष समर्पण केले तर याप्रमाणे शिवास हर्ष होत नाही. मानस पूजेने श्री गुरुवराला अपार आनंद होतो याप्रमाणे भक्तिभावाने पूजा करून शंकराचे चरणावर डोके ठेवून साष्टांग नमस्कार कर आणि अशी प्रार्थना कर की, हे दयाळा, या घोर संसारसागरात पडून मी फार कष्टी झालो आहे तरी माझ्या संसारभयाचे निवारण कर. याप्रमाणे हृदयात ध्यान करून नित्यनेमाने तू पूजा करीत जा. निर्हेतुक राहून अवश्य ते व्यवहार कर. कर्तादेव चिदंबर आहे, असे मनात दृढ धरून कोणतीही शंका मनात न धरता एखादे वाटसरूप्रमाणे आपले घरी रहा. श्वान, चांडाळ आदी करून सर्व ठिकाणी देव व्यापक आहे, असे समजून नम्र भावाने सर्वांना आदराने देवाप्रमाणे मान. काम व क्रोध दूर लोटून शांत मनाने अंत:करणी स्थिर हो. पाणपोईप्रमाणे आपल्या कुटुंबातील संबंध ठेव. शिवापेक्षा जास्त शिवभक्तावर भक्ती ठेवून आपले सर्वस्व शिवाला अर्पण कर. देव, गुरु आणि भक्त यात द्वैत पाहू नको. कारण, सर्वात्मा जो श्री गुरुनाथ तो सर्वांचे ठिकाणी एकच असतो. रोज मोठ्या भक्तिभावाने भजन, पूजन, पुराण श्रवण करावे आणि पर्वकाळी उपास व जागरण शिवाकरिता करावे. रोज अन्नदान करावे याप्रमाणे भक्तीमार्गाचे आचरण केले तर तो सावित्रीरमण संतुष्ट होतो आणि कर्मबंधन छेदून भक्ताला या लोकी मान्य करून शेवटी कैलासपदी बसतो याप्रमाणे शास्त्री बोलून गुरुध्यानी मग्न झाला. तेव्हा श्री चिदंबर त्या शूद्रास म्हणाले की, ''या भक्तराजाने तुला जो बोध केला तो तू एकाग्र चित्ताने ऐकलास काय? भक्तिभावाने त्याप्रमाणे आचरण कर. ज्यायोगे तू ही मोहनदी तरशील आणि शेवटी तुला सायुज्य मुक्ती मिळेल. आता मनात भवव्यथा आणू नकोस.'' याप्रमाणे श्रीगुरु बोलून त्यांनी शेतात प्रवेश केला व सर्व

ठिकाणी संचार करून शूद्रास बोलवून सांगितले. एक ठिकाणी दाखवून त्या ठिकाणी खण म्हणून सांगितले. स्वामींच्या वचनाप्रमाणे त्याने खणताच त्या शूद्राला तेथे द्रव्य मिळाले. अंत:करण आनंदित होऊन त्या शूद्राने तो द्रव्याचा घट घेऊन श्री स्वामींपुढे ठेवला आणि दंडवत घालून नमन केले. हे श्री चिदंबराने पाहून त्या शूद्रास आज्ञा दिली की, हे द्रव्य घेऊन तू घरी जा आणि तुला बोध केल्याप्रमाणे आचरण कर. याप्रमाणे शूद्राला बोध करून त्याला सांगून तो आनंदकंद आपल्या इतर भक्तांसह मंद गतीने परतून आपल्या घरी गेला. तो शूद्र ते सर्व द्रव्य घेऊन ओकसाबोकसी रडत स्फुंदत श्री गुरूच्या अद्‌भुत लीलेचे स्मरण करत घरी आला आणि ज्याप्रमाणे शास्त्रीने बोध केला होता, त्याप्रमाणे आचरण करून मोठे भक्तिभावाने सरस्वती पतीस भजू लागला. श्री चिदंबराच्या कृपेने इहलोकी धनपुत्रादि मिळून सुखी झाला आणि आपल्या दातृत्वाने प्रख्यात होऊन शेवटी शिवलोकी पावला. याप्रमाणे श्री चिदंबर दिक्षित इहपराचे सुख देण्याकरिता कल्पवृक्षाचे पेक्षाही जास्त यश वाढवीत तिन्ही लोकांत प्रसिद्ध झाले. जो चिदंबरावर विश्वास ठेवील तो इहलोकी सुस्वभावी होऊन अंत:काळी सदाशिवासी ऐक्य पावेल, असे हा चिदंबर किंकर सांगत आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय बत्तिसावा

द्विजव्रणाचे निवारण

।।श्री शिव चिदम्बराय नमः।।

।।श्री गणेशाय नमः।। श्री चिदंबर अरूप असूनही भक्तांना अपार रूप दाखवून नाना अवतार धरतो त्याला वंदन असो. याप्रमाणे मागे वर्णिल्याप्रमाणे शिरहट्टीस अपार महिमा दाखवित श्रीहरी तेथे राहत असता फार मोठी यात्रा तेथे होत होती. चिक्कोडीपुरी अण्णंभट्ट नावाचा एक सदाचारी ब्राह्मण राहात होता. तो आपले पत्नीवर रागावून गुरुजवळ आला व तेथे राहिला. ही गोष्ट त्याचे पत्नीस कळताच आपले मुलाला घेऊन ती तेथे आली व श्री स्वामींना वंदन करून आपले मुलाला अण्णंभट्ट याचे पायावर घातले. हे पाहून तो रागाने धावत दगड मारू लागला. तेव्हा ती पतीव्रता मनात घाबरून श्रीगुरुंस शरण गेली. तेव्हा तो कृपाराशी त्या ब्राह्मणास म्हणाला की, ''जो आधी जाणता आहे त्याने लग्न करू नये आणि केल्यास पत्नीचा त्याग करू नये. तसे केले तर नरक भोगावा लागतो. पत्नीचा त्याग करण्यास तुला कारणे सांगतो ती ऐक. जर तिला मूल होत नसेल तर तिला दहा वर्षांनी सोडावी. पतीचा द्वेष करणारी, अधर्माने वागणारी, बाळाचा नाश करणारी किंवा व्यभिचारिणी असेल तर सुज्ञ जनांनी तत्काळ सोडावी. त्याला काही काळ, नियम नाहीत. धर्मशास्त्र सांगते की, धर्मपत्नी घरी असता तिला सोडून काही केले तरी सुखाचा लेशही हाती येत नाही. एकंदरीत कुटुंबाचे रक्षण करावे आणि आधी अंगीकारून पत्नीचा अकारण त्याग केला तर तो यमाच्या शिक्षेस पात्र होतो. मनू, याज्ञवल्क्य पराशर आणि दत्तात्रेय इ. स्मृतीकार असेच सांगतात आणि उपदेश करतात. याकरिता तूही या पतिव्रतेस घेऊन सुखाने प्रपंच कर आणि आपले घरी जा व धर्मपत्नीस सोडू नको.'' असे हे गुरुवचन ऐकूनच त्याचा क्रोधाने धिक्कार करीत तो दुसरे घरी निघून गेला. तो गेल्यावर श्री स्वामींना अत्यंत राग आला आणि पूर्णकृपेने त्यांनी तिला सांगितले, ''हे निष्पाप आई, तू धीर धर. तुझा पती तुझा आपण होऊन स्वीकार करील.'' 'तथास्तु' म्हणून ती बाई स्वामींजवळच राहिली. आणि अण्णंभट्ट श्री स्वामींना पक्षपाती म्हणून दुसरे घरी राहिला. पण त्यामुळे लोक त्याची छी थू करू लागले आणि त्याला त्या रात्रीच प्रचिती आली. गुरुच्या

आज्ञेचे उल्लंघन केल्याने त्या ब्राह्मणाचे मांडीवर एक अद्‌भुत व्रण उत्पन्न झाला. ते पाहून तो फार व्यथित झाला व शोकाने विलाप करू लागला. एका क्षणात त्या व्रणाचा दाह इतका वाढला की, त्याला तो सहन होईना. आपल्या प्राणास होणाऱ्या अपायाच्या भयाने तो विप्र भ्याला व श्रीगुरुंना शरण आला व आक्रंदून म्हणू लागला की, ''हे देवा, श्रीमुरारी या अनाथाला तार. तुझ्यावर क्रोध करून माझ्याकडून मोठा अपराध घडला आहे.'' त्या द्विजास पाहून श्रीस्वामी सुमंद हसत म्हणाले की, ''तू येथे कशाकरिता आला आहे? तू दुसरे घरी सुखाने जा. मी स्त्री पक्षपाती आहे आणि तू वैराग्यमूर्ती आहेस. तू माझेकडे कशाकरिता आला आहेस? सुख मिळविण्याकरिता तू आनंदाने जा.'' हे स्वामींचे वचन ऐकून त्या द्विजाने लोटांगण घातले व म्हणाला, ''हे स्वामी, मी पापी व दारुण असा पापकर्मी आहे. तुझा महिमा मी जाणत नाही. तुझा अगाध महिमा मी न जाणून हे पुरुषोत्तमा, तुझा धिक्कार केला. त्यामुळे मला कष्ट प्राप्त झाले. तरी हे आनंदधामा, मला या दुःखापासून सोडव. तुला जर क्रोध आला तर सबंध भूमी जाळून तू त्याचे भस्म करशील आणि गवतावर कृपा केलीस तर ते गवत एखादा पर्वत एका क्षणातच जाळून भस्म करील. हे समर्था, गुरुराया, या व्रणाचे भयातून मला सोडव. याचा दाह आता मला सोसवेना. आता मी यमालयास जात आहे. बसण्याकरिता व चालण्याकरिता हे गुरुराया, मला अशक्य झाले आहे. यानंतर मी शपथ घेऊन सांगतो की, तुझी आज्ञा तंतोतंत पाळीन.'' तेव्हा श्री स्वामी म्हणाले की, ''तू देवाची शपथ घेतली आहेस की, माझी आज्ञा पाळशील, तरी तुझे पत्नीचा आता तू स्वीकार कर.'' तेव्हा द्विज म्हणाला, ''मी शपथ घेतो की निश्चितच मी माझ्या पत्नीचा स्वीकार करतो. परंतु या असह्य दुःखाने माझा प्राण जात आहे. त्यातून मला वाचव.'' तेव्हा श्री गुरु द्विजाला म्हणाले की, ''तो व्रण कोठे आहे ते मला दाखव. त्याचा आपण प्रतिकार करू. उगीच कशाला आक्रंदून रडत आहेस.'' द्विजाने हे स्वामी वचन ऐकून त्या व्रणावर बांधलेले वस्त्र सोडले व पाहिले तर तेथे व्रण अजिबात नव्हता. हे पाहून त्याला फार आश्चर्य वाटले व म्हणाला की, ''हे समर्था, कृपावंता, तुझी सत्ता अगाध आहे. हे दयाळू गुरुनाथा, माझा अपराध मनात ठेवू नकोस.'' याप्रमाणे त्या द्विजाने पश्चात्तापाने नमन करताच तो सावित्रीरमण म्हणाला की, ''तू तुझे पत्नीसह सुखाने रहा'' तेव्हा त्याने श्री गुरुंना विनंती केली की, ''असार अशा संसारभयाने मी तुला शरण आलो आहे. आणि तू मला पुन्हा तेथेच पाठवतोस तेव्हा याला माझा काहीच



शि व चि द म्ब र

उपाय नाही. हे माझे दुर्दैव फार मोठे आहे की, आपण सर्वज्ञ व जाणते असून पुन्हा मला संसारात पडण्याचा उपदेश देतात.'' ही ब्राह्मणाची भाषा ऐकून श्री स्वामी त्याला म्हणाले, ''ज्ञान मार्ग सोडून ब्रह्मज्ञानी जसा बोलतो तसाच तू बोलत आहेस याचे मला फार आश्चर्य वाटते. तसेच ज्याप्रमाणे अज्ञानी माणूस तहानलेला असून पाण्याच्या इच्छेने पाण्याची विहीर सोडून मृगजळामागे धावतो किंवा आपले पानातील अन्न सोडून मनोराज्यात मांडे खाऊ म्हणून जसा प्रौढ अज्ञानी माणूस झटतो त्याप्रमाणे तू मनात वैराग्याची इच्छा करतोस. संसार हा असा आहे हे खरे आहे. त्यात संग न करणे हेच मुख्य होय. कुटुंबाचा त्याग करून काम-वैराग्य येते हा विचार अयोग्य आहे. देहाभिमान असताना भार्यादिकांवर ममता असते आणि त्यामुळेच क्रोध, हर्ष, शोक मनात उत्पन्न होतात. ज्या उद्देशाने तुला सुख व्हावे म्हणून प्रयत्न करतोस. तो देह शेवटी कृमी-किटकांना भक्ष होतो. देहाभिमान जागृत असता तुझे असंगत्व कसे? संसाराचा मूळ वैरी निश्चितच काम, क्रोध आहेत जे महायोग्यांचेही महातप क्षणात गिळतात. याकरिता मोक्षाचा मार्ग तुला सांगतो. जो काम व क्रोधाला स्पर्शही करीत नाही तोच मोक्षाचा अधिकारी होतो. काम व क्रोधाचा त्याग केल्याशिवाय संसार कधीही सुटणार नाही हे तू निश्चित जाण व असे श्रुतिवचन आहे. काम व क्रोधास बाळगून अरण्यात तप करीत राहिले तरी तिळभरही सुख न लागता केवळ श्रमाचा भागीदार होतो. वनात तप करण्यापेक्षा जो घरी राहून स्वधर्म दीक्षा घेतो त्याला मोक्ष सुलभ प्राप्त होतो. विषयशत्रू जिंकण्याकरिता गृहस्थ धर्म हा सुलभ उपाय होय. कारण किल्ल्यामध्ये राहूनच राजा वैऱ्यावर सुलभतेने जय मिळवितो. ज्याचे मन आपले स्वाधीन आहे तो घरी असूनही अलिप्त असू शकतो आणि ज्याचे मन परतंत्र आहे त्याच्याकडून साधना कधीही घडणार नाही. तू घरी जाऊन रहा. पुत्रादिकांचे रक्षण करीत व्यवहार पूर्ण कर, पण मनात नेहमी निःसंगपण धरून रहा. आत्मा हा निसंग असून अलिप्त असतो व तो पूर्णपणे अभंग असा सच्चिदानंद असतो. इंद्रिय कर्म करीत असताही आत्मा असंगत्वाने वेगळाच असतो. आकाशाप्रमाणे आत्मा हा सर्वत्र भरून असतो. स्फटिक जसा रक्तपुष्पात असतो तसा अलिप्त आत्मा सर्वत्र आहे. संसारातील गुण आत्म्यास नसतात. परंतु अज्ञानाने व देहाध्यासाने ब्रह्म संसाराजोगे भासे, जसा सूर्य हा सर्वप्रकाशक असून ढगाने झाकला जातो तसे अज्ञानाने लोक आत्म्याला 'संसारी' म्हणतात. याप्रमाणे आपले अज्ञान निर्मितीकरिता गुरुपदेश व वेदान्त मंत्र जाणून भक्ती-श्रद्धायुक्त

नेहमी विचार करावा. रोज अभ्यास केल्याशिवाय आत्मज्ञान केव्हाही वाढणार नाही. आणि नित्याभ्यासाने ज्ञान उत्पन्न होऊन मुक्ती लाभते. आधी एकांतात बसून प्राणायाम करावा. कुंभक आणि रेचक हळूहळू अभ्यासावे. याप्रमाणे प्राणायाम केल्याने मन स्वाधीन होते आणि मन स्वतंत्र होताच अंत:करणाला निर्विकल्प समाधान लाभते. मग आनंदाने पंचकोशाला अन्न, प्राण, मनीविज्ञान, स्थितीविचार विचारपूर्वक सोडून सोयीने आत्मस्थितीचा शोध घ्यावा. हा स्थूल देह अन्नमय कोष आहे. याचा जाणता चित्प्रकाश असा आत्मा आहे. आणि त्याचा साक्षी मीच आहे असे समज. या लिंगदेहात तीन कोश असतात. त्यांची नावे प्राण, मन व विज्ञान अशी आहेत. पंचकर्मेंद्रिये पंचप्राणास, प्राणकोश असे नाव आहे. चित्त, मन व ज्ञानेंद्रिये, पंचक याचे नाव मनोमय कोश आहे. अहंकार व बुद्धीला 'विज्ञानकोश' असे नाव आहे. या तीन कोशांचा तुझा हा जो देह आहे त्याचे नाव लिंग, देह जाणावे. देहाचा चालक तेथे राहतो व जीव नावाचे आत्म प्रतिबिंब आहे. कर्मानुसार जीवाला जे हर्ष, शोक मिळतात त्याचे कारण अज्ञान आहे. आणि आनंद, देह का संज्ञककोश होय. या प्रमाणे तीन देह व पंचकोश यांचा विशेष विचार करून याला विशेष विचाराने जे चैतन्य साक्षी आहे त्याला ओळखावे. जेणेकरून जीवास मुक्ती लाभते. तीन देहाचा जो जाणता आहे, तोच साक्षी आत्मा मी असून मी सर्व प्रकाशक आहे व सर्वांवर माझी सत्ता चालते. मला जाणणारा दुसरा कोण आहे. मी साक्षी असून इंद्रियातीत आहे. मी सर्वप्रकाशित असून सर्व ठिकाणी जाणारा आहे, असे नेहमी निजरूप ध्यानाने देहत्रयाचा अभिमान नाहीसा करावा. देहामध्ये जी पोकळी आहे त्यात आत्मा पूर्णपणे भरलेला आहे आणि तो सर्वसाक्षी असून देह कुणास स्पर्श करीत नाही. म्हणजेच देहात असून अलिप्त असतो. तेथे मन ठेवून पूर्ण समाधान धरावे. विषयावर जर मन गेले तर त्याला तेथे पुन्हा आणून बसवावे. असा रोज अभ्यास करून चित्ताला बळाने आणून आत्मवश करावे जेणेकरून स्वानंदानुभव लाभतो आणि तो लाभेपर्यंत प्रयत्नाने अभ्यास करावा. दृश्य सर्व मायिक आहे आणि ते खोटे असून कल्पनेला भासते याप्रमाणे संकल्पबीज जाळून निर्विकल्प व्हावे. हृदयातील सर्व कामना जेव्हा समूळ नाश पावतील त्या वेळी ब्रह्मानुभवाने जीवाला शाश्वत सुख अभ्यासाने लाभते. जोपर्यंत वासना क्षीण होत नाहीत तोपर्यंत निक्षून अभ्यास करावा आणि वारंवार जे दृश्य आहे त्याने आत्मस्वरूपी विलोकन करावे. चैतन्याशिवाय थोडीही कोणती गोष्ट नाही असे ब्रह्मानुभवाने

जाणून आपल्या इच्छेप्रमाणे कार्य कर. जोपर्यंत मी कर्ता, मी भोक्ता असा अभिमान उत्पन्न होतो तोपर्यंत प्रयत्नाने अभ्यास करावा. याप्रमाणे सदाचाराने प्रपंचात कुटुंब सांभाळून स्वस्थ चित्ताने विषयभोग करावा. तरी तुला कर्माचा लेप लागणार नाही. माझा बोध तुझ्या मनात ठसला काय? की जाया-पुत्रावर पुन्हा क्रोध करशील की त्यांचे आनंदाने पालन करशील? जे तुझ्या मनात असेल ते मला सांग.'' तेव्हा अण्णंभट्ट श्री स्वामींना म्हणाला, ''तुमचा स्पष्ट असा उपदेश ऐकून माझा मोह नष्ट झाला आहे. यापुढे तुझे आज्ञेचे पालन करीन.'' याप्रमाणे बोलून त्या ब्राह्मणाने श्री स्वामींना नमन केले व श्री स्वामींचे आज्ञेने आपले पत्नीपुत्रास घेऊन आपले घरी गेला. आपले घरी श्री गुरुंचे कृपेने सदाचार करीत आनंदाने कुटुंबाचे रक्षण करून शंकराचे भजनात मग्न झाल्याप्रमाणे सदाचार करताना त्याचे चित्तास अत्यंत शांती लाभली. त्यायोगे गुरुभक्ती उत्पन्न झाली आणि ती प्रकटू लागली. ज्याच्या बोधाने मंदबुद्धीचा कोणीही आपले हृदयात ब्रह्मज्ञान पावतो अशा त्या श्री दीक्षितेंद्राचे चरणी चित्त ठेवून हा चिदंबर किंकर मनात शांत झाला आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

# अध्याय तेहेतिसावा (३३)

घंटाखाचे गर्वहरण

।।श्री शिव चिदम्बराय नमः।।

ज्यांचे चरणांचे दर्शनाने जगातील दुर्जन आपली दुर्बुद्धी टाकून श्री गुरुस भजू लागतात ते चिदंबर चरण वंदून आता पुढील चरित्र तुम्हास सांगतो. ते लक्ष देऊन ऐका. तो लीलावतारी शिरहट्टीस राहत होता तेव्हा एक पूर्वदेशाचा ब्राह्मण, जो वेदशास्त्र पारंगत असून अष्ट विकृती, अठरा पुराणी निःसीम पंडित मी आहे असे मनात म्हणत होता. माझ्यासारखा ज्ञानी जगात कोण आहे? त्याला शोधून त्याचेशी वाद करू आणि वादात त्या पंडितांना जिंकून देशोदेशी जयपत्रे घेऊन त्रिलोकांत कीर्ती पसरवू असा त्याने मनात निश्चय केला. छत्र चामर घेऊन स्वतः पालखीत बसून आपली वाखाणणी करून तो दिग्विजयाला निघाला व आपले विद्याबळाने चहूकडे हिंडून बरेच पंडितास त्याने वादात जिंकून जयपत्रे घेतली. त्याला पाहताच कित्येकांचे तोंड काळे पडत असे. तर कित्येक जण त्याला आणून कौतुक पाहत असत. सिंहनाद ऐकताच हरणे जशी रानोरानी पळतात तसेच यांचे आगमन होताच विद्वान लोक पळ काढीत किंवा जसा हिरण्यकशिपू येताच देवता भिऊन पळाल्या अथवा परशुरामाची वार्ता कळताच राजे लोक गडबडत असत किंवा मांजर दृष्टीस पडताच उंदीर पळतात तसेच सर्व देशींचे द्विजवर त्याचे समोर येत नसत. या प्रमाणे तो पंडित बरीच जयपत्रे घेऊन गर्वाने उन्मत्त झाल्याने म्हणाला की, माझेपुढे जगातील कोण पंडित आहे. जगात मीच सर्वज्ञ आहे व वादात निपुण आहे, असे म्हणून तो फार माजला. आपले हातात घंटा बांधून म्हणाला की, ''माझे नाव घंटाख शास्त्री असून ज्याला आपल्या पांडित्याचा अभिमान असेल त्याने माझेबरोबर वादास यावे नाहीतर जयपत्रे द्यावीत.'' असे गर्वाने म्हणत असे. याप्रमाणे देशात संचार करताना त्याने श्री चिदंबर कीर्ती ऐकली व मनात म्हणाला, ''याचे यश दिगंत ऐकू येते. तरी याला वादात जिंकून माझा दिग्विजय पूर्ण होईल. जो सुदैवी असेल त्याला सर्व देव अनुकूल होतात. व मनोरथ पूर्ण होतात. माझे भाग्य अपूर्व आहे. चतुःसमूह पंडितांचा मला गुरु भेटला आहे. याचा पराभव करून माझे विद्वत्तेचे सार्थक करू,'' असे म्हणून तो पंडित श्री गुरुपुरात आला. इकडे अद्‌भुत

सभा भरवून श्री दीक्षितेंद्र बसला होता. तो गर्वाने आंधळा झालेला पंडित श्री स्वामी महिमा न ओळखता वादाकरिता आतुर होऊन ताबडतोब श्रीसभेत आला. दुरून ती सभा पाहून त्याला ती अगाध दिसू लागली आणि ती पाहून त्या पंडिताची प्रभा उतरून तो कापू लागला. श्री चिदंबराभोवती वेदशास्त्र जाणणारे असे थोर विद्वान बसले होते व ते त्या पंडिताशी वाद करण्यास उत्सुक होते. श्रीगुरुंजवळ राजे लोक नाना अलंकारांनी सुशोभित असे दोन्ही हात जोडून देवासारखे बसले होते. नगरातील कित्येक लोक कौतुकाने श्री चरणांचे दर्शनाकरिता स्वस्थ चित्ताने बसले होते. स्वामींचे यश वाखाणीत वेत्रधारी उभे होते. शस्त्रधारी स्वारशिपाई सभादारी उभे होते. अशा सभेस पाहून तो पंडित मनात दचकला आणि म्हणाला,'' मी येथे का आलो आहे? माझे मनात भीती का उपजली की अवचित मी कैलासावर आलो आहे की शिवसभेत आलो आहे? की विष्णुसभेत आलो आहे. या सभेचे तेज पाहून माझे मन भ्रमित झाले आहे. येथे मला जय मिळेल का, याचा मला संशय आहे.'' याप्रमाणे वितर्क करून भीतभीत तो सभेत येताच त्याची दृष्टी श्री चिदंबरावर पडली जो शुभ्र भस्माने विभूषित होता. सर्व लोक त्याचे पदकमलास वंदन करीत होते. तो सर्व शास्त्रांचे रहस्य सांगत होता आणि तो विद्वानांचा मेळावा ऐकत होता. अशा दीक्षितास त्याने पाहिले. तो पंडित जवळ येताच श्री दीक्षितेंद्राने त्यास वंदन केले व उत्तम आसनावर त्यास बसविले व मंद हास्याने श्रीस्वामी बोलू लागले, ''आपले येणे कोठून झाले आहे व कोठे जाणार आहे ते सांगावे. आपले हातात घंटा दिसत आहे.'' असे श्री स्वामींनी विचारताच मी पूर्व देशीचा असून चतु:शास्त्रवेत्ता आहे व चारी वेदार्थ जाणतो. मी चर्चाधुरीण आहे. देशोदेशी फिरलो पण कोणताही पंडित माझ्यापुढे वादासाठी आला नाही. मग पुष्कळ जयपत्रे घेतली. आता फक्त तूच एक पंडित जगात वादी असा राहिला आहेस. तेव्हा तुझ्याकडे वादासाठी आलो आहे. वाद करावा अथवा जयपत्र द्यावे.'' हे पंडिताचे वचन ऐकून श्री स्वामी हसून म्हणाले, ''मी वादात अनभिज्ञ आहे. आपण फार थोर पंडित आहात. जो विद्वत्तेचे संपादन करील, त्याने द्विजांचाही आशीर्वाद संपादावा व द्विज क्षोभ कदापिही घेऊ नये. जो समभावाने राहतो तोच खरा ज्ञानी होय. तेव्हा हे पंडितहो, यापुढे वादाच्या इच्छेचा त्याग करून अंत:करणात शांती धरा. तुमच्या हिताकरीता तुम्हाला सांगतो की, तुमचे चित्त हे जर ऐकत नसेल, वादाचा आग्रह असेल तर हे समोर जे थोर पंडित बसले आहेत, त्यांचे पुढे हत्तीप्रमाणे झुंझार असे वादी

टिकणार नाहीत आणि ते तुमचे गर्वहरण करतील. तरी आता वादास आरंभ करावा.'' तेव्हा घंटाख हसून म्हणाला, ''माझा अपूर्व वाद न ऐकताही अहंभावाने आपलेच म्हणणे पुढे करता पण माझेसमोर वादाकरिता बसण्यास कोण समर्थ आहे? ब्रह्मदेवही माझेपुढे निश्चितच टिकणार नाही आणि शेषही मला पाहून बिळात जाऊन बसेल. श्री व्यासाला मी थरथर कापवीन. मी गुरुला माघारी पाठवीन. मग माझ्यासमोर येण्याचा ऋषिवरांना थाराच नाही. हे दीक्षितेंद्र, माझे म्हणणे ऐक. वादी असा मी सूर्य उगवल्यावर विद्वानरूपी नक्षत्रांचा समूह माझेपुढे येईल काय? चंद्रप्रकाशाची सुद्धा येथे शोभा नाही तो सूर्य नक्षत्रास विचारील काय? जो समुद्र पिऊन टाकतो तो डबक्यात बुडेल काय? जो सिंह हत्तीस धरत नाही त्यास चिलटांचा समुदाय मारील काय? जो गरुड शेषाला भीत नाही त्यास गांडूळ मारू शकेल काय? तर मग व्यर्थच बिचाऱ्या पंडितांना माझेपुढे कशाला पाठवतोस? त्यांना आपली मर्यादा रक्षण करून सुखाने एकीकडे बसूदे. हत्तीशी झुंज घेण्याकरिता बोकडांचा समुदाय पाठवू नको. माझेशी वाद करण्याकरिता या पंडितांना का पाठवतोस? तुझे चित्ती अभिमान असेल तर आपणच स्वत: पुढे यावे आणि एक क्षणच माझा वाद पाहून अभिमान सोडावा. विद्वत्तेचा अभिमान असेल तर वादाची रीत काय आहे ते मला दाखवा नाहीतर ताबडतोब जयपत्र देऊन सुखाने संतुष्ट व्हा.'' विद्यागर्वाने परिपूर्ण असलेले घंटाख वचन ऐकून श्रीगुरु हसून मधुर वाणीने म्हणाले, ''अरे पंडिता, कोणतेही भय न बाळगता वादाकरिता माझ्यापुढे ये व पूर्व पक्षाचा आरंभ कर.'' इकडे पाच वर्षांचा एक मुका स्वामींपुढे उभा होता. त्याला श्री गुरुंनी बोलावून त्याचे तोंडात भस्म घातले आणि भस्म तोंडात पडताच तो मुका समर्थ असा ज्ञानी झाला आणि गुरुंची आज्ञा घेऊन तो बाळ पंडितापुढे येऊन बसला. त्या बाळाने पंडितास सांगितले की, ''कोणतेही भय न धरता पूर्वपक्ष करून वादास प्रारंभ करावा.'' हे ऐकून पंडिताने पूर्वपक्षास प्रारंभ केला. इतक्यातच त्याचे हृदयात कंप उठून बुद्धी व वृत्ती कुंठित झाली. अंगातून झरझर घाम वाहू लागला. सर्व अंग थरथर कापू लागले आणि सर्व शास्त्रार्थाचा विसर पडला. याप्रमाणे तो पंडित भयातुर होऊन मौनावला. तेव्हा श्री चिदंबर म्हणाला की, ''शास्त्रार्थ विचारावा. आपण थोर पंडित असून मौन का धारण केलेत? वेदवेदांतील विचार शास्त्रार्थ व पूर्वपक्ष या बाळापुढे चालू द्यावा. आता भय कशाचे?'' हे गुरुवचन ऐकून तो पंडित मुक्याप्रमाणे मौन धरून चिंताक्रांत बसला. गारुड्याने मंत्राक्षता टाकताच साप जसा मुग्ध होतो किंवा सूर्य

उगवताच काजवे लपून जातात किंवा सिंहनाद ऐकताच हत्ती स्तब्ध होतो तशी त्या पंडिताची श्री गुरुंपुढे स्थिती झाली. मग एका मुहूर्तानंतर तो सावध होऊन त्या पंडिताने श्री स्वामींना वंदन केले. आणि म्हणाला, ''तुझी लीला अगाध आहे. माझ्याकडून फार मोठा अपराध घडला आहे. तरी माझे दुष्कृत्य पोटी घालून हे देवराया, मला तार.'' असे म्हणून तो स्वामींच्या पायावर पडला. श्री स्वामींचे पोटी कृपा उपजून त्याचे सर्वांगावर आपला वरदहस्त फिरवला त्यायोगे तो पंडित सावध होऊन स्वामींचे चरण वंदून स्तवन करू लागला. ''संतसंगाने सर्व पापे जळतात ही गोष्ट मला पटली. केवढी माझी अहंता, परंतु आपल्या दर्शनाने मला मुक्ती लाभली. हे सभासदहो, प्रत्यक्ष पहा. माझी बुद्धी किती गर्विष्ठ आहे परंतु केवळ आपल्या दर्शनाने श्री गुरुंनी ती विमल केली. श्री गुरुपदांना पाहून माझा जन्म सफल झाला. हे देवा, सर्व व्यापून आकाशाप्रमाणे तू निराळाच आहे. पाण्यात जशा लाटा उपजतात किंवा अग्नीत धूर उत्पन्न होतो त्याप्रमाणे स्वामीराया, तुझ्यातून प्रकृती उपजली. तिनेसुद्धा तुझ्या सत्तेने निर्गुण कार्याला उत्पन्न केले आणि सर्व जीवांना स्वाधीन ठेवून त्यांना प्रपंचात ती नाचवते. हे देवराया, जोपर्यंत हा जीव मायेने आवृत्त आहे तोपर्यंत गर्वाने भ्रमित होऊन जीव तुला भजत नाही. ही मायाही अविचाराने उपजून सारे जीव व उपजवीते आणि विचाराने मायेचा तिच्या कार्यासहित नाश होतो. प्रकृती आदी करून देहापर्यंत तत्त्वगण चित्प्रतिबिंबित असतात. त्यामुळे ते चैतन्यासारखे दिसतात. या प्रतिबिंब शक्तीने जडासही चलनशक्ती लाभली आहे. आणि हृदयात जे प्रतिबिंब प्रकाशते ते श्रुतीमताने जीवच होय. देहादिकांचे ठायी जोपर्यंत जीव भ्रमण करून अहंममता धरतो तोपर्यंत त्याला दुःख व संसार सुटणार नाही. जीवाला फार दुःख असते. आत्म्याला संसार नाही. बुद्धीला चेतना नाही आणि दोघांचे संयोगाने हा जीव हृदयात अज्ञानाने देहाभिमान धरून जीव स्वस्वरूपी जोपर्यंत नेत नाही, तोपर्यंत बुद्धीच्या संगाने जन्ममरण फेरी चुकत नाही. जीव हा चिन्मात्र असूनही तरी खोटे ज्ञानाने त्याला देहभाव असतो. त्या देहाला मी समजून संसारात भ्रमतो. ज्या प्रमाणे जड स्वभावाने लोखंड अग्नीचा संयोग करताच दाहक होतो तसा हा जीव देहाची कल्पना करून स्वानंदभाव विसरला. जेव्हा पूर्व पुण्याने भक्तसमागम होतो, तेव्हा त्याचा भ्रम सुटतो. तरीही निर्भ्रमाने तुला भजताच हे स्वामीराया तू सत्समागम व शांती देतोस. कारण सत्संग भक्तीने प्राप्त होतो. त्यामुळे जीवाला शांती लाभून काही प्रयत्न न करता सहजच मायेचा नाश होतो. व मायेचा नाश

होताच भवबंध तुटतोच. याकरिता त्रिभुवनात सत्समागम हा मोक्ष देण्यास समर्थ आहे. याकरिता हे स्वामीराया, एवढीच माझी विनंती पूर्ण करावी की, तुझे पदी मला अहेतुक अशी भक्ती दे.'' याप्रमाणे पंडिताने स्तवन करून साष्टांग नमस्कार घातला व श्री स्वामींचे चरणावर पडला. त्या कृपानिधीने त्याला उठवून विद्वानांचे पंक्तीत बसविले. त्या दिवसापासून तो घंटाखशास्त्री श्री चिदंबराचे जवळ राहिला आणि चाळीस अवधानी असे नाव पावला. ज्याचे स्मरणाने सात्त्विक लोकांना सुख मिळणारी अशी भक्ती लाभते, त्या गुरुपादुका हृदयात आठवून सुखाचा लाभ घ्यावा. याप्रमाणे नाना तऱ्हेचे चरित्र दाखवीत. श्री चिदंबर तेथे राहून दुष्काळाचे भय निवारण करून मुळगुंदास आले. तेथेही श्रीसद्गुरुंनी सर्वांना अघटित लीला दाखवून दुष्काळभय नाहीसे करून लोकांना अन्नदानाने संतुष्ट केले. याप्रमाणे मुलुगुंदपुरात स्वामींची लीला चालत असता एक अद्‌भुत चमत्कार झाला. तो मी तुम्हाला सांगतो. त्या गावी एक वेश्या होती. आणि ती अप्सरेसारखी सुस्वरूप व लावण्यवती अशी होती आणि गाननिपुण अशी होती. अशी ती अपूर्व नारी असूनही दैवयोगाने तिला कुष्ठरोग जडला. त्यामुळे ती अंतरात तळमळत असे. ती श्रीगुरु कीर्ती ऐकून तिने नवस केला की, 'आजपासून हा माझा देह निश्चितपणे श्री चिदंबराकरिता अर्पण केला आहे. रोग किंवा प्राण जावो. मी श्रीप्रति भाव ठेवला आहे. हे तो सर्वज्ञ चिदंबर जाणतो' असा मनात निश्चय करून तिने स्नान केले व चिदंबराकडे येऊन तिने साष्टांग नमस्कार घातला. मग तिने प्रदक्षिणा करून अंगणात लोटांगण घातले व एक प्रहर तिथे उभे राहून आपल्या घरी गेली. याप्रमाणे तीन दिवसाकरिता गुरुच्या चित्तात कृपा उपजली व त्या दिवशी एक प्रहर दिवस आल्यावर श्री गुरु बाहेर आले. श्री गुरु दाराजवळ येताच त्या वेश्येने नमस्कार केला पण लोक तिला दूर करीत असलेले पाहून श्रीस्वामींनी तिला बोलावले. तेव्हा सर्व लोक तटस्थ झाले. नंतर दारावर आलेल्या वेश्येला श्रीगुरु हसत म्हणाले, ''तुझे पूर्वजन्माचे पाप अघटित आहे. त्यामुळे तुला रोग जडला आहे. हे सुंदरी, तुझा रोग दूर होण्याकरिता तू येथवर आलीस तेव्हा मी तुला सांगतो ते तू ऐक. ब्राह्मणांच्या उष्ट्या पानात जर तू भक्तिभावाने तीन दिवस लोटांगण घातलेस तर तत्काळ तुझा रोग निवारण होईल व तुझा देह सोन्यासारखा सुंदर होईल.'' हे गुरुवचन ऐकून त्या वेश्येने गावाबाहेर असलेले उष्टे टाकण्याचे ठिकाण जे पर्वताप्रमाणे होते, तेथे येऊन गुरुवर पूर्णपणे विश्वास ठेवून त्या ठिकाणी लोटांगण घालू लागली. एक दिवस होताच देहाचा वर्ण

बदलू लागला. याप्रमाणे तीन दिवस करताच तिचा देह सुवर्णासारखा झाला. मग अत्यानंदाने ती वेश्या आपला परिवार घेऊन श्री स्वामींचे सभेत येऊन कौतुकाने नाच करू लागली. अशी एक मुहूर्त सेवा करून तिने स्वामीस तोषविले आणि मग दोन्ही हात जोडून प्रेमाने स्तोत्र करू लागली की, ''तूच खरोखर शिवरमण आहेस. परंतु नरवेषाने अवतार घेतला आहे. तुझ्यासारखा दयाळू त्रिभुवनात शोधूनही सापडणार नाही. मी बरेच जन्माची पापिणी आहे. तरीही मजकडे दयादृष्टीने पाहून व कृपा करून मला रोगापासून सोडविलेस. हे कृपासमुद्रा मी जन्मापासून रूपयौवनाने गर्विष्ठ झाले आणि पुष्कळ दुष्टांशी या पापिणीने संग केला. तरीही तू मला पावलास. द्रव्यार्जन व पुरुषवंचना यात मी जन्म घातला तरीही हे दयाळू तू आपल्या लीलेने मला तारलेस. वेदवेत्तेने असे योग्य ब्राह्मण सभोवती बसलेले असूनही त्यांची उपेक्षा करून माझेकरिता तू धावलास. परपुरुषाशी संग करणारी अशी मी दुष्ट असूनही मला जवळ बोलाविलेस आणि मजवर अनुग्रह करून माझ्या कुष्टाचे निवारण केलेस. आता महापुण्यवान पुरुषामध्ये सोमजी बसला असताना पापिणीचे उत्कट पापसमूह न मोजता तू बाहेर आलास. जो रोग दान, होम किंवा जपानेही नाहीसा होत नाही तो तू दयाळा तुझे कृपाकटाक्षाने जाळलास. असा कृपानिधी त्रिभुवनातही शोधून सापडणार नाही हे निश्चितच समजावे. काया-वाचा-मनाने माझे सर्वस्व मी श्री स्वामीचरणी अर्पण केले आहे. हीच माझी सर्वांपुढे प्रतिज्ञा आहे.'' आनंदित व गदगदित वाणीने तिने अशी स्तुती केली तेव्हा अश्रुधारा वाहात होत्या. याप्रमाणे वारंवार स्तोत्र करून आपल्या परिवाराला बोलावून नाच-गाण्याची फार सेवा केली ज्यामुळे श्री गुरु तुष्टला. आधीच ती वेश्या रूपवती असून तारुण्याने शोभत होती. त्यातच गुरुकृपेची प्राप्ती होताच तिची कांती विशेष फाकू लागली. श्री चिदंबराने वेश्येला सांगितले की, ''आता गाणे पुरे कर. तरी तुझे मनात काय इच्छा असेल ते माग.'' याप्रमाणे श्री स्वामींचे मुखातून अभयवचन ऐकताच त्या वेश्येने साष्टांग नमस्कार घातला व म्हणाली की, ''हे जगन्नाथा, मला या वेळी दुसरा कोणताही वर नको. तुझे पायी मला दृढ भक्ती दे. हे स्वामीराया, हीच माझी प्रार्थना आहे. तुझी दुस्तर माया मला हे देवराया स्पर्श करणार नाही असे या वेळी कर. हेच तुझे पायाशी माझे मागणे आहे.'' याप्रमाणे वेश्यावचन ऐकून स्वामी संतोषून म्हणाले की, ''या वेळी तुझे हृदयात पूर्ण ज्ञान ठसले आहे. ब्राह्मणांच्या उच्छिष्टांच्या संसर्गाने तुझा महारोग नाहीसा झाला. यापुढे तू ब्राह्मणांना शंकरासारखे

भजावे. ब्राह्मणांची पूजा केल्यावर मला संतोष होतो कारण ब्राह्मणांचे हृदयात माझा वास आहे. या बद्दल मनात तू शंका मुळीच धरू नकोस. द्विजांची पूजा केल्यास माझीच पूजा तुला घडेल आणि द्विजांचा धिक्कार तो माझाच धिक्कार.'' याप्रमाणे श्री स्वामींनी त्या वेश्येला बोध करून व तिचा सन्मान करून तिचे घरी पाठविले. स्वामींची आज्ञा पाळून संसारात वैराग्य धरून द्विजाराधना करीत पिंगलेप्रमाणे ती प्रसिद्ध झाली. श्री चिदंबराचे कृपेने इहलोकी त्यांचे भक्तीने प्रिय होऊन द्विजाराधनेचे बळाने शेवटी कैलासलोकी जाऊन बसली. याप्रमाणे चिदंबराचे अगाध चरित्र आहे आणि ज्यास इहपराची चाड असेल त्याने चिदंबराचा आश्रय धरावा आणि असा थोर आश्रय दुसरा कोणताही नाही, हे चिदंबर किंकर सांगत आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

# अध्याय चौतिसावा

यज्ञाची पूर्वपीठिका

|| श्री शिव चिदम्बराय नमः ||

|| श्री गणेशाय नमः || ब्रह्मादि देव ज्याचे चरणी भाव धरून ज्याचे पदकमळ पुजतात त्या श्री चिदंबराला वंदन असो. हे नित्यानंदमूर्ती उदरा भक्त कामपुरा सर्वेश्वरा, हे सरस्वती वरा मला संमती दे. चिंतितार्थ पुरविण्याकरिता ज्याने कल्पवृक्षाहूनही अधिक दाखविले त्या श्री दीक्षितचरणी वंदन करून पुढील कथा सांगतो. श्री स्वामींनी मूळगुंदपुरी राहून अनेक लीला दाखविल्या व दुष्काळभयाचे निवारण केले. त्या गावी एक अन्नछत्र ठेवून दिनांचे पोषण करण्याकरिता आपला एक शिष्य तेथे नेमला व आपल्या परिवारासह तेथून निघाले. देशसंचाराचे निमित्त करून दुष्काळाचे भय निवारण केले व प्राणीमात्रांचे सुखाचे साधनात तो कैलासधनी मग्न झाला. नाना तऱ्हेने चरित्र दाखवित त्या दीक्षित चंद्राने या भूलोकावर कीर्तीचंद्रिका पसरवली आणि आपल्या भक्तिरुपी नक्षत्रात संचार केला. जेथून श्री चिदंबर पुढे जातील तेथील नारी नर मनात सारखे त्या प्रभूचे ध्यान करीत गृहकृत्य विसरून जात आणि विरहाचे भयाने श्री चरणास प्रार्थना करीत की, "हे कारुण्यसिंधू आमच्याबद्दल चित्त कठीण का करतोस? हे दयाळा, या दिनांना विरहाग्नीत का टाकतोस आणि आम्हाला टाकून आमचे सांत्वन न करता एखाद्या निर्दयाप्रमाणे निघून जातोस. हे कपटी ब्रह्मदेवा, आधी सुखाचा पंथ दाखवून आता वियोग का दिलास? त्याने तुला काय लाभ झाला. 'व्यर्थ जीवहिंसा करू नये.' असा काहीतरी लेख ललाटी लिहिला आहेस. तरी तू तो आता पुसून टाक. हे दयासागरा, चिदंबरा, हा ब्रह्मदेव खरा रजोगुणी आहे. म्हणून त्याने दुष्ट अक्षरे आमच्या ललाटी लिहिली आहेत. या रजोगुणी मनात दया कशी उपजेल? परंतु हे दयाराशी श्री चिदंबरा त्याच्यासारखा तू नाहीस. हे दीनदयाळा, तू शुद्ध सत्त्व आहेस, दयेने पूर्ण भरलेला तुझा स्वभाव आहे. तरी हे देवराया, तू आता विरहाग्नी का दाखवितोस? विश्वासाने तुला शरण आलेल्यांचा का अव्हेर करतोस? दयाळांची वंचना करून जाणे हे उचित आहे का? आम्ही आधीच पापी आहोत व आम्हाला तुझे दर्शन दुर्लभ आहे. अशा वेळी प्रथम तू स्वतः येऊन दर्शन देतोस व नंतर टाकून देतोस. हे सदैव चित्ता, दीक्षितेंद्रा, हे असे करणे उचित नाही.

आधी दिनांचा अंगीकार करून ज्ञानराशी मनुष्यही त्याला सोडून जात नाही. हे हृषीकेशी, तू तर विश्वाचा पालक आहेस. मग आमचा अव्हेर कोणत्या कारणाने करतोस? दयाळा, ही बिरुदावली फार जुनी आहे. ती तू आज का सोडतोस? हे दीनपालका, ही तुमची तऱ्हा काय आहे? हे स्वामीराया, तू जेथे राहतोस तेथेच सर्व उत्सव असतात. ते पाहण्याकरीता तेथेच सिद्ध व देवर्षि राहतात. स्वामींचे मुखचंद्राचे दर्शनाने ताप नाहीसा होऊन तेथेच शांतपणे नांदतात व धन्य होतात. यामुळे त्यांचा जन्म सफल होतो. याप्रमाणे गुरुचरित्राचे अहोरात्र चिंतन करीत व अवश्य ते गृहकर्म सोडून गुरुचिंतनात मग्न झाले. हे दीक्षितेंद्रा, श्यामसुंदरा, भक्तवत्सला, दोन चकोर चंद्रा आमचे चिंतितार्थ पुरवून आम्हाला अभय देऊन लवकर तुझे पदकमळ दाखव.'' याप्रमाणे नेहमी मन लावून गुरुस्मरण केल्यास अवचित त्यास दर्शन देऊन तो दयाखणी तोषवितो. नाना तऱ्हेने सांत्वन करून त्यास बराच आनंद देऊन तो हृषीकेशी नंतर अदृश्य होऊन यात्रिकांना आनंद देत होता. यात्राजन आनंदाने श्री चिदंबराबरोबर चालत असताना रस्त्यातील दगड व काटे गुरुकृपेने कापसासारखे होत असत. श्री चिदंबराजवळ असता थंडी व ऊन यांचा त्रास होत नसे. याप्रमाणे ते यात्राजन गुरुबरोबर चालत होते. याप्रमाणे श्रीगुरु आनंदभरीत यात्रिकांसह नवलगुंदास आले. तोच त्या गावातील लोक दर्शनाला आले व त्यांनी श्री गुरुंचा आदराने सन्मान केला व आपल्या गावात नेले. श्री स्वामींनी त्या सर्वांना कुशल विचारून आपल्या मृदू वचनाने तोषविले. श्री गुरुचा एक शिष्य अग्निहोत्री आणि भक्त होता. तो आपल्या सरस्वती नावाच्या कांतेसह त्या गावात स्वस्थ राहत होता. त्याने द्विजाराधना आरंभली होती. कित्येक यात्राजनांसह सावित्रीदेवी व आपला पुत्र काशिनाथ यांना लाल गडात ठेवून आपले शिष्य समुदायास स्वामी शिकवीत असत. केव्हा गावी राहत आणि केव्हा श्री गुरु नाना चरित्र दाखवीत गडात राहत. आपल्या दोन्ही बायका व पाच मुले आणि अग्निहोत्र सांभाळीत. तो ईश्वर लोकानुसार वर्तत असे. आपण स्वत: निरुपाधिक असून लोकोद्धार करण्याकरिता इतर लोकांसारखे वर्तन करून अमानुष असा महिमा दाखवीत असे. ज्याचे चरित्र वाचून व ऐकून लोक पावन होतात व संसार फेऱ्यातून सुटून मोक्षास जातात याच हेतूने त्या सर्वेश्वराने भूलोकावर अवतार घेतला. नाहीतर जो नित्यानंद सागर आहे त्याला अवतार घेण्याचे काय कारण? अद्वितीय चिन्मात्र असून लोकोद्धार करण्याकरिता आपण मायेने प्रापंचिक भाव दाखवून सर्व पापांचा नाश करणारा असा तो लीला खेळ खेळत असे. याप्रमाणे श्री चिदंबर अग्निहोत्र व

शि व चि द म्ब र

परिवारासह रोज परोपकार करून सर्वांना अत्यंत सुख देई. त्याच गावी श्री दीक्षितेंद्राने आपल्या काशीनाथ या नावाच्या मुलाचे इतर शंभर कुमारांसहित मौजीबंधन केले. हा सोहळा चार दिवस चालला होता. त्याचप्रमाणे विप्रांचे आराधन चालू होते. अन्न, वस्त्र व दक्षिणा सर्वांना देऊन श्री स्वामी संतोषवीत होते. असा काही काळ जाताच विश्वंभर या नावाचा त्या गावाचा अधिकारी जो श्रीमंताचा सखा होता तो तेथे आला. त्याचे नाव गोखले होते. त्याने श्री चिदंबरपदी भाव ठेवून आपले सर्वस्व त्यांना अर्पून सेवेला तत्पर झाला. श्री गुरुंचेही त्याच्यावर अत्यंत प्रेम होते. असे असता एके वेळी विश्वंभराने स्वामींना विनंती केली की, ''हे स्वामीराया, या वेळी फार मोठा दुष्काल आहे आणि अन्न-पाण्यावाचून सर्व प्राणी नाना तऱ्हेने तळमळतात. तरी हे विश्वंभरा, या वेळी तू प्रकट होऊन सर्वांना अन्न पाणी देऊन त्यांचा सांभाळ कर. हे स्वामीराया तुझे चरणाशी माझी एक विनंती आहे की, या दुष्काळाचा नाश होऊन सर्व लोकांनी सुखी व्हावे. याकरिता काही उपाय शोधून मला सांग. आपला देश फार पीडला आहे. तरी हे गुरुराया, तुझ्या चित्तात दया येऊ दे.'' याप्रमाणे विश्वंभर वचन ऐकून श्री गुरु म्हणाले, ''या दु:खाचे कारण म्हणजे मेघांचे अवर्षण आहे आणि पाऊस पडण्याखेरीज याला दुसरा उपाय नाही. त्यामुळे पाऊस पडण्याचा काही उपाय कर ज्या योगे देश सुखी होईल.'' तेव्हा गुरुचे पायी वंदन करून करुणेने विनंती केली की, ''कोणत्या उपायाने पाऊस पडेल ते मला सांग.'' त्यावर श्री स्वामी म्हणाले, ''विश्वंभरा, ऐक. पुण्यामुळे पाऊस पडतो परंतु लोक तर सर्व पापी झाले आहेत. ज्याचे फळ दु:ख व अवर्षण आहे. यावर एक गीतावचन आहे. त्यात श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे की, अन्नात् भवति भूतानी पर्जन्यात अन्न संभव: । यज्ञात् भवति पर्जन्यो यज्ञ: कर्म समुद्र भव: । कर्म ब्रह्मोद्भव विधी ब्रह्मा क्षर समुद्रवम् ।। तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।। अन्नापासून प्राणी जन्मतात. पावसाने अन्न उपजते. यज्ञाने पाऊस पडतो आणि यज्ञाची सांगता पूर्ण कर्माने होते. याकरिता पाऊस पडून लोकांना सुख होण्याकरिता उपाय म्हणजे योग्य ब्राह्मण मिळवून त्याचे हातून यज्ञ कर त्यामुळे पाऊस पडेल व लोकांचे दुष्काळ भय नाहीसे होईल.'' याप्रमाणे श्री चिदंबर बोलून तो आनंदसागर मौनावला. तेव्हा विश्वंभराने विनंती केली की, ''तुझ्यापेक्षा जगात यज्ञाकरिता योग्य असा ब्राह्मण कोण थोर आहे हे स्वामीराया मला सांगावे.'' त्यावर श्री चिदंबर म्हणाले, मी याग करीत नाही, मात्र जाणतो. यागाची पद्धत फार अवघड आहे. याकरिता दुसऱ्या ब्राह्मणांची योजना कर आणि त्यांचे हातून सोमयाग कर.



शि
व
चि
द
म्ब
र

त्यामुळे पाऊस पूर्ण पडेल. याप्रमाणे यज्ञाबद्दल बोलत असताना दिवाकर तेथे आला व त्याने पितृचरणी वंदन केले व हात जोडून उभा राहिला. तेव्हा श्री गुरुंनी विचारले, ''हे पुत्रा, गुरुवनपुरी सर्व क्षेम आहे ना? बाळा, तू काय इच्छा धरून येथे आला आहेस?'' याप्रमाणे श्री गुरुंचे मुखाने प्रेमाचे भाषण ऐकताच त्याला फार आनंद झाला. तो म्हणाला की, ''सर्व जण सुखी आहोत आणि श्रीकृपेने सर्व क्षेम आहे. तुझे आज्ञेचे पालन करीत तेथे श्री स्वस्थ असताना एक ब्राह्मण आला व त्याने भारत पुराणास आरंभ केला. काही दिवस ऐकल्यावर राजसूय यज्ञाचे वर्णन निघाले त्या ब्राह्मणाने सांगितले की, 'धर्माने जो राजसूय यज्ञ केला असा अद्‌भुत महायज्ञ मागे कुणी केला नाही व पुढेही कोणी करणारा या भूतलावर उत्पन्न होणार नाही.' हे ऐकून मी एक निश्चय केला की राजसूय यज्ञासारखा यज्ञ आपण निश्चित कराल, एवढा हेतू मनात धरून हे देवराया, मी येथे आलो आहे. आपणाला रूचेल तर माझी अशी इच्छा आहे की, हा जो माझा निश्चय आहे तो आपण पूर्णत्वास न्यावा.'' हे मुलाचे वचन ऐकून श्री स्वामी हसून बोलले की, ''बालभावाने अशक्य अशी इच्छा तू मनात धरली आहेस. द्वापार युगात श्रीकृष्णाचे मदतीने जो यज्ञ झाला आहे तसा मनुष्य साहाय्याने कधीच होणार नाही.'' तेव्हा दिवाकराने विनंती केली, ''हा असा कलीकाल आहे. पण आपण जर दीक्षा घेतली तर मी राजसूय यज्ञाची काहीच चिंता करीत नाही.'' तेव्हा स्वामी दिवाकराला म्हणाले, ''हे मुला, मूर्खासारखे काय बोलतोस? मनुष्य जर देवासारखे करू लागला तर ते कसे होईल?'' तेव्हा दिवाकर म्हणाला, ''तुझ्यासारखा मनुष्य असेल तर देवकार्यापेक्षाही मोठे कार्य निश्चितच होईल. तुम्ही कसे मानव आहात, हे निश्चितच जाणतो. तर मोहाचे बोलणे का बोलता? आता लवकर यज्ञाचा संकल्प करावा.'' तेव्हा श्री गुरु दिवाकराला म्हणाले, ''तू मनात यागाचा आग्रह धरू नकोस. त्याचे कारण तुला सांगतो. मी जर यज्ञाची दीक्षा घेतली तर तुझे मदतीस कोण येईल आणि मदतीशिवाय एवढे मोठे काम पूर्ण कसे होईल?'' तेव्हा दिवाकर म्हणाले, ''आपण निःशंकपणे दीक्षा घ्यावी मदतीकरता काय सुरवरही सेवेला येतील.'' असे दिवाकर म्हणाला त्यावर श्री गुरु म्हणाले की, ''बाळा, यागाकरिता माझी प्रेरणा करतोस तेव्हा मागे-पुढे मनात खोल विचार करून मला सांग.'' त्यावर दिवाकर म्हणाला की, ''मी अगोदरच फार विचार केला आहे आणि निश्चय केला आहे की, यज्ञाला आरंभ करावा. यज्ञ सामग्रीकरिता मला आज्ञा द्यावी. हे स्वामीराया, आता दुसरा विचार कशाला? यज्ञाला आरंभ करावा.'' त्यावर श्री चिदंबर म्हणाले, ''मी

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

याग, यज्ञ निश्चितच करीन, परंतु तुझ्यावर फार मोठा कामाचा भार पडेल. याकरिता पुन्हा विचार कर आणि तरीही तू याग करू इच्छितोस. तर मग यज्ञसामुग्री जमा कर. जे अवश्य आहे अशा कामास कोण डावलू शकतो?'' हे गुरुवचन ऐकून विश्वंभर गोखले आनंदाने देहभान विसरून नाचू लागला. विश्वंभर आणि दिवाकर दोघेही आनंद निर्भर झाले. म्हणून हा चिदंबर किंकर सांगत आहे.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।



शिव चिदम्बर

# अध्याय पस्तिसावा

सोमयाग

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे यज्ञेश्वरा, आदिमूर्ती चिदंबरा तुला नमन असो. या वेळी मला यज्ञ कथेची स्फूर्ती दे. दिवाकर आणि विश्वंभर यांनी श्री स्वामीचे आज्ञेने यज्ञ समारंभास सुरूवात केली. राजद्विज दीक्षित ऋत्विज प्रेक्षक आणि भक्त यांना यज्ञोत्सव पाहण्याकरीता बोलावण्यास हेर पाठविले. श्री स्वामींनी आपल्या हस्ताक्षराने सुशोभित अशी पत्रे गावोगावी पाठविली आणि त्याचप्रमाणे अनेक दूतही देशोदेशी पाठविले. विश्वंभराच्या मदतीने दिवाकराने थोड्याच दिवसात यज्ञोपयोगी सामग्री संपादन केली आणि तो स्वामींजवळ आला. हे ऐकून संतोषाने श्री चिदंबर म्हणाले की, ''माझा एक विचार सांगतो तो तू ऐक. मला पहा. नदीचे किनारी गोण्णागर नावाचे एक गाव आहे. तेथे एक रम्य असे आम्रवन आहे व ते चांगले विस्तीर्ण आहे. सर्व लोकांना छाया, अन्न, पाणी अन् राहण्याकरिता मोठी जागा आहे आणि यासारखी अशी जागा दुसरीकडे मिळणार नाही. म्हणून तेथेच यागभूमी करावी. हा माझा विचार तुला रूचेल तर अग्निहोत्र घेऊन तेथे जाऊ. आजच सुमुहूर्त आहे.'' हे स्वामींचे वचन ऐकून दिवाकर आनंदाने म्हणाला की, ''अंगणात रथ तयार आहे तरी आपण निघावे.'' तेव्हा स्वामींने अग्निचा समारोप करून सपत्नीक त्याचक्षणी निघाले आणि गावातील लोकही ही वार्ता ऐकून त्याचक्षणी निघाले. प्रेक्षक, सेवक आणि भक्त तसेच त्या गावातील सर्व भक्त लोक यज्ञ दर्शनाकरिता स्वामींबरोबर धावू लागले. कित्येक गाडी घेऊन निघाले. कित्येक गाडी करीत बैल व घोडी घेऊन निघाले आणि कित्येक आपल्या डोक्यावर गाठोडी ठेवून त्या वेळी धावले. असंख्य यात्राजनांसह सर्वांना आनंद देत व मुखाने नाम गजर करीत श्रीगुरु पायी पायी चालत निघाले. त्या जगदीशाने रस्त्यात पाय ठेवताच जमिनीवर विशेष चिन्हे उमटीत होती. त्यात ध्वज सरीसह वज्रांकुश अशी चिन्हे होती आणि स्वामींचे पायाचे स्पर्शाने ती भूमी संतुष्ट होत होती. पादस्पर्शाने तोषली म्हणून ती भूमी अत्यंत मऊ होऊन शोभू लागली आणि वसंत ऋतूमुळे आलेल्या नव्या पालवीस रोमांच भरून आनंदाश्रू वाहू लागले. तो साक्षात शिवाचा



शि व चि द म्ब र

अवतार होता. त्याने मनुष्यावताराचा स्वीकार करून व बरोबर मोठा यात्राभार घेऊन अधिकच शोभू लागला. याप्रमाणे श्रीगुरु महोत्सवाने यात्रेतील लोकांना आनंद देत आपल्या परिवारासह गोण्णागरांस आले. नदीचे काठी सुंदर मंडप निर्माण करून यात्रिकांना तेथे बसविले व आपण स्वत: दुसऱ्या मांडवात जाऊन राहिला. त्या सर्वेश्वराच्या हस्ताक्षराने सुशोभित अशी यज्ञपत्रे पाहून राजे लोक आपल्या परिवारासह निघून गोण्णागरास त्याच क्षणी आले. मंडलेश आणि पटवर्धन सर्व राजेरजवाडे, शेठ, सावकार इ. यज्ञ दर्शनाकरिता निघाले. शास्त्री, पंडित, वेदपाठी, श्रौती, ज्योतिषी घनपाठी, असे सर्व हा अपूर्व यज्ञ पाहण्याकरिता गोण्णागराजवळ आले. त्या सर्वेशाचा याग महोत्सव पाहण्याकरिता सर्व राजे लोक आपले चतुरंग दळ घेऊन त्या गावाजवळ आले. हिरे, माणिके, मोती आणि सोने त्या मांडवास शोभत होते. हत्तीच्या मदाच्या स्त्रावाने गंधाच्या इच्छेने भृंगे तेथे येऊ लागले. त्या ठिकाणी नीलमणी ओतल्यासारखे वाटत होते. तसेच निलगिरीप्रमाणे सुंदर हत्ती, सेनेसमोर मंद मंद चालत येऊ लागले. चांदी-सोन्याच्या भूषणांनी सुशोभित असे घोडदळ येऊ लागले. तसेच शस्त्रसज्ज असे स्वार येऊ लागले. ते देवाप्रमाणे दिसत होते. आपले गतीने वायू गतीला मागे हटविण्याकरिता घोडे धावत होते आणि त्या घोड्यांच्या गतीने खुरपट शब्द उमटत होते. तेव्हा सर्वांनी चित्त देऊन ऐकले की, हे काय विचित्र वाद्य आहे? नवरंगाने सुशोभित असे रथ ज्यावर सोनेरी वर्ण होता व प्रत्येक रथास चार घोडे जुंपलेले होते व त्यात राजे लोक बसले होते व त्यांची कांती चोहीकडे फाकत होती. ढाल व तलवार घेऊन पायदळ पुढे चमकत होते व त्याचे अधिपती स्वत:च्या पराक्रमावर संतुष्ट असे गुरुंचे दर्शनाकरिता आले. नाना तऱ्हेची पांढरी छत्रे त्या राजे लोकांच्या डोक्यावर शोभत होती आणि वेळोवेळी वेत्रधारी आपले राजाचा बिरुद वाखाणत होते. यज्ञाच्या दर्शनाकरिता राजे लोक कौतुकाने आपले सैन्यासकट एका ठिकाणी येता भूमी पीडित झाली. कारण ते चतुरंग सैन्य एकत्र येताच एका तिळाएवढीही जागा कोठे दिसेना. नदी, पर्वत व शेते एका क्षणात सैन्यमय झाली. ते अद्भुत सैन्य पाहताच असे वाटले की, एखादा समुद्र आपली मर्यादा सोडून गर्जना करीत उचंबळून येथे आला आहे आणि त्याने हा सर्व भाग व्यापला आहे किंवा रूक्मिणी स्वयंवराकरिता छप्पन्न कोटी यादवांसह श्रीकृष्णाने येऊन हा भूभाग व्यापला आहे असे वाटत होते. याप्रमाणे सर्व राजे लोक आपले रथ व पालख्या घेऊन केवळ यज्ञाचे दर्शनाकरिता गोण्णागराजवळ

शि व चि द म्ब र

आले. दुरून ते गाव पाहताच आपले आपले यानातून खाली उतरून व छत्र-चामरे बाजूला करून ते राजेलोक पायी चालू लागले आणि श्रीगुरुंना दुरून येताना पाहताच भक्तिभावाने लोटांगण घालीत गुरुंचे पायापाशी येऊन फळ समर्पण करून वंदन करीत आपल्या शक्तीप्रमाणे व शुद्ध भक्तीने आपले वैभव गुरुला अर्पण करू लागले व हात जोडून उभे राहिले. त्या वेळी श्री स्वामींनी सर्वांचे कुशल विचारले आणि सर्वांना उत्तम आसन देऊन आपले जवळ बसविले आणि म्हणाले की, ''माझ्याकरीता तुम्हाला निष्कारण श्रम झाले. मज गरिबाचे आमंत्रण मान्य करून येथवर आपण श्रमून आलात व हेच थोरांचे भूषण आहे. मी आपला धर्माश्रित आहे म्हणून आपण स्वत: येथे आलात. तरी आपला कार्यभाग समजून यथासांग करावा. दीक्षित निमित्तमात्र आहेत, परंतु या कार्याचा भार आपलेच शिरावर आहे.'' हे ऐकून ते राजे म्हणू लागले, ''हे लौकिक पालका, तू सर्व चालक आहेस. हे पार्वतीसख्या, तू आम्हाला वृथावीतोस तुझ्या आज्ञेप्रमाणे व आमचे शक्तीप्रमाणे कार्य करू. सर्व जगाचा शास्ता तू आहेस. तरी आमची सेवा तुझे चरणी लावून घे.'' इतक्यातच सर्व दिशांकडून ब्राह्मणांचे थवे तेथे येऊन मिळाले. त्यात बहुतेक तेलंग देशाचे होते. ते सर्व भस्म व रुद्राक्षाने सुशोभित होते व त्याचे डोक्यावर टोपी व पागोटे होते. हातात अजीन व कमंडलू होते आणि ते मूर्तिमंत वेदपुरुषाप्रमाणे दिसत होते. गुरुंचा यज्ञमहोत्सव पाहण्याकरिता कुतुहलाने चहूकडून अनेक विप्र आपले वेदवैभव दाखवित आले. कित्येक न्याय व व्याकरणात निष्णात होते. कित्येक मिमांसा पारंगत होते व चतुर्वेधी असून श्रौत शतपथ जाणणारे होते. असे सर्व ब्राह्मण स्वामीजवळ येऊन जेव्हा त्यांनी डोळे उघडून पाहिले तेव्हा श्री गुरुंची मूर्ती शुभ्र वस्त्राने दिव्य दर्शन देणारी, सर्वांगावर भस्म व रुद्राक्षाचे भूषण अशी शामसुंदर दिसत होती आणि त्या दयाघनाने आपले मधुर वाणीने सर्वांना आनंदविले. अशा श्री गुरुस डोळे भरून पाहून त्या सर्व विप्रांनी साष्टांग नमस्कार केला व वेदपाठाने स्तवन करू लागले. त्या ब्राह्मणांना श्री चिदंबराने उभे राहून नमस्कार केला आणि मोठे आदराने आसनावर बसविले आणि सर्वांचा सन्मान केला. त्यांना कुशल प्रश्न विचारून दीक्षितेंद्राने राजे लोकांना सांगितले की, ''या सर्व ब्राह्मणांना विशाल स्थान करावे.'' हे स्वामी वचन ऐकून राजे लोकांनी ताबडतोब सुंदर असे शिबिराची रचना केली आणि त्यात त्या सर्व ब्राह्मणांना बसवून आणखी मंडप घातले. मधोमध श्री गुरुंचा मोठा मंडप नदीतीरी, वैदिक मंडप पूर्वेकडे,

शि व चि द म्ब र

पाकशाळा अशी सर्व रचना केली. दक्षिण बाजूला सैन्याला राहण्याची सोय सर्व कार्योपयोगी लोकांकरिता विशेष अशा मंडपाची रचना केली आणि राजे लोकांकरीता पश्चिम भागी सोय केली. मधोमध कमळाप्रमाणे श्री गुरुंचा मंडप शोभत होता आणि सभोवताली कंजदळाप्रमाणे नाना मंडप शोभत होते. इतक्यात दिवाकराने येऊन श्री स्वामीस वंदन केले व म्हणाला की, ''आपले कृपाकटाक्षाने कोठी मंदिर पाहावे. तथास्तु म्हणून श्री गुरु कोठीकडे निघाले. तेव्हा पुढे होऊन विश्वंभर गोखलेने सर्व वस्तू श्री गुरुंना दाखविल्या. असंख्य अशी पोती, गोण्या व पिशव्या हळद-कुंकू वगैरेने भरून ठेवल्या होत्या. हळद कुंकवाच्या प्रत्येकी पाच पाच पिशव्या त्याने कौतुकाने दाखविल्या. त्यामुळे श्री गुरुंना आनंद झाला व ते विश्वंभराला म्हणाले की, दिवाकराने रचलेल्या सामग्रीला काय पहावयाचे आहे. मनात मुळीच शंका धरू नको, तेव्हा तो म्हणाला की, हे गुरुराया, या वेळी आपण अमृतदृष्टीने हा सर्व पदार्थ समुदाय पाहवा. ज्या योगे हे सर्व पदार्थ अक्षय होतील. 'तथास्तु' म्हणून श्री चिदंबराने मंद गतीने आत प्रवेश केला आणि विश्वंभराने मोठ्या आनंदाने अगोदर गव्हाची रास दाखविली. नंतर एखाद्या पांढऱ्या पर्वताप्रमाणे तांदळाची रास दाखविली व तूर व हरभरा डाळीच्या राशी पिवळ्या पर्वताप्रमाणे दिसत होत्या. पीठ व कणीक एकीकडे, लोण्याचा ढीग दुसरीकडे आणि नंतर हजारो तुपाचे घट दाखविले. साखरेची पाच हजार पोती व दुसरीकडे गुळाची रास पर्वताप्रमाणे दिसत होती. मीठ, खडीसाखर, चंदन, अगरू, कापूर, केशर, कस्तुरी आणि नाना तऱ्हेची वस्त्रे निरनिराळी दाखविली. नंतर तेलाचे एकीकडे असंख्य घट दाखविले. सोन्या-चांदीची आसने, पाट दाखवले. नंतर नारळ, लवंग, पत्री, विड्याची पाने व फणस आदी फळे दाखवली. अनेक रत्ने आणि आभरणे, दुभत्या म्हशी आणि गाई आणि अनेक तऱ्हेचे शिल्पकार हे सर्व श्री स्वामींना दाखविले. याप्रमाणे सर्व वस्तू विश्वंभर दाखवित असता श्री चिदंबराने ते सर्व आपल्या कृपादृष्टीने पाहिले. मग हसत दिवाकराला म्हणाले की, ''सर्व सामग्री पूर्ण आहे. तू आता मनात कोणतीही चिंता करू नकोस.'' तेव्हा दिवाकराने विनंती केली की जमाखर्च पाहण्याकरिता कोठीवर कोणास नेमावे?'' हे ऐकताच श्री गुरु मधुर वाणीने म्हणाले की, ''जमाखर्च श्रीमंताचे घरी पाहवा लागतो. तो वैदिक मंदिरात कशाला हवा? तेव्हा कोणाची नेमणूक करण्याच्या भरीस पडू नको.'' दिवाकरावर श्री गुरुकृपा पूर्ण होती. त्याचे कोण वर्णन करू शकेल? तरीही दिवाकरने गुरुंची आज्ञा मनात न

आणता हिशोब लिहिण्याकरिता कित्येक कारकुनांची कोठीमध्ये योजना केली. इतक्यात तेथे शामभट्ट नावाचा योगीराज सहज आला. त्याला पाहून श्री चिदंबर उभे राहिले. त्याला प्रेमाने व आदराने आलिंगन दिले. दोघांनी एकमेकांचे चरणास वंदन केले. दोघांचे अंगावर रोमांच उभे राहिले व आनंदाश्रू वाहू लागले. तेव्हा शामभट्टाने स्वामींना विचारले की, ''माझा एक प्रश्न आहे की, सोमपान करण्याची इच्छा आहे. यज्ञभोक्ता देव कोण आहे?'' तेव्हा श्री स्वामी हसून म्हणाले की, ''माझी मुळीच इच्छा नाही. दिवाकराचा फार आग्रह झाल्यामुळे माझा निरुपाय झाला.'' तेव्हा शामभट्ट म्हणाला की, ''कसेही असो, असा उत्कृष्ट याग श्री स्वामींनी आरंभिला आहे. त्यामुळे मी आनंदित झालो आहे. यागकीर्तीने त्रिभुवन व्यापून पावन झाले आहे. तेव्हा याग दर्शनाकरिता मी आलो आहे. ज्यामुळे मला महानंद झाला आहे.'' अशा सुख गोष्टी दोघे करीत दोघेही क्षणभर नदीतीरावर बसून त्या योगीशाला श्री चिदंबराने स्वतःच्या मंडपाजवळ राहण्याची सोय केली. इतक्यात श्री स्वामींना बोलवण्याकरिता श्रौत मंडळी आली. तेव्हा दीक्षित चंद्रमौळी यज्ञ मंडपाचे दर्शनाकरिता निघाला. सभोवती यागभूमी पाहून श्री स्वामी संतुष्ट झाले. आता मंडप विस्तार सांगतो तो ऐका. शास्त्रोक्त अवनी शोधून अगोदर प्राची साधून मग कारिका प्रमाण धरून याग मंडप उभारला होता. आधी सुशोभित अशी पंचकुंडे दीर्घ चतुरस्त्र वीस हात यागशाला रचून त्याला तीन दारे होती. त्याचे सभोवती पुष्कळ लोक राहण्याकरिता लोक मंडप होता. त्याचे रम्यतेचे माप कोण करील? यागशालेपुढे तीन हात जागा सोडली. तेथून पुढे छत्तीस हात उत्तम वेदी होती. सदोमंडप, उर्विधान, अग्नीध्रीय, शामित्रसदन इतके मंडप शास्त्राला धरून उभारले होते. पुढे पाच हात महावेदी होती आणि चात्वाल, मार्जालिय, संज्ञीत, उपरव, धीष्ण्य आणि औदुंबरी असे शास्त्रोक्त प्रांत निर्माण केले. इतके शास्त्रोक्त मंडप उभारून सभोवती लौकिकार्थ शिल्पकारांनी रचलेले कित्येक मंडप होते. मग राजे लोकांनी मिळून मंडपाभोवती तोरण बांधले जे अलौकिक अशा रत्नांचे होते. तसेच स्वर्णमाला व मुक्तामाळा होत्या. तसेच प्रत्येक खांबावर ऊस केळी व पोफळी व नारळ बांधले होते. ठिकठिकाणी नाना तऱ्हेची चित्रे काढली होती. ज्यांना पाहून सुरवर प्रत्यक्ष उभे आहेत असे वाटत होते. पांढऱ्या व पिवळ्या रंगाच्या कित्येक ध्वजपताका होत्या व पुढे अत्यंत सुंदर असा नगारखाना होता. नाना तऱ्हेच्या चित्रविचित्र रांगोळ्या ठिकठिकाणी काढल्या होत्या आणि असंख्य अशी सुगंधित फुलांची रोपे

लावलेली होती. आता जास्त काय सांगावे? ती मंडप शोभा पाहण्याकरीता स्वर्गाहून आलेले देवगणही आश्चर्यचकित झाले. देवांची चित्रे जशी मंडपाभोवती होती त्याप्रमाणे तो प्रत्यक्ष देवगण एखादे दगडाप्रमाणे स्तब्ध होता. ती मंडप शोभा पाहून तो विश्वकर्माही आपले मनात चकित होऊन त्याने लाजेने खाली मान घातली. याप्रमाणे मंडप सौंदर्य पाहून श्री स्वामी म्हणाले की, आता संध्याकाळ झाली आणि ते आपल्या स्वत:च्या मंडपाकडे निघाले. इकडे यज्ञमंडपात अचानक एक यवन आला. त्यामुळे त्याला पाहून दिवाकर अतिशय क्रोधायमान झाला आणि त्याला मारण्याकरिता धावून गेला. तोच श्री चिदंबराने धावत येऊन त्याचा हात धरला व दिवाकराला बोलविले. नंतर त्या स्वामींनी आदराने त्या यवनाचा हात धरून त्याला सर्व यागमंडप दाखविला. नंतर तो यवन महावेदीत ताबडतोब गुप्त झाला. तेव्हा सर्व लोकांनी श्री स्वामींनी नमस्कार करून विचारले, ''हे देवराया, या यवनरूपाने कोण आला होता? आपण मोठ्या आदराने व प्रेमाने सर्व यागभूमी दाखविली आणि तो एका क्षणातच उत्तर वेदीत गुप्त कसा झाला.'' तेव्हा श्री गुरु म्हणाले, ''तो स्वत: यज्ञेश्वरच होता आणि म्हणून आपले स्थानावर तो गुप्त झाला.''

॥ श्री चिदम्बर गुरुवेनम: ॥



शिव चिदम्बर

# अध्याय छत्तिसावा

सोमयाग पुढे चालू......

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। सोमयागामुळे श्री चिदंबराचे चित्तांत स्मरण करतो तो आपले चिंतितार्थ लाभाने अत्यंत आनंदित होतो. अशा त्या श्री चिदंबरास नमन असो. गुरुंचा यज्ञ विख्यात असा झाला. त्याचे वर्णन ऐकताच जीवन्मुक्ती लाभते. अहं या पशूचा घात करून स्वामींनी प्रख्यात असा ज्ञानयज्ञ केला आणि लौकिकार्थ कर्मयज्ञ करून दाखविला. दोन यज्ञांचे निरुपण तुम्हाला सांगतो ते चित्त देऊन सावधानतेने ऐका. शके १७२९ प्रभवसंवत्सरी चैत्र मासी शुक्ल प्रतिपदा सोमवारी महास्वामींनी यज्ञास आरंभ केला. त्या दिवशी ब्राह्म मुहूर्ती उठून आधी नित्य कर्मे आटोपून श्री चिदंबर वेदवत्त्या ऋषीप्रमाणे असलेल्या अशा ब्राह्मणांजवळ आले की, ज्याप्रमाणे आत्मसाधक आधी सत्कर्मे आचरून नंतर उत्सुकतेने गुरुंना शरण जातो. सुस्नात वस्त्रभूषणाने विभूषित अशा आपल्या दोन्ही जाया म्हणजे पत्नी श्रद्धा व भक्तीप्रमाणे आपल्या बरोबर घेतल्या. आधी कुलदेवतांना वंदन करून नंतर सर्व विप्रांना वंदन केले आणि महास्वामींनी सर्व सभासदांची आज्ञा घेतली. सोम संकल्प करून आधी विघ्नेशाची पूजा केली. नंतर त्या चिदानंददीपाने पुण्याहवाचन केले. नांदीश्राद्ध करून पितरांची आराधना केली. नंतर ऋत्विजांना वंदन करण्याकरिता ब्राह्मण समुदायाला विनंती केली आणि म्हणाले, ''हे सभासदहो, माझी विनंती ऐका. यज्ञाकरिता मला सोळा ऋत्विज हवे आहेत. ज्यांची इच्छा असेल त्यांनी पुढे यावे.'' हे ऐकताच त्या सभेतील सर्व पंडित उभे राहिले. मी पुढे, मी पुढे असे आपापसात वाद करू लागले. चांगली गोष्ट करू लागताच ज्याप्रमाणे नाना गोष्टी पुढे येऊन विघ्न करतात त्याप्रमाणे पंडित पुढे आले. तेव्हा श्री गुरुंनी सर्वांना आदराने विनंती केली, ''आपण परस्पर वाद का करता? स्वस्थ बसावे. मी गरीब ब्राह्मण असूनही आपण दया दाखवून येथे आलात. सर्व शौतशास्त्री निपुण आहात तरी माझे म्हणणे ऐका. मला यागकर्माकरिता या वेळ सोळा ऋत्विज पाहिजेत, परंतु बाकी राहिलेले आहेत त्यांचा ऋत्विजांप्रमाणेच सत्कार होईल. माझे शक्तीप्रमाणे सर्वांचीच पूजा मी निश्चित करीन. तरी वृथा कलह

शि व चि द म्ब र

वाद सोडून मला वणार्थ निरोप द्यावा.'' स्वामींचे हे अमृतवचन ऐकून सर्वांचे समाधान झाले. ज्याप्रमाणे साधकांच्या दृढनिश्चयाने नाना कर्मे शांत होतात त्याप्रमाणे साधक आपले हिताकरिता जसा गुरुपंथाचा मुख्य अंगीकार करतो त्याप्रमाणे श्री गुरुंनी आपले इच्छेने सोळा ऋत्विज निवडून घेतले. जसा साधक नित्संग राहून नवविद्या, भक्ती, अष्टांग, योग करतो तसा सर्वातरंग स्वामींनी सतरा ऋत्विजांस वरले. याप्रमाणे ऋग्विवरण करून मग मधुपर्क पूजन केले. आधी पादप्रक्षालन करून गंधपुष्प समर्पण केले. नंतर शाल, पितांबर देऊन सोने व मोती दिले. याप्रमाणे श्रीगुरुंनी मोठे प्रेमाने मधुपर्क पूजा विधान केले. ज्याप्रमाणे काम्यकर्म आटोपून साधक आपले साधनात झटतो त्याप्रमाणे अग्नीचा समारोप करून याग साधनेस सुरुवात केली. तो श्री चिदंबरेश्वर जेव्हा याग मंडपाकडे निघाला, तेव्हा ती रम्य मूर्ती स्नान करून शुभ्र भस्म सर्वांगावर चर्चून व तो आनंदधाम शुभ्र वस्त्रे व रुद्राक्षाने अत्यंत शोभत होता. हातात अमृतपूर्ण कलश धरून तो दीक्षितेंद्र यज्ञमंडपास जाताना कोटी सूर्यापेक्षाही जास्त तेजाने शोभत होता. त्याच्या दोन्हीही सती वस्त्रालंकार लेवून मंदगतीने स्वामीमागे चालत होत्या. तरी अशा चिदंबराला चित्ती धरा. त्याच्या मागे पाचही पुत्र हाती यज्ञ संभार घेऊन सुकुमार असे मंद मंद चालले होते आणि ऋत्विजही पुत्रांमागे भस्म रुद्राक्षाने भूषित आणि संस्कृतमध्ये धर्मशास्त्रार्थ बोलत होते व ऋत्विजांबरोबर पंडितही याग स्थळाकडे जात होते. सर्वांवर शास्त्राधाराने महावस्त्राची छाया केली होती आणि त्या छायेच्या आधाराने सर्व हवनीय द्रव्य ऋत्विज मंडपात आणत होते. सुंदर अशी वस्त्रे आणि नाना भूषणांनी युक्त असे सर्व लोक सूर्याप्रमाणे देदीप्यमान पंडितामागे शोभत होते आणि सभोवताली राजभट चकाकत होते. शस्त्रास्त्र धरून भाट कोमल नादाने त्या वेळी आपले स्वामीचे यश वाखाणीत होते. तुर्यपट आदी मंगल नादांनी आणि सर्व दिशातून त्याच्या प्रतिनादाने वीणामृदंगादी महानादाने दाही दिशा दुमदुमत होत्या. द्विजवृंद वेदपठण करीत होते. भक्त लोक आनंदाने टाळ्या पिटीत जय नादाची गर्जना करीत होते. त्यामुळे कानठळ्या बसत होत्या. वेश्यांचे रम्य गायन ऐकून सर्वांचे मन मूढावत होते आणि त्यांची गती खुंटून स्तब्ध राहताच मार्गात गर्दी दाटली. तेव्हा वेत्रधारी येऊन प्रयत्नाने ती दाटी दूर केली. मग तो श्रीहरी मंदमंद पावलाने पुढे चालू लागला. शामसुंदर असा तो गुरुनाथ कमलाप्रमाणे ज्याचे डोळे शोभत होते सर्वांकडे कृपादृष्टीने पहात हळूहळू चालत होता. तो दयाघन राजीववदन

शि व चि द म्ब र

मंद हसत आहे, हे भक्त लोक पाहत होते. ज्याचे मोगऱ्याप्रमाणे शुभ्र दात होते. ज्याची प्रभा पूर्णपणे चंद्रिकेप्रमाणे पसरत होती. पूर्ण कुंभ डोकीवर घेऊन पुरंध्री पुढे चालल्या होत्या आणि त्यांच्या मागे देवांगनांप्रमाणे बऱ्याच स्त्रिया चालत होत्या. भक्तांची इच्छा पूर्ण करणेकरिता कल्पवृक्षाहूनही जो जास्त दक्ष असा दीक्षितमणी त्याला ध्यानी दृढ धरा, ज्यामुळे चित्त समाधान पावेल. श्रीगुरु अशा महोत्सवाने यज्ञ मंडपात वैभवाने चालले असता सर्व लोक मोठ्या प्रेमाने पाहत होते. त्या वेळी असे वाटले की, ते लोक आपल्या नेत्रकमळाने श्रीगुरुंची पूजा करीत आहेत. मंडपाजवळ येऊन हातपाय धुऊन दोन्ही अरणी घेऊन शालेच्या दारात मंत्र म्हणू लागले. प्रपंच व सर्व आशा सोडून साधक ज्याप्रमाणे आपल्या साधनेचा अभ्यास करतो त्याप्रमाणे श्रीगुरु याग मंडपात आले. ज्याप्रमाणे गुरुवाक्याचा अर्थ घुसळून आपले हृदय कुंडात ज्ञानाग्नी स्थापन करतात तसा दोन्ही अरणी मधून पाचही कुंडात अग्नी स्थापन केला. गुरुंचा उपदेश असेल त्याप्रमाणे वेळोवेळी साधन करतात. त्याचप्रमाणे काव्यायन सूत्राप्रमाणे आध्वर्या कर्माचा आरंभ केला. मग सर्व ऋत्विजांनी मिळून दीक्षणीयदि कर्म प्रथम दीक्षी पूर्ण करून श्री चरणास वंदन केले. पहिले दिवशी कृष्णाजिन दिक्षा होताच तो सावित्री सखा म्हणजे मूर्तिमंत वैराग्य यज्ञमंडपात बसले आहेत, असे वाटत होते. मग दुपारी द्विजाराधनेकरिता दिवाकराला आज्ञा केली. तेव्हा सुचिर्भित असे विप्र येऊन आम्रवनात बसले. कित्येक वेद पठण करू लागले. कित्येक शतपथपंचक म्हणू लागले. कित्येक सुंदर असे सामगायन करू लागले. इतक्यात दिवाकर तेथे आला. सर्व राजसेवकांना त्याने वाढण्याकरिता आज्ञा दिली. मग एकेक पदार्थ प्रत्येकाने नेमून घेतला. आपल्या सेवकासह बापू गोखलेही अन्न वाढू लागले. जमखिंडीचे परशुराम पंतानेही तेच स्वीकारले. हावनूरचे राजाने विशेष असा तूप वाढण्याचा अधिकार घेतला आणि श्रीमंताचे अष्टप्रधानास अपूपादी नेमून दिले. कित्येक लोकांस मदतीस घेऊन हे सर्व सेवक आपापले पदार्थ पुरवू लागले. त्यांनी प्रत्येक पंगतीत आपले पदार्थाने भरून एकेक गाडी ठेवली होती. कित्येक पदार्थ आणून गाडी भरत होते तर कित्येक पदार्थ काढून वाढत होते आणि कित्येक श्री गुरुंच्या नावाची गर्जना करून गाड्या पुढे ओढीत होते. गुप्त रुपाने निर्जर ब्राह्मणांची पाने वाढत होते आणि वीस किंवा तीस पाने वाढताच पंक्ती वाढणे पूर्ण होत होते. नाहीतर एक-दोन पळात हे राजे लोक कसे वाढू शकतील? एकेक पंगत कोसभर होती. तेथे मनुष्य कसे वाढू

शकेल? तुपासकट सर्व वाढणे पूर्ण होताच शंकर दीक्षितांनी पात्र प्रोक्षून एकोभावे पाणी सोडले. इतक्यात तोफ उडाली. तिचा आवाज ऐकून ब्राह्मणांनी आपोशन घेतले व भोजनास सुरुवात केली. विप्र तेथे स्वस्थ चित्ताने जेवत असता मृदंग, नौबत आदी मंगल वाद्ये वाजू लागली आणि जेवताना कोणताही पदार्थ कमी पडत नव्हता. श्री चिदंबर सद्गुरुनाथ अन्न पुरवीत असता कितीही वाढले तरी पात्रात कमी पडत नव्हते. सर्व पदार्थ जितके जेवले तितके पानात टाकत होते. असे सर्व आकंठ जेवून तृप्त झाले. मग तांबूल आणि दक्षिणा देवून ब्राह्मणांना संतुष्ट केले. त्या दिवशी बावन्न हजार दोनशे ब्राह्मण त्या पंगतीत जेवले. वाढणारे तसेच राजे आणि त्यांचे मंत्री या शिवाय दोन लक्ष सैनिक जेवले. याप्रमाणे सर्व लोक प्रसाद अन्नाचे सेवन करून आपापले स्थानी गेले. श्री स्वामी यज्ञमंडपात आले. आपल्या भार्यासह श्री चिदंबर गाईचे दूध पिवून बसले. तोच सर्व विद्वान लोक दर्शनाकरिता आले व वंदन केले. जे जे त्यांनी शास्त्रवर्य व यज्ञाविषयी विचारले ते ते त्या मेघश्यामाने सांगितले. सर्वांना यज्ञाची कथा सांगून संतोष दिला आणि दहा घटका रात्र होताच त्यांना निरोप दिला व ते सर्व आपले स्थानी गेले व श्री गुरुंनी कृष्णार्जीनावर विश्रांती घेतली. दुसरे दिवशी यज्ञदीक्षा घेऊन श्री गुरु सूर्याप्रमाणे तेजस्वी दिसत होते. रुद्राक्ष व शुभ्र वस्त्रे परिधान करून स्वस्तिकासनावर बसले. दंड कृष्णार्जीन व मृगश्रुंग धरून तो सर्वांतरंग शोभत होता. त्याचे चरणावर अंतरंग ठेवून पुढे कथा सांगतो. ऋत्विज मंडळी प्रात:काळी उठून स्नान करून रोजचे अनुष्ठानाकरिता श्री गुरुंजवळ आली. स्वामीसुद्धा यज्ञेषास वंदन करून संतोषाने आसनावर बसले. ऋत्विजांनीही भक्तीने दृष्टी कर्मास आरंभ केला. चक्षुरादी ऋत्विग्मण स्वकर्माचरण करीत असता जसा आत्मा साक्षित्वाने यजमान म्हणून बसतो, त्याच प्रमाणे श्रीगुरु बसले होते. सोमक्रयादी सर्व कर्म करून ऋत्विक गणांनी अग्नीज्वाला उडवीत धर्म तयार करण्यास लागणारी क्रिया केली. स्थाता व अध्वर्यू दोघांनी धरून धर्म मंडपामागे नेवून अजापय ओतताच ज्वाला त्याही चित्रगतीने जणूकाही आकाश मार्गाने देवांना यज्ञवार्ता कळविण्याकरिता निघाल्या, अशी ती धर्मक्रिया पाहून लोकांना वाटले. मग धर्मक्रिया करून ऋत्विजाने यज्ञ भागाचे सेवन केले. तेव्हा सूर्य डोक्यावर आला होता आणि सर्व विप्र आम्रवनात जमले. त्यांनी आत्मसुखाचा संकल्प करून व प्रापंचिक सर्व सुखांचा, कर्मांचा त्याग करून श्री गुरुचरणी शरण जाऊन ज्ञानदीक्षा घेतली. यथाविधी मंत्रानुष्ठान निर्विघ्न चालण्याकरिता वैराग्य दीक्षा घेऊन प्रथम भूमी

साधिली. दुसऱ्या दिवशी दुसरी भूमी स्वीकारून आपल्या आत्मधामात अभिमान सोडून धर्मविधीने स्थूल जाळतात आणि साधनात विघ्न निवारण्याकरिता द्विजसमारधनेस आरंभ करतात. पहिल्या दिवसाप्रमाणे श्री चिदंबराने ब्राह्मणांचे आराधन केले. थंड व सुवासिक पाणी, नाना तऱ्हेची रसाळ पक्वान्ने अर्पण करून मोठ्या आदराने उपहार करविला. द्राक्ष, खजूर, अंजीर, डाळींब, दूध, साखर, नारिंग, आंबे, जांभळे आणि अशी अनंत फळे अर्पण केली. ज्यामुळे सर्व ऋत्विज तृप्त झाले आणि ब्राह्मणही पूर्वीप्रमाणे आकंठ जेवले. दुसरी दिवशी पंक्तीत बासष्ठ हजार पाचशे ब्राह्मण जेवले आणि बाकीची संख्या पहिल्या दिवसाप्रमाणेच यथेच्छ जेवली. राजे लोक प्रसाद घेऊन श्रीगुरुंजवळ आले. श्री गुरुंनी त्यांना कौतुकाने ज्ञानमार्ग सांगितला. इतक्यात एक चमत्कार झाला तो ऐका. मलापहा नदीचे डोहात एक ब्राह्मण पोहताना अवचित बुडाला. त्याचे दोन्ही हात-पाय थकून तत्क्षणी तो तळाला गेला. इतक्यात त्या दिन चिंतामणीने काय केले? राजे लोकांना बोध करीत असता श्री स्वामींनी दोन्ही डोळे झाकले. मौन धरून हात वर करून बसले. एका क्षणातच स्वामींचे वस्त्रातून झरझर पाणी वाहू लागले. हे पाहून लोकांना आश्चर्य वाटले. इकडे एक विचित्र गोष्ट झाली. नदीत जो ब्राह्मण बुडाला त्याचे अंगाखाली हात घालून कोणीतरी वर काढीत होते. वर येताच त्या ब्राह्मणाने तेथे एक मोठी शिळा पाहिली व दोन्ही हाताने धरली मग सावध होऊन त्या शिळेवर तो बसला. मला कोणी बाहेर काढले. कोणत्या दयाळाने माझे प्राण वाचवले असा मनात विचार करून त्याने चारी दिशांकडे पाहिले नदी किनाऱ्याचे सभोवती त्याला कोणीही मनुष्य दिसला नाही तेव्हा त्याला निश्चित वाटले की, दीक्षितेंद्राने आपणास वाचविले. श्री चिदंबराची करुणा जाणून त्याचे मनात आनंद मावेना म्हणून आनंदाने नाम गर्जना करीत तो त्या शिळेवर बसला. नदी किनारी चालू असलेली नाम गर्जना ऐकून जवळपासचे लोक तेथे जाऊन त्याची हकिकत ऐकली व त्याला बाहेर काढले तोच ती शिळा अदृश्य झाली तेव्हा लोक म्हणू लागले की, ''ही काय अपूर्व गोष्ट आहे की, ब्राह्मणाचे प्राण वाचविण्याकरिता हा दगड येथे प्रकट झाला.'' इकडे श्री गुरुने उठून दुसरी वस्त्रे परिधान केली. नंतर ज्ञानकथा सांगण्यास आनंदाने बसले. इतक्यात नदीहून लोक त्या ब्राह्मणास घेऊन स्वामींजवळ आले आणि त्याची सर्व हकिकत सांगितली. हा वृत्तांत ऐकून लोकांच्या मनात हर्ष मावेना. अंग रोमांचित झाले आणि डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. महास्वामींचे हे चित्र चरित्र पाहून लोकांचा पूर्ण

विश्वास गुरुंवर बसला आणि अनायसे आत्मज्ञानाची प्राप्ती होऊन सेवापरायण झाले. इतक्यात खिन्न चित्त असा दिवाकर यज्ञशालेत येऊन स्वामींना वंदन करून म्लानमुखाने विनंती करून म्हणाले की, "हे दयाळा, कोठीमध्ये मी जी सामग्री गोळा केली होती ती दोन दिवसांतच संपली. आता फक्त चतुर्थांश भाग शिल्लक आहे. आता काय करावे? रोज जास्तच जास्त लोक येत आहेत." असे दीनवाणीने सांगून हिशोब पुढे ठेवले. हे पाहून मंद हसत श्री गुरु म्हणाले, "मी तुला पूर्वीच सांगितले होते. तू उगीचच चिंता करतोस. आजपासून हिशोब सोडून दे. आपण वैदिक आहोत. आपणास हिशोब कशाकरिता? तो श्रीमंतांनाच करावा लागतो. आमचे मुख्य धन समाधान आहे. निष्कारण हिशोब कशाला ठेवतोस? आमचे रक्षणाकरिता तो रात्रंदिवस विश्वंभर आहे. शुभ कार्याचे साहाय्याकरिता भक्ताकरिता तो जागतो. तू मनात भिऊ नकोस आणि निर्भयतेने पुढे काम चालव." याप्रमाणे दिवाकराचे समाधान करून त्याला आपले स्थळी पाठविले. त्या दिवसापासून तो जगज्जेठीने कोठीचे द्वार मुक्त ठेवले व तेव्हापासून कोठीमध्ये सारखी लोकांची गर्दी होऊ लागली. श्री चिदंबर कृपेने ज्याला जे जे पदार्थ हवे होते ते ते निर्भयतेने यथेच्छ घेत तेव्हा ऋत्विज शुचिर्भूत आले व सायं प्रवर्ग्यन करण्याकरिता सकाळ सारखे प्रवर्ग्यन कर्म विधियुक्त सुरू केले. पुढे यज्ञास वंदन करून व स्पर्श करून श्री गुरुचरणांना भावाने वंदन केले. नंतर स्वामी आज्ञेने संध्या करण्याकरिता नदीवर गेले. इकडे श्री चिदंबर दूध पिऊन सुखासनावर स्थिर बसले. तेव्हा पुराणिक येऊन पुन्हा पुराण सांगू लागले. गायक मोठ्या प्रेमाने गाऊ लागले आणि कुशल लोक वीणा वाजवू लागले. वैदिक ब्राह्मण मंत्र पढू लागले. याप्रमाणे सर्व लोक आपापल्या विद्येने श्री स्वामींची सेवा करू लागले कित्येक गर्जना करू लागले. कित्येक भजन करू लागले आणि कित्येक स्त्रिया श्रीगुरुंना आरती ओवाळू लागल्या. आधीच ती आनंदमूर्ती त्यावर यज्ञदीक्षा प्राप्त झाली आणि नवे शुभ्र वस्त्र नेसून हरणाची शिंगे हातात धरून अतिशय शोभत होती. आधीच स्त्रिया सुंदर होत्या. त्यावर तुपाच्या दिपाच्या प्रकाशाने कांती फाकत होती आणि राजे लोक अर्धवट मिटलेल्या डोळ्यांनी सारखे भक्तीने वंदन करीत होते आणि या प्रमाणे श्रीगुरुंची सेवा करून सर्व लोक आपले स्थानी गेले. स्वामीही मनात आनंदित होऊन विश्रांतीस गेले. देहाभिमान सोडताच प्रपंच चिंता दूर होते आणि चित्तात शांती उत्पन्न होऊन विचाराला पक्व दशा येते. आता यज्ञांगाची तिसरी भूमी जी अभंग आत्मज्ञान आहे तिचा आरंभ तिसरे दिवशी

शिवचिदम्बर

झाला ते तुम्हाला यथासांग सांगतो. तो ज्ञानपूर्ण चिदंबर याजी जो याग मंडपात बसला होता. तो सद्बोधाने भक्तांचा उद्धार करीत होता. त्याचे चरण कमळावर चित्त ठेवा. तनु मानस जी तृतीय भूमिका आहे ती सतत अभ्यासाने साधकास लाभते. त्यावेळी तिसरे दिवशी लिंगदेह निरास आरंभिला. चक्षुरादि ऋत्विगण प्रात:काळी शुचिर्भूत होऊन चिदम्बर भानू उगवताच आधी त्यास वंदन केले. अवश्य नित्यकर्म आटोपून ऋत्विक् स्तोत्र आटोपले आणि भस्म रुद्राक्ष, सुवर्णादी अलंकार धारण केले. अलौकिक रत्ने व मोती हे ऋत्विक जनानी लेवून अस्खलीत मंत्र उच्चारीत प्रवर्ग्याचरण आरंभिले. सुंदर स्वराने साम गाऊ लागले. अध्वर्यू सुंदर स्वराने मंत्र म्हणू लागले आणि प्रणवाचा उच्चार होताच सर्व लोक आदराने पाहत होते. याप्रमाणे प्रवर्ग्य धर्म आटोपून उपसद कर्मास सुरुवात केली आणि पूर्वीप्रमाणे सोमाचे सेवनाने उत्तर वेदी मोजली. याप्रमाणे प्रातर्नुष्ठान आटोपून ऋत्विकजन संध्येकरिता नदीवर गेले. त्या वेळी मध्यान्ह काळ होता. पूर्वीप्रमाणेच द्विजाराधना झाली, पानात नाना पक्वान्ने वाढली. इतक्यात प्रमादाने भोजनात एक विघ्न आले. कुष्मांड भाजीच्या हौदात एक आचारी अवचित पडला. हे पाहून सर्व वाढपी लोकांनी त्यास गडबडीने बाहेर काढले. इतक्यात त्याचे शरीर भाजून पिकलेल्या वांग्यासारखे झाले आणि सर्व लोक म्हणाले की, ''अहाहा! ही काय वेळ आली?'' तेव्हा कित्येक सेवकांनी धावून श्री गुरुंना सांगितले की, ''ब्राह्मण भोजनाला मोठे संकट ओढवले आहे कारण अवचितच भाजीचे हौदात पाय घसरून आचारी पडला. वाढप्यांनी त्याला बाहेर काढले तरी अजून मेल्यासारखा दिसतो. तेव्हा हे ज्ञानराशी, द्विजाराधनेस आता उपाय काय? तो सांगावा.'' असे त्यांचे दिनवचन ऐकून मंद हसत स्वामी म्हणाले, ''नेहमी मंगल बोलावे, अमंगल शब्द केव्हाही जिभेवर नसावा. तो घशातच दडपून ठेवावा.'' याप्रमाणे सर्वांना सांगून श्री स्वामी पाकशाळेकडे निघाले आणि मार्गात कृपादृष्टीने सर्व भक्तांना पहात चालले. दंड, कृष्णाजीन व पगडी असा तो सर्वेश शोभत होता. अशा त्या श्री चिदंबराला पाहून पंक्तीतील ब्राह्मण उठून त्यांनी नमस्कार केला. त्यांच्याकडे कृपादृष्टीने पाहत श्री गुरु ताबडतोब पाकशाळेत आले तेव्हा कंठात प्राण उरलेला असा तो आचारी जमिनीवर पडला होता आणि त्याला पाहून स्वामींना दया आली. त्याच्याकडे कृपाकटाक्षाने पाहून त्याचे सर्वांगावर आपले कमंडलूतील पाणी शिंपडले व त्याचे सर्वांगावर मध लावला. त्याला मंडपाजवळ आणून कर्दळीचे पानावर निजवून तो चंद्रमौळी आम्रवनात

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

विप्रांजवळ आला आणि म्हणाला की, "भिऊ नका, तुमचे संकट टळले. स्वस्थपणे आकंठ जेवा आणि जे लागेल ते पदार्थ मागून घ्या." त्यांना आणखीन आनंदवीत तो कृपाराशी म्हणाला की, "आज तुम्हाला इच्छा भोजन द्यावयाचे आहे. जी इच्छा असेल तो पदार्थ मागा" याप्रमाणे श्री चिदंबर इच्छा भोजन देऊ लागला. ऋतुप्रमाणे अशक्य व मिळण्यास दुर्लभ असा पदार्थ कोणी मागितला, तर तो स्वसत्तेने निर्माण करून ताबडतोब आणून वाढत असे. तसेच दुसरे पंक्तीतही त्याने असेच केले. काय त्या प्रसादान्नाचे वर्णन करू? याप्रमाणे नेहमी संतर्पण होत होते. ऋत्विज व ब्राह्मण जेवून नामस्मरणाने गर्जना करीत होते. जेथे प्रत्यक्ष श्री भगवान पुरवीत होता त्या दिव्य अन्नाचे मी काय वर्णन करू. त्या अन्नाच्या सुवासाने बसंत त्याभोवती प्रदक्षिणा करीत होता. ऋषीगण रोज जेवत होते. परंतु त्यांना मुळीच वीट येत नव्हता. जसा चंद्रकांताचा पर्वत तसाच शुभ्र व निर्मळ असा भात होता. जसा सोन्याचा पर्वताचा पिवळा रंग असतो तसे वरान्न वरण वाढले. अमृतालाही उणीवपणा येईल असे पंचभक्ष परमान्न होते आणि विप्र जेवताना हरीस्मरणाने वारंवार गर्जना करीत होते. तूप, दूध आणि मध याप्रमाणे सर्व भाज्यांचा सुवास आकाशापर्यंत पोहोचला. जेथे श्री चिदंबर स्वत: पुरवीत होते तेथील गोडी काय वर्णन करू. इच्छाभोजन जेवून सर्व ब्राह्मण तृप्त झाले. त्यांना तांबूल व दक्षिणा देवून आदराने त्यांचे ठिकाणी पाठविले. त्या दिवशी पहिल्या पंक्तीत ऐंशी हजार ब्राह्मण जेवले. याशिवाय इतर अनेक लोक पूर्वीप्रमाणे जेवले. ऋत्विजही उपहार करून याग मंडपात आले आणि श्री चिदंबर चरणी वंदन करून त्यांना विचारले, "हे दयानिधे हे काय आश्चर्य आहे? या चित्रकार्याकरिता तुम्ही जागत असता हा आचारी दु:ख का भोगत आहे? पुरलेल्या बाळाला दाखविलेस, मेलेल्या कन्येस जिवंत केलेस, विधवेला सौभाग्य दिलेस तर मग याचे हे दुर्दैव कसे आहे?" याप्रमाणे ऋत्विजवाणी ऐकून तो सरस्वतीपती म्हणाला, "त्याचे पूर्वाख्यान तुम्हाला सांगतो ते चित्त देवून ऐका. याने एके दिवशी पूर्वी मला विनंती केली की, 'मी जिवंत आहे तोपर्यंत आपली सेवा करीन आणि शेवटी आपणाजवळ हा देह धरणीवर पडावा इतके सेवा-फल मला देऊन माझा हेतू पुरव आणि हे दयानिधी, शेवटी मला कैलासामध्ये स्थान द्या.' त्याला देहत्यागाची संधी आजच होती. पण शुभकामात अमंगल होऊ नये म्हणून मी शंकराला विनंती केली आणि त्याने दहा दिवस याला आयुष्य दिले. आजपासून अकरावे दिवशी हा प्रात:काली देह सोडून निश्चितच कैलासास जाईल.

या गोष्टीची तुम्ही शंका धरू नका. त्याच्या शरीराला कोणतीही व्यथा नाही आणि तो शिवस्मरणाचे आनंदात निमग्न आहे.'' याप्रमाणे ऋत्विजांना सांगून श्री गुरु मौनावले. स्वामींना वंदन करून ऋत्विज आनंदाने सायंप्रवर्ग्य आटोपून संध्येकरिता नदीवर गेले. स्वामींनी सुद्धा गाईचे दूध पिऊन आनंदित हृदयाने व सुखाने बसले व सर्वांना असा बोध केला की, ज्याने चित्तशुद्धी होते. प्रवर्ग्य म्हणजे योग्य विचार आणि विचाराने शरीर व मनाचे रूप प्रखर होते. तिसरे दिवशी दीक्षितेंद्राने तृतीय भूमिका सुंदर साधली ती निरहंकार रूप अशी होती. चौथी भूमी निष्पाप अशा अग्नीषोमीय विधानाची होती. अशा त्या चौथे दिवशी प्रात:काली ऋत्विज उठून नित्य कर्म आरंभण्याकरिता श्री गुरुंजवळ आले. तेव्हा दीक्षित सती सावित्री सकाळी ऋतुमती झाली होती आणि पंडितांनी शास्त्रार्थ पाहून म्हणाले, ''आता कार्यास आरंभ करू. कारण जेष्ठ सती सरस्वती जवळ असताना कार्यात काही विघ्न येत नाही. तरी अग्नीषोमीया करता आपण नि:संशय आज्ञा द्यावी.'' तेव्हा स्वामी म्हणाले, ''चार दिवस ब्राह्मण भोजन करा आणि पुढे पाचवे दिवशी अग्नीषोमीयास आरंभ करा.'' या स्वामींचे आज्ञेप्रमाणे चार दिवस दिवाकराने नाना पक्वान्ने करून मोठ्या आदराने चार दिवस ब्राह्मण भोजन केले. या चार दिवसात किती ब्राह्मण जेवले ते सांगतो. ते तीन लक्ष साठ हजार होते. मग अष्टमीला प्रात:काली ऋत्विज मंडपात आले आणि श्री गुरुपदी वंदन करून दोन्ही प्रवर्ग्य आटोपले मग प्रवर्ग्योत्सादन ताबडतोब अग्नी प्रणयन केले. त्यानंतर अग्निषोमीयास आरंभ केला. प्रकृती व पुरुष या दोघांना अग्नीषोमीय ही संज्ञा आहे आणि अहं ममत्वाचे योगाने त्याचा परिणाम म्हणजे ते दोघे अहंकाराकरिता पावले. अहंकाराने हे त्रिभुवन व्यापले आहे. म्हणून अहंकाराचा नाश केल्यास आपोआप मोक्ष लाभतो. त्या अहंकाराचा नाश करण्यासाठी अग्नीषोमीय हे अद्भुत कर्म आणि त्याचाच आरंभ झाला होता. तो चिदानंद यजमान वेदीजवळ येऊन बसला. मग हृदयतूप आणून ते वेदीपुढे घट्ट रोवले. मग त्या तुपात ऋत्विजानी अहं पशुस आणून बांधले. महामंत्राने मग विधीयुक्त सर्व संस्कार करून ऋत्विज आपले स्थानी स्थिर बसले. नंतर प्रबळ विचाररूपी पशुचे हनन करून श्वास निरोधाने प्राणायनयन केले. मग एकाग्र या तिक्ष्ण शस्त्राने वपा काढून ऋत्विजानी होम करताच सर्वांना अपार आनंद झाला आणि सर्व जण आपले सर्वकर्म विसरून यजमानाबरोबर बसले. याप्रमाणे आत्मसाक्षात्कार होऊन चौथी भूमिका साधली आणि पुढे सतत अभ्यास केल्यास पाचवी भूमी हाती येते. त्या आठवे दिवशी

शि व चि द म्ब र

दिवाकराने अपार असे ब्राह्मण संतर्पण केले. त्या दिवशी एक चमत्कार झाला. पंक्ती धरून ब्राह्मण बसले असताना दिवाकराने तद्क्षणीच चर्तुर्विधान्नाचे वाढप करवले आणि तूप वाढावयाचे बाकी होते. तेव्हा तुपाधिकारी श्री गुरुंना म्हणाले की, ''अर्धे पंक्तीस तूप पोहोचले आहे व आता मजकडील सर्व तूप संपले आहे. तेव्हा हे अनाथ माउली दयाळा, आता माझी पुढे गती काय ते सांग.'' तेव्हा श्री गुरु म्हणाले, ''तू मुळीच भिऊ नकोस. मलापहेतून यथेच्छ तूप घेऊन काम चालव.'' हे स्वामी वचनामृत सेवन करताच त्या तुपाधिकाराच्या चित्तात आनंद मावेना आणि सेवकांना घेऊन मलपहेस गेला. चिदंबराचे नावाची गर्जना करून सर्व घट पाण्याने पूर्ण भरून त्याचे लोणकढी तूप होऊन घमघमाट सुटला. असे तूप आणून ब्राह्मणांना यथेच्छ वाढले आणि त्या तुपाचे सेवन करताच विप्रांना वाटले की, आज तुपाचे ऐवजी अमृत वाढले आहे की काय आणि ते सर्व लोक पक्वान्न सोडून आवडीने तूपच खाऊ लागले आणि दिवाकर मधेमधे येऊन आदराने तूप वाढीत होता. ज्याचे स्वामींचे प्रसादाचे स्वादाने देवही मोहित होऊन भोजनाकरिता त्या द्विजांमध्ये बसले आणि घास घेऊन द्विजरूपाने तृप्त झाले. सर्व द्विज आकंठ जेवले तरी त्यांची तृप्ती होईना. त्या स्वादाच्या मोहात पडून पोटात जागा नसतानाही अजूनी जेवू इच्छित होते. तेव्हा सर्व द्विज म्हणाले की, ''मागे राजसूय यज्ञात द्रौपदी व कृष्ण वाढीत होते. त्या वेळची हकिकत ऐकली होती की तृप्त होऊनही द्विज पान सोडून उठत नसत. तसेच आज येथेच प्रत्यक्ष पाहिले. सर्व लोकांनी तेथील यज्ञाचा प्रसाद भक्षण करून रोग समुदाय जाळले व तत्क्षणी निरोगी झाले. प्रसादाच्या योगाने सर्वांची देहकांती सोन्यासारखी फाकत होती आणि ते निश्चितच आरोग्य पावले. त्या दिवशी चौऱ्याण्णव हजार आठशे ब्राह्मण आणि बाकीची संख्या पूर्वीप्रमाणेच भक्तिभावाने श्री प्रसाद घेऊन जेवले. स्वामींनी देखील गाईचे दूध पिऊन, आनंदित हृदयाने मंडपात बसले आणि श्रोत्यांना युक्तीने बोधामृत पाजू लागले. एक मुहूर्तानंतर सर्वांनी स्वामीस वंदन करून विश्रांतीकरिता त्यांची आज्ञा घेतली व स्वामीसुद्धा विश्रांतीकरिता कृष्णाजीनावर पडले. आता जीवनमुक्ती सुखाकरिता पंचपभूमिकेचे वैभव सोमयाग रुपकाने सांगतो ते ऐका. चतुर्थ भूमीत तदेकध्यान लागताच अन्य चिंतन विसरते आणि तिन्ही अवस्थेत आदराने आत्मचिंतन चालते. उठता-बसता-निजता जग खोटे आणि ब्रह्म सत्य असा विचार चालतो. याला सत्त्वापक्ती असे नाव आहे. आता सत्त्व परिपाक स्थिती त्याचे नाव अससक्ती असे आहे. नाव, रूप, आकार मनात न

शि व चि द म्ब र

आणता चिन्माप्रवृत्ती ही भावना होते. जोपर्यंत द्वैव दर्शन होते तेव्हा नामरूप नाश पाहून सर्वत्र चिन्मात्र अनुभवून अद्वयानंद आनंद भोगतो. प्रकृतीला उमा म्हणतात जिला चिदात्म्याने धरले आहे त्याचे नाव 'सोम' आहे आणि तो अहंवृत्तीने हृदयात वसतो. मी माझी अशी वृत्ती जेव्हा मनात उठते तेव्हा त्या वृत्तीला उलट करावी आणि तद्क्षणीच मी चिन्मात्र होतो. अशा विचारांना महर्षि लोक 'सोमयाग' म्हणतात. अहंवृत्तीला नाहीसे करून सर्वात्म भावाने साक्षित्व पहावे. आता सोमयाग विधान ऐका. प्रात:काली ऋत्विज उठून व स्नान करून मंडपात आले व सुत्याकर्मास आरंभ केला. ऋत्विजांनी सूत्र विधाने सुत्याकर्मे चालविली आणि सकळ होताच आकाशात मंद नाद उठले. 'मी पुढे, मी पुढे' असे म्हणून स्वर्गाहून देव धावू लागले. त्यांना राजारामादी महाभक्त प्रत्यक्ष पहात होते. शिल्लक असलेले सोमरस पान करताच ऋत्विजांचे मनात यागांची हौस भरून उच्च स्वराने मंत्र म्हणू लागले. नंतर सोमयाग करून आपापला भाग आपले भांडे घेऊन पिऊ लागले आणि उंच स्वराने प्रेष देऊ लागले. उद्गातृगण सुस्वराने चर्चा करून सामगायन करू लागले आणि होतृ गण आपापले भेदाप्रमाणे शास्त्रही गाऊ लागले. शास्त्रानंतर प्रदक्षिणा करून आपण स्वत:च ऐकेनासे झाले व मैत्रावरुण मधुर कंठाने प्रेष देऊ लागले. मग नंतर होत्याने याज्या म्हणून स्वत:च वषट क्रिया केली व त्यास अवदान घालून अध्वर्यू सोमयाग करू लागला. सोमरस पिऊन ऋत्विज माजले व उदयात्रू सामगान रस ऐकून सर्व लोक तुष्ट झाले. आदराने भोजनाकरिता बोलावले असता द्विजांचे मनास ते रूचले नाही आणि सामश्रवण सोडून आम्ही येणार नाही असे धीटपणाने म्हणाले. सोमरसाने तृप्त होऊन दैवत द्विजांबरोबर खेळत बसले. याप्रमाणे ऋत्विजांनी द्वितीय प्रात:काल घालवला. नंतर माध्यांन्ही ऋत्विजांनी सोमयायादि विधी आटोपून दक्षिण होम केला. आधी अत्रेय यांची पूजा केली मग श्री गुरुराय ऋत्विज पूजनाकरिता सदौमंडपात आला. सर्वांचे पाय धुवून डोक्यावर तीर्थ शिंपडले व नाना तऱ्हेची वस्त्राभरणे ऋत्विजांस समर्पण केली. नंतर दक्षिणेचे वेळेला स्वामींनी शंभर सालंकृत गायी आणवल्या व सूत्रोक्त विभागाने दक्षिणा म्हणून दिल्या. त्यानंतर स्वामींनी शास्त्री-पंडितांना चमसाध्वर, उपऋत्विजांना तसेच मंडपात असलेल्या ब्राह्मणांना भरपूर दक्षिणा दिली. जे जे हात पुढे करीत त्यांना तो सावित्रीपती द्रव्य देत असे आणि आपले दारिद्र्य निवारण झाले म्हणून सर्व ब्राह्मण मनात संतुष्ट झाले. याशिवाय अन्य लोकांना त्यांनी जी इच्छा केली ते त्या दीक्षितेंद्राने देऊन

सर्वांचे मनोरथ पूर्ण केले. त्या दक्षिणा समयास एक कली सोडून सर्वजण पूर्ण काम झाले. स्वामींची दानशक्ती पाहून देवही माना डोलावू लागले आणि म्हणू लागले की, ''याच्यासारखा दाता या भूलोकी मागेही कोणी पाहिला नाही. याचे यज्ञमंडपात कामाचा हनन करणारा असा शंकर याचेशिवाय कोणीही दिसत नाही. कारण सर्व कामे पूर्ण होतात.'' याप्रमाणे दक्षिणा विधी आटोपला. मग श्री गुरुंनी दिवाकराला आज्ञा केली की, ''आता द्विजांचे भोजनास सुरुवात कर. उशीर फार झाला आहे.'' स्वामीची आज्ञा ऐकून दिवाकराने वेगाने ब्राह्मणांना बोलावून आदराने भोजन करवले. नाना तऱ्हेने पक्वान्ने केली होती. त्या दिवशी नरनारी मिळून शहाण्णव हजार लोकांनी भोजन केले व पूर्वीप्रमाणेच नृप, सेवक, सैन्य व वाढपे यांचीही जेवणे झाली. ऋत्विजही उपहार करून सुंदर असे तृतीय सवन सत्वर पूर्ण केले. मग दीक्षितेंद्र चरणास वंदन करून सर्व ब्राह्मण आनंदाने आपापल्या घरी विश्रांतीला गेले. हृदयात ब्रह्मानंद भरलेला असा तो चिदंबर सुखाने बसला होता. ज्याने सोमयागामुळे अहंकार जाळून निर्विकल्प चित्सागर असा उरला होता. याप्रमाणे पंचमभूमिका पूर्ण होताच द्वैत मावळून केवळ एक पूर्णानंद सर्वात्मा उरला. आता तुम्हाला षष्ठीभूमी सांगतो की एकाग्र होऊन अवभृत रूपाने ऐका.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥


शि व चि द म्ब र

# अध्याय सदतिसावा

यज्ञा व भृथ वर्णन

।।श्री शिव चिदम्बराय नमः।।

।।श्री गणेशाय नमः।। हे पूर्णब्रह्मा हृदंबरी आनंदधामा चिदंबरा, पुरुषोत्तमा, तारकनामा तुला नमन असो. हे पूर्णकामा, सगुणरूपा, मेघःश्यामा तुला नमन असो. हे दीक्षितेंद्रा, सर्वोत्तमा, आम्हा अनाथांना तार. हे चारुगात्रा श्यामसुंदरा, श्री रामसख्या कामहरा, नामभजका, प्रेमदातारा, सोमशेखरा तुला नमन असो. हे विमल चरित्रा, कोमल हृदया, कमलनेत्रा, निर्मल काया उमासख्या, तू या भूतलावरील मल नाहीसा करण्यास ब्राह्मण कुळी अवतरलास. तुझे चरणी चित्त ठेवून तुझे चरित्र वर्णन करण्यास उद्युक्त झालो आहे. तरी तू माझे अंतःकरणात राहून सरस चरित्रवदन संकल्प साक्षित्वाने अहंकाराचा नाश होतो आणि अहंकाराचा नाश होताच अद्वयानंद असा आत्मा हृदयात विलसतो याप्रमाणे पाचवी भूमी हृदयात अभ्यासिताच जीवात्मा ब्रह्मानंदाने निष्काम होतो. क्वचित विक्षेपाचा संयोग होताच त्यामुळे चित्तात संकल्प उत्पन्न होतात. जेणेकरून आत्मा पुन्हा जीवरूप व्यवहारी असा होतो. जेव्हा जेव्हा व्यवहार दिसतो तेव्हा जिवाला दुःख अपार होते म्हणून व्यवहार नाशाकरिता वारंवार अभ्यास करावा. निरंतर अभ्यास केल्याने व्यवहार केव्हाही डोळ्यांसमोर येत नाही आणि नामरूप नाहीसे होताच नेहमी सर्व ठिकाणी चिन्मात्रच दिसते. त्यामुळे आत्म्याला जीवनमुक्ती सुख लाभते आणि सुरेख अशी षष्ठी भूमी साधते. त्यात विक्षेप मुळीच येत नाही. षष्ठीभूमिका प्राप्ती करता ज्ञान यज्ञात अवभृय सांगितला आहे. तेच तुम्हाला सांगतो, ते तुम्ही स्वस्थ चित्ताने ऐका. सूर्योदय होताच ऋत्विज आणि इतर ब्राह्मण अवभृत संभार घेऊन स्नानाकरिता नदीवर निघाले. जेव्हा श्री चिदंबर श्रद्धा व भक्ती या भार्यांसह उठला व अवभृत स्नानाकरिता सपरिवार चिद्गंगेस निघाला. तेव्हा आपले वैभवासह राजे लोकही स्नानास निघाले. त्या वेळी असे वाटले की, जणूकाही अष्ट दिशानाथ अवभृत स्नानाकरिता स्वामींबरोबर निघाले होते. अशा त्या स्नानयात्रेमध्ये रथी घोडदळ, गजदळ व पायदळ अलंकाराने सुशोभित होते. त्यांचे ध्वज लखलखत होते. जशी काही वीजच पाण्यात चमकत होती. सूर्य व चंद्राप्रमाणे छत्रे तळपत होती. कुंचे

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

चामरे झळकत होते. हत्ती महानादाने किंकाटत होते. त्यांचे दातावर हिरे जडवले होते व त्यांच्या कानात मोत्यांच्या माळा डुलत होत्या. रत्नजडित सुरेख पाखरा आणि पुढे घंटा गर्जत होत्या. आणि तो गजर ऐकून भक्त व उपासक श्री गुरुचे नामाने जयजयकार करीत होते. अतिशय चतुर व सुकुमार असलेले अतिरथ उद्‌भटवीर शस्त्रास्त्रधर रणपंडित असे शूर पुढे चालले होते. हत्तीवर बसून बंदीजन दीक्षित प्रताप वाखाणत होते. कनक वेत्रधारी पुढे धावून चालण्याकरिता वाट करीत होते. श्री स्वामींभोवती खूप राजे होते. अशा त्या वरिष्ठ श्री चिदंबराला पाहून सर्व कष्ट नाहीसे होतात. असा तो श्री चिदंबर अवभृत स्नानाकरिता निघाला. श्री स्वामींचे पाचही पुत्र मागोमाग चालत होते आणि श्री गुरुचे यश वर्णन करण्यात मग्न होते. सिद्धी वारांगना त्या वेळी नाना तऱ्हेचे नृत्य आरंभून नवीन तऱ्हेची वाद्य समुदाय वादक वाजवित होते. तूर्यतु-तूरा-टाळ-वीणा दुंदुभी-कहाल शंख ही वाद्ये देवलोकही आकाशात वाजवीत होते. गायक गायन करीत होते. देवगण फुलांचा वर्षाव करीत होते. सिद्धऋषी आदी स्वामींचे स्तवन करीत होते. वैराग्य विचारादी राजे आपल्या हाती स्वत:चे आयुध धरून स्वामींचे सभोवती राहिले आणि ते विकल्प जनांना निवारीत होते. शुंडादंडी शृंखक देऊन चारी दिशांना चौदंतावळ ठेवले. ते कोणास जवळ येऊन देत नव्हते. बोध दिवाकर सूत स्वामींवर शुभ्र छत्र धरून मागे मंद चालत जन दाटीचे निवारण करीत होता. कित्येक चामरे ढाळीत होते. कित्येक आपल्या हाती मोरचेल पंखा घेऊन प्रेमभावाने वारा घालीत होते आणि वेत्रधर ब्रीद वाखणत होते. तूर्यादी मंगल घोषाने पटहादी वाद्याने, वेदपाठ आणि जय घोषाने दाहीदिशा दुमदुमत होत्या. त्यांचे प्रतिध्वनी पर्वतात दुमदुमत होते. ज्या योगे कान बधीर होत होते आणि अशा आनंदाने चालत जनसमुदाय स्नानाकरिता नदी तटावर आला. कित्येक कौतुकाने श्री स्वामींवर खजूर, केळी व द्राक्षे उडवीत होते तर कित्येक लाह्या, सुवासिक फुले प्रेमाने उडवीत होते. तेल, तूप, दही, दूध व हळद-कुंकू आणि गंगोदक पुरुष वारांगनेस लावीत होते व त्याही पुरुषास लावत होत्या. इतर लोकही आपापसात हाच खेळ खेळत होते. याप्रमाणे विनोदाने खेळत नदीचे किनाऱ्यावर आले आणि वारुण याग होईपर्यंत सर्वांना नदीचे तटी बसविले. नुसत्या स्मरणाने जो तापहारक आहे असा तो श्री चिदंबर ऋत्विजासकट आपण पत्नीसह गंगेत प्रवेशला आणि वारुनेष्टी संपविली. गुडघ्याएवढ्या पाण्यात तो चंद्रमौळी स्नानाकरिता नदीत उतरताच राजे, ब्राह्मण व इतर लोक स्नानाकरिता उठले. आबाल वृद्ध,

शि व चि द म्ब र

नरनारी नदीस स्नान करण्याकरिता त्याचवेळी मोठ्या आनंदाने नदीत शिरले आणि श्री स्वामींचे बरोबरच सर्व लोकांनी स्नान करावे असा संकेत असल्याचे डांगोरे पिटून सर्वांना कळवले. श्री स्वामी स्नान करताच हत्तीवरचे निशाण पडेल हीच खूण समजावी आणि त्याचवेळी पाच तोफा उडतील आणि त्याच वेळी सर्वांनी स्नान करावे. नंतर श्री गुरुने हात जोडून गंगा स्तवन आरंभिले. ''जय गंगे त्रितापहारिणी, चंद्रचूड जटाजूट सदनी, जीवसोनी त्रिताप-शमनी तू त्रिगुण शक्ती संपादली आहेस. हे जाणून मी सर्व लोकांना घेऊन स्नानाकरिता आलो आहे. तरी सर्वांपुढे तुझे अगाध चरित्र प्रकट करून त्यांना पुनित कर.'' श्री स्वामींनी गंगा स्तुती करताच गंगेची लीला प्रकट झाली ती ऐका. जे आधी गुडघाभर पाणी होते ते तत्काळ बेंबीपर्यंत वाढले. कमी-अधिक कोठेच नव्हते. हा चमत्कार पाहून राजस्त्रियांना कौतुक वाटले व त्या स्नानाकरिता नदीत उतरल्या. आपल्या सख्याबरोबर प्रेमभावाने शृंगारादी जलक्रीडा वैभवाने एकमेकावर पाणी शिंपडत खेळू लागल्या. त्या भूपाळ वनिता शृंगारादी क्रीडा करीत असताना त्यांच्या पातळ वस्त्रातून त्यांची अंगकांती फाकत होती. अशा त्या राजस्त्रियांच्या लीला चालू असताना श्री स्वामी आपले जायांसह चित्गंगेत स्नान करण्याकरिता पुढे झाले. अद्वानंद जलात श्री गुरु स्नान करताना सर्व लोकांनी एकाच वेळी पाण्यात बुडी मारली. चिदाभास स्वरूपी मिळताच संकल्प गणांचा जसा लोप होतो किंवा ज्याप्रमाणे सूर्य उगवताच नक्षत्रांचा लोप होतो किंवा सूर्यास्त होताच पक्षी जसे लपतात. त्याप्रमाणे श्री गुरुंनी बुडी मारताच सर्व लोकांनी बुडी मारली. आकाशात विमानात असलेले देव म्हणाले की, ''हा काय चमत्कार आहे की श्री गुरु सर्व परिवारासह अदृश्य कसे झाले? जसे पाण्यात मीठ पडताच भिन्न भाव दिसत नाही, तसा चिदात्मा एक भाव पावताच द्वैत दिसत नाही. पाण्यात पाणी मिसळताच तत्काळ त्याची एकता होते. तसाच द्वैत भाव मावळत स्नान करून जेव्हा श्री स्वामी उठले तेव्हा सभोवती अफाट अशी लोकांची गर्दी दिसत होती. जशी कल्पांती ब्रह्मसृष्टी एकदमच उत्पन्न होते किंवा जागृती होताच संकल्प गण जसे चित्तात जागृती बरोबरच गर्दी करतात त्याप्रमाणे लोकांची गर्दी दिसत होती. स्नान करून आल्यावर अंग आर्द्र दिसत होते. जशी समाधी उतरताच आनंदभरीत कल्पना असते. सर्व संकल्प विरहित चिदात्मा स्वरूपात मिळताच शाश्वत अशी षष्ठी भूमिका त्या वेळी साधली. दुसऱ्याच्या उपदेशाने किंचित व्यवहार व त्यावर समाधी तत्पर अशी स्थिर अवस्था साधल्यास

षष्ठी भूमी पूर्ण झाली. जसे स्नान करून पाण्याबाहेर येताच अंगातून पाणी वाहते तसेच ज्ञानी लोकही व्यवहार करूनही क्षणोक्षणी समाधी तत्पर असतात. ही भूमिका साधल्यावर त्याला जीवनमुक्ती नवरी स्वत: येऊन वरते, कारण द्वैत बाहेर गेलेले असते. षष्ठी भूमिका पक्की झाल्यावर मग साधकांना अभ्यास नसतो. अन् त्याचा परीणाम म्हणून सप्तमी भूमी तुर्या अवस्था पावते. याप्रमाणे श्रीगुरु अवभृत स्नान करून किनाऱ्यावर येऊन शुद्ध वस्त्र नेसले. भस्म, चंदन आदी अलंकार ऋत्विजांसह लेवून सहपरिवार याग मंडपाकडे निघाले. याप्रमाणे श्री गुरु मंडपात येताच तेव्हा राजे लोकांसह दिवाकराने आहेर घेण्याची विनंती केली. तेव्हा श्री गुरु म्हणाले, "हे पुत्रा, तू आग्रह करू नकोस. प्रतिग्रह हा दुर्धर असतो. म्हणून या सत्कर्मात मी ते करू इच्छित नाही." तेव्हा दिवाकर म्हणाला, "असे हे थोर यज्ञकर्म आरंभिले असता श्रुतीने सांगितलेला अहेर मात्र अवश्य घेतला पाहिजे." अहेराचा निर्बंध जाणून तो आनंदकंद म्हणाला, "जरी शुद्ध अहेर म्हणतोस तरी त्याला मुहूर्त मात्र अवश्यक आहे." हे स्वामी वचन ऐकून गाव, जमीन, देश देण्याकरिता राजे लोक मी पुढे पुढे करीत पत्रिका घेऊन आले. हाती पत्रिका असलेल्या लोकांची दाटी पाहून तो जगज्जेठी बोलला की, "हे राजे शेवटी येऊ द्या. आधी गरिबांना बोलवा." हे स्वामी वचन ऐकून दिवाकर मनात खिन्न होऊन अहेराकरिता ब्राह्मणांना त्याने बोलाविले. तेव्हा संतोषाने ते ब्राह्मण चहूकडून धावू लागले व एक-दोन रुपये आपले शक्तीप्रमाणे देणाऱ्यांची मंडपात गर्दी झाली मग राजे लोक आले मग श्री चिदंबर म्हणाले की, "आता अहेराची वेळ संपली आहे, मी घेणार नाही." हे स्वामीवचन ऐकून सर्व राजेलोकांनी प्रार्थना केली की, "यावेळी आमची काही तरी सेवा घ्यावी." तेव्हा तो कृपाधनी म्हणाला, "काही चिंता करू नका. तुमचे सर्व राज्यच माझे आहे." याप्रमाणे श्री गुरुंनी सर्वांचे सांत्वन करून बाकी राहिलेले सर्व काम संपविले व ते ईश्वरार्पण केले. यज्ञाची सांगता होण्याकरिता ब्राह्मण भोजनाचा संकल्प करून श्री चिदंबर पाकशाळेत आले. तिकडे अहेराची संख्या मोजली असता एक लक्ष पन्नास हजार तीनशे इतकी झाली. इकडे नाना विविध पक्वान्नाने सुप्रसन्न मनाने द्विजाराधना केली. अपूप भक्ष्य आणि परामान्न द्विजांना अर्पण केली. पन्हे आणि दूध, साखर, वेलदोडे व वाळा वगैरे घालून शुद्ध केले होते आणि असे हे सुस्वादित पेय समर्पून त्या पूर्णानंदाने सर्व द्विजांना तोषविले. मग तांबूल आणि दक्षिणा देऊन त्या दीक्षितमणीने ब्राह्मणांना बोळविले. नंतर नृपादिकांना जेववून आपण स्वत: भोजनास गेला.

त्या दिवशी प्रथम पंक्तीत शहाण्णव हजार ब्राह्मण जेवले आणि पूर्वीप्रमाणेच बाकीची संख्या होती शिवाय नागरिक लोकही होते. यागाचे आरंभापासून समाप्तीपर्यंत एकंदर ब्राह्मण संख्या आठ लक्ष एकतीस हजार पाचशे इतकी होती. अवभृत दिवसापर्यंत सैनिकादी अन्य लोक वीस लक्ष होते आणि बाकीचे लोक एक लक्ष सोळा हजार होते. इतके लोक जेवले तरी श्रीगुरु त्या वेळी म्हणाले, ''ज्योतीष्टोमासम आजपर्यंत अन्नदान झाले नाही. हे दिवाकरा, याकरिताच मी तुला पूर्वी सांगितले होते की यज्ञ करू नकोस. माझे वचन अव्हेरून बाळ स्वभावाने तू यज्ञास सुरुवात केली.'' जो सर्व जीवांचे रक्षण करतो त्या विश्वंभराचे मनात कितीही लोक जेवले तरी विशेष काही वाटेना. मुळात नि:संग असून बाहेरून माणसाचेच सोंग श्री स्वामी दाखवत होते आणि मूळ जो अकर्ता आहे त्याने लौकीकार्थ कर्माचार दाखवला. यज्ञभोक्ता आपण स्वत: असून बाहेरुन यज्ञाचे आचरण दाखविले याचे मानव बुद्धीने कोठवर वर्णन करावे? ब्रह्मादिकही ज्याचे वर्णन करताना थकले आणि मौन धरून राहिले तेव्हा या अल्पमती मानव लोकांत कोण वर्णन करू शकेल. ज्ञान यज्ञात जो निरंतर वसतो. त्याने लौकिकार्थ कर्म यज्ञ दाखविला. त्यामुळे त्रिजगात त्याची कीर्ती पसरली. मग श्री गुरुने ते भोजन करून ते ताबडतोब नदीतीरावर आले. आंब्याच्या छायेत ब्राह्मण बसलेले होते. ते स्वामींच्या दर्शनाकरिता आले. राजेलोकही दर्शनाकरिता नदीवर आले. श्री स्वामी सर्वांना आनंदवीत आदराने त्यांना आपलेजवळ बसविले आणि सुमंद हसत म्हणाले की, ''आपण फार श्रमित झाला आहात. कारण माझ्याकरिता आपण यज्ञात खूप कष्ट केलेत. राजे लोकांनाही जो योग अवघड आहे, तो तुमच्या थोर मदतीने या गरिबास सोपा झाला आणि निर्विघ्नपणे सिद्धीस गेला.'' हे श्री गुरुंचे वचन ऐकून राजेलोकांनी त्यांचे चरणी वंदन केले व म्हणाले, ''हे दयाघना, देवराया मोहक वचन का बोलतोस. तूच पार्वतीनाथ आहेस आणि नररूपाने अवतरला आहेस हे निश्चितच आणि एका क्षणातच जीवनात सहज उत्पन्न करतोस आणि पाळतोस. मनुष्याने जरी यज्ञ केला तरी त्याने चित्त शुद्धी होते आणि शुद्ध चित्त तोच धर्म जाणता आहे आणि तेथेच दान निवास करते. जेथे दान आहे तेथे नारायण आणि नारायणाजवळ इंदिरा असते आणि जेथे इंदिरा असते तेथे पूर्ण सुख असते आणि सुखामधे आनंद भरलेला असतो. जेथे आनंद तेथे सत्पुरुष व त्याचे ठायी विशेष अशी शांती असते आणि शांतीमध्ये निवृत्ती वास असतो. निवृत्तीत अभेद विलसतो. अभेद तेथे ब्रह्मानंद मूर्ती आणि तूच चिदानंद

असून तू स्वत:च यज्ञकर्ता असल्यामुळे त्यात न्यून काय असेल? अशा तुला शंकराला मनुष्याची मदत कशी? ब्रह्मांड रचनेचा खेळ खेळवतोस आणि हे लीला नाटकी पुरुषोत्तमा, हे देवराया, लौकिक वचन विडंबना हे देवराया, कशाला दाखवितोस? हे दयाघना, जगद्गुरुचे पुढे आमचे काही प्रश्न आहेत. स्वहितार्थ आम्ही तुझे पायी शरण आलो. जर आमचेवर दया दाखवीत असशील तर आम्ही एक विनंती करतो.'' तेव्हा श्री चिदंबर म्हणाले, असे काय तुमचे थोर प्रश्न आहेत ते विचारावेत. मी यथामती तुम्हाला सांगीन. आपण नि:संशय दयापात्र आहात. हे श्री गुरुवचन ऐकून सर्व राजेलोकांनी आनंदाने त्यांचे पायास वंदन करून प्रश्न केला.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

# अध्याय अडतिसावा

शि व चि द म्ब र

## कायिक यज्ञ वर्णन

।।श्री गणेशाय नमः।। ।। श्री चिदम्बराय नमः।। ज्याचेकरिता यज्ञ करतात व ज्याला सिद्ध ऋषी भजतात त्या श्री चिदंबराचे कथास्फूर्ती होण्याकरिता स्मरण करू राजेलोकांनी श्री चिदंबराला विचारले, यज्ञ विधी किती प्रकारचा आहे ते कृपा करून हे स्वामीराया, या वेळी आम्हास सांगावे. तसेच यज्ञ केले असता त्याचे फळ काय? आणि जो आपण दिव्य यज्ञ केला की, जो या कलीयुगात राजेलोकही करू शकत नाहीत याचे फळ काय? गोरगरिबांना जो सोपा असेल तो यज्ञ आम्हाला देवराया, या वेळी सांगावा यामुळे निश्चित मोक्ष सुलभ होईल. सर्वांना करण्यास सोपा असेल असा यज्ञ आम्हाला सांगावा. हे कृपानिधी या वेळी आमची इतकीच आपल्या पायाशी विनंती आहे.'' राजेलोकांचे प्रश्न ऐकून श्रीगुरु हसून म्हणाले, ''मी तुम्हाला यज्ञ विधान सांगतो. जो सुलभ साधनाने होऊ शकेल. हा जो विस्तृत यज्ञ झाला तो कर्मनिष्ठास उगीचच आहे. आणि श्रुती सांगतात की होमाने स्वर्ग मिळतो. यज्ञाचे स्वरूप आणि त्याचा विधी मी तुम्हाला आधी स्पष्ट सांगतो. तो एकाग्र बुद्धीने ऐका. ज्या योगे तुमच्या मनात संशय राहणार नाही. स्वर्गाची इच्छा असणाऱ्या पुरुषाने यज्ञ करावा असे जो म्हणतो तो कर्मठ आणि मंदगती जाणावा. यज्ञ हा सर्वगत आहे. ज्ञानी असो वा कर्मी असो किंवा चतुराश्रमी असो, या सर्वांनी निष्कामी होऊन यज्ञ करावा व त्याचा अधिकार चारी वर्णांना आहे. ज्याचे पायात प्रपंच बेडी आहे, त्याची द्रव्याची आवड केव्हाही सुटणार नाही. द्रव्याच्या आशेने तो अधर्म जोडतो आणि अधर्म्याला जन्ममरण केव्हाही चुकत नाही. याकरिता श्रुतीमाउलीने द्रव्याची आशा सोडविण्याकरिता सांगितले की, 'यज्ञाने स्वर्ग लाभते व अक्षय सुख मिळते. परलोक सुखावर चित्त ठेवून कर्मठ लोक द्रव्याचा खर्च करतात. यज्ञ पुण्याने अंतःकरण शुद्ध होते. तरीही द्रव्येच्छा नाहीशी होत नाही आणि द्रव्य वासना गेल्यावर अखंड देवास भजू लागतो. त्याने मोक्ष मार्ग अनायासे जिवाला लाभतो.' चित्त शुद्धी करता श्रुतीमध्ये विस्तारपूर्वक यज्ञ सांगितला आहे. परंतु तो महाफल न दाखविल्यामुळे कोणीही करीत नाही. लोकांची प्रवृत्ती होण्याकरिता श्रुती माया फळ दाखवित असते. मोक्ष मार्ग साधण्याकरिता आधी कर्म मार्ग (श्री शिव चिदंबराय नमः) साधला पाहिजे. यज्ञ स्वरूपात पाहता चारी वर्णांना

शि व चि द म्ब र

अधिकार आहे. तरी आता यज्ञ शब्दाचा अर्थ सांगतो तो ऐकताच चित्त शांत होते. यज्ञोवैविष्णू असे श्रुतीमध्ये प्रमाण आहे. जो व्यापक असा चिदात्मा विलसतो, त्याला विष्णू असे नाव आहे. याकरिता जगदीशाची आराधना हाच मुख्य यज्ञ आहे की ज्या योगे निश्चित अक्षीण असे स्वर्गफळ मिळते. असा यज्ञामध्ये मुख्य यज्ञ हा कर्मयज्ञ आहे आणि ज्याचे आचरण करताच चित्तशुद्धी होऊन भक्ती पंथाला लागतात आणि प्रेमाने महेशाचे आराधनात मग्न होतात. शिवाराधनेने अहेतुक भक्ती केल्यास कर्मबंध तुटतात व मग शिवानुग्रहाने सहज मुक्ती जीवाला मिळते. भगवंत भक्तीशिवाय कर्माचरण निरर्थक आहे. याकरता रोज शिवाकरिता सत्कर्म करीत असावे. निरिच्छेने जे जे कर्म होईल त्यामुळे निश्चित शिवप्रीती होते आणि भगवंताला प्रिय असलेल्या कर्मास शास्त्रात 'यज्ञ' असे नाव आहे. यज्ञाचे दोन भाग आहेत. एक कर्मयज्ञ आणि दुसरा ज्ञानयज्ञ. हे दोन्ही यज्ञ यथासांग आचरावे. कर्मयज्ञाने चित्तशुद्धी होते आणि ज्ञानयज्ञाने अखंड निजानंदाचा लाभ होतो व जीवनमुक्ती मिळते. आपले वर्णाश्रम धर्माने तप करून शिवाराधना करावी याने चित्तशुद्धी होते. आणि यालाच कर्मयज्ञ म्हणतात. याप्रमाणे प्रात:काळी स्नान वेदपाठ नित्य कर्मानुष्ठान भक्तीने अन्नदान शिवाराधना व तीर्थयात्रा अशा सत्कर्माला 'कर्मयज्ञ' असे नाव आहे. असे महाऋषींनी स्मृतीत सांगितले आहे. हा जो कर्मयज्ञ सांगितला आहे तो गरीब आणि श्रीमंत दोघांनीही करावयास सोपा आहे आणि थोड्या कष्टात त्याचे महत्फळ आहे. आता विस्तारून तुम्हाला ज्ञानयज्ञ सांगतो तो ऐका. काया, वाचा आणि मन या तीन प्रकारांनी वेगवेगळ्या मोठ्या भक्तीने शिवाची आराधना करावी. याचे नाव 'ज्ञानयज्ञ' होय आणि हे श्रुती व शास्त्रात प्रसिद्ध आहे. जन्म फेरी चुकवण्याकरिता तुम्हाला कायिक यज्ञ सांगतो. तो तुम्ही मोठ्या आदराने संपूर्ण ऐका. हे नृपांनो, देहाभिमान गेल्यास जीव मुक्त होतो आणि देहाभिमानाने बांधून भ्रमाने जीव बद्ध होतो. याकरिता आधी गुरुंचा आश्रय घ्यावा. जो युक्तीने संशय नाहीसा करतो आणि अनायसे शिष्यास मोक्षपदी बसवितो. ब्रह्मानुभवाने जो तृप्त आहे, जो सर्व शास्त्रार्थ जाणणारा आहे, असा गुणी सद्गुरुनाथ शोधून त्याला शरण जांवे आणि अहोरात्र आपला देह त्याचे पायी सेवा करण्याकरिता लावावा. थंड पाण्याने प्रात:स्नान करावे व सर्वांगाला भस्म लावावे आणि कपाळावर त्रिपुंड्र धारण करावे आणि शिवाप्रीत्यर्थ भाव धरून गुरुंना शिवासारखेच मानून अनन्यभावे त्यांचे पाय धरावे. डोक्यावर, गळ्यात, हृदयावर, हातात, कानात, भुजेत, शेंडीत आणि दोन्ही डोळ्यात भक्तिभावाने रुद्राक्ष धारण करावे.

शिवचिन्हाने युक्त असा हा देह शिवाचाच आहे असे समजून देहात अहंपणा किंचितही नाही असे मानावे. मनात निश्चय करून देहबुद्धी दूर करावी आणि विक्षेपाने मन विषयावर जाताच देहाला जाऊ देवू नये. जेथे जेथे मन जाईल तेथून त्याला मागे फिरवून मनात असा विचार करावा की मला देह नसल्याने मी विषयाचा भोग कसा घेवू. हा देह सुदृढ असेल तर तो परोपकारी झिजवावा आणि स्वार्थी विषयी मूर्खपणा पत्करून अभिमानाचा नाश करावा. गुरु शुश्रुपणाकरिता जे काही कर्म घडेल त्याने आपले हित किंवा अहित होईल असा विकल्प मनात आणू नये. लाकडी बाहुलीप्रमाणे हा देह आहे आणि सूत्रधार महादेव आहे. ज्याचे आधाराने हा देह नाचतो त्या कूटस्थाला जाणले पाहिजे. जसा तो सर्वेश्वर नाचवेल तसा हा परतंत्र देह निश्चितच नाचतो. हे सूत्र बाहुलीच्या खेळाप्रमाणेच होय. विचार करून पाहिल्यास येथे माझे काय कर्तृत्व आहे. या जड देहावर शिवाचीच सत्ता आहे असे जाणवेल. हा देह नश्वर जाणून देहात ज्याची वस्ती आहे, तो परमेश्वर म्हणजेच जीव हा पूर्ण चिदानंद सर्वत्र आहे. देहात आपण नाही आणि देहाला आपण कोणीही नाही असा हृदयात निश्चय करून त्यातील अहंपणा नाहीसा करावा. मुख्य एक परमेश्वर व सर्व जगभर असलेली दुसरी प्रकृती आणि तिसरा आपण चोर मध्ये कशाकरिता आणला आहे? अशा नाना युक्त्या करून देह अहंकार नाहीसा करावा. यालाच कायिक यज्ञ असे म्हणतात. ज्या योगे देहातील ईश्वर भेटतो. अशा मुख्य यज्ञाचे आचरण करताच जन्म-मृत्यू इ. बाधा होत नाही आणि सर्व चिंता नाहीशी होऊन जीवनमुक्त दशा प्राप्त होते. यालाच 'अक्षय स्वर्ग' असे नाव आहे. याप्रमाणे कायिक यज्ञ सांगितला. जो आचारताच मोक्ष लाभतो आता तुम्हाला वाचिक यज्ञ सांगतो तो आदराने ऐका.'' तेव्हा राजेलोकांनी वंदन करून विचारले की, ''आपण ज्ञानयज्ञ येथे सांगता आणि भस्म रुद्राक्ष धारण करण्यासही सांगितले. सर्व पदार्थ सोडून साधकांना भस्म रुद्राक्ष काय म्हणून धारण करण्यास सांगितले, ते आम्हास सांगावे. भस्म आणि रुद्राक्ष महिमा ऐकण्याकरिता आम्हाला फार उत्कंठा लागली आहे. याकरिता दोन्हीचे माहात्म्य विस्तारून आम्हास सांगावे.'' अशी प्रार्थना करून नृपसमुदायाने स्वामींपुढे नमस्कार केला. ही नृपांची प्रेमभक्ती पाहून तो सावित्रीपती म्हणाला, ''मी तुम्हाला त्याचे माहात्म्य सांगतो.'' असे सांगून श्रीगुरु रुद्राक्षांचा थोर महिमा सांगण्यास सादर होऊन बसले. रुद्राक्ष महिमा ऐकताच मनात शिवभक्ती लगेच सहज लाभते.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||

# अध्याय एकोणचाळिसावा

रुद्राक्ष महिमा आणि गाढवाला शिवलोक प्राप्ती

|| श्री गणेशाय नमः || || श्री शिव चिदम्बराय नमः || जो एकच अद्वितीय असा भक्तांना कल्पतरू आहे व श्रुतीही हेच सांगतात त्या गुरुदेवाचे आता स्मरण करू. आता श्रीगुरु नृपांना रुद्राक्ष महिमा सांगतील तो आदराने ऐका. श्रीगुरु नृपांना म्हणाले की, ''रुद्राक्ष महिमा काय विचारता? त्याचे महत्त्व श्रुती पुराणात आणि व्यास मुनींनी दहाही पुराणात विस्तारून वर्णन केलेले आहे. ते या वेळी तुम्हास मी थोडक्यात सांगतो जे निळकंठाचे भूषण आहे. त्याचे वर्णन कोण करील? तरी मी तुम्हाला यथामती सांगतो ते ऐका. तुम्ही जसा प्रश्न केला तसाच पूर्वी रुद्राक्षाविषयी स्कंदाने श्री शिवाला केला होता. तेव्हा शिवाने स्कंदास जे सांगितले तेच मी तुम्हाला सांगतो. शिवाने षण्मुखास सांगितले की, ''आधी भस्म धारण करावे आणि मग रुद्राक्ष भूषण ल्यावे. यामुळे मोक्ष साधन होते. रुद्राक्ष धारणाचा नियम शास्त्राप्रमाणे तुम्हाला सांगतो. गळ्यात उत्तम रुद्राक्ष धारण करावे. वीस अथवा चाळीस मस्तकी बांधावे. दोन्ही कानास सहा सहा बांधावेत. मनगटात बारा बांधावेत आणि बांहूत सोळा तसेच प्रत्येक डोळ्यास एक एक रुद्राक्ष धारण करावा आणि शेंडीत एक बांधावा. हृदयावर एकशे आठ रुद्राक्ष धारण करावेत आणि असे जो करेल तो प्रत्यक्ष निळकंठ जाणावा. सोन्याने किंवा चांदीने रुद्राक्ष बांधून शुद्ध मनाने धारण करताच त्यायोगे शिव प्रसन्न होतो. उच्च स्वराने मंत्र उच्चारून निष्काम भक्तीने जो सर्व ठिकाणी रुद्राक्ष धारण करतो तो शिवप्रीतीस प्राप्त होतो अथवा पंचाक्षरी म्हणून जो सांगितलेले ठिकाणी रुद्राक्ष धारण करतो तो कैलास सदनी जाऊन बसतो आणि शिवास अत्यंत आवडतो. शिवज्ञान होण्याचे मुख्य कारण रुद्राक्ष धारणच आहे. ज्यांचे शेंडीत रुद्राक्ष भूषण आहे त्याला तारक तत्त्व असते. दोन्ही कानाचे ठिकाणी रुद्राक्ष धारण केल्यास शिव आणि शक्ती या दोघांचाही तेथे वास असतो. जानव्यात चोपन्न रुद्राक्ष घालताच चतुर्वेद तेथे आनंदाने राहतात. तसेच कंठात देवी सरस्वती व अग्नी वास करतो. याप्रमाणे प्रत्येक स्थानी देवांचा वास असतो, असा भाव अंतःकरणात धरून सतत असावे. चारी वर्ण व चारी आश्रम रुद्राक्ष धारणास अधिकारी आहेत. परंतु मंत्रासह धारणेचा अधिकार फक्त ब्राह्मणांना आहेत.



शिव चिदम्बर

शूद्रादिकांनी मंत्रविरहित रुद्राक्ष धारण करावेत. रुद्राक्ष धारण केल्याने तो धारण करणारा स्वत: रुद्र होतो आणि त्याच्या सर्व पापांचा नाश होतो. निषिद्ध वस्तू पाहता ऐकता किंवा स्मरता जे पाप घडते त्याचा रुद्राक्ष धारणाने नाश होतो. जशी कापसाची रास अग्नीमुळे भस्म होते तशी रुद्राक्ष धारणाने सर्व पातक एका क्षणात नाहीसे होते. रुद्राक्ष धारण करणारा पुरुष जे अन्न भक्षण करतो ते महेशास पोहोचते, असे श्रुती वचन आहे. ज्या ज्या विषयांचे रुद्राक्षधारी पुरुष सेवन करतो ते स्वत: साक्षात शंकर सेवन करतो म्हणून भक्तिभावाने अन्न वगैरे रुद्राक्षधारी पुरुषास समर्पण करावे. रुद्राक्ष धारण करण्याची ज्याला लाज वाटते त्याने कितीही कोटी जन्म घेतले तरी मोक्ष मिळणार नाही. रुद्राक्ष धारण करणाऱ्यास पाहून जो निंदा करतो, निश्चित त्याची उत्पत्ती संकटाने झालेली आहे असे समजावे. पूर्वी रुद्राक्ष धारण करताच रुद्राला रुद्रता लाभली म्हणून विष्णू ब्रह्मादि देवांनाही हा रुद्राक्ष वंद्य आहे. सिद्ध ऋषी मुनीश्वर जे जे मागे थोर पदास पोहोचले त्या सर्वांचे मुख्य कारण म्हणजे रुद्राक्ष धारण होय. रुद्राक्ष धारणासारखी श्रेष्ठ गोष्ट दुसरी पाहिली नाही आणि मोक्ष साधनाकरिता यापुढे सर्व गोष्टी निकृष्ट होत. रुद्राक्ष धारण करणाऱ्या नरास जो अन्न, वस्त्र व धन देतो त्याचे सर्व पाप जळून निश्चितच तो कैलासवासी होतो. रुद्राक्ष धारण करणाऱ्याचे ठिकाणी भाव धरून श्राद्धाकरिता त्याला निमंत्रण द्यावे आणि आदराने त्याची सेवा करता सर्व पितर तृप्त होतात आणि अशा रितीने पितृगण तृप्त होताच त्याला पितृ-लोकाची प्राप्ती होते असे शिवाने स्कंदाला सांगितले. रुद्राक्षधारकाचे पाय धुऊन ते तीर्थ भक्तीने व आनंदाने प्राशन जो करतो त्याचे सर्व पातक यज्ञात नाहीसे होते आणि जोपर्यंत सूर्य, चंद्र आहेत तोपर्यंत त्याला कैलास लोक मिळतो. हार किंवा कडे सोन्याचे करून रुद्राक्षासहित जो वापरेल त्याला रुद्रपदाची प्राप्ती होते किंवा केवळ कौतुकाने रुद्राक्ष धरला. मंत्र असो वा नसो तो ज्ञानमूर्ती जाणावा. भावाने किंवा भावारहित पुरुषाने रुद्राक्ष जरी हाती धरला तर त्याला पाहून यमदूतही चळाचळा कापतील. लाजेने, भयाने किंवा विनोदाने जो रुद्राक्ष धारण करतो त्याचे सर्व पाप नाहीसे होऊन त्याला शिवाचे ज्ञान प्राप्त होते. हे षण्मुखा, फार काय सांगावे. माझे पाचही मुखाने रुद्राक्ष महिमा वर्णन करता येत नाही. याकरिता प्रयत्नपूर्वक रुद्राक्ष धारण करावे. कारण रुद्राक्ष महिमा अलौकिक आहे. त्याचे सविस्तर वर्णन कोण करू शकेल? देवामध्ये सर्वोत्तम असा सच्चिदानंद परब्रह्म असा आहे. तसेच त्रिभुवनात रुद्राक्ष हा सर्वोत्तम असा आहे. मोक्ष


शिव चिदम्बर

देण्याकरिता गंगा, विष्णू आणि उमाकांत हे समर्थ आहे,'' असे शिवाचे वचन ऐकून षडाननाने संतोषून शंकराला प्रश्न केला, ''हे दयाळा, सदाशिवा, याप्रमाणे तुम्ही रुद्राक्षाचे माहात्म्य वर्णन करता की हा सर्वोत्तम आहे म्हणून. परंतु हे देवा, रुद्राक्षाला एवढे महत्त्व देण्याचे कारण काय? हे सांगून हे समर्था माझा आशय पूर्ण कर.'' याप्रमाणे आपल्या मुलाचा प्रश्न ऐकून तो सर्पभूषण संतोषला व आपल्या पुत्राला म्हणाला की, ''रुद्राक्षाची उत्पत्ती ऐक. तुला मी सविस्तर सांगतो की, ज्या योगे रुद्राक्षाचा महिमा थोर झाला व महापुरुषाची बुद्धि त्याचे ठायी पूज्य झाली. पूर्वी त्रिपुर नावाचा दैत्य होता. त्याने ब्रह्मा, विष्णू आदी देवांना फार पीडा दिली. कित्येकांना जीवे मारले. कित्येकांच्या स्त्रिया क्षोभविल्या आणि कित्येकांचे वैभव हरण करून देशोधडीस लावले. असा आकांत झाला असता देवांना कोणी त्राता मिळेना आणि सर्व जण माझे जवळ कैलासी आले. सर्व देवांनी माझी विनवणी केल्यामुळे माझ्या मनात दया उपजली आणि त्रिपुराचा संहार करण्याकरिता माझ्या मनात प्रचंड क्रोध उत्पन्न झाला आणि मग मी एकांती अघोरास्त्राचे चिंतन करीत बसलो. सर्व देवमय असलेले हे महाशस्त्र ज्याचे अघोर असे सुंदर नाव आहे परंतु वैऱ्यांना फार घोर वाटावे असे देदीप्यमान व दुर्धर होते. त्रिपुर संहाराकरिता, सर्व देवांचे रक्षण करण्याकरिता व सर्व विघ्ने निवारण करण्याकरिता अघोरास्त्रच पाहिजे. एकाग्र होऊन एकांती बसून देवतांची हजारो वर्षे लोटली. तोपर्यंत मी डोळे झाकलेले होते. तेव्हा माझे व्याकूळ डोळ्यांतून भूलोकावर जलबिंदू पडले आणि त्यापासून महारुद्राची झाडे उत्पन्न झाली. मग माझ्या आज्ञेने सर्वांचे हिताकरिता हे स्कंद अडतीस भेदाने रुद्राक्ष प्रसिद्ध झाले. सूर्य नेत्रापासून बारा तऱ्हेचे कपिल वर्णाचे रुद्राक्ष उत्पन्न झाले. चंद्राचे नेत्रापासून श्वेत वर्णाचे सोळा तऱ्हेचे रुद्राक्ष उत्पन्न झाले. अग्नीचे नेत्रापासून दहा प्रकारचे असित वर्णाचे उत्पन्न झाले. याप्रमाणे रुद्राक्षाचे अडतीस प्रकार आहेत. आता याच्या जाती ऐक. श्वेत वर्णाला 'ब्राह्मण' म्हणतात आणि तांबड्या वर्णाला 'क्षत्रिय' म्हणतात. मिश्र वर्णाला 'वैश्य' व काळ्या वर्णाला 'शूद्र' म्हणतात. 'एकमुखी' जो रुद्राक्ष असतो तो 'कैलास नायक'च आहे असे समजावे. तो धारण केला असता ब्रह्महत्येचे पातक जळते. 'द्वीमुखी' गौरीशंकर जाणावा. तो दोन्ही तऱ्हेने पातकांचा नाश करतो. 'त्रिमुखी' अग्नीरुपी जाणावा. त्याच्यायोगे स्त्रीहत्या पापाचा नाश होतो. 'चतुर्मुख' ब्रह्मदेव जाणावा. तो धारण केल्यास नरहत्येचे पातक नाहीसे होते व तो पुरुष पुण्यमूर्ती होतो. 'पंचमुखी' रुद्राक्षास 'कालाग्नी रुद्र' असे

नाव आहे. त्याच्यामुळे अगम्य गमनादी पापांचा संहार होतो. अभक्ष्य भक्षण आदी करून पापांचा नाश करणारा समर्थ सेनानी पंचमुखी तो मीच आहे आणि सहापासून चतुर्दश मुखापर्यंत या धरणीवर एकाहून एक श्रेष्ठ असे रुद्राक्ष आहेत. चौदामुखी रुद्राक्ष जर मिळेल तर तो भक्तीनें मस्तकी धरावा आणि त्यामुळे त्याचा देह शिवाचाच जाणावा. हे वत्सा, वारंवार आता मी तुला काय सांगू? रुद्राक्ष धारण करणाऱ्यास सर्व देव माझे सारखेच मानतात. प्राणीमात्रांना रुद्राक्ष धारणाने निश्चितच सद्‌गती मिळते याचा विश्वास वाटावा म्हणून तुला मी एक गोष्ट सांगतो. नेपाळ देशाचा एक व्यापारी होता. तो अत्यंत दुराचारी होता. तो गाढवावर रुद्राक्ष वाहून त्याचे विक्रीसाठी संचार करीत असे. काही काळानंतर गाढव अगदी दुबळे झाले आणि त्याला भार सहन होत नसे. एकदा घोर वनात तो मार्गात पडला आणि एक मुहूर्त तडफडून त्या गाढवाने प्राण सोडला. तेव्हा तेथे माझे दूत येऊन त्याला त्यांनी विमानात बसविले व माझेकडे आणले. मी मोठ्या प्रीतीने प्रथम पंक्तीत त्याला स्थान दिले. पहा, अजूनही तो माझी सेवा करीत आहे. आणखी तुला एक गोष्ट सांगतो. ती ऐकताच हे षडानना, रुद्राक्ष धारण करण्याविषयी तुझा उत्कट विश्वास बसेल. नंदापुरी एक वेश्या होती आणि लोकांत ती पतिव्रता म्हणून मिरवीत होती आणि नेहमी ती परोपरीने दान करीत असे. तिचा नाट्यमंडप रत्नखचित असा होता. ती वेश्या अत्यंत तरुण व लावण्यवती होती. तिने विनोदाने नाट्यमंडपात एक कोंबडा व एक माकड बांधले होते. दरवर्षी ती अधिका अधिक शिवभक्ती करीत असे. आणि तिचे जवळ नाना प्रकारचे अलंकार असूनही प्रीतीने रुद्राक्ष धारण करीत असे आणि भक्तिपूर्वक आपल्या सखी व सेवकास रुद्राक्ष बांधत असे. त्याप्रमाणे तिने कोंबड्याला व माकडालाही रुद्राक्ष बांधले होते. अशा तऱ्हेने ती वेश्या आपली गणना पतिव्रतेत करीत असे व नाना धर्माचे आचरण करीत असे आणि आपल्या धर्माप्रमाणे परपुरुषांना रमवीत असे. तिची फार कीर्ती पसरली. आपण स्वत: वेश्या असूनही तनमन धनाने रोज पतिव्रतेचा धर्म आचारण करीत असे. असे असता एके दिवशी तिची परीक्षा घ्यावी म्हणून मीच वैश्यरूप धारण करून तिच्या घरी गेलो. कोटी मदन सुंदर असे माझे रूप पाहून ती हातात पूजेची सामग्री घेऊन ती बाहेर धावत आली. अतिथी म्हणून तिने माझे पूजन केले व सामोपचाराने मला घरात नेले. तिला मोहवण्याकरिता मी हातात रत्नलिंग घेतले. जे सूर्याप्रमाणे तेज:पुंज असून लिंग कांती फाकत होती. मग पूजेकरिता ते लिंग तिने मला मागितले आणि म्हणाली, जर द्रव्याची

इच्छा असेल तर एक लाख रुपये देते आणि कामाकरिता आला असल्यास तीन दिवस मी तुमची कुलस्त्री होईन. या दोन्हीपैकी एक निश्चित सांगून त्वरित मला एक लिंग द्यावे. तिचे हे म्हणणे ऐकत मी तिला मोहविण्यास सांगितले की, 'मी कामहेतूने तुला लिंग देईन पण तू माझी कुलस्त्री होऊन तीन दिवस कशी राहशील? कारण वेश्यांना रोज एक नवीन पुरुष असतो.' तेव्हा वेश्येने शपथ घेऊन सांगितले की, ''मी सूर्य चंद्राची शपथ घेऊन सांगते की, नि:संशय तीन दिवस मी तुमची कुलस्त्री होईन व यात जर काही अंतर पडले तर माझे बेचाळीस पितर मजबरोबरच कोटी कल्प वर्षे नरक मागतील.'' तिची अशी प्रतिज्ञा ऐकून हे षडानना, मी तिला लिंग दिले. मग ती वारांगना मोठे संतोषाने माझे जवळ बसली. आम्ही दोघेही मंडपात विनोदाने स्वस्थ बसलो असताना संध्याकाळ झाली. तेव्हा मला विचारून ती शिवपूजेकरिता गेली. तेव्हा मी मायेने अग्नी उत्पन्न करून तद्क्षणीच मंडप जाळला आणि स्वत: बाहेर येऊन शोक करू लागलो आणि म्हणालो, ''माझे प्राण लिंग जळून गेले आता मी प्राणत्याग करतो.'' आणि उडी घेऊन मी त्याच अग्नीत प्रवेश केला. तेव्हा ती वेश्या बाहेर येऊन अपार शोक करू लागली व म्हणाली, ''माझ्या नवऱ्याने अग्नीत प्रवेश केला आहे. तेव्हा मी आता प्राणत्याग करीन.'' असे म्हणून तिने ब्राह्मण समुदाय बोलाविला आणि सहगमन विधी त्या वेळी त्यांच्याकडून करविण्याची विनंती केली. घरातील सर्व धन, धान्य आणि वस्त्रे तिने ब्राह्मणांना वाटून टाकली आणि द्विजाज्ञेवरून सविस्तर सहगमन केले. तिच्या आप्तांनी तिला सांगितले, ''हा काय धर्म आचरत आहेस. वेश्येच्या घरी कित्येक पुरुष कामाकरिता रोज येतात. त्या सर्वांची तू कुलस्त्री कशी होशील आणि मूर्खपणाने या वेळी वृथा प्राणत्याग का करतेस?'' तेव्हा ती त्यांना म्हणाली की, ''तुम्ही काय बडबड करता. सूर्य-चंद्राची शपथ घेऊन तीन दिवसाकरिता मी त्यांची कुलस्त्री झाली होते. आता मला मरण सुटणार नाही आणि धर्माप्रमाणे मी देह सोडताच उभय कुलातील बेचाळीस कुळे उद्धार पावतील.'' असे त्यांना सांगून तिने अग्नीत उडी घेतली तेव्हा या सदाशिवाला दया उपजून तेथे मी प्रत्यक्ष प्रकट झालो. अग्नी शांत केला आणि तिच्या धर्माचरणाने सहपरिवार त्या वेश्येला शाश्वत कैलास पद दिले. त्यात जे माकड व कोंबडा जळून गेले होते त्यांना पुढे राजकुळात जन्माला घातले. रुद्राक्ष धारणेचे जे अगणय असे पूर्वजन्मीचे पुण्य होते त्यायोगे ते दोघेही अखंड राज्य व लावण्य बरेच वर्षे भोगले आणि पुनरावृत्तीला बाजूला सारून अंती शाश्वत पद




शिव चिदम्बर

लाभले.'' रुद्राक्ष महिमा अद्‌भुत आहे आणि तो वर्णनापलीकडील आहे. शास्त्रोक्त रुद्राक्ष असा धारणाचा विधी तुम्हाला सांगतो. तो भक्तीने करताच जीव निश्चितच कैलासपदी बसतो. पूर्वी सांगितल्याप्रमाणे शेंडीत एक, सव्वीस डोक्यावर, पन्नासाची माळ हृदयावर धरावी तसेच दोन्ही बाहूंमध्ये सोळा सोळा आणि मनगटात बारा धरावेत. एकशे आठ किंवा चोपन्न अथवा सत्तावीस रुद्राक्षांची माळ साधकाने गळ्यात घालावी. याप्रमाणे रुद्राक्ष माळ धारण करता अगण्य पुण्य हाती येते किंवा जपाकरिता वापरल्यास अनंत फळ साधते. एकशे आठ रुद्राक्षांची माळ जो भक्तिभावाने धरील त्याला शंभर अश्वमेधाचे पुण्य पदोपदी लाभते. रुद्राक्षधारी पुरुष एकवीस कुळांना उद्धारून त्याचा शिवलोकी निवास होऊन त्यास शिवसायुज्य मुक्ती मिळते. श्री चिदंबराने नृपांना सांगितले की, ''याप्रमाणे शंकराने षण्मुखास सविस्तर रुद्राक्ष महिमा सांगितला तोच मी तुम्हाला सांगितला आहे. याप्रमाणे तुम्हाला अगाध असा रुद्राक्ष महिमा सांगितला आहे. आणि आता यथामती भस्म महिमा सांगेन.''

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय चाळिसावा

भस्म महिमा व पतिताचे कैलास गमन

।। श्री गणेशाय नमः ।। ।। श्री शिव चिदम्बराय नमः ।। हे पूर्णब्रह्म चिदंबरा, पुरुषोत्तमा, हे आदिमूर्ती आनंदधामा, हे ज्ञानपूर्णा तुला नमन असो. श्री चिदंबराने नृपांना भस्म माहात्म्य सांगितले ते मी तुम्हाला सांगतो. चिदंबर स्वामी नृपांना म्हणाले, ''शिवपुराणात सुरस कथा आहे. तेच भस्म माहात्म्य तुम्हाला थोडक्यात सांगतो. जे माहात्म्य शिवाने सनत्कुमाराला सांगितले तेच तुम्हाला सांगतो. रुद्राक्ष व शिव नाम याप्रमाणे भस्मही शिवाला प्रिय आहे. या तिन्ही वस्तू जो सेवन करतो तो नर नसून खुद्द महादेवच होय. सर्व मंगलदायक असे हे भस्म दोन प्रकारचे आहे. ते दोन्ही प्रकार मी तुम्हाला सांगतो. जे भासते त्यालाच 'भस्म' ही संज्ञा आहे. चिदानंद शिवरूपाला, अग्नी, जल, व्योम आदींना भस्म अशी वेदांमध्ये संज्ञा दिली आहे आणि सर्व भूतांचे ठिकाणी भासमान चिन्मात्र शंकर परिपूर्ण आहे असे जे शिवात्मैक्य ज्ञान आहे, त्यालाच 'भस्म' म्हणतात व तेच महाभस्म होय. आता अल्प भस्म सांगतो, हे तीन प्रकारचे आहे. त्याचे श्रौत स्मार्त लौकिक अशी नावे असून त्याच्या धारणाने शिव तुष्ट होतो. श्रौत व स्मार्त हे मुख्य ब्राह्मणास होय व लौकिक भस्म अन्य वर्णांना. मंत्राने धारण विधी विप्रास व अन्य लोकांना अमंत्र धारण होय. अग्नीहोत्राचे भस्म मुख्य होय, ते न मिळता गाईचे वाळलेले शेण जाळून त्याचे भस्म करावे. तेही धारणास योग्य आहे. अग्निविर्य-संभूत पवित्र शंकरास ते आवडते आहे. ते धारण केल्यास ते सर्व पापांना जाळते. अग्निरित्यादी पवित्र सप्तमंत्र जाबाल श्रुतीत वर्णिले आहेत. त्या मंत्रांनी ब्राह्मणांनी भस्माचे हळुवार विलेपन करावे व नंतर त्रिपुंड्र धारण करावे. त्याचे सर्वोत्तम विधान जाबाल उपनिषिदात पूर्णपणे विवरण केले आहे. शिव विष्णू ब्रह्मादिक देवही त्रिपुंड्र धारण करतात. त्यामुळे सर्व वर्णांनी ते धारण करणे आवश्यक आहे. याकरिता जे भस्म उद्धूलन व त्रिपुंड्र धारण केल्याशिवाय राहतात त्या मूर्खांना हा घोर संसार का कोटीकल्प फिरल्यावरही सुटत नाही. त्रिपुंड्र धारण केल्याशिवाय शिवज्ञान केव्हाही होणार नाही. शुभ्र भस्माचे विलेपन केल्यास सर्व पापांचा नाश होतो. ज्याचे कपाळावर विभूती नाही, ज्याचे गळ्यात रुद्राक्ष नाही आणि ज्याचे मुखात शिवनाम नाही तो या

भूतमीषतीत जाणावा. भस्म-गंगा, विभूती-जमुना, रुद्राक्ष-सरस्वती समजावी आणि जो हे तिन्ही धारण करील तेथेच निश्चित त्रिवेणी संगम जाणावा. ज्या ठिकाणी विभूती भूषीत शिवज्ञानी राहतो, तेथे शिवाज्ञेवरून त्रिकोटी तीर्थाची वस्ती असते. आता तुम्हाला फार काय सांगावे? भस्म हे अवश्य धारण करावे. तसेच षडक्षर मंत्राचा जप करावा व लिंगार्चन करावे हे मुमुक्षाला आवश्यक आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश्वराला व सिद्धमुनी महर्षीला भस्म माहात्म्य करण्याची शक्ती नाही. जो भस्म धारण करीत नाही व जो शिवद्वेष करतो तो पंचपातकी जाणून त्याचा जन्म संकराचा समजावा. जो भस्मधारकाला क्रोधाने मारतो तो निश्चित चांडाळबीज होय, असे व्यास सांगतात. विप्र व क्षत्रियांनी मान म्हणून भस्माचे अभिमंत्रण करावे. वेश्यांनी त्र्यंबक उच्चारून आणि स्त्री शूद्रांनी पंचाक्षरी मंत्राने करावे. (सद्योजातादी पंचब्रह्म मंत्रांनी गृहस्थांनी) व्रती वनस्थ व संन्यासी लोकांनी त्र्यंबक अघोरे तारे भस्म लावावे. सर्व वर्णांना भस्म धारण शिवाज्ञेवरून आवश्यक आहे. प्रमादानेही धारण करणे सोडू नये. भस्म स्नानाने जितके कण आपले अंगात संलग्न होतात तितके लिंग धारण अंगात केले आहे, असे निश्चयाने समजावे. चतुश्रामवासी भाविकांना चिताभस्माने त्रिपुंड्र धारण करताच त्यांना मुक्तीसुख लाभते, हे त्रिवार सत्य आहे. रुद्राक्ष, भस्म सोडून अन्न-पाणी घेऊ नये. जर प्रमादाने कोणी स्वीकार केला तर त्याचे पाप भोजनी होय. जे त्रिपुंड्राची निंदा करतात, ती निंदा शिवापर्यंत पोहोचते व जे भक्तिभावाने त्रिपुंड्र धारण करतात ते शिवपदाला पोहोचतात. भस्मरहित कपाळाचा धिक्कार असो. शिवरहित गावाचा धिक्कार असो व शिवार्चनाशिवाय असलेल्या कुलाचा सर्वथा धिक्कार असो. जे विभूती आणि शिवाची निंदा करतात, ते अंती नरकात जातात. त्यांचे दर्शनाने दोष घडतात व त्यांचेशी भाषण करताच आपलेकरिता नरकद्वार उघडे होते, जरी प्रमादाने दर्शन व भाषण घडले तर ताबडतोब सूर्यदर्शन घ्यावे. त्याने सर्व पापांचा निश्चित नाश होतो. सर्वदा विभूती धारण करावी व विभूतीवर काही धारण करू नये. जर चंदन धारण करण्याची इच्छा असेल तर विभूती मिश्र करून करावी. सर्व अंगाला भस्म लेपन करून व त्रिपुंड्र धारण केले तर स्त्री-गोहत्यादि पापे जळून जातात. शिवद्रव्याचा अपहार आणि शिवनिंदा वचन ज्या पापाने संपादली आहेत ती भस्म धारणाने नाश पावतात. भस्म व रुद्राक्ष ज्याचे अंगावर आहेत व तो जरी मातंग असला तरी तो शिवलोक भागी होतो आणि अवघी तीर्थे त्यांची सेवा करतात. ज्याचे अंगी त्रिपुंड्र आहे

त्यालाच 'सप्तकोटी मंत्र' साधतात आणि त्याचे सहस्त्र पूर्वजांचा उद्धार होतो. तो इहलोकी सर्व भोग भोगून दीर्घायु व सुखी होतो आणि शेवटी कैलासलोकी जातो. भस्मधारणाचे पुण्याचे कोण वर्णन करील? सर्व देवांना ते मान्य आहे. शिव सायुज्य मुक्ती ज्यामुळे मिळते असे या भस्माचे माहात्म्य आहे. भस्म स्नान हे गंगा स्नानच आहे व भस्मासनावर ज्ञान प्राप्त होते आणि भस्माने त्रैलोक्य पावन होते. भस्म हे प्रत्यक्ष शिवच होय. भस्माशिवाय जे पुण्य होईल ते निश्चित व्यर्थ होते असे हे भस्म माहात्म्य आहे, ते प्रत्यक्ष शिवाने सांगितले आहे. आता त्रिपुंड्र धारण विधी सांगतो. जो विधीने भस्म धारण करतो तो शुद्ध होऊन तो शिवपदी वास करतो. दोन्ही भुवया बरोबर त्रिपुंड्र कपाळावर लावावे. तिन्हीही रेषा मात्र वेगळ्या असाव्यात असे सावधतेने त्रिपुंड्र धारण करावे. मध्यमा व अनामांगुलीने दोन रेघा आधी सरळ लावाव्यात आणि त्याच्यामध्ये अंगठ्याने तिर्यग्रेखा लावावी की ज्यामुळे त्रिपुंड्र तयार होतो अथवा करंगळी व अंगठा सोडून मधल्या तीन बोटांनी तीन रेखा कपाळावर लावावायात. त्याने भोग व मोक्ष साधतो. एकेक रेघेचे ठिकाणी नऊ दैवते वस्ती करतात, त्यांची नावे हृदयात धरावी ती वेगळी करून सांगतो. भुरात्मा, गार्हपत्य, रजोगुण, अकार, ऋग्वेद, प्रात:स्तवन, क्रियाशक्ती आणि उमारमण ही प्रथम रेषेची दैवते आहेत. उकार, दक्षिणाग्नी, शंभू, व्योम, माध्यंदिन सवन्, यजु:स्तोम, इच्छा-शक्ती, सत्त्व आणि अंतरात्म ही मध्यम रेखेची दैवते आहेत. मकार, आह, वनीय तम आहवनीय धौर्ज्ञान शक्ती तद्सम तृतीय सवन शिवपरमात्म ही दैवते तृतीय रेखेची होत. याप्रमाणे या रेखादैवतांना रोज भावाने नमन करून जे मनात भोग व मोक्ष इच्छा करतात त्यांनी त्रिपुंड्र धारण करावे. हे नृप हो, त्रिपुंड्र धारण करण्याकरिता स्थाने आहेत ती या वेळी वेगळी करून सांगतो. बत्तीस, सोळा, आठ व पाच अशी उच्च स्थाने आहेत. शिवप्रीती होण्याकरिता त्या ठिकाणी त्रिपुंड्र धारण करावेत. डोके, कान, डोळे, नाक, कपाळ, तोंड, पाठ, मान, बेंबी, गळा व दोन्ही गुह्यस्थाने, मनगट, मांड्या, पाय ह्या बत्तीस स्थानी अनुक्रमे बत्तीस देवांना नमन करून त्रिपुंड्र धारण करावेत. अष्टमूर्ती, अष्टविद्येस आणि अष्टवसू (असे ३२देव) आता शास्त्रीय सोळा स्थाने ऐका. शिरोभाल, कंठ, दोन्ही कर्ण, अंस, कर्पूरमणी बंध, हृदय, नाभी, पार्श्व, पृष्ठ अशी सोळा स्थाने आहेत. अश्विनी दैवत, शिवशक्ती, सदाख्य विद्याख्य ईशान्य देवता तसाच वामादि नवशक्ती अशा सोळा स्थाने स्मरण करा. आता आठ स्थाने सांगतो ती ऐका. गुरुस्थान, ललाट, नाभी, कर्ण,

हृदयस्थान, असंयुग्म ही आठ स्थाने आहेत. ब्रह्मा आणि सप्तर्षी या स्थान देवता आहेत. येथे त्रिपुंड्र धारण केल्यास सदाशिव संतुष्ट होतो. आता पाच स्थाने ऐका. बाहुद्वय, हृदय, मस्तक आणि नाभि हे पाचवे स्थान या ठिकाणी त्रिपुंड्र धारण करावेत. जर एखादे वेळी घडले नाही तरी त्रिपुंड्र धारण सोडू नये. जो त्रिनेत्रधारी सर्व देवांचा जनक आहे. जो त्रिगुणाधार कात्यायनी सखा आहे. त्याचे पंचाक्षरपूर्वक स्मरण करून भाळी भस्म लावावे. ईशान्यामनम: असे म्हणून त्रिपुंड्र पार्श्वस्थानी लावावे. बिजाभ्याम नम: म्हणून मनगटी धरावे. पितृभ्यानम: म्हणून अद्यस्थानी व भीवर उमेशाभ्यां नम: म्हणून म्हणावे. पृष्ठभागी भिमाय नम: या विशेष विधी मंत्राने धारण करावेत. भस्म धारकाचे पुण्य ब्रह्मादीकाला सुद्धा वर्णन करता येत नाही. धारणानेच पापाच्या वचनाने नाश होतो. जाणून किंवा न जाणून विभूती अंगावर लावताच सर्व पापे जळतात. याविषयी तुम्हास कथा सांगतो ती ऐका. महा अमंगळ असा एक विप्र होता. तो बऱ्याच कालापर्यंत एका शूद्र स्त्रीबरोबर रमला होता. तिचे भ्रतराने वेळ साधून त्या द्विजाला जीवे मारले. त्याचे प्रेत गावाबाहेर टाकले आणि त्याचा कोणी संस्कार करेना. तेव्हा विक्राळ वदन असे यमाचे दूत आले आणि त्याचे गळ्यात पाश बांधून त्याला मारीत नेत होते. तो विप्र भयाने आक्रंदत होता कारण तो फार त्रास भोगत होता. जे पाहणे शक्य नाही अशा भव्य नरक यातना ते निर्दय दूत त्या महापाप्यास देत होते. इकडे एक उत्तम शिवमंदिर होते त्यापुढे भस्म पडलेले होते. त्या दिवशी महाशिवरात्र असून प्रेमाने भक्त पूजेला बसले होते. त्या भस्मात एक कुत्रे वेगाने येऊन बसले होते आणि शिवलिंग पाहू लागले. त्याचे सर्व अंग भस्मचर्चित झाले. मग तेथून त्वरेने निघून ज्या ठिकाणी ते विप्र प्रेत पडलेले होते त्यावर तो कुत्रा येऊन बसला. त्यामुळे त्या प्रेताला भस्म लागले. त्यामुळे त्याचे पाप त्वरित जळले. प्रेताचे अंगावर शिवद्वारीचे भस्म कुत्र्याचे योगाने लागताच तो अधम असा द्विज त्याचे सर्व पाप जळून तो पुण्यात्मा झाला. तेव्हा यमाचे दूत त्याला अत्यंत नाना तऱ्हेने.वेदना देत होते कारण तो महापापी होता, तोच शिवदूत धावून आले आणि त्यांना पाहून यमदूत भ्याले आणि त्या जिवाला नरकातून बाहेर काढून बाहेर टाकून पळाले. मग तो ब्राह्मण सावध झाला आणि शिवदूतांनी त्याला विमानात बसविले आणि आपल्या पापसमुहाचा संहार करून तो विप्र कैलासी जाऊन बसला. असे भस्म पवित्र शिवभूषण आहे. त्याचा महिमा वर्णन करता येत नाही. पुष्कळ पाप्यांचे बंधमोचन भस्म धारणाने झाले आहे. वामदेव अंगीचे भस्म लावताच एक राक्षस



शिव चिदम्बर

पूर्व कर्म जाणता झाला. मग त्याने कृपेने भस्म लावताच शिवसुख भोक्ता झाला. ऋषभ योगी, योगायोगाने भस्म देताच भद्रायू बाळ भस्म बळाने निरोगी झाला आणि या जगात शिवभक्त म्हणून प्रसिद्धी पावला आणि भस्म धारण सामर्थ्याने शत्रूसमुदाय जिंकून निष्कंटक राज्य भोगून अंती शिव सायुज्य मुक्तीस पावला. याप्रमाणे भस्म महिमा अगाध आहे. तो संक्षेपाने तुम्हाला विषद करून सांगितला.''

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||



शिव चिदम्बर

# अध्याय एकेचाळिसावा

नृपांना ब्रह्मोपदेश

||श्री गणेशाय नमः|| ||श्री शिव चिदम्बराय नमः|| ज्याचे मनात स्मरण होताच चित्तशुद्धी होते, त्याचे चरणांना स्मरून पुढे चरित्र सांगतो. श्री चिदंबर राजेलोकांना म्हणाला की, ''मी तुम्हाला वाचिक यज्ञ सांगतो तो ऐका. त्याचे श्रवणाने पापांचा नाश होतो. ब्रह्म हे सर्वत्र व्यापक आहे व ते शांत सच्चिदानंद व नित्य सुख असते. तिथे द्वैत नसून एक अद्वय असते असे श्रुतिवचन आहे. अशा पूर्णब्रह्माचे ठिकाणी जसा भ्रमाने दोरीचा साप दिसतो तसेच हे चराचर जग मायेने दिसते. पाण्यात जसे बुडबुडे व लहरी असतात पण प्रत्यक्षात तेथे काही नसते. तसेच परब्रह्मावर नसून देखिले देहादिक दिसत असतात. देहाचे आत व बाहेर पूर्णब्रह्म निश्चित भरलेले आहे. जसे घटाभोवती आकाश दिसते. आकाशात पक्षी उडताना भोवती आकाश व्यापलेले असते किंवा पाण्यात मासे संचार करतात. तसेच देहात ब्रह्म व्यापक आहे. सर्व व्यापक सत्ता असलेला आत्मा अंतःकरणात असतो. परंतु अहंरूपाने तो व्यक्त भासतो. याकरिता देहाचे ठिकाणी पूर्णब्रह्म व्यापक आहे आणि जे अस्तित्वाने जे हृदयात अहंस्फुरण आहे, तेथेच ब्रह्म साक्षात्कार होतो. मी आहे असे भान तिन्ही अवस्थेत पूर्ण असते परंतु मीपणा गेला की, देहात पूर्णब्रह्म स्वतःच असते. जीवाचे ब्रह्मत्व विसरण्याचे कारण तुम्हाला सांगतो की, अनादि अज्ञान जे आहे त्यांनी जीवाला भ्रम होतो. अज्ञान हे मूळ माया प्रकृती आहे. हे तुम्ही एकरूपच जाणा. नुसत्या नावाने भेद दिसतो. त्यामुळे जीव भिन्न वाटतात. हृदयात जे संकल्प उत्पन्न होतात तेथे ब्रह्माचे प्रतिबिंब पडते आणि या प्रतिबिंबाचे नाव चिदाभास आहे. अन् त्यामध्ये जीव हे नाम विलसते. प्रतिबिंब नाहीसे होताच एकच आनंदधाम परब्रह्म विलसते. याकरिता वेद गर्जना करतात की ब्रह्म हे अद्वितीय आहे. ब्रह्मसाक्षात्कारासाठी अभ्यासाची खटपट केली पाहिजे आणि या अभ्यासाची कृती फार सुंदर आहे. की ज्यामुळे सहजासहजी मोक्ष मिळतो. अस्तित्वाने हृदयात आत्मा वस्ती करतो. तेथेच वृत्तीरूपाने माया विलसते आणि वृत्ती नसताना अखंड आत्मा भासतो. जेथे मनाची गती नाही तेथून वाणी उत्पन्न होते. सर्व श्रुतीही असेच सांगतात की वाग्वृत्ती मनापूर्वी उत्पन्न होते. वाग्वृत्ती उठताच तेथे आत्म प्रतिबिंब पडते.

ज्याप्रमाणे आकाशात सूर्य उगवताच पाण्यात त्याचे प्रतिबिंब पडते, तसेच वृत्तीपासून नाना तऱ्हेचे स्वच्छंद असे संकल्प निघतात आणि स्थान भेदाने त्यात नामभेद असतात. आत्मा हा ज्ञानमय व्यापक आहे. त्याशिवाय कोणतेही ठिकाण नाही आणि विचार करून पाहिल्यास सर्व वृत्ती समुदाय ज्ञानमय असतो. तुपाप्रमाणे ज्ञान थिजते व वृत्ती रूपाने ते घट्ट दिसते. म्हणून वृत्ती ज्याप्रमाणे असते त्याप्रमाणेच ज्ञानात्मा असतो. जे वृत्तीमध्ये ज्ञान आहे तेच वाणीने बाहेर येते. जी वृत्ती बेंबीचे ठिकाणी अव्यक्त अशी स्फुरण रूपाने उमटली त्यालाच परावणी म्हणतात. सर्व वृत्तीला तीच कारण आहे. प्राणगतीने हृदयस्थान पावताच तीच अर्धाकार होऊन पश्चंती नाम पावली तीच संकल्पात्मक होऊन पुढे कंठस्थानी येऊन विषय गणाचे चिंतन करते. म्हणून तिला 'मध्यमावणी' असे म्हणतात. ती अक्षर नामाने पुढे तोंडात येताच तिला 'वैखरी' हे नाव आहे आणि ती चहूकडे पसरते. याप्रमाणे वृत्तीपरिणाम आहे. जे ज्ञान मूलाधारी आहे, तेच पश्चंतीमध्ये येते. जसे ज्याप्रमाणे आडाचे पाणी घटाने ओढताच वर येते तसे वैखरी शब्द मात्र आहेस आणि विचार केल्यास त्यात ज्ञान दिसते. तोंडातून शब्द निघताच त्यांचा नाश होऊन अर्धमात्र शिल्लक राहतो. आपले हृद्गत अभिप्राय दुसऱ्यांना कळण्याकरिता वैखरी वाक्य बोलते. ज्यायोगे त्याचा अभिप्राय सर्वांना कळतो. श्रुती असे सांगतात की वैखरी म्हणजे शब्दब्रह्म होय. म्हणून सद्धर्म हा जाणून आचारावा ज्यायोगे वाग्यज्ञ घडतो. वाचेने भगवंताचे आराधन करावे त्याचे नाव वाग्यज्ञ जाणावे याचे विवेचन करून सांगतो ते ऐका. वेदपाठ स्तुती आणि जपजाप्य हे नेहमी नेम धरून करावे आणि एक निष्ठा धरून सतत मुखाने नाम उच्चारावे. शब्दरूपाने जो गिरिजासखा आहे. तोच सर्व शब्दामध्ये व्यापक आहे, असा भाव धरून वाचेने संथ उच्चारावा. वक्ता हा शिवाकांत आहे तेथे माझी काय अहंता आहे, असा मनात निश्चय करून वक्तृत्वाभिमान सोडावा. वाणीचा अहंभाव सोडून तिचे ठिकाणी ममत्व धरून सर्वात्मकभाव वाग्यज्ञाने आचारावा. सर्व प्राणी-मात्राचे ठिकाणी निरंतर शंकर समभावाने राहतो. याकरिता वाणीचा असा उच्चार करावा की, त्यात सर्वांचे हित होईल. एक भावाने शिवमंत्र जपावा आणि मुखात शिवनाम दृढ धरावे. नेहमी शिवस्मरण करावे आणि प्रेमभावाने सदाशिवाला आळवावे आणि शिवानुग्रह होण्याकरिता सर्व जीवांना संतोष होईल असे वचन बोलावे. निर्लज्ज होऊन मोठे आदराने शिवभजन करावे आणि जसा प्रेमरंग भरेल तसे नृत्यगीतही करावे.



शि व चि द म्ब र

गुरुत्वाचा अहंकार सोडून शिष्यांना सत्‌बोध सांगावा किंवा गुरुमुखातील बोधवाणी वेदतुल्य मानून ती ऐकावी. या वचन पालनास महर्षी लोक 'वाग्यज्ञ' असे म्हणतात. वाग्यज्ञात त्याज्य असलेले दोष निवडून तुम्हाला सांगतो ते ऐका. चहाडी सांगणे, खोटे बोलणे आणि दुसऱ्याची निंदा करणे आणि दुसऱ्याचे मर्मावर घाव घालणे हे सर्व वाग्ज्ञाचे विध्वंसक जाणावे. तसेच कठोर वर्तन, दुसऱ्याच्या मर्मावर घाव घालणे, दुसऱ्याची अव्हेलना करणे व मनोभंग करणे हे सर्व त्यागावे. असा निर्दुष्ट वाग्यज्ञ जो सुज्ञ नेहमी आचारतो तोच या भयानक संसारात अभिज्ञ जाणावा. त्यावर शिवनायक संतुष्ट होतो व त्याची अहेतुक भक्ती पाहून त्याचे संसारमोचन करतो हे त्रिवार सत्य होय. हे राजेलोकहो, आता तुम्हाला मनोयज्ञ सांगतो, तो चित्त देऊन ऐका. ज्यायोगे संसारमोचन होऊन परब्रह्मी पूर्ण समाधान मिळेल. गुरुभक्तास हा सुलभ होतो त्यामुळे साधकाला तत्काळ मोक्ष लाभतो. मन हे अत्यंत चंचल आहे. त्यायोगे जिवाला भयफेरा सुटत नाही. मन उडाले तर संसारही सुटतो आणि मन नसता संसार आटतो. आणि मन नसल्यास ब्रह्माची भेट होते असे श्रुती सांगतात. मनाचे योगाने जिवाला नाना तऱ्हेचे दुःख होते व मनाच्या नाशाने पूर्णसुख लाभते आणि मोक्ष सोपा होतो. जो शाश्वत असा कैलासनाथ आहे तो सर्वांचे ह्रदयात वसतो आणि जन्ममरण विरहित संकल्पसाक्षी तोच समजावा अशा त्या सदाशिवाच्या संगात जीव असून तो आपला निजानंद भाव विसरून दुःख अंगीकारतो. जीवाचे स्वरूप पाहता तो नित्यानंद रूप आहे. परंतु तो दुःखाचे फळ भोगणारा झाला. मनाने देह हाच जीव आहे असे भ्रमाने वाटते. तेथे जन्मादी दुःख फार आहे आणि पर्वश होऊन तो ते भोगतो. ही माझी बायको-मुले, हे माझे घर आणि आप्त, हे माझे धन, पशु आणि शेत अशी मनानेच कल्पना केली आहे. या सर्वांचे ठिकाणी माझेपणाचा अभिमान दृढ असल्यामुळे जिवाला दुःख बंधन होते. याकरिता सर्व दुःख देणारा वैरी मनच आहे आणि ज्ञानयज्ञाने त्याला मारताच सुख लागते. वैराग्य घेऊन ह्रदयात ज्ञानाग्नी पेटवावा आणि ध्यानरूप पक्के रोवून मनरुपी पशूला आणून बांधावा. विचाररुपी दोराने त्याला बांधावा. महावाक्य मंत्राने त्यावर संस्कार करावा. नंतर निरंजनरुपी यज्ञपशुगृहात न्यावा आणि साक्षीत्वाने संहार करावा. निर्ममत्व हे तीक्ष्ण शस्त्र हाती घ्यावे आणि त्या मनू पशूवर ममता न करून त्याला छिन्न भिन्न करून त्याचे हवन ज्ञान यज्ञात करावे. याप्रमाणे ज्ञानयज्ञ केला तर तो नागभूषण संतोषतो आणि अक्षय असे पुनर्जन्म विरहित

स्वर्गस्थान देतो. मनाचा नाश झाल्यास एकमात्र अविनाश स्वरूप राहते. याकरिता मनाचा नाश होण्याकरिता यज्ञरुपक दाखविले आहे. मन असता संसार असतो आणि मन गेल्यास चिन्मात्र होतो असे उपनिषधाने निर्धाराने सांगितले आहे. याकरिता नेहमी सावध चित्ताने निर्विषय प्रभूचे चिंतन करावे आणि मनानेच मनाला छेदून जीवनमुक्ती सुख पावावे. सर्व सिद्धी देण्यास निपूण असा हा जो मानसिक यज्ञ आहे त्याचे भक्तिभावाने आचरण करावे त्यामुळे अक्षय सुख सुलभ होते. हे राजेलोकहो, मी तुम्हाला थोडक्यात हे तीन यज्ञ सांगितले. त्यावर विश्वास ठेवावा व त्याचा अभ्यास करा. आपले वर्णाश्रम धर्मावर विश्वास ठेवून हे तिन्ही यज्ञ करीत जा. त्यामुळे इहसुख भोगून अनायसेच मोक्ष लाभेल.'' एवढे सांगून श्री चिदंबर स्नानाकरिता नदीत उतरले. स्नान करून याग स्थानास आले व होम विधी उरकून स्वस्थ बसले. इकडे श्री गुरुचे तोंडून रसाळ असा बोध ऐकून सर्व राजेलोक आनंदसागरात बुडाले व शांत चित्ताने बसले. गुरु बोधाचे मनन करून राजेलोक समाधिस्थ झाले व ब्रह्मानंद सागरी लीन झाले. गुरु शिष्यपण नाहीसे झाले. श्रवण व मनन सर्व राहिले आणि सर्व एकदाच आपले स्वरूपात निमग्न झाले. सर्व आधी निरसून अक्षस्य समाधी लागली. चित्त, मन व बुद्धी हरपली आणि सर्व उपाधी नाहीशी झाली. एक मुहूर्तानंतर सर्व राजेलोक सावध होऊन संध्या करून सत्वर श्री गुरुंजवळ आले. मग त्यांना श्री चिदंबराने बोलावून मंद हसत तो चंद्रमौळी म्हणाला, ''आता फलमंत्राक्षदा घेऊन सकाळी आपले घरी जावे.'' हे गुरुवचन ऐकून सर्व लोक मनात दचकले. डोळ्यात शोक भरला व खिन्न वाचेने म्हणाले की, ''हे दयाळा, आज नवल झाले. सूर्यापुढे अंधार उभा राहिला तसा आमचा दैवाने हा खेद समय आला. जोपर्यंत गुरुचे दोन्ही पद हृदयात हे महादेवा, प्रवेशत नाहीत तोपर्यंत मानव भोक्ता असतो आणि त्याला विरहादी व्यथा असतात. दु:खाचा नाश करणारे वज्र जोपर्यंत नाममात्र जीभ सिंहासनावर बसत नाही तोपर्यंत भारी दु:ख होते. जोपर्यंत गुरुमुखाने बोधामृत कानावर येत नाही तोपर्यंत हे गुरुनाथा दु:खाचा जाच होतो. श्रुतीने सांगितलेली रम्य मूर्ती ज्याचे दर्शनाने सर्व इंद्रिये निवतात. तो जोपर्यंत डोळ्यांपुढे येत नाही हे करुणामूर्ती सदाशिवा, तोपर्यंत घररूपी विहिरीत पडलेला मूर्ख वियोगादी दु:ख नेहमी भोगू दे. हे प्रयत्नाने अनिवार्य आहे. सकल दु:ख संहारक आणि शाश्वत सुखदायक तुझे सुरेख पदपंकज आहेत ज्याची सेवा ब्रह्मादिकही करतात. ते प्रत्यक्ष पाहून आणि सेवन करून हे कृपावंता, हे वियोग दु:ख कशाकरिता, सूर्य

उगवताच अंधार कसा राहील? तसेच स्पर्शमणी लागताच लोखंड मलीन कसे राहील? दामोदर कांता प्रसन्न होऊन आपले घरी येताच दारिद्र्य चिंता कशी राहील? हे कृपावंता, तू या वेळी हे सांग, तोंडात अमृत पडताच रोगभिती उडाली नाही आणि कामधेनू जवळ बसली असताना भुकेची बाधा पुरली नाही, याप्रमाणे हे दयाघना तुझे चरण प्रत्यक्ष दिसले असताना आमचे चोज पुरले नाहीत. आम्ही पूर्वीप्रमाणे अभागी आहोत म्हणून राज्य गर्तेत पडून दारासूत आप्त धन व धामी गुंतून चडफडत होतो. हे दयाळा, सर्व सौख्यदायक तुझे पद द्वंद्व तू स्वतःच आम्हाला दाखवून आमचे सर्व दुःखाचा नाश करून सुख दाखविलेस आणि यानंतर हे सोमयाजी आम्हाला विरहाग्नीमध्ये का टाकतोस आमचे दुर्दैवाला एवढे बळ का आले आहे? हे विधात्या, तुला आमची या वेळी दया का येत नाही? आधी गुरुपाय दाखवून अपूर्व असे सौख्य दाखवलेस. आता ते परत घेऊन आम्हाला विरहाग्नीत का टाकतोस? त्याने तुला काय फळ लाभेल? वृथा प्राण्यांना त्रास देऊ नकोस. श्री चिदंबरा, करुणाघना, सांबा, सर्वोदया, पूर्णा तुला आमची करुणा येऊ दे आणि आमचे विरह भय नाहीसे कर. आम्ही तुमचे पायी शरण आहोत. हे शिवसखया, आमचे रक्षण कर व विरह भय निवारण कर. आम्ही हे क्षणभरही सहन करू शकत नाही.'' याप्रमाणे लोकांची करुण वाणी ऐकून तो कैलासधनी मनात द्रवला व आनंदाने विरहहारक वचन बोलला. ''माझे म्हणणे ऐका, ज्या वियोग भयाने तुम्ही दुःखी झाला आहात त्याचा विचार सांगतो. आज किंवा शंभर वर्षांनी या देहाला निश्चितच मृत्यू आहे. वियोग भय तेव्हा तरी सुटणार नाही ना? हे सत्य आहे हे तुम्ही विचार करून पहा. यांचा पूर्ण विचार करून माझी स्थिती जर तुम्ही जाणता तर कल्पांती तुम्हाला वियोगाचे दुःख होणार नाही ते माझे स्वरुप तुम्हाला सांगतो. माया योगाने स्वीकार केलेल्या देहाला कार्य समाप्ती नंतर निश्चित लय आहे. पूर्वी एक ब्रह्म होते. ते नित्य मुक्त अविकारी होते. पूर्ण ज्योती हा स्वयंप्रकाशक असून नेहमी सत्यज्ञानी होते. तेच ब्रह्म जगदीश्वर आपले शक्तीचा अंगीकार करून स्वतःच चराचर होऊन आपलेच इच्छेने विहरते. ज्या ठिकाणी जगद्त्रय उत्पन्न होते, ज्या सत्तेने प्रपंच कार्य चालते, जेथे सर्व अंती लय पावते असे सच्चिदानंद माझे स्वरूप आहे. जगाचे आधी आणि जगामध्ये जो त्रिशुद्धी एकटाच व्याप असतो आणि लयानंतर जे अनादि उरते तेच पूर्णानंद स्वरूप माझे आहे. तुमचे अंतःकरणात सुद्धा त्रिकाळी मी पूर्णत्वाने राहतो. मी आहे अशी स्फूर्ती जी हृदयात असते तेथेच माझा वास

असतो. त्या ठिकाणचे मी पण सोडून आहे-पण जे अंत:करणात भासते तेच रूप मी म्हणून हे राजे लोक हो ओळखा. अवस्थेच्या पूर्वी व तिन्ही अवस्थेत हृदयात अस्तित्वाने भासते आणि काही अवस्था नसताही ते अस्तित्व स्वयंप्रकाशित असते. देहाचा नाश झाल्यानंतर आहे-पणाचा निश्चित नाश होत नाही. सर्वात्मा असा जो मी हृषीकेशी त्याच स्वरूपाने मी सर्वत्र वसतो. अस्तित्व हेच सर्वाधिष्ठान असून देहादि आरोप मायेने त्यावर कल्पित असतो. विचार करून पाहता आत्मा एकच आहे. समुद्रामध्ये ज्याप्रमाणे लहरी असतात किंवा निर्मळ आकाशात निळा रंग असतो. जसे अभेदाने त्यावर कल्पित दिसते त्याप्रमाणेच अधिष्ठानावर देहादिक दिसतात. सूर्य किरणावर पाणी किंवा दोरीवर साप ज्याप्रमाणे अभेदाने त्याप्रमाणे कल्पित भ्रमाने अधिष्ठानावर जग भासते किंवा शिंपात जशी चांदी किंवा आकाशात गंधर्वनगर तसेच कल्पित देह अधिष्ठानावर भासतो. याकरिता विचार करून या देहादि पंचक्रोशात सोडल्यास पूर्वीप्रमाणेच अस्तित्व स्वयंप्रकाशाने भासते. विचाराने जे जे सोडता येते ते खोटे समजावे आणि जे आकाशाप्रमाणे दडवता येत नाही ते सर्वगत अस्तित्व जाणावे. नाना युक्तीने निवारण करून जी आत्मसत्ता जात नाही ती मीच जाणा. जो सर्वांचे हृदयात असतो तेथे चित्त ठेवून आपला अहंकार उडतो आणि अहंकारास देहादिकांचे ममत्व असते. त्याप्रमाणे अस्तित्व सत्तेस मार्मिक देह वगैरे भासतो. देहादि बुद्धिपर्यंत किंचित मी पण आहे आणि जेथे माझेपण आहे त्या ठिकाणी आत्मता नाही. याकरिता अहंकारापूर्वी जे विलसते ते अस्तित्व शिवरूप असते आणि जो शिव तोच मी आहे असा विचार करून निश्चय करावा. याप्रमाणे निश्चय करून जो अंतरी माझी सेवा करतो तो कालत्रयी विरहाग्नीत पडत नाही. याकरिता तुमचे आमचे ठिकाणी देहात्म बुद्धी सोडून अखंड एकच अशी सर्वांचे ठिकाणी सतत शिव भावना करावी. प्रवाह पतित कर्म करावे, कर्माभिमानी चित्त गुंतवू नये आणि सर्वकाळी स्वत:चे अकर्तृत्वाचे स्मरण करून स्वस्थ असावे.'' याप्रमाणे श्रीगुरु चिदानंदाने सर्व राजे लोकांना सद्बोध केला आणि त्यांचा मिथ्याभेद दूर करून पुन्हा त्यांना विचारले की, ''जो बोध तुम्हाला सांगितला तो तुम्हाला नीट उमजला का? किंवा तुमची काय इच्छा असेल ती मला सांगा व तेच आता करू.'' अशी श्री गुरुवाणी ऐकून सर्व लोक त्याच क्षणी निघाले आणि निरहंकाराने स्वामी चरणी नमन करून मनात आनंदाने तुष्ट झाले. नंतर हात जोडून प्रार्थना केली की, ''हे स्वामी, तू त्रयमूर्ती आहेस. या भूलोकावर तुझी आज्ञा कोण उल्लंघन




शिव चिदम्बर

करू शकेल? ज्याचे भयाने वारा वाहतो. ज्याचे भयाने सूर्य ही तापतो, इंद्र पाऊस पाडतो आणि अग्नी जाळतो. मृत्यूलाही ज्याचा धाक आहे अशा सर्वांना तुम्ही जशी आज्ञा करता तसेच आम्ही वर्तन करू. तरी तुझे चरणी आमची एक विनंती आहे की, ती गुरुराया ऐकावी. सोमयागाने कृतकृत्य झालेल्या गुरुस आमचे वैभवाने त्यांचे गावास पोचवून आम्ही आमचे स्थळास जाऊ अशी आमची इच्छा आहे. हे दयाघना, याविषयी तू जशी आज्ञा देशील तीच हे कैलासरमणा, आम्हास शिरोभूषण होय.'' याप्रमाणे राजे लोकांची विनंती ऐकून दीक्षितमणी बोलला की, ''तुमच्या अंत:करणात जी इच्छा आहे. तसेच आनंदाने होऊ द्या.'' असे राजे लोकांना सांगून दिवाकराला बोलावले.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनम: ॥



शिव चिदम्बर

# अध्याय बेचाळिसावा

बाजीरावाचा प्रसाद त्याग

।। श्री शिव चिदम्बराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। हे त्रैयमूर्ती गुरु आनंदघना, सावित्रीपती आपले हित साधण्याकरिता ब्रह्मादिकही तुला वंदन करतात. तेव्हा दयासिंधू तुला मी वंदन करतो. माझी मती विषद करून हे दीनबंधू माझेकडून तुझे चरित्र वदव आणि यावेळी कथा स्फूर्ती दे. दिवाकराला बोलावून श्री चिदंबराने सांगितले, ''उद्या सुंदर मुहूर्त आहे म्हणून आपण गुरुपुराला जाऊ. यज्ञातून जे पदार्थ शिल्लक असतील त्याने विप्र जात आराधून मग आपले स्थानी परत ये.'' तेव्हा दिवाकराने विनंती केली की, ''तुमचेशिवाय माझेकडून द्विज आराधना कशी घडेल?'' पुत्राची ही प्रार्थना ऐकून श्री चिदंबरांनी हसत आपले पुत्राबरोबर कोठीगृहात जाऊन जेव्हा सामग्री पाहिली तेव्हा ती तिसरे दिवशी जेवढी होती तेवढीच आताही दिसली. तेव्हा महास्वामी म्हणाले, ''हे वत्सा, पुत्रराया सामग्री अजून बरीच आहे. याकरिता यापुढे पाच दिवस समाराधना कर.'' तेव्हा दिवाकराने विनंती केली की, ''द्विजाराधना जर पाच दिवस करावयाची असेल तर माझी प्रार्थना ऐकावी. मी कामात गुंतल्यामुळे यज्ञ विधी पूर्ण पाहिला नाही, म्हणून पुन्हा सोमयाग करीन.'' दिवाकराची ही प्रार्थना ऐकून श्री स्वामी हसत आपले स्थानाकडे गेले. इकडे दिवाकराने योग्य ब्राह्मण आणून सोमयागास आरंभ केला आणि पाच दिवस विशेष असे द्विज संतर्पण केले आणि या पाच दिवसात दोन लक्ष अठ्ठ्याण्णव हजार ब्राह्मण जेवले. याप्रमाणे यज्ञ संपल्यावर एक दिवस सुमुहूर्त पाहून श्री हरीने सर्वांना बोलावून फलमंत्राक्षता दिल्या आणि म्हणाले, ''हे द्विजेंद्रहो, तुम्ही माझेकरिता फार श्रमित झाला आहात, परंतु तुमचे योग्यतेप्रमाणे माझेकडून तुमचा सन्मान झाला नाही तरी मला क्षमा करून माझेवर पूर्ण लोभ ठेवावा आणि आता आनंदाने हे द्विजेंद्रहो, आपले स्थानास जावे.'' याप्रमाणे गुरुवचन ऐकून सर्व द्विज तुष्ट झाले आणि प्रेमाने नाम गर्जत चांदण्यात चहू वाटेने निघाले. इकडे श्री चिदंबराने अग्नीचा समारोप करून व अरणी घेऊन आपले भार्येसह सत्वर निघाले. इकडे सर्व राजे लोक निघण्याचे तयारीने आपले दळ घेऊन श्री गुरुंजवळ आले. श्री गुरु आता परत निघाले हे ऐकून तेथील

आम्रवनाच्या मालकाने म्लान वदन करून स्वामी चरणी विनंती केली, "हे स्वामीराया, हे ब्राह्मण माझे सर्व आंबे खाऊन गेले त्यामुळे माझे वार्षिक अन्न नाहीसे झाले. यापुढे मी काय करू?" तेव्हा स्वामी मंद हसून म्हणाले की, "ब्राह्मणाचे अनुग्रहाने लाभ होतो, त्यांच्यामुळे काही नाश होत नाही, तू हे काय विचित्र बोलतो आहेस? हे सुबुद्धा, निष्करण ब्राह्मणावर अपराध घालू नकोस. तुझी आंबराई पाहून ये, मग मी तुला सांगीन." हे गुरुवचन ऐकून तो आंबराई पाहण्यास निघाला तेव्हा त्याला सर्व झाडे आंब्याने परिपूर्ण व खाली वाकलेली दिसली, तेव्हा त्याला आश्चर्य वाटले तेव्हा तो स्वामींकडे येऊन म्हणाला की, "माझेकडून फार अपराध घडला आणि मी द्विजांवर वृथा बोल ठेविला. तुझे रूप ओळखले नाही. तुझी लीला अगाध आहे. मी मतिमंद होऊन तुझेवर शब्द ठेविला. हे दयाधना, क्षमा कर." अशी विनंती करून तो गहिवरून अंगणात लोळू लागला. तेव्हा त्या दयावंताने त्याला उठवून नाना तऱ्हेने त्याचे सांत्वन केले व त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला वर दिला. नंतर श्री दीक्षित यागभूमीला नमस्कार करून निघाले. जेव्हा ते ब्राह्मणांजवळ आले, तेव्हा त्यांना आनंदित मनाने वंदन करून सालंकृत गोदान दिले. याप्रमाणे सर्व ब्राह्मणांना संतुष्ट केले. इतर लोकही स्वामींच्या दर्शनास आल्यावर त्यांचे इच्छेप्रमाणे त्यांना देऊन श्रीगुरुने त्यांनाही तोषविले. मग हातात दोन्ही अरणी घेऊन दीक्षितमणी मौनानेच निघाला. तेव्हा राजसैन्यही सेनाधिपतीस पुढे करून निघाले. रथ, पायदळ, घोडे, हत्ती असे चतुरंग दळ पुढे चालले आणि द्विज शांतीसुक्त पाठ म्हणत स्वामींचे भोवताली चालले. पादचाऱ्यांनी सीमा ओलांडली तेव्हा श्रीगुरु शुद्धभूमीवर बसले. तेव्हा राजेलोक जवळ येऊन त्यांनी विनंती केली की, "हे स्वामीराया, आपल्याला दूर जावयाचे आहे. तेव्हा हे भक्तकैवारी, घोड्यावर किंवा रथावर बसून चलावे." तेव्हा श्रीगुरु म्हणाले, "अग्नी असलेली अरणी माझे हातात आहे. त्याने स्पर्शदोष घडेल." हे गुरुवचन ऐकताच कुशल ब्राह्मणाला स्नान घालून आणि पितांबर नेसवून सारथी म्हणून आणले तेव्हा श्रीगुरुने सर्वांना वाहनावर बसवून आपण स्वत: भार्या आणि अरणीसह वाहनावर बसले. गहिवरलेल्या त्या गावातील लोकांना श्रीगुरुने सांगितले, "आपण मनात खंती करू नका. सुखाने आपल्या घरी राहावे. पुन्हा तुम्हाला दर्शन घडेल परंतु आता आपण सुखाने जावे," असे सर्वांना सांगून प्रेमाने परतवले. मग स्वामी वाटेने जात असता हत्ती, घोडे, पायदळ वगैरे आणि धडधडाटाने स्वामी रथ बरोबर रथ जाऊ लागले. मृदुंग, भेरी,


शिवचिदम्बर

आनक, कहाल, वाजंतुरे, गोमुख ही वाद्ये वाजत असताना दाही दिशा प्रतिनादाने दुमदुमत होत्या. नंतर राजस्त्रिया सुंदर वस्त्रे नेसून ज्या देवांगनांप्रमाणे शोभत होत्या त्या रथ आणि पालखीत बसून निघाल्या. गाढवे, खेचर, उंट, घोडे, बैलगाड्या व रेडे स्वामींकडे पहात ओझे घेऊन पुढे चालले होते. वस्त्रालंकाराने सुशोभित अशा वारांगना रथात बसून राजेलोकांच्या सैन्यामध्ये स्वर्गातील गणिकेप्रमाणे शोभत होत्या. शुभ्र पताका, छत्र, चामर, सच्दल आणि वस्त्रालंकार, यावर चंद्रकिरण पडताच चांदणे दुप्पट प्रकाशत होते. याप्रमाणे शांतसमयी चांदण्यात मार्ग चालत असताना अरुणोदयी श्री स्वामी नवगुंदास आले तेव्हा श्री स्वामींचे दर्शनाकरिता सर्व ग्रामजन, अबालवृद्ध, नारी, नर आणि सुवासिनी मंगल आरत्या घेऊन आल्या. केळी, नारळ व चित्रान्न देऊन आधी ओवाळणी करून मग अक्षता वाहून आरत्या ओवाळल्या. हा स्त्री समुदाय गेल्यानंतर श्री चिदंबरानी गावात प्रवेश केला व त्यांचे मागोमाग आपले सैन्यासकट सर्व राजे लोकही चालले. स्वामी जेव्हा नगरात आले तेव्हा ते नगर शृंगारलेले होते आणि सुगंधित पाण्याने सडा घातलेला होता, राजमार्ग शोभत होता. रस्त्यारस्त्यावर ध्वज पताका तळपत होत्या. सोने व पानांची तोरणे होती. फुलांच्या व मोत्यांच्या माळा व पितांबरादी वस्त्रे दारादारावर शोभेकरिता बांधले होते. प्रत्येक घरापुढे फळे व पाने शोभत होती आणि पूर्ण कुंभ चोहीकडे ठेवले होते आणि सुगंधी धूप वेदीवर ठेवले होते. प्रत्येक वेदीमध्ये नवी वस्त्रे नेसून व रत्नाचे अलंकार घालून सुवासिनी उभ्या होत्या. त्या बाहुल्याप्रमाणे शोभत होत्या. चहूकडे दिवे लावले होते. त्या जणू नक्षत्र माळाच दिसत होत्या. गुग्गुळ, अगरु व धूप हे चोहूकडे पसरले होते. सुवासिनी आरती करण्याकरिता प्रत्येक दारापुढे मार्ग आडवीत होत्या. त्यामुळे तो दीक्षित शंकर अगदी मंदगतीने चालला होता. लोकांच्या डोळ्यांना अमृताप्रमाणे वाटणारी अशी ती सुंदर मूर्ती आल्याची ती गोष्ट ऐकून स्त्रीया हर्षाने धावत येत असता रस्त्यात त्यांचे पदर खाली पडत असत. कित्येक आपल्या बाळांना सोडून गोपुरे चढत होत्या. कित्येक आपले गृहकर्म सोडून चंद्रशाळेत धावत होत्या. कित्येक आपले पदर सावरून माडी चढत होत्या. कित्येक मार्गात उभे राहून स्वामींचा मुखचंद्र पाहत होत्या. स्वामी दर्शनाकरिता चित्त धावत असता आपले देहभान विसरून त्या कुलवंताच्या स्त्रिया दर्शनाकरिता माडी चढत होत्या. एकीने कलश धरला होता. ऐकीने धार काढण्याचे भांडे धरले होते. एक आपले केस सावरत येत होती. एक आपला दह्याने भरलेला हात घेऊन येत होती. कित्येक स्त्रिया हातात कुंकवाच्या करंड्याने शोभत होत्या. कित्येक गृहकृत्य चिन्हाने शोभत

होत्या. अशा या सर्व स्त्रिया श्री गुरूच्या दर्शनाकरिता आल्या होत्या. कित्येक सोन्या-मोत्याचे दागिने लेवून आपल्या प्रासादावर हातात फुलांचा हार घेऊन देवांगनेप्रमाणे शोभत होत्या. श्री चिदंबराच्या रम्य मूर्तीवर सर्वेंद्रीय पुष्प समर्पून सुंदरी प्रासाद शिखरावर शोभत होत्या. त्या विमानात सिद्धांगनाप्रमाणे शोभत होत्या आणि डोळ्याचे पाते न लवविता श्री गुरुंना पाहताना कित्येक श्रीमंतीनी शोभत होत्या. त्या जणूकाही आपल्या नेत्रकमळांची पुष्पमाळ स्वामींना समर्पण करून त्यांची पूजा करीत होत्या. नाहीतर ब्रह्मदेवाने भक्तीने श्री गुरुंची कृपा करण्याकरिता चंद्राची माळ निर्माण केल्याप्रमाणे स्त्रीवदन पंक्ती शोभत होत्या. सुवासिनी गण श्री गुरुंवर केळी, बत्तासे, लाह्या व फुले भक्तीने उधळीत होत्या आणि परस्परांशी प्रिय वचन बोलत होत्या. अशा कौतुकाने स्त्रिया बोलत असताना श्री स्वामी त्यांना कृपादृष्टीने पाहत होते आणि मंद चालत होते. मार्गात नमस्कार करणाऱ्या लोकांना श्री गुरु प्रेमाने उठवित त्यांना कुशल प्रश्न विचारून त्यांना मृदू वचनाने तोषवित होते. याप्रमाणे सद्‌गुरु श्री दीक्षितांनी आपला सर्व परिवार घेऊन ताबडतोब लालगडात प्रवेश केला. जेथे त्यांचे पूर्वीचे निवासस्थान होते. तेथील लोक स्वामींना म्हणाले, "आजचा हा सुदिन आहे कारण कैलासनाथांचे या भूलोकावर चरण कमलांचे दर्शन झाले." सर्वांचा आदराने सन्मान करून श्री स्वामींनी त्यांना भोजनाचे निमंत्रण दिले. मग आपण स्नान करून यज्ञेश्वरास मंत्रोन त्याची स्थापना केली. त्यादिवशी नाना तऱ्हेची पक्वान्ने करून मोठे हर्षाने ब्राह्मण संतर्पण केले. नंतर भक्तांबरोबर आपण भोजन करून सर्वांना विश्रांतीकरिता निरोप दिला. दुसरे दिवशी प्रात:काली सर्व राजे लोकांना जवळ बोलावून फळ, मंत्राक्षता देऊन त्यांना आनंदाने बोळाविले. याप्रमाणे सर्वांना पाठवून आपण सुखाने तेथे काही दिवस राहिले. तेव्हा दर्शनाकरिता बाजीराव आला. तेव्हा त्या करुणाकर चिदंबराने बाजीरावाचे आदराने आतिथ्य केले व त्याचे सर्व सैन्यही त्या कृपासमुद्राने तोषविले. त्याचे आतिथ्य पाहून बाजीराव फार आश्चर्यचकित झाला व म्हणाला, "या चिदंबराची काय शक्ती आहे असे आतिथ्य माझेकडूनही होणार नाही." असा आश्चर्यचकित होऊन बाजीराव श्री चिदंबराची स्तुती करत असता त्याचा दुष्टमती असा दुमंत्री त्याला म्हणाला की, "एक लक्ष सेनेसह तुमचे सारखे आतिथ्य केले म्हणून तुम्हाला आश्चर्य वाटले त्याचे कारण काय? आपण येणार हा वृत्तांत दीक्षित आधीच जाणून होते आणि आपल्या मांडलिकांचे साहाय्य घेऊन त्याने प्रयत्नाने सामग्री संपादित केली होती. कालचे त्याचे आतिथ्य पाहून त्याला आपण अवतार कृत्य म्हणता हे आम्हास खरे





शिव चिदम्बर

वाटत नाही. यात अवतार क्रिया काय आहे? जरी हा अवतारीक असेल तर त्याचा आपण प्रत्यय घेऊन कौतुक पाहू. आज सारखेच हा जर उद्या आतिथ्य करील तर हा शिव होय.'' जे श्री गुरुंची परीक्षा घेऊ पाहतात ते मूर्ख लोक असतात आणि शेवटी त्यांना नरकाची प्राप्ती असते. म्हणून ते श्री गुरुंना छळतात. त्या दुर्मंत्र्याचे दुष्ट विचार बाजीरावास कालमानाप्रमाणे खरे वाटून त्याला मनात आनंद झाला. जसा संग तशी मती होते याकरिता दुष्ट संग करू नये. विषवल्लीची संगत घडताच अमृतवल्लीचेही गुण नाश पावतात. दुधाच्या भांड्यात लसूण पडताच त्याक्षणी दुधाचे गुण नाहीसे होतात. तशीच दु:संगती घडताच बाजीरावाचे अंत:करण पालटले. प्रात:काली श्री चिदंबर त्याला निरोप देण्याकरिता बोलवताच त्याने दोन्ही हात जोडून विनवले, ''हे स्वामीराया, आज येथेच प्रसाद घेऊन अनुग्रह घेतो एवढे कृपादान यावेळी मला द्यावे.'' तेव्हा श्री चिदंबर या वेळी म्हणाले, ''हे बाजीरावा, मी तुझा धर्माश्रित आहे. तू माझे आता सत्त्व का पाहतोस. तुझा येण्याचा वृत्तांत ऐकून मी तुझे मांडलिकांचे साहाय्य घेतले व प्रयत्नाने सामग्री संपादली. काल एक दिवस तुझे आतिथ्य करून मी कृतकृत्य झालो. यापुढे माझे सत्त्व घेऊ नको.'' श्री गुरुंनी एवढे स्पष्ट सांगितले असता त्यांच्या बोलण्याचा काही विचार न करता बाजीरावाने पुन्हा प्रसादाकरिता आग्रह धरला. तेव्हा तो दयानिधी म्हणाला की, ''तू एकटाच ये. यापुढे परीक्षा घेण्याची दुर्बुद्धी धरू नकोस.'' तेव्हा बाजीराव म्हणाला, ''माझे सैन्य प्रसादाकरिता येथे आले आहे, तेव्हा त्यांना सोडून मी एकटाच कसा प्रसाद घेऊ? मला सैन्यासह संतुष्ट करण्याकरिता आपणास काय कमी आहे, तरी हे स्वामीराया, भोजनानंतर आम्हाला निरोप द्यावा?'' तेव्हा श्री गुरु म्हणाले की, ''तू जर माझे सत्त्व पाहू इच्छितोस तेथे माझा काहीच उपाय नाही. तो जगदीश समर्थ असा त्राता आहे. तरी सेनेसह भोजन करून तृप्त व्हा.'' असे म्हणून श्री दीक्षित कोठीत आले आणि तेव्हा कोठीत पाहता सव्वाशे लोकांना पुरेल एवढीच सामग्री होती. ती पाहून तो भक्तकैवारी म्हणाला की, ''सामग्री पुष्कळ आहे.'' एक प्रहरात स्वयंपाक केला तेव्हा बाजीराव परिवारासह आला. त्या सर्वांकरिता अद्‌भुत असे पाट मांडले होते. ते पाहून बाजीरावास आश्चर्य वाटले. बाजीराव, त्यांचा अमात्य आणि त्यांचे सर्व सैन्य या सर्वांना पाट, रांगोळी व कर्दळीची पाने सारखेच मांडले होते आणि पहिल्या दिवसापेक्षा शंभर पट अधिक अन्नपूर्णेचे स्मरण करून त्या सर्वांचे आतिथ्य केले, उणे काहीच पडले नाही. चतुर्विध पक्वान्ने अतृप्त जेवून सर्वजण तृप्त झाले तरी स्वयंपाक पूर्वीप्रमाणेच होता. त्यामुळे ग्रामस्थ लोकही

तृप्त झाले. सव्वाशे लोकांपुरता स्वयंपाक त्या दिवशी केला होता. परंतु प्रत्यक्षात सव्वालक्ष लोक जेवले, तरी स्वयंपाकात काही न्यूनता नव्हती. तेव्हा लज्जित होऊन जेवण झाल्यानंतर बाजीराव स्वामींकडे आला आणि फलमंत्राक्षता हाती घेऊन श्री चिदंबर बाजीरावाला म्हणाले, ''सर्वांच्या मतीने सर्वांचा राजा होतो, आता मला विचारून माझ्या वाणीने फलमंत्राक्षता घे. तुझे पदरी पुष्कळांचे अन्न आहे. याकरिता पुन्हा या वेळी सांगतो हा प्रसाद वस्त्रात घट्ट बांधून आपले घरात ने.'' असे श्री दीक्षित बोलून फलमंत्राक्षता त्याच्या पदरात घातल्या आणि स्वामीवचन ऐकूनही बाजीरावाने तो प्रसाद आपल्या दासाचे पदरात टाकला. हे पाहताच स्वामींचे नेत्रातून पाणी वाहू लागले व म्हणाले की, ''हा राजा काय उदार आहे. याने आपले सर्वस्व सेवकाला दिले. आता याला काय करावे? दैवगती उल्लंघन कोणाला शक्य आहे?'' असे बोलून खिन्न मनाने व मौनाने श्री गुरु बसले. गुरुवचनाचा गौरव न विचारता तो दुर्दैवी बाजीराव स्वामींना वंदन करून सह्याद्री पर्वताकडे निघाला. इकडे श्री गुरुंनी सर्वांना सांगितले की, ''कालगतीला प्रतिकार करता येत नाही. अब्रह्मण्य समय या भूलोकावर आता निश्चित आला आहे. यानंतर द्विज अनाथ होतील. ब्राह्मणाभिमानी' कोणीही उरणार नाही आणि ब्राह्मणाभिमान यापुढे शंकरानीच सांभाळला पाहिजे. परधर्मी तांबड्या तोंडाचे लोकांनी इथे राज्य करीत असता पापभाराने पिडित होऊन ही धरणीमाता शंकरास शरण जाईल. भूमीचे आक्रंत ऐकून गोविप्र व श्रुती रक्षणाकरिता पुन्हा शंकर अवतार घेऊन धर्माची निश्चित स्थापना करतील. तोपर्यंत आपण, दुर्जनांनी कितीही पीडा दिली तरीही आपले धर्माचे भक्तीभावाने नेहमी आचरण करून शिवाचे भजन करावे. कष्टाचा काळ आलेला असतानाही जो भक्तिभावाने शिवाचे भजन करीत असतो त्याचा योगक्षेम सदाशिव निश्चित चालवितो.'' याप्रमाणे सर्वांना बोध करून आनंदकंदाने सर्वांना बोलाविले. तेही अगाध असा भावी समय स्मरून शंकरपदाचे स्तवन करू लागले, ''हे करुणासिंधू, महादेवा, हे प्रभूदेवा, आम्हाला तार आणि धर्मपंथ सांभाळ. या भूलोकावर आम्ही अनन्य गतीक आहोत.'' अशी शिवाची प्रार्थना करून सर्व ब्राह्मण आपले स्थानास गेले. तरी आपले सुखाकरता श्री गुरुला आठवा असे चिदंबर कंकर सर्वांना सांगत आहे.

|| श्री चिदम्बर गुरुवेनम: ||



शि व चि द म्ब र

# अध्याय त्रेचाळीसावा

चतुर्भुजाख्यान

|| श्री शिव चिदंबराय नम: ||

|| श्री गणेशाय नम: || जो हृदयात सूक्ष्म स्थानी आहे व जो सर्वव्यापक असून ध्यान केले असता प्रसन्न होतो त्या शिवचिदंबराच्या पायी चित्त ठेवून पुढील चरित्र ऐका. सप्त गोदावरी तीरी एक चतुर्भुज नावाचा सदाचारी भूमी पालक होता. तो अंतरी नेहमी शिवाचे ध्यान करीत असे व नाना तऱ्हेने धर्महीं करीत असे. परंतु एके वेळी त्याचेवर वैऱ्याचे सैन्य युद्धाकरिता आले. त्याच्याशी तो राजा युद्ध करू लागला. परंतु दुर्दैवाने पराजित झाला आणि शस्त्र प्रहाराने पीडित होऊन दीक्षितास चित्तात आठवू लागला आणि म्हणू लागला, "या वेळी हे दयाराशी, चिदंबरा, माझे प्राण वाचवून माझे पालन करशील तर तुझे चरण दर्शनाकरिता मी येईन. हे सत्य होय." असे श्री गुरुचे स्मरण करून नवस करताच त्याचे शिल्लक राहिलेल्या सैन्यास आवेश चढून दारुण युद्धास प्रारंभ झाला आणि एका क्षणातच शत्रूसैन्याचा पराभव होऊन या राजाचा जय झाला. मग तो राजा आनंदभेरी वाजवत आपले सैन्यासह त्याने नगरात प्रवेश केला आणि सुखाने राज्य करू लागला. तो लक्ष्मीने उन्मत्त होऊन प्राणरक्षक श्री गुरुंचे पाय विसरला. असे काही दिवस जाताच पुन्हा वैऱ्याचे सैन्य त्याचेवर चालून आले आणि राजा युद्धात जर्जर होऊन शस्त्राघाताने भूमीवर पडला. त्यावेळी त्या राजाने आपले मनात श्री चिदंबरास आठवून त्याचा पुष्कळ धावा केला आणि आपल्या अपराधाची क्षमा मागू लागला. स्मरभ्दय विध्वंसक अशा श्री गुरुंचे चित्तात स्मरण करताच श्री गुरुंनी त्या राजाचे दु:ख दूर करून विजयाने त्याला आनंद दिला. त्याच दिवशी त्या राजाचे स्वप्नात दीक्षितमणी आला आणि राजाला मृदू वचनाने म्हणाला की, "प्राणरक्षकास तू विसरलास की काय? ज्याच्या कृपेने तू मृत्युमुखातून सुटलास त्या शिवाला राज्य मदाने विसरलास काय? राज्य सुख भोगत असता मूर्ख उन्मत्त होतो तरी नृपा त्या मार्गाला जाऊ नकोस आणि ताबडतोब शिवदर्शनाकरिता जा." याप्रमाणे त्या राजाला स्वप्नात सांगून श्री चिदंबर अंतर्धान पावले. तेव्हा तो राजा स्वप्नाचा अर्थ आठवून आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला, "सद्गुरू हा दयानिधी असतो. मीच

अपराधी आहे आणि श्री स्वामी माझी कुबुद्धी मनात न आणता माझेवर अनुग्रह करू इच्छित आहेत. मी दुर्दैवी असा दुराचारी आहे. त्यामुळे श्री गुरुंना विसरून संसारी पडलो, परंतु मला यावेळी श्री गुरुंनी स्वप्नामध्ये बोध केला. संसार हा मायामय आहे. याचा पार कोणास लागेल, स्वामींनी निश्चितच यावेळी माझेवर उपकार केला.'' याप्रमाणे राजाने म्हणून पुरोहितास बोलावले व आपल्या पुत्रास मोठ्या आनंदाने पद्माभिषेक केला. नंतर आपले चतुरंग सैन्य, पुरोहित, दासदासी, आप्त व इष्ट मित्र यांना घेऊन जाण्यास निघाला. सर्वांना फार आनंद झाला. कारण आता श्री गुरुंचे पद त्यांना दिसणार होते, त्यायोगे संसार बंधाचे छेदन होऊन श्री गुरुंच्या कृपेने आनंद मिळणार होता. आता आपण श्री चिदंबराचे दर्शन घेऊ, त्यांचे पायावर मस्तक ठेवू आणि आपले हृदगत निवेदून या संसारी कृतकृत होऊ. अशा विचाराने सर्व लोक पुढे जात असता त्या राजाने स्वामींकडे लक्ष देऊन दुर्धर संकल्प केला तो असा, ज्यांचे कृपेने मी वाचलो. युद्धात विजयी पावलो त्या दयानिधीस राज्य मदाने मूर्खासारखे त्याला विसरलो. आता जोपर्यंत श्री चिदंबर दर्शन होत नाही, तोपर्यंत मी अन्न घेणार नाही असा संकल्प करून उपवासाने मार्ग चालू लागला. एक योजन वाट चालून संध्याकाळ जवळ आली असता राजभाटानी शिबिर बांधले आणि त्या शिबिरात तो राहिला. त्या शिबिराभोवती नग्न शस्त्रधारी पहारेकरी होते आणि तो राजा आत बसून त्या चिदंबर मूर्तीचे ध्यान करीत होता. तहान-भूक विसरून प्रेमाने चिदंबर भजन करीत होता. इकडे राजाचा हा संकल्प ओळखून श्री चिदंबर प्रसन्न झाले. तो भक्तवत्सल कृपामूर्ती हातात सर्व सामग्री घेऊन ज्याप्रमाणे रात्र संपल्यावर सूर्य उगवतो, त्याप्रमाणे राजापुढे येऊन उभा राहिला व त्याला आशीर्वाद देऊन म्हणाला, ''मी अत्यंत भुकेजलो आहे. तू आम्हाला भोजन घालशील म्हणून मी तुझे जवळ आलो आहे. जर थोडीशी जागा मला येथे देशील तर ताबडतोब स्वयंपाक करून स्वस्थ चित्ताने भोजन करून सुखाने मी येथून जाईन.'' राजाने ही सुंदर मूर्ती पाहून त्याला मनात आश्चर्य वाटले आणि त्याने उठून सत्वर जाऊन त्या द्विजेंद्राला नमस्कार केला. त्या विप्राचे वचनाचा अर्थ न विचारता 'तथास्तु' असे म्हणाला मग त्यावेळी त्या द्विजाने थोड्याच वेळात स्वयंपाक केला आणि दोन पाने मांडून त्या राजाला भोजनाकरिता बोलाविले, तेव्हा त्या राजाने हात जोडून विनंती केली की, ''माझा एक संकल्प आहे की, चिदंबर पायाचे दर्शन झाल्याखेरीज मी अन्नोदक घेणार नाही आपण सुखाने जेवावे.'' तेव्हा तो द्विज त्या

राजाला म्हणाला की, ''श्री चिदंबर सर्वांचा आत्मा आहे, तो जेथे नाही असे एकही स्थळ नाही आणि तोच तुझे आणि माझे ठिकाणी आहे. तुझा संकल्प सिद्ध झाला आहे म्हणून भोजनाकरिता ताबडतोब उठ. तू निश्चितच चिदंबराला समक्ष पाहिले आहेस, जरी मूर्खपणाने आग्रह धरशील तर मी देखील भोजन करणार नाही. तू देवभक्त आहेस तेव्हा या ब्राह्मणाच्या आशेचे खंडन करू नकोस.'' याप्रमाणे द्विजवचन ऐकताच ब्रह्मक्षोभ होईल म्हणून राजा मनात भ्याला आणि ताबडतोब भोजनाकरिता उठला. माझा संकल्प जरी गेला तरी ब्राह्मणाला फार आनंद होत आहे. तेव्हा शिवाला प्रिय असा दुसरा परमार्थ कोणता आहे असे म्हणून राजा साशंक चित्ताने भोजनास बसला आणि तो जेवीत असता तो ब्राह्मण गुप्त झाला. राजाने मनात विचार केला की, हा कोण द्विज येथपर्यंत आला होता आणि माझा संकल्प नासून तो कोठे गेला हे कळेना. हे पहारेकरी येथे जागत असताना दुसरा कोण आत येऊ शकेल? माझा प्राणरक्षक श्री चिदंबर कौतुकाने आला असावा जर हा चिदंबर असेल तर निश्चितच मला परत भेटेल असा मनात त्याने पूर्वीप्रमाणे संकल्प केला. दुसरे दिवशीही श्री चिदंबराने मायेने त्या राजाला भुलवून त्याला भोजन करून अंतर्धान पावला. श्री चिदंबर चरण धरू म्हणून राजा रोज संकल्प करीत होता व स्वामीही रोज नाना लीला दाखवून त्याला पुन्हा पुन्हा रोज भोजन करवीत होते. याप्रमाणे राजा वाट चालत चालत नवलकुंदपुरास आला. श्री चिदंबरही तेवढ्यातच तेथून निघून गेले. ग्रामसीमा ओलांडून तो कैलासधनी बसला होता. तेव्हा तेथे राजा येऊन श्री चिदंबराचे चरणास वंदन केले. तेव्हा स्वामी म्हणाले की, ''हे चतुर्भुजा कुशल आहेस ना? आज फार दिवसाने भेटलास. काय इच्छा धरून येथे आला आहेस?'' तेव्हा चतुर्भुज म्हणाला, ''वचनाने मला का मोहवतोस? रोज पंक्ती भोजनात मला सहज दर्शन देत होतास.'' असे बोलून त्या राजाने आपले सर्व वैभव स्वामी चरणावर ठेवले आणि दास्यभाव स्वीकारून त्या दिवशी तेथेच राहिला मग त्याचे सैन्याचे रक्षणाखाली श्री गुरुंबरोबर गुरुपुरास आला आणि गुरुकृपेने पुरुषार्थ साधण्याचा मनात निश्चय केला. नंतर आपले लोकांना बोलावून त्यांना आपले मनोगत सांगितले की, ''हा देह यापुढे चिदंबर चरणावर अर्पण केला आहे, मजवर दया ठेवून आपण सर्वांनी घरी जावे आणि धर्मावर विश्वास ठेवून सुखाने संसार करावा.'' हे राजाचे वचन ऐकून सर्व लोक गहिवरले आणि परत येण्याकरिता परोपरीने विनवू लागले. राजाने त्या सर्वांना नाना तऱ्हेने सांगून त्यांचे सांत्वन केले आणि त्या

वेळी त्यांना परत पाठवून दिले व स्वतः वैराग्याने तो चिदंबराची सेवा करीत राहिला. एके दिवशी श्री गुरुंनी त्या राजाच्या निर्धाराची परीक्षा करण्याकरिता त्याला जवळ बोलावून तो करुणाकर म्हणाला, ''तुला माझे एक सांगणे आहे. मला पूजेकरिता सुंदर असे अकरा नर्मदा बाण हवे आहेत. तेव्हा हे भक्तराजा तू ते आणून देशील काय?'' हे गुरु वचन ऐकून राजाने त्यांचे पायास वंदन करून सांगितले की, ''हे दयाघना, तुझे आज्ञेप्रमाणे मी बाण घेऊन ताबडतोब येतो.'' नंतर तो नर्मदेला गेला व अकरा सुंदर बाण आणून श्री गुरुंपुढे प्रेमाने ठेवले आणि वंदन केले. ते बाण पाहून दीक्षित हसून राजाला म्हणाले, ''हे लिंग मला आवडत नाहीत ते दुसऱ्या कोणाला तरी देऊन टाक. हे लिंग ताबडतोब घेऊन जा.'' तो सर्वांतरंग असे बोलताच राजाने साष्टांग नमस्कार करून विनंती केली की, ''हे गुरुवर्या, हे लिंग स्वीकारावे. आपण आज्ञा केली म्हणून मी मोठ्या कष्टाने ही लिंगे आणली आहेत. तरी हे दयानिधी, माझी एवढी सेवा स्वीकारावी.'' तेव्हा श्री चिदंबर म्हणाले की, ''मी निश्चितच हे बाण घेणार नाही. कोणी योग्य असा द्विज पाहून त्याला हे समर्पण कर आणि कृतार्थ हो.'' त्यावर राजा म्हणाला,' हे स्वामीराया, माझी उपेक्षा करू नका. या वेळी हे बाण घेऊन या दासाचे श्रम निवारा.'' याप्रमाणे गहिवरुन तो स्वामींना विनवत होता. परंतु श्री दीक्षितांनी आग्रह धरून मी घेत नाही म्हणून सांगितले. राजाने स्वामींचा हा निर्बंध पाहून त्याचे मनात फार खेद झाला आणि तो उठला व गुरुपद वंदून लिंगे घेऊन निघाला. मग मलप्रभेच्या डोहात त्याने लिंगे टाकली आणि देहत्याग करावा म्हणून पोटावर दगड बांधले. 'चिदंबरा!' असे म्हणून राजाने डोहात उडी घेतली. तत्काळ श्री गुरु तेथे प्रकट होऊन त्यांनी राजाचा हात धरून त्याला बाहेर काढले व म्हणाले की, ''मला ते बाण ताबडतोब दे, ते मी स्वीकारतो, वृथा प्राण का सोडतोस.'' तेव्हा राजाने विनंती केली की, ''देव जर बाण स्वीकारतील तर मी पुन्हा आणून देईन आणि त्याने अशी प्रतिज्ञा केली की, गुरुंचे पुढे बाण आणून ठेवल्यावरच मी भोजन करीन.'' याप्रमाणे प्रतिज्ञा करून राजा ताबडतोब निघाला, आणि एक योजन मार्ग चालून त्या दिवशी एके ठिकाणी राहिला. त्या दिवशी त्याला उपवास घडला होता म्हणून तो क्षीण झाला होता. त्यामुळे दुसरे दिवशी वाट चालताना तो थकला व दोन कोसातच राहिला. अघोर वनात बसून त्या राजाने रसाळ असे गुरुस्तवन आरंभिले आणि मध्यरात्र होताच त्याला किंचित झोप आली आणि झोपेत त्याला अवचित स्वप्न पडले आणि दिनदयाळ कृपावंत राजाशी बोलू लागला, ''हे सुबुद्धा, हा निर्बंध सोड नाहीतर याने तुझा प्राण जाईल व

मला हत्या घडेल. याकरिता भोजन कर. अन्नाने देह वाढतो आणि अन्नरसाने नर बलिष्ठ होतो. अन्नाच्या बलाने प्राण चालतो आणि अन्नाशिवाय जीव जातो. असे अन्न त्यागाने काही काम होत नाही आणि असे हृदयात ( श्री चिदंबरायनम:) निश्चित जाणून घे. याकरिता कर्माचा आनंद करताना फलाशा धरू नये, काम साधो किंवा न साधो. लोक आरंभी निंदा करोत अथवा वंदन करोत परंतु समबुद्धीला बाधा न देता कर्तव्य कर्म करावे. कर्तव्य कर्म करताना कर्मपीडा करू नये तसेच आत्म्याला क्लेष देऊ नयेत. सत्त्वबुद्धीने कर्म करावे. असे सत्कर्म करताच तो शंकर संतुष्ट होतो. हे सर्व सोडून सत्कर्म केले तर सुख कोणासही लाभणार नाही.'' तेव्हा राजाने स्वामींना विनंती केली की, ''जे तुम्ही निश्चित सत्य असे सांगता तसे पूर्वी मी केले होते आणि मला वृथा त्रास मात्र झाला. कृतकर्म देवाला आवडले नाही तर जिवंत राहून काय करायचे आहे. तर हे गुरुनाथा, देहत्यागाचा मी निश्चय केला आहे.'' या प्रमाणे राजाचे वचन ऐकून श्री गुरूंचे अंत:करण द्रवले आणि राजाला त्यांनी आलिंगन देऊन आपले मांडीवर बसवले आणि म्हणाले, ''हे वत्सा, हा निर्बंध सोड. तुझेसाठी मी घाईघाईने आलो आहे. मी तुला घास घालतो तू तोंड उघड. तुझेकरिता लाडू आणले आहेत.'' याप्रमाणे राजाला सांगून ज्याप्रमाणे आई आपले मुलाचे तोंडात घास घालते, त्याप्रमाणेच प्रेमाने भक्ताचे तोंडात घास घातला. पुण्यशील असा तो भक्त धन्य होय. स्वामींचे हाताने तोंडात घास घेताच तृप्त होऊन पुरेपुरेशी स्वामीला विनंती केली. स्वामी म्हणाले, ''थोडेसे घे.'' तेव्हा राजा म्हणाला की, ''इच्छा नाही. माझे पोट आकंठ भरले आहे. तरी हे देवराया, पुरे कर. तरी जे अर्धे लाडू उरले होते ते नदीत टाकून जलचर भक्षून तृप्त होतील असे स्वप्नात बोलावून श्री चिदंबर सत्वर गुप्त झाला. तेव्हा तो राजा सावध होऊन चहूकडे त्याने पाहिले परंतु श्री गुरु कोठे दिसेनात आणि जेवल्याप्रमाणे तृप्ती तर वाटत होती आणि म्हणाला, ''हे काय चरित्र आहे. माझे तोंडात अजूनी घास आहे. नदीत अर्धे टाकतो असे म्हणाले याचा अभिप्राय काय आहे'' आणि पूर्वीसारखीच नर्मदा नदी पुढे दिसू लागली. याप्रमाणे श्री चिदंबर लीला पाहून राजा आश्चर्यचकित झाला व म्हणाला की, ''मला गुरु पावला, त्याने माझे प्राण वाचविले.'' आनंदाच्या भरात स्फुंदत त्या दयानिधीचे गुण तोंडाने गात व श्री गुरु चरित्र आठवित देहभान विसरून तो बसला. मग प्रात:काली उठून सुंदर बाण घेऊन निघाला आणि आनंदाने गुरुचरण पाहून वंदन केले व लिंगसमर्पण केले. राजाची दृढ भक्ती पाहून श्री गुरु फार प्रसन्न झाले आणि विचारले, ''काय इच्छा धरून तू येथे राहिला आहेस

ते माग तुला वर देतो. तुझे भक्तीने मी तुष्ट झालो आहे. तुझे मनात जे अभिष्ट आहे ते जरी देण्यास दुर्लभ असेल तरी माग. शिवालयात शिवाला मागून तुला देतो.'' असे स्वामींचे अभयवचन ऐकून राजाने त्याचे चरणास वंदन केले व म्हणाला, ''मला वरदान द्यावयाचे असेल तर स्वामीराया, एक दे म्हणजे मला ज्ञान मार्ग सांग. जो योगाने विलसतो आणि ज्यामुळे भवसमुद्र क्षणात तरून परमपदास जाता येईल. याप्रमाणे भक्ताची विनंती ऐकून श्री गुरु चित्तात संतुष्ट झाले आणि त्याने भक्तास एकांती नेऊन ज्ञानोपदेश दिला. श्री गुरुकृपेने चतुर्भुज सहजच कृतकृत्य झाला आणि योग ज्ञानबीज जाणून संसाराचे पैलतीरावर पोचला. नंतर श्री गुरुंची आज्ञा घेऊन स्वच्छंदाने घोर वनात प्रवेशला आणि गुहेत एकांती बसून समाधी योगाचा अभ्यास सुरू केला. गोमृगकाकचर्या कधी कधी आचरून योगक्रिया वश करू लागला. केव्हातरी अजगर चर्या घेत असे. केव्हा केव्हा जड, आंधळा, बहिरा, मुका असे दाखवीत असे आणि केव्हा मोठा परिपाठी पंडित आहे असे दाखवून दुसऱ्यांना बोध करीत असे. त्याच्या उपदेशाने पुष्कळ लोक ज्ञानमार्ग निपुण झाले. कित्येकांना योगज्ञान लाभले आणि कित्येकांना सहजासहजी समाधी लागू लागली. ज्याचा उपदेश होता क्षणीच तत्काळ निर्विकल्प स्थिती साधून कित्येक श्री चिदंबर चरणी लीन होऊन राहू लागले. हा चतुर्भुज श्री गुरुंचा कृपापात्रभूत होता आणि त्याचा अद्‌भुत उपदेश होताच सर्व कार्य साधत असे आणि सर्व सिद्धी वश होत याकरिता तुम्ही सर्व श्रोते ज्याचे भक्त सर्व लोकात निश्चित मान्य होतात अशा श्री गुरु पदाचे भजन करा. श्री चिदंबर चरित्राचा पाठ केल्यास जन्मांतरीचे सर्व कष्ट नाहीसे होतात आणि इहलोकीचे सर्व अरिष्टांचा नाश होऊन सुख मिळते. आपले चरित्र श्री गुरु श्रवण व पठण करताच त्याचे हृदयी वस्ती करून निश्चित निजज्ञान देतात. एकवारही हा यज्ञ खंड कानी पडताच दुखंड होतो आणि संसारात चिदंबर कृपेने उदंड सुख मिळते. यज्ञ करण्याची ज्यांना शक्ती नाही त्यांनी हे चरित्र ऐकावे. त्यामुळे त्यांना चिदंबर कृपेने निश्चित यज्ञफल मिळते. आनंदमूर्ती चिदंबराचे भक्तिभावाने मनात ध्यान करून मनात कोणताही शंका- न धरता सुख राशी लुटा असा हा चिदंबर किंकर सर्वांना सांगत आहे.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।





शिव चिदम्बर

# अध्याय चव्वेचाळिसावा

संन्याशाला रामेश्वर स्वरूप दर्शन

||श्री शिव चिदंबराय नम: ||

|| श्री गणेशाय नम: || हे धर्ममूर्ती पाप-पुण्याकरिता आत्मज्योती, श्री गुरुराया, माझी अहंवृत्ती निवारून हे दयाळा मला सत्यवृत्ती दे. हे गुरुनाथा, कृपावंता श्रीकंठा श्रीसखा-चिंता, श्रीपत्र पूजीता, श्रीतक्षेमदाता, श्री शिवानाथा तुला नमन असो. हे श्रीयाळ सखा, गंगाधरा, श्रेयकारका, श्रीतमोक्षदायका, श्रीवरवल्लभा, श्रीमदहरका, श्रीप्रदायका, तुला नमन असो. हे लोकमान्या उदारा, तुला नमन असो. अगणित पुण्या, वेदवर्ण्या अर्धांगीकृत शैलकन्या अपूर्व लावण्या तुला नमन असो. मोक्ष साधण्याकरिता सर्व मुमुक्षजन आपले हृदयात तुझे ध्यान करतात आणि हा भवसिंधू अनायसे तरतात. द्विजांनी मुनिश्वराला विचारले की, सोमयाग उरकल्यावर तो सर्वांतरंग काय करीत होता. जे ऐकल्याने पापांचा समुह एक क्षणात भस्म होतो असे श्री चिदंबर कथामृत पिऊन मन तृप्त झाले आहे तरी त्याचे स्वाद लोभात गुंतवून पिपासा जात नाही. कानाला जे अमृत आहे आणि ऐकल्याने चित्तातील मल दग्ध होतो आणि वैराग्य आणि भक्ती देण्याकरिता समर्थ आहे असे श्री चिदंबराचे चरित्र आहे. त्याचे लोक स्वसुखाकरिता सेवन करतात पण जर तेथे आळस केला तर त्यास कल्पांतीही सुख प्राप्ती होणार नाही. संसाररूपी अरण्यास हे चरित्र अग्नी आहे व- ताप शमनाकरीता ते मेघ आहे आणि रोग नाशाकरीता ते अमृत रसायन आहे. तरी हे चिदंबर चरित्र ऐका. हे कथामृत पिण्याची ज्याची इच्छा होईल त्याची मोहमाया नाश होऊन भवसिंधू निश्चित आटेल. हे चरित्र ऐकताच संसारचिंता तिळभर राहणार नाही आणि अज्ञान भ्रांती उडून आत्मज्योती झळकेल. अशी ही श्री चिदंबर लीला आहे. राजद्विजासहित श्री चिदंबराने अपार द्रव्य खर्च करून सोमयाग केला आणि आपले यशाने आकाशसुद्धा झाकले. नंतर गुरुपुरास येऊन श्री स्वामी सुखाने राहिले असता एक संन्यासी गंगा घेऊन रामेश्वर यात्रेस निघाला होता. मार्गात श्री रामेश्वर ब्राह्मण रूपाने त्याचे स्वप्नी आला व म्हणाला, ''हे यतीशा, तुला एक गुप्त गोष्ट सांगतो. ती तू चित्त देऊन ऐक. तू रामेश्वराच्या अभिषेकाकरिता गंगा घेऊन निघाला आहेस. तरी तेथे मी राहत नाही. आता गुरुपुरी येऊन एक भावाने माझी पूजा कर. हे

यतीनायका तू याविषयी शंका घेऊ नकोस.'' असे बोलून तो रामेश्वर गुप्त झाला. मग तो यतीश सावध होऊन अंत:करणात स्वप्नाचा अर्थ विचारून निश्चय करून श्री चिदंबर दर्शनाकरिता निघाला. तो गुरुपुरास येऊन सभेत श्री गुरुंना पाहून त्यांना वंदन करावे म्हणून त्याने कावडी जमिनीवर ठेवल्या. तोच श्री चिदंबर लगबगीने उठले. आश्रम धर्माचे विरुद्ध यती आपणास वंदन करेल तसे निषिद्ध होईल म्हणून श्री दीक्षितांनी आधी यतीपदास वंदन केले. त्या यतीचे हात धरून श्री स्वामींनी त्यास सभास्थानी नेले व उत्तम आसनावर बसवून यथाविधी पूजा केली. मग दोन्ही हात जोडून दीक्षिताने यतीस विचारले, ''आपणास कोठपर्यंत जावयाचे आहे व येथे आपण कोठून आला.'' तेव्हा यतीश्वर म्हणाला, ''येथून मला कोठेच जावयाचे नाही. मी गंगानीर घेऊन रामेश्वराचे अभिषेकाकरिता निघालो आहे परंतु सेतूबंधी रामेश्वर नाही असे त्या दयानिधीने स्वत: स्वप्नात सांगितले म्हणून मी रामेश्वर दर्शनाकरिता आलो आहे. हे रामेश्वरा, विश्वेशा, माझी आशा पुरव. तुझे कृपेने मी सहजासहजी शाश्वत पद पावेल.'' तेव्हा श्री चिदंबर यतीला म्हणाले की, ''रामेश्वर येथे आहे असे तू म्हणतोस तो कोठे आहे ते मला दाखव. त्याचे दर्शनाकरिता मीही येईन. तुमच्यामुळे माझ्यासारख्या गृहस्थालाही दर्शन होईल.'' तेव्हा तो यती चिदंबरांना म्हणाला की, ''हे दयाळा, माझी वंचना का करतोस. तूच गिरिजानायक आहेस आणि तुलाच अभिषेक करण्याकरिता मी येथपर्यंत आलो आहे. तरी हे देवराया, माझे मनोरथ पुरवा.'' तेव्हा श्री चिदंबर म्हणाले की, ''मला दोन बायका व सहा मुले असा मी संसारी मनुष्य आहे. मी रामेश्वर कसा असू शकेन? माणसाची स्तुती का करता आणि आता दुपारची वेळ झाली आहे. तरी भिक्षेकरिता ताबडतोब यावे.'' परंतु यती दीक्षितांना निर्धाराने म्हणाला, ''आज रामेश्वर अभिषेक करूनच भिक्षा घ्यावयाची आहे.'' तेव्हा तो सावित्री, प्राणसखा मंद हसून यतीला म्हणाला, ''येथून सेतुबंध शंभर योजने दूर आहे तेव्हा आज अभिषेक करून भिक्षा कशी घेणार?'' तेव्हा यती म्हणाला, ''सेतुबंध रामेश्वर माझे जवळच आहे आणि मनुष्यरुप असा त्यास मी अभिषेक करुन भिक्षा घेतो. मार्गात रामेश्वराने स्वप्नात प्रकट होऊन मला सांगितले, 'तूच रामेश्वर आहेस' म्हणून तुझे अभिषेकाकरिता गंगेचे पाणी आणले आहे.'' असे बोलून त्या यतीशाने कावडीतून गंगा पात्र काढून श्री स्वामींपुढे भक्तिभावाने ठेवले. श्री चिदंबराने गंगेची पूजा करून कुंकू आणि वस्त्र समर्पण करून हात जोडून यतीला विनंती केली की, ''अभिषेकाचा आग्रह धरू नये.'' यती हट्ट सोडेना व दीक्षितेंद्र अभिषेक स्वीकारेना. त्यामुळे यतीने रुष्ट होऊन गंगापात्र

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

आपटून फोडून टाकले आणि म्हणाला, ''माझी पूजा तुझे मनास येत नाही तर मग प्राण ठेवून काय उपयोग? तरी तुला शेवटचे वंदन करून हे गिरिजारमणा मी देह सोडतो.'' याप्रमाणे संन्यासाने वंदन करून आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे देहत्यागाकरिता निघाला. हे पाहून श्री स्वामी मनात म्हणाले की, ''या यतीची निष्ठा धन्य होय.'' मग त्या यतीस बोलावून तो तेजोराशी प्रेमानंदाने बोलला, ''तू अभिषेक करू इच्छितोस तरी तुझ्या सुखाकरिता ताबडतोब कर.'' तेव्हा यतीने विनंती केली, ''जर तू अभिषेक स्वीकार करशील तर पुन्हा काशीस जाऊन गंगा मी ताबडतोब आणतो.'' तेव्हा श्री चिदंबर म्हणाले, ''ताबडतोब स्नान करून यावे. आज शंकर तुमचे मनोगत निश्चितच पूर्ण करणार आहे.'' हे स्वामी वचन ऐकून त्या यतीने मोठ्या आनंदाने नदीत स्नान करून घरी येताच श्री गुरुने कौतुकाने त्याचा हात धरून होमशाळेत नेले. नंतर त्याचा हात सोडून स्वामी एका मोठ्या भांड्यात बसले. मग तो भक्तकैवारी यतीला म्हणाला, ''डोळे झाकून संकल्प कर आणि यथासांग पूजा संपल्यावर डोळे उघडून पहा.'' असे श्री चिदंबर बोलताच एक नवल झाले. यतीपुढे धरणी दुभंग झाली आणि तेथून गंगापात्र निघाले. हे चरित्र पाहताच तो यती अंत:करणात संतुष्ट झाला. अकरा आवर्तने करून रुद्राभिषेक करीन असा संकल्प करून त्याने डोळे झाकून पूजा सुरू केली. एकेक आवर्तन संपताच हाताने स्पर्श करताच त्याचे हातास दीक्षित न लागता दिव्य लिंग हातास लागत असे. त्यामुळे यतीला अत्यानंद झाला व म्हणाला की, ''हाच शंकर आहे. माझे पुण्य थोर होते म्हणून मी येथवर आलो.'' चित्तात प्रेम दाटले. कंठ सद्‌गदित झाला. डोळ्यांतून आनंदाश्रू निघाले आणि अंगी रोमांच दाटले. आणि रुद्राचे आवर्तन तो मोठ्यामोठ्याने करू लागला. प्रत्येक आवर्तन संपताच तो लिंग शिरावर मस्तक ठेवून प्रेमाने आलिंगन घेत होता. याप्रमाणे दहा आवर्तने पूर्ण होताच त्याने मनात विचार केला की, रुद्रावर्तन अभिषेकाकरिता श्री स्वामी येथे बसले नाहीत आणि दहा आवर्तने यथासांग करून रामलिंग कसे आहे, हे डोळे भरून पाहू'' असे तो म्हणाला. जेव्हा त्याने डोळे उघडून पाहिले तेव्हा त्याला ते दिव्यलिंग पुढे दिसले हे अगाध चरित्र पाहून तो तटस्थ झाला. त्याचे देहभान हरपले. श्री रामेश्वर सेतुनाथ पाहताच यतीने त्याला वंदन केले आणि आसन सोडून आनंदाने नाचू लागला. तेव्हा रामलिंग बोलले की, ''हे यतीराया, जेव्हा तू डोळे उघडलेस तेव्हाच तुझी पूजा संपली'' असे म्हणून रामलिंग ताबडतोब गुप्त झाले. परंतु लिंगाचे ठिकाणी श्री चिदंबर यती समोर उभा राहिलेला दिसत होता, तेव्हा तो यतीश्वर अत्यानंदाने अनेक स्तोत्रे करू लागला. जयजयाजी

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

चिदंबरा, जगन्निवासा, रामेश्वरा, हे शकंर, मी तुला शरण आलो आहे. या अनाथांचा तू सांभाळ कर. तू स्वानंद सागरीची प्रेमलहरी आहेस. निर्विकार असा तू विश्व व्यापक आहेस आणि तुझे गुण वर्णन करताना चारी वेद मौनावले. जय विश्वपते चिदंबर, जय रामेश्वरा, जगन्निवासी तव पाद सरोजिनी हर शरणम् यातमव प्रभोऽधुना कलीकल्मषदून मानसान कृपया त्रातुममून समागतम नररूपिण मार्यत्सेवीतम् शरणं याही चिदंबरं मनः। मम दुर्जर संसृतेर्भयं हर कारुण्य निधी चिदंबर त्वदनन्य गतेर्गतिप्रद भुवि कैलासपतीर्थवा निह न हिमेगतीरास्ती चान्यथा नरवेष विरहय्य शंकरम्।। करुणाकर दिन मांगतम् शरणम् मामव पादयोस्तव ।। यदी मा विजेहासी सर्वगत्व हतेन्यः कत मोऽस्ति रक्षिता। जननी जनक स्तवमेव सत्यमम देह्याशु करावलंम्बनम् निजभक्तज नैरगेन्द्रकन्यया हरिपादान्ज भुवादिभीर्युत जनजन्तुततीः सहस्त्रसाव विता मे अस्तु गतिः समे प्रभुः। इति स्तुवंन्त बहूशो नमन्त प्रेमाश्रु मन्त यतिशेखरंतम्।। आश्वास्त भुयो यतिसद्धतीशो वरन्ददौतन्म सीप्सिताश्र'' याप्रमाणे स्तोत्र करून यतीने सद्‌गुरु चरणी वंदन केले. तेव्हा स्वामींनी संतुष्ट होऊन आपला वरद हस्त त्याचे डोक्यावर ठेवला आणि त्याला ब्रह्मोपदेश दिला, त्यामुळे त्याचे अज्ञानाचा नाश होऊन तो तत्काळ जीवनमुक्तीस पावला. असा हा श्री गुरुचा महिमा आहे. जसा सूर्य उगवताच अंधार ताबडतोब पळतो किंवा चंद्र उगवताच चंद्रकांत मण्यास पाझर फुटतो तसे त्या सच्चिदानंद परमेश्वराने यतीला आत्माराम दाखवून मग तो करूणाकर आदराने म्हणाला की, ''हे यतीराया, आमची भिक्षा घ्यावी'' याप्रमाणे यतीला भिक्षा करवून त्या कैलासवासीने त्याला आदराने बोलविले. ही वार्ता ऐकून सर्वांचे मनात हर्ष मावेना. रामेश्वरबुद्धीने श्री चिदंबरास सर्व भजू लागले. जे आपले हिताची इच्छा करतात त्यांनी चिदंबराची सेवा करावी. हृदयात चिदंबराचे ध्यान करावे. वाचेने चिदंबराचे भजन करावे. हाताने चिदंबराची पूजा करावी. चिदंबराचे चित्तात स्मरण करावे आणि चिदंबराला भावाने आळवावे. हृदपद्मी चिदंबराचे ध्यान केले असता सर्व देवता तुष्ट होतात आणि आपले सर्व मनोरथ पूर्ण करून अहोरात्र आपणास सांभाळतात. आनंदाने हात वर करून हा चिदंबर किंकर अति आदराने भक्तांना विनंती करतो की या चिदंबर लीलामृताचे सेवन करा.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।



शिवचिदम्बर

शिवचिदम्बर

# अध्याय पंचेचाळिसावा

संसारचंद्राचे रोग निवारण

।। श्री शिव चिदंबराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। दूर असणारा देखिल ज्याचे स्मरण करताच महा मृत्यूभयापासून मुक्त होतो अशा त्या श्री चिदंबरापायी भाव ठेवून त्याचे चरित्र पुढे सांगतो ते ऐका. त्याचे श्रवणाने देहात्म बुद्धी दूर होऊन सत्वर निजानंद मिळतो. काश्मीर देशी एक राजा राहत होता आणि नाना तऱ्हेने द्विजांची भक्ती करत असे तसेच धर्मकार्यात त्याला अतिशय प्रीती होती आणि त्याचे नाव संसारचंद्र असे होते. तो प्रख्यात असा दाता, त्याची कीर्ती ऐकून त्याचेकडे द्विजगण याचनेकरिता येत असत. त्यांना तो पुष्कळ द्रव्य देत असे. त्यातही जे चिदंबर चरित्र सांगत असत, त्यांना मोठ्या प्रेमाने वस्त्र, द्रव्य देत असे. पुष्कळांचे तोंडून चिदंबर कथा ऐकल्यामुळे तो राजा मोठा ज्ञानी झाला आणि चिदंबर भजनाने काळ क्रमून शास्त्रोक्त धर्म आचरत होता. असे असता काही दिवसांनी त्याच्या दुर्दैवामुळे असह्य असा राजयक्ष्मा रोग त्याच्या देहाला झाला. त्यामुळे त्याला अत्यंत पीडा होऊ लागली. नाना देशातून त्याने वैद्य आणले आणि औषधोपचार केला तरी तो रोग बरा होईना. ज्योतिषी ग्रहहवन करू लागले, तरीही त्याला बरे वाटेना. जप, होम व सुरार्चन पुष्कळ केले तरीही रोग बरा होईना. तो रोज वाढू लागला. राजाचे अंगातील शक्ती क्षीण होऊ लागली आणि तो रात्रंदिवस तळमळू लागला आणि म्हणाला, ''या वेळी प्राणत्याग करणेच ठीक होईल'' असा मनात निश्चय करून मध्यरात्र झाली असता चहूकडे स्तब्धता पाहून संसारचंद्र उठला आणि एकटाच मंद चालीने बुरुजावर चढला. त्याचे चित्त शोकाने दाटले होते. आणि खाली बसून तो रडू लागला. आपले जन्मादारभ्य संचित झाले आणि आपले निजकर्म मनात आठवून दीर्घ शोकाने स्फुंदत बसला आणि प्राणभयाने आतुर झाला. तो विचार करू लागला की जन्मापासून आजपर्यंत जे स्मरणाने केलेले पाप ज्याचे स्मरणाने जाते त्या शिवपदांना आपण चित्तात आठवले नाही आणि व्यर्थ आपण आपले आयुष्य खर्च केले. सुखाकरिता स्वर्ग मिळण्याकरिता यत्न केले नाहीत. आता माझ्या या दुःखाचे हरण करण्याकरिता या वेळी कोण भेटेल. स्त्री, धन, आप्त आणि मुले

एवढेच संसारात सुख आहे असे समजून त्यांचे हिताकरिता पुष्कळ प्रयत्न केले. परंतु ते सर्व वाया गेले. माझेवर प्राणसंकट येताच त्यांनी मला काय सुख दिले. या वेळी मला तारक कोण भेटेल. मी काही सत्कर्म केले नाही. वेदांत शास्त्र ऐकले नाही किंवा गुरुपायाचे सेवेचे बळाने देह बंधन तोडले नाही. तीर्थयात्रा केल्या नाहीत. सत्पात्री दान दिले नाही. तेव्हा या महारोग पीडिताला कोण त्राता मिळेल. या देह पोषणाला आसक्त होऊन मी कृपण होऊन कुर्मती आणि उन्मत्त झालो. सत्पुरुष बोधात चित्त दिले नाही पण विषय लोभाकरिता प्रयत्न केले, आता रोगरुपी अग्नीत पोळत असता मला कृपासागर, दयाळू व तारक कोण मिळेल. याप्रमाणे आपले निजकर्म आठवीत राजा अस्वस्थ झाला व काय करू व कोठे जाऊ असे म्हणून दुःखाने रडत बसला. ब्राह्मणाचे मुखाने ऐकलेले त्याचे मनात एकदम श्री दीक्षित चरित्र आठवले आणि मग थोडे स्वस्थ होऊन श्री स्वामींना त्याने एकभावाने आठवले मग त्यांची मनात पूजा करून राजाने त्या करुणानिधीस प्रार्थना केली, "हे ज्ञानराशी दयाळा, माझे सुदैवाने तुझे स्मरण झाले आहे. तप, यज्ञ, जप, ध्यान, दान आणि पुष्कळसे होमहवन करूनही जो दयाघन भेटत नाही, असा तू दिन रक्षणासाठी पोटी दया उपजून मनुष्यरुपाने या भूलोकावर अवतरला आहेस. त्यात तुलाही मी भेटलो नाही. हे दिनानाथा, सांबा, शंकरा, मृत्युंजया, श्री चिदंबरा, या भवसिंधूत पडून हे दातारा तुझा प्रभाव मी ओळखला नाही. हे दयाळा, मी मदान्ध होऊन तुझी अगाध कीर्ती ऐकून सुद्धा तुझ्या निजानंद देण्यास समर्थ अशा पदांबुजांची सेवा करीत असे. हे महाराज तुम्ही या भूलोकावर मोक्षदानी आहात आणि तुम्ही अवतार घेऊन आले असता राज्यमदाने मी पतित तुमचे चरणी शरण आलो नाही. हे श्री चिदंबरा ज्या देहावर मनाने प्रभुत्व मानून सुगंधी जल, वस्त्रे व भूषणे मोहाने व ममतेने परिधान करीत होतो. तो देह आता नाना प्रकारचे दुःख देत आहे आणि तुजवीण मी परदेशी झालो आहे आणि अनन्य गतीकही यावेळी झालो आहे. जो मूर्ख मनुष्य या तुच्छ देहावर प्रभुत्व मानतो तोच या संसारात दुःस्वभाव असून त्याचे नाव नरपशू होय. त्याला फक्त माझ्यासारखीच व्यथा आहे. त्याला शेवटी दुर्गती मिळेल. हे चिदंबरा अशा पतिताला परलोकी सांभाळ. देहाभिमानाचे योगाने महादुःख न सोसता मी या दुर्गमस्तकावर चढलो आहे. येथून उडी घेऊन देह सोडू इच्छितो. हे दयासागरा, चिदंबरा, हे दातारा मी फार संकटात पडलो आहे. मला आता दोन्हीकडे थारा नाही. हे दीनकैवारी, आता धाव. आत्मघात भयाने परलोकी यमयातनेमुळे



शि व चि द म्ब र

मी कसा सुखी होईन. परंतु या इहलोकात असत्य रोग असता हे दीनानाथा, मी सदा दु:खी आहे. इकडे पाहता विहीर तिकडे पाहता घोर तलाव, मी पामरमधे सापडलो आहे. तरी हे चिदंबरा मला तार. माझे अघोर पाप म्हणून तुझा विसर पडला. मागे वाघ व पुढे अजगर, हे दयासागरा, मला तार. दोन्हींकडून लाकूड पेटले असताना त्याचे मध्यठिकाणी ज्याप्रमाणे किटक आश्रयाकरिता जातो आणि नंतर चरफडतो तसा मी झालो आहे. पुढे धनुर्धर असा- व्याध आणि मागे लांडग्यांचा तांडा धावत आहे आणि मध्ये असणारे हरीण संकटात सापडते तसे संकट या वेळी मजवर आले आहे. श्रीमत् चिदंबरा, परलोक बंधु, वेदांत वेद्या, करुणानिधी तुझे चरणी परलोक भयाने देवदयाळा, शरण आलो आहे. तुझे दिव्य पाद द्वंद्व चित्ती दृढ धरून मी स्वेच्छेने प्राण सोडतो तरी हे वेदान्त वेद्या मला तार. मरणास टेकलेल्यास सद्‌गती देण्याकरिता जो कैलासपती समर्थ आहे आणि जो त्याचे स्मरणाने भीती निवारतो त्या शिवाला नमस्कार असो.'' असे चिदंबर पद कमळ काया, वाचा, मनाने केवळ प्रेमाने आठवून त्या राजाने साष्टांग नमस्कार घातला. चिदंबर असे उच्चारून त्याने तटावरुन उडी टाकली. तेव्हा तो दयाखणी प्रकट झाला. खाली मोठा पलंग असून त्यावर मऊ अशी गादी अंथरली होती आणि चारी कोपऱ्यात दिवे लावले होते. जेव्हा त्या राजाने तटावरून खाली उडी घेतली तेव्हा तो त्या मऊ गादीवर पडला आणि श्री स्वामींनी त्याला हाताशी धरले. नंतर त्या राजास सावध करून त्याला बसविले. मग तो भक्तकैवारी म्हणाला, ''अशा या मध्यरात्री प्राण देऊ इच्छिणारा तू कोण आहेस? आत्मघात हा भयंकर असता तू सुखाने का स्वीकारतोस? प्राण देऊन तू अपयश कोणाला देऊ इच्छितोस?'' अशी दटावणी देऊन राजाला श्री स्वामी बोलत असता राजाला मनात आश्चर्य वाटले व त्याने डोळे उघडले. जसा सूर्य उगवताच सोज्ज्वळ प्रकाश फाकतो तसा तो तेजस्वी भक्तवत्सल पुढे उभा राहिलेला दिसला. करुणार्णव श्री चिदंबर भस्म रुद्राक्षाचे अलंकार लेवून तो कर्पूरगौर शोभत होता आणि आपल्या भक्ताला तारण्याकरिता आला होता. दोन शुभ्र वस्त्राने शोभत होता. हातात उत्तम अमृतकलश होता व तो मेघ:श्याम आनंदधाम मंद हसत पुढे चमकला होता. राजा मनात वितर्क करीत होता की, हे काय कौतुक झाले. हा रमानायक आहे काय? की उमापती आला आहे. हा दारुण रोग सहन न होऊन मी सुखाने प्राण देत होतो आणि हा कोण ज्याने येथवर येऊन माझे प्राण वाचविले. चिदंबर नावाची गर्जना करून मी तटावरून उडी

घेतली म्हणून तो दयानिधी श्री चिदंबर धावून आला असेल काय? किंवा याज्ञवल्क्य, वामदेव अथवा दत्तात्रय असेल काय? कारण ते सद्हृदयाने परोपकाराकरिता सर्व ठिकाणी संचार करतात. ही मध्यरात्रीची वेळ आहे आणि हे स्थान निर्जन आहे आणि येथे त्याचे काय काम आहे? तेव्हा तो येथे आपल्या वैभवाने राहण्याकरिता आला आहे. माझे प्राण रक्षणाकरिता तो दयाळू श्री चिदंबर दीक्षित निश्चितच या दुर्गम ठिकाणी आले आहेत. नाहीतर येथे कोण राहू शकेल, असे प्रेमाने मनात विचार करून प्रेमाश्रूंनी त्याचे नेत्र भरले आणि त्या प्रेमळ भक्ताने स्वामी पायांवर आनंदाने दंडवत घातला. तेव्हा तो कृपाचित्त चिदंराबने त्याचे डोक्यावर आपला अभयकर ठेवून त्या राजाला सत्वर उठवून त्याला प्रेमालिंगन दिले. मग राजा सावध होऊन आपले वस्त्राने दोन्ही डोळे पुसून आदराने दोन्ही हात जोडून मृदू वाणीने बोलला. ''येथील प्रजापालक मी संसारचंद्र या नावाचा राजा आहे आणि राजयक्ष्मा रोग दुःख सहन न झाल्यामुळे प्राणत्यागाकरिता उडी घेतली. या निर्जन ठिकाणी मध्यरात्रीचे वेळी हे दयानिधी या अनाथाचे प्राणरक्षण करण्याकरिता धावलात? तरी आपण कोण व आपले नाव काय आहे? येथे कशाकरिता वस्ती केली आहे. तुमचे सोबती कोणी दिसत नाही तरी माझेवर कृपा करून आपली ओळख सांगावी.'' अशी राजाची विनंती ऐकून तो भक्त कनवाळू म्हणाला, ''सर्व लोक मला चिदंबर म्हणतात. मी दक्षिण देशस्थ ब्राह्मण आहे व तीर्थयात्रेसाठी आलो आहे आणि एकांत पाहून येथे राहिलो आहे. शंकराने तुझे प्राण वाचवले आहेत.'' ही दीक्षितवाणी ऐकून राजा म्हणाला, ''तुम्ही तीर्थयात्रेकरिता एकटेच आला आहात मग हे पलंग गादी वैभव तुमचेजवळ कसे?'' तेव्हा दीक्षित मंद हसून म्हणाले, ''पलंगाची सवय मला लहानपणापासून आहे आणि पलंगाशिवाय मला झोप येत नाही.'' श्री स्वामींनी विचारले की, ''तू प्राणत्याग का करतोस ते मला सांग'' तेव्हा तो राजा म्हणाला, ''यक्ष्मा रोगाने मी फार पीडित आहे आणि हे कष्ट मला सोसवत नाहीत म्हणून मी प्राणत्याग करीत आहे.'' तेव्हा त्या कनवाळूने विचारले की, ''तुझा रोग कोणता ते मला सांग. तरी तुला उत्तम उपाय आरोग्यासाठी सांगतो'' तेव्हा राजाने आपल्या देहाकडे पाहिले आणि त्याला थोडेसेही रोगाचे चिन्ह दिसले नाही आणि त्याची अंगकांती चहूकडे सोन्यासारखी फाकत होती. त्याच्या अंगात पूर्ण शक्ती भरली. असे चरित्र पाहताच श्री गुरुपदी गाढ मिठी घालून नाना तऱ्हेने तो राजा स्तोत्रे करू लागला. ''जय षड्गुणैश्वर्या-निरुपमा, षड्गुणातीता, आनंदधामा,


शिव चिदम्बर

षटचक्र संचारक, ज्ञानात्मा, षडानन जनका तुला नमन असो. तू भवसागर नाशक अगस्ती आहेस. अज्ञानतम नामक सूर्य आहेस आणि सर्व ब्रह्मांडी वस्ती करून शोधले तरी दृष्टीस पडत नाहीस.'' याप्रमाणे स्तवन करून मग राजाने हात जोडून विनंती केली की, ''दयाखणी घरी चला.'' राजा पुढे जात होता आणि श्री चिदंबर मागे चालत होते. याप्रमाणे राजामागून श्री दीक्षित महाद्वारापर्यंत आले आणि राजाने उंबऱ्यात पाय ठेवताच श्री गुरु गुप्त झाले. राजाने मागे फिरून पाहताच श्री दिक्षित दिसेना व तो फार विव्हल होऊन जमिनीवर बेशुद्ध होऊन पडला. एक मुहूर्तानंतर तो सावध होऊन त्याने स्वामी ज्या ठिकाणी गुप्त झाले होते, त्या ठिकाणी वंदन करून चिदंबराचे ध्यान करीत बसला मग सकाळी तो राजा उठून आपले सिंहासनी रुढ झाला. तेव्हा सर्व सभासदांना राजाला पाहून आनंद झाला. तेव्हा राजानेही त्या सभासदांना वृत्तांत सांगितला आणि सर्वजण आनंदाने डोलून श्री दीक्षितांना वंदन करू लागले आणि म्हणू लागले, प्रत्यक्ष शंकराने जग उद्धार करण्याकरिता चिदंबर नावाने अवतार घेतला आहे. मग त्या राजाने द्रव्य, अलंकार आणि सुंदर असा पितांबर प्रधानाजवळ देऊन तत्काळ स्वामींकडे पाठविले. त्याने गुरुपदास येऊन स्वामींचरणी मोठ्या प्रेमाने ते अर्पण केले. ते पाहून सर्व लोक आनंदाने डोलू लागले. श्री गुरुनी मंत्र्याला बोलावून फलमंत्राक्षता दिल्या. राजालाही फलमंत्राक्षता दिल्या आणि सांगितले की, ''कोणतीही संसार चिंता न करता शिवाला स्मरून, त्याचेवर विश्वास ठेवून सुखाने राज्य करावे. धर्माने राज्याचे पालन करावे. प्रेमाने शिव भजन करावे. याप्रमाणे कालक्रमणा करावी. त्या योगे जन्मसार्थक होईल.'' श्री गुरुंचे मुखातून हा बोध ऐकून राजाला अत्यंत आनंद झाला व मनात श्री गुरुपद आठवून तो सुखाने राज्य करू लागला. श्री चिदंबर भजनाचे योगाने इहविषय सर्व भोगून शेवटी त्याच स्थळी पोहोचला की, ''जे शिवभक्तीशिवाय दुर्मीळ आहे असे हे श्री चिदंबर चरित्र आहे.'' आणि हे पवित्र चरित्र जे भक्तीने सेवन करतात ते श्री चिदंबरास प्रीती पात्र होतात. तरी आपले हिताकरीता श्री चिदंबर सेवा करावी असे हा चिदंबर किंकर श्रोत्यांना वारंवार विनवीत आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥



शि व चि द म्ब र

# अध्याय सेहेचाळिसावा

विधवेला सौभाग्य प्रदान

|| श्री शिव चिदंबराय नमः ||

|| श्री गणेशाय नमः || हे आदिपुरुषा, भक्तवत्सला, चिदंबरेशा, मायामानुष-वेषा, मुक्तीकंठभूषा तुला नमन असो. हे चित्तरूपी तळ्यातील कमळा, घनानंदा चिन्मात्रगात्रा, अज्ञानध्वांत प्रचंड मित्रा, चिदंबरा तुला नमन असो. तू चिदाकाशीचा मार्तंड आहेस. तू मोहकर्दळी बनीचा हत्ती आहेस. अन् तुझ्या नुसत्या स्मरणाने हे भवतारका, प्रचंड पाप नाहीसे करतोस. दीनरक्षका, दैन्यहारका, भक्तसख्या, सावित्रीनायका, रमानायक ज्याच्या पादुकांची आराधना करतो अशा भवतारका, तुला नमन असो. भूमध्यकाशीचे ठायी जो आनंदविग्रह विलसतो, त्याचे पायी भाव ठेवून आपले हृदयात अवधान साठवा. हा चिदंबर कथा सुधारस सेविताच पुरुषकाल मृत्यूस जिंकतो. एके दिवशी श्रीगुरुपुरास एक राम नावाचा मुनी आला आणि तो अण्णंभट्टाचे घरी वस्तीस राहिला. त्याचे घरातील एक एकांत स्थान घेऊन तेथे तो ध्यानस्थ बसत असे आणि मध्यरात्र होताच आसन सोडीत असे. असे आठ दिवस झाले असता स्नानाचे वेळी अण्णंभट्टाने त्याला विचारले की, ''हा एकांतवास का करता आहात आणि कशाकरिता येथे आला आहात?'' त्या रामयोग्याने त्यास सांगितले की, ''मी चिदंबर दर्शनाकरिता येते आलो आहे.'' हे ऐकून अण्णंभट्टास मनात फार आश्चर्य वाटले तेव्हा त्याने विचारले की, ''श्री चिदंबर गावातच आहेत आणि एकांती बसून तुम्हाला त्यांचे दर्शन कसे होईल?'' तेव्हा तो रामयोगी म्हणाला की, ''श्री चिदंबरेश सर्वज्ञ आहे आणि माझा येथील निवास तो जाणतो आणि मला येथेच येऊन भेटतो.'' असे बोलून तो योगीराज नदीला स्नानाला गेला आणि इकडे अण्णंभट्ट श्री चिदंबर दर्शनाकरिता निघाला. त्याला पाहून श्रीगुरु मंद हसत म्हणाले, ''आपण मोठ्याचे आश्रित आहात. तुमचा संसार धन्य होय.'' तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, ''आमचे काय धन्यत्व आहे?'' तेव्हा श्री चिदंबर मधुर वाणीने म्हणाले, ''योगेश्वराचा वास तुमचे घरी आहे आणि त्यांची संगत तुम्हाला मिळाल्यावर तुमच्यासारखे कोण धन्य आहे? कारण साधुसंगत ही फार दुर्मीळ आहे. दारिद्र्याचे घरी कामधेनू किंवा लक्ष्मी आल्यास त्याची धन्यता काय वर्णावी? त्याप्रमाणे तुझे दैव आहे. त्या रामयोग्याला इतकेच सांगावे

की तुम्ही येथे ज्याकरिता बसले आहात ते काम निश्चीत साधले आहे आणि अनुष्ठान आता पूर्ण करावे. अनुष्ठान सांगता करण्याकरिता ब्राह्मणभोजन करावे असा या वेळी माझा निरोप आहे आणि नंतरच सुखाने येथून जावे.'' त्या भक्तकैवाराने एवढे बोलून फलमंत्राक्षता त्याचे हाती देऊन त्याला म्हणाले की, ''ह्या त्या रामयोग्यास पोहोचवा'' अशी स्वामी आज्ञा घेऊन तो अण्णंभट्ट सत्वर रामयोग्याजवळ येऊन गुरु आज्ञा त्यास सांगितली आणि फलमंत्राक्षता त्याला दिल्या. त्या योगींद्राने हे ऐकून त्याचे जवळ एक तांब्याचे भांडे होते ते त्या अण्णंभट्टाजवळ दिले आणि सांगितले की, याचे जेवढे द्रव्य येईल त्याचे ब्राह्मणाला आनंदाने दध्यन्न वाटून सुखाने तोषवावे. याप्रमाणे द्विजाराधन झालेवर त्या दिवशी रामयोग्याने पारणे केले आणि आपले एकांत खोलीत निघाला. तेथे त्याला श्री गुरुंची एकाएकी भेट झाली. तेव्हा तो सद्भावाने श्री गुरुचरणी साष्टांग नमस्कार घालून हात जोडून उभा राहिला. तेव्हा तो दयानिधी म्हणाला की, ''प्रखर असे वैराग्य घेऊन तू अवघड असे तप आचरतोस ते आता पुरे कर आणि ही माझी गोष्ट तू ऐक. मीच परब्रह्म आहे आणि हे सर्व जग जड आहे. जसा शिंपल्यात चांदीचा भ्रम होतो तसे सर्व खोटे आहे. तूच म्हणजे मी, मीच म्हणजे तू हे निश्चित जाण, जी जी वस्तू डोळ्यास दिसते ते सर्व खोटे आहे. मनासह सहा इंद्रियांना जे तेजोराशी अगोचर आहे, ते निश्चित तुझे स्वरूप आहे. हे मनात दृढ धर. पोट आणि जीभ न हलवता एक क्षण मौन धरून बसले असता कंठाने बोलल्याप्रमाणे भासते तेच या भावाचे मूळ म्हणजे मन आहे. वासनात्मक संकल्प हे स्पष्ट मनस्वरूप जाण आणि संकल्प वासना स्वरूपी भेद दिसत नाही. जे जे प्रथम स्फुरण होते त्याचे नाव संकल्प होय. आणि विषयाकडे अभिमुख होऊन जी वृत्ती उत्पन्न होते तीच वासना होय. संकल्प वासना विरहित मन कधीच नसते आणि दोन्ही उत्पन्न होताच मनोरूपी मिथ्याभूत उत्पन्न होते. मनाचे योगाने संसार मनाचे योगाने, अपार दुःख आणि मनाचे योगाने देहाचा अहंकार तसेच थोर भवभय मनाचे योगानेच होते. जेव्हा आपण मन जाणू शकतो जे संकल्पाचे उत्पत्ती नाशाचे ठिकाण आहे, तेव्हा आपले संकल्प साक्षीरुप आपल्याला कळते. संकल्प साक्षित्वाने आपल्याला जे दिसते तेच शिव जाणावे आणि त्यालाच कूटस्थ असे नाव आहे. ते तूच आहेस येथे चित्त स्थिर कर. आणि जे जे संकल्प उठतील ते त्याला दिसतील. असे साक्षित्व सदा ओळखत उत्पन्न कल्पना तू पाहतोस, जेव्हा तू कल्पनेला पाहतोस तेव्हा तू वेगळा होतोस. साक्षित्वाने स्वस्वरुप पाहताच तत्काळ संकल्पाचा नाश होतो आणि संकल्प नसताना

कूटस्थ निष्पाप असतो त्यामुळे आपोआपच तो हृदयामध्ये प्रकाशतो. याप्रमाणे साक्षित्वाचा अभ्यास नित्यनेमाने करताच मनाला थोडेच दिवसात क्षीण दशा प्राप्त होते. अभ्यासाने मन क्षीण होताच हृदयात शुद्धात्मा परिपूर्ण भासतो. जसे निवांत दिव्यावर कंपन दिसत नाही आणि कोणतीही संग नसल्याने तो उत्तम प्रकाशतो असा जो आत्मसाक्षात्कार तीच थोर तुर्यावस्था जाण. अशा निर्धाराने स्वरुपी पावताच तो काळ मृत्यूला पाहत नाही. जे जे डोळ्याला दिसते ते नाहीच असा निर्धार कर. जसे आकाशात गंधर्वनगर किंवा मृगजळात मृगतृष्णा जे काही दिसत नाही आणि प्रयत्नाने दडविले जात नाही तें मन षष्ठेंद्रियातीत आहे त्याप्रमाणे तू हो. जे प्रयत्नाने भासते आणि अंतर यामियत्वाने सर्वत्र दिसते ते नामरुप मायिक असून मुळीच सत्य नसते. कोणतेही दृश्य पाहता तिथे अस्थिभाती प्रियरुपता इतकेच मनाला समजून मायिक नामरुप सोडून द्यावे. अस्तित्व म्हणजे आहे ते. भाती म्हणजे दिसते ते प्रिय जे आहे ते आवडते या तिन्ही नावाने वस्तू एकच आहे. या एकरुपी मायायोग्याने नामरुपाने सर्व दृश्य दिसते. परंतु अज्ञानाने सत्यच आहे असे वाटते. सर्व नाम रुपे सोडून सर्व अस्तित्व या जगात पाहताच स्वत:चे रूप अंतरंगात दिसते की सर्व काही मीच आहे. संकल्प साक्षित्वाचा अभ्यास करता अंतरंगात शुद्धात्मा प्रकाशतो आणि अभाव भावना करताच बाहेरील सर्व द्वैत आटते, असे अंतर्बाह्य शुद्ध होताच आकाशाप्रमाणे निर्मल सर्व ठिकाणी स्वसत्ता व्यापते. तेव्हा सर्वात्मकता अनुभवास येते. याप्रमाणे गुरु मुखातून त्यास परोक्ष ज्ञान म्हणतात ज्याने सर्व विघ्नांचा नाश होतो. आणि मानव हा पुण्यात्मा होतो. त्याला मग दृढ वैराग्याचे अभ्यासाने मीच पूर्णब्रह्म आहे, असे निश्चित ज्ञान ठसते त्याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात आणि अपरोक्ष ज्ञान चित्तात बाणल्यास जीवनमुक्ती हाती लागते आणि जीवनमुक्त तोच कैवल्यमूर्ति भगवान सर्वात्मा असा पूर्णब्रह्म होय.'' असे बोधामृत सांगून श्री गुरु एकाएकीच तेथे अंतर्धान पावले. कारण रामयोगी पूर्णपद पावला होता. त्यानेही श्री चिदंबराचा बोध ऐकल्यावर त्याला निर्विकल्प पद झाले. त्यानेही आनंदाने श्री स्वामींना वंदन करून स्वच्छंद भूमंडळावर तो हिंडू लागला आणि त्या दिवसापासून तो चिदंबर भक्तांमध्ये या भूलोकावर प्रख्यात झाला. याकरिता मोक्षार्थी लोकहो, श्री चिदंबर चरण धरा. ज्यायोगे निश्चित असे भक्तिज्ञान तुम्हाला अनायसे होईल. चिदंबर कृपेचा अल्पांश जरी मिळाला तरी हा संसार तरून निश्चित मृत्युंजय पद लाभते असे हा चिदंबर किंकर सांगत आहे. श्री चरित्र अगाध असा सुधासागर आहे, त्याचे


शिव चिदम्बर

श्रवणाने आम्ही धन्य आहोत आणि कृत्यकृत्य झालो. मार्तंड क्षेत्रास श्री गुरु गेले त्या वेळी तेथे अपार चरित्र झाले ते आता ऐका. बृहस्पती कन्यागताला आला होता. त्यामुळे श्री गुरुंनी कृष्णा यात्रेकरिता जाण्याचा मनात संकल्प केला आणि सुमुहूर्त बघून ते निघाले. भक्त, ब्राह्मण, यात्रिक, आप्त बंधू आणि नागरिक असे पुष्कळ लोक तीर्थविधी करण्याकरिता बरोबर निघाले. गायी, बैल, म्हशी व पशू संतोष पावून श्री स्वामींबरोबर आपणास पूर्वपुण्याने यात्रा घडत आहे असे मानून मनात प्रसन्न झाले. मार्गात बसण्याकरिता नाना तऱ्हेची वाहने, भोजनाकरिता उत्तम अन्न, रात्री निवासाकरिता उत्तम शिबिरे होती. कोणाला काहीच कमी पडत नव्हते. सर्व लहान मुलांना स्वामींचे शिष्य वेळोवेळी गायीचे दूध देत असत. स्त्रियांना तेल व गरम पाणी न्हाण्याकरिता देत असत. सर्व लोक आपले स्वत:चे घरात असल्याप्रमाणेच सुखाने चालले होते आणि कोणालाही प्रवासाचा श्रम तिळभरसुद्धा वाटत नव्हता. श्री स्वामी मार्गाने जात असता सर्व देवता त्यांचे सेवेकरिता आपली सत्ता प्रकट करून भोवती दाटले. फुलांचा सुगंध उत्पन्न करून वसंत सेवा करीत असे. टवटवीत असे वृक्ष नवी पाने धरून नाना तऱ्हेच्या फुलांचा सुगंध वारा मंद मंद वाहून सेवा करीत होता. त्यामुळे यात्रिक लोक संतुष्ट होत असत कारण, त्यांचा प्रवासाचा क्षीण नाहीसा होत होता. श्री चिदंबराचे पादस्पर्शाने धरणी रोमांचित झाली होती आणि ज्याप्रमाणे वनात झाडे भासतात त्याप्रमाणे त्यावर फळे, पाने व फुले पसरली होती. सहाही ऋतु श्री चिदंबर चरणाची भक्तिभावाने सेवा करण्याकरिता एकदमच प्रकट झाले होते. श्री गुरुंचे प्रवासावेळी पायी चालणाऱ्यांचे पायाला खडे व काटे लागत नव्हते. कारण भूमी मऊ होऊन सेवा करीत होती. मुले जेव्हा तान्हेली होत, तेथेच पाणी उत्पन्न होत असे आणि मार्गात ज्यावेळी मुले भुकेली होत त्या वेळी फलांचा भार पुढे येत असे. श्री स्वामींबरोबर ज्या देवता गुप्तरुपाने चालत होत्या त्यांच्या मनातील इच्छा श्री चिदंबर पुरी करीत असत. मंद अशा उष्ण प्रकाशाने सूर्य श्री चिदंबर चरणाची सेवा करीत होता. ढग छाया करून सेवा करीत असत आणि उष्णवेळी तुषार वर्षीत असत. शिरावर फळभार घेऊन देवलोक गुप्तपणे पुढे येत होते. ज्या वेळी यात्रिक लोकांना भुकेचा त्रास होत होता, फळे, फुले व छाया समर्पून जे जे गुरुचरणाची सेवा करीत होते त्यांचा जरी कुजन्म वृक्षाचा होता तरी ते धन्य होत. ज्यांचे स्मरणाने पाप नाहीसे होते असा तो गिरिजासरखा दिसत होता. त्यांची सेवा भवाब्धी शोषक होती म्हणून देव त्यांची सेवा करीत होते. याप्रमाणे श्री चिदंबररूपी

सूर्य सर्वांकडून या भूलोकावर यात्रिकांना तोषवीत सेवा घेत चालले होते. त्याचे अगाध असे चरणतीर्थ आहे. त्रिकोणात ज्यांची पावले पावनपद आहेत त्यांना परंतु लोकोद्धाराकरिता श्री चिदंबर यात्राचरित्र दाखवीत होते. याप्रमाणे श्री गुरुवर्य मार्ग चालीत असता एके गावी वस्तीत राहिले असता सकाळी एका यात्रिकाने विनवणी केली की, त्याचे बाळाचे अंगावर देवी स्फोट दिसतात. हे ऐकताच त्या विश्वकुटुंबी जगदीशाने तेथे निवास केला आणि बाळास आरोग्य लाभण्याकरिता सत्तावीस दिवस लागले. तोपर्यंत तो कामपूरक स्वकुटुंबाप्रमाणे सर्व यात्रिक लोकांस सांभाळून रोज नवीन लीला दाखवीत राहिला. बापू या नावाचा दीक्षित कुमार होता आणि तो बाळपणापासून द्विज संतर्पण तत्पर होता हे पाहून चिदंबर मनात तुष्टला आणि बापूस वररुची असे नाव दिले. त्याला अनेक वर दिले आणि म्हणाले की, ''तुझे जिभेवर नेहमी सरस्वती निश्चित राहिल आणि तुझे बरोबर मी ही राहीन.'' या वराने बापू दीक्षित वाक्‌सिद्धीने जगात प्रसिद्ध झाले. इकडे एके दिवशी श्री दीक्षितेंद्र सहपरिवार निघाले. मोठ्या आनंदाने वाट चालत सद्‌बोध कथा व इतिहास लोकांना सांगत. यात्रिक लोकांना आनंद देत गेले व क्षेत्रात आले. श्री गुरुचे आगमन झालेले ऐकताच सर्व पौरजन दर्शनाकरिता आले आणि स्वामींपुढे अहेर ठेवून त्यांनी साष्टांग नमस्कार केला. आदराने गावात प्रवेश करून रम्य अशा गावात त्यांची वस्ती करविली आणि बाकी सर्व यात्रिकांना राहण्याकरिता मोठे घर दिले. मग श्री गुरुंना सहपरिवार यथाशास्त्र तीर्थविधी करून नाना पक्वान्ने करून द्विजसंतार्पण केले. सर्वांकडून तीर्थश्राद्ध करवून त्या पूर्णानंद कंदारेनाना तऱ्हेने दक्षिणा व दान देऊन क्षेत्रातील लोकांना तोषविले. कृष्णेजवळ उभा राहून भक्तिभावाने हात जोडून श्री चिदंबरांनी त्या वेळी श्रीकृष्णाचे स्तवन सुरू केले. ते असे, ''नमः कृष्णे कृष्ण प्रपदजनि ते भुष्णुसलीले ।। क्षमायामाया सप्रशमनी समा का तव नदि ।। तृष्णा तापं पापं हरसि जयनाध्वन्यपि गता ।। जगन्मातः स्नातु यतत मव मां पाथसितव ।। भवसारा घोरामय चयहारा भासि सततम् पयः पूराकारा स्मृतजनिहरानंत सुखदा ।। सदा जीयान्मा यामयजन समुध्दारणतया ।। मुदा स्नातं जातं नयसि मनुजानां हरिपदम् ।। अये मातः कृष्णे तव पयासियः स्नाति विमले ।। महिलौके लोकेश्वरी भवति सत्पुण्यनिलयः ।। द्रव्याकृतिरीह सुह्वव्याद विनुतः ।। तवाप्यभ्भोरम्याद्द मखनि ताराभितपयः सुखक्रिडापीडोदगालितवनीता देह्रजमलम् ।। दधंन्नैलयंमातस्तदपि विणुधै : सेव्यमभवत् ।। सतां सङ्गोत्तुंडः कइह्न ह्यधत्पावनपदम् ।।

ग्यतामाता यातावनितलमियं तापशमनी ।। तदाद्ता भीता दीनकरसुताज्ञा नरहस: ।। गता दूरं निरं श्रुतिपथचरं यस्य न चतम् ।। विचेतुं नेतुं वै हरिपदजनुर्माभवतु सा ।। भवत्या: सप्राथे वितरतु सुखंमेडनवरतम् ।। दिव: सन्मो कामी मुनिवर वधुय्यामपि तदा।। मुने:शापक्ता पाकुलीत हृदयोय ढ्रिमजले सकृप्तनात: पूतोऽभवद खिलतापादिरहीत: ।।अये कृष्णेजिष्णौ मटीमनी तवाब्म प्रकटति ।। तदा साम्बो लम्बोदर जनक असिन्मुनि वरम् ।। हरिशेते सिन्धौ विधीरपितप: कर्माणी पह्: सुखं देवा सेवन्त्य निशम वनौ त्वां प्रवहतीम् भवक्तीरे धीरे पयसि तरीकोटान्तरगता ।। मरुन्नी राहार: कृमिजलचरा: सज्जनवरा: ।। यतो मोहे देहतव पयासिसन्त्यज्य निलयम् ।। हरेर्यान्ति भ्रान्ति त्यजत भजते मां नरवरा: ।। इति स्तुवा नमस्कृत्य स्नातूकामे चिदंबरे ।। तत्रैका पूर्व सुभगा स्वामिनं दृष्टमागता ।।'' याप्रमाणे स्तोत्र करून श्री गुरुने स्नान केले. इतक्यात दुरून वंदन करून एक विधवा तेथे आली. तिला पाहताच श्री दीक्षितेंद्राने आशिर्वाद दिला की, ''अष्टपुत्रा सौभाग्यवती हो'' आणि उठ म्हणाले. लोक म्हणाले की, ''ही विधवा सुवासिनी व पुत्रवती कशी होईल?'' लोक असे बोलत असता त्या विधवेने श्री चिदंबराचे चरणास वंदन केले, तेव्हा पुन्हा तसाच आशीर्वाद देऊन तिला उठ म्हणाले आणि लोकांना सांगितले, ''ही माझी वाणी नसून माझे तोंडाने कोणी देव बोलला असे मला वाटते.'' त्यानंतर तो कैलासधनी म्हणाला की, ''कृष्णा पापहरीणी आहे. नि:संशय हिचीच वाणी माझे तोंडून उमटली. आपले वचन सत्य होण्याकरिता ही कृष्णामाई पूर्ण समर्थ आहे. आता हिला महासंकल्प सांगून स्नान करवून ताबडतोब आणा.'' असे सर्वांना चिदंबराने सांगून सहकुटुंब यथाशास्त्र कृष्णा स्नानासह करून भिजवलेली वस्त्रे ब्राह्मणांना दिली. नवी वस्त्रे नेसून सर्वांना बरोबर घेऊन नाना तऱ्हेने कृष्णेची पूजा केली. स्त्रियांकडून सुपाचे दान देऊन त्या दयाघनाने ब्राह्मणांना अपार दान देऊन गंगेची पूजा केली. त्याची देण्याची शक्ती पाहून सर्व क्षेत्रस्थ आश्चर्यचकित झाले आणि म्हणाले, ''हा श्रीपतीच असेल म्हणून अशा तऱ्हेने दान करतो किंवा स्वत: कैलासनाथ तीर्थयात्रेस आला असेल आणि अष्टसिद्धीचे योगाने महादान करतो. याची दानशक्ती पाहता मनात लज्जित होऊन कर्णादिक याला तोंड न दाखवता ते मागेच होऊन गेले. याचे दातृत्व पाहून कल्पतरू स्वर्गात जाऊन लपले आणि कामधेनू आपले पशुत्व घेऊन गोलोकास पळून गेल्या. चिंतामणी गुप्त होऊन खड्यामध्ये मिसळून गेला. सबंध त्रिभुवनात शोधले तरी याप्रमाणे समर्थ दाता कोण मिळेल असे लोक स्तवन करीत

असता दीक्षितेंद्र सहपरिवार आपल्या स्थानी आले. मग त्या विधवेला कुशल विप्रांना संकल्प सांगून स्नान करण्यास आज्ञा दिली. विप्राज्ञा शिरी मानून ती नारी नदीत उतरली तोच ती खाली बुडाली आणि एक मुहूर्त वर येईना तेव्हा तो विप्र घाबरला व म्हणाला, ''काय हे नवल झाले! थोड्याच पाण्यात ही अवचित बुडाली कशी? आता श्री गुरुंना काय सांगू?'' कितीही प्रयत्न करून तिला नदीत शोधले, तरी ती काही मिळेना म्हणून ब्राह्मण मनी चिंतावला. तोच एकाएकी नदीच्या मध्यातून एक नवयौवन सुंदरी नाना अलंकार लेवून बाहेर आली. तिची मुखचंद्र कांती टवटवीत दिसत होती. रत्ने, मोती व सोन्याचे अलंकार तिचे अंगावर झळकत होते व वेणीत घातलेल्या माळा तळपत होत्या व कपाळ हळदी कुंकवाने शोभत होते. चुडे व कंकणांचा झणत्कार करीत होते आणि गळ्यातील हार व पदके नक्षत्राप्रमाणे शोभत होते. ती पितांबर नेसली होती व सर्वांगावर सुगंध चर्चिला होता. सिंदूर बिंदू उत्तमांगावर विलसत होत्या. कामुक कटाक्षाने पाहत काम शर रोवीत होती. शरद ऋतुतील चंद्राचे किरणाप्रमाणे जिची मुखप्रभा होती आणि दोन्ही हाताने पाण्याचे लाटा बाजूला सारीत मंदमंद किनाऱ्यावर येऊ लागली. तो विप्र मनात भिऊन म्हणाला, ''ही तर पाण्यात बुडाली म्हणजेच कायमची गेली आणि मग अचानक ही नदीतून वर आलेली आहे. हिचे रूप दिव्य असून लावण्यखणी आहे. ज्याप्रमाणे समुद्र मंथनातून लक्ष्मी निघाली तशी ही शोभत आहे किंवा ही कोणी सिद्ध कन्या असावी किंवा स्वत: लक्ष्मी असावी. जी स्वामी दर्शन घेण्याकरिता आली असेल अथवा मेनका किंवा नागकन्या श्री गुरुपादुका पूजनाकरिता आली असेल.'' याप्रमाणे तो विप्र नाना तर्क करीत असता त्या नारीने किनाऱ्यावर येऊन त्याला वंदन केले. तेव्हा त्या विप्राने भिऊन तिला विचारले, ''हे भामिनी, तू कोण आहेस व कोठून आलीस? तुझा निवास पाण्यात कसा आणि तू येथवर का आलीस. तुझा सर्व वृत्तांत मला सविस्तर सांग.'' तेव्हा ती अंगना हसून म्हणाली की, ''हे ब्राह्मणा, तुला काय भ्रम झाला आहे? संकल्प सांगून मला इतक्यातच स्नानाकरिता पाठविले. माझेकरिता तू भ्रमू नकोस. श्री चिदंबर करुणाघन आहे आणि त्याच्या कृपेने मला हे पूर्ण सौभाग्य लाभले आहे.'' असे चरित्र पाहताच तो विप्र आनंदाने मान डोलवू लागला आणि म्हणाला की, ''ही चिदंबर सत्ता प्रकटली आहे हे आश्चर्य झाले.'' हर्षाने त्याचे मुख खुलले, दोन्ही डोळे आसवाने भरले, अंग रोमांचित झाले आणि गहिवराने कंठ दाटला. तो विप्र आनंदाने स्फुंदत तिच्याबरोबर मंद चालत श्री गुरु नामाची गर्जना

करीत स्वामींजवळ आला. तिचेकडून स्वामीला नमन करवून तो मौन राहिला. तेव्हा श्री गुरुरायाने विचारले, ''तू कोण आहेस, कोठून आलीस व तुझे नाव काय सुंदरी? तू या वेळी मला सविस्तर सांग.'' तेव्हा तिने स्वामींचे हृदगत ओळखून प्रणिपात केला. मग सर्व ब्राह्मणांना दोन्ही हात जोडून प्रार्थना केली की, ''सर्वांना प्रत्यय देणेकरिता देवराय मला विचारत आहे. याकरिता स्वामी पायास वंदन करून त्यांचा प्रश्नाभिप्राय सांगते तो ऐका. मी विधवा होते आणि स्वामींचे भेटीस आले होते ते तुम्हाला माहित होते. नंतर स्वामींना वंदन करून त्यांनी 'अष्टपुत्र सौभाग्यवती हो' असा आशिर्वाद दिला व त्यांचे आज्ञेने नदीवर स्नानाकरिता गेले, नंतर ब्राह्मणाने संकल्प धरताच मी नदीत स्नानाकरिता गेले. इतक्यात देवकन्या येऊन त्यांनी मला पाताळात नेले. तेथे रत्नखचित सिंहासनावर हेच महास्वामी बसले होते. देवकन्यांनी मोठे आनंदाने यांची पूजा केली. मला पाहताच हा करुणाकर देवकन्यांना आज्ञा देता झाला की, हिला सुंदर असा सुवासिनी वेष देऊन भूतलावर पाठवा. मग त्या देवकन्यांनी मला सुवासिनी चिन्हे दिली आणि मला नदीत लोटून दिले आणि मी ताबडतोब वर आले. श्री दीक्षित साक्षात महादेव आहेत आणि सर्व त्रिलोकवासी जीव यांची भक्तिभावाने पूजा करतात. याला जे सामान्य मनुष्य म्हणतील ते मूर्खच होत. हा कैलासपती आहे हे त्रिवार सत्य आहे आणि याची कृती अगाध आहे. कर्पूरगात्रा, चंद्रशेखरा, दीनदयाळा, शुभ्रवस्त्रा, त्रिलोकपूज्या, चिदंबरा, या अनाथाला तार. हे जगदात्म्या, चिदंबर मूर्ती, वेदवंद्या कैलासपती, ब्रह्मांडाधीशा तुझी कीर्ती सदा अमर असो. राक्षस सदा गातात. तू सर्वोत्तम, सर्वेश्वर, सर्वातीत, अगोचरु, सर्वाध्यक्ष, वज्रपंजस आहेस. तू साक्षीरूपाने राहतोस. हे मदनताता, मनरंजना, मंदाकिनीधरा, मन्मथदहना, मंदारकुसुम प्रिया, त्रिनयना, मंदारवरा, निवासीया, काय माझे सुकृत की आज सद्गुरु मला भेटून त्यांनी मला सार्थ सौभाग्य दिले आहे. मी आता काय वर्णन करू. धन्य धन्य चिदंबर माउली, सुकलेली वेली तू पुन्हा रोवलीस आणि माझेवर अक्षय सौभाग्याची पूर्ण छाया केलीस. या अभागिनीला कुठले बाळ आणि कपाळावर कुठले कुंकू? पण ते सर्व या भक्तवरदायकाने दिले याचा अद्भूत महिमा काय वर्णन करू?'' असे म्हणून तिने आपले डोके श्री सद्गुरु चरणी ठेवले आणि तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले आणि ती म्हणाली, ''हे सर्व शरीर तुजवरून ओवाळून टाकते.'' याप्रमाणे त्या सुंदरीने नाना तऱ्हेने स्तोत्रे करून वारंवार दंडवत घालू लागली. तेव्हा एक गंगातीर्थ हातात असलेला



शिव चिदम्बर

[illegible] आला. त्याला पाहून तो करुणाकर त्या सुंदरीला बोलावून म्हणाला, "हे गुणवंती, माझी [illegible] आहे, ते जवळ जाऊन पहा." हे स्वामीवचन ऐकून ती ताबडतोब उठली व त्या जटाधारीला पा[illegible] पाहताच तिला तिच्या नवऱ्याची सर्व लक्षणे दिसू लागली. त्यामुळे लाजेने ती खाली मान घा[illegible]ी. मग श्रीगुरुने त्या दोघांचा विवाह करून त्यांचे स्थानास परत पाठविले. मग चिदंबर कृपेने [illegible] होऊन चिदंबरावर दृढ विश्वास ठेवून रात्रंदिवस श्री गुरु भजनात रममाण झाली. याप्रमाणे तो आन[illegible] असे चरित्र दाखवित होता. मी मंदमती त्याचे काय वर्णन करू शकेन? याप्रमाणे श्री चिदंबर कृ[illegible]टोपून पुढे मार्तंड क्षेत्र यात्रेकरिता सहपरिवार निघाले. तरी हा चिदंबर किंकर विनंती करतो, यापु[illegible] कथा एकाग्र चित्ताने ऐका.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

शिव चिदम्बर

# अध्याय सत्तेचाळिसावा

मृत ब्राह्मण संजीवन

।। श्री शिव चिदंबराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। हे पुण्यपुरुषा, वेदवरेण्या, अगणित लावण्या, त्रिलोकमान्या हे भवारण्यातील अग्री, हे दिक्षीताग्रगण्या तुला नमन असो. तुझ्या केवळ स्मरणाने जन्ममरणाचे तू हरण करतोस असे श्रुतीमध्ये वर्णन केले आहे. हे जाणून तुझ्या चरण सेवेकरिता शरण आलो आहे, तरी हे गुरुराया मला तार. तुझे स्मरण हे दु:खहारक आहे. तुझे पूजन सौख्यदायक आहे आणि तुझे चिंतन बंधमोचक आहे. तुझेसारखा तारक दुसरा कोण आहे? या भवसागरात बुडत बुडत सोमयाजी निर्विघ्न झालो, वेगाने तुझे पदाम्बुज नौकेत बसवून मला पैलतिराला पोहोचव. हे ब्रह्मानंद बिज दीक्षितराजा, दुसरी सर्व चिंता सोडून तुझे पदाम्बुजाला शरण आलो आहे. तरी माझे मनोरथ पुरव. चिदंबरा, नंदी विमग्र होऊन जे सर्व विघ्नाचा नाश करते असे हे चरित्र ऐका. गालव क्षेत्राहून श्री चिदंबर असंख्य यात्रिकांबरोबर सहपरिवार चालत हिप्परगीपुरास आला. मणिमल्ल वधाकरिता ज्याने भैरवरुप घेतले तो हा सर्व देवाधिदेव मार्तंडभैरव येथे आहे. ज्या गावी गंगा व म्हाळसा नावाच्या दोन पत्नी असलेला असा हा मार्तंड देव ज्या ठिकाणी होता तेथे श्री गुरु आले. दुरून हिप्परगी गाव पाहताच श्री दीक्षितेंद्राने पायी चालत धुळीपादाने दर्शनाकरिता देवालयात प्रवेश केला. पाच मुठी रुपये पुढे ठेवून प्रेक्षकांचे मनी अंतरी ठसेल अशा रितीने श्री चिदंबरांनी भक्तिभावाने नमन केले. इतक्यात सेवक लोकांनी देवालयाभोवती मंडप निर्माण केला. तसेच यात्राजनांकरिता राहण्याकरिता शिबिर उभारले. त्यात सर्व यात्रिकांस राहण्यास सांगून आपण स्वत: मार्तंड निवासी राहिले. मग देवाला महाभिषेकाने स्नान करविले व पाहताक्षणीच मन प्रसन्न होईल अशी हळद कुंकू, पत्र, पुष्प, माल्य आणि तांदूळ या योगे देवाची महापूजा केली. आरती नैवेद्य आटोपून ब्राह्मण भोजनाकरिता स्वामी बाहेर आले तेव्हा अपार ब्राह्मण व सुवासिनी देवळात प्रवेशल्या. मग सर्व ब्राह्मणांना बसवून त्यांना चतुर्विध पक्वान्न समर्पून दक्षिणा व दानाने सर्वांना संतोषविले आणि त्यांना निरोप दिला. मग आपले भक्तांसहित स्वत: भोजन करून उत्सवमूर्ती

आणण्याकरिता श्री स्वामी रात्री गावात आले. वस्त्रादिकाने उत्सवमूर्तीचे प्रेमाने श्री चिदंबरांनी पूजन केले आणि नंतर ती मूर्ती सालंकृत घोड्यावर स्थापन केली. मग मैराळमूर्ती आणून भक्तांनी रथावर बसवली आणि मंगलवाद्ये वाजू लागली व भक्त लोक नामस्मरण व जयजयकार करू लागले. सर्व छत्र चामरादी राजोपचार केले. वेत्रधर बिरुद वाखाणित होता. रथ मंदगतीने ओढताना म्हाळसाकांत वीर वेषाने शोभत होता. जणू काही आजच मणिमल्लाच्या वधाकरिता कैलासनाथ अवतरला आहे असे वाटते. विजेप्रमाणे खड्ग हाती चमकत होते आणि वीरश्रीचा हात धरण्याकरिता घोडा नाचत पुढे येतो त्याप्रमाणे मार्तंड मंदमंद येत असता भक्तांचे हृदयात आनंद मावत नव्हता आणि ते प्रेमरंगाने धुंद झाले होते. कित्येक हळद उडवीत होते. कित्येक लोखंडाचे गोळ्याने मारून घेत होते आणि स्वत:चे पोटात शस्त्रे टोचवून प्रेमाने नाम गर्जत होते. पोटऱ्यात पहार मारीत होते. कित्येक हात-पाय व जिभेवर दाभण टोचून दिवा लावीत होते आणि त्याने देवाला आरती करत होते. देवाला समर्पण करण्याकरिता मान कापून घेत होते. भक्त लोक भंडारा आणून लावताच ते भक्त पूर्वस्थितीवर भानावर येत होते. नंतर पुन्हा पूर्वीप्रमाणेच गर्जना करीत होते. अहाहा! काय हे अपूर्व मार्तंड भैरव सत्ता वैभवइतके घाव अंगावर करून घेऊनही ते भक्त पूर्वीप्रमाणेच राहत होते. असा हा भक्तवत्सल मार्तंड देव आपल्या नावाचा प्रचंड प्रताप सर्वांना उघड करून दाखवित होता. अशा महोत्सवाने देवाला राज वैभवाने आणून देवालयात श्री चिदंबराने मोठ्या प्रेमाने स्थापन केले आणि नवरात्रीचे विधीने रोज महापूजा करून द्विजांना संतर्पणाला सुरुवात केली. श्री स्वामी रोज नाना तऱ्हेची पक्वान्ने करून व अपार दक्षिणादान रोज द्विजांना देत होते. असे असता एके दिवशी श्री चिदंबर दुपारी श्री मार्तंड भैरवाची पूजा करीत स्वस्थ बसले असताना दिवाकर दीक्षिताने तेथे येऊन नम्रभावाने स्वामींना विनंती केली की, "ब्राह्मण फार भुकेजलेले आहेत. तरी पान प्रोक्षणाकरिता आज्ञा द्यावी" तेव्हा श्री दिक्षीत म्हणाले की, "आज जेवणाकरिता फार उशीर आहे. तू गडबड करू नकोस. मी जेव्हा सांगिन तेव्हा पाने वाढ." एक मुहूर्त झाल्यावर दिवाकराने पुन्हा विनवणी केली आणि स्वामींनी तेच उत्तर दिले की, 'गडबड करू नकोस.' थोड्या वेळाने पुन्हा दिवाकराने सांगितले की, "ब्राह्मण फारच क्षुधित झाले आहेत. स्वयंपाक पण सर्व तयार आहे तरी निष्कारण वेळ का करता?" तेव्हा श्री चिदंबर म्हणाले की, "स्वयंपाक तयार नाही असे माझे म्हणणे नाही. परंतु दुसरे अगाध




शिव चिदम्बर

असे कारण आहे, तू गडबड करू नकोस आणि थोडा वेळ स्वस्थ रहा.'' हे ऐकून दिवाकराला राग आला आणि त्याने स्वामींना न विचारता पाने मांडवली. सर्व पदार्थ पानात मांडले आणि पान प्रोक्षण करण्याकरिता हातात जलपात्र घेतले इतक्यात एक अगाध प्रमाद उद्‌भवला. लोकांना देवालयात बसण्याकरिता छाया म्हणून एक छत मांडले होते, तोच भयंकर असे वादळ सुटले आणि असे वाटले की प्रलयाची वेळ आली आहे काय? तेव्हा वादळाचा भयंकर आवाज होत होता. कोणी कोणास दिसेना. स्त्रिया आपल्या तान्ह्या मुलांना विसरल्या आणि त्या धुळीतच पाऊस पडू लागला. आपले डोळे झाकून कित्येक लोक भिंतीस टेकून बसले. कित्येक मूर्च्छित होऊन गडाबडा जेवणाचे पानावर लोळू लागले. एक मुहूर्तपर्यंत वाऱ्याने हलकल्लोळ केला. झाडे समूळ उन्म[illegible]ळाभोवती पडली. त्यामुळे मांडव उडाला. दोर तुटून छत पडले. सर्व पाने धूळीने भरली. त्यामुळे दोरी[illegible]ले दगड पडले. एक मुहूर्तानंतर ते वादळ शांत झाले. लोक सावध होऊन डोळे उघडून पाहू लागले तेव्हा [illegible]ाह्मण भिंतीस टेकून बसला होता आणि वाऱ्याने त्याचे डोक्यात एक दगड पडला होता त्यामुळे तो ढेकण[illegible]ा चूर्ण झाला होता. हा आघात पाहून सर्व लोक चोहोकडून धावले, हाहाकार करीत त्या वेळी ते म्हणा[illegible], ''काय ही वेळ आली आहे? भुकेल्या ब्राह्मणांच्या भोजनाला केवढे हे विघ्न ओढवले आहे?'' त्या मेलेल्[illegible] ब्राह्मणास पाहून सर्व द्विजांना खेद झाला. स्त्रीजनही ही हकिकत ऐकून शोकाकांत होऊन धावत आल्या[illegible] त्या ब्राह्मणाचे बायकोलाही हा वृत्तांत समजला आणि ती आपली छाती पिटत धावत पतीजवळ आली आणि [illegible]स पाहून जमिनीवर मूर्च्छा येऊन पडली. एक मुहूर्तानंतर सर्व स्त्रियांनी तिला सावध केले, तेव्हा ती साव[illegible]न म्हणाली, ''हे प्राणसख्या, मला सोडून माझा सौभाग्यधनी अनाथाला सोडून कोठे गेला, हे शंकर[illegible]बंधू तू माझा काय अपराध पाहिलास? ज्या कर्माचे हे अगाध फळ या वेळी मला दिलेस? तुझ्या दर्शन[illegible]ात्रिक सुख पावले, मी एकटीच पापिणी आहे काय? म्हणून मला या दु:ख सागरात लोटलेस. हे सु[illegible] चिदंबरा तूच जर माझे पतीस नेलेस तर मग हे दातारा मला आता थारा कोण देईल? हे गुणा[illegible]श्वरा माझी उपेक्षा का केलीस? आता मला बसण्याकरिता कोठेही थारा नाही. आतापर्यंत माझे रक्षण [illegible] आता परलोक मार्ग धरला आहेस. तुला सोडून मी हे दैन्य दाखवित कोठे जाऊ? माझे शिवाय आज[illegible]लेही धर्म, अर्थ, काम आचरले नाहीस. मग आजच तू एकटाच स्वर्गसुख कसे भोगतोस? मी

तुला जड झाले आहे काय? म्हणून हे प्राणप्रिया, सुखराशी म्हणून मला सोडून तू निघालास. एकदा तरी बोल.'' असे म्हणून ती डोके फोडून घेत होती आणि पतीचे प्रेतावर लोळत होती. आणि दुसऱ्या स्त्रियांनी काही सांगितले तर शोकाने आक्रोश करीत होती. हृदय धडाधडा पिटून घेत होती. अलंकार तोडून फेकत होती आणि म्हणाली, ''हे दुर्विधी मूर्खा, ही प्राणजोडी तू का बिघडवलीस?'' तिचा शोक पाहून सर्व स्त्रिया तिच्याभोवती भारी दुःख करू लागल्या. त्यात कित्येक वृद्ध स्त्रिया उगी शांत रहा म्हणून तिचे सांत्वन करीत होत्या. त्यांचे वचन ऐकून तिला जास्त दुःख होत होते. म्हणून म्हणाली की, ''हे मायबहिणीनो. या दुर्भाग्याचं काय सांत्वन करिता? हळद व कुंकूवाचा भार झाला. चुडे कंकण कोठे गेले. गळसळीला चोर पडले. हे काय अचानक झाले. मी चिदंबर दर्शनाकरिता आणि पुत्रसंतान मागण्याकरिता आले आणि मला वैधव्य लाभले. असा कसा माझा दुर्विधी आहे. वाघाला भिऊन गाय शरण गेली. तेथेच यवन येऊन त्याने वध केला असे झाले आहे किंवा आरोग्य वैद्याकडून औषध घेतले तेच विष होऊन त्याने प्राण घेतल्याप्रमाणे झाले आहे. या भूलोकी श्री चिदंबर अनाथाला कल्पतरू आहे असे त्याचे यश ऐकून मी येथपर्यंत आले आहे. मायबहिणींनो तुम्ही त्याला भक्तीने भजता. कारण तो तुमचे मनोरथ पूर्ण करतो. पण मला तो निर्दय झाला आहे. मुक्याकडून वेद वदविले, मृत बाळाला जिवंत केले. मग या दीक्षितेंद्राने माझे करताच कठीण चित्त का केले?'' याप्रमाणे श्री गुरुला आळवीत फार शोक करू लागली आणि तिचा शोक पाहून सर्व लोक तटस्थ झाले. इतक्यात एक ब्राह्मण धावत देवळात गेला आणि चिदंबरांना त्याने सर्व वर्तमान सांगितले. ब्राह्मणाचे तोंडाने हे वृत्त ऐकून श्री चिदंबरांनी उठून कानावर हात ठेवला आणि तो दीनानाथ शिवशिव म्हणीत उठला. 'शुभ बोला! शुभ बोला!' असे म्हणून तो कृपावंत ते विप्र प्रेत जेथे पडले होते तेथे आला. श्री दीक्षितांना पाहताच त्या स्त्रीचे दुःख उचंबळले आणि ती म्हणाली, ''तू परमपुरुष म्हणवतोस. मग आज माझा अव्हेर का करतोस? माझे हातून काय अपराध घडला म्हणून माझ्या प्राणवल्लभास परलोकात पाठविले. हे दयाळा चिदंबरा, मला सांग तू माझेवर कृपा करशील? माझे मनोरथ पुरवशील म्हणून तुझ्या पदकमळाच्या भेटीसाठी पतीसह दुरून आले. माझे सौभाग्य तुला समर्पण केले आणि तुझे अनुग्रहाने हा देह सोडून यमालयाला जाते. तुझे यश विस्तीर्ण पसरू दे. माझे काम पूर्ण केले आणि आता तुझी कीर्ती वर जाऊन परलोकांत वाखाणते.'' शोक बळाने ती नारी नाना तऱ्हेने बोलत

शिव चिदम्बर

असता श्री गुरु म्हणाले, ''हे सुंदरी, एक क्षणभर धीर धर. शोक सोडून उगी रहा. येथे म्हाळसाकांत जागृत आहे. तो मृत्युंजय आहे. तू अगदी निश्चित रहा.'' असे तिला समाधान सांगून विप्र प्रेत वस्त्रात बांधून मार्तंड भैरवाचे देवळात ठेवले आणि सर्व लोकांना बाजूला सारून दार बंद केले आणि आपण आत बसून सावध होऊन मृत्युंजय मंत्राने मार्तंड तीर्थाचे श्री स्वामींनी प्रोक्षण केले. त्याचे तोंडात भस्म घातले. सुधा दृष्टीने त्याचे सर्व अंग पाहिले आणि उजव्या हातातील मंतरलेले पाणी त्याचे सर्वांगावर फिरवले. तत्काळ तो ब्राह्मण सर्वांगात जीव संचारून अंग मुरडीत उठला आणि पूर्वीप्रमाणे त्याचे अंगी कोणतीही व्यथा नव्हती. जखम नव्हती. तो विप्र सावध झाला आणि चहूकडे पाहताच त्याला पुढे मूर्तिमंत श्री दीक्षितेंद्र दिसले. त्याने मोठ्या भक्तिभावाने श्री स्वामींना प्रणिपात केला. त्याला उठवून व त्याचा हात धरून श्री दीक्षित बाहेर आले. ब्राह्मण जिवंत झालेला पाहून तेथील सर्व लोक आनंदाने तृप्त झाले आणि भूक व तहान सर्व विसरले. सर्व लोक धावून चिदंबराचे भोवती जमा झाले. तेव्हा त्या ब्राह्मणाची सती सुद्धा श्री स्वामींजवळ आली. आपले पतीला पूर्वीप्रमाणे पाहून मनात संतुष्ट झाली आणि सारखी लोटांगण घालीत जयजयकाराने गर्जना करू लागली. उपहासप्रिय भक्तकैवारी तिला म्हणाला, ''मला स्तोत्र आवडत नाही. विनोद वचनाने मी तुष्ट होतो. पूर्वी जसे प्रेमवचन तू मला बोललीस तसेच आणखी गोड भाषण हे बाई एकवार बोल.'' श्री गुरुवचन ऐकताच ती स्त्रि लाजलज्जेने खाली मान घालून एकही शब्द न बोलता मौन झाली. तेव्हा तिचा प्राणनाथ श्री गुरुंना प्रणिपात करून आनंदाने वारंवार स्फुंदत प्रेमाने स्तोत्र करू लागला. ''शिव चिदंबरा, कामदायका, सुखरर्चिता, दिव्यपादूका, ग्रहसितानना, भक्तीवर्धका, तारकेश्वरा, तुला नमन असो. त्रिवेद ताप संतापहारका, ध्यानमात्र सौख्यदायका, दीक्षितात्मजा, त्रिविधसच्चरिका, तारकेश्वरा, तुला नमन असो. हे महादीक्षितात्मजा तू धर्म, गो-विप्रांचे रक्षणाकरिता या भूवरी जन्मलास हे मी जाणतो. हे तारकेश्वरा, तुला नमन असो. हे महागुरु तुझा दयाळूपणा यमाचे घरी मी स्वत: पाहिला आहे. हे बंधमोचका, यमार्चित, तारकेश्वरा, तुला नमन असो. अन्य लोक हे तुला जाणीत नाहीत आणि तुझा विभव मीच पाहिला आहे. यमानेही भीतीने तुझी पूजा केली. हे तारकेश्वरा, तुला नमन असो. लोकहो, अद्भुत क्रिया नित्य पाहून सुद्धा तुम्ही का मोह पावता. तारकेश हा सर्व जाणतो. आता सर्व मोह सोडून त्याला भजा. हे सद्यमानसा मृत्यूहारका, हे पार्वतीसख्या, तुझे पदानुजी हे

ज्ञानदायका, माझे चित्त राहू दे. हे तारकेश्वरा, या बालकाचे रक्षण कर. तुझी कथा श्रवणाकरिता कान असू देत. डोळे तुझे रूप पाहू देत. जीभ तुझे नाम घेऊ दे. तारकेश्वरा, एवढेच मला दे.'' याप्रमाणे स्तोत्र करून आणि वारंवार चिदंबर चरणी प्रेमाने नमन करून सर्व लोकांना त्याने विनवणी केली की, ''लोकहो, सर्व संशय सोडून श्री चिदंबरचरणी चित्त ठेवा. निःसंशय हाच कैलासधनी आहे. आणि यमाचे घरी मी याला ओळखले आहे. तुम्ही सर्व लोक चित्त देऊन माझी दिव्यवाणी ऐका आणि गुरुचरणी विश्वास ठेवा. ती ऐकताक्षणी तुमचा मोह नाश होईल. डोक्यावर दगड पडून माझे चूर्ण झालेले तुम्ही पाहिले आहे आणि इतरांनी मला यमालयाला नेले आणि यम मला विचारीत होता, इतक्यातच हा करुणाकार भस्मरुद्राक्ष गुंडीधर आणि तेज भास्कर दयासागर चिदंबर हाच देवाधिदेव श्री गुरु तेथे आले आणि याला पाहताच तो यमदेव गडबडून उठला आणि श्री चिदंबराचे चरणी वंदन करून त्यांना सिंहासनावर बसवले आणि मोठे वैभवाने त्याने त्यांची पूजा केली. हे मी स्वतः पाहिले. मग यमाने हात जोडून विचारले की, ''आपले आगमन कशाकरिता झाले आहे.'' तेव्हा मंद हसत हा आत्माराम यमाला म्हणाला, ''हे धर्मराया, माझे वचन ऐक. हा गतायुषी ब्राह्मण तू आज्ञेने आणला आहेस. परंतु त्याला तू सोडले पाहिजेस.'' हे गुरुवचन ऐकून यमाने साष्टांग नमस्कार केला आणि म्हणाला, ''हे जगद्पालका, तुझी आज्ञा मला मान्य आहे. 'तथास्तु' असे यमाने म्हटले व माझा हात धरून हा पूर्ण काम श्री चिदंबरांनी या मार्तंडधामी प्रवेश केला. हे पहा यमाने पूजा केलेली गंध, तुळशी श्री स्वामींचे पायी दिसत आहे.'' असे बोलताना गहिवरून त्याचा कंठ दाटून तो मौनावला. डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. सर्वांग रोम हर्षाने शोभू लागले आणि प्रेमभाराने अंग कापू लागले आणि त्याने पुन्हा दंडवत घातला. हे चरित्र पाहून सर्व लोक प्रेमआनंदाने नाचू लागले. जयजयकाराने गर्जू लागले. वारंवार श्रीपदी नमन करू लागले. श्री चिदंबरावर विश्वास ठेऊन सर्व लोक सेवा निमग्न झाले. श्री गुरुंनीही सर्वांचे सांत्वन करून सर्वांना तोषविले. मग पुन्हा स्वयंपाक करून द्विज समुदायाला भोजन, तांबूल व दक्षिणा दिली. याप्रमाणे सर्वांना अपार तोषविले. या प्रमाणे नवरात्र उत्सव पूर्ण करून श्री दीक्षितेंद्राने महोत्सवाने मार्तंड देवास स्थानी पोहोचवले. त्या प्रदेशात राहणाऱ्या सर्व ब्राह्मणांनी श्री चिदंबराचे पाशी येऊन आपल्या शंका विचारून त्यांनी यथार्थ मार्ग जाणून घेतला. स्मृती शास्त्रार्थ विषयी ज्या काही शंका होत्या त्या श्री चिदंबराचे मुखाने ऐकून ते शांती पावले.

याप्रमाणे थोर अशी मार्तंडयात्रा पूर्ण करून सहपरिवार श्री चिदंबर आनंदाने आपले स्थानी आले. श्री चिदंबर चरित्र फारच मनोहर आहे. जे लोक हे ऐकतात किंवा वाचतात त्यांना अनायसे इहपर साधते, हे त्रिवार सत्य आहे. श्री चिदंबर चरित्र अमृत आहे. त्याचे जे भक्तीने सेवन करतात ते जन्मजरा व मृत्यूपंथ जिंकून संसारात मुक्त होतात असे सर्वांना हा श्री चिदंबर किंकर हात जोडून विनंती करतो की, ज्याला इहपर पाहिजे असेल त्याने श्री चिदंबराचे भजन करावे.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||



शि व चि द म्ब र

# अध्याय अठ्ठेअचाळिसावा

झाडाचे मुळात व्यंकटेश मूर्ती दर्शन

।। श्री शिव चिदंबराय नम: ।।

।। श्री गणेशाय नम: ।। हे ब्रह्मण्यदेवा, निर्विकारा, महादेवा, सुरासूरांना मान्य असलेल्या श्री चिदंबरा तुला नमन असो. तू निजानंद व बुद्धी प्रकाशक आहेस आणि केवळ तुझ्या स्मरणाने तू ज्ञानसुख देतोस. हे श्री चिदंबरा तुझे पायी मस्तक ठेवून भक्तिभावाने तुझी प्रार्थना करतो की श्री चिदंबर दिव्य चरित्र हा नेहमी वरदग्रंथ असावा आणि कलीपापाने दूषित झालेले लोक त्याचे श्रवणाने पुनीत व्हावेत. श्रुतीमध्ये जसे उपनिषद तसेच मुक्तिदानात सुप्रसिद्ध असे तुझे मूळ चतुरक्षर नाम चिदंबर हे स्वत: सिद्ध आहे आणि हे तुझे चरित्र नेहमी सुप्रसिद्ध कर. त्याचे श्रवणाने लोकांचे मनोरथ पूर्ण व्हावे आणि साधकांची सर्व विघ्ने नाहीशी व्हावीत. ज्याची कीर्ती शुभ्र चांदण्याप्रमाणे असून तिन्ही लोकांत त्याचा प्रकाश पडतो आणि जड जिवाला मुक्ती देण्यास समर्थ आहे अशी ज्याची पसरवणारी सत्कीर्ती त्रिभुवनात अव्याहत गती आहे आणि ती जीवास तारणारी आहे आणि जो ब्रह्मादिकांचे मनमोहनच आहे असा हा शिव स्थापना व लोकोद्धार करण्याकरिता अवतरून येतो आणि इतरही नाना अवतारांचे कारण इतकेच होय. श्री गुरुंचे लीलेचा ब्रह्मादिकासही अंत लागत नाही. परंतु श्री चिदंबर आपल्या उघड लीला भक्तांना प्रेमाने दाखवतात. कलियुगी अवतार घेऊन सत्य युगाची राहणी दाखविली आणि कलीराज पुढे हात जोडून आज्ञा वंदून पुढे दारी उभा असे. कलीजनांचा संग असून श्री स्वामी कोणाचा मनोभंग करीत नव्हते. अलिप्त आणि नि:संग राहून यथासांग ब्रह्मकर्म दाखवित असत. नेहमी अपार अशी यात्रा दाही असे व ठिकठिकाणचे लोक भेटीस येत असत व त्यांना श्री स्वामी अशा गोष्टी सांगत की जशी ज्याची इच्छा पोटी असेल ती अंतरीची इच्छा पुरी होत असे. श्री स्वामी निश्चित असा दृष्टांत देत असत. स्वप्नात काही पदार्थ दिले तर ते जागेपणी प्रत्यक्ष दिसत असत. तो करुणाकर ज्यामुळे ज्ञान स्थिर होईल असे श्लोक, ओव्या, अभंग आणि मंत्र स्वप्नात सांगून अपार बोध करीत असे. प्रात:काली दर्शन होताच स्वप्नाचे वर्तमान विचारीत असे आणि ज्याला जे आठवत नसेल त्याला ते आपण स्वत: सांगून अनुभव खूण दाखवीत असे. चिदंबर हा सगुण ब्रह्म असून

अंतर्साक्षी ईश्वर आहे. त्या पूर्ण ब्रह्म स्वामीने अनंत अपार लीला दाखविल्या. देशोदेशीची यात्रा येत होती आणि जशी ज्याची भक्ती असेल तशी उघड प्रचिती श्री स्वामी त्याला दाखवित असत. असा तो कलियुगातील लीलाधारी सर्वेश्वर श्री स्वामी चिदंबर यात्रेत रोज नवीन चमत्कार दाखवीत असे. जसे धनाची इच्छा असणाऱ्याला नाना तऱ्हेचे कौतुक दाखवून डाळ देऊन त्याचे होन करीत असे त्या व अशा लीलांचे कोठवर वर्णन करावे? नाना तऱ्हेच्या विचित्र कला दाखवून नारळातून द्रव्य निघत असे. डाळ, तांदुळाचे सोने होत असे. असा तो लीलाधारी चिदंबर रोज चमत्कार दाखवीत असे. कोणाला धान्य देऊन श्री स्वामी त्यांना म्हणत की, "तुम्ही आलेल्यांना अन्नदान करा आणि तुमचे हे धान्य कधीच संपणार नाही." जसे श्री स्वामी भक्तांची इच्छा पुरवीत असत तसेच जशी ज्याची उपासना असेल तसे त्याला रूप दाखवीत. विष्णूभक्तांना विष्णूरुप, शिवभक्तांना शिवस्वरूप, शक्ती गणेश आणि मारुती रूप त्या त्या उपासकांना दाखवीत असत. एकदा एक नृसिंहभक्त ब्राह्मण श्री स्वामींना त्रास देणेसाठी आला. त्याने दुरूनच श्री स्वामी नृसिंहरुप पाहून लोटांगण घातले. रंक व राव ज्याला समान होते असा तो दयाळू कृपाघन स्वामी सर्वांचे ठिकाणी तो भक्तवत्सल श्री चिदंबर समसमान होता. यात्रेची नित्य दाटी होती. दर्शनाला लोक येत असत. त्या सर्वांना भेट देऊन श्री चिदंबर त्यांची इच्छा पूर्ण करीत असत. पूर्ण ब्रह्म लीला नाटकी कर्नाटकमध्ये अवतार घेतलेल्या श्री स्वामींच्या दर्शनाकरिता जार, चोर व बटकी येत होत्या आणि इतर अपार लोक येत होते. आनंदमूर्ती श्री चिदंबर विश्व-कुटुंबी विश्वंभर अठरा जाती, मुसलमान, फकीर इ. सर्वांचे अंतर निववीत होता. निरनिराळ्या भाषेचे लोक जसे पारशी, अरबी इ. अनेक भाषा बोलणारे लोक येत असत. त्या सर्वांचे श्री स्वामी समाधान करीत असत. ज्याचे रूपाला अंत व पार नाही, जे निर्विकार शुद्ध ब्रह्म आहे असा चिदाकार चिदंबर मूर्तिमंत सगुण झाला आणि उघड अशी वर्तणूक दाखवून नाना प्रकारच्या लीला कौतुक दाखवीत असे. कलियुगातील अज्ञानी लोक त्यांना डोळ्याने पाहून ओळखीत नसत. यात्रेला भाविक येताच त्यांना प्रसाद म्हणून एक नारळ देताच त्याचे उपास्य दैवत त्यात निघत असे, कोणाला फळात गणपती निघत असे. कोणास शाळीग्राम, विष्णूमूर्ती आणि कोणास बाण, पशुपती निघत असे. आणखी कोणास सूर्यकांत निघत असे. कोणास मारुती निघत असे. जशी ज्याची प्रीती असेल त्याची भक्ती पाहून तीच मूर्ती निघत असे. कोणाचा निर्मळ भाव पाहून त्याला सुपारी देताच त्याचे हातात त्या सुपारीचे

उपास्य दैवत होत असे. जसे कोणास सुपारीचे स्फटिक लिंग, कोणास अभंग असे, नर्मदा, गणपती व बाण होत असे. पोफळी दिली असतानाही त्याचेही आराध्य दैवत होत असे. कोणास रुद्राक्ष देताच त्याचा बाण होत असे. कोणास नारळ देताच त्याचे झाड होत असे आणि भक्त लोक ते झाड लावून त्याची पूजा करीत असत. त्या झाडाला फळ येताच त्यात द्रव्य निघत असे. कधी कोणाला हातात द्राक्ष देताच त्याचा अर्धा भाग बाण, पशुपती होऊन अर्धा भाग मृदू फळ राहत असे. श्री चिदंबरांच्या पायाखालची माती घेताच त्याचे कुंकू होत असे. अशी अगाध लीला श्री चिदंबर दाखवीत असे. ठिकठिकाणाहून व्याधीग्रस्त पुष्कळ लोक येत असत. त्यांना केवळ दर्शनाने आरोग्य होऊन सुख होत असे. कोणी गलत कुष्ठी, कोणी रक्तपिती; असे नाना रोगी किती सांगू? परंतु ते स्वामींपाशी येताच त्यांची रोग निवृत्ती होत असे. असा बहुतेकांना प्रत्यय येत असे. मुले येऊन वेदपठण करीत असत. आंधळ्याकडून पोथी वाचून घेत असत. लंगड्याना बोलावताच ते धावत येत असत. असा तो कृपामूर्ती श्री चिदंबर होता. बहिऱ्याला कान, नपुंसकाला पुरुषत्व आणि वांझेला पुत्र संतान देत असे. असा तो चिदंबर गुरुराया होता. म्हातारी आणि वांझ अशी स्त्री आणि भ्रतारही म्हातारा ज्याची मान कापत होती अशांना सुद्धा पुत्र संतान देत असे आणि सर्व लोकांना आश्चर्य वाटत असे. असा तो कृपाघन स्वामी त्याची लीला कोण वर्णन करू शकेल? लहान-थोर सर्व चमत्कार पाहत असत. चिदंबर हा पूर्णावतार आहे. अवतार सामर्थ्याचे अघटित करणी करून ब्रह्मलेख मागे सारून आपले अपार सत्ता सामर्थ्य दाखवीत असे. जे देवादिकांनाही कळत नसे. असे नाना तऱ्हेचे प्रत्यय या सृष्टीवर श्री चिदंबर दाखवीत असत. त्यांची कीर्ती कोठवर करावी आणि कोण वर्णन करू शकेल. या जमिनीचे पत्र केले आणि समुद्राची शाई आणि कल्पतरूची लेखणी करून लिहिले तरी ते शारदेस जमणार नाही. 'गुणानु वादस्य पारंजयाति' असे वेद बोलले आहेत. तेथे मी मंदबुद्धीचा मूर्ख मनुष्य, त्याचे गुण आणि कीर्तीचे काय वर्णन करू? ज्या वेळी श्रीगुरु गालव क्षेत्री आले त्या वेळी तेथे लोकांना महामारीची पिडा होती. त्यामुळे त्या प्रदेशातील सर्व लोक अत्यंत तळमळत होते. त्यामुळे ते पाहून तो करुणाकर श्री गुरु कृपेने द्रवला आणि आपण स्वतः सात दिवस रोगाचा भार आपले अंगावर घेतला. त्यानंतर तो भक्त कैवारी अंथरुणावर आजाऱ्याप्रमाणे दिसत होता आणि अंथरुण सोडताच निरोगी माणसाप्रमाणे सर्व कर्म श्री चिदंबर आचरीत होता. याप्रमाणे सात दिवस तो दारुण रोग सोसून त्या

प्रदेशातील लोक निरोगी होताच श्री चिदंबराने आपले अंथरूण कृष्णेत नेऊन टाकले. असा तो लीलाधारी श्री चिदंबर सर्वांचा रोग दूर करून स्वत: निरामय आणि निर्विकार राहिला. धर्मस्थापना व लोकोद्धारण करण्याकरिता तो गिरिजारमण भूतलावर अवतार घेऊन अघटित चरित्र करीत असे. जे नुसते ऐकल्यानेसुद्धा पापहरण होते. असे असंख्य मनोहारक लीला चरित्र श्री गुरुंनी छप्पन्न वर्षांपर्यंत या भूलोकी दाखवले आणि श्री चिदंबर साक्षात या भूलोकी असताना सर्व नारी, नर सुखी होते. कोणत्याही अरिष्टाची वार्ता तर कोणीही ऐकली नाही. वेळेवर पाऊस पडत असे आणि सुकाळाने सर्व देश स्वस्थ होता. तसेच विपरीत मरण वृत्तांत कोणी केव्हाही ऐकला नाही. सर्व ब्राह्मण वेदपाठी असून आपले कर्माचरणात निष्णात होते. कित्येक श्रौत परायण व कित्येक स्मार्त पारायण त्या वेळी झाले. स्नान, संध्या, जप, अनुष्ठान, पुराण, श्रवण, भजन, पूजन इत्यादी सत्कर्मात सर्व ब्राह्मण आपला वेळ घालवीत असत. कित्येक वेदान्त विचारी निष्णात झाले. कित्येक श्री गुरुभक्त झाले व कित्येकांनी स्वामी शिक्षेस भिऊन आपले दुर्गुण सोडले. कोणाचाही मनोभंग न करता तो सर्वांतरंगी दुर्वृत्त व दुर्गुणी लोकांना अपार भोग देत असे. वाईट कर्म करून रात्री एक राजा सकाळी दर्शनाकरिता आला. परंतु त्या सर्वज्ञाने त्याला भेट न देता आपल्या शिष्याकडून प्रायश्चित्त देवविले. शिष्याने राजाला सांगितले, ''तू केलेले कर्म स्वत:चे तोंडाने उच्चारून या वाड्यास तीन प्रदक्षिणा करण्यायोगे तू पावन होशील.'' तो राजाही आज्ञेप्रमाणे तीन प्रदक्षिणा करून व पश्चात्ताप पावून त्याने श्री गुरुंचे दर्शन घेतले. अशीच एक व्यभिचारिणी संतानाचे इच्छेने श्री गुरुचरणी येताच त्या दयाळूने तिचे दुर्गुण सोडवून तिला पुत्र देऊन संतुष्ट केले. ही हकिकत ऐकून सर्व लोक भिऊन श्री गुरुंजवळ राहू लागले. कोणाचेही हातून दुराचरण होताच त्याचे समोर श्री चिदंबर पुढे उभे राहत असत. अशा अगाध लीला दाखवून तो सर्वज्ञ श्री चिदंबर लीला चरित्र दाखवित असे. श्री चिदंबर जागृत असता निंदकही क्षितीत लोपले. निंदकांनाही श्री स्वामी सहज शिक्षा देत असत. कलदुरगीपुरी एक ब्राह्मण होता. त्याचे नाव विश्वनाथ होते आणि लोकांनी श्री चिदंबराची स्तुती केल्यास तो मनात खवळून कारण नसताना दुर्वृत्तपणे श्री गुरुंची अपार निंदा करीत असे. सज्जनांचे आचार बघून दुर्जनास फार त्रास वाटतो आणि भगवंताचे चरित्र कानी पडताच दुर्जन सहज संतापतो. ज्याप्रमाणे राजहंसास पाहून कावळा मनात चडफडतो किंवा पतिव्रतेस पाहून जारिणी फार संतापते अथवा कृष्णमहिमा ऐकताच तो दुष्ट कंस



शि व चि द म्ब र

क्रोध ... त असे किंवा जसे हरिभक्त प्रल्हाद बाळ दुष्ट दैत्यांना आवडत नसे. सत्त्वगुणी सुबुद्धीचे वचन ऐकत ... बद्ध खवळतो किंवा सहज हरिणांचा कळप पाहिल्यास व्याघ्र खवळतो तसा तो दुष्ट श्री विश्वंभर स्वा... ार निंदा करीत असे. त्याचे उद्धाराकरिता श्री स्वामींनी लीला चरित्र दाखविले. एके दिवशी तो ब्राह्म... या गावाला जात होता आणि अर्धा कोस मार्ग चालताच त्याला झोप अनावर झाली. एका झाडा... एक मुहूर्त तो निजून उठला. तोच त्याला अघोर असे अरण्य दिसू लागले आणि ज्या ठिकाणी गगन... अशी झाडे होती. तसेच वाघ, डुक्कर, अजगर, कोल्हे व अस्वले अशी नाना तऱ्हेची भयानक श्वाप... ठिकाणी जमलेली दिसली. ते घोर असे अरण्य पाहताच तो ब्राह्मण प्राणास अपायाचे भयाने क्षणो... मूर्च्छित पडून नंतर सावध होत असे. अशा भयंकर भीतीने तो अचाट शोक करू लागला आणि म्हण... काय वेळ भयंकर आहे आणि मी कोठचा कोठे आलो? माझे गाव कोठे राहिले? हे मोठे अरण्य कोठू... आता दयाळू असा मला कोण भेटेल व कोणत्या वाटेने आता मी पुढे जाऊ?'' त्याला पुढे विचार सुचे... भीतीने दीर्घ सुराने तो रडू लागला आणि त्याचा रडण्याचा आवाज ऐकून त्या रानातून जाणारे लोक ... व त्यांनी विचारले तेव्हा त्या ब्राह्मणाने सविस्तर हकिकत सांगितली तेव्हा त्या लोकांना करुणा येऊ... ाले की, ''भिऊ नकोस. जरा धीर धर. येथून अर्ध्या कोसावर बनवासी या नावाचे एक गाव आहे ... चे बरोबर तुला पोहोचवितो.'' हे ऐकताच तो त्यांचे बरोबर जाऊ लागला व त्या गावातील लोक पाहू... समाधान वाटले व सर्वांना त्याने आपला वृत्तांत सांगितला. इतक्यात तेथील लोक श्री चिदंबर दर्शन... निघाले होते. त्यांचे बरोबर तो ब्राह्मण गुरुपुरी आला. श्री गुरुंनी त्याला पाहताच सर्व यात्रिकांना मागे ... ाला ते म्हणाले, ''तू भिऊ नकोस. भूतबाधा वगैरे काही नाही. तुझे वडिलांना एके वेळी व्यंक... ा सापडली. तिची पूजा न करता तुझे वडिलांनी ती प्रतिमा एका झाडाखाली टाकून दिली. त्या देवते... भाने तुझी अशी दशा झाली. तरी तू ताबडतोब गावास जाऊन त्या मूर्तीची पूजा कर. आळस मुळी... ना आजपासून चौथे दिवशी त्वरा करून घरी जा. नाहीतर पुढे अनर्थ घडेल,''असे सांगून श्री गुरुंनी ... एक उत्तम घोडा दिला. तो ब्राह्मणही फार घाबरा होऊन श्री गुरुंना वंदन करून निघाला. रात्रंदि... ट चालत चौथे दिवशी मध्यरात्री आपले घरी आला व आपले वडिलांचे नावाने हाक मारली.

आपल्या मुलाचे शब्द ऐकून सावध होऊन त्यांनी विचार केला की, ''माझ्या मुलाला वाघाने खाल्ले व तो आता येथे भूत होऊन आला आहे काय?'' आतच बसून मुलाचे तोंडाने सर्व हकिकत ऐकून त्यांना फार आनंद झाला व दार उघडून वडील त्याला भेटले. मुलाला आलिंगन देऊन पिता रडू लागला. इतक्यात त्याची आई धावून आली आणि मिठी मारून रडू लागली आणि म्हणाली, ''हे पुत्रराया, तू भेटलास हे फारच चांगले झाले. नाहीतर उद्या तुझ्या बायकोस अवलक्षण दशा आली असती.'' सर्वांना सांगून विश्वंभराने व्यंकटेश मूर्ती बाहेर काढून, श्री चिदंबरावर विश्वास ठेवत त्याची प्रेमाने पूजा केली व त्या दिवसापासून निंदा सोडून दिली व आपला परिवार घेऊन भक्तीने श्री गुरुंचे दर्शनाकरिता आला. याप्रमाणे निंदकाचाही मनोभंग न करता तो सर्वांतरंग त्याला शिक्षा करून अभंग अशी भक्ती देत असे. या कलियुगात श्री चिदंबर हा भक्तवत्सल करुणाकर असून मूर्तिमंत हाच श्री शंकर आहे आणि तो भक्ताचे संकट निवारतो. ज्याला आपले हित पाहिजे असेल त्याने श्री दीक्षिता भजावे आणि भजनामुळे श्री स्वामी निजपद देतील, असे हा चिदंबर किंकर सांगत आहे.

॥ श्री चिदम्बर गुरुवेनमः ॥

# अध्याय एकोणपन्नासावा

वैष्णवाने घरात कोंडलेल्या पत्नीस श्री चिदंबर दर्शन

।। श्री शिव चिदम्बराय नमः।।

।।श्री गणेशाय नमः।। हे कल्पतरू चिदंबरा तुला नमन असो. भक्तांचे अभीष्ट ताबडतोब देण्यास तुझे सारखा समर्थ या जगात कोण आहे? म्हणून मी तुला शरण आलो आहे. चिदंबर कथा प्रेमाने, भक्तीने जो श्रवण करतो त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात. एके वेळी श्री गुरु मुरुगोडी असता एक ९० वर्षांचा ब्राह्मण लग्नाच्या इच्छेने दर्शनास आला. त्याला पाहताच तो दयानिधी म्हणाला, ''तू काय इच्छा धरून येथे आला आहेस, ते मला सांग.'' हे ऐकताच तो विप्र मनामध्ये लाजून मौनावला. स्वामीने पुन्हा पुन्हा विचारले की, ''तुझी काय इच्छा आहे ते मला ताबडतोब सांग.'' तेव्हा तो म्हातारा ब्राह्मण लाजून मौनाने सभेला न्याहाळीत स्थिर बसला. स्वामी म्हणाले, ''तुझी विवाह करण्याची इच्छा आहे काय, हे तू न लाजता सांग!'' तेव्हा तो म्हातारा म्हणाला की, ''सर्वज्ञाला मी काय सांगू? हे स्वामी, तू सर्वांचे अंतरंग जाणतोस.'' तेव्हा श्री गुरु म्हणाले की, ''तू चिंता करू नकोस. तुझे लग्न मी करतो. मनात विश्वास असू दे आणि माझे एक वचन ऐक. येथून एक योजनावर मुनीवल्ली नावाचे एक गाव आहे. तेथे नारायण नावाचा एक ब्राह्मण राहतो. तो दयाळू, धार्मिक व शिवभक्त आहे. त्याची बारा वर्षांची मुलगी आहे व ती अत्यंत लावण्यवती आहे. माझ्या आज्ञेने तेथे जाऊन त्या ब्राह्मणाला कन्या माग. तो तुला देईल. मग खर्चाकरिता मी द्रव्य देईन आणि लग्न करून सुखाने गृहस्थ धर्मात रहा.'' असे श्री गुरुने सांगताच त्या ब्राह्मणाला फार आनंद झाला आणि स्वामी वचन ऐकताच तो म्हातारा असूनही तरुणाप्रमाणे हर्षयोगाने मुनीवल्लीस पळत निघाला आणि नारायणाचे घरी जाताच त्याची कन्या मृत झालेली असून तिचे माता-पिता शोकाक्रांत आहेत, असे त्याला दिसले. त्यावेळी ह्या म्हाताऱ्याने तेथे जाऊन श्री गुरु आज्ञेप्रमाणे त्यांची कन्या मागितली. तेव्हा शोकातुर असा तो नारायण म्हणाला, ''निश्चित तू भ्रमिष्ट दिसतोस. माझे कन्येची काय दशा झालेली आहे आणि हे वेड्या, गुरुची आज्ञा वृथा का सांगतोस?'' आणि त्याला 'जा' म्हणताच तो वृद्ध ब्राह्मण निराश न होता हसून बोलला की, ''श्री चिदंबराचे वचन

केव्हा... होणार नाही. तरी कन्येचा संस्कार न करता मी श्री स्वामींना विचारून येईपर्यंत हिला वस्त्राने झाकून... असे बोलून तो म्हातारा श्री स्वामींजवळ धावला आणि सर्व वर्तमान सांगितले. त्यावर श्री हसून म्हणा... "ही विभूती घेऊन जा आणि त्या कन्येच्या मुखात घाल. त्यायोगे ती निश्चित जिवंत होईल." विभूती घेऊन ...ण नारायणाचे घरी आला आणि प्रेतावरचे वस्त्र काढून तोंडात विभूती घातली. तोच त्या कन्येच्या अंगा... आली व ती उठून बसली. त्यामुळे त्या म्हाताऱ्याला आनंद झाला व म्हणाला की, "आता तातडीने लग्न ...ता उशीर कशाला?" हे ऐकून त्या कन्येची माता मनात गडबडली आणि एकांतात तिने आपल्या पतीस ...ले की, "या म्हाताऱ्याला आपली कन्या कशी देता?" तेव्हा तो कांतेस म्हणाला की, "ही त्याचे प्रयत्न ...की. म्हणून त्याचे वचन जर मोडशील तर तुझे मुलीस क्षेम नाही. याकरिता कन्यादान विधी प्रेमाने कर." ...गे आपले पत्नीस सांगून त्या म्हाताऱ्याला सांगितले की, "लग्नाकरिता द्रव्य घेऊन ये. अजून चार ...वकाश आहे." याप्रमाणे वाङ्निश्चय होताच त्या म्हाताऱ्याच्या चित्तात आनंद मावेना. आणि तो परत ...नवळ आला आणि त्याने सर्व वृत्तांत निवेदन केला. त्यावर त्याला श्री गुरुंनी द्रव्य दिले. अशा तऱ्हेने ...ताऱ्याने लग्न करून सुखाने गृहस्थधर्म स्वीकारला आणि त्या ब्राह्मणाला गुरुकृपेने एक मुलगा झाला. अ... श्री गुरुचे अघटित महिमान कोण वर्णन करू शकेल? ज्याचेवर श्री गुरुंची कृपा आहे तोच यथा... करू शकेल. एके दिवशी एक शूद्र अरण्यात फिरत होता. तेव्हा वाघाने अचानक येऊन त्याचा कंठ ...व्हा तो शूद्र घाबरून मनात श्री चिदंबराचे स्मरण करू लागला. आणि त्या गुरुस्मरणाने भिऊन त्याच... ...डून वाघ पळाला. परंतु रक्त धडाधडा वाहत होते. जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना तो निश्चेष्ट पडले... ...ा. तेव्हा त्यांनी त्याला उचलून श्री स्वामींपाशी आणले. श्री गुरुंनी त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहिले आणि ...ल लोकांना सांगितले की, "याला औषधोपचार करून निरोगी करून पाठवा." श्री गुरुंचे आज्ञे... ...ा गावातील लोकांनी त्याचेवर बरेच उपचार करून त्याला आठ दिवसात निरोगी केला. तेव्हा तो श्री... ...चे दर्शनाकरिता आला. त्याला पाहून श्री गुरुंनी त्याला दोन कल्याणदायक खारिका दिल्या आणि... गुरुंचा निरोप घेऊन तो स्वस्थानी आला. जेव्हा खाण्याकरिता त्याने खारीक फोडली तेव्हा त्यात... ...चाले. त्यामुळे तो बरेच वैभव भोगू लागला. याप्रमाणे श्री स्वामी नेहमी सर्वांना विचित्र लीला

दाखवत असत. ते सविस्तर सांगण्याकरिता ब्रह्मादिकांचीसुद्धा बुद्धी चालत नाही. एके वेळी एका ब्राह्मणाने वस्त्र मागितले असता स्वप्नात त्याला दिव्य पितांबर देऊन जागृतीत त्याला तोषविले. अगाध अशी श्री चिदंबर लीला किती म्हणून तुम्हाला सांगू? स्वत: कैलासनाथ जगाचा उद्धार करण्याकरिता अवतरला होता. एक शूर शिलेदार होता. तो दारिद्र्याने बेजार होऊन आपले सुखाकरिता ताबडतोब श्री गुरुंचे दर्शनाकरिता आला. त्याला पाहताच श्री गुरु म्हणाले, ''जर सुखाकरिता येथवर आला आहेस पण मनात जर दृढ निर्धार असेल तरच येथे स्वस्थ राहवे. जेव्हा तुला निरोप देईल तेव्हाच स्वस्थानी जावे.'' हे गुरुवचन ऐकून तो विनयाने 'तथास्तु' म्हणून राहिला. रोज भेटीकरता येत असे आणि पदरमोड करून आपला चरितार्थ चालवीत असे. याप्रमाणे दोन महिने तो श्री स्वामींपाशी होता. जवळचे सर्व द्रव्य संपले तरीही स्वामींचा निरोप मिळेना. मग जवळचे कपडे, भांडी विकून चरितार्थ चालवू लागला. असे तीन महिने झाले. खर्चाला मुळीच द्रव्य राहिले नाही आणि तो सर्वेश्वर निरोपही देईना म्हणून तो शिलेदार चिंतातुर झाला. कुटुंबाचे काय वर्तमान आहे, येथे घोड्याचे रक्षण कसे करू आणि माझा उदर निर्वाह कसा चालेल. याप्रमाणे अतिशय चिंतातुर होऊन त्याने श्री स्वामींना वंदन केले आणि त्याला पाहून श्री गुरु मौन बसले. मग त्याने सर्व दागिने विकले. त्याचा घोडा नुसत्या वैरणावर होता. त्यामुळे फार अशक्त झाला होता आणि शिलेदार स्वत: चिंताक्रांत झाला. याप्रमाणे सहा महिने झाले. शिलेदार अहोरात्र तळमळू लागला. परंतु तो भक्तकैवारी कोणत्या कारणाने निरोप देईना. शिलेदार असा विचार करीत असता श्री स्वामींनी हे ओळखून त्याला ताबडतोब जवळ बोलाविले आणि म्हणाले, ''आज तुला निरोप देत आहे. याच क्षणी येथून निघून जा. क्षण मात्र ही वेळ लागू देऊ नको.'' हीच स्वामींची आज्ञा मानून त्यांचे पायी वंदन करून तो निघाला. आषाढ महिना असल्यामुळे पाऊस फार पडत होता आणि अत्यंत वारा सुटला होता. दिवस फक्त एक घटकाभर होता आणि तो शिलेदार त्या समयी निघाला. एक कोस मार्ग चालताच रात्रीची वेळ झाली. तेव्हा अरण्यात एक देवालय पाहून वस्तीकरिता तो तेथे राहिला. घोडा बांधण्याकरिता जमिनीत खुंटी मारू लागला, तेथे त्याला निधी दिसला. हे पाहून त्याने वेगाने खणून तो सर्व निधी घेतला आणि तो घोड्यावर ठेवला आणि तो परत श्री गुरुपुरी आला. परंतु श्री गुरुंनी त्याला परत माघारी पाठविले. असे अघटित चरित्र रोज होत होते. त्यांच्या नुसत्या स्मरणाने अंगावर रोमांच

उभे राहिले. तुम्हाला कोठवर सांगू? चरित्राची गोडी लागताच तहानभूक विसरली. तेव्हा यथामतीने ते चरित्र तुम्हाला सांगतो ते ऐका. श्री चिदंबराप्रीत्यर्थ द्विज संतर्पण चालू असता एक शिष्ट ब्राह्मण परान्न घेऊ नये म्हणून स्वयंपाक करून जेवला, तेव्हा त्याचे उपास्य दैवत नृसिंह अंगात येऊन बरीच चिदंबर स्तुती करून प्रसाद सेवन करून गुप्त झाला. त्या प्रसादाची देवादिकही कौतुकाने दुर्लभता मानून गुप्त रूपाने येऊन तो प्रसाद सेवन करीत. त्याला परान्न कोण म्हणेल? एक राजा अनंत शयनाचा भक्त होता. तो बरोबर दहा हजार सैन्य घेऊन केवळ दर्शनाकरिता निघताच तेथे तत्काळ प्रकट होऊन सर्वांना श्री स्वामींनी भेट दिली. तेथे चार दिवस राहिले. त्या राजाला फार आनंद झाला आणि त्याला परतवून श्री गुरु गुप्त झाले. व्यंकटेशगिरीत एक ब्राह्मण दोन वर्षे अनुष्ठान करीत होता. त्याला व्यंकटेशाने चिदंबराकडे जाण्याचा निरोप दिला. व्यंकटेशाचे आज्ञेने तो ब्राह्मण १२०० होन मागण्याकरिता ताबडतोब श्री गुरुंजवळ आला. श्री गुरुंची भेट घेऊन त्याने आपला दृष्टांत सांगितला आणि म्हणाला, ''कृपादृष्टीने मला १२०० होन द्यावेत.'' श्री स्वामी त्या ब्राह्मणाला म्हणाले, ''मी एक गरीब ब्राह्मण आहे. तेव्हा १२०० होन तुला कोठून देऊ? दिवस दोन प्रहर झाला आहे. स्नान करून अगोदर जेवावे आणि माझे शक्तीनुसार जे देईन त्यात संतोष मानावा.'' तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, ''आधी होन द्यावेत मग सुखाने भोजन करीन. नाहीतर पुन्हा अनुष्ठान करण्यास गिरीस जातो.'' अत्यंत आग्रह तो ब्राह्मण करीत असता नाना तऱ्हेने श्री चिदंबरांनी त्याला समजावून ताबडतोब जेवण करवून त्या दिवशी बिऱ्हाडी पाठविले. अतिशय प्रयत्न केल्यावरही स्वामी शिष्य त्या दिवशी त्याला श्री स्वामींच्या भेटीसाठी सोडेनात. दुसरे दिवशी मध्यान्ही त्याला श्री गुरु एकांती भेटले व त्या दिवशी त्या ब्राह्मणाने पुन्हा होन मागितले. श्री स्वामींनी त्याचा तांब्या हिसकावून घेतला व विहिरीत टाकला आणि म्हणाले ताबडतोब घेऊन ये. तो ब्राह्मण भयभीत होऊन म्हणाला की, ''विहिरीत कसा उतरू? माझा प्राण जाईल. आपणच तो काढून द्यावा.'' श्री स्वामी म्हणाले, ''पाणी फार थोडे आहे व उतरताच तुला लाभ होईल. व्यर्थ शंका न करता विश्वासाने आत उतर.'' मग तो ब्राह्मण धैर्य धरून विहिरीत उतरला. पाणी कमरेइतके होते. मग त्याने आपला तांब्या शोधून काढला व तो तांब्या हातात घेताच त्यात होन भरलेले दिसले आणि वर येऊन मोजताच ते बरोबर बाराशे भरले. तेव्हा ब्राह्मणाने आनंदाने स्वामींना वंदन केले. श्री स्वामींनी त्याचे सांत्वन करून त्याला

वर देऊन निरोप दिला. आपले मनोरथ पूर्ण झाल्यामुळे त्या विप्राला आनंद झाला. व तो आपल्या घरी आला. असा श्री गुरुंचा महिमा रोज लोकोत्तर होत असे. सारखे विचित्र चरित्र दाखवून श्री चिदंबर लीला प्रकट करीत असे. अल्पमती माणसाने त्याचे कोठवर वर्णन करावे? एकाचे दोन्ही डोळ्यात वडस वाढले होते. जेव्हा तो श्री स्वामींपायी सेवेस राहिला तेव्हा वडस जाऊन त्याला पुन्हा दृष्टी आली. शंकर दीक्षिताचे लग्नाकरिता व्यंकटेश आला होता. म्हणून प्रयत्न करूनही सात दिवस देवद्वार उघडेना. आठवे दिवशी श्री व्यंकटेश बाबाने स्वप्नी येऊन सांगितले की, ''श्री दीक्षितांचे घरी लग्नाला आजपर्यंत गेलो होतो. आता दार उघड.'' दुसरे दार त्याने सहज दार उघडले व तेव्हा दिव्य गंध, फुले व तुलसी हार देवावर शोभत होता. असे श्री गुरुचे अगाध चरित्र आहे. ते आपल्या वाचेने कोण वर्णन ते करू शकेल? श्री गुरुचे नुसते वचनाने विधवेचा गर्भ जिरला. दुष्कर्माने त्या विधवेने गर्भ धरला होता. ती सात महिन्याची गर्भवती झाली असता तिला फार पश्चात्ताप झाला व ती एकांती श्री गुरुंना भेटली. पश्चात्तापाने आपले सर्व दुष्कर्म तिने श्री गुरुंना सांगितले. तेव्हा श्री गुरु म्हणाले, ''गर्भनाभी नाही'' तोच आश्चर्य झाले. गर्भ जिरून गेला. पोट पाठीला लागले आणि तिने श्री गुरुंच्या पायांना वंदन केले. शिरहट्टीला एक वैष्णव होता. तो दुःखभावी आणि निंदक होता. त्याच्या पत्नीचा भक्तिभाव श्री गुरुपदी होता. दोघांची संगत पाहता पाहणाऱ्यांना असे वाटे की सोने व लोखंड एका ठिकाणी घडविले आहे किंवा राजहंस आणि कावळ्याची संगत घडली आहे किंवा धनगर आणि विद्वानाची मैत्री योजिली आहे किंवा दुर्दैवाने निवडुंगाला कल्पवेली वाढली आहे अथवा कामधेनू येऊन यवनाचे हाती सापडली आहे किंवा राक्षसाचे हाती पद्मिनी युवती सापडली आहे. अशा तऱ्हेने त्या दुष्टाचे सोबतीस त्याची पत्नी पडली होती. बाईचे मनात असे की, 'श्री चिदंबर दर्शनाकरिता जावे' परंतु तिचे पतीला द्वेष वाटत असे. श्री स्वामींचे दर्शनाकरिता जाते म्हणून पतीची तिने विनवणी केली, तेव्हा तो रागवून म्हणे, ''माझी एक गोष्ट ऐक. तू अज्ञानाने या वेळी बोललीस तेव्हा तुला क्षमा केली आहे. यापुढे असे बोलशील तर असह्य शिक्षा पावशील. आम्ही पूज्य असे वैष्णव आहोत आणि तो शिव आमचे विरुद्ध आहे आणि त्याच्या दर्शनाने आपणास दोष लागेल म्हणून यापुढे असे बोलू नकोस.'' असे पतीवचन ऐकून ती मनात उदास होऊन खंत करू लागली. काही काळ जाताच श्री स्वामी शिरहट्टीस आले आणि ती पतीव्रता श्री गुरुंचे दर्शन कसे होईल म्हणून मनात झुरू लागली. स्वामी

आपल्या गावी आलेले पाहून तो धूर्त वैष्णव आपल्या सतीस म्हणाला, ''जर तू गुप्तरितीने दर्शनास गेलीस तर प्राणास मुकशील.'' त्या गावीच श्री गुरु आपले चरित्र दाखवीत काही दिवस राहिले. परंतु त्या पतिव्रतेला दर्शन घडत नव्हते. म्हणून तिचे मनास समाधान वाटेना. माझे काय दुर्दैव आहे म्हणून मला हा असा दु:स्वभाव पती मिळाला असे तिला वाटले. कोटी जन्माचे पुण्य खर्च करूनही श्री चिदंबराचे दर्शन घडत नाही. आणि हा तसा दयाळू आहे. हा सदाशिव जवळ आला आहे. तेव्हा द्वेष स्वभाव पोटी ठेवून पतीचे सद्वैष्णत्व काय आहे असा विचार करताच तिचे शेजारचे घरी श्री गुरु आले म्हणून पश्चिम दाराने ती गुप्तरितीने दर्शनाकरिता निघाली. तिथेच तिचा पती आला आणि आपले पत्नीस तेथे पाहताच तिला मारून त्याने तिला घरात कोंडून ठेवले. ती पतिव्रता रात्रंदिवस प्रेमभावाने श्री गुरुंना प्रेमाने आळवीत होती की,'' मी पराधीन आहे. हे श्री गुरुराया मला भेट कशी देशील? पतिव्रत्य पुण्य जर मजजवळ असेल, तर हे गुरुमाउली चिदंबर माते या वेळी मला भेट दे.'' अशा नाना तऱ्हेने अंतरात गुरुस्मरण चालू असता श्री स्वामी अचानक माजघरात प्रकट झाले आणि म्हणाले, ''हे माते, चिंता करू नकोस. तुझा पती तुला घेऊन आमचे गावास येईल तरी आता सात दिवस धीर धर.'' एवढे बोलून श्री गुरु गुप्त झाले आणि स्वामींचे दिव्यरुप पाहून त्या पतिव्रतेने प्रणिपात केला. पाहिलेल्या रुपाचे मनात ध्यान करून ती सती घरी स्वस्थ राहिली. इकडे स्वामी हुबळीला आले. पुढे अचानक दुष्काळ पडला. घरचे सर्व द्रव्य संपले. पोट भरण्यास अन्न दुर्लभ झाले आणि तो वैष्णव दैवबळाने रडून म्हणाला, ''आता या वेळी मी काय करू.'' तेव्हा ती पतिव्रता मंद हसून मधुर वचनाने बोलली की, ''श्री दीक्षित विश्वंभर आहे. तेव्हा तुम्ही अन्नाची चिंता का करता? आपण त्याचे दर्शनास जाऊ. त्या योगे तुम्हास सुख होईल. मनात भरवसा धरा. व्यर्थ रागवू नका.'' पत्नीचे वचन ऐकताच तो वैष्णव मनात फार कोपला आणि त्याने तिला मारले आणि म्हणाला, ''व्यर्थ भेटीची इच्छा का करतेस? त्याचे दर्शन आम्ही घेऊ नये. तुला आता शिक्षा द्यावयाची आहे. याकरिता दर्शनाचे निमित्य करून त्या ठिकाणी जातो.'' हातात दोर व कोयता घेऊन तो म्हणाला, ''माझे म्हणणे ऐक. तेथे जर मला काही मिळाले नाही तर येथे येऊन मी तुला मारीन.'' असे बोलून तो ब्राह्मण हुबळीस आला. तेथे असंख्य यात्रेकरू होते म्हणून त्याला लवकर दर्शन घडेना. सर्वांची नावे लिहून आत नेऊन भेट करवित होते. तसे तिसरे प्रहरी त्याला आत नेऊन भेटवले. त्याने भक्तीने वंदन

केले नाही. तरी स्वामी हसून म्हणाले की, ''स्वयंपाकाला आपणास उशीर झाला आहे.'' आणि एक शेर डाळ व एक शेर तांदूळ त्याला देऊन श्री स्वामी म्हणाले, ''लवकर खिचडी करून जेवा व जे उरेल ते पत्नीस नेऊन प्रसाद द्या. ब्राह्मणाने 'तथास्तु' म्हणून स्वयंपाक करून स्वस्थपणे तो जेवला व पत्नीकरिता अर्धी खिचडी ठेवली आणि रात्री सुखाने झोपला. सकाळी श्री गुरुजवळ येऊन निरोप मागितला आणि तो मनात म्हणाला, 'आता वंदन करून जावे.' त्या लीलाधराने काहीच न देता निरोप दिला म्हणून त्या वैष्णवास फार क्रोध झाला आणि म्हणाला, ''त्या पापिणीने मला फसवले. ताबडतोब त्या दुर्वत्तेस जीवे मारावे'' असा त्याने निश्चय केला. तो तेथून निघताना श्री गुरु म्हणाले, ''आपल्या पत्नीस प्रसाद मात्र द्यावा.'' वैष्णव काही बोलला नाही व क्रोधाने गावी आला आणि हातात दोर-कोयता घेऊन मोठ्याने आपल्या पत्नीस त्याने बोलावले. पतीचा शब्द ऐकताच ती कांता आपला पती श्री स्वामींचे दर्शन घेऊन आला. धन्य माझा जन्म आणि मनात आनंद न मावता बाहेर आली. भक्तिभावाने पती चरणी वंदन करून तुम्हाला स्वामींनी काय दिले ते दाखवा असे म्हणाली. तेव्हा ओठ चावून तो विप्र म्हणाला, ''आधी ही गाठोडी पहा. तुझे वधाकरिता मला तातडी आहे. मला गोड बोलून तू फसवलेस मी तुला जीवे मारतो, ताबडतोब गाठोडे बघ.'' हे ऐकूनही ती मनात भ्याली नाही आणि तिने गाठोडी सोडली. गाठ सोडून तिने जेव्हा पाहिले तेव्हा आत सुवर्णप्रभा फाकत होती. ते पाहताच तिचे चित्ती हर्ष मावेना आणि तिने पतीचरणी वंदन केले तोही ती सुवर्णकांती पाहून प्रेम व लाज चित्ती उचंबळून एक क्षण मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला आणि नंतर तो वैष्णव सावध होऊन त्याचे डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले आणि म्हणाला, ''तू भक्तसखामणी आहेस आणि मी पतित आहे. अविचाराने मी जगन्नाथाची निंदा केली आणि तुझा घात करण्याची इच्छा केली. हे स्वामीराया, चिदंबरा, मी खरा पतित आणि दुराचारी आहे. परंतु माझा अपराध मनात न ठेवता तू माझे दारिद्र्याचा संहार केलास. तुला, त्रिलोकनाथाला पत्नी भक्तीने भजत असता मी पापीष्टाने तिला विघ्न केले. मी श्री गुरुंना एकदाही नमन केले नाही असा मी दोषी आहे.'' आणि मग त्याने संकल्प केला की, ''माझे अपराधाचे शांती करता येथून दंडवत करीत श्री गुरुंचे दर्शनास मी जाईन.'' अशा तऱ्हेने स्वामी स्मरण करीत भक्तिभावाने दंडवत घालीत आपले पत्नीसह आठवे दिवशी तो हुबळीस आला. सहकुटुंब तो वैष्णव आपले दुर्गुण सोडून त्या वेळी श्री गुरुंना भेटला आणि श्री गुरुंचे कृपेस

पात्र झाला. तुंगभद्रेच्या काठी देवपूर या नावाचे एक सुप्रसिद्ध नगर होते. तेथे बाबा भागवत या नावाचा एक भाविक भक्त होता. रात्रंदिवस तो हरिभजन करून आनंदित मनाने काळ कंठित होता आणि रोज अन्न संतर्पण करीत असे. कोणताही द्विज तेथून विन्मुख गेला नाही. त्याने श्री चिदंबराची कीर्ती ऐकून त्यांचे दर्शनाकरिता धरणे देऊन बसला. पाणीही न पिता, दोन आठवडे झाले. तो भक्तवत्सल त्याचे भक्तीस वश होऊन चौदाव्या दिवशी त्याचे कांतेस हाक मारीत मध्यरात्री प्रकटली. कोमल शब्द कानी पडताच त्याचे कांतेने दार उघडले आणि तिला अचानक दिव्यरूप असलेली तेजोमूर्ती पुढे दिसली. येथे काय सूर्य प्रकटला आहे असा विचार ती सुवासिनी करत असता तो दयाखाणी वेगाने धावून भक्ताजवळ जाऊन बसला. त्याची भक्ती, धैर्य आणि प्राप्त झालेली दारुण कष्टदशा पाहून तो कोमलांत करण श्री गुरु द्रवून बोलला. ''बाबा, उठ'' आणि जगन्नाथाने त्याला स्वत:चे हाताने उठवले व नंतर त्याला प्रेमालिंगन देऊन त्याचे सर्वांगावर आपला वरदहस्त फिरवला. जगदीशाचा हात लागताच तो भक्त सावध झाला. तेव्हा श्री गुरु हसत म्हणाले की, ''तामस भक्ती करू नये. हे भक्तवर्या, हे प्राणप्रिया, धरणे धरून तुला फार कष्ट झाले आहेत. हे सखया, तुझ्याकरीता चार लाडू आणले आहेत ते तू भक्षण कर'' असे बोलून त्या सर्वेश्वराने त्याला मांडीवर घेऊन स्वत: त्याच्या मुखात घास घातला. काय दैव थोर त्या भक्ताचे? प्रेमाने त्याला घास घालून आणि त्याला पाणी पाजून त्याला सावध करून मग त्या भक्ताबरोबर तो कृपातरंग मधुर बोलू लागला. ''धरणे धरून आत्मारामाला कशाला दुखवितोस? हे सखया, सात्विक भक्तिने देवाला फार संतोष होतो.'' हे गुरुवचन ऐकून भागवत म्हणाला की, ''सगुण दर्शनाकरिता मी धरणे धरले'' तेव्हा श्री गुरु म्हणाले, ''सगुणमूर्ती सर्व ठिकाणी आहे. तुमचे आमचे ठिकाणी सर्वात्मा परिपूर्ण श्री चिदात्मा आहे. नुसते विचाराने सुद्धा सोपे असता तुझे दर्शनासाठी वृथा कष्ट घेऊ नये. असो, हे होन घे. उद्या श्री चिदंबराचे आज्ञेने एक ब्राह्मण येईल त्याला देऊन कृतार्थ हो.'' एवढे बोलून श्री गुरु तेथेच अदृश्य झाले आणि ही लीला पाहून भागवत म्हणाले, ''मी कृतार्थ झालो. धन्य माझे जीणे की ज्यामुळे मला सगुण दर्शन झाले. मी ज्याचेकरिता धरणे धरले होते ते श्री गुरुने पूर्ण केले.'' पाहिलेले रूप हृदयात ध्यान करून जेथे श्री गुरु गुप्त झाले होते त्या ठिकाणी प्रणिपात करून आपले सुखाचे लाभाने तो निवांत बसला. श्री स्वामींनी सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी एक विप्र भिक्षेच्या निमित्ताने गुरुंचे नाव सांगत आला. त्याला होन

देऊन भागवताने वंदन केले. असा विलक्षण गुरु महिमा ज्याची कळा ब्रह्मादिकालाही कळत नाही ते गुरुचरित्र वर्णन करायला या भूलोकावर कोणाला शक्य आहे? श्री गुरु मुरगोडी असता थोर अशी आषाढी एकादशी आली. त्या दिवशी असंख्य यात्राजन श्री गुरुंचे दर्शनाकरिता आले. ते लोक रामेश्वरास निघाले होते आणि सहज श्री गुरुंचे दर्शन घेऊन जाऊ म्हणून सर्व यात्रिक तेथे आले होते. आपली सत्ता भक्तांना कळण्याकरिता श्री गुरुंनी चार कारकून नेमून सर्व यात्रिकांचे नाव, पत्ता लिहवीला. मग कारकून येऊन सर्वांची नावे वाचून सांगू लागले. त्यातील एक हजार लोकांना आत बोलावून श्री गुरुंनी दर्शन दिले. त्यांचे सर्व मनोरथ पुरविण्याकरिता अर्धा नारळ व डाळ, तांदूळ मोजून सर्वांना प्रसाद दिला. प्रत्येकास एक शेर तांदूळ, अर्धा शेर डाळ व अर्धा नारळ देऊन प्रसाद फळ घ्या. म्हणून सर्व यात्रिकांना बोलविले की, प्रत्येक कौतुकाने दुकानातून धान्य आणून पुरवीत होते. कित्येक शिधा मोजून देत होते. याप्रमाणे श्री गुरु आज्ञेने सर्व यात्रिकांना दिले. दिवसाचा तिसरा प्रहर होता. श्री गुरु धर्मशाळेत उभे होते. आणि अपार दर्शनोत्सुक यात्राजन बाहेर उभे होते. बाहेर कमाविसदार बाजाराची खबर घेत होता आणि डाळ तांदूळ निश्चित संपले म्हणून हेर सांगत आले. तेव्हा तो कमाविसदार चिंतातुर होऊन आत आला आणि आता काय करू म्हणून म्लान वंदन करून श्री गुरुजवळ बसला. त्या सर्वज्ञ श्री गुरुंनी ते ओळखून त्याला बोलावून श्री गुरु सुमंद हसत म्हणाले की, ''ते तांदूळ आणा पाहू.'' चार पायली तांदूळ शिल्लक होते. त्यातील एक मूठभर तांदूळ आणले आणि ते हातात घेऊन भक्त कनवाळू म्हणाला, ''हे राशीत टाका.'' त्या कर्पूर धवलाने सहज डाळ आणवून तसेच केले मग आपण स्वत: नारळाजवळ येऊन बसले. अंदाजे ते पाचशे होते त्यातील एक फळ हाती घेऊन श्री गुरुंनी त्याकडे सुधादृष्टीने पाहिले आणि स्वत: ते राशीत ठेवले मग गुरुंनी शिष्यांना सांगितले की, ''प्रसाद लवकर वाटावा अन्यथा निश्चित रात्र होईल.'' तेव्हा जरी खूप यात्रिकांना ताबडतोब बोलावून शिधा देऊन पाठविले तरी धान्य तसेच पाहून शिष्यांना आनंद झाला. पाच घटका रात्र झाली. परंतु यात्रिक शिधा घेत होते, तरी धान्य पूर्वीइतकेच उरले होते. अशी श्री गुरुंची अगाध लीला कोणाची मती वर्णू शकेल? परंतु श्री गुरुंची कृपा ज्यावर होईल तोच थोडक्यात वर्णू शकेल. देवादिक ज्याचे धाकाने वर्ततात त्याचे चरित्र कोण वर्णू शकेल? एके दिवशी सावित्री पतीने सहजच आनंदाने ब्राह्मण भोजन आरंभिले होते. भोजनाकरिता ब्राह्मण बसले. तुपासह सर्व

पदार्थ वाढले. इतक्यात जोराच्या पावसाने ब्राह्मण पंक्तीत घाबरले. हे लोकांवरील संकट पाहून तो सोमयाजी श्री गुरु पंक्तीमध्ये आला आणि सहज पाच नारळ आणून ढगांकडे पाहत फोडले. मग द्विजांना भोजनाकरिता आज्ञा दिली. द्विजांनी आपोषणी केली. इतक्यात ढग कडकडून वर्षाव करू लागले. मळ्याच्या शेरतटा बाहेर अपार पाऊस पडत होता. परंतु आत पाण्याचा एक थेंबही पडत नव्हता असे श्री गुरुंचे अगाध चरित्र आहे. बाहेर गुडघ्याएवढे पाणी धडाधडा वाहात होते. आत द्विजांचा मेळावा स्वस्थ जेवत होता. असा श्री गुरुंचा अगाध महिमा होता की, वर आकाशाची छत्री धरली होती म्हणून एक थेंबही पाणी गळत नव्हते आणि अघटित असे जगद् पवित्र श्री गुरुंचे चरित्र प्रकटले होते. ब्राह्मण स्वस्थ जेवून उठले, त्यानंतर यथास्थित पंक्ती जेवल्या. तोपर्यंत स्वत: तेथे उभे राहून मग श्री गुरु भोजनाकरिता आत गेले. सर्व ब्राह्मण गेल्यानंतर श्री स्वामी भोजनाकरिता बसले. मग मात्र पाऊस आत पडू लागला. असे श्री गुरुंचे अघटित कृत्य कोठवर वर्णन करावे? पदोपदी तो मनमोहन पूर्णावतार श्री चिदंबर विलक्षण चरित्र दाखवीत होता. गुरुनवपुरी तो ज्ञानराशी आनंदाने लीला चरित्र दाखवीत असता एके दिवशी आषाढ कृष्ण एकादशी आली. श्री गुरुपुजेस बसले होते तेव्हा एक गोदातीरीचा विख्यात असा महाभक्त जो योगभक्ती व ज्ञाननिष्णात होता आणि रात्रंदिवस शिवभजनी रत होता व योगाभ्यासाच्या योगाने ज्याला सर्व सिद्धी प्राप्त होत्या तो स्वत:च्या आयुष्याचा अंत निकट आलेला पाहून गुरुपदी प्राण सोडावा अशी इच्छा धरून आला. मग तो योगी योगाभ्यास बळाने वाघ होऊन गुरुपुरी प्रवेशला. त्या वेळी सूर्य उदयास आला होता. एका लोहाराचे घर पाहून त्या वाघाने मौन धरून आत प्रवेश केला. त्याला लोहाराने पाहिले. वाघाला पाहून लोहार फार भ्याला आणि आक्रोश करून चोहीकडे पळू लागला व जमिनीवर पडला. वाघाचा वृत्तांत ऐकून त्याचे जवळ लोकांची फार दाटी झाली. कित्येक धीर धरून वाघाला पाहण्यासाठी गेले. लोकांना पाहताच त्या कपटी वाघाने वारंवार आपली शेपटी आपटली व भयंकर आवाजाने गर्जना करीत लोकांना मारण्यास तो येऊ लागला. कित्येकास सकुंचित नखाने मारल्यासारखे भय तो दाखवित होता. कित्येकांची डोकी दातात धरून कौतुकाने तो सोडीत होता. त्या वेळी महास्वामी पूजेला बसले होते आणि वाघाचा वृत्तांत कळताच त्यांनी शिष्यांना सांगितले की, ''तो वाघ नसून ज्ञानराशी असा महाभक्त आहे. तो भेटीस आला आहे. त्याला मारू नका,'' असे श्री गुरु

शिव चिदम्बर

सांगत असूनही ते न ऐकता दुर्जन म्हणाले की, ''आपण वाघाला मारू.'' लोहार आक्रोश करीत असता पुष्कळ लोक आयुधे घेऊन आले. कित्येकांच्या हातात कुऱ्हाड होती. कित्येकांनी तीक्ष्ण तलवार घेतली होती. कित्येकांनी लोखंडाचा दांडा घेतला होता आणि कित्येकांनी पदरी दगड बांधून घेतले होते. तेव्हा वाघाने महाशांती धारण केली होती आणि तो डोळे झाकून एकांती बसला होता. कित्येकांनी दगड गुंडे मारले. परंतु वाघाची शांती ढळली नाही. जर वाघ कोपला असता तर त्याने एकजात शेकडो लोकांना मारले असते. परंतु तो शांतीने गुरुपादुकांचे ध्यान करीत होता आणि योग्यासारखा स्वस्थ बसला होता. इतक्यात एका दुष्टाने कोपाने त्याला गोळी घातली. गोळी लागूनही वाघ उठला नाही व आपले डोळे त्याने उघडले नाहीत. तो ध्यानस्थ बसला होता. श्री गुरुंनी तो गोळीचा आवाज ऐकून ताबडतोब आपले आसन सोडले आणि उठून ताबडतोब लोहाराच्या घरी आले. क्रोधाने सर्व लोकांना दूर सारले. ते जेव्हा वाघाजवळ आले तेव्हा वाघाने डोळे उघडले आणि पुढे श्री स्वामींना पाहताच जमिनीवर डोके लावून नमन केले आणि जोरात गर्जना करून तत्काळ देह सोडला. गर्जनेच्या शेवटी चार अक्षरे ऐकली तो चिदंबर असा कोमल शद्ब होता. तेव्हा श्री स्वामींना अचाट क्रोध आला आणि म्हणाले की, ''तुम्ही हे काय केले? वाघ म्हणून भक्तश्रेष्ठाला मारून तुम्ही अरिष्ट संपादले आहे.'' मग वाघाचा संस्कार करवून आपण स्वत: स्नान करून आपले वस्त्र आसन आदि सर्व पूजा संभार नदीमध्ये टाकला आणि शांतीकरिता एक लक्ष लिंगार्चन करविले. तसेच लक्ष हवन करविले आणि लक्ष ब्राह्मण भोजन वाघाकरिता करविले. अशा विलक्षण गुरुलीला ज्याच्या कळा ब्रह्मादिकालाही कळत नाहीत त्या गुरुंचे चरित्र वर्णन करायला या भूलोकावर कोण समर्थ आहे? अष्टमहासिद्धि ज्याचे स्वाधीन आहेत त्याचा महिमा कोण वर्णन करू शकेल? दोन शेर पुरण घालून हजार ब्राह्मण जेवविले असे अघटित कौतुक तो सावित्रीपती पदोपदी दाखवीत असे. परंतु मूर्ख लोक ते ओळखत नसत. श्री गुरु सर्वांचे ठिकाणी दयाळू होता आणि त्याची सर्व कृती लोकांचे उद्धाराकरिता होती. एका श्रीमंताने अफूच्या व्यसनात आपली सर्व संपत्ती घालवली. पोटाला अन्न दुर्लभ झाले होते. तरीही अफूविषयी त्याचे मन विटेना. अफूशिवाय त्याचा प्राण व्याकूळ होताच श्री गुरुंचे दर्शनाकरिता आला. तेव्हा तो करुणाकर त्याचे स्वप्नात जाऊन म्हणाला, ''तू घाबरू नकोस. तूही एक शेर अफू घे आणि रोज किंचित घेत जा.'' असे बोलून त्या कृपामूर्तीने त्याचे हाती

अफू दिली. मग तो जागा होऊन त्याने प्रत्यक्ष आपले हातात अफू पाहिली. मग आनंदाने अफूचे सेवन करताच त्याचे चित्ताला स्वस्थता आली. परंतु अफूचा गुण त्याचे अंगी आला नाही. उलट अफूविषयी निराशा प्राप्त झाली. मग ते व्यसन सोडून श्री गुरुचरण तो भजू लागला. याप्रमाणे विलक्षण अघटित अशी करणी श्री गुरूची होती. गल्लीत कुष्ट असा एक ब्राह्मण होता. त्याचे हातपाय गळून पडले होते. परंतु केवळ दर्शनानेच त्याचा दारुण रोग नाहीसा होऊन त्याच वेळी तो सर्वांगी सुंदर झाला. पांढऱ्या कोडाचा एक द्विज श्री गुरुचे दर्शनाकरिता आला परंतु क्रोधाने स्वामीने त्याला भेट न देता लोकदृष्टीबाहेर घालवले. तो खिन्न वदन होऊन एका देवळात जाऊन राहिला. तेथून त्याला बाहेर घालवा म्हणून श्री गुरुंनी शिष्य पाठविले. तो ब्राह्मण फार खेद करीत गावाबाहेर जाऊन बसला आणि 'नदी पार करून द्या' असे म्हणत होता. नंतर पुन्हा श्री गुरुंनी शिष्यांना पाठविले. मग तो ब्राह्मण अत्यंत दु:खी होऊन नदीजवळ बसून म्हणू लागला की, ''काय माझे दुर्दैव बलिष्ठ आहे. येथेही मला कष्ट होतात. लोक श्री चिदंबराला पूर्ण कनवाळू आणि दिनदयाळू म्हणतात. त्याला जर माझेविषयी एवढा क्रोध आहे तर त्याला दयाळू म्हणू कसे? आता जिणे कशाला पाहिजे? प्राण सोडणेच बरे आहे.'' अशा परम दु:खाने तो मार्गाने जात रडत होता. कंठशोषाने उबारा होत आहे. अंग थरथरा कापत होते. अंगातून घाम झरझरा वाहत होता. तेव्हा तो एका झाडाचे खाली वारा घेत होता. वस्त्राने अंग पुसून सहज त्याने आपल्या हाताचा पृष्ठभाग पाहिला तेव्हा त्याचा सोन्यासारखा रंग दिसत होता. मग त्याने आपले सर्वांग पाहिले. सोन्याप्रमाणे त्याची अंगकांती फाकत होती. हे पाहून त्याला फार आनंद झाला आणि म्हणाला, ''हे दयाळू, कृपामूर्ती तूच आहेस हे मी ओळखले. वरवर क्रोध दाखवून हे कृपाराशी माझे पाप न पाहता माझेवर पूर्ण अनुग्रह केलास. मी मनात व्यर्थ रागावलो.'' याप्रमाणे तो द्विज स्तोत्र करीत होता व वारंवार लोटांगण घालीत पुन्हा दर्शनाकरिता आला आणि श्री स्वामींनी त्याला आदराने बोलाविले. त्या दयाघनाने त्याची इच्छा पूर्ण करून स्वस्थानी पाठविले. जेथे ब्रह्मदेव मौनावला तेथे कोठपर्यंत वर्णन करावे? मेलगिरी नावाचा एक गजेंद्रगडीचा सराफ जन्मांध होता. त्याला केवळ स्वामी दर्शनाने दृष्टी आली. नवलगुंदपुरी श्री चिदंबराने थोर असे द्विजसंतर्पण आरंभिले. इतक्यात मोठा पाऊस आला आणि सर्व द्विज भयातुर झाले. तेव्हा श्रीगुरु म्हणाले की, ''भिऊ नका. स्वस्थपणे भोजन होऊ द्या.'' मैदानात ब्राह्मण बसले होते. त्यांचे पूर्ण जेवण

झाले पाहिजे याकरिता एका ब्राह्मणाचे उपरण्यात नारळ बांधून त्याला आज्ञा केली की, ''तू बुरुजावर आपले हाताने नारळ फिरवीत उभा रहा.'' 'तथास्तु' म्हणून तो ब्राह्मण वस्त्र फिरवीत उभा राहताच ढग कडकड शब्द करून गरगरून फिरू लागले. डावी उजवीकडे तो ब्राह्मण नारळ फिरवीत होता. त्याप्रमाणे ढगांचा समूह फिरत होता. कडकडून गर्जना होत होती. पण पाण्याचा एक थेंबही जमिनीवर पडत नव्हता. स्वामी पंगतीत फिरत होते आणि म्हणाले, ''पोटभर जेवण होऊ द्या.'' त्याप्रमाणे ब्राह्मण भरपूर जेवून त्यांनी हात धुतले. तेव्हा श्री गुरुंनी त्या ब्राह्मणास बुरुजावरून खाली उतरण्यास सांगितले. नारळ फिरवणे सोडून तो ब्राह्मण खाली उतरला इतक्यात जोराचा पाऊस सुरू झाला आणि ते मेघ कडकडून गर्जना करीत होते तोपर्यंत स्तब्ध होते. सर्व माना डोलावू लागले व म्हणाले की, ''काय गुरुची लीला आहे.'' असे चरित्र तुम्हाला किती सांगू? देवादिकांनाही सांगता येणार नाही. भक्तिभावाने श्री चिदंबर चरित्र ऐकताच इहपर सुख लाभते. असे हा श्री चिदंबर किंकर श्रोत्यांना आनंदाने विनंती करतो.

।। श्री चिदम्बर गुरुवेनमः ।।

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

# अध्याय पन्नासावा

चिदंबर लिंगावतार वर्णन

।।श्री चिदम्बराय नमः।।

।। श्री गणेशाय नमः।। हे भक्तवत्सला भवसंकट हारका, श्री चिदंबरा, आनंदघना आदिमूर्ती, श्रुतिपथपालना, दीक्षितराणा तुला नमन असो. मंदस्मित वदना, दयाळा, मदन दहना वास्तव्य, मंदाकिनी धरा, सर्व मंगला असा प्रियकर जो पंचपातक नाराज पंचानन पंचभूतातीत पन्नग भूषण, पतित पावन पार्वतीरमण जो परम मंगल आहे. शुभ्र जटा, शुभ्र कांती आणि दुधाच्या पांढऱ्या फेसाप्रमाणे विभूती लावलेला ज्याच्या हाती डमरू, शूळादि आयुधे आहेत व ती शोभतात. हे त्रिविधतापहारका, त्रिनेत्रा, त्रिगुणातीता, त्रिलोकसूत्रा, त्रिपुरांतका, शुद्ध-सत्त्व-गात्रा चित्तचरित्रा तुला नमन असो. श्री गुरुचरित्र हे भवरोग रसायन आहे. ते तुम्हाला सुदैवाने लाभले आहे. ज्यामुळे जन्म-मरण फेरे सुटतात. याप्रमाणे विचित्र लीला दाखवीत नित्य मंगल श्री दीक्षित भूलोकी वर्तत असता छप्पन्न वर्षे लोटली. एके दिवशी श्री चिदंबरांनी मनात असा विचार केला की, ''आता वेदोद्धार झाला आहे आणि आपले अवतार कृत्य संपले. आता कलीकाल वाढला आहे. लोक कर्म भ्रष्ट होणार आहेत. तेव्हा या वेळी प्रकट राहणे योग्य नाही. याकरिता लोकोद्धाराकरिता येथेच गुप्त राहवे'' असा श्री गुरू मनात विचार करीत असता त्या वेळी सत्यलोकी ब्रह्मादिदेव विचारू लागले की, ''कैलासनायक भूतलावर गेले आहेत आणि अजून तेथेच राहिले आहेत. त्यामुळे आमचे येथील कार्य मुळीच चालत नाही. जेथे सदाशिव राहतो तेथेच सर्व वैभव असते. याकरिता त्याला बोलविण्यास या वेळी कोणाला तरी पाठवू.'' इतक्यात त्या ठिकाणी ब्रह्मदेवाचे दर्शनाकरिता महाकाल आला. त्याला ब्रह्मदेवाने आज्ञा केली की, ''तू भूतलावर जाऊन उमासख्यास बोलावून आण. त्याच्याशिवाय आमचे सर्व कार्य थांबले आहे.'' हे ब्रह्मदेवाचे वचन ऐकून महाकाल त्यांचे चरण वंदून म्हणाला, ''त्याचे नाम-स्मरण करणारे लोक जे आहेत त्यांना पाहण्यासही मी भितो. ज्याच्या हाती पुष्कळ जीव आहेत आणि तो सदाशिव त्यांना स्वसत्तेने सोडवितो तर मग मी प्रत्यक्ष त्याचे पुढे गेलो तर माझे महत्त्व कसे टिकेल? त्याचे अवतार चरित्र जो वाचेल





शिव चिदम्बर

शि व चि द म्ब र

त्याच्यापुढेही जाणे मला शक्य नाही. मग त्या महाकाल कालास प्रत्यक्ष भेटणे कोणीकडे? ज्याचे भक्त माझे डोक्यावर पाय ठेवून कैलास मंदिरात निर्भयतेने जाऊन बसतात त्याचेपुढे मी कसा जाऊ? ज्याची आज्ञा मानून मी भीतभीत भूलोकावर संचार करतो त्याचेपुढे मी उपद्रवी कसा जाऊ सांगा?'' असे महाकाल वचन ऐकताच ब्रह्मदेवाने त्यास बोध केला, ''तो सर्वात्मा दीक्षित सर्व जाणणारा आहे आणि तुझे मनोरथ पुरवील. त्याचे नगराजवळ गुहेत जाऊन बैस. तो चिदंबर ज्ञानदृष्टी आहे. असे वाक्य ऐकून ब्रह्मदेवाचे पद वंदन करून तो विरक्त वेष घेऊन सिध्द गुहास स्थळी जाऊन बसला. कोणी विचारले तर कौतुकाने सांगत होता की, ''श्री दीक्षित दर्शनाकरिता मी आलो आहे.'' ''मग त्यांना जाऊन भेटा'' असे म्हणताच, ''तो सर्वज्ञ मला जाणतो'' असे सांगत असे. इकडे एकदा श्री गुरुंनी आपले भक्तांना एकांती बोलावून भावी अनर्थ टाळावा म्हणून त्यांना हिताकरिता धर्माचार सांगितला आणि म्हणाले, ''एकचित्ताने माझी गोष्ट ऐका. भावी समय दुर्घट आहे आणि तुम्ही धैर्याने धर्माचे रक्षण करावे. नित्य नैमित्तिक कर्म आचरावे. यदृच्छा लाभाने संतुष्ट राहवे आणि यथाशक्ती दान करावे. वाईट अन्न खाऊ नये. दारिद्र्य आले तरी धीर सोडू नये. शूद्राचे अन्नाने मती जड होते, म्हणून हे अन्न खाऊ नये. फार काय सांगावे, अब्रह्मण्य समय काळ निश्चित आहे. परंतु सुखाने सत्कर्म करीत राहवे. नंतर कैलासरमण अवतरून वेदमार्गाचे रक्षण करतो. तोपर्यंत धर्माने सत्त्व राखून शिवचिंतनात काळ घालवावा.'' याप्रमाणे गुरुने सांगितलेले कलिवृत्त व भविष्य राजारामादिक महाभक्त ऐकून खिन्न चित्ताने विचारते झाले, ''हे स्वामी, आपण कर्तुमकर्तु समर्थ असून भावी अनर्थ निवारण्याकरिता असामर्थ्यप्रमाणे का बोलता आहात? आम्हाला असे वाटते की, आपण अवतार संपवू इच्छिता आहात. तुमचे जवळ इतकी वर्षे क्षणाप्रमाणे नाहीशी झाली. आसनी, शयनी, भोजनी, भाषणी, मंत्रणी आणि सभा स्थानी आम्हाला सोडून राहिला नाहीत आणि आजच आमचा अव्हेर का करता? आम्हालाही बरोबर न्या. तुझेशिवाय आम्हाला एक क्षणही चैन पडणार नाही.'' असे साश्रु नयनाने विनवीत श्री गुरुंचे पायी गहिवरत ते भक्त आडवे पडले. याप्रमाणे विरह भयाने दु:खी झालेले आपले भक्तांचे कष्ट पाहून श्रीगुरु चित्ती द्रवून बोलले, ''मागे तुम्हाला सोडून मी कधी गेलो नाही आणि आताही जाणार नाही हे तुम्हाला सत्य सांगतो. या वेळेपर्यंत धर्म स्थापण्याकरिता मी प्रकट होतो. आता येथेच भक्तांचे रक्षण करण्याकरिता गुप्त राहीन. अवतार कृत्य सर्व

शि व चि द म्ब र

संपलेले आहे. यापुढे भक्त कार्य मात्र राहिलेले आहे.'' हे गुरुवचन ऐकून म्लान वदनाने भक्तांनी विनंती केली की, ''तुला सोडून आम्ही या काळ्याकुट्ट कलिकालात कसे राहू?'' तेव्हा श्री चिदंबर म्हणाले, ''भिऊ नका. धीर धरा. मी माझे सर्व रहस्य सांगतो. तो एक भावाने ऐका. मागेही भक्तांना मी कधीच सोडले नाही आणि पुढेही मी तुम्हाला कधीच सोडणार नाही. माझे आवडते ठिकाण 'केंगेरी' आहे आणि नेहमी महापहातीरी गुरुपुरी मी वास्तव्य करून भक्तोद्धार करतो. माझे निवासस्थान हे महाक्षेत्र आहे आणि काशी वगैरे सर्व क्षेत्र आणि गंगा ही लोकांचे उद्धाराकरिता येथे राहतात. 'केंगेरी हीच काशी होय.'' याचा प्रत्यय येण्याकरिता श्री स्वामींनी औदुंबरातून गंगेस प्रकट करून दाखविले. औदुंबर कोटरातून सात दिवस शुद्ध पाणी वाहत होते. हे पाहून सर्व लोक भारावून गेले. एक दिवशी श्री गुरु लोकांना म्हणाले, ''एक चमत्कार दाखवितो'' आणि असे म्हणून श्री स्वामी गावाबाहेर आले. तेथे तळ्याखाली एक विहीर होती त्या पाण्यात मधोमध तीन पिंड तरंगत होते. हे पाहून लोकांना आश्चर्य वाटले आणि त्यांनी विचारले, ''हे पिंड तरंगतात कसे?'' तेव्हा श्री गुरु ब्राह्मणांना म्हणाले, ''विहिरीजवळ बाहेर झोपून सकाळी माझ्याकडे या आणि काय दृष्टांत होईल ते सांगा.'' आज्ञेप्रमाणे दोन ब्राह्मण तेथे निजून सकाळी सभास्थानी आले व ''एक सुवासित सर्व अलंकार धारण करून कडेवर सुवर्णकलश घेऊन आली व ती पाण्यात गुप्त झाली.'' दुसरा ब्राह्मण म्हणाला, ''एक सवत्स आणि तहानलेली अशी गाय विहिरीपाशी पाणी पिण्याकरिता येताच विहिरीचे पाणी एकदम वर आले. आणि ते गाय वासरू पाण्यात शिरले. तोच पाणी पुन्हा ख़ाली गेले.'' तेव्हा स्वामींनी सभासदांना विचारले की, ''या दृष्टांताचा अर्थ काय ते सांगा.'' तेव्हा विनयाने सभासदांनी विनंती केली की, ''याचा अर्थ सांगण्यास श्री गुरुच समर्थ आहेत.'' तेव्हा श्री गुरुंनी सभासदांना दृष्टांताचा अर्थ सांगितला. ''सुवासिनी ही निश्चितच गंगा होती आणि गाय ती गयाच होय आणि दोघी एकत्र येऊन विहिरीत राहिल्या आणि त्यांची सत्ता प्रकट होण्याकरिता पिंड तरंगत होते म्हणून केंगेरी हीच काशी आणि तेथेच मी निश्चित वस्ती करतो'' असा चमत्कार दाखवून भक्तांना श्री स्वामींनी बोध केला. ''जगात चिदंबर संप्रदाय वाढविण्याकरिता तसेच भक्ती वाढविण्याकरिता माझी सहा मुले तुम्हाला मदत करतील. माझे ठिकाणी भाव धरून जो संप्रदाय विधीने लोकांत राहतो त्याचे अंतःकरणात मी पूर्णपणे वास करतो. आपण चिंता करू नये. देवांना माझ्या आगमनाची

इच्छा झाली आहे आणि सिद्ध दरीत माझेकरिता महाकाल येऊन बसला आहे. संतुष्ट चित्ताने मला आज्ञा द्यावी. त्याच्या संतोषाकरिता मी जाईन. परंतु लगेच लौकिकार्थ देह सोडून शाश्वत येथेच गुप्तपणे वस्ती करीन. याचा आपण विषाद मानू नका. जे शांत अंत:करणाचे संत आहेत. जे वेदांची आज्ञा पालन करतात, त्यांचे हृदयी मी पूर्णत्वाने वस्ती करतो. माझे कीर्तन, माझी कथा श्रवण आणि जे स्वत: माझे चिंतन करतात, त्यांचे हृदयात माझे सदन आहे. हे भक्तांनो, यावर भरंवसा ठेवा. सर्वांशी जो समत्वाने राहतो आणि परनिंदेला शिवत नाही आणि ज्याच्या दृष्टित हरिहरात भेद नाही, तेथे मी राहतो. परस्त्री, परद्रव्यहरण, परनिंदा आणि प्राणी हिंसा जो स्वप्नातही शिवत नाही, तेथे मी पूर्णपणे वसतो. असत्य बोलणे, कपटी असणे, गो-ब्राह्मण ग्रास हरणे जो स्वप्नातही मनाने शिवत नाही तेथे पूर्णपणे माझा वास आहे. राजारामकृत अभंग जो विश्वासाने भजतो त्याचे अंतरंगात निश्चित मी सर्वात्मा सतत राहतो. प्रेमभराने माझे नाम म्हणून गाऊन रोमांच व हर्षाश्रू वाहतात, तेथे मी पूर्णपणे वसतो. शिवशास्त्राने केलेले माझे प्राकृत व संस्कृत स्तवन जो भक्तीने व प्रीतीने वाचतो, तेथे मी निश्चित वसतो. फार काय सांगावे? भक्तांजवळ मी राहतो.'' असे बोलून श्री स्वामींनी अभयवचन दिले. श्री चिदंबराचे अभयवचन ऐकून सर्व भक्तजनांना समाधान झाले व ते स्वस्थ राहिले. श्री चिदंबराचे अभयवचन ऐकून सर्व भक्तांना पटले की, श्री चिदंबर चरित्र परम पावन असून त्याच्या केवळ श्रवणाने पाप नाहीसे होते आणि ते ऐकून आपण आपला जन्म सफल करा असे हा चिदंबर किंकर सांगत आहे. मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थीस श्री गुरुंनी प्रात:कर्मे आटोपून होमशाळेत जाऊन ते वेदीमध्ये बसले आणि क्षणमात्र ध्यानस्थ बसून 'ब्रह्माहंस्मी' असे उच्चारून चिदानंदी ऐक्य पावले. असा लीला नाटकी मृत्युंजय पाहून सर्व भक्त दीन वदन व दु:खाक्रांत झाले. इतक्यात दिवाकर येऊन होमशाळेचे दारात बसला व कोणाचे न ऐकता दारुण आक्रोश करू लागला आणि म्हणाला, ''मी स्वामींना सोडणार नाही. तसेच पुढील कर्म पण करणार नाही. माझे बरोबर जर गुरु जातील तर ते सुखाने कैलास मंदिरात जावोत. नाहीतर मी प्राण देईन.'' असे म्हणून सर्वांना मारावयास येऊ लागला. दिवस तीन प्रहर झाला होता आणि दिवाकर शांतचित्त नव्हता. त्याचेसमोर उभे राहण्यास कोणासही शक्य नव्हते. तेव्हा धुरंधर शिवशास्त्री समोर आले. त्यांना मारण्यासाठी दिवाकर उठला. परंतु न घाबरता होमशाळेच्या दारात उभे राहून शास्त्री हात जोडून प्रार्थना करून म्हणाले की, ''हे भक्तकैवारिया दक्षिणायन


शिव चिदम्बर

चालू असताना स्वर्गाचे दार बंद असते. आजपर्यंत ह्या अवनीवर आपण अद्भुत लीलाचरित्र दाखविले. शिवावतार म्हणून आपण प्रसिद्ध झाला आहात, मग ह्या अंतिम समयी असे का?'' अशा तऱ्हेने शिवशास्त्र्याने दीन वदनाने प्रार्थना केली. तेव्हा श्री गुरु लगेचच शिवशिव असे म्हणून उठून बसले. नंतर पुत्रास बोलावून म्हणाले, ''संध्याकाळ झाली आहे. ब्राह्मणांना अतिशय भूक लागली आहे आणि तुम्ही असे भ्रमित झाल्यासारखे का बरे बसला आहात? स्वयंपाकाची देखील काहीच तयारी दिसत नाही आहे.'' श्री गुरुंच्या चरणाशी मिठी मारून दिवाकर म्हणाला, ''जर आपणच आम्हाला सोडून जात आहात तर मग आम्हाला कोणत्याही गोष्टीचे स्मरण कसे काय राहील?'' तेव्हा श्री स्वामी दिवाकरासी म्हणाले, ''अरे, तू अज्ञ असल्यासारखा हे काय म्हणत आहेस. तुमच्यासारखे प्रेमळ भक्त असताना त्यांना सोडून मी कोठे राहू? मी येथेच ह्याच क्षेत्री निरंतर वास करून आहे. हे सत्य तू अंतरंगात जाणून घे. अगदी ब्रह्मांड प्रलय झाला तरी मी येथून मुळीच हलणार नाही.'' अशा प्रकारे पुत्राचे सांत्वन करून लगेचच श्री गुरुंनी स्वयंपाक करविला व पूर्वीप्रमाणेच ब्राह्मण भोजन करविले. नंतर चार दिवसपर्यंत पूर्वीप्रमाणेच लीलाचरित्र श्री स्वामींनी दाखविले व नंतर दिवाकरास बोलावून म्हणाले, ''माझेवर आलेली वाईट वेळ जेव्हा देवकृपेने टळली, तेव्हा मी देवास नवस केला की मार्तंड आणि पांडुरंग या दोघांचे यथासांग दर्शन घेईन. परंतु मला दुसरे काही काम आहे, म्हणून तूच जाऊन ये.'' त्या मायालाघवीचे ते वचन ऐकताच दिवाकर जरी सूर्याचा अंश होता तरीही स्वामींचे वचनाने मोह पावून 'तथास्तु' म्हणून निघाला. आधी मार्तंड चरणाचे दर्शन घेऊन मग पांडुरंग दर्शन घेण्याकरिता तो निघाला. कारण दिवाकर पितृभक्त होता. इकडे श्री गुरुने काय केले? शके १७३७ पौष महिन्यात शुद्ध चतुर्थीस युव संवत्सरी पहाटे उठले. सर्व नित्य कर्म आटोपून गोद्विज, देवांची पूजा केली. सूर्याचे स्तवन करून पंचाग्नी प्रज्वलित केला. नंतर सालंकृत गोदान देऊन सर्व ब्राह्मणांना वंदन केले आणि वेदीमध्ये दर्भाचे आसन घालून मध्ये तो दयाघन बसला. जायासूत, भक्त, आप्त, इष्ट व सर्व यात्रिकांना बोलावून तो जगन्निवास म्हणाला, ''आज इच्छित वर मागा. माझे सर्व अवतार कृत्य संपलेले आहे आणि भक्तोद्धारणाकरिता मी येथेच गुप्तपणे राहीन. तरी आपण सर्वांनी मजवर दया ठेवावी व सुखाने राहवे.'' हे श्री गुरुवचन ऐकताच विरह भयाने दु:खीत झालेल्या लोकांनी जे वर मागितले ते संपूर्ण त्या दानशूर श्री गुरुंनी दिले. इतक्यात प्रभाकर येऊन

शि व चि द म्ब र

श्री चरणी वंदन करून म्हणाला की, ''या कलीसिंधूत आम्हाला लोटून हे देवराया, तुम्ही कसे जाता? हे स्वामीराया, मलाही आपणाबरोबर घेऊन जावे.'' हे भावाचे वचन ऐकून मंद हसत श्री गुरु बोलले, ''भिऊ नकोस. वत्सा, धीर धर. गालव क्षेत्री सुखाने राहा. तेथे राहून तुझी कीर्ती या भूलोकावर पसरेल. काही दिवस भक्तांच्या मेळ्यात राहून माझा संप्रदाय या भूलोकावर वाढवून नंतर माझेकडे ये.'' असे त्याचे सांत्वन केले. इतक्यात ब्रह्मादिक देव श्री चिदंबराच्या दर्शनाकरिता आले, ते ब्राह्मण वेषाने होमशाळेत आले. श्री चिदंबरांना वंदन करून त्यांनी ती दिव्यमूर्ती पाहिली. भस्म वनलिप्त सर्वांगा असून कपाळावर त्रिपुंड्र धारण केला होता आणि पाप समुदायाचा नाश करणारे रुद्राक्ष भूषण गळ्यात शोभत होते. दोन शुभ्र वस्त्रे अंगावर होती आणि त्याचे कमलमुख मंद हासत होते. अर्धे मिटलेले दोन्ही डोळे शोभत होते. ज्ञानमुद्रा हाती धरली होती आणि धगधगीत पंचाग्नीमध्ये ती तेजोमूर्ती शोभत होती. तुलसी मंजिरी त्या कृपामूर्तीचे कानात सुरेख शोभत होत्या. होमशाळा तेजाने तळपत होती आणि वक्षस्थळाला शिवपंचायतन शोभत होते आणि दर्शनोत्सुक यात्रिक श्री गुरुंना अनिमिष नेत्राने पाहत होते आणि तोंडाने अखंडित अशी शिवनामाची गर्जना चालली होती आणि प्रेक्षकांचे सर्व मनोरथ ज्याच्या केवळ दर्शनाने पूर्ण होत अशा त्या श्री चिदंबराला पाहून आनंदाने ब्रह्मादिकांनी प्रेमाने दंडवत वारंवार घालीत स्तोत्र आरंभिले, ''नमो नमो क्षितीभारनाशना, विप्रोत्तमरूपा, विज्ञानघना, विख्यातचरित्रा, भक्तपालना, श्री चिदंबरा, तुला नमन असो. अतिंद्रिया, निर्गुण, निराकारा, दीक्षित नामे घेऊनी अवतारा स्वयशे त्रिजग आच्छादिले दातारा, आता निजमंदिरा यावे. सुखागायकासी अखंड मंगलदायक जेणे स्वचरित्र मनोहारक भूवरी स्थापिले, त्याचे स्वसुख साधावया पायक वंदे, तुझे आज्ञाधारक आम्ही तुजसी सेवित स्वधामी वसतो. आम्ही पाहुनी महास्वामी स्वधामासी यावे, देवराया.'' याप्रमाणे ब्रह्मादिकांचे स्तवन ऐकून कैलासपती तुष्टले. मग नंतर आपला मुलगा शंकर, त्याचे हाती पंचायतन मूर्ती दिली. तेव्हा पाचही श्री गुरुपुत्र साश्रुनयनांनी व म्लान वदनाने नमस्कार करून स्वामींना त्यांनी गदगद् स्वराने विनंती केली. या घोराज्धार संसारी या महीवर आम्ही कसे राहू? आपण दुःखहारी असून आम्हाला अव्हेरुन का निघाला? तेव्हा तो सदानंद चिदंबर सर्वांना समोर बोलावून म्हणाला, ''भिऊ नका. धीर धरा. माझे वचन ऐका. जे जे सत्कर्मी मी दाखविले आहे, जो त्या वाटेने

शि व चि द म्ब र

चालेल त्याचा योगक्षेम मी चालवीन, हे माझे नेमस्त वचन जाणा.'' एवढे बोलून श्री चिदंबरेशाने आपले दोन्ही बायकांना जवळ बोलावून त्याचे पाठीवर हात फिरवले आणि त्यांना आपले तेजात सामावून घेतले. पुत्रभक्त व यात्रिकांना इच्छित वर देऊन सर्वांना हर्षचित्त करून श्री स्वामी ज्योतिर्ध्यान करू लागले. वेदीतील दर्भासनावर तो जगजेठी पद्मासन घालून नासाग्री अर्धोन्मीलित दृष्टी ठेवून बसला. ज्ञानमुद्रा विलसत होती. दोन्ही हात हृदयावर शोभत होते आणि कुंभकाने प्राणापान संचार स्तब्ध केला होता. एक मुहूर्त योग स्थितीत राहून मग 'ब्रह्माहंस्मि असे श्री स्वामी बोलले आणि त्यांनी निजानंद स्थिती धारण केली. याप्रमाणे ज्योतीरुप श्री गुरु पाहून दिनकर अस्तंगत होताच सर्व नारी-नर मौनावले. कित्येक चित्तात खिन्न होताच चिदंबर मूर्ती प्रकटून त्याचे समाधान करून गुप्त झाली. मग सर्वांना समाधान होऊन वेदपाठ, जयघोष शब्द करीत सर्व नाचू व स्तवन करू लागले, मग सर्व वैदिक पंडितांनी शंकराचे हाताने विधीयुक्त अहीताग्नी विधी करून पुत्रधर्म करविला. टाळ, वीणा, मृदंग भक्त वाजवू लागले आणि प्रेमरंग भजनात भरवून स्वामींपुढे नि:संग नाचू लागले. कित्येक खारका उडवू लागले. कित्येक लाह्या उडवू लागले. कित्येक सुगंध चूर्ण, तेल व फलांचा अलौकिक वर्षाव करू लागले. पवित्र असे ब्राह्मण मंद मंद रथ ओढू लागले आणि तोंडाने वेद उपनिषद म्हणत उत्तर दिशेला निघाले. आकाशात विमानात असलेले देव अपार अशा फुलांचा वर्षाव करू लागले. तसेच दूध, दही, अक्षता, कुंकू, पाणी आणि हळद यांचा वर्षाव करू लागले. तसेच विविध प्रकारचे सुगंध चूर्ण वरून पडताना आकाश शोभत होते. ते दुरून प्रेक्षकांना इंद्रधनुष्याप्रमाणे वाटत होते. भूतली त्या वेळी ते सुगंध चूर्ण पसरले. अहो महोत्सवाने सर्व केंगेरीतील औदुंबराजवळ आले. हा वृत्तांत ऐकून गाव व खेड्यातील लोक स्वामी निर्याण पाहण्याकरीता आले. वृद्ध, बाल, तरूण सर्व नारी-नर आले. इतक्यात रुद्रापुरीचा देसाई तोही दर्शनाकरिता निघाला. आणि त्याचवेळी त्याचे पुढे श्री चिदंबर प्रकटले व त्यांनी सांगितले की, ''मी रामेश्वराचे दर्शनाकरिता निघालो आहे व मागून इतर सेवक व भक्त येत आहेत.'' आणि मग स्वामी गुप्त झाले. तेव्हा देसाई मनात म्हणाला, ''काय ही अगाध श्री चिदंबर लीला! मी त्यांचे निर्वाण वृत्त ऐकून निघालो आणि मला प्रत्यक्ष भेटून श्री स्वामी गुप्त झाले. उत्तरेकडे तर विचित्र वाद्यनाद ऐकू येतो आहे. परंतु मी तर प्रत्यक्ष गुरुपद पाहिले हे काय अगाध चरित्र आहे?'' याप्रमाणे विस्मित होऊन देसाई मुरगोडात आला आणि स्वामींचे

प्रस्थान पाहून आपला वृत्तांत भक्तांना सांगितला. त्याच दिवशी पंढरपुराला चंद्रभागातीरी पांडुरंगाचे देवळात श्री स्वामी दिवाकराला सत्वर भेटून केले. त्या वेळी श्री गुरुंनी दिवाकराला सांगितले की, ''पदर धर. मी तुला फलमंत्रक्षता देतो.'' जेव्हा दिवाकराने पुढे पदर पसरला त्या वेळी श्री स्वामी गुप्त झाले व पांडुरंगाने आपला हात पुढे करून फलमंत्राक्षता दिवाकराला समर्पण केल्या आणि गळ्यातील स्वत:ची तुळशीची माळ दिवाकराच्या गळ्यात घातली. तेव्हा तुळशी आणि शुभ्राक्षता पाहून दिवाकर घाबरला. फलमंत्राक्षता देतो म्हणून श्री गुरुंनी सांगितले आणि गुप्त झाले आणि पांडुरंगाने या वेळी मला प्रसाद कसा दिला? ही चिन्हे पाहून माझा पिता देह सोडून गेला. असा निश्चय करून दिवाकर निघाला. तेथे जेथे श्री चिदंबराचे भक्त होते तेथे तेथे त्यांना त्या दिवशी श्री गुरुंनी भेटून त्या शिष्यांचे सांत्वन केले असे श्री गुरुंचे अघटित चरित्र आहे, असा श्रीगुरुंचा अगाध महिमा होता. लोकाचार म्हणून जरी देह सोडला तरी केंगेरी क्षेत्री त्या सर्वेश्वराची पूर्ण वस्ती होती. पुत्रादिक सर्वांनी मिळून रामचंद्र देवळाचे दक्षिणेस औदुंबराचे उत्तरस्थानी चिदंबर स्थान कल्पिले. चंदन, आगरू असे इंधन योजून श्रौताग्निने संस्कार केला आणि सर्वांनी अवभृत स्नान करून मग ते त्या चिदंबर स्थानी आले. औदुंबरावर अग्नीच्या ज्वाळा जात असतानाही त्या वेळी तो न सुकता औदुंबरांकुराला सतेजता आली. त्या रात्री चिदंबराचे अग्नीचे प्रकाशात ब्राह्मण भोजनास बसले. त्यात एका ब्राह्मणाचे मनात अशी शंका उपजली. भोजन सोडून तो ब्राह्मण उठला. तत्काळ त्याला पोटदुखी सुरू झाली. आणि पश्चात्तापाने प्रसाद सेवन करताच तत्क्षणी त्याची व्यथा गेली. रात्रंदिवस सत्वर मार्ग चालून तिसरे दिवशी दिवाकराने येऊन थोर आक्रोश केला आणि डोके फोडून प्राण देतो असे म्हणू लागला. इतक्यात श्री गुरु समर्थ पुत्राला भेटून त्यांनी त्याचे सांत्वन केले आणि म्हणाले, ''तुला तुझ्या हिताची एक गोष्ट सांगतो. शांत चित्त देऊन ऐक. लौकिकार्थ मी गुप्त झालो आहे. परंतु शाश्वत येथे राहतो. सुब्रह्मण्यम्‌क्षेत्री सध्या मी राहतो, तेही अश्वत्थाखाली लिंगरुपाने स्वयंप्रकारेश्वर परमगुरु त्याचे भेटीकरिता मी गेलो होतो आणि जोपर्यंत सूर्य, चंद्र आहेत तोपर्यंत माझा वास केंगेरी क्षेत्री आहे हे तू जाण. ते लिंग येथे आणून स्थापन कर आणि भक्तांचे काम पूर्वीप्रमाणेच यथा प्रकारे करीन हे माझे वचन सत्य आहे.'' असे श्री गुरुंचे अभयवचन ऐकून विश्वस्त चित्त होऊन, भ्रम सोडून दिवाकराने आनंदाने द्विजाराधना केली. बरेच दिव्यान्न व अपार दक्षिणा देऊन ब्राह्मणांना तोषविले. मग त्या



शिव चिदम्बर

स्थानी मनोरम असे विस्तीर्ण देवसदन निर्माण केले. नंतर श्री चिदम्बर आज्ञेप्रमाणे सुब्रह्मण्यम् क्षेत्री सांगितलेल्या स्थानावर शोधताच त्याला सुलक्षण लिंग सापडले. ते दिवाकरने आणले. शास्त्रविधीप्रमाणे पंचकुड विधान करून तेथे दिवाकराने भक्तीने लिंग स्थापन केले आणि त्या लिंगस्थानी गुप्तरुपाने तो कैलासधनी प्रत्यक्ष जागृत आहे. कित्येक भक्तांना प्रत्यक्ष भेटून तो त्यांचे मनोरथ पुरवितो. भक्तांना लिंगस्थानाजवळ पाहताच तो दीक्षितेंद्र वेळोवेळी प्रकट होऊन मनोभिष्ठ पुरवितो. असा तो भक्ताभिमानी परमेश्वर रात्रंदिवस निरंतर जागृत आहे. असा हा चिदम्बर किंकर सर्वांना सांगत आहे.

|| श्री चिदम्बर गुरुवेनमः ||



शिव चिदम्बर

# अध्याय एक्कावन्नावा

शि व चि द म्ब र

चिदंम्बर चरित्राची अवतरणिका

।। श्री शिव चिदम्बराय नमः ।।

।। श्री गणेशाय नमः ।। हे शिव चिदम्बरा, मायातीता, करुणासागरा, भवभयभंजका, भवानीभरा, परत्परा तुला नमन असो. चैतन्यघना, सद्गुरुनाथा, अविनाशपद, निजसुखदाता आदि मध्यांतरहीता, जगदाधारा तुला नमन असो. जयजयाजी, आत्मस्वरुपा, भक्तवरदा, सुज्ञानदीया, जय विश्वंभरा तेज अमूपा बुद्धीसाक्षी तुला नमन असो. हे पुरुषोत्तमा, पंडरीकाक्षा, अजा अव्यया अलक्षा सत्भक्तांना गुरुदीक्षा देऊन निजस्वरुपी मिळविलेस. त्रिपुरीरहिता, परमेश्वरा, तुझे मानस मंदिरात जीवशिव दोन्ही वसतात. हे श्री गुरु चिदम्बरा, त्यांचे अधिष्ठान तूच आहेस. द्विज श्रेष्ठ मुनींना (वक्ता बनलेल्या वृद्ध द्विजाला) म्हणाले की, ''आपण श्री चिदम्बर चरित्र सर्व सांगितले, पण देहभावाने विस्मरण होणे हे मानवतेचे लक्षण आहे. तरी पूर्वचरित्रासंधान म्हणजेच चिदम्बर चरित्रावतरणिका सांगून आता सर्वांना आठवण करून द्यावी. मागे भगवंतांनी गीता सांगून अर्जुनाला कृतार्थ केले. परंतु त्याला पुन्हा उत्तर गीता सांगावी लागली. असे मानव धर्मानुसार वारंवार विस्मरण होते. म्हणून चिदंबर कथासार सांगून स्मृती करून द्यावी. श्री चिदंबराचे चरित्र ज्यांनी ऐकले ते पवित्र होतात व न ऐकलेल्यांच्याही मनात अवतरणिका ऐकून चरित्र ऐकण्याकरिता आतुरता निर्माण होते. ही अवतरणिका ऐकून चिदंम्बरीचितैक्य होते. श्री चिदम्बर चरित्र अपार आहे. परंतु भक्तांचे अधिकाराप्रमाणे सेवन केले तर तृप्तीचा एकच प्रकार आहे. जसे तृषार्ताला पाणी. श्री चिदंबर सर्वांचे स्थानी समान असून जागृती-स्वप्नी व सुषुप्ती या तिन्हीकाळी तो अद्वयानंद भगवंत प्रकाशमय आहे. त्याचे प्रीतीने भोजन केले असता तो सद्भक्तांना स्वानंद सुख देऊन भवपार करतो, याविषयी शंका नको. आता या अवतरणिकेचे सिंहावलोकन करू या. ज्यामुळे भक्ती-प्रेम लाभेल. पहिल्या अध्यायात मंगलाचरण, केंगेरीला एक ब्राह्मण येऊन सात दिवस नाम सप्ताह करताच त्याला मुनिश्वर भेटले. त्या द्विजरुपी वृद्ध मुनिश्वराने ब्राह्मणांची तीव्र इच्छा पाहून त्यांना श्री चिदम्बर चरित्र सांगितले. जे भवरोग रसायनच आहे. दुसऱ्या

शि व चि द म्ब र

अध्यायात चिदंबराचे पूर्वजांचे नाव मूळ पुरुषापासून सांगितले आहे. कश्यपावतार असा मल्हार दीक्षित ज्योतीवृत्तीने राहत असता संत्रस्त होऊन गोठे गाव सोडून वाराणशीत स्वयंप्रकाश गुरुंजवळ राहिला आणि अध्ययन झाल्यानंतर मुरगोडी येऊन आदिती लक्ष्मीचे पाणीग्रहण केले. बरेच दिवस संतान न झाल्याने विषण्ण होऊन सुगोल क्षेत्रास पुनश्चरणाकरिता गेला. तेथून हिप्परगी गावी जाऊन आपले कुलदैवत मार्तंडास प्रसन्न केले आणि त्याचे आज्ञेने शिवाची आराधना करण्याकरिता चिदम्बर क्षेत्री प्रयाण केले. तिसऱ्या अध्यायात चिदम्बर प्रसन्न होऊन त्याने 'मीच अवतारीन' असा वर दिला आणि लक्ष्मीमाता गरोदर राहिली आणि विलक्षण तेजाने झळकू लागली. नववे महिन्यात आठ वर्षांचा चिदंबर पाहून त्याला विनंती केली असता कार्तिक कृष्ण षष्ठीस सुरेख असे बालरूप घेतले. बाललीला विश्वरूप दर्शन आणि मातेपोटी प्रभाकर म्हणून शेषाचा जन्म, शिवपूजेच्या वेळी मातीचा प्रसाद देताच त्याची साखर झाली. चौथ्यात पाचव्यात व्रतबंध व विद्याभ्यास, गजगौरी व्रतास होसुरास जाताच सुवासिनींचा उपहास पाहून मातीचा हत्ती लीलेने चालविला. रामचंद्र भक्ताचे घरी पित्यासह हळ्ळीहाळीस जाताच त्याचे मन तोषविले. सहाव्या अध्यायनात बेडसुरात शिवाची प्रतिष्ठापना करताच मेलेला बैल उठवून सुमुहूर्त केला. त्यावेळी मल्लभक्तास विश्वास वाटला. सातव्यात माढल्ली आडनावाचे लिंगोपंताने वरार्थी होऊन प्रार्थना करताच चिदंबराने सरस्वती सतीशी विवाह केला. शेल्लीकेरी येथील विष्टेशाची कन्या परम साध्वी होती आणि द्विभार्या योगाने प्रभाकराच्या लग्नानंतर तिला स्वीकारले. स्वत: पूर्णावतारी असून परोपरीने गुरुसेवा आचारीत होता. त्यामुळे पितृसेवेची थोरवी दाखवत होता. आठव्या अध्यायात सरस्वतीच्या पोटी दिवाकर आणि शंकर ही मुले झाली आणि श्री चिदंबराचे वचन अव्हेरून त्याच्या मातेने पडवळ स्वीकारुन ती मरण पावली. लीला दाखविण्याकरिता आज्ञा देऊन मार्तंड दीक्षित निजानंदी मग्न झाले आणि तिसरे दिवशी चिता भस्म गोळा करताच औदुंबराचे अंकुर दिसू लागले. द्विज भोजनात अन्नपूर्णा दर्शन झाले आणि शूद्राला निक्षिप्त धन दिले आणि माहेरी सरस्वतीचा छळ करताच टिपू सुलतान आंधळा झाला. मग त्या यवनाने श्री चिदंबराची प्रार्थना करताच त्याला परत दृष्टी दिली आणि त्याचे सर्व सैन्य जिवंत केले. कारण श्री चिदंबर सुष्ट दुष्टाकरिता करुणाकर होता. नवव्या आध्यायी वर्णाश्रम धर्मपालन आणि पितृ पुरश्चरण सांगितले व अपार ब्राह्मण भोजन दिले आणि दरिद्री ब्राह्मणांना सुवर्ण दिले.

शिव चिदम्बर

सरस्वतीचे पोटी मृत्युंजय व वररूची तसेच सावित्रीस काशीनाथ आणि भास्कर ही मुले झाली. पूर्वीचे जन्मी असलेल्या तेलणीस कृतकर्म सांगून दोन पुत्र दिले. गुरुवचन अवमानून लिंगोपंत जाऊन देसायास भेटले आणि तेथे त्याचा घात झाला. स्वामींनी ते गाव बारा वर्षांकरिता सोडले. महाप्रसादास निंदून त्याग केला असता विप्र उन्मादाने बरळू लागला आणि श्री आज्ञेने तोच प्रसाद सेवन केला असता त्याला तत्काळ गुण आला. तापसी नारायण यतीचा अधिकार पाहून श्री चिदंबराने त्याला उपदेश केला आणि तो ब्रह्मनिष्ठ सहा शिष्यात अग्रेसर झाला आणि गुरुकृपेने सिद्धी संपन्न झाला. यती वाघाशी खेळत असता मृत बाळाला जिवंत केले आणि चिदंबर नामसामर्थ्याने रिकाम्या कुंडात भागीरथी आणंली. देवलपूरी श्रीला भेटून सत्बोध चर्चा निरूपणात रंगले आणि प्रेमाने दत्त क्षेत्राला जाऊन पुन्हा आत्मरंगी रंगले. सांगलीचे राजास दृष्टांत देऊन सखारामाला स्वामींनी बंदीतून सोडविले आणि त्यानेही श्रीचे चरित्र रचून तो सर्वत्र प्रसिद्ध झाला. एकादशीस गोदातिरस्थ बाळकृष्ण स्वभार्येसहित श्री चिदंबराचे भेटीस येताना वाटेत त्याचे तान्हे मूल मृत झाले. ते तेथेच भूमीमध्ये पुरून चौथे दिवशी म्लान वंदन करून भेटीस आले आणि स्वामींनी विचारल्यावर सर्व वृत्तांत सांगितला. बाळकृष्णाला श्री चिदंबराने सांगितले की, ''मूल मेले नाही'' आणि सत्तीगेरीस जाऊन पाहताच आपले मूल रांगत आणि खेळत असलेले दिसले. भेंडीवाड गावच्या देसाईने संतती विषयी प्रार्थना केली असता स्वामी म्हणाले, ''प्रथम सुरेख कन्या होईल आणि नंतर पुत्र होईल. परंतु ती कन्या मी सांगेल त्याला द्यावी लागेल'' त्यावर तो होकार देऊन गेला. लग्नाचे वेळी दुसरे वराची योजना करताच त्या कन्येच्या अंगात ताप भरला. पुन्हा असे एकदा झाले आणि नंतर तो उर्ध्व श्वास लागलेल्या आपल्या कन्येस रामाला देता झाला आणि देवळात ती मृत्यू पावताच श्री चिदंबराने तिला उठवून रामाशी तिचे लग्न लावले. बाराव्या अध्यायात रत्नाकर यतीचे ऐश्वर्य हरण करण्यास येताच श्री चिदंबराने त्याचे भय निवारले आणि धोंडू गोखले दर्शनास येताच 'रत्नाकराला शिक्षा कर' अशी स्वामींची आज्ञा होताच त्याला युद्धात मारले. धोंडूने प्रसाद फळाचा त्याग करताच वाघाने त्याचा कंठ फोडला. हे बापूस कळताच वाघाचे शिरकमल कापून तो प्रसाद फळामुळे विजयी झाला. खलनिग्रह सत्भक्त रक्षण आणि गोद्विजपालन हे राजाला उपदेश श्री चिदंबरांनी करविले. तेराव्या अध्यायात श्री चिदंबराकडून सव्वा लक्ष रुपये मागून आणले असे बुवाजीने स्वप्न पाहून चिदंबर

शि व चि द म्ब र

शि व चि द म्ब र

दर्शनाकरिता आला. श्री चिदंबराने व्यंकटेशाची पूजा करून पालखीला पाच वर ठेवले आणि गिरीला जाऊन बुवाने ते सत्वर मोजले तेव्हा ते सव्वा लक्ष भरले. समुद्रात जहाज बुडू लागताच इंग्रजाने शिरस्तेदाराला सहज विचारले, ''आज कोण देव तारक आहे. चौथा हिस्सा लाभ त्याला देईन?'' त्याचा प्रश्न ऐकून शिरस्तेदार म्हणाला, ''समर्थ असा श्री चिदंबर एकच आहे.'' तेव्हा विश्वासाने व्यापारात पार पडताच गिरीवर सव्वा लक्ष रुपये पाठविले. छब्बीपुराला पाणी आणविले. पार्श्ववाडीस नारीने तूप देताच नैवेद्य समर्पून त्याच्या पुत्राचे विषबाधेचे हरण केले. केवळ सुनेच्या भक्तीमुळे चोर कर्मातून सोडविले. कुसुगल्लीस राक्षसाला सद्गती दिली आणि बाजीरावाकडून काशीरायास राज्य परत देवविले. पडगानूरचे वैष्णवास हरिहर ऐक्याचा बोध केला आणि यादगिरीचे देसायास परस्त्री आणि पंक्तिभेद सोडवण्यास सांगितले. परंतु दुर्दैवाने त्याचे हातून दोन्ही गोष्टी घडल्या. त्यामुळे देहास व्रण उत्पन्न झाले. पुन्हा श्री चिदंबराची प्रार्थना करताच त्याचे दिव्यांग झाले. चौदाव्या अध्यायात रेणुका दर्शनानंतर मलापहा तटी मारुती मंदिर पाहून भक्तांकडून तेथे गुरुनवपूर रचवून आपण राहिले. वेदपठण ऐकण्याकरिता शंकर भारती शृंगेरीहून नवपुराला आले आणि त्यांनी श्री चिदंबरांना लोकोद्धार कार्याची आठवण दिली. चिदंबराने अंध्रिपूजन केले असता म्हणाले, बाजी शोखोद्धरण होऊ दे. मग कर्मभक्ती आणि ज्ञान वेदाप्रमाणे स्थापन होऊ दे. पाप दुर्बुद्धीने एका ब्राह्मणाने श्रींचा कलश घेताच प्रखर असे विंचू पाहून स्तवन केले. तेव्हा त्या दयासागराने त्याचे दारिद्र्य व दुर्मती निवारण केली. पंधराव्या अध्यायात श्री चिदंबरांनी आपले सुनेस उष्टा खजूर पाठवला असता शिष्याने तो स्वत:च खाल्ला. नंतर पश्चात्तापाने आपली जीभ कापली. श्री चिदंबराने त्याचेवर कृपा करून त्याला पुन्हा जीभ देऊन उष्टे खाल्ल्याने पुण्य जाते म्हणून सर्वांना बोध केला. शिष्यासहित श्री निवासाचार्य श्री गुरुंची परीक्षा पाहण्यास गेले असता निंदेमुळे त्यांची जिव्हा कुंठित झाली. तेव्हा त्यांचे शिष्याने प्रार्थना केली. त्यावर स्वामींनी कृपादृष्टीने पाहताच त्याला पुन्हा जीभ आली आणि कोणास निंदू नये असा श्री स्वामींनी बोध केला. स्वधर्माचे आचरण करणाऱ्यास श्रीपती त्याच स्थानी भेटतो असे निश्चित वर्म दाखविण्याकरिता व्यंकटेश भेटण्यास येईल असे सांगितले. पंधराव्या अध्यायात श्री व्यंकटेश पठाण वेषाने आले परंतु ते कोणास कळले नाहीत. कारण चिदंबर आणि व्यंकटेश दोघेही गुप्तपणे बोलत होते. सोळाव्या अध्यायात शिवशास्त्र्याला भेटून शिव अवताराची खूण पटवली व

त्याच्यावर प्रसन्न होऊन भक्तिमार्गाचा उपदेश केला. सतराव्यात एका गरीब ब्राह्मणाने प्रार्थना करताच ताबडतोब त्याचे वस्त्रात माती बांधून त्या सावित्री वराने सांगितले, ''घरी जाऊनच याची गाठ सोड.'' परंतु अविश्वासाने त्याने अर्ध्या रस्त्यातच वस्त्र सोडून पाहिले असता त्यात अर्धे सोने व अर्धी माती निघाली. पुन्हा श्री चिदंबराला येऊन भेटून परतत असताना त्याचे चोर भय वाघरुपाने हरण केले. अठराव्यात चौवेदी चौघे ब्राह्मण परीक्षेकरिता काशीहून येताच एका बालकाला प्रसाद देऊन त्याचेकडून वेद म्हणून त्यांचे गर्वहरण केले. एकोणिसाव्या अध्यायात गुप्त त्रिस्थळी यात्रा करून क्षेत्रस्थ विप्रांना भोजन, दक्षिणा दिली आणि गयेच्या पुरोहितांना एक हजार रुपये दिवाकराकडून देवविले. पुत्रासह एका विधवेने वंदन करताच तिला 'अष्टपुत्र सौभाग्यवती भव' असा आर्शिवाद दिला आणि एक वर्षानंतर क्षेत्रस्थ तिचा पती आणवून तिला सौभाग्य दिले. आपला मुलगा शंकर याचे मुंजीत तूप कमी पडताच शंभर घागरी तूप मलापहेतून उसने आणून ते ऋण विसाव्या अध्यायात फेडले. धनाच्या इच्छेने एक अनाथ द्विज आला असताना त्याचे अंतरंग ओळखून 'हा साप घे. तुझे कामा होईल' असे श्री स्वामी म्हणाले, तेव्हा त्याला भीती वाटली. परंतु श्री स्वामींच्या बोलण्यावर विश्वास ठेवून धीर करून त्याने सर्प धरला असता त्याचे चोख सोन्यात रूपांतर झाले. ब्राह्मण मनामध्ये अतिशय आनंदित होऊन श्री स्वामींचा जयजयकार करीत घरी आला. एकविसाव्या अध्यायात राजाराम नावाचा भक्त भगवंताच्या सगुण दर्शनाकरिता तळमळत असता श्री चिदंबर स्वामींनी मनावर घेऊन त्याला सगुण रूपात दर्शन देऊन तोषविले. बाविसाव्या अध्यायात श्री स्वामींनी राजारामास बोध उपदेश केला. त्यायोगे अज्ञान भ्रम दूर झाल्याने साधक हा स्वत:च 'परब्रह्म' होतो. अशी राजारामास अनुभूती आली. तेविसाव्या अध्यायात श्री स्वामींनी राजारामास तत्त्वमस्यादी ज्ञानाचा उपदेश केला व त्याच्या डोक्यावर कृपाहस्त ठेवला. श्री सद्‌गुरुंच्या कृपेने त्याला कवित्व स्फुरले. चोविसाव्या अध्यायात एका मांत्रिक शास्त्र्याने व्यंकटेशाच्या आठ कला उतरविल्या व श्री गिरी क्षेत्री सहा हजार रुपये मिळाल्यानंतर तो स्वामींना जिंकण्यासाठी निघाला. तेव्हा श्री चिदंबर स्वामींनी त्याला विकल बनविले. जेव्हा त्याला पश्चात्ताप झाला तेव्हा प्रेमाने स्वामींनी कृपा केली. तसेच फक्त दोन होन देऊन ब्राह्मणास काशीयात्रा करविली. पंचविसाव्या अध्यायात तेलंग नारायण पंक्तीमध्ये जोंधळयाच्या कण्या पाहून भात मागू लागला. तेव्हा




शिव चिदम्बर

पंक्तिभेद होऊ नये म्हणून श्री स्वामींनी त्याला तांदूळ दिले. ते अक्षय तांदूळ घेऊन तो गर्वाने ब्राह्मण भोजन करू लागला. नंतर त्याने केलेला ब्राह्मणांचा अपमान ऐकून श्री स्वामींनी त्याच्याकडे भिक्षा मागितली व भिक्षा म्हणून तांदूळ मागून आणल्या दिवसापासून ते अक्षय तांदूळ गुप्त झाले. चार वैष्णव श्री स्वामींना भेटण्यासाठी आले असता त्यांनी स्वत:च स्वयंपाक केला व ते नैवेद्य दाखविण्यासाठी शाळीग्रामाच्या मूर्ती सांभळीमध्ये शोधू लागले तर तेथे त्या मूर्ती दिसेनात. तेव्हा त्यांनी श्री स्वामींची विनम्रतेने प्रार्थना केली. त्यावर श्री स्वामींनी आपल्या स्वयंपाक्यास सांभारामध्ये मूर्ती शोधावयास सांगितल्या. त्या स्वयंपाक्याने जेव्हा त्या मूर्ती काढून दिल्या तेव्हा त्या वैष्णवांनी आनंदाने श्री स्वामींचा 'आपणच विष्णू' आहात असा जयजयकार केला. गोदावरी नदीच्या काठी राहणारा एक ब्राह्मण आपल्या पुत्रासह श्री स्वामींच्या भेटीस येत असता वाटेत एका वाघाने त्याच्या बाळाला धरले तेव्हा त्या ब्राह्मणाने श्री चिदंबराचे नाव घेताच त्या वाघाने त्या बाळास सोडून दिले. सव्विसाव्या अध्यायात अगडी गावी राहणाऱ्या रामशास्त्र्याच्या मुखात भस्म घालून त्याच्याकरवी श्री स्वामींनी पुराणकथन करविले व पंडित त्र्यंबकशास्त्र्याचे गर्वहरण केले. त्या अगडी गावाच्या राजपुरोहिताचे दारिद्र्य दूर करण्यासाठी श्री स्वामींनी एक मोठा दगड दिला. घरी परतताना अर्ध्या वाटेवर त्याने पाहिले असता तो दगड अर्धा सोन्याचा झाला. अशा तऱ्हेने त्याचे भाग्य उजळले. तुंगा नदीच्या काठी राहणारा भक्त नारायण कुटुंबाचे पालन-पोषण चांगले व्हावे म्हणून श्री पांडुरंगासी प्रार्थिता झाला. तेव्हा श्री पांडुरंगाने त्याला श्री चिदंबर समर्थ आहेत म्हणून त्यांच्याकडे जाण्यास सांगितले. तेव्हा निरुपाय होऊन आणि श्री चिदंबर हे साधे मानवरूप आहेत ते काय देऊ शकणार असा संशय मनात धरून तो श्री गुरुपायाशी शरण आला. तेव्हा श्री चिदंबर स्वामींनी प्रसन्न होऊन त्याला पूर्णय्याकडे पाठविले. पूर्णय्यांनी त्यास ५००० रुपये दिले आणि त्याचे कर्ज फिटले. सत्ताविसाव्यात सुगोल क्षेत्रास वाघाजवळ दिलेल्या मुलाला परत मागताच वाघाने ते मूल प्रेमाने परत दिले. दोन शूद्र दर्शनाकरिता निघताच मार्गात एका वाघाने एकास धरले. दुसऱ्याने चिदंबराची शपथ घालताच त्याने तत्काळ सोडून दिले. तेव्हा ते दोघे श्री गुरुंकडे आले. त्यांना वाघास मुक्त करण्याकरिता श्री गुरुंनी सांगितले. ते दोघे शपथ सुटली असे म्हणताच वाघ उडी टाकून वनामध्ये निघून गेला.

अठ्ठाविसाव्या अध्यायात तडस्नूरी एका निर्जल ठिकाणी पाण्याचा झरा उत्पन्न करून लोकांना अपार

शि व चि द म्ब र

संतोष दिला. आपणास अत्यंत श्रेष्ठ समजून एक गर्विष्ठ हरिदास गुरुपुराला आला. त्याचा अहंपणाचा नाश, मंदबुद्धिच्या तिम्माच्या किर्तनाने केला.

एकोणतिसाव्या अध्यायात नृसिंहरूप दाखवून नृसिंह भक्ताचे गर्वहरण केले आणि पंक्ती बहिष्कृत असणाऱ्याचा स्वीकार करून आपला अद्‌भुत असा नाम प्रताप प्रकटविला. नामाने चित्त शुद्धी होते, नामाने सर्व सिद्धी प्राप्त होतात आणि नामानेच त्रिशुद्धी मुक्ती होते व निर्विकल्प स्थिती नामानेच होते. नामानेच भक्ती, ज्ञान व विरक्ती चित्स्वरुप प्राप्ती निजानंद निरतिशय शांती नामानेच प्राप्त होते, हे सर्वांना दाखविले.

तिसाव्या अध्यायात क्षय नाम संवत्वरी या भूलोकी दुष्काळ पडताच मल्ल भक्ताकडून सर्वांना ज्वारी देववून जे दुष्काळ पीडित होते त्यांना तोषविले. एकतिसाव्या अध्यायात अन्न आणि पाणी देऊन कुसुगल्ली दुष्काळग्रस्त लोकांना तृप्त केले आणि शिरहट्टीस कार्तिकात पाऊस पाडून श्री गुरुंनी दुष्काळाचे निवारण केले. चार ब्राह्मणांना इच्छा भोजन देऊन शूद्राला निक्षिप्त धन दिले व त्याची भक्ती आणि अधिकार पाहून दिव्य ज्ञानाचा बोध केला.

बत्तिसाव्या अध्यायात चिकोडीला अण्णंभट्टास प्रपंच आणि परमार्थ ऐक्याचा सुरस बोध करून त्याचे व्रणाचे निवारण करून त्याने सोडून दिलेल्या पुत्रास त्याचे स्वाधीन केले. तेहेतिसाव्या अध्यायात गर्विष्ठ अशा घंटाख शास्त्र्याचे मुक्याकरवी वेद म्हणवून गर्वहरण केले व कुष्टी वेश्येचा रोग निवारून द्विजोच्छीष्ट महिमा दाखविला.

चौतिसाव्या अध्यायात नवलगुंदी काशीनाथ या मुलाची मुंज केली. विश्वंभर व दिवाकराने प्रार्थना करताच यज्ञाचा उपोद्‌घात केला. पस्तिसाव्या अध्यायात यज्ञपूर्वांग कथन, श्यामभट्ट योग्याने दर्शन, म्लेंच्छरूपाने यज्ञेशाचे आगमन, नृपादी लोक समुदाय यज्ञाकरिता आला.

छत्तिसाव्या अध्यायात अथांग यज्ञ वर्णन आणि बुडत असलेल्या ब्राह्मणाला मलापहेतून काढले व उकळत्या भाजीत पडलेल्या स्वयंपाक्याला दहा दिवस आयुष्य दिले. समाधान हेच द्विजाचे धन होय असे दिवाकराला उपदेशून अपार जनांना भोजन घातले आणि अद्वयानंद बोध केला. सदतिसाव्या अध्यायात चित्‌गंगेत अवभृत स्नान करून गंगास्तुतीने ते जल सर्वांना समान केले. मग या सोमयागाच्या शेवटी





शिव चिदम्बर

अहेराची विनंती करताच फक्त तो गरीब भक्तांकडून घेतला आणि आता वेळ गेलेली आहे असे राजेलोकांना सांगितले. यज्ञ हा कर्म आणि ज्ञान याप्रमाणे द्विविध आहे आणि ज्ञानही काया वाचा मन असे तीन प्रकारचे आहे असा बोध केला. अडतिसाव्या अध्यायात कायिक यज्ञ वर्णन आणि देहस्थ ईश्वर निरहंपणे भेटतो असा बोध केला.

एकोणचाळिसाव्या अध्यायात रुद्राक्ष महिमा ओझे ओढणारे गाढव मोक्षास जाते. कोंबडा आणि माकड वेश्येच्या घरी रुद्राक्ष धारण केल्यामुळे राज जन्माला जातात. भस्म महिमा व तो धारण करण्याचा विधी, भद्रायु रोगहरण व राक्षसास मुक्ती आणि दुर्वृत्ती अशा मृत विप्राचे कैलास गमन.

चाळिसाव्या अध्यायात वाचिक मानसिक विशेष यज्ञाचा अर्थ. एकेचाळिसाव्या अध्यायात ब्रह्मोपदेश व प्रेमळ वचनाने शिवस्मरण सर्वांना सांगितले. ज्याने संतोष होतो तोच वाग्यज्ञ भवपार व्हावे असे ज्यास वाटते त्याने ममता न धरून मन या पशुस मारावे. नंतर स्वानंद साम्राजी पडावे त्याचे नाव मनोयज्ञ होय.

बेचाळिसाव्या अध्यायात शिल्लक राहिलेल्या सामग्रीचा उपयोग करून दिवाकराने पाच दिवस सोमयाग करविला आणि आमराईच्या मालकाची प्रार्थना ऐकून फळाभाराने झाडे वाकविली, मग सुमुहूर्ता गोण्णागर सोडून श्री चिदंबर नवलगुंदास येतात आणि तेथे बाजीराव सहपरिवार भेटताच त्याचा सत्कार केला. जाण्याकरिता निघताना त्याला फलमंत्राक्षता आपले घरी नेण्याकरिता दिल्या. परंतु त्या त्याने आपले सेवकाचे पदरात टाकलेले पाहून श्री स्वामी हळहळले आणि म्हणाले, 'अब्रह्मण्य समय आलेला दिसतोय.' संकटाच्या वेळी जो ईश्वराचे निरंतर भजन करतो त्याचा योगक्षेम उमावर वाहतो.

त्रेचाळिसाव्या अध्यायात चतुर्भुज राजाचा निर्धार पाहून त्याला थोर ज्ञानाचा उपदेश केला. त्यानेही दीर्घाभ्यासाने पैलतीर गाठले आणि कृतकृत्य झाला. यतिश्वराला रामेश्वरी मी नाही असा दृष्टांत दिला. त्यामुळे तो गुरुपुरास आला आणि अभिषेक करताच त्याने प्रत्यक्ष रामेश्वराला पाहिले हे चव्वेचाळिसाव्यात सांगितले.

पंचेचाळिसाव्या अध्यायात संसारचंद्र राजा स्वामींचा प्रताप ऐकून त्यांना भजू लागला. पुढे क्षयाचा ताप त्याला होताच देहत्याग करण्याकरिता निघाला. तेव्हा श्री चिदंबरांनी तेथे प्रकटून भक्तांचे प्राण रक्षण केले असा तो दयाघन सद्गुरु केवळ स्मरणाने भक्तांना उद्धारीत होता.

शिव चिदम्बर

शिव चिदम्बर

सेहेचाळिसाव्यात एकांती राम योग्यास भेटून साक्षित्वाभ्यासाचा उपदेश केला. तेव्हा त्याचे हृदयात केवळ तूच मी आणि मीच तू या बोधाने कूटस्थ प्रकाशला. मार्तंड यात्रेकरिता निघाले असता वाटेत गालव क्षेत्री श्री कृष्णामाईचे स्तवन केले आणि स्थानाचे वेळी विधवेला सौभाग्य देऊन पुत्र दिला.

सत्तेचाळिसाव्या अध्यायात हिप्परगी क्षेत्री प्रचंड यात्रा जमली आणि ब्राह्मण भोजनाचे वेळी एका ब्राह्मणाचे डोक्यावर दगड पडून तो मरण पावला तेव्हा त्याच्या कांतेचा आकांत पाहून श्री चिदंबराचे अंत:करण द्रवले आणि यमाकडून तिच्या पतीस तिला परत दिला असता सर्वांना आनंद आणि आश्चर्य वाटले.

अट्ठेचाळिसाव्या अध्यायात स्वामीचे चित्र चरित्र थोडक्यात वर्णन केलेले आहे. विश्वनाथावर कृपा करून व्यंकटेशाच्या मूर्तीची स्थापना करविली.

एकोणपन्नासाव्या अध्यायात म्हाताऱ्याचे लग्न व एका ब्राह्मणाला १२०० होन दिले आणि काशीनाथाचे लग्नाकरिता व्यंकटेशाचे आगमन त्याप्रमाणेच भक्त व्याधीहरण, वाघरूपी भक्ताचा उद्धार आणि निंदक वैष्णवाचे कांतेस दर्शन दिले आणि खिचडीचे होन केले आणि शिलेदाराला धनदान दिले.

पन्नासाव्या अध्यायात श्री चिदंबर ब्रह्मी लीन होताच शिवशास्त्र्याने अपार स्तवन करून मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थीस पुन्हा अवतार करविला. मग दिवाकराला पंढरपूरला पाठवून सर्व भक्तांना स्वधर्म सांगून पौष शुद्ध चतुर्थीला निर्याण केले. पुढे दिवाकर परतला असता सांगितल्याप्रमाणे सुब्रम्हण्यम् क्षेत्री जाऊन शोधले तेव्हा लक्षण लिंग सापडले. त्याची यथाविधीने स्थापना केली. श्री स्वामी गुप्तरुपाने राहून भक्तांना वर व दर्शन देतात असा तो करुणाघन सद्‌गुरु भक्तांची इच्छा पुरवतो, ही अवतारणिका ऐकूनही असे वाटते की, ''याचा सप्ताह विधी ऐकून तृप्त व्हावे. तरी तो ऐका. एकाच स्थानी शुचिर्भूत होऊन पूर्व किंवा उत्तराभिमुख बसावे. रंग वल्ल्यादीक शोभा करावी. जवळ दीप तेवत ठेवावा आणि संकल्प करुन श्री चिदंबराचे पूजन करावे. चिदंबर जप व कवच पठण करून वाचनास सुरुवात करावी. मन नेहमी दिव्याप्रमाणे समाहीत असावे. गुरुस्मरणपूर्वक श्री चरित्राचा पवित्र सप्ताह सुरू करावा आणि प्रत्येक ओवी संपल्यावर चिदंबर गुरवे नम: असे म्हणावे. अथवा शिव चिदंबर हा महामंत्र म्हणताही नर अत्यंत पवित्र होतो. तसेच इष्टार्थ लाभही होतो. कामादिक नियम पाळून आरामाने भूमीवर शयन करावे. दर्भासन, कृष्णाजीन किंवा कांबळ्याचे उत्तम आसन असावे.

पहिले दिवशी नऊ अध्याय..........
दुसरे दिवशी सोळा अध्याय.......... पर्यंत
तिसरे दिवशी चोवीस अध्याय.......... पर्यंत
चौथे दिवशी बत्तीस अध्याय.......... पर्यंत
पाचवे दिवशी अडतीस अध्याय.......... पर्यंत
सहावे दिवशी सेहेचाळीस अध्याय.......... पर्यंत
व सातवे दिवशी पन्नास अध्याय.......... पर्यंत
वाचून अवतरणिका वाचावी. मग पहिले तीन अध्याय भक्तिपूर्वक वाचून सप्ताह संपवावा आणि हाच त्याचा विधी होय.

प्रत्येक दिवशी वाचन संपताच उत्तरांग पुजून उपहार पदार्थांचे सेवन करावे. संध्याकाळी भजन, आरती व मंत्रपुष्प करावे. नंतर स्वस्थ चित्ताने गुरु स्मरण पूर्वक विश्रांती घ्यावी. असा सप्ताह करून ब्राह्मण दांपत्य व सुवासिनी यांचे आदराने पूजन करून त्यांना भोजन द्यावे आणि आपल्या शक्तीप्रमाणे दक्षिणा द्यावी. गरीबांना वस्त्रे द्यावी आणि जात-गोत न विचारता भुकेलेल्यांना अन्न द्यावे. याप्रमाणे चरित्र वाचता इहपर सुख लाभते. वाचक सर्व ठिकाणी विजयी होतो व त्याच्या दर्शनाने पुण्य लाभते. भक्ती व प्रेमाने सप्ताह करताच श्री चिदंबर साक्षात दर्शन देतो आणि दिव्य ज्ञान लाभून जन्म मरण टळते. तसेच भक्तीने जे चरित्र ऐकतात. त्यामुळे त्यांचे मनोरथ पूर्ण होते. चिदंबर संप्रदायी मुख्य म्हणजे भक्तांनी पूर्ण प्रेममय व्हावे आणि काया, वाचा, मनाने सर्वांचे हृदय शांत होईल असे वर्तावे. आर्जव, सत्यसदाचरण, अक्रोध, नित्य कर्मानुष्ठान, अतिथी सत्कार आणि ब्रह्मसंतर्पण आणि प्राणीमात्रांचे ठिकाणी दयापूर्ण असावे. श्री चिदंबर भजन पूजन आणि स्वानंदामध्ये काळ व्यय आणि सद्गुरूचे अखंड नामस्मरण करून सर्वदा शांत अंत:करण असावे. धन्य तो मल्हार दीक्षित ज्याने या कलीत जड मूढभक्तांचा उद्धार करण्याकरिता अवतार करविला. त्याला साष्टांग प्रणिपात असो. ज्याप्रमाणे चातकाकरिता मेघ वर्षाव करून सर्व प्राणीमात्र सहजच तृप्त होतात किंवा स्वादिष्ट असा स्वयंपाक नैवेद्याकरिता तयार केला तर अनेक लोक आकंठ जेवून तृप्त होतात. धन्य धन्य हा चिदंबर जो

हरिहराचा पूर्ण अवतार असून जगाचा उद्धार करतो. त्याचे पदकमळी माझे नमन असो. धन्य धन्य चरित्र वाचक, धन्य धन्य दासभजक, धन्यधन्य संप्रदायिक त्याचे चरणी नमन असो.

॥ श्री चिदंबरार्पणमस्तु ॥

॥ श्री चिदंबर गुरुवे नमः ॥

शिवचिदम्बर

शिवचिदम्बर

चिदम्बरचरित्र

॥श्री॥

# श्री चिदंबर महास्वामींची आरती

शिव चिदम्बर

आरती चिदंबरा, धावा धावा हो त्वरा।
देऊनी शुद्ध मती, दैन्य दुःखा निवारा॥धृ.॥

तुझे नाम घेता घेता, घडे पुण्य सहजता।
संकटे दूर जाती, तुझी आरती गाता.....॥१॥

निर्वाणा प्रति जाया, पद तुमचे हो राया।
मार्ग वाटे मज सोपा, बाकी सर्व उपाया.....॥२॥

पापे बहू मी केली, तीच जणू फळा आली।
दुःख सागरी बुडालो, आता सावर या वेळी॥३॥

काळजी वाटे ती जीवाची, चिंता वाटे उद्याची।
व्याधी हर तू साची, शरीराची मनाची.....॥४॥

तुम्ही पूर्ण अवतार, सदाशिव शंकर।
पद दिसो तुझे आता, नाही दुसरा विचार॥५॥

आरती चिदंबरा, धावा धावा हो त्वरा।
देऊनी शुद्ध मती, दैन्य, दुःखा निवारा.....॥६॥

शिव चिदम्बर

- श्री चिदंबर भक्त सतेज केळकर



।। सावित्रि माता ।। ।। चिदंबर महास्वामी ।। ।। सरस्वती माता ।।

मूल्य रु. २२५/-

अर्चित प्रकाशन